

# शब्द रुची

४३

दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१८
मूल्य १८० रु.
पृष्ठे २१६




आमचे सर्व सभासद, ग्राहक
व सर्व हितचिंतकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!
सारस्वत बँक
मिले यहाँ, दोनो जहाँ
100
Years Young
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)
देशातील सर्वात मोठी सहकारी बँक
www.saraswatbank.com


या दीपावलीत महाबँकेच्या साथीने
आपले स्वप्न करा साकार
महासुपर होम लोन
8.75% प्रती वर्ष
787
30
महासुपर कार लोन
9.25% प्रती वर्ष
1,622
7
प्रक्रिया शुल्कामध्ये 50% सवलत
मनासारखे घर आणि मनपसंत कार खरेदी करुन दीपावलीचा आनंद द्विगुणित करा
बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बँक


# Apte FOODS

## पारंपारिक पदार्थांचा घरगुती आस्वाद मिळवा घर बसल्या!!!



- घरपोच सेवा
- १२ ही महिने सर्व पदार्थ उपलब्ध
- लग्न, मुंज इत्यादी शुभकार्यांच्या व सणासुदिच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील
- संपर्क : महेश आपटे
  ९६८९९ १३४७७ / ९४२२६ १३४७७

- चिरोटे
- करंजी
- चकली
- चिवडा
- शंकरपाळी
- बुंदी
- पापडी
- सर्व प्रकारचे लाडू
- पुरणपोळी, खवा पोळी
- गव्हाची कुरडई
- गव्हाचा चीक
- शेव, गाठीया




चकली, चिवडा, चिरोटे, बेसन लाडू व करंजी या पाच पदार्थांचा मिळून बनलेला हा रॉयल डिलाईट बॉक्स

**पाठवू शकता जगभरात कुठेही !**

आपटे फुड्स, विनायक बिल्डींग , शंकर तत्वज्ञान मंदिरा मागे , अंबाबाई देवळाजवळ, मिरज.

aptefoods@hotmail.com

Supreme® People who know plastics best

पाईपिंगचे संपूर्ण समाधान

'सुप्रीम' परिवारा तर्फे आपणा सर्वांना
दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

# शुभ दीपावली

पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची'
दर्जेदार, पर्यावरण पूरक उत्पादने...

aqua Gold® उच्च दाबाची प्लंबिंग प्रणाली

Lifeline® गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

indo green® गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली

S.W.R. ड्रेनेज प्रणाली

SKY RISE® हाय-टेक, लो नॉईज, एस.डब्ल्यू.आर. ड्रेनेज प्रणाली

Nu-Drain™ भूमिगत ड्रेनेज प्रणाली

Ultra PLUS डबल वॉल कोरोगेटेड पाईप्स्

SILTANK® ओव्हरहेड वॉटर टँक्स् अ‍ॅण्ड लॉफ्ट टँक्स्

Amrutam अंडरग्राऊंड वॉटर टँक्स्

SAFEGARD® सेप्टीक टँक्स्



दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव

फोन : 0257- 3050541,42,43,44,49 • www.supreme.co.in

आयुष्यभराची साथ...



दिपावलीच्या
शुभेच्छा !
NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
Better Rate...Higher Returns
w.e.f.22.05.2018
1 Year - upto 2 Years
FIXED DEPOSIT
QIRP
REGULAR
7.50%
SENIOR CITIZEN
7.75%
FDR/MIP/RD
8%
FOR ALL
Registered Address: Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
Customer Care: 022 28602000 I www.nkgsb-bank.com



१००%
फळं
दुसरं काहीही नाही
FRU2go
Strawberry Banana
Apple Banana
Mango
Mango Banana
Mix Fruit
शुद्ध फळांची ऊर्जा
FRU2go
शुद्ध फळांची ऊर्जा वाढवील दिवाळी उत्सव.
॥ शुभ दीपावली ॥
Jain FarmFresh
जैन फार्म फ्रेश फूड्स लि.
www.fru2go.com
Manufactured & Packed By : जैन फार्म फ्रेश फूड्स लि., जैन फूड पार्क, जैन व्हॅली, जळगाव - ४२५ ००१.
care@jainfarmfresh.com; www.jainfarmfresh.com; www.aamrus.in
fb.com/aamrus.in @_aamrus _aamrus
TOLL FREE NO. 1800 599 4000

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्मक
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

दिवाळी अंक
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८, वर्ष सहावे
अंक सहावा-सातवा, मूल्य १८० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : डॉ. वीणा सानेकर
मुखपृष्ठ, मांडणी, कथा-लेख रेखाटने : प्रदीप म्हापसेकर
कविता रेखाटने : ईशा सानेकर

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट - योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी - धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण - हरिप्रसाद जयस्वाल

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी २५० रुपये डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
% २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

ऑफिस वेळ : सकाळी ११ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी



अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत


## अनुक्रम


**१. लढाई अजून सुरु आहे...**
करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची... / १२
**डॉ. हमीद दाभोलकर**
जागे राहणे भाग आहे... / १६
**उल्का महाजन**
संघर्ष अजून सुरूच आहे... / २०
**डॉ. शमसुद्दीन तांबोळी**
दृश्य-उपयोजित कला आणि आपला समाज / २५
**डॉ. संतोष क्षीरसागर**
दडवून ठेवण्याची मानसिकता बदलणारे आंदोलन / २८
**मुमताज शेख आणि सुप्रिया जाण-सोनार**
**२. जन्मशताब्दी विशेष**
स्वरप्रेमी हे देशप्रेमी / ३२
**यशवंत देव**
एक अनोखे लावण्य... / ३५
**विनायक जोशी**
माझिया रक्तात थोडा 'गदिमांचा' अंश आहे... / ४०
**सुमित्र माडगूळकर**
अफाट अमृता प्रीतम / ४९
**रविप्रकाश कुलकर्णी**
कीर्तीमान दोनशे वर्षे / ५३
**संजीवनी खेर**
आठवणीतले 'स्नेहल' स्वर / ५६
**अरुणोदय**
व्यक्ती आणि वल्ली...आजच्या काळात / ५८
**विवेक मेहेत्रे**
**३. अनुबंध**
सोरेल व आम्ही / ६०
**नितीन अरुण कुलकर्णी**
माझा मोत्झार्ट / ६७
**शशिकांत सावंत**
आमचा ऑस्कर / ७१
**डॉ. विजय ढवळे**
**४. कथा**
अडसर / ७९
**अपर्णा महाजन**
चंद्रभागा आणि चंद्रकला / ८४
**मूळ कथा : प्रतिभा राय अनुवाद : वसुधा सहस्त्रबुद्धे**
एक्सआयझेड / ८९
**साधना गोरे**
आभाळ कोसळलंच नाही! / ९४
**हेमलता अंतरकर**

### ५. दुसरी बाजू
लेखन आणि चित्रं : एक निरंतर शोध / १००
**रत्नाकर मतकरी**
कॅमेऱ्याची नजर ओळखणारे डॉक्टर / १०७
**डॉ. अविनाश सुपे**
शब्दांचा ध्यास नि सुरांची आस... / १०६
**रामदास भटकळ**
नव्या वाटा, नवे ठसे / १०८
**दिलीप पांढरपट्टे**

### ६. स्मरणस्वर
चांदण्याची मोजदाद करणारा कवी / ११०
**मधुवंती सप्रे**
के.ज. पुरोहितांचे आत्मपर ललित लेखन / ११४
**डॉ. किशोर सानप**
अंतर्बाह्य नितळ कविता / ११९
**अंजली कुलकर्णी**

### ७. काव्यरंग
१२४/ 'तरीच' मूळ कविता : **विष्णू खरे, अनुवाद. प्रकाश भातम्ब्रेकर**, १२५ / **वसंत आबाजी डहाके**, १२५ / **सदानंद डबीर**, १२६ / **उषा मेहता**, १२६ / **वसन्त वाहोकार**, १२७ / **नीरजा**, १२७ / **प्रकाश हरी कार्लेकर**, १२८ / **चंद्रशेखर सानेकर**, १२८ / **डॉ. प्रज्ञा दया पवार**, १२९ / **गीतेश शिंदे**, १२९ / **प्रशांत असनारे**, १३० / **मोहन शिरसाट**, १३० / **कैलास दौंड**, १३१ / **उषा परब**, १३१ / **प्रतिभा सराफ**, १३२ / **संजय चौधरी**, १३२ / **भगवान निळे**

### ८. चौकटीपलीकडे
स्त्री समजून घेताना... / १३३
**किरण येले**
पुरुष समजून घेताना... / १३७
**वंदना महाजन**
दफा ४९७ अर्थात विवाहबाह्य संबंध / १४२
**धनंजय गांगल**

### ७. कलाविश्व
'कविथां'चं षांतारामीय अवकाश / १४६
**दीपक घारे**
'उपयोजित' अभिजाततेचे निर्माते 'धुरंधर' चित्रकार! / १५६
**रंजन रघुवीर इंदुमती जोशी**
स्वच्छंद कलाप्रवासी : राजाराम होले / १६६

### ८. ललित
घरा-घरातले कलाकार / १७०
**अनुराधा गांगल**
महिरपी कंस / १७३
**डॉ. वृषाली किन्हाळकर**

### ९. देश-विदेश
९/११ च्या हल्ल्याचे गौडबंगाल / १७६
**दीपक करंजीकर**
केनिया सफारी! / १८०
**गणेश कुलकर्णी**
सुख निर्देशांक / १८५
**डॉ. अनंत पां.लाभसेटवार**

रंग 'झी' मालिकाविश्वाचे... / १९०

ग्रंथाली कार्यक्रम वृत्तांत / १९३
ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / १९८
मेहता पब्लिशिंग हाऊस ग्रंथपान / २०९
ग्रंथाली ग्रंथपाने / २१०


## संपादकीय...

वाचकांच्या हाती यावर्षीचा 'शब्द रुची' दिवाळी विशेषांक देताना मनात समाधान आहे. कथा, कविता, ललित, वैचारिक लेख, कलाविश्व, संवाद-मुलाखत यांच्यासह हा अंक सजवला आहे. 'ग्रंथाली'ने नेहमीच माणसांशी जोडून घेतले आहे. समाजाच्या वाटचालीतले माणसांचे देणे हा सांस्कृतिक ठेवा आहे. तो जपणे-सांभाळणे, स्मरणात ठेवणे ही आपली सामूहिक नैतिक जबाबदारी आहे ही जाणीव या अंकातून ठसठशीतपणे व्यक्त होते (लढाई अजून सुरू आहे, जन्मशताब्दी विशेष, स्मरणस्वर हे विभाग)

आपल्याला ठाऊक असणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची दुसरी बाजू माहीत असतेच असे नाही. ती कळली की तो माणूस अधिक वाचण्याची ओढ निर्माण होते. माणसं स्वतःतूनच कशी बहरत-उगवत जातात हे समजून घेण्यात एक वेगळाच आनंद असतो. असा आनंद 'दुसरी बाजू' हा विभाग वाचकांना नक्की देईल.

साहित्याला कलात्म परिमाणाची जोड हे 'शब्द रुची'चे खास वैशिष्ट्य आहे. या अंकातील 'कलाविश्व' या विभागाची आमचे जिज्ञासू वाचक विशेष दखल घेतील असा विश्वास वाटतो. चित्रकार महादेव धुरंधर यांच्या चित्रांचे पाच मजली चित्रप्रदर्शन चित्रकार सुहास बहुळकर यांच्या संकल्पनेतून मुंबईत आकाराला आले. 'आपल्या मातीत घडलेल्या पूर्वसुरींनी काय नवे केले, याचा संशोधनपूर्ण शोध' असे या प्रयत्नाचे वर्णन करता येईल. असे आदर्श नव्या पिढीसमोर ठेवण्याची नितांत गरज आहे. माझ्यासोबत बीएच्या निवडक विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहिले. तेव्हा त्यातली एक म्हणाली, ''मॅडम, आज खऱ्या अर्थाने शिकलो.'' तिचे हे एकच वाक्य खूप काही सांगून जाणारे आहे. सोबतच्या काही मुलींना उपजतच चित्रकलेची आवड होती पण पुढे-पुढे अभ्यासाच्या धाकात नि रेट्यात चित्रकला खूप मागे राहिली. म्हटलं तर हे एक

छोटेसे निरीक्षण पण कलेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनही ते सांगून जाणारे आहे. 'कलाविश्व'मध्येच वाचकांना एका स्वच्छंदी अवलिया चित्रकारची भेट घडवतो आहोत. कलावंताचे जग हे त्याचे स्वतःचे जग असते. या जगात तो चित्रभाषेची उलटापालट करतो, काव्यभाषेची मोडतोड करतो किंवा इतरही कलांचे घटक घेऊन नवं सृजन करतो. षांताराम पवारांच्या 'कविथा'मधला अवकाशही 'कलाविश्व' मधून जिवंत झाला आहे.

आपली क्षमता पणाला लावून लढत राहणे ही सामाजिक दृष्ट्या महत्त्वाची प्रक्रिया आहे. लढण्याची जोखीम न घेता शस्त्र टाकून मोकळी होणारी माणसं अलीकडे वाढत असताना हाती घेतलेल्या कामाच्या क्षेत्रात झोकून देऊन काम करत राहणारी माणसे अजूनही अवतीभवती आहेत; हे काय कमी आहे? यादृष्टीने 'लढाई अजून सुरू आहे' हा विभाग अधोरेखित करायला हवा. कधी हक्कांसाठी, तत्त्वांसाठी, न्यायासाठी तर कधी परिवर्तनासाठी सुरू असलेल्या लढ्यामुळे खरं तर सबंध समाज ढवळून निघायला हवा पण आज समाजातील आर्थिकदृष्ट्या स्थैर्य लाभलेल्या वर्गाने अशा लढ्यांपासून स्वतःला तोडून घेतले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या लढ्यांशी त्यांचा संबंध उरलेला नाही. वास्तवाचा असाच एक आरसा अमृता प्रीतमच्या कवितेतून चकचकतो आहे. हा तुकडा दीर्घकाळ मनात रेंगाळत राहिला आहे.

अस्पतालके दरवाजेपर कुछ लफ्ज बीमार पडे हैं

हक, सच, ईमान और कद्र

पुढे ती म्हणते, 'कुणीतरी प्रिस्क्रिप्शन लिहून देईल, 'कदाचित ते लागूही पडेल पण तूर्त तरी या शब्दांचे दिवस संपल्यातच जमा आहेत.' तिच्या शब्दांत सांगायचं तर- लगता है कि इनके दिन अब पूरे हो चुके। अशा विपरीत वास्तवातही झुंजणारे झुंजत राहतात, लढणारे लढत राहतात. या लढ्यांची चित्रे साहित्यातून उभी राहिली पाहिजेत. ती माणसांमध्ये निखारे धगधगत ठेवतील, म्हणून तर लिहित्या माणसाचे शब्द मौलिक आहेत- हा लिहिता माणूस काय करतो? अमृता प्रीतमचेच 'मन मंथनकी गाथा' वाचत होते. ती एका लेखात लोककथेचा संदर्भ देते. ही लोककथा अशी आहे की एकेकाळी आकाश खूप खाली होते. त्यामुळे माणसांना खाली वाकून चालायला लागायचं. एकदा पक्ष्यांना असं वाटलं की आकाश जरा वर उचललं तर 'माणसं' ताठ मानेने चालायला लागतील. पक्ष्यांनी खरोखरच एकत्र येऊन प्रयत्न केला आणि आकाश थोडं वर खेचलं. मग माणसं ताठ चालू लागली. पक्ष्यांनी केवढं मोठं काम केलंय हे! लिहिता माणूसही या पक्ष्यांसारखा असतो. तो आपल्याकरता आकाश वर खेचत राहतो; त्यामुळे पतन झाल्यावरही पुन्हा उठून उभे राहण्याचे बळ समाजाला मिळते.

पक्षी हे शांततेचे, आनंदाचे, चांगुलपणाचे, स्वातंत्र्याचे, मोकळ्या विचारांचे, भयमुक्त मनाचे प्रतीक! विशाल आकाशाचा भव्य पट आणि चिमुकला पक्षी- त्या आकाशाकडे झेपावण्याचे धैर्य बाळगणारा!

पक्ष्यांवरून आठवलं, माझी मुलगी शाळेत शिकत होती. तेव्हाची गोष्ट! ती एकटीच असल्याने अनेक मानसिक स्थित्यंतरातून जात होती. एकदा आमच्या घरालगतच्या रस्त्यावर एक नवं दुकान सुरू झालं. त्यात किलबिलणारे रंगीबेरंगी लव्हबर्ड्स होते. ती रोज तिथे जाऊन पहात बसे. मग पठ्ठीने हट्ट करून एक पक्ष्यांची जोडी घरी आणायलाच लावली. हे पक्षी घरी आल्यावर ती अधिक धीट बनली. घरी एकटे राहावे लागले तरी तिला भीती वाटेनाशी झाली. पक्ष्यांसोबत राहणे तिला अतिशय सुरक्षित वाटू लागले. त्यांच्या सोबत असण्याने ती आतून बदलली. पक्षी-प्राण्यांशी जुळलेला अनुबंध भावनिकदृष्ट्या आधार देतो. या 'अनुबंधा'चे निवडक रंग पकडण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे.

कार्यकारी संपादकाला साहित्याची निवड करावीच लागते. राग-रोष ओढवून घ्यावे लागतात. माणसांना (शक्यतो) न दुखवता मजकुराला कधी-कधी कात्री लावावी लागते. अशा सर्वच कसरतींसकट यंदाचा 'शब्द रुची' तयार झाला. त्याच्या घडणीत लेखकांचे, कवींचे, अभ्यासकांचे योगदान पहिले! त्यांच्या शब्दांनीच तर तो साकारला, पण त्या शब्दांना सजावटीचे योग्य कोंदणही तितकेच अपरिहार्य! या अंकाची मांडणी चित्रकार प्रदीप म्हापसेकर यांनी केली, तसेच त्यांच्या आशयपूर्ण रेखाटनांनी कथा व ललित लेखांचे सौंदर्य वाढवले. प्रदीप म्हापसेकर यांचेच या अंकाकरता केलेले मुखपृष्ठ अनेक अर्थांनी बोलके आहे. अस्वस्थ काळाच्या पोटातील नकारात्मकतेला छेद देऊन सकारात्मक जाणिवांचे स्वागत करणारे आहे. दिवाळीच्या मंगल सणाच्या पार्श्वभूमीवर वाचकांना ते आनंददायी वाटावे.

यावर्षी विविध लेखांचे शब्दांकन, त्याकरता लेखकांशी- कलावंतांशी संवाद, मुलाखत या जबाबदाऱ्या श्रद्धा पेडणेकर या पत्रकार मैत्रिणीने घेतल्या. तिची कामामधली तन्मयता मला उर्जा देत राहिली.

वसंत आबाजी डहाकेसरांनी त्यांच्या कवितेसोबत त्यांचे रेखाटनही पाठवले, त्यांचे मनःपूर्वक आभार. कवितांची अन्य रेखाटने ईशा सानेकरची. 'शब्द रुची'च्या माझ्या प्रवासात तिची साथसोबत नेहमीच असते.

या अंकाकरता सुदेश हिंगलासपूरकर यांनी जे स्वातंत्र्य मला दिले, त्याबद्दलचे ऋण शब्दातीत आहे. 'ग्रंथाली'च्या योगिता मोरेसोबत काम करताना मी आश्वस्त असते. शब्दांची जाण ठेवून ती अक्षरजुळणीकरता मनापासून अथक परिश्रम घेते. त्यामुळे 'शब्द रुची' सर्वांगसुंदर होतो. अनिरुद्ध गद्रे, धनश्री धारप, हरिप्रसाद जयस्वाल, नंदिनी पाटील आणि 'ग्रंथाली'ची उत्साही टीम माझा उत्साह कायम टिकवून ठेवते हे नोंदवलेच पाहिजे.

मनातली सर्व जळमटं काढून टाकून, सगळ्या भयावर मात करून निर्भयपणे, उन्मुक्तपणे येणाऱ्या काळाला सामोरे जाऊया... गगनालाच नवे पंख देऊया, अशा भरभरून शुभेच्छा!


– डॉ. वीणा सानेकर

सी-१२, सुयोग सोसायटी,


संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६

veenasanekar2018@gmail.com



# ती लिहू लागली अन्
# जगण्याचे सारे रंग कागदावर अवतरले...
# अशा 'ती'च्या गोष्टी...



तिचा निर्णय वैवाहिक नातं तुटण्याच्या विदारक अनुभवाला नव्या चेतनेत रुपांतरित करतो आणि ती जगभरातल्या जोडप्यांची आदर्श ठरते.

'A Year By The Sea'
या इंग्रजी पुस्तकाचा
अनुवाद

## समुद्रकाठचे एक वर्ष

**जोआन अँडरसन**
अनुवाद
**अरुंधती चितळे**

जागतिक अर्थशास्त्रज्ञ,
पद्मभूषण पद्मा देसाईंचा
लोकल ते ग्लोबल प्रवास...



'Breaking Out'
या इंग्रजी पुस्तकाचा
अनुवाद

## बंधमुक्त होताना...

**पद्मा देसाई**
अनुवाद
**सुनंदा अमरापूरकर**



एका मनस्वी द्विखंडीय प्रवासातली
कलंदर कलाकारी

## मॅग्नोलिया

**लेखिका - अनिता कुलकर्णी**

लेकीचं बोट पकडून भूतकाळाशी लढणारी आई आणि आईच्या सामर्थ्याला नवसंजीवनी देणारी लेक... मायलेकींची हृदयस्पर्शी गोष्ट...



## माय डॉटर माय मदर

**ॲनी मरे**
अनुवाद : **रमा नाडगौडा**



बर्मातील लोकशाहीच्या आग्रहास्तव सर्वस्व झोकून देणाऱ्या ब्रह्मकन्येची सत्यकथा

'Little Daughter'
या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद

## ब्रह्मकन्या

**झोया फन आणि डेमियन लुईस**
अनुवाद
**श्रद्धा भोवड**

मेहता पब्लिशिंग हाऊस

Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta Books
950+ Marathi books
Available as e-Book
WhatsApp us on 9420594665

Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book - play.google.com/store/books
www.amazon.in


# करु नका एवढ्यात चर्चा पराभवाची...

डॉ. हमीद दाभोलकर


**विवेककारण हा सध्याच्या राजकारणाचा चेहरा-मोहरा बदलणारे एक साधन व्हावे ही डॉ. नरेंद्र दाभोलकरांची तळमळ होती. राजकारण, अर्थकारण व धर्मकारणाच्या बरोबरीने विवेककारण समाजमनात रूजवण्याची त्यांची धडपड होती. तीच धडपड कृतिशीलपणे पुढे नेण्याचा प्रयत्न कार्यकर्ते प्रामाणिकपणे करीत आहेत. 'अंनिस'च्या सातत्यपूर्ण लढाईचा हा डॉ. हमीद दाभोलकर यांनी मांडलेला ओजस्वी प्रवास...**

२० ऑगस्ट २०१३ ला डॉ नरेंद्र दाभोलकर ह्यांचा पुण्यात दिवसाढवळ्या निर्घृण खून करण्यात आला. ह्या घटनेला मागील महिन्यात पाच वर्षे पूर्ण झाली.

सातत्याने केलेल्या पाच वर्षांच्या संविधानिक लढाईनंतर गेल्या दोन महिन्यांमध्ये तपासाने गती घेतलेली दिसत आहे. गौरी लंकेश ह्यांच्या खुनाच्या तपासात झालेली प्रगती, त्यातून पुढे नालासोपारा येथे मोठ्या प्रमाणात स्फोटके सापडणे आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर खुनाच्या तपासात सीबीआयने केलेले अटकसत्र अशा काही महत्त्वाच्या घटना घडत आहेत.केवळ भारतातच नव्हे तर जगभरात उन्मादी शक्तींचे प्राबल्य वाढत चालले आहे. समाजमाध्यमांमधून पसरवला जाणारा विद्वेष आणि समाजात वाढणारे विद्वेषाचे वातावरण हे कोणत्याही संवेदनशील माणसाला व्यथित करेल असे आहे. जरी डॉक्टर दाभोलकरांच्या मारेकऱ्यांना अजून शिक्षा झाली नसली तरी ज्या विचारांनी दाभोलकरांचा खून केला त्याच्या विरोधात 'अंनिस'चे कार्यकर्ते खंबीरपणाने उभे आहेत. ज्या विचारांसाठी डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांनी आपले विचार पणाला लावले ती सातारा जिल्ह्यातून सुरू झालेली चळवळ आज केवळ परराज्यात नाही तर परदेशात देखील आपला प्रभाव निर्माण करीत आहे.



डॉ दाभोलकरांच्या खुनाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे मारेकरी आणि त्यामागचे सूत्रधार पकडले जावे ह्यासाठी लढाई देणे हा 'अंनिस' समोरचा सगळ्यात जास्त प्राधान्याचा प्रश्न होता. ह्यामधील सगळ्यात महत्त्वाची, नोंदवण्याजोगी गोष्ट म्हणजे 'अंनिस'ने गेल्या चार वर्षातील ही लढाई संविधानिक मार्गाने केली. डॉ. दाभोलकरांच्या खुनाच्या नंतर महाराष्ट्रात एकही हिंसक प्रतिक्रिया उमटली नाही. तीनशे शाखा आणि पाच हजारच्या आसपास कार्यकर्त्यांची संख्या असलेल्या संघटनेला







हिंसक प्रतिक्रिया देणे हे अजिबात अवघड नव्हते. खरे तर त्यासाठी एवढ्या कार्यकर्त्यांची देखील गरज नाही, पण आपली लढाई संविधानिक राहील ह्यासाठी मात्र कसोशीने प्रयत्न करावे लागतात. ते 'अंनिस'ने सातत्याने केले. निषेधाचे सर्व संविधानिक मार्ग आम्ही वापरले. धरणे, निवेदने, मोर्चे ह्या नेहमीच्या गोष्टी तर झाल्याच पण प्रत्येक वीस तारखेला ज्या विठ्ठल रामजी शिंदे पुलावर डॉ. नरेंद्र दाभोलकरांना गोळ्या घालण्यात आल्या तेथे जमून निदर्शने करणे, मॉर्निंग वॉकला जाताना दाभोलकर आणि पानसरे ह्यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी निर्भय मॉर्निंग वॉकचे आयोजन करणे, दर वीस तारखेला रक्तदान शिबिरांचे आयोजन, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून निषेध व्यक्त करणे असे अनेक मार्ग आम्ही अवलंबले. रिंगणनाटकांसारख्या कलेच्या माध्यमातून एका बाजूला आपला निषेध व्यक्त करणे आणि दुसऱ्या बाजूला आपल्या वेदनेची अभिव्यक्ती करणे असे देखील मार्ग आम्ही अवलंबले आहेत. न्यायालयीन लढाई आणि माध्यमांच्या सहाय्याने लढाई ह्या दोन मार्गांचा आम्ही वापर केला. आज तपासामध्ये जी काही प्रगती दिसते आहे ती त्यामुळेच शक्य झाली असे म्हणणे ही अतिशयोक्ती ठरणार नाही.

दलित समाजावरील शतकानुशतके झालेल्या अन्यायाला हिंसेच्या ऐवजी संविधान निर्मितीने लढा देणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरांचा आणि 'अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी माझी मरण्याची तयारी आहे पण कितीही गंभीर कारणासाठी माझी दुसऱ्याला ठार मारण्याची तयारी नाही' असे सांगणाऱ्या गांधींच्या विचारांचा वारसा पुढे चालवण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. ज्या कालखंडामध्ये आपल्या देशावर परकीय राज्य होते, आपली राज्यघटना अस्तित्वात नव्हती, त्यावेळी देखील आपण अहिंसेने यशस्वी लढा दिला आहे. त्यामुळे स्वकीयांच्या मनातील अपप्रवृत्तीविरोधातला आपला लढा हा देखील संविधानाच्या चौकटीतच लढला पाहिजे हा 'अंनिस'चा आग्रह राहिलेला आहे. कदाचित वेळ लागेल, कदाचित आपल्याला हयातीत पूर्ण न्याय मिळणार नाही पण लोकशाही व्यवस्थेमध्ये ही लढाई अटळ आहे. ''मी ज्या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रामध्ये काम करतो आहे त्या क्षेत्रातील लढाई ही काही दशकांची नाही तर काही शतकांची आहे असे डॉ. दाभोलकर म्हणत असत. तशीच ही देखील लढाई शतकांची आहे'' ह्याचे भान ठेवूनच ही लढाई लढली जात आहे.

ज्या विचारांचा प्रसार थांबावा म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा खून झाला त्या विचारांचा प्रचार, प्रसार आणि संघटन हे देखील ह्या हिंसेला दिलेले एक सकारात्मक उत्तरच आहे. दहशत निर्माण करणे हे बहुतांश हिंसेच्या मागचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते. ते साध्य न होता उलटपक्षी लोकांमधील निर्भयता वाढीला लागली तर हिंसेचा वापर फोल ठरू शकतो. त्या दिशेने जे काम 'अंनिस'ने केले त्यामधील सगळ्यात महत्त्वाची लढाई होती जादूटोणाविरोधी कायद्याची. ज्या कायद्यासाठी डॉ. नरेंद दाभोलकर ह्यांनी जीवाचे रान केले होते, तो मंजूर करून घेणे हे 'अंनिस'साठी अत्यंत महत्त्वाचे होते. ह्या कायद्याचा अध्यादेश शासनाने डॉ. नरेंद्र दाभोलकर ह्यांच्या खुनाच्यानंतर लगेच काढला असला तरी प्रत्यक्षात तो कायदा पुढील सहा महिन्यांच्या आत विधिमंडळात मंजूर करून घेणे ही लढाई 'अंनिस'ला लढावी लागली. सातत्याने होणारे खोटे आणि दिशाभूल करणारे आरोप ह्यांना सामोरे जात 'अंनिस'ने हे घडवून आणले. पुरोगामी कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्यांच्या अंमलबजावणीमध्ये पुरेसे लक्ष दिले गेले नाही हा भारताचा इतिहास आहे, हे लक्षात घेऊन जादूटोणाविरोधी कायद्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात प्रभावी व्हावी म्हणून 'अंनिस'ने कंबर कसली. आज अखेर या कायद्यांतर्गत महाराष्ट्रात चारशेहून अधिक केसेस दाखल झालेल्या आहेत. ह्या कायद्याविषयी समाजाचे प्रबोधन करणारी यात्रा महाराष्ट्राच्या ३५ जिल्ह्यांमध्ये 'अंनिस'चे कार्यकर्ते स्वयंसेवी पद्धतीने घेऊन गेले. महाराष्ट्रात हा कायदा झाल्यानंतर कर्नाटक, तामिळनाडू, आसाम, हरियाणा, छत्तीसगड अशा राज्यांमध्ये तसेच केंद्र पातळीवर देखील हा कायदा व्हावा ह्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

नोंद करावी असा महत्त्वाचा भाग असा की ह्या कायद्याने सत्यनारायण पूजा करणे, पंढरीची वारी ह्यावर बंदी येईल असा अपप्रचार मोठ्या प्रमाणात केला गेला होता. आज कायदा अस्तित्वात येऊन चार वर्षे झाली पण प्रत्यक्षात असे काहीही झालेले नाही. हा कायदा केवळ हिंदू धर्माच्या विरोधात आहे असा देखील अपप्रचार मोठ्या प्रमाणात केला गेला होता. प्रत्यक्षात कायद्याअंतर्गत पहिला गुन्हा मुस्लीम बाबाच्या विरोधात नोंदला गेला. ह्या सगळ्यामुळे कायद्याविषयी अपप्रचार करणाऱ्या संघटनांचे पितळ उघडे पडले.

दुसरी तितकीच महत्त्वाची लढाई होती जातपंचायती विरोधातील सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्याची. जातपंचायती (खापपंचायती) ह्या केवळ दूर हरियाणा आणि पंजाब ह्या राज्यांमध्ये असतात असा आपला समज होता. त्यांचे अस्तित्व महाराष्ट्रात असेल असे कुणासही वाटत नव्हते. मात्र डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या निर्घृण खुनाच्या बरोबर दीड महिना आधी २६ जून २०१३ला नाशिकमध्ये प्रमिला कुंभारकरच्या वडिलांनी नऊ महिन्यांच्या गरोदर प्रमिलाचा तिच्या वाढदिवशी हाताने गळा आवळून खून केला. यामागे जातपंचायतीचे वास्तव असल्याचे कार्यकर्त्यांनी शोधून




प्रबोधनासाठी रिंगणनाट्य

काढले आणि 'अंनिस'ने जातपंचायतीच्या मनमानी विरोधात लढा उभारला. जातीच्या नावावर होणारे शोषण हे केवळ एका जातीकडून दुसऱ्या जातीतील लोकांचे होते असा एक समज प्रचलित आहे. पण जातपंचायतीच्या शोषणाच्या एक-एक घटना जशा समोर येऊ लागल्या तसे जाती अंतर्गत होणाऱ्या शोषणाचे भयावह रूप लोकांच्या समोर येऊ लागले. जातपंचायती किवा गावकीच्या पंचांनी स्वतःच्या जातीसाठी अथवा समजासाठी बनवलेले नियम असतात. हे नियम अनेक पिढ्यांपासून चालत आले असतात. ह्या लढ्यामधून असे देखील पुढे आले की जातपंचायतीचे अस्तित्व हे केवळ भटक्या आणि विमुक्त समाजामध्येच नसून तथाकथित उच्च जातींमध्ये देखील आहे. थोडे खोलात जाऊन तपासले तर आपल्या लक्षात येते की जातपंचायत अथवा गावकी केवळ व्यक्तीला बहिष्कृतच करीत नाही तर हे पंच न्यायनिवाडे करतात आणि शिक्षाही देतात. गेल्या चार वर्षांमध्ये आलेल्या तक्रारींमध्ये नवविवाहितांना कौमार्य चाचणी द्यावयास लावणे, उकळत्या तेलात हात घालून पातिव्रत्य सिद्ध करायला लावणे, आर्थिक दंड करणे लग्न तोडण्याचे आदेश देणे अशा अनेक घटना पुढे आल्या आहेत. जातपंचायत किवा गावकी म्हणजे केवळ सामाजिक बहिष्कार नसून ती एक समांतर (अ)न्याय व्यवस्था आहे. देश स्वतंत्र झाल्यावर इतर सर्व व्यवस्था बंद करण्यात आली. अगदी संस्थानेही बरखास्त करण्यात आली. मात्र जातपंचायती आणि गावकी मात्र टिकून राहिल्या. डॉ. नरेंद्र दाभोलकर ह्यांच्या खुनाच्या धक्क्यातून पूर्ण सावरले नसतानाही 'महाराष्ट्र अंनिस'ने अतिशय निर्धाराने ही लढाई लढवली. गेल्या चार वर्षांमध्ये अडीचशेपेक्षा अधिक सामाजिक बहिष्काराच्या घटना 'अंनिस'च्या कार्यकर्त्यांनी उपलब्ध कायद्याच्या चौकटीत सोडवण्याचा प्रयत्न केला. नाशिक, लातूर, जळगाव, रायगड, पुणे ह्या महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये जात पंचायतीला मूठमाती देण्याकरता परिषदा घेतल्या आणि कायद्याची मागणी लावून धरली. एवढेच नाही तर केवळ प्रबोधनाच्या जोरावर गेल्या चार वर्षांमध्ये महाराष्ट्र 'अंनिस'ने अकरा जातपंचायती बरखास्त करण्यात यश मिळवले. अहमदनगर जिल्ह्यातील मढी येथे भरणारी सर्वात मोठी जातपंचायत थांबवण्यात कार्यकर्त्यांना यश आले. अनेक सामाजिक संघटनांनी देखील हळूहळू हा मुद्दा उचलून धरला. उच्च न्यायालयाने राज्यशासनाला हा कायदा करण्यासाठी निर्देश दिले. ह्या सगळ्याला सकारात्मक प्रतिसाद देत राज्यशासनाने देखील हा कायदा करण्यासाठी सकारात्मक पावले उचली आणि त्याला विरोधी पक्षांनी देखील साथ दिल्याने हा कायदा अस्तित्वात आला.

'अंनिस'ही काही राजकीय संघटना नाही असे असताना केवळ सामाजिक घुसळणीच्या जोरावर समाजहिताचे दोन कायदे संघटनेने मंजूर करून घेतले. ते देखील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, हे नोंद करणे महत्त्वाचे वाटते.

ह्या दोन कायद्यांच्या बरोबरीने 'अंनिस'ने सुरू केलेल्या पर्यावरणपूरक गणेशविसर्जनाच्या मोहिमेला आज समाज आणि शासन ह्या दोन्हीची मान्यता मिळते आहे. वीस वर्षांपूर्वी ज्या कोल्हापुरात 'विसर्जित गणपती दान करा' मोहिमेसाठी 'अंनिस'च्या कार्यकर्त्यांना मार खावा लागला होता, तिथे ह्या वर्षी दोन लाखापेक्षा अधिक गणेशमूर्ती दान केल्या गेल्या. 'फटाकेमुक्त दिवाळी', 'होळी लहान करा, पोळी दान करा' हे उपक्रम देखील अंनिस आज त्याच जोमाने चालवीत आहे. ह्या उपक्रमांचा देखील समाज स्वीकार करीत आहे. 'अंनिस'च्या वार्षिक नियोजनातील एकही कार्यक्रम डॉ. दाभोलकरांच्या खुनानंतर रद्द झालेला नाही आणि एकही कार्यकर्ता काम करायचे थांबला नाही. उलट संघटनेच्या शाखांची आणि कार्यकर्त्यांची संख्या वाढत आहे.

नोंद करण्याची आणखी एक महत्वाची बाब अशी की हे संघटित काम महाराष्ट्रात उभे राहिले ते पूर्णपणे समाजाने दिलेल्या पैशावर उभे राहिले. महाराष्ट्रभर विकेंद्रित पद्धतीने चालणाऱ्या

'अंनिस'च्या कामाला लागणारे सर्व पैसे कार्यकर्ते समाजातून जमवतात व समाजदेखील ह्यासारख्या प्रवाहाविरूद्ध पोहतानाच्या कामाला मदत करतो हे नोंद घेणे महत्त्वाचे आहे. दुसरी तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे, लोकशाही पद्धतीने जातपात निरपेक्ष संघटना चालवण्याची. 'अंनिस'मध्ये सर्व निर्णय लोकशाही पद्धतीने घेतले जातात व सर्व जातिधर्मांचे प्रतिनिधी दिसतात. त्यामुळेच डॉ. दाभोलकरांच्या क्रूर हत्येनंतरदेखील 'अंनिस'ची चळवळ खंबीरपणे उभी आहे. 'अंनिस'च्या वार्षिक नियोजनातील प्रत्येक कार्यक्रमापर्यंत सर्व कार्यकर्ते दुप्पट जोमाने काम करीत आहेत. डॉ. दाभोलकरांचे स्वप्न होते की, आपले काम अंधश्रद्धा निर्मूलनापासून सुरू झाले असले तरी ते विवेकनिष्ठ समाजनिर्मितीपर्यंत जावे. त्यामुळेच जोडीदाराची विवेकी निवड, आंतरजातीय आंतरधर्मीय विवाहांना सहाय्य, व्यसनविरोधी युवा निर्धार, संविधान बांधिलकी महोत्सव असे अनेक विवेकाच्या कामाचे आयाम 'अंनिस'च्या चळवळीला देण्याचा डॉ. दाभोलकरांनी सातत्याने प्रयत्न केला. भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत सामान्य नागरिकांविषयी उत्तरदायित्व मानणारे शासन ह्या समाजात रूजावे यासाठी केलेले हे विवेककारण हा सध्याच्या राजकारणाचा चेहरा-मोहरा बदलणारे एक साधन व्हावे ही डॉ. दाभोलकरांची तळमळ होती. राजकारण, अर्थकारण व धर्मकारणाच्या बरोबरीने विवेककारण समाजमनात रूजवण्याची त्यांची धडपड होती. तीच धडपड कृतिशीलपणे पुढे नेण्याचा प्रयत्न कार्यकर्ते प्रामाणिकपणे करीत आहेत.

केवळ 'अंनिस' नाही तर डॉ नरेंद दाभोलकरांनी हाती घेतलेले प्रत्येक काम आज त्याच जोमाने चालू आहे. 'अंनिस' बरोबरीने साधना, सामाजिक कृतज्ञता निधी आणि परिवर्तन ह्या आणखी तीन संस्था उभ्या करण्यात डॉ नरेंद्र दाभोलकर ह्यांनी आपले योगदान दिले.

'साधना साप्ताहिक' केवळ आपला वैचारिक पोत टिकवून आहे असे नाही तर तो विस्तारत आहे. साधनेचा प्रकाशन विभाग, बालकुमार आणि युवा विशेषांक हे आज महाराष्ट्रात आपला वेगळा ठसा उमटवत आहेत. 'परिवर्तन' ही आज 'व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्याच्या' क्षेत्रात काम करणारी महत्त्वाची संस्था समजली जाते. 'सामाजिक कृतज्ञता निधी' (साकृनी) हा देखील जनतेच्या पैशातून उभा राहिलेला, पूर्ण वेळ सामाजिक कार्यकर्त्यांना मानधन देणारा आणि गेली पंचवीस वर्षे कृतिशील असलेला असाच एक अत्यंत अभिनव उपक्रम आहे. तो देखील तितक्याच जोमाने सुरू आहे. ह्या प्रत्येक संस्थेची जबाबदारी ही त्यासाठी डॉ. दाभोलकरांनी घडवलेले तरुण सांभाळत आहेत. साधनाची जबाबदारी विनोद शिरसाट, 'अंनिस'ची जबाबदारी अविनाश पाटील आणि संघटनेची कार्यकारी समिती, साकृनीची जबाबदारी सुभाष वारे आणि सहकारी पार पडत आहेत हे नमूद करणे महत्त्वाचे आहे.

तुम्हाला स्वतःवर हल्ला होईल अशी भीती वाटत नाही का? असा प्रश्न जेव्हा विचारला होता तेव्हा दाभोलकर म्हणाले होते की, 'जर माझ्यावर हल्ला झालाच आणि त्यामध्ये माझे बरे वाईट झाले तर मला ही खात्री आहे की चळवळ थांबणार नाही, ती दुप्पट जोमाने पुढे जाईल.' आज जरी डॉ. दाभोलकरांचे मारेकरी सापडले नसले तरी डॉ. दाभोलकारांचा विश्वास खरा ठरला आहे. हयात नसलेले दाभोलकर विचारांच्या मारेकऱ्यांना अधिक त्रासदायक ठरणार आहेत. डॉ. दाभोलकरांचे शरीर नष्ट केले तरी त्यांनी या समाजामध्ये रूजवलेले विवेककारणाचे बीज सहजासहजी नष्ट होणार नाही.

*करू नका एवढ्यात चर्चा पराभवाची*
*रणात आहेत झुंजणारे अजून काही*

ह्या सुरेश भट यांच्या गझलेमधील पुढच्या दोन ओळी,

*विझून माझी चिता युगे लोटली तरीही*
*विझायचे राहिले निखारे अजून काही*

ह्या ओळी ऐकताना काव्यात्मक वाटतात पण डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे असंख्य कार्यकर्ते ते निखारे बनण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.

**– डॉ हमीद दाभोलकर**
भ्रमणध्वनी : ९८२३५५७५३१
hamid.dabholkar@gmail.com

**ग्रंथाली**




## कहाणी सार्वमताची – निपुण विनायक

### अनु. सचिन रोहेकर

एका सनदी अधिकाऱ्याच्या अनुभवांचे कथन असलेले हे पुस्तक म्हणजे जनसहभागी लोकशाहीच्या-निगुतीने राबविलेल्या प्रात्यक्षिकाचा सिद्धहस्त नमुना आहे. हा असा प्रवास आहे की जेथे क्षमता आणि आव्हानांचा अतीव बारकाईने विचार करावा लागतो; अंमलबजावणीच्या प्रत्येक पातळीवर पारदर्शकता, उत्तरदायीत्व यांवर कटाक्ष ठेवून कृतिशील आणि संस्थात्मक सहभाग यांचा मेळ घालावा लागतो. ही तत्त्वे तळागाळात सुरू असलेल्या कामात लागू करण्याच्या प्रयत्नांचा या अधिकाऱ्याने शब्दबद्ध केलेला हा अनुभववजा दस्तावेज अत्यंत मौल्यवान ठरतो. 'कहाणी सार्वमताची' या त्यांच्या प्रयोगाने महाराष्ट्राच नव्हे तर देशाचे लक्ष वेधून घेतले आहे.

**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

# जागे राहाणे भाग आहे...

उल्का महाजन

**सर्वहारा जनआंदोलनाने कातकरी आदिवासींच्या डोळ्यांत स्वप्न जागवली. शिक्षण, आरोग्याचे हक्क, मारहाण-अत्याचारांविरोधात लढे अशा विविध माध्यमांतून संघर्ष पेटता ठेवला. जागतिकीकरणानंतर विकासाचे प्रश्न अधिकाधिक तीव्र होत गेले आहेत. उल्का महाजन मांडताहेत, विकासाच्या तथाकथित समीकरणांमागे दडलेले चिंताजनक वास्तव...**

**मा**नवी संस्कृतीचा इतिहास हा विविध प्रकारच्या संघर्षाचा इतिहास आहे. निसर्गाच्या लहरींशी संघर्ष, परिस्थितीशी संघर्ष, हिंस्त्र प्राण्यांशी संघर्ष, अमानुषतेविरोधी संघर्ष, अज्ञानाशी संघर्ष वगैरे. संघर्ष आणि परिस्थितीशी समायोजन करतच मानवाची वाटचाल होत आली आहे. तरीही आधुनिक व स्वत:ला पुढारलेला मानणारा समाज संघर्ष म्हटलं की अंग काढून घेतो. सामाजिक कामातदेखील सेवाभावी कामाला, रचनात्मक कामाला जेवढी मान्यता आहे तेवढी संघर्षाला मिळत नाही. वास्तविक संघर्षातून उभी राहणारी रचना ही दीर्घकाळ टिकणारी व लोकसहभाग असणारी असते, पण अन्यायाविरुद्द लढायला शोषित वर्गाला तयार करणे यापेक्षा अन्यायाला बळी पडलेल्यांची सेवा करणे याला अधिक मान्यता आहे.

त्यामागे अर्थातच प्रस्थापित वर्गाचे हितसंबंध राखण्याचे राजकारण असते. समाज जितका दुबळा राहील तेवढे त्यांचे फावत असते. मात्र समतेसाठी, न्यायासाठी लढणाऱ्यांना, परिवर्तनाचे स्वप्न पहाणाऱ्या प्रत्येकालाच संघर्ष अपरिहार्य असतो.

आम्ही संघटना बांधली ती शोषणाविरुद्ध लढण्यासाठीच. समाजातल्या, देशांतल्या वेगवेगळ्या उतरंडी, त्यातून येणारी सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विषमता अनेक अमानवी प्रकारांना जन्म देते. त्यांना मुळापासून बदलायचं असेल तर प्रस्थापितांशी टक्कर घ्यावीच लागते.

रायगड जिल्ह्यात कातकरी आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेची बांधणी सुरू झाली १९९० साली.

कातकरी आदिवासींचे प्रश्न, त्यांचे जगणे पाहता त्यांच्याकडून काय-काय हिरावले गेले आहे हे लक्षात आले आणि सर्वहारा म्हणजे काय ते समजू लागले आणि संघटनेचे नाव ठरले 'सर्वहारा जन आंदोलन'. कातकरी समाजाकडून त्यांच्या हातातले कौशल्य, जगण्याची साधने, त्यांची संस्कृती तर हिरावली गेली होतीच पण त्यांचा आत्मसन्मान, स्वाभिमान व आत्मविश्वास देखील हिरावला गेला होता. डोळ्यातले स्वप्न संपवण्यात आले होते. खूप काही मुळापासून समजून घ्यावे, उभारावे लागणार होते. त्यासाठी त्यांना लुटणाऱ्या प्रस्थापितांशी संघर्ष अटळ होता. मग सुरू झाला न्याय्य मजुरीसाठी लढा. पाठोपाठ जमीन व जंगलावर अधिकार मिळवण्याचा संघर्ष. हे करताना जागवायची होती त्यांच्या डोळ्यातील स्वप्ने आणि स्वत:च्या मनगटातल्या ताकदीवरचा विश्वास. संघर्षाच्या वाटेवर हे दोन्ही गरजेचे, दिशा ठरवण्यासाठी तसेच स्वत:ला सिद्ध करण्यासाठी! यासाठी खूप प्रयोग करत गेलो.

पहिलीच मजुरांची परिषद पार फसली. तयारी खूप झालेली, पण परिषदेत दोन-चारच लोक उपस्थित होते.




जमिनदार मंडळींनी आमची प्रचंड खिल्ली उडवली. या अपयशाची कारणं शोधताना बुजुर्गांनी सल्ला दिला. लोकांनी न येऊन तुम्हाला काही संदेश दिलाय, तो काय ते नेमके समजून घेतलेत तर वाट सापडेल. मग शोधायला सुरुवात केली, निव्वळ शब्दात न सापडणारी उत्तरे!

हळूहळू लक्षात येऊ लागले. आदिवासी मजुरांचे सवर्ण शेतकरी वर्गावर, अवलंबून असणारे जगणे. आदिवासींची घरे त्यांच्याच जमिनीवर, आदिवासी वाडीकडे येण्या-जाण्याच्या वाटा त्यांच्याच शेताच्या बांधावरून. आजारपणात, अडीअडचणीला हात पसरायचा त्यांच्याचसमोर. शेतीची कामे नसतात तेव्हा मासेमारीला त्याच जमिनीत, शेततळ्यात उतरायचे. सणवार साजरे करायचे, घराची डागडुजी करायची तर पुन्हा हात तिथेच पसरायचे. थोडक्यात त्यांच्या जगण्याचा धडा होता, ज्या फांदीवर उभे आहोत त्या फांदीवर कुऱ्हाड मारायची नसते. आम्हाला संघर्षाच्या वाटेवर मिळालेला हा पहिला धडा होता. त्यानंतर काही काळ हा प्रश्न आम्ही मागे ठेवला.

नंतर लढा सुरू झाला दळी जमिनीच्या हक्कांसाठी. इथे अधिकारांसाठी झगडायचं होतं सरकारशी, ज्या लढ्याला संविधानाची कवचकुंडले होती. हे काम तुलनेने सोपे होते. हा लढा उभारताना कातकरी समाजाच्या आत्मविश्वास उभारणीच्या कामाला अवकाश मिळाला. जोडीनेच शिक्षण, आरोग्याचे हक्क, त्यासाठी जागरमोहिमा, मारहाण, अत्याचाराविरोधात लढे उभे करता आले. याच वाटेवर मग काही काळानंतर मजुरीच्या प्रश्नावर पण संघर्ष उभा राहू शकला. त्यातीलच एक महत्त्वाचा प्रश्न शिक्षणाचा होता. कातकरी वाडीवर शिकलेले प्रौढ मिळणे तर कठीणच पण शाळेत शिकलेली साक्षर मुले मिळणे पण दुर्मिळ होते. त्यामुळे प्रत्येक प्रश्नाला हात घालताना गाडी शिक्षणाच्या मुद्द्याशी अडायचीच.

कातकरी हा आदिवासी समाज जगण्यासाठी हंगामी स्थलांतर करणारा. पावसाळ्यात फक्त आपल्या मूळ ठिकाणी, तर उरलेले सात-आठ महिने पाठीवर बिऱ्हाड बांधून कोळसाभट्ट्यांवर जंगलात किंवा वीटभट्ट्यांवर जगायला जाणारा. मुलांना मागे कसे ठेवणार? मग त्यांची पण आईबापाबरोबर फरपट. शिक्षण नाही, आजारी पडलं तर आरोग्याच्या सोयी नाहीत, कुठल्याच सुविधा नाहीत, शिक्षणाला पूरक वातावरण नाही. कष्ट तर पाचवीलाच पुजलेले. अतिशोषणाला तोंड देताना स्वप्न पहायला वाव नाही, पाहिलीच तर त्याचा उच्चारही करणे शक्य नाही. अशा स्थितीत शिक्षणाची गरज पोचवायची कशी हा आमच्यासमोर प्रश्न होता.

भुकेसमोर किंवा उपाशी पोटावर पोकळ उपदेश व प्रबोधन देऊन काहीच उपयोगाचे नाही हे तर कळत होतेच. मग जगण्याच्या प्रश्नांना हात घालताना, शोषणाविरुद्ध लढण्याची तयारी करताना, जंगल, जमीन या उपजीविकेच्या साधनांवरील हक्क मिळवताना, आत्मसन्मानाची लढाई लढताना शिक्षणाची गरज हळूहळू रुजवण्याची वाट सापडली. शिक्षणाबद्दल बोलणे पोकळ राहिले नाही. मग सामूहिकपणे मुलांना शिकवायचे यासाठी निर्धार करणे, प्रत्येक स्वातंत्र्यदिनी हातात तांदूळ घेऊन मुलांना शिकवणार अशी सामूहिक शपथ घेणे सुरू केले. जिथे मुलांना शाळेत दाखल करण्यात अडचणी येत होत्या, त्या संघटित सामूहिक प्रयत्नांमधून दूर करणे सुरू झाले. जातिभेदाचा मुद्दा पण काही ठिकाणी आडवा आला. मुले अर्ध्यातच शाळा सोडून जातात, मग पटसंख्या घटते म्हणून त्यांना शाळेत दाखल न करण्याचा शिक्षकांचा कल होता, तो मोडून काढावा लागला. त्याचा परिणाम होऊ लागला. आश्रमशाळेत मुलांना दाखल करण्याचे प्रमाण वाढू लागले. आईबाप मजुरीसाठी स्थलांतरित झाले तरी मुले आश्रमशाळेत राहू लागली.

पुढील टप्प्यात मध्यान्ह भोजनाची मागणी देशभरात अन्न अधिकार अभियानामार्फत उठवण्याच्या आमच्या सामूहिक प्रयत्नांना यश आले आणि अन्नसुरक्षा कायद्यान्वये मध्यान्ह भोजनशाळेत मिळणे हा कायदेशीर हक्क झाला. याचा थेट परिणाम शाळेतील मुलांची पटसंख्या वाढण्यात झाला. मजुरीला जाणाऱ्या आईवडिलांना आता मुलांच्या दिवसाच्या जेवणाची काळजी नव्हती.

कष्टकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नाला एकांगी



एकटोकी पद्धतीने हात घालून चालणार नाही हे यातून स्पष्ट व्हावे.

कातकरी कुटुंबांचे, शेतीचा हंगाम संपल्यावर व मधल्या मजुरीसाठी नसण्याच्या काळातील उद्योग म्हणजे दारू पाडणे. त्याशिवाय जगायला दुसरा स्थानिक आधार नव्हता. दारू गाळण्याचे काम प्रामुख्याने महिला करतात. मग आईबरोबर लहान मुले सोबत दारूच्या भट्टीवर जातात. दारू नीट पेटती झाली की नाही हे तपासायला, दारू चाखायला मग याच छोट्या मुलांना दिली जाते आणि अगदी लहान वयातच या मुलांना प्यायची चटक लागते. एका आदिवासी वाडीवर हा अनुभव घेतल्यावर ह्या कामातून मुलांना बाहेर काढण्यासाठी पण प्रयत्न करावे लागले. त्याशिवाय शिक्षणाची वाट खुली होणार नव्हती.

आता शिक्षण हा मूलभूत हक्क झाला आहे. त्यामुळे कोणालाही कोणत्याही कारणासाठी शिक्षण नाकारता येणार नाही. पण प्रत्यक्षात जातींचा दाखला नाही म्हणून, जात पडताळणीच केली नाही म्हणून शिक्षण नाकारण्याचे, दाखल न करण्याचे प्रकार आदिवासी क्षेत्रात घडत असतात. त्याविरोधात आवाज उठवणे आजही सुरू आहे.

गेली तीन वर्षे आदिवासी मुलांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही. त्याविरोधात दाद मागतो आहोत पण अजून त्यात यश आलेले नाही.

एका बाजूला शिक्षणाचा संविधानिक हक्क मिळालेला असला तरी शासन शिक्षणाच्या क्षेत्रातून काढता पाय घेत आहे व खाजगी शिक्षणाला उघडउघड पाठिंबा देत आहे, त्याचा परिणाम विशेषत: आदिवासी मुलांच्या शिक्षणावर होताना दिसत आहे. वस्ती शाळांमधून प्रशिक्षित शिक्षक नसल्याने मुलांच्या गुणवत्तेवर त्याचा थेट परिणाम होतो आहे. पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद केल्याचा सर्वात जास्त फटका आदिवासी भागातील मुलांना बसतो आहे. आश्रमशाळांची दुरावस्था तर इतकी आहे की राहणे, जेवण व अभ्यासासाठी वेळ या तिन्ही गोष्टींसाठी झगडावे लागते. अशा परिस्थितीत परिस्थितीशी झगडून काही पिढ्यांबरोबर काम करून शाळेपर्यंत आणलेल्या मुलांना शाळेत टिकवायचे कसे हा कठीण प्रश्न होत चालला आहे. हा वंचित व दारिद्र्याने पिडित कुटुंबाच्या दृष्टिकोनाचा मुद्दा आता राहिलेला नाही, तर व्यवस्था चालवणाऱ्यांचा दृष्टिकोन बदलण्याचा हा मुद्दा आहे. शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळाला तरी आवश्यक व्यवस्था व यंत्रणाच प्रत्यक्षात नसेल तर तो अधिकार मिळणार कसा?

दुर्गम भागांत तर फक्त कागदोपत्री शाळा आहेत, शिक्षक तिथे फिरकत देखील नाही. जिथे शिक्षक आहेत तिथे शिक्षणाचा दर्जा हा तर आणखी गंभीर विषय आहे. विविध आदिवासी भाषा आणि प्रमाणभाषा यांतील फरक हा देखील महत्वाचा अडसर आहे. मराठी भाषेवर शिक्षकांनी मेहनत घेतली नाही तर मराठी व्याकरण सुधारत नाही आणि साधी वाक्येदेखील नीट लिहिता न येणे हा सर्व ठिकाणचा प्रश्न होऊन बसतो. गणित, इंग्रजी ह्या विषयाची तर बोंबच आहे. शिक्षकांकडे सोपवलेली इतर अवाजवी कामे हा तर सार्वत्रिक मुद्दा आहे. हे पाहता शिक्षणाकडे सरकारच गंभीरपणे पाहत का? हा प्रश्न उभा राहतो. की समाजातल्या सत्ताधारी वर्गाला शिक्षित वर्ग नको आहे आणि त्या वर्गाचे हितसंबंध सांभाळणाऱ्या शासनव्यवस्थेला त्याचीच तळी उचलून धरायची आहे म्हणून हे जाणीवपूर्वक केले जात आहे? असा प्रश्न उपस्थित करणे अनाठायी ठरणार नाही.

या परिस्थितीतही आव्हानांशी झुंजत वाट काढणारे, शिक्षणाचे व्रत घेतलेले शिक्षक आणि विद्यार्थी व त्यांचे मुलांना शिकवायचं हा वसा घेतलेले पालक कुठेकुठे ओॲसिससारखे आहेत, पण ते अपवाद आहेत. शिक्षणाबद्दल राज्यकर्ते गंभीर नाहीत हा नियम ठरतोय, ही सर्वात चिंताजनक बाब आहे.

परिस्थितीशी झुंजणे व चिवटपणे कठीण परिस्थितीला तोंड देणे ही आदिवासी समाजाची उपजत प्रवृत्ती आहे. त्यांच्यातील ह्या गुणाला उजाळा देत अन्य क्षेत्रातील गुणवत्ता वाढवणे हे खरेतर औपचारिक शिक्षणातून घडायला हवे, पण तसे होताना दुर्दैवाने दिसत नाही.

शिक्षण व रोजगार यांचा सांधाच निखळणे हा तर सर्वच समाजासमोरचा प्रश्न आहे. त्यामुळे शिकायचे कशासाठी हा प्रश्न पूर्ण आवर्तनानंतर पुन्हा एकदा निव्वळ जिवंतच झाला आहे असे नाही तर आवासून अवाढव्य रूपात समोर उभा ठाकला आहे. या प्रश्नाच्या उत्तरावर पुढील पिढ्यांच्या शिक्षणाची दिशा व वाट आज अवलंबून आहे.

या मूलभूत प्रश्नांवर तसेच सरंजामी अवशेषांशी लढताना एक दशक उलटले. या संघर्षाच्या दोन दशकांमधे आदिवासी समाज आत्मविश्वासाने उभा राहिला. नवी पिढी शिकू लागली, महिला ताकदीने पुढे आल्या. एक कालखंड उलटला आणि प्रश्नांचे स्वरूप बदलू लागले. जे-जे लढून मिळवले ते काढून घेणे सुरू झाले. विकासाच्या नावावर कष्टकऱ्यांची, शेतकऱ्यांची जगण्याची साधने ओरबाडून काढून घेण्याचे विविध डाव सुरू झाले. प्रश्नांचे स्वरूपच बदलले.

आताच्या काळात म्हणजे जागतिकीकरणाच्या काळात विकास म्हणजे प्रचंड मोठे पूल, हायवे, एक्स्प्रेस वे, बुलेट ट्रेन,

विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर्स, स्पेशल इकॉनॉमिक झोन्स, मेट्रो, मॉल्स इत्यादी बांधणे असे चित्र सरकारच्या धोरणातून व सामान्य जनतेच्या मनात देखील उभे केले गेले .



आज पूर्ण जग दोन भागांत वाटले गेले आहे. एका विभागाकडे प्रचंड पैसा, साधनसंपत्ती आहे, ऐषोराम आहे, चंगळवाद आहे तर दुसरे जग किमान जगण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जिवाचा आटापिटा करत आहे. वर उल्लेख केलेले प्रकल्प हे त्यांच्या (दुसऱ्या जगाच्या) गरजा पूर्ण करण्यासाठी येत नाहीत. गावातले रस्ते, वर्षानुवर्षे बांधून ठेवलेल्या धरणांचे पाणी शेतीला पोचवण्यासाठी लागणारे कालवे, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची किमान व्यवस्था, प्राथमिक शाळेच्या इमारती, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ओहोळ, नद्यांवरील छोटे पूल यासाठी आम्हाला अनेक वर्षे आंदोलन करावे लागले, पण त्यासाठी शासनाकडे निधी नसतो. व हे छोटे प्रकल्प म्हणजे आजच्या सरकारच्या नजरेत पायाभूत सुविधा नव्हेत, तर पायाभूत सुविधा/infrastructure म्हणजे वर उल्लेख केलेले महाकाय प्रकल्प होय. अशा महाकाय प्रकल्पांची गरज जनतेच्या गळी उतरवली जात आहे. हे महाकाय प्रकल्प सामान्य जनतेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी येत नसून आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या व भांडवलदारांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणले जात आहेत. हे आजचे वास्तव आहे.

गरिबी दूर करणे हे ध्येय म्हणून आजच्या सत्ताधाऱ्यांच्या पटावरून गायब झाले आहे. आतापर्यंत किमान नियोजन आयोग त्यावर चर्चा करत असे, दारिद्र्यरेषा ठरवत असे, त्यावर किमान वादविवाद घडत. आता ही चर्चा संपवण्यात आली आहे. भारतीय संविधानात दिलेले गरिबी व विषमता दूर करण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी सोयीस्कररित्या डोळ्यांआड केले आहे. सामाजिक सबलीकरणाच्या नियोजनाची जबाबदारीच सरकार झटकून टाकत आहे.

महाकाय infrastructure प्रकल्प आणणे हा जागतिक धनदांडग्या कंपन्यांचा धंदा आहे. त्यात मिळणारा भांडवलावरचा परतावा अनेक शर्तींसह व लांब पल्ल्याच्या भरभक्कम नफ्यासह परदेशी परत जाणार आहे. त्यामधे सामान्य शेतकरी, जमिनधारक, शहरी व ग्रामीण गरीब यांच्या उपजीविकेच्या साधनांची लूट केली जाणार आहे. त्यांच्या उध्वस्तीकरणावर हा विकास स्वार होत आहे. पंतप्रधान मोदी बुलेट ट्रेन जपान सरकार आपल्याला जवळपास मोफत देत आहे अशा वल्गना करीत असले तरी ती भारतीय जनतेची दिशाभूल आहे.

जपान, चीन, अमेरिकेसारखे देश ज्यांच्याकडे प्रचंड भांडवल आहे, त्यांनी दीर्घ पल्ल्याच्या मुदतीचे कर्ज पायाभूत सुविधाच्या नावाखाली कमी व्याजदराने अविकसित देशांना देणे व त्या बदल्यात त्यातून भरभक्कमरित्या त्यांच्या देशांतील कंपन्या व भांडवलदारांच्या साठी काय-काय मिळवायचे यांचे करार करणे हा त्यांच्यासाठी प्रचंड नफ्याचा पण आपल्यासाठी आतबट्ट्याचा धंदा आहे. आपल्याकडील धनिक वर्गाला त्या वहात्या गंगेत हात धुवून घेता येतील पण सामान्य जनतेच्या डोक्यावर मात्र त्याच्या खर्चाचा बोजा त्या सुविधा न वापरतादेखील बसणार आहे. त्या कंपन्या व परदेशी सरकारांच्या पायाभूत सुविधांच्या व्याख्येत सामान्य जनतेच्या गरजा येऊच शकत नाहीत कारण त्यातून भरभक्कम परतावा मिळू शकत नाही, पण भारत सरकार तर सामान्य भारतीय जनतेच्या हिताला बांधील असायला हवे. त्यांचा विकासाचा प्राधान्यक्रम बुलेट ट्रेन नव्हे तर खेड्यापाड्यात रस्ते, कालवे पोचवण्याचा असायला हवा, पण असे घडताना दिसत नाही. जागतिक भांडवलशाहीने ह्या सरकारांना पण आपल्या दावणीला जुंपून घेण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे आजच्या काळात सर्व काही जागतिक भांडवलासाठी व इथे गुंतवणूक खेचण्याच्या नावाखाली केले जात आहे व त्यामागचा दृष्टिकोन व आराखडाही त्यांचाच आहे.

जगाकडे पहाण्याची नजरच विकली गेली तर जगच वेगळे दिसणार हे उघड आहे. हीच सर्वात चिंतेची बाब आहे.

तात्कालिक आभासी फायदे तेही धनदांडग्या वर्गाचे, रंगवून, चढवून सांगायचे आणि दीर्घकालीन तोट्यांची चर्चाच होऊ द्यायची नाही हा भारतात वसाहतकाळापासून चालत आलेला डाव आहे. यातूनच भारतात विषमता वाढती राहिली आहे व जागतिक स्तरावर सर्वात वरच्या आर्थिक वर्गातल्या १०% धनिकांच्या हातात ५०% संपत्ती एकवटली आहे. हे संपत्तीचे केंद्रीकरण सुलभ करण्यासाठी कारभार यंत्रणाच ताब्यात घेतल्या जात आहेत.

चालू वर्षी शिक्षण, आरोग्य, रेशन, पेन्शन, निवारा, पिण्याचे पाणी, पोषणआहार, शेतीच्या किमान सुविधा इ. बाबींसाठी बजेटमधे सव्वीस हजार कोटींची भर हवी अशी आमची मागणी होती, पण ती अवास्तव आहे असे म्हणत आमच्या मागण्या पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आल्या. मात्र 'मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग' ह्या प्रकल्पासाठी ज्यामुळे आताच्या मुंबई नागपूर हायवेपेक्षा फक्त ३४ किमी वाचणार आहेत, त्यासाठी बत्तीस हजार कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मुंबई ते अहमदाबाद भरधाव जाणाऱ्या बुलेट

ट्रेन साठी एक लाख कोटी खर्च येणार आहे. त्यासाठी कर्ज घेतले जाणार आहे. त्याचा बोजा सामान्य जनतेच्या माथी मारला जाणार व ते चुकते करत आपण आणखी कंगाल होणार.

हा आहे विकासाचा प्राधान्यक्रम!

ह्या संपूर्ण धंद्यात भारतातीलच काही कंपन्या, ठेकेदार, दलाल यांना ठेके मिळतील व ते मालामाल देखील होतील पण याच देशांतील निव्वळ जगण्यासाठी धडपडण्याऱ्या करोडो जनतेचे काय होईल? देशांचा विकास म्हणजे ह्या धनाढ्य व ठेकेदार वर्गाचा विकास असतो का? यावर प्रश्न उठवणाऱ्यांना देशद्रोही ठरवले जाते, परंतु हा देश येथील कष्टकऱ्यांचा, शेतकरी, शेतमजुरांचा, मच्छिमारांचा, आदिवासी, दलितांचा, असंघटित कामगारांचा आहे. निव्वळ राजकीय आर्थिक दलाल ठेकेदारांचा नाही हे वारंवार ठणकावून, कष्टकऱ्यांची ताकद उभारून सांगावे लागते. आपल्याला या मांडणीत दम भरावा लागतो.

ह्या तथाकथित विकासांचे आराखडे एक नवी चौकट घेऊन येत आहेत, ज्यामधे आपले पर्यावरणविषयक, कामगार हक्कांविषयक कायदे बदलले जात आहेत. जमीनसुधारणा कायदे पातळ व निकामी केले जात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे ग्राम पंचायती, नगर परिषदांपासून ते जिल्हा परिषदांपासून महानगरपालिकांपर्यंत विविध लोकशाही यंत्रणांच्या अधिकार कक्षेला बाधा आणली जात आहे. त्यांचे अधिकार निमसरकारी व भांडवली प्राधिकरणांकडे सोपवले जात आहेत, ज्यामधे लोकशाही पद्धतीने आलेले लोकप्रतिनिधीच नाहीत. कारभाराचे, निर्णयप्रक्रियेचे स्वरूपच त्यातून बदलते आहे.

आज देशात प्रचंड मोठे असे पाच औद्योगिक कॉरिडॉर्स येऊ घेतले आहेत. दिल्ली- मुंबई, अमृतसर ते कोलकाता, मुंबई-बंगळुरु, चेन्नई-बंगळुरु, विशाखापट्टणम-चेन्नई कॉरिडॉर. या पाच कॉरिडॉरच्या क्षेत्रात देशाचा ४०% भूभाग प्रभावित होत आहे. प्रचंड प्रमाणात भूसंपादन होऊ घातले आहे. पेट्रोकेमिकल पेट्रोलियम इन्व्हेस्टमेंट रिजनसाठी देशाचा संपूर्ण समुद्रकिनारा गुजरातपासून पश्चिम बंगालपर्यंत आरक्षित करण्यात आला आहे. समुद्रावर ज्यांचा उदरनिर्वाह चालतो त्यांना तिथून विस्थापित केले जात आहे. त्यात 'भारतमाला', 'सागरमाला'सारख्या प्रकल्पांची भर आहे. रस्ते पुरेसे नाहीत म्हणून जलमार्ग आखले जात आहेत, तिथेही मोठ्या नद्यांवर जगण्यासाठी अवलंबून असणाऱ्या जनसमूहावर गदा येऊ घातली आहे.

नवा रोजगार निर्माण तर नाहीच, पण उपजीविकेची साधने संपल्याने किती बेरोजगार होत आहेत याची गणनाच नाही. याला विकास कसं कोणत्या अंगांनी म्हणायचं? शेतीखालील जमीन एवढ्या मोठ्या प्रमाणात संपादित केल्यावर या देशाच्या अन्नसुरक्षेचं काय होणार? शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार कुठे जाणार? एवढी जिवंत जमीन मारल्यावर इथल्या पर्यावरणाच्या साखळीचं काय होणार? या प्रश्नांना आजचे राज्यकर्ते भिडू इच्छित नाहीत व जनतेला या प्रश्नांची त्यातून उद्भवणाऱ्या संकटांची जाणीवच नाही.

अन्न सुरक्षा, अन्न सार्वभौमता, जनतेची सार्वभौमता संपुष्टात आणून भ्रामक राष्ट्रवाद जपायचा व जनतेची दिशाभूल करायची ही खोट्या विकासाची वाट सत्ताधारी चालत आहेत. जनतेला खोटी स्वप्ने विकत आहेत. जनतेच्या पोटातील भूक, मनातील भय आणि डोक्यातील भ्रम वाढवत विकासाचा प्राधान्यक्रम बदलला जात आहे.

कायद्यान्वये भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार मिळाला आहे, पण या प्रकल्पांची माहिती जाणूनबुजून दडवली जाते. इथली माहिती सदर प्रकल्पांचे ठेके घेणाऱ्या विदेशी कंपन्यांना दिली जाते पण या देशाच्या नागरिकांना दिली जात नाही. घोषणा मेक इन इंडियाची पण छोटेमोठे ठेके परकीय कंपन्यांना. असा खोटेपणा प्रत्येक टप्प्यावर सुरू आहे.

आंतरराष्ट्रीय वित्त संस्थांनी हे जग मुठीत घेतले आहे. भांडवली साम्राज्यवाद जागतिकीकरणाच्या नावाने आपल्यावर आरूढ आहे. त्यांनी सामाजिक न्यायाच्या कल्पना धुळीस मिळवल्या आहेत. सरकारे (विशेषत: अविकसित देशांची) ताब्यात घेतली आहेत. प्रसारमाध्यमे आपल्या दावणीला जुंपली आहेत. ज्या संविधानाला शोषित वर्गाने आपला आधार मानला ते संविधान दुबळे करण्याचे, नष्ट करण्याचे डाव रचले जात आहेत.

तरीही देशात व जगभर ह्या जुलमी शक्तींविरोधात दंड थोपटून जागोजाग जनशक्ती उभी रहात आहे. दमदार सवाल उभे करत आहे. जुलमी कॉर्पोरेट्सना पळवून लावत आहे.

आम्ही रायगड जिल्ह्यातील आगरी, कुणबी शेतकरी व आदिवासी समुहांच्या ताकदीवर 'रिलायन्स' या बलाढ्य उद्योग समूहाच्या स्पेशल इकॉनॉमिक झोन विरोधात संघर्ष केला व तो रद्द करणे सरकारला भाग पाडले. देशांतील सर्वात श्रीमंत अंबानीला रायगडमधील फाटक्या शेतकऱ्यांसमोर गुडघे टेकावे लागले.

दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी माणगावमधे जबरदस्तीने घेतल्या जाणाऱ्या जमिनी वाचवण्यात देखील आम्हाला यश आले आहे.

समानतेवर, न्यायावर आधारित, खऱ्या विकासाची वाट चालण्यासाठी, मानवी संस्कृतीला उन्नत दिशेने पुढे नेण्यासाठी हे संघर्ष आवश्यक आहेत. आपल्या आधीच्या पिढ्यांनी पण हे केले आहेत. काळाच्या या टप्प्यावर ते अधिक मजबुतीने उभारण्याची ऐतिहासिक जबाबदारी आपल्या खांद्यावर आहे. ती पार पाडली नाही तर पुढील पिढ्यांचे भविष्य पण धोक्यात आहे. पुढील पिढीसाठी आजच्यापेक्षा अधिक मोलाचे संचित राखणे व ते हस्तांतरित करत राहाणे यालाच तर मानवी संस्कृती म्हणतात.

या इतिकर्तव्यात चुकायचे नसेल तर जागे राहणे भाग आहे.

**– उल्का महाजन**
भ्रमणध्वनी : ९८६९२३२४७८
ulkamahajan@rediffmail.com




# संघर्ष अजून सुरुच आहे...

शमसुद्दीन तांबोळी

**तलाकबंदीच्या कायद्यात झालेल्या बदलानंतर मुस्लीम महिला स्वतंत्र झाल्या, अशी जोरदार चर्चा सुरु झाली. पण बदल जरी स्वागतार्ह असला तरी मुस्लीम स्त्रियांना पूर्णपणे न्याय मिळाला असे म्हणता येणार नाही कारण न्यायालयाखेरीज अन्य कोणाला तलाक देता येणार नाही, अशी तरतूद अजूनही कायद्यात केली गेलेली नाही. त्यामुळे या प्रश्नासह अजूनही मुस्लीम महिलांच्या विविध प्रश्नांबाबत संघर्ष अजून सुरूच आहे.**

हमीद दलवाई यांनी १८ एप्रिल १९६६ मध्ये सात मुस्लीम महिलांना घेऊन तोंडी एकतर्फी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला या ज्या अन्यायकारक तरतुदी मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात आहेत, त्याविरोधात मोर्चा काढला होता.त्याला आता बावन्न वर्ष झाली. मुस्लीम महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आहेत ते उपभोगता यावेत अशी त्यांची मागणी होती. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्याकडे तसं निवेदनही दिलं. त्यानंतर दलवाई यांनी 'सदा ए मिस्वा' (सदा म्हणजे हाक आणि मिस्वा म्हणजे महिला) ही संघटना काढली. महिलांमध्ये त्यांच्या प्रश्नांसंदर्भात जागृती व्हावी, आपल्या हक्कांसाठी त्यांनी पुढे यावं, त्यांचा आवाज लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी ही संघटना काढली होती. 'इंडियन सेक्युलर सोसायटी' यांच्यामार्फत सुद्धा भारतीय संविधानाला अपेक्षित असणारा समान नागरी कायदा यावा यासाठी सह्यांची मोहिम उभारली होती. हीच चळवळ अधिक पुढे घेऊन जाता यावी म्हणून २२ मार्च १९७० रोजी हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना

केली. त्यातर्फे मुस्लीम महिला परिषद, तलाकपिडित महिलांच्या परिषदा घेतल्या. असं करताना अनेक तलाकपिडित महिला एकत्र येत होत्या. आपलं दु:ख, वेदना व्यक्त करत होत्या. या परिषदांमध्ये एक सत्र असायचं ते म्हणजे 'मेरी कहानी-अपनी जुबानी'. त्यातलं प्रत्येक प्रकरण ऐकताना समोरच्याचं हृदय हेलावत असे, अश्रू अनावर होत. याची नोंद प्रसारमाध्यमांनी पन्नास वर्षांपूर्वी घेतली. मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर लढणारी एक ऐतिहासिक संघटना स्थापन झाली आहे अशी जाणीव झाल्याने मनोबल वाढवण्याचे प्रयत्न होत होते. एकीकडे हे होत असताना दुसरीकडे मात्र तथाकथित धार्मिक, राजकीय नेते यांची झोप उडाली होती. त्यांनी दलवाई यांच्या कार्याला विरोध करण्यासाठी १९७३ मध्ये मुंबईला मोठी सभा घेतली आणि 'मुस्लीम पर्सनल लॉ'ची स्थापना केली. मुस्लीम महिलांचा आवाज दाबण्याचं काम या संघटनेनं केलं. महिलांचे प्रश्न चव्हाट्यावर येऊ नयेत, न्यायालयात जाऊ नये, कायदा बदलू नये असा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. दुर्दैवाचा भाग म्हणजे जास्तीत-जास्त काळ सत्तेत असणाऱ्या काँग्रेस पक्षाने सुधारणावादी विचारांना फारसं महत्त्व दिलं नाही आणि केवळ राजकीय हेतू डोळ्यांसमोर ठेवून जमातवादी, प्रतिगामी लोकांचंच ऐकण्याचा प्रयत्न केला. याचा संदर्भ आपल्याला शाहबानो प्रकरणात मिळतो.

१९८५मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्या. चंद्रचूड यांनी शाहबानोला पोटगीच्या संदर्भात निवाडा दिला होता. 'मुस्लीम महिला मग ती परित्यक्ता किंवा तलाकपिडीत असे तिचा कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळवण्याचा हक्क आहे.' असं त्यांनी त्या निकालात म्हटलं होतं. हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय 'मुस्लीम पर्सनल लॉ'वर आघात आहे, शरीयतचा अपमान आहे असं म्हणत लाखो मुस्लीम, त्यात महिला बहुसंख्येने होत्या, रस्त्यावर उतरल्या. न्यायालयाने दिलेला निवाडा रद्द करण्यात यावा, तसा कायदा करावा तशी मागणी तेव्हाचे राजीव गांधी सरकार यांच्याकडे केली. या काळात मुस्लीम सत्यशोधक मंडळाने पंतप्रधान राजीव गांधी, राष्ट्रपती, कायदामंत्री यांना भेटून मुस्लीम महिलांना मिळणारी पोटगी कायम ठेवावी अशी मागणी केली. त्यावेळी तलाकपिडीत महिलांची दिल्लीला परिषदही घेतली होती. दुर्दैव असं की पुरोगामी आवाज न ऐकता जमातवाद्यांच्या आग्रहाखातर राजकीय हेतू समोर ठेवून १९८६ मध्ये राजीव गांधी सरकारने घटस्फोटाचा कायदा केला. त्यात १२५ वं कलम होतं, जे महिलांना पोटगी मिळवून देण्याचा अधिकार देणारं होतं त्यातून मुस्लीम महिलांना वगळण्यात आलं. हा सर्व प्रकार म्हणजे धर्मनिरपेक्षतेवरचा घाला होता. मुस्लीम महिलांना महिला म्हणून जे अधिकार हवे होते ते न देता इतरांना देऊन केवळ मुस्लीम महिला असा शिक्का मारून त्यांना डावलण्यात आलं. यावर जनजागृती व्हावी यासाठी आम्ही गुजरात, तमिळनाडू, दिल्ली, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र अशा विविध भागांत परिषदा घेत होतो. त्यातून मोठं संघटन उभं राहिलं. ते म्हणजे 'ऑल इंडिया मुस्लीम प्रोग्रेसिव्ह'ची स्थापना झाली. या घटनेनंतर संघटना वाढत गेली, महिला येत गेल्या. 'भारतीय मुस्लीम संघटना' यासारख्या महत्त्वाच्या संघटना स्थापन होत गेल्या. महिलांसाठी लढा सुरूच होता.

दरम्यानच्या काळामध्ये शबाना बानोचं प्रकरण आलं. शबानाला विसाव्या वर्षी बाळ झालं, एकविसाव्या वर्षी तोंडी तलाक दिला गेला. पोटगीसाठी तिने ग्वालियरच्या कुटुंब न्यायालयात याचिका केली. पण तिथे त्यांनी १२५ व्या कलमाकडे बोट दाखवलं, पोटगी देणं मुस्लीम नवऱ्याला बंधनकारक नाही असं सांगत न्याय नाकारला. मग ती उच्च न्यायालयात गेली. तिथेही कुटुंब न्यायालयाचीच पुनरूक्ती झाली. मग ही केस सर्वोच्च न्यायालयात गेली आणि २००८ मध्ये न्या. दीपक वर्मा आणि न्या. सुदर्शन रेड्डी यांनी निवाडा केला. हे प्रकरण कुटुंब न्यायालयातून आलं असून न्यायालयात धर्म, जात, पंथ हे न्यायाला आडवे येता कामा नयेत. १२५ व्या कलमानुसार कुटुंब न्यायालयातील महिलांना पोटगी मिळवण्याचा हक्क आहे असं सांगत तिथून ती केस कुटुंब न्यायालयाकडे सोपवण्यात आली आणि अखेरीस तिच्या लढ्याला यश आलं आणि पोटगी मिळाली. त्यानंतर अनेकींना न्याय मिळाला. मात्र पोटगीचाही प्रश्न इथे सुटत नाही.

राज्य सरकारच्या अखत्यारित असलेली ही कुटुंब न्यायालये पूर्वी चार-पाच ठिकाणीच होती. आता त्यांची संख्या सात आठवर गेली आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये कुटुंब न्यायालय नाही. त्यामुळे जी कुटुंबे न्यायालयात जातात, त्यांना पोटगी मिळते. जिथे ते नाही तिथे पोटगीच्या हक्कापासून वंचित रहावं लागतं म्हणून 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ने असा आग्रह धरला आहे की प्रत्येक जिल्ह्यात कुटुंब न्यायालय असावं ते केवळ मुस्लीम महिलांसाठीच नाही तर सर्व महिलांना उपयोगी ठरणारं आहे. मंडळाने 'मुस्लीम महिला केंद्र', 'मुस्लीम मदत केंद्रा'कची स्थापना केली. शाखा काढल्या. कायदा बदलण्याची मागणी केली.

जसं शहाबोनोचं प्रकरण झालं, शबाना बानोचं प्रकरण झालं तसं सायरा बानोचं प्रकरण पुढे आलं. सायरा बानो ही उत्तराखंडच्या काशीखंडची. तिला नवऱ्याने तोंडी तलाक दिला, सहा वेळा तिचा गर्भपात केला आणि दोन्ही मुलांची कस्टडी स्वतःकडेच ठेवली म्हणून सायरा बानोने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली.तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलाला या गोष्टी महिलांवर अन्याय करणाऱ्या आहेत अशी याचिका होती. त्यावेळी न्यायालयाने 'मुस्लीम पर्सनल लॉ'मधील तरतुदींमुळे महिलांना समानता, समान संधीचा अधिकार, प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार नाकारण्यात येत आहे त्यावर तुमची भूमिका काय आहे अशी विचारणा मोदी सरकारकडे केली. मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातील तरतुदींमुळे समानता-समान संधींचा अधिकार, प्रतिष्ठेने जीवन जगण्याचा अधिकार यावर आघात होत असेल तर आम्ही कायद्यात सुधारणा करू असं प्रतिज्ञापत्र नरेंद्र मोदी सरकारने सादर केलं. ते सादर केल्यानंतर मोदी सरकारने दुसरं पाऊल उचललं ते असे की विधी आयोगाला (लॉ कमिशन) या प्रश्नावर अभ्यास करून शिफारस करण्याचे आवाहन केलं.

त्याप्रमाणे विधी आयोगाने एक दोन वर्षांपूर्वी सर्व लोकांची मतं समजून घेण्यासाठी सोळा प्रश्नांची प्रश्नावली तयार केली. त्यात तोंडी तलाक, बहुपत्नीत्व, हलालाबद्दल प्रश्न विचारण्यात आले आणि शेवटचा प्रश्न होता समान नागरी कायदा तुम्हाला हवा आहे का? ही खुल्या पद्धतीने घेतली जाणारी प्रश्नावली पाहून पुरुषप्रधानतेला महत्त्व देणारा मुस्लीम समाजातील प्रतिगामी गट खवळून उठला आणि त्यांनी 'लॉ कमिशन'च्या विरोधात भूमिका घेतली. हा सारा आमच्या शरीयतवर घाला घालण्याचा प्रकार आहे असं म्हणत धर्माच्या नावाने दिशाभूल करत विरोधासाठी महिलांनाच पुढे केलं. यातला सोळावा प्रश्न लोकांना गोंधळात टाकणारा होता. समान नागरी कायद्याचा मसुदा, त्याची ब्ल्यू प्रिंट अद्याप तयारच करण्यात आलेली नाही. जे अस्तित्वातच नाही ते तुम्हाला हवं का नाही हे विचारणंच चुकीचं होतं. समान नागरी कायदा हा अलीकडे सामाजिक समतेचा, धर्मनिरपेक्षतेचा, स्त्री-पुरुष यातले भेद मिटवणारा जो विषय आहे, त्याला राजकीय रूप देण्यात आलं आहे. ध्रुवीकरणाचं एक साधन बनवलं आहे. हिंदुत्ववादी सरकार असल्याने हिंदू कायदा मुसलमानांना लागू करण्यात येणार आणि मुस्लिमांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येणार अशा पद्धतीने त्याचा प्रचार करण्यात आला. यानिमित्ताने आंदोलनं होत राहिली, चर्चा होत राहिल्या, प्रसारमाध्यमांनी हे सगळे मुद्दे उचलून धरले. वेळ कमी असल्याने तलाक, बहुपत्नीत्व, हलाला हे सगळे विषय घेण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाने तलाकच्या एका मुद्यावर सुनावणी घेतली. त्यामध्येही तलाकचे जे वेगवेगळे प्रकार आहेत त्यावरही विचार न करता फक्त 'तलाक ए बिद्दत'वर निकाल दिला.

खरं तर तलाकचे दोन प्रमुख प्रकार आहेत 'तलाक ए बिद्दत' (अयोग्य असलेले) आणि तलाक ए सुन्नत (योग्य असलेले). 'तलाक-ए-सुन्नत'मध्ये नवऱ्याने तलाक म्हटल्यानंतर एक महिना थांबावं, विचार करावा, पुन्हा एकत्र येण्याची शक्यता पडताळून पाहावी. तशाप्रकारे दोन्हीकडच्या लोकांनी मिळून प्रयत्न करावेत. शक्य नाही झालं तर एक-एक महिन्याने तलाक उच्चारावा, तीन महिन्यांची मुदत देऊनही जर सर्व ठीक नाही झालं तर मग तलाक द्यावा. तीन महिने त्या महिलेचं संरक्षण करावं, ती गरोदर तर नाही ना याची खात्री करावी आणि मग तलाक द्यावा. त्यात 'तलाक-ए-हसन'ही आहे, 'तलाक-ए-खुला'ही आहे. खुला म्हणजे महिला तलाक मागू शकते द्यायचा की नाही ते नवरा ठरवणार. 'तलाक-ए-बिद्दत' म्हणजे 'माझ्या मनात आलं म्हणून मी तलाक दिला', नशेमध्ये, स्वप्नामध्ये, वॉट्सॲपद्वारा, मेसेजद्वारा तलाक दिला असे जे प्रकार आहेत त्याला 'तलाक-ए-बिद्दत' म्हणतात. 'तलाक-ए-बिद्दत' जगात अनेक देशांमधून रद्द करण्यात आला आहे, पण भारतामध्ये मात्र तो अस्तित्वात होता. इस्लाममध्येही तलाक हा अल्लाला नापसंत आहे असं म्हटलेलं आहे, पण मुल्ला लोकांनी त्याचा वापर केला त्यामुळे तोंडी तलाकची एक परंपरा झाली. सुनावणीवर २२ ऑगस्ट २०१८ रोजी न्यायालयाने सुनावणीवर निर्णय दिला. पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने तीन गोष्टी सांगितल्या. एक म्हणजे 'तलाक-ए-बिद्दत' हा इस्लामचा अविभाज्य भाग नाही, धर्मालाही मान्य नाही. त्यामुळे तो धर्मस्वातंत्र्याचा भाग होऊ शकत नाही. दुसरं म्हणजे इतर इस्लामिक देशांमधून अशाप्रकारचा तलाक हा हद्दपार केलेला आहे. तिसरा मुद्दा म्हणजे भारतीय संविधानाने दिलेले जे मूलभूत हक्क आहेत, त्यांचं उल्लंघन करणारा हा अमानवी प्रकार आहे. न्यायालयाने याप्रकारच्या एकतर्फी तोंडी तलाकवर बंदी घातली आणि शासनाला सहा महिन्यांची मुदत देऊन कायद्याद्वारे हा प्रश्न मिटवावा, कायदा झाल्याशिवाय त्याचा अन्वयार्थ लावता येणार नाही, न्यायप्रक्रिया सुरू करता येणार नाही असं सांगितलं. त्यानंतर 'मुस्लीम बोर्ड', 'एमआयएम', 'जमाते-ए-इस्लाम'सारख्या धर्मवादी संघटनांनी 'तलाक' या शरीयत -मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार बाह्यशक्तीला नाही अशी ओरड सुरू केली. ती बाह्यशक्ती म्हणजे कोण तर न्यायालय! न्यायालयाचं आणि संसदेचं सार्वभौमित्व हे धर्मवादी लोक नाकारतात. धर्मस्वातंत्र्याचा आणि तलाकच्या मुद्याचा संबंध येत नाही. तोंडी तलाकची पाठराखण करताना त्यांच्या वकिलांनी हा श्रद्धेचा विषय आहे असं सांगितलं होतं. तो श्रद्धेचा कसा असू शकतो? तो प्रथेचा विषय आहे. श्रद्धा वेगळी आणि प्रथा वेगळी. अखेर डिसेंबर २०१७ मध्ये संसदेत मोदी सरकारने तोंडी तलाकचं विधेयक सादर केलं. ते लोकसभेत मंजूरही झालं. ते तोंडी एकतर्फी तलाकच्याच बाबतीत होतं. तोंडी तलाक देण्याचा कोणी प्रयत्न केला तर तो दखलपात्र गुन्हा ठरेल व तीन वर्षांची शिक्षा होईल. बाह्यतः चांगला वाटणारा कायदा हा अपूर्ण-अर्धवट होता. घिसाडघाई करून आणलेला होता. कायदा येण्याआधी मुस्लीम सत्यशोधक मंडळाने माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन केवळ एकतर्फी तलाकवर बंदी आणून चालणार नाही तर तलाकच्या सर्व प्रकारांवर बंदी हवी. तलाकचे निवाडे बाहेर न होता न्यायालयीन प्रक्रियेत आले पाहिजेत. जोपर्यंत न्यायालयातून निकाल लागत नाही तोपर्यंत पुरुषाला दुसरं लग्न करण्याची परवानगी नसली पाहिजे. तलाकचा मुद्दा बहुपत्नीत्वाच्या मुद्दाला जोडून आहे. तो वेगळा, सुटा करता येणार नाही. तलाकवर बंदी आहे तर नवरा तलाक न देता दुसरं लग्न करेल. ती स्त्रीच स्वतःहूनच कंटाळून निघून जाईल. तसंच नुसतं बहुपत्नीत्वावर बंदी घालूनही चालणार नाही. नवरा हवं तेव्हा तलाक देऊन दुसरं लग्न करू शकतो. हा तिढा सोडवायचा असेल तर सर्व प्रकारचे तलाक न्यायालयातूनच व्हावेत, जोपर्यंत न्यायालयातून तलाक होत नाही तोपर्यंत नवऱ्याला दुसरं लग्न करता येता कामा नये. पोटगीचा अधिकार, मुलांची कस्टडी ही आईकडे ठेवायची की वडिलांकडे यामध्ये महिलेच्या मताला महत्त्व असावं. 'हलाला'सारखी कालबाह्य झालेली प्रक्रिया रद्दच करायला हवी.

सप्टेंबर महिन्यात २०१८ला शासनाने अध्यादेश काढलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन सुधारणा केलेल्या आहेत. विरोधी पक्ष किंवा जे लोक आक्षेप घेत होते त्यातला कळीचा मुद्दा म्हणजे अजामीनपात्र गुन्ह्याची नोंद. पहिला जो मुद्दा आहे त्यात दखलपात्र आणि अदखलपात्र असा जो गुन्हा होता, त्याची तीव्रता कमी

केलेली आहे. जो पती आहे तो याचिकेमध्ये रूपांतर करून घेऊ शकतो. दुसरा बदल म्हणजे पूर्वी स्त्रीच्या वतीने पोलिसात कोणीही फिर्याद दाखल करू शकत असे, पण आता पत्नी आणि तिच्या जवळचे नातेवाईक हेच फिर्याद दाखल करू शकतात. तिसरा बदल जो आहे तो म्हणजे न्यायालयात केस गेल्यानंतर पतीला किंवा पत्नीला असं वाटलं की आपण तडजोड करावी तर अशा प्रसंगी न्यायालय तडजोडही करू शकते. गुन्हा झालेलाच आहे, तीन वर्षांची शिक्षा झालेलीच आहे मात्र स्त्रीची, तिच्या मुलांची जबाबदारी कुणावर? असे जे काही प्रश्न आहेत त्यावर उत्तर मिळालेलं आहे, त्यामुळे असं म्हणता येईल की काहीसा लवचीक असा कायदा केलेला आहे. त्यामुळे आता याचं बाकीच्या लोकांनी स्वागत करायला हवं असं वाटतं. मात्र तरीही सर्व प्रकारचे तलाक हे न्यायालयात जाऊनच घेतले जावेत असा कडक कायदा अद्यापही न केल्याने कायद्यातून पळवाटा निघू शकतील आणि स्त्रीला न्याय मिळेलच याची खात्री देता येणार नाही.

अलीकडे शरीयत अदालत सुरू करण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. शरीयत अदालत तंटामुक्ती, समुपदेशनाचं काम करणार असतील तर ठीक पण त्यांना कायदा हातात घेता येणार नाही. आम्ही न्याययंत्रणा चालवणारे आहोत असं म्हणता येणार नाही. त्यांच्याकडे अंमलबजावणीची यंत्रणा नसेल. त्यामुळे हे विसंगत ठरेल. जातपंचायत, खापपंचायतीप्रमाणे शरीयत अदालतीद्वारे पुन्हा आपण धर्मनिरपेक्षतेलाच धोक्यात आणतो आहोत. भारतीय नागरिक म्हणून भारतीय संविधानाचा सन्मान केला पाहिजे.

आता कळीचा मुद्दा आहे तो समान नागरी कायद्याचा. त्याचा मसुदाच तयार केलेला नाही. तो राज्य किंवा केंद्र सरकारपैकी कोणीही करू शकतं. समान नागरी कायद्याच्या मसुद्यावरून संभ्रम दूर करण्याच्या ऐवजी त्याचा राजकीय फायदा उठवला जात आहे. भारतामध्ये जसं 'इंडियन पिनल कोड' आहे, 'इंडियन एव्हिडन्स ॲक्ट' आहे, 'इंडियन सिव्हिलियन लॉ' आहे तशा प्रकारचा भारतीय कौटुंबिक कायदा तयार केला तर तो सर्वांना न्याय देणारा ठरेल.

आताचा जो मुस्लीम व्यक्तिगत कायदा आहे तो १९३७ मध्ये इंग्रजांनी तयार केलेला 'शरियत ॲक्ट' आहे. त्याला आपण दैवी म्हणणं, अपरिवर्तनीय म्हणणं, इस्लामचा अविभाज्य भाग म्हणणं चुकीचं आहे. १९३७ च्या कायद्यामध्ये महिलेला तलाक हवा असेल तर काय करावं याबाबत स्पष्टता नव्हती. तलाक द्यायचा अधिकार पुरुषांनाच होता म्हणून त्यानंतर 'मुस्लीम विवाह विच्छेद कायदा' १९३९ मध्ये आला.त्यानुसार महिलेला तलाक हवा असल्यास, नवरा वेडा आहे, शारिरीक-मानसिक छळ करतो, क्रूरतेने वागतो, त्याला असाध्य प्रकारचा आजार झालेला आहे, तो बरा होणारा नाही किंवा तो फरार आहे, त्याला तुरुंगवास झालेला आहे, तो नपुंसक आहे अशाप्रकारच्या कारणांपैकी एक कारण सिद्ध करावं लागेल. म्हणजेच महिलेला तलाक हवा असेल तर तिने कोर्टात जायचं यापैकी एक सिद्ध करायचं आणि पुरूषांनी स्वप्नात दिलेला तलाकही ग्राह्य धरायचा ही असमानता होती. त्यावर उतारा म्हणून मुस्लीम विवाहित महिलेला संरक्षण देणारा कायदा मोदी सरकारने केला, पण यामध्येही केवळ 'तलाक-ए-बिद्दत'चाच(तोंडी तलाक) उल्लेख आहे. मग संरक्षण मिळणार कसं? म्हणून आम्ही 'मुस्लीम मॅरेज ॲन्ड डिव्होर्स ॲक्ट' तयार करा अशी मागणी करतो आहोत. अशा प्रकारच्या मागण्यांकडे लक्ष न देण्याचा आपला पूर्वइतिहास आहे. टप्प्याटप्प्याने सुधारणा करू असं म्हटलं जातं पण एक औषध हे दुसऱ्या आजाराला निमंत्रण देतं. तलाकचं औषध घ्यायला लागलो तर बहुपत्नीत्वाचा आजार वाढतो, बहुपत्नीत्वाचं औषध घेतलं तर तलाकचा आजार वाढतो. हे सगळं एकत्रित पद्धतीने व्हायला हवं. दुर्दैव असं आहे की यामध्ये प्रामाणिक पद्धतीने प्रयत्न होतायत का? तर नाहीत. दिशाभूल, मतांचं राजकारण होतंय. ज्या महाराष्ट्रात 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना झाली, ज्याच्यामागे पुरोगामित्वाचा इतिहास आहे त्या महाराष्ट्रात तरी शासनाने कठोर कायदा करायला हवा.


हमीद दलवाई यांच्या लढ्याला ५२ वर्षे झाली तरीही कायद्यात ठोस सुधारणा झालेली नाही. त्याचं औचित्य साधून १८ एप्रिल २०१८ रोजी मुख्यमंत्री, राज्यपाल, विरोधी पक्षनेते, शिवसेना, मनसे, काँग्रेस, राष्ट्रवादी अशा पक्षांना या संदर्भात स्पीड पोस्टने पत्र पाठवून, ईमेल द्वारे चर्चेचं आवाहन केलं होतं. मात्र अद्यापही कोणाचा प्रतिसाद मिळालेला नाही. एरव्ही मतांचं राजकारण करणाऱ्या यातल्या एकाही राजकीय पक्षाला यावर गांभीर्याने विचार करावासा वाटला नाही. लोकांशी निवडणुकीपुरता संबंध ठेवायचा, आश्वासनांची बरसात करायची आणि वेळ येईल तेव्हा असंवेदनशीलता दाखवायची ही प्रत्येक सरकारची रीत. इस्लामिक देशांना आपण बुरसटलेल्या विचारांचे मानतो मात्र तेही महिलांबाबत सकारात्मक धोरण राबवत आहेत आणि धर्मनिरपेक्ष भारत मात्र पिछाडीवर आहे. अजूनही मुस्लीम महिलांना स्वातंत्र्य मिळालेलं नाही. सुदैवाने महिलांच्या प्रश्नी न्यायालयाने चांगली भूमिका निभावली आहे. या सगळ्यावर तोडगा काढण्यासाठी विशेष विवाह कायदा १९५४ द्वारे विवाह नोंदणी केली की तलाक, बहुपत्नीत्व असे सारेच प्रकार बाजूला पडतील. मात्र सध्या हा सार्वत्रिक उपाय नाही. ज्याप्रमाणे 'हिंदू कोड बिला'च्या विरोधात जसं हजारो महिलांना विरोधात उभं केलं तसं आत्ता मुसलमानांच्या बाबत केलं जात आहे. कायदा करण्यासाठी शासनदरबारी विनवण्या, जनजागृती, एका बाजूला कोर्टात खेटा मारणं सुरू आहे. केवळ तलाकच नाही मुस्लीम महिलांच्या विविध प्रश्नावर संघर्ष सुरू आहे. तो सुरूच राहणार आहे.कधीतरी बदल होईल, महिलांना त्यांचे मूलभूत अधिकार मिळतील. न जाणो किती दिवस, किती महिने किती दशकं..संघर्ष सुरू राहील.

**शब्दांकन : श्रद्धा पेडणेकर**

**- डॉ. शमसुद्दीन तांबोळी**
भ्रमणध्वनी : ९८२२६७९३९१
tambolimm@rediffmail.com

दृश्यकला व दृश्य उपयोजित कला या विषयाची मूक लढाई आपल्या साऱ्या समाजाबरोबर अव्याहत सुरू आहे. दृश्यकला म्हणजे चित्रकला अशी सरसकट बघण्याची वृत्ती समाजात दिसते पण कलादालनात लावलेली चित्रं, इथपासून पुढे जाहिरात ते दूरचित्रवाणी व सिनेमातली हलणारी चित्रं ते दुकानं-मॉल यांच्यात तयार केले गेलेले दृश्यात्मक वातावरण असा आजच्या बदलत्या जगात दृश्यकलेच्या उपयोगाचा परीघ आपल्या आवाक्याबाहेर गेलेला आहे म्हणूनच की काय तो आपल्याला ज्ञात नाही. ही लढाई एका व्यक्तीची नसून एका मूक विषयाची पूर्ण अनभिज्ञ समाजाबरोबर सुरू असलेली ही लढाई आहे. ती समजून घ्यायला आपल्याला इतिहासातून पुढे जावे लागेल.

इंग्रजांना भारतात निर्माण होणाऱ्या धातुकाम, लाकडी कलाकुसरीच्या कलाकृती परदेशात विकल्या जातील याची खात्री होती. या सर्व कलावस्तू बाहेर विकण्यासाठी काय करता येईल हे त्यांनी काही उद्योगपतींना विचारले. तेव्हा त्यावेळचे आघाडीचे उद्योगपती जमशेदजी जीजीभॉय यांनी भारतीय दृश्यकलेला उत्तेजन मिळावं म्हणून 'जे.जे. स्कूल ऑफ आर्ट'ची स्थापना केली.




संतोष क्षीरसागर

# दृश्य-उपयोजित कला आणि आपला समाज

**आपल्या समाजात कलासाक्षरता, कलेविषयीचं कुतूहल, आस्था किती आहे? आपल्या शासनाला कलाशिक्षण टिकवलं, जगवलं, वाढवलं पाहिजे असं वाटतं का? दृश्य उपयोजित कलांच्या अभ्यासाचे क्षेत्र आजही आपल्याकडे दुर्लक्षित आहे. या साऱ्याच मुद्द्यांसह या क्षेत्रातील संघर्षाचे स्वरूप उलगडाताहेत सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालयाचे डीन डॉ. संतोष क्षीरसागर.**

इंग्रजांनी भारतातल्या समुद्रकिनाऱ्यावरची म्हणजे मुंबई, मद्रास (चेन्नई), कराची आणि कलकत्ता ही चार शहरं निवडली होती. तेव्हा या ठिकाणांहून भारतीय कलाकृती आणून त्याची निर्यात जगाला करता येईल व भारतीय कलेला जागतिक बाजारपेठ मिळेल हा उद्देश होता. तोपर्यंत भारतातील दृश्यकला ही संस्थानिकांच्या राजाश्रयाखाली वाढत होती, अर्थात स्वातंत्र्योत्तर काळात संस्थाने खालसा झाल्यावर कलाकारांनी अर्थार्जनासाठी काय करायचे हा प्रश्न उद्भवला होताच.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे (म्हणजे पूर्वीचे व्हीटी) जेव्हा बांधकाम सुरू झाले तेव्हा, आपल्याला स्टेशनच्या इमारती बाहेर आजही दिसणारे अलंकृत आकार हे जे.जे.च्याच कलाकारांनी बनवले आहेत. केवळ एवढंच नाही तर मुंबईतल्या काही मौलिक वास्तूंचे आराखडे ब्रिटिशांनी परदेशातील वास्तुशास्त्रज्ञांना तयार करायला दिले असले तरी ते नकाशे वापरून प्रत्यक्षात वास्तू उभारण्याचे काम इथल्याच लोकांनी केले आहे. अर्थातच १९१३ साली जे. जे. वास्तुशास्त्र विभाग उदयास आला आणि दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी १९३५ साली प्रथम 'पोस्टर डिझाईन क्लास' व नंतर 'कमर्शियल आर्ट' नावाने अजून एक विभाग सुरू झाला. मुद्रणाच्या क्रांतीनंतर उपयोजित कलेची झपाट्याने मागणी वाढली. भित्तिपत्रकांच्या संकल्पना केवळ छपाई-रेखाटनांपर्यंत मर्यादित राहिल्या नाहीत. जेव्हा वर्तमानपत्रे आली तेव्हा त्यातील जाहिराती व रेखाटने छपाईच्या दृष्टीने तयार करण्यामुळे उपयोजित कलेचा उद्देश निश्चित झाला. तसेच उपयोजित दृश्यकला (कमर्शियल आर्ट) हे नाव समाजासाठी उपयोजित दृश्यकला Applied Art म्हणून स्थिरावले. शिल्पकला व पेंटिंग यांचे उद्देश संशोधनात्मक पातळीचे ठरले. संशोधनात्मक, विचारप्रवर्तक, आत्मसंशोधनात्मक असे मूलभूत स्वरूप त्याला प्राप्त झाले. उरलेल्या सर्व दृश्यकलेच्या शाखा समाजोपयोगी दृष्टीने वाढत आजही कार्यरत आहेत. त्यामुळे १९७० साली सर जी.जी. उपयोजित कला महाविद्यालयाची पाच मजल्यांची इमारत शासनाने तातडीने उभी केली आणि त्यात १०० विद्यार्थी प्रतिवर्षी अशा पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाची मांडणी निश्चित झाली.

मूलभूत दृश्यकला असो किंवा उपयोजित दृश्यकला असो, त्या चित्रांमागचा माणूस एकंदरीत समाजासमोर आलाच नाही. मात्र त्याची कला समाजात खूप उपयोगाला येत होती आणि ती आजही येते. संगीत, गायन, वाद्यसंगीत, नृत्य, नाट्यकला या सर्व प्रत्यक्ष सादरीकरणाच्या कला असल्याकारणाने ते कलाकार एकंदरीत सम ाजात सरळसरळ त्यांच्या नावाने प्रसिद्ध व लोकप्रिय झाले. त्यामानाने नाटकातील मागचे पडदे रंगवणारा चित्रकार, रंगसज्जा करणारा दृश्यकलाकार आणि पुढे सिनेमातील दिग्दर्शक असे सारे आजही एकंदरीत समाजात 'अभिनेत्यांच्या' तुलनेत पडद्यामागेच राहतात.

ही पार्श्वभूमी सांगण्यामागचा उद्देश हा आहे की दृश्यकलाकाराचा थेट संवाद समाजाशी फार झाला नाही म्हणूनच बहुधा आजही या विषयातील असंख्य कलाकार समाजाला माहीत नाहीत. अर्थातच त्यामुळे सर्व शाखांतील दृश्यकलेची प्रक्रिया, त्यामागची कलाकरांची साधना, त्यातून त्याचे स्वत:चे निर्माण होणारे विचार आणि भावविश्व याबाबत एकंदरीत समाज अनभिज्ञच राहिला.

आज या सर्व दृश्यकलाविश्वाचे असंख्य व विविध शाखांमार्फत समाजास उपयोगी होणे अजूनही सुरू आहेच. त्यामानाने मूलभूत चित्रकला म्हणजे पेंटिंग व शिल्पकला यांची प्रदर्शने होत असल्याकारणाने व ते स्वत: प्रदर्शनाच्या निमित्ताने समाजाला सरळ भेटू-बोलू शकतात. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान, विचार, कामाच्या पद्धती हे एकंदरीत समाजातील मूठभर लोकांना तरी माहीत आहेत. मात्र



उपयोजित कलाकार कायमच समाजमान्यतेपासून वंचित व अनोळखी राहिला. या सगळ्याचे परिणाम म्हणजे त्याची होणारी आर्थिक फसवणूक व पिळवणूक! मी एकेकाळी ती अनुभवली. शिक्षक असल्याकारणाने ती आजही डोळ्यांदेखत मी सहन करीत आहे. वकील, डॉक्टर, इंजिनियर हे वीस वर्षापूर्वीपासून आपल्या समाजात मानाचे पेशे आहेत. त्यात आजकाल थोड्याफार प्रमाणात प्रदर्शन आयोजित करणारे व त्यामुळे त्यांच्याबद्दल चर्चा होत असल्यामुळे काही कलाकारांना थोडेफार स्थान मिळाल्याचे दिसते.

मुद्रण क्रांतीनंतर पुढे सिनेमा, व्हिडिओ आणि संगणकामुळे आलेली डिजिटल क्रांती यांत उपयोजित कलेच्या शाखा निर्माण झाल्या आहेत, हे एकंदरीत समाजाला आजही माहीत नाही. एकेकाळी छपाई करणाऱ्यांनी रेखाटन करू शकणारे, मुद्रित पानाची मांडणी करू शकणारे दृश्य कलाकार आपल्या पदरी ठेवले. ते आजकाल संगणक अभियांत्रिक कंपन्या (इंजिनियर्स) करत आहेत.

या सर्व क्रांतीच्या ओघात 'डिझाईन' हा शब्द पुढे आला याची नाळ दृश्य उपयोजित कलाकाराशी जोडली गेलेली आहे. मुळात संगणक जेव्हा सुरू झाला, त्यात वापरकर्त्यांची सुलभता या दृश्यसंवेदनशील कलाकारांनीच केली आहे. मोबाईल क्रांतीमध्ये ज्या अनेक सोयी आपणास पहावयास मिळतात त्या वापरकर्त्यास सुलभ करण्याचे काम आजही दृश्य उपयोजित कलाकार करत असतो.

अनेकविध कंपन्यांची, विविध शासकीय विभागांची बोधचिन्हे तो तयार करतो. या सर्वांतून सर्व भाषांना ओलांडून चित्रांची एक वैश्विक भाषा त्याने रुजवली आहे. त्यामुळे भाषासुद्धा न येणाऱ्या लहान मुलांना मोबाईल/संगणक फार लवकर वापरता यायला लागला आहे. हे दृश्य उपयोजित कलाकाराचे मोठे योगदान अजूनही समाजाला माहीत नाही. मात्र माणसाचे सारे आयुष्य आज त्यावर सुरळीत व वेगाने विकास पावत असल्याचे दिसते. आजही जन्म प्रमाणपत्रापासून ते मृत्यू प्रमाणपत्रापर्यंत जन्म, लग्न, मृत्यू ते देश सोडून जात असलेल्या पारपत्रापर्यंत तसेच सकाळी उठल्यानंतर दात

कला दिग्दर्शक र.कृ. जोशींनी डिझाईन केलेला पंजाब नॅशनल बँकेचा लोगो.

मुंबई मेट्रासाठी ज.जी. उपयोजित कलेच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांच्या टीमने डिझाईन केलेला लोगो

घासायच्या टूथपेस्टपासून ते झोपताना रात्री मच्छर अगरबत्तीपर्यंत सर्व उत्पादनांची वेष्टने (packaging) व जाहिराती या सर्व ठिकाणी आजही उपयोजित चित्रकाराचे योगदान सुरू आहे. उपयोजित दृश्यकला चित्रकाराने अथवा संकल्पनाकाराने चित्रकला मानवी जीवनात व व्यवहारात इतकी जवळ आणून ठेवली आहे की बहुधा त्यामुळेच आपल्याला ती दिसत नाही, किंबहुना त्यामुळेच आपल्याला त्याचे मूल्यही कळत नाही. या बदललेल्या चित्रकलेच्या समाजोपयोगी विषयाबद्दल शाळेतील मुलांना एकही धडा नाही. त्याचाच परिपाक म्हणून की काय विद्यापीठाला अथवा शासनयंत्रणेला सुद्धा त्याचे स्थान व मूल्य ना कधी कोणी सांगितले, ना कधी त्याबाबत चौकशी करण्याचे कोणाला सुचले. आपल्या समाजात त्यामुळे दृश्यकला आणि त्याचे उपयोजन, त्याचे मूल्य आणि मूल्यमापन, त्याचा व्यवहार आणि त्याची आर्थिक गणितं, त्यातून निर्माण होणारे उद्योगविश्व या असंख्य स्तरांवर प्रबोधनाची गरज आहे. त्यामुळे याला लढाई म्हणायचेच म्हटले तरी अशक्य वाटते कारण कुठल्या देशाची अव्याहत इतका काळ चालणारी लढाई आजवर ऐकिवात नाही.

या सर्व पार्श्वभूमीमुळे निर्माण होणारे प्रश्न फार विचित्र आणि गंभीर असे आहेत. दृश्य, संवेदनशील व कुवत असलेल्या लहान मुलांना हे सारे अजाणत्या वयात आपल्या आईबाबांना कसे सांगता येईल? तसेच याबाबतची कुठलीही पार्श्वभूमी-संस्कार नसलेल्या अजाण पालकांना त्यांच्या मुलांचे चित्रात्मक/दृश्यात्मक बोलणे कसे ऐकू येईल? हे असे सारे गेल्या तीस वर्षांपासून घडते आहे, जे मी पाहतो आहे आणि शिक्षक या 'नात्याने शहाणे करूनी सोडावे सकळा' या निष्पाप भावनांनी हवेत लढाई करत बसलो आहे. सांगायचे तर कोणाला? किती? कसे? हे मोठे प्रश्न माझ्यासमोर आहेत.

बालशिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत केवळ समाजालाच नव्हे तर अनेकविध विषयातील, उद्योगातील व्यक्तींना, विद्यापीठांना, शासनातील उच्च शिक्षण विभागांना वेळोवेळी प्रसंगोचित या सर्व बाबी मोठ्या कळकळीने सांगण्याचा माझा प्रयत्न असतो.

आजही अनेकांना हे माहीत नाही की एकंदरीत दृश्यकलेचा पदविका अभ्यासक्रम चालवणाऱ्या महाराष्ट्रातच सरासरी १७० संस्था आहेत. महाराष्ट्र राज्यशासनाचे दृश्यकला संचलनालय १९६५ साली स्थापन झाले. त्यामुळे थोडाफार व्यवस्थित रचनात्मक प्रयत्न जर कोणी केला असेल तर तो महाराष्ट्र राज्यानेच आहे. ही मानाची व प्रतिष्ठेची बाब आहे मात्र आजही देशातील कोणत्याही राज्याने हा कित्ता अजूनही गिरवलेला नाही, हेही सत्य आहे. आज देशामध्ये ४०-५० पेक्षा जास्त उपयोजित कलेचे शिक्षण देणारी नोंदणीप्राप्त विद्यालये कार्यरत आहेत. मात्र १००० पेक्षा अधिक अशी 'डिझाईन' या नावाने चालणारी विद्यालये/शैक्षणिक संस्था आज अस्तित्वात आहेत. त्यावर अजूनही फार कोणाचे नियंत्रण, परीक्षण होत नाही. हे इथे खेदाने नमूद करावेसे वाटते.

ही आकडेवारी खूप मोठी जरी वाटत असली तरी एकशेतीस कोटी लोकांच्या या देशात दृश्यकला व डिझाईन, उपयोजित कला शिक्षण देणाऱ्या संस्था मात्र अत्यल्प आहेत. मात्र नजीकच्या भूतकाळात ही वाढलेली संख्या भविष्यात प्रचंड प्रमाणात वाढू शकते. त्याला न्याय देण्यासाठी देशाला एक व्यवस्था निर्माण करावीच लागेल कारण NID/IDC, IIT सारख्या काही स्वतंत्र व स्वायत्त महाविद्यालयांनी केलेले प्रयत्न आपल्या देशाच्या व लोकसंख्येच्या आवाक्यात तुटपुंजे आहेत.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉ. अब्दुल कलाम यांनी सांगितल्याप्रमाणे २०२० साली या देशात जगाच्या लोकसंख्येच्या तुलनेत सर्वात जास्त युवक असणार आहेत. दृश्यकला व त्यासंबंधित डिझाईन/उपयोजित कला या सर्व नामाभिधानाने तयार झालेल्या शिक्षण संस्थांकडे आजचे तरुण मोठ्या संख्येने आकर्षित होत आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे चित्रकला व त्याच्याशी निगडित दृश्यसंकल्पना! कला हे सृजनाचे व अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे, मात्र ते आजपर्यंत आपल्या देशात बऱ्यापैकी दुर्लक्षित राहिले आहे.

जसे शासनाने याच्या व्यवस्थेत लक्ष घालावे त्याहीपेक्षा कित्येक पटीने जास्त, त्याच्याशी संबंधित उद्योगसमूहाने एकत्रित येऊन व्यवस्था निर्माण करण्यास शासनास हातभार लावणे हे खरं म्हणजे त्यांचे नैतिक कर्तव्य आहे आजवर झालेल्या मानवी दृश्यउत्सर्जनाचे सरळसरळ व अप्रत्यक्षरित्या त्यांनाच प्रचंड आर्थिक फायदे झालेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्याने जमिनीकडे दुर्लक्ष केले तर कसे चालेल? पीक कसे येईल? या न्यायाने संबंधित उद्योगांची जमीन कसण्याचे काम केवळ शासनाने करणे पुरेसे होणार नाही. त्यातून उद्योगांचा फायदा होतो आहे. त्याच्याशी संबंधित शिक्षण व्यवस्थेकडे लक्ष घालणे किंवा तशी शिक्षणव्यवस्था नसल्यास ती निर्माण करण्याचे धाडस जमशेदजी जीजीभॉय यांनी दाखवले ते धाडस देशातला कोणीही उद्योगपती जबाबदारीने दाखवताना दिसत नाही ही फार दुःखद बाब आहे.

एखाद्या व्यावसायिक संस्थेने आपले महाविद्यालय काढणे, अनेकांनी आपापली वेगळी महाविद्यालये काढणे आणि मग त्यामुळे त्यांच्यात सुसूत्रता नसणे तसेच बाजारपेठेनुसार दृश्यकलाकाराच्या सृजनाची पिळवणूक होणे हे दोन्ही भविष्यकाळात घडू शकते. त्यामुळे जमशेदजी जीजीभॉय यांची दूरदृष्टी लक्षात घेऊन अनेक मोठ्या उद्योगसमूहांनी दृश्योपयोजित कलांच्या (डिझाईन) शिक्षणव्यवस्थेला सामूहिक व आर्थिक पाठबळ द्यावे असे स्वप्न आज तरी मी पाहतो आहे. या लेखाच्या अनुषंगाने ते आपल्यासमोर ओबडधोबड पद्धतीने का होईना मांडावयास मिळाले हा एक विजयच नाही का?

**- डॉ. संतोष क्षीरसागर**
kshirsagar.santosh@gmail.com

मुमताज शेख आणि सुप्रिया जाण-सोनार

# दडवून ठेवण्याची मानसिकता बदलणारे आंदोलन

**वाढत्या शहरीकरणात महिलांच्या स्वतंत्र अवकाशाचा विचार व्हायला पाहिजे, पण तो किती होतो? की तो न करताच 'स्मार्ट सिटी'चे आराखडे तयार होतात. 'राईट टु पी' या आंदोलनाच्या आघाडीच्या कार्यकर्त्या मुमताज शेख व सुप्रिया जाण-सोनार उलगडताहेत या आंदोलनाची वाटचाल...**

कोरो (committee of Resource Organisation) ही स्वयंसेवी संघटना सन २००८पासून तळातील नेतृत्व विकास (Grassroots Leadership Development) हा कार्यक्रम राबवित आहे. महाराष्ट्र, राजस्थान आणि दिल्ली येथील साधारण २८०पेक्षा संस्था-संघटनामधून आजपर्यंत 'ज्यांचे प्रश्न त्यांचे नेतृत्व असे' म्हणत ११३५ लीडर्स या कार्यक्रमातून तयार झाले आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागात महिला सक्षमीकरण ते जल-जंगल-जमीन अशा वंचित समूहांच्या अनेक मुद्यांवर सामूहिक प्रयत्नातून हे लीडर्स बदल घडवून आणत आहेत. सन २०११ मधे याच कार्यक्रमाच्या राळेगणसिद्धी येथील एका कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रात समाजातील कोणत्या मुद्याला घेऊन 'जनवकालत' करायची याबाबत चर्चा सुरू होती. कुपोषण, महिलांवर होणारे अत्याचार, मुंबईत सुरू असलेले 'SR प्रकल्प' अजूनही बरंच काही. आम्ही मुंबई विभागातील काही कार्यकर्त्यांनी 'महिलांच्या मुताऱ्यांबाबत काम करूया का?' हा पर्याय ठेवला आणि अनेकांच्या भुवया उंचावल्या. तेव्हापासून ते आज २०१८पर्यंत असे भुवया उंचावण्यापासून ते मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर निदर्शने केली म्हणून झालेली अटक अशा अनेक संघर्षाच्या प्रसंगांना सामोरे जाऊन 'राईट टू पी' ही चळवळ एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन ठेपली आहे.

वर म्हटल्याप्रमाणे, कार्यशाळेत हजर असलेल्या जवळपास सर्वांनीच हा विषय हसण्यावारी नेला, 'हा विषय आहे का?' ही पहिली प्रतिक्रिया कार्यकर्त्यांमधून उमटली. बरीच उलटसुलट चर्चा झाल्यावर अखेरीस मुंबईत महिलांच्या समस्यांवर काम करणाऱ्या इतर संघटनांसोबत चर्चा करून विषय हाताळण्याचा निर्णय झाला. मुंबईत आल्यावर इतर संघटनांशी चर्चा केली, त्यांनी तात्काळ हा विषय उचलून धरला आणि २०११ मध्ये बत्तीस संघटनांनी मिळून हा विषय हाताळण्यास सुरवात केली. महानगरपालिकेला दोन-चार वेळा पत्र देऊन हा प्रश्न सुटेल अस वाटलं होतं, परंतु त्याने काही होणार नाही याची लवकरच जाणीव झाली आणि पुढील प्रवास हा खडतर आहे याचीही खात्री पटली. आम्ही सगळे पालिकेच्या अधिकाऱ्यांना भेटायला गेलो. नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांनी चर्चा करण्यास सुरुवात केली. *आम्हाला महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी मुताऱ्या हव्यात', 'काय? महिलांसाठी मुताऱ्या? हे काय नवीन? महिलांसाठी मुताऱ्या असतात का कुठे...? अहो, महिलांसाठी मुताऱ्या काय म्हणता? स्वच्छतागृह म्हणाना, मुताऱ्या ऐकायला कसं वाटतं?'* हा पुरुषी मानसिकतेचा अनुभव होता.







आजच्या २१व्या शतकातील महिला स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. त्यासाठी तिच्या अंतर्मनातून येणारा आत्मविश्वास आणि धाडस हे तिला पाठबळ देत आहेत. आजही जगातील महिलांना विविध क्षेत्रात जसे की, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक, अशा प्रत्येक क्षेत्रात निर्णय घेण्यास दुय्यम स्थान दिले जाते. आम्हाला वाटले किमान महिला तरी आमच्या बाजूने असतील, परंतु पुरुषप्रधानतेचे वाहक फक्त पुरुष नसून महिलाही आहेत त्यामुळे महिलांकडून मिळणारी वागणूकही अंगावर काटा आणणारी होती. मुंबईतील फोर्ट विभागातील स्वच्छतागृहाची देखभाल महिला करते. महिला म्हणून तिला ही समस्या समजेल, असे वाटले होते परंतु एकूण अनुभव मन सुन्न करणाराच होता. त्या स्वच्छतागृहात गेल्यावर ती महिला म्हणाली, ''तुम्ही संडासात जाऊन काय करणार हे आम्ही कुठे बघायला येतो?'' सार्वजनिक स्वच्छतागृहाची देखभाल करणाऱ्या महिलेनेच विचारलेल्या अशा विक्षिप्त प्रश्नातूनच आमचा संघर्ष वेगळा आहे हे आमच्या लक्षात आले आणि आज जवळपास आठ वर्ष झाली तरीसुद्धा स्वतंत्र, स्वच्छ, आणि सुरक्षित मुताऱ्याचा हक्क आणि स्वातंत्र्य आजही नाकारलं जात आहे याची खंत आम्हा कार्यकर्त्यांना वाटते आहे. गेल्या आठ वर्षातील या लढ्याची वाटचाल नेमकी कशी झाली याचा मागोवा आणि भविष्यातील वाटचालीचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.

'राईट टू पी' अर्थात महिलांसाठी मोफत, स्वच्छ, सुरक्षित आणि सार्वजनिक मुताऱ्या हव्यात, ह्या मुद्याचा सबंध हा संघर्षाशी आहे असे आम्हाला मनापासून वाटते कारण हा लढा सरळ समाजाने पुरुषी व्यवस्थेला सहज दिलेल्या सत्तेशी आहे. पुरुष कोठेही मोकळे होऊ शकतात, महिला नाही. ही सुविधा पुरुषांना नि:शुल्क तर महिलांना सशुल्क? नैसर्गिक विधीसाठी सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधांची आजची परिस्थिती लक्षात घेतली तर आपल्याला हा प्रश्न किती गंभीर आहे याची कल्पना येईल माहितीच्या अधिकारात मिळालेली आकडेवारी लक्षात घेतली तर पुरोगामी महाराष्ट्र आणि भारताच्या आर्थिक राजधानीतील महिलांच्या ह्या प्रश्नाबद्दलचे चित्र किती विदारक आहे हे लक्षात येईल. माहितीच्या अधिकारातून पुरुषांसाठी २८३९ आणि महिलांसाठी शून्य मुताऱ्या असल्याचं वास्तव सामोरे आले. आणि मग सुरू झाला प्रवास धरणे, मोर्चा, आंदोलने, तो आजपर्यंत सुरू आहे. ह्यामधून यंत्रणांची असंवेदनशील मानसिकता प्रामुख्याने जाणवली आणि महिला अजूनही चार भिंतीच्या आतच आहे असं गृहीत धरलं जातंय का? असा प्रश्न पडला, जो आजही तसाच आहे. गेल्या आठ वर्षांच्या या प्रकियेत महिला संस्थांसोबत अनेक पुरुषांनी चालवलेल्या संस्थांनीही सहभाग घेतला आहे. त्यामुळे पुरुष या मोहिमेत सुरुवातीपासूनच होते. मात्र सर्वच पुरुषांनी 'राईट टू पी'ला पाठिंबा द्यावा यासाठी आम्ही पुरुषांच्या उघड्यावरच्या मुतारीच्या जागा स्वच्छ करून तेथील भिंती रंगवल्या. मात्र जेव्हा पालिकेने पुरुषांकडून दंड घ्यायला सुरुवात केली, तेव्हा मात्र आम्ही त्या मोहिमेला कडाडून विरोध केला. उघड्यावर मुतारीला जावे लागणे ही प्रशासनाला लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे. पुरेशा सुविधा नसल्याने पुरुष उघड्यावर मुतारीला जातात, मग त्यासाठी त्यांना दंड का लावावा? 'तुम्हाला हॉस्पिटल हवं असेल तर जागा सुचवा, डॉक्टर तुम्हीच आणा आणि पेशंटही तुम्हीच व्हा,' असा अनुभव आला आहे. पहिल्या टप्प्यात अनेक नाविन्यपूर्ण रणनित्या आखल्या गेल्या. उदा. जेव्हा अडीच वर्ष महानगरपालिका आयुक्तांनी भेट नाकारली तेव्हा मंत्रालयासमोर लघवी करण्याचा इशारा दिला आणि भेट मिळाली. महानगरपालिका सहआयुक्तांच्या




भेटीसाठी अस्वच्छ टॉयलेटचे हॅपी दिवाळी ग्रिटींग्ज पाठवले आणि विभागवार आढावा बैठका सुरू झाल्या. मुंबईमधील १६ रेल्वे स्टेशनांवर सह्यांची मोहीम राबवून ५० हजार सह्यांचे निवेदन दिले, १२९ टॉयलेट ब्लॉक्सचे सर्वेक्षण करून त्याचा विश्लेषणात्मक अहवाल मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीला सादर केला. साधारण १००० पेक्षा जास्त पत्रे संबंधित यंत्रणेला पाठवली. महिला मुताऱ्यांसाठी आर्थिक तरतूद व्हावी म्हणून आझाद (आझाद मैदानही येणाऱ्या सर्व निदर्शने करणाऱ्यांना कोंडून ठेवण्याची जागा वाटते.) मैदानावर निदर्शने केली. जगभरातील लोकांना जोडून घेण्यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून मोहीम राबविली. अगदी तपशीलवार गुगल मॅपिंगही केले.

हळू-हळू प्रशासन आणि संबधित यंत्रणांकडून प्रतिसाद मिळू लागला. सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात मुंबई शहरामध्ये गर्दीच्या ठिकाणी महिलांकरिता शौचालय बांधण्यासाठी ७५ लाखाची तर २०१४-१५ मध्ये १ कोटी रुपयाची आर्थिक तरतूद करण्यात आली आणि २०१५-१६ मध्ये ५.२५ कोटीची तरतूद करण्यात आली. 'राईट टू पी'च्या एकूण प्रवासाचा आढावा घेतला तर असं सांगावस वाटतं की आम्ही जोडून घेत आणि सोबतच योगदान देत संवाद कायम ठेवला आणि फक्त चर्चा नाही तर 'दिसणारा बदल घडवण्यासाठी स्वत:च्या रणनीतीमध्ये बदल करणंही आलच. जेंडर डायमेन्शन हा ह्या मोहिमेचा गाभा कायम ठेवत लोकांच्या प्रत्यक्ष आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालू ठेवले. ह्याचा अर्थ आपण टॉयलेट आणि मुताऱ्यांचा प्रश्न हा फक्त शारीरिक प्रक्रियेशी न जोडता, तो हक्काचा मुद्दा आहे हे कायम रेटून धरलंय. सन २०१४ ते २०३४ मध्ये मुंबई शहराच्या नगरनियोजनाच्या आराखड्यातील नियमांमध्ये 'सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी मोफत मुताऱ्या असाव्यात' ह्या नियमाचा समावेश झाला आहे आणि सन २०१३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणात 'राईट टू पी'वर स्वतंत्र प्रकरणाचा समावेश करण्यात आला आहे. विविध तज्ज्ञ संस्था आणि व्यक्तींच्या सहकार्यातून महिला मुताऱ्याचे जेंडर फ्रेंडली डिझाईन, मुंबईमधील 'पे आणि युज' शौचालयांसाठी मार्गदर्शिका, तसेच मुंबई महानगरपालिकेसाठी विभागवार मूल्यमापन तक्ता 'महानगरपालिका' आणि 'राईट टू पी' टीम मिळून सामूहिकरीत्या करण्यात आला. ही सर्व प्रक्रिया १ सप्टेंबर २०१६ रोजी मुंबई येथे 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान' येथे झालेल्या राष्ट्रीय परिषदेने देशपातळीवर नेली मात्र तरीही आजही महिलांच्या मुताऱ्याच्या हक्क नाकारला जात आहे. (स्वच्छ भारत अभियान असताना?). आज घराबाहेर काहीना काही कामानिमित्त आणि कामानिमितच कशाला फिरायला, खरेदी करायला, महिला बाहेर पडतात परंतु त्यांच्यासाठी स्वच्छतागृह मात्र नसते. मुंबई (आणि मुंबईसारख्या इतर अनेक शहरांमध्ये) महिलांना सार्वजनिक, गर्दीच्या ठिकाणी आणि बऱ्याच वेळेस कामाच्या ठिकाणी मुतारी, शौचालयाची सोय उपलब्ध नसते. परिणामी महिलांना लघवी दाबून ठेवावी लागते. बहुतांश महिला लघवी होईल म्हणून पाणी पित नाहीत. त्यामुळे महिलांच्या व मुलींच्या प्रजनन आरोग्यावर परिणाम होतो, तसेच मुतखडा व इतर संसर्गजन्य आजाराचे प्रमाणही लक्षात घेतले पाहिजे आणि हा परिणाम फक्त शारीरिक-मानसिक असतो. मुख्यत: महिलांची शरीररचना लक्षात घेतली तर त्या लघवी जास्त काळ थांबवून ठेवू शकत नाही हे लक्षात घेणे जास्त जरुरीचे वाटते. 'राईट टू पी' या चळवळीने मात्र हा प्रश्न जगभरातील महिलांपर्यंत नेला आहे आणि आम्हाला वाटतं या चळवळीने जात, वर्ग, लिंग यांच्या पलीकडे हा मुद्दा नेला आहे, म्हणूनच राष्ट्रीय परिषदेनंतर ट्रान्सजेंडर कम्युनिटीही या चळवळी सोबत जोडली गेली आहे.

अगदीच अपरिहार्य अवस्थेत मुंबईत उपलब्ध असणारी 'पे अॅन्ड युज' शौचालय वापरावी लागतात. सुरक्षिततेच्या बाबतीत आपल्या सगळ्यांना माहीत आहेच की अशा शौचालयांचे व्यवस्थापन करणारे पुरुषच असतात. वीज, दरवाजे, खिडक्यांचा तर पत्ताच नसतो. बऱ्याच ठिकाणी अशा शौचालयांमध्ये ते शौचालय चालविणाऱ्याचा संसारच मांडलेला असतो. अशा परिस्थितीत तिथे जाणे कोणत्या महिलेला सुरक्षित वाटेल? आणि जवळपास प्रत्येक

रेल्वे स्टेशनवर तर ही शौचालये बंद असतात व तिथे लिहिलेलं असतं, 'अमुक ठिकाणी जाऊन तमुक माणसाकडून चावी घ्या.' ही वस्तुस्थिती आहे. मुंबई महानगरपालिकेत ५०%पेक्षा जास्त महिला नगरसेविका आहेत. त्याच मुंबईत महिलांना लघवीच्या अधिकारासाठी रस्त्यावर उतरावं लागतं हे लज्जास्पद आहे आणि देशाची आर्थिक राजधानी असलेल्या पुरोगामी महाराष्ट्राला मागे नेणारे आहे. आज स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ५०% आरक्षण मिळालेले आहे, बेस्ट बसेसमध्ये महिलांना ३३% जागा राखीव असतात, रेल्वे तर महिलांसाठी राखीव डबा आणि विशेष गाड्या चालविते, पण महिलांच्या या मूलभूत, जैविक गरजेकडे दुर्लक्ष केले जात आहे. ज्या मुंबईच्या आर्थिक विकासात ५०% पेक्षा जास्त महिला योगदान देत आहेत. त्याच महिला घराबाहेर पडल्यावर शौचासाठी, लघवीसाठी कुठे जात असतील? ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही आणि आजपोवतो कोणत्याही सरकारने तो केलेला नाही. ही वास्तवाची स्थिती जर शहरी भागातील असेल तर ग्रामीण महाराष्ट्रातील कल्पनाच करवत नाही.

सन १९९५ मध्ये बिंजिगमध्ये जागतिक स्तरावर संपन्न झालेल्या चौथ्या जागतिक संमेलनाचे घोषवाक्य होते, ''महिलांच्या दृष्टीतून जगाकडे पाहा.'' महिला सक्षमीकरणात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे तिला माणूस म्हणून जगण्याची संधी देऊन तिला तिचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास समाजातून प्रोत्साहन मिळावे. महिला सक्षमीकरणाचा अर्थ, महिलांना भीक नको आहे, कोणाची दया नको आहे, तर त्यांना पुरुषांप्रमाणे समान संधी हवी आहे आणि 'राईट टू पी'च्या अंतर्गत आमच्या मागण्या ह्याच दृष्टिकोनातून आहेत. आम्हाला माणूस म्हणून आमच्या नैसर्गिक विधीचा (लघवी) हक्क हवा आहे, भीक नकोय. गेल्या आठ वर्षाच्या आमच्या प्रवासात सुरुवातीला खिल्ली, नंतर बघूयात, आणि शेवटी उपकार केल्यासारखे संबंधित यंत्रणा ह्या प्रश्नाकडे बघतेय असे वाटतेय. कारण निधी मंजूर केला त्याचा विनियोग नाही, आश्वासने दिली पण ती पूर्ण केली नाहीत. आम्ही जे मॉडेल शौचालय बांधण्याचा प्रस्ताव मुंबई महापालिकेला दिला होता, त्या प्रकरणात तर आमची अक्षरशः फसवणूक झाली. मुंबईसारख्या महानगरात कामासाठी, उपजीविकेसाठी घराबाहेर पडणाऱ्या महिलांचे प्रमाण ४५ टक्के (एकूण वर्किंग फोर्सच्या तुलनेत) इतके आहे, आम्ही अभिमानाने सांगतो की आम्ही मुंबईतील 'वर्किंग वुमन'च्या चौथ्या पिढीचे प्रतिनिधित्व करतो एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक स्वच्छतागृहांची आजची मुंबई शहराची गरज लक्षात घेतली तर किमान पाच हजार स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे परंतु अवघी २५९१ सार्वजनिक स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत. स्त्रीमुक्तीच्या चळवळीतून महिला सक्षमीकरणाचा प्रवास वेगाने झाला खरा, परंतु वाढत्या नागरीकरणात, मुंबईसारख्या शहरात आणि तत्सम एकूण शहरांत महिलांच्या दृष्टिकोनातून शहरांचा विकास झालेला नाही आणि आपण आता तर मुंबईला स्मार्ट सिटी करत आहोत (रस्त्यावरील खड्डे न बुजवता.) चंद्रावर जेवढे खड्डे नसतील त्याच्यापेक्षा जास्त खड्डे दर पावसाळ्यात मुंबईच्या रस्त्यावर असतात.) जेथे साधा पिण्याचा पाण्याच्या प्रश्न सुटलेला नाही. ब्रिटिशकालीन पर्जन्यवाहिन्यांवर आजही आपण अवलंबून आहोत, २६ जुलै सारखी परिस्थिती कधीही येईल अशी अवस्था आहे. कसली स्मार्ट सिटी करणार आहोत आपण? आणि या स्मार्ट सिटीमध्ये महिलांचा म्हणून काहीही स्वतंत्र विचार दिसत नाही. म्हणूनच 'राईट टू पी'चा पुढील टप्पा आहे 'राईट टू सिटी' अर्थात बदलत्या सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक पार्श्वभूमीवर वाढत्या शहरात महिलांच्या स्पेसचा वेगळा विचार व्हायला हवा आणि हा विचार लघवीच्या हक्कापुरता मर्यादित नसून तो या शहरातल्या प्रत्येक स्तरातील महिलांच्या विविध गरजांचा, त्यातील स्थानिक संदर्भाचा विचार करून व्हायला हवा असे वाटते. जागा, निधी यापेक्षाही स्त्रियांसंबंधीच्या असंवेदनशीलतेशी लढणे अधिक कठीण असल्याचे या मोहिमेतून दिसून येते. ह्या मोहिमेने जात, धर्म, वर्ग, लिंगाधारित असमानता ह्यांना आव्हान देण्याचे काम नक्कीच केले आहे.

'राईट टू पी' हे कोणत्याही एका वर्गातील महिलांचे आंदोलन नाही. हे आंदोलन सर्वांचे आहे. भाजी विकणाऱ्या, धुणीभांडी करणाऱ्या महिलांमध्ये याची तीव्रता अधिक आहे. काही स्त्रियांना 'पे ॲण्ड युज' परवडू शकते, पण मुळात या सुविधेसाठी कोणालाही पैसे का द्यावे लागावेत? हा मुद्दा केवळ स्वच्छतेचा नाही तर तो स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा आहे. या आंदोलनाच्यामार्फत स्त्रिया त्यांच्या शरीराच्या अवयवाविषयी, लैंगिकतेविषयी मोकळेपणे बोलण्याची स्पेस तयार झाली. आतापर्यंत दडवून ठेवण्याची मानसिकता भेदण्याचे काम या आंदोलनाने केले आहे आणि हा भारतीय महिला आंदोलनातील महत्त्वाचा टप्पा आहे.

'राईट टू पी'च्या पुढील 'राईट टू सिटी'च्या पुढच्या टप्प्यात सार्वजनिक प्रश्नांवर काम करत असतानाच 'सोच के साथ शौचालय बदलो' या घोषणेसोबत 'कम्युनिटी टॉयलेट'चा प्रश्न घेऊन लोकसहभागाने लोकांच्या ओनरशिपने टॉयलेटचा प्रश्न सोडवणे व त्याचे उदाहरण समोर ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत. या प्रवासात निम्म्या लोकसंख्येने असलेल्या पुरुषांना सोबत घेतल्याशिवाय खरे सक्षमीकरण होणार नाही याची आम्हाला खात्री आहे कारण न्याय्य हक्क मिळवण्यासाठी ज्यांनी परंपरागत हक्कांचा उपभोग घेतला आहे त्यांना जाणीव करून देऊनच पुढे जायला लागेल. भारतीय संविधानाने दिलेल्या समतेच्या मूल्यांवरच खरे सक्षमीकरण होईल असे सांगावेसे वाटते आणि आमचा लढा समतेचा आहे, हक्काचा आहे म्हणून तो आमच्या सक्षमीकरणाचा आहे आणि तो मिळेपर्यंत लडाई जारी है!

**– मुमताज शेख**
दूरध्वनी : (०२२) २५२९५००२
mumtaz.shaikh@coroindia.org
**– सुप्रिया जाण–सोनार**
supriya.jaan@gmail.com

यशवंत देव

# स्वरप्रेमी हे देशप्रेमी

**गायक-संगीतकार सुधीर फडके यांचे हे जन्मशताब्दी वर्ष.**
**त्यानिमित्त 'शब्द रुची'तून आम्ही दोन स्वतंत्र लेख प्रकाशित करीत आहोत.**
**हा पहिला लेख संगीतकार यशवंत देव यांच्याशी झालेल्या संवादातून साकार झालेला!**

*स्वरप्रेमी हे देशप्रेमी, सावरकरप्रेमी*
*लहरे यांच्या कीर्तीचा ध्वज भारतीय व्योमी*

मला भावलेल्या व्यक्तींवर कविता करायची सवयच जडली आहे. त्या व्यक्तींमध्ये महत्त्वाचं स्थान आहे ते फडकेसाहेबांना अर्थातच बाबूजींना. ते केवळ गायक, संगीतकार म्हणूनच त्यांची ओळख मर्यादित नाही तर ते जाज्ज्वल्य देशप्रेमी होते.

बाबूजींचा आणि माझा एकत्र काम केलेला पहिला चित्रपट म्हणजे 'झालं गेलं विसरून जा' या चित्रपटासंदर्भात पु.ल. देशपांडे आणि निर्मात्यांमध्ये चर्चा सुरू होती, तेव्हा गाडी संगीतावर आली. ''अरे दुसरा कशाला संगीतकार हवा हाच संगीत उत्तम देईल'' या शब्दात त्या गाण्याचं संगीत मी करावं हे पुलंनी आमच्या निर्मात्याला सांगितलं. राजा गोसावींनी या चित्रपटात काम केलं होतं. बेबी शकुंतलाही होती. संगीत मी देणार हे निश्चित झालं पण मग गाणार कोण? निर्माते म्हणाले, ''अहो फडके येतील ना.'' तेव्हाच काळजात अगदी धस्स झालं. माझा संगीतकार म्हणून पहिलाच चित्रपट. त्यात खुद्द बाबूजी गाणार म्हणजे उलट्या शिडीवर चढण्यासारखं होतं. म्हटलं कसं काय जमणार मला? माझ्या पहिल्या चित्रपटातले द्वंद्वगीत सुधीर फडके आणि आशाबाई गाणार. ते ड्युएट होते.


*तू नजरेने हो म्हटले, पण वाचेने वदणार कधी?*
*कर पडले गळ्यामधी पण वरमाला पडणार कधी?*

असे त्या गीताचे शब्द होते. अगदी व्यावहारिक प्रश्न होते.



सर्वसामान्यतः मुख्य तर हेच असतं ना! 'नजरेने हो म्हटलं तरी तोंडाने प्रत्यक्ष सांगणार कधी?' अशी घालमेल होत असते. ती गीतात चांगल्या पद्धतीने उतरली होती. गाणं उत्तम लिहिलं गेलं आहे, असं खुद्द पुलंनी आमच्या निर्मात्याला सांगितलं होतं.

रिहर्सलचा दिवस ठरला. सगळे आले. साक्षात बाबूजी अर्थात सुधीर फडके, आशाबाई (आशा भोसले) माझ्या समोर होत्या. बापरे! मी तर एकदम बावरूनच गेलो. छाती धडधडायला लागली. मी बाबूजींना म्हणालो, ''तुम्हाला गाणं शिकवणं



**तीन स्वरयात्री – यशवंत देव, अनिल विश्वास आणि बाबूजी**

म्हणजे रेल्वेच्या इंजिनात भर घालण्यासारखं आहे. इंजिन वेगळं असतं आणि मालगाडी वेगळी. इंजिनाला मालगाडी घेऊन धावायचं असतं पण त्या इंजिनात काही नसेल तर मालगाडी काय करणार?''

असं अगदी मोकळेपणाने मी फडकेसाहेबांना सांगितलं. मी खूप घाबरलो आहे हे त्यांनी जाणलं. त्यावर ते म्हणाले, ''घाबरू नका. घाबरण्यासारखं काहीच नाही. काही अडलं तर आम्ही आहोत.''

*हृदयामध्ये दुःखाची विसरते घडी, त्या हृदयाचा या हृदयाशी संगम तरी होणार कधी?* या गाण्यात आशाबाईंनी त्यांच्या स्टाईलने एका अंतऱ्यात 'अं' असं काही केलं आहे की बस रे बस्स! त्या गाण्याला दोघांनीही छान स्वरसाज चढवला. या गाण्यात चित्रीकरणामध्ये नायक-नायिका जवळ येतात, मात्र हे गाणं ऐकताना प्रत्यक्ष नायक-नायिका जवळ आलेत असा भास होतो. स्वरातून भावनेची एकंदर जी भाषांतरे आहेत ती त्यांनी अत्यंत खुबीने पकडली आहेत. एका नवीन संगीतकाराला एका ज्येष्ठ गायकाने, संगीतकाराने दिलेली साथ म्हणजे काय याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हे गाणं. नंतर-नंतर मीही गाणी करत गेलो माझाही आत्मविश्वास वाढत गेला, मात्र तुमच्या पहिल्या प्रयत्नाला जी उत्तम साथ हवी असते ती बाबूजींनी मला दिली. 'मी किती मोठा आहे, वगैरे' असा कोणताही आव न आणता! हे त्यांचं मोठेपण. बाबूजींच्याच बाबतीत माझ्या वाढलेल्या आत्मविश्वासाच्या गाण्याची एक गंमतीशीर आठवण यानिमित्ताने आठवतेय.

'उतावळा नारद' नावाच्या चित्रपटाचं संगीत मी केलं होतं. त्यावेळी सुधीर फडकेंचा आवाज त्या गाण्यांना लाभला होता. नारदमुनींना ब्रह्मचारी म्हणून आपण ओळखतो खरं तर मात्र या चित्रपटामध्ये हा नारद लग्न करतो. यात एक फॅण्टसी दाखवली आहे. आपण लग्न करून बघूया तरी काय होतं, म्हणून तो संसार करायला निघतो. त्यामुळे संसारात जे करायला लागतं ते आपल्या बायकोकडे बघून तो 'तू हे करतेस तर मीही करणार' असं म्हणतो. भांडी घासणं, कपडे धुणं अशी घरातली सगळी कामंही करायला लागतो .राजा गोसावींनी नारदाची भूमिका पार पाडली होती. आता वयपरत्वे ते गाणं आठवतं नाही पण तो नारद कपडे धुतो असा प्रसंग होता. आता राजा गोसावीलाच काय खऱ्या धोब्यालाही कपडे धुवायला लावल्यानंतर तो काही तालात धुणार नाही, पण चित्रपटात मात्र ठेक्यावर कपडे धुवायचे होते निदान तसा आवाज तरी अपेक्षित होता. काय करावं अशा विचारात असताना काहीसं घाबरतच म्हणा मी फडकेंना अर्थात बाबुजींना म्हटलं, ''फडकेसाहेब मी तुम्हाला थोडं काम देणार आहे.'' ते मात्र निश्चिंत होते. ते म्हणाले, ''तुम्ही सांगा तर काय काम आहे?'' मग थोडासा धीर आला आणि मी त्यांना म्हणालो, ''तुम्हाला थोडे कपडे धुवावे लागणार आहेत.'' अनपेक्षित अशा बाऊन्सरने फडकेसाहेबही थोडे गडबडले. ''नारदाचं जे आपण गाणं करतो आहोत त्यात नारद कपडे धुतायत आहे असं दाखवायचं आहे. तसे आवाज आहेत, ताक् तिक् ताक् तिक्! इतक्या सहज तसे आवाज करणं कुठल्याही धोब्याला जमणार नाहीत म्हणून तुम्हाला विनंती करतो आहे.'' असं मी नम्रपणे त्यांना सांगितलं. ''धोबी जर असाच करत राहिला तर

दिवस जाईल पण त्याच्याकडून कपडे काही धुतले जाणार नाहीत.'' त्यावर फडकेसाहेब मिश्कील हसले आणि म्हणाले, ''हो हो. आणा कपडे कुठे आहेत?'' त्यांना चार-पाच कपडे दिले आणि 'कपड्यांचा आवाज येईल असं करा' असं म्हणालो. तालाचं तर त्यांना सांगायला नकोच होतं. 'एका ओळीमध्ये चार ठोके द्या' असं सांगितलं. तर तेही म्हणालो, ''तुम्ही निश्चिंत राहा. मी बरोबर ठोके देतो.'' मीही निर्धास्त झालो. ''ठक् ठक् ठक्, ठक् ठक् ठक्'' असे बरोब्बर ठोके दिले आणि ते गाणं फार सुंदर झालं. मी केवढा मोठा संगीतकार, गायक आणि तुम्ही मला कपडे काय धुवायला सांगता असा कोणताही अभिनिवेश त्यांनी आणला नाही. उलट सहाय्याचीच भूमिका अधिक होती. अखेर मला हवं तसं गाणं झालं आणि दस्तुरखुद्द बाबूजींना मी कपडे धुवायला लावले.

बाबूजी म्हणजे गाण्याचं विद्यापीठ होतं. त्यांच्याकडून गाण्याचे अनेक प्रकारचे बाळकडू मला मिळाले. अगदी महत्वाचं आणि गाण्याच्या दृष्टीने गायकांना अत्यंत मार्गदर्शक ठरेल असं त्यांचं विवेचन म्हणजे 'गाण्याचा सूर कसा लावावा? 'आ' नेमका कसा आहे? तो कुठे तयार होतो?' संगीताच्या साधकांच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्वाचं सांगताना ते नेहमी म्हणत, ''गायकाने श्वासाचा सूर केला पाहिजे.'' ते मला करूनही दाखवत असत. आऽऽ असं म्हणायचे. प्रथम कोमल त्यानंतर सूर वाढवत जायचा. मात्र हे करताना कोणत्याही प्रकारे तोंडावर काय गातो आहे याचा भाव उमटू द्यायचा नाही. (तोंड वेडवाकडं करायचं नाही) इतर अवयवांना पत्ताच न लागता गळ्यातून गाणं अवतरलं पाहिजे. ही सगळी शक्ती गाण्याकडे द्या.'' ते एक सूर लावायचे आणि मग तो सूर चढवायचे. आवाज टिपेला न्यायचा मात्र चेहऱ्यावरची एकही रेषा हलवायची नाही. हातवारे नाही की काही नाही. म्हणजेच 'ही सगळी शक्ती तुम्ही त्या स्वराच्या मागे लावा' असं त्यांचं म्हणणं असायचं.

आजच्या गायकांसाठी हे खरं तर खूप मार्गदर्शक आहे. हल्लीचे गायक काय करतात तर दुसरा कसा गातो त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. त्यावर ते म्हणत, ''ईश्वराने तुम्हाला निर्माण केलं आहे. तुम्ही सर्वस्वी वेगळे आहात. तुमचा आवाज हा तुमचा आवाज असतो. दुसऱ्याची नक्कल करू नका. त्यांना ईश्वरकृपेने दुसरा आवाज मिळालेला आहे. तुमचा आवाज हा केवळ तुमचा आवाज आहे. त्याचा उपयोग करून घ्या.'' असं त्यांचं सांगणं प्रत्येकाला असे. तुम्ही निर्लेप राहून सुरांच्या मागे शक्ती लावा. सूर मोकळा करायचा म्हणजे आपोआप त्यात शक्ती भरते. म्हणजेच जसं फुगा फुगवताना आपण त्याच्या बाह्य आवरणावर फारसं काहीही न करता सर्व शक्ती ही त्या फुग्यात हवा भरण्यावर देतो. तसंच सुरांचंही आहे. त्यावर सगळी शक्ती केंद्रित करा म्हणजे कुठेही क्रॅक वगैरे जाणार नाही. आता प्रशांत दामलेंचंच पहा ना ते अभिनय करतात, गाणंही गातात. त्यालाच सहज सूर म्हणतात.''

बाबूजी स्वतः संगीतकार आणि गायक! मात्र माझ्या संगीत दिग्दर्शनाखालीही त्यांनी अनेक गाणी गायली. 'मी किती मोठा आणि हा नवीन संगीतकार आहे. हा काय मला शिकवणार?' असा त्यांचा अविर्भाव कधीच दिसला नाही. उलट प्रत्येकाकडून शिकून घ्यायचं, काम अप्रतिम झालं पाहिजे असा अट्टाहास, मेहनत करायचीच वृत्ती असल्यामुळे माझ्या कामात ते कधीच डोकावले नाहीत, पण मदत मात्र अनेकदा केली.

आज जर बाबूजी असते तर त्यांना काय वाटलं असतं आजच्या संगीताबद्दल? असा कधी मी विचार केला तर वाटतं, हल्ली गाण्याची स्वतःची पद्धत आहे, चाल देण्याची जी पद्धत आहे. तिच्यातून तितकेसे शब्द लोकांपर्यंत पोहोचत नाहीत आणि त्या प्रकारची गाणी ऐकायला सुद्धा लोक तयार नाहीत. गायकांपासून ते सर्वसामान्य माणसांपर्यंत असं नेहमीच विधान केलं जातं की 'हे शब्द फारच कठीण वाटतायत.' गाण्यातले साधे-साधे शब्द जर यांना कठीण वाटायला लागले तर काय बोलावं? म्हणजे नेमक्या कोणत्या काळात आहोत आपण? गायकी ही शब्दप्रधान हवी, असे मानणारे आम्ही होतो.

अनेकदा माझ्या कामात मी व्यग्र, त्यांच्या कामात ते! त्यामुळे अगदी शिवाजी पार्कसारख्या परिसरात राहूनही फारशा गप्पा झालेल्या आठवत नाहीत. फडकेसाहेबाचं घर आमच्या इथे जवळच रामदास भुवनमध्ये होतं. सकाळच्या वेळेस आमच्या फुटपाथवर सावली येत असे. गाडी शक्यतो सावलीत लावावी असं म्हणतात त्यानुसार राजा परांजपे असो किंवा ग.दि. माडगूळकर असो या मातब्बर मंडळींचा बाबूजींकडे राबता असायचा. ते यायचे बाबूजींकडे पण गाडी मात्र फूटपाथवर सावलीत लावत. मी मजेत एकदा राजा परांजपेंनाच म्हणालो, ''अहो, तुम्ही गाडी माझ्या फुटपाथवर लावता आणि काम करता मात्र फडकेसाहेबांकडे.'' ते फडकेसाहेबांनी ऐकलं आणि ते तेवढ्याच मिश्किलतेने म्हणाले, ''अहो, तुम्ही खरंच घेऊन जा त्यांना. माझी काहीही हरकत नाही.'' असे अनेक मजेदार किस्से घडत. खूप गप्पा-गोष्टी झाल्यात असे क्षण काहीच आहेत. मात्र माझ्याशी वागताना त्यांनी मोठेपणाचा कधीही आव आणला नाही. कधी चालताना सोबत आले तर 'चला चला. लवकर चला.' म्हणायचे. अगदी हाताला पकडून न्यायचे, तेव्हा खरं सांगतो एवढ्या महान माणसाचा आपल्याला स्पर्श झाला या जाणिवेनेच अंगावर शहारे यायचे, पण त्या स्पर्शातून प्रेम अखंडपणे वाहत असायचं. तेच प्रेम अजूनही त्यांची गाणी ऐकतानाही आत कुठे तरी जाणवतं, काहीसं मन कातर होतं, पण हेही जाणवतं बाबूजी आहेत. इथेच आहेत आणि इथेच राहणार आहेत..पुढची अनेक वर्षे, अनेक तपं, अनेक युगं....

**- यशवंत देव**

**शब्दांकन : श्रद्धा पेडणेकर**

भ्रमणध्वनी : ९९३०११२००४

गायक-संगीतकार सुधीर फडके यांनी स्वत: संगीतबद्ध केलेली व गायलेली असंख्य गाणी आपल्या कानामनांत आहेत. गायनाचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलेले सुधीर फडके अर्थात अवघ्या संगीतविश्वाचे 'बाबूजी' हे उत्तम गुरू होते. जसे ते उत्तम गुरू होते तसे ते आदर्श विद्यार्थी सुद्धा होते. अन्य संगीतकारांकडे जेव्हा ते गात असत तेव्हा प्रत्येक वेळी ते विद्यार्थ्याच्या भूमिकेत असायचे. गायन उत्तम होइपर्यंत ते तालीम करत. गाण्याच्या चालीमागचा संगीतकाराचा विचार काय असतो या वृत्तीने ते अभ्यास करत. इतक्या मोठ्या संगीतकाराने असे काम करणे ही खूप मोठी गोष्ट आहे. काही माणसे आपल्या मनात उच्च स्थानावर का जातात हे अशा वेळी समजते. अन्य, पंचवीसपेक्षा अधिक संगीतकारांकडे बाबूजींनी जवळपास सत्तर ते ऐंशी गीते गायली आहेत. शिकण्याची वृत्ती, मेहनत, नम्रपणा या त्यांच्या गुणांमुळे प्रत्येक चाल ते यशस्वीरित्या आत्मसात करत. त्यामुळे त्या त्या संगीतकाराकडे गायलेली भिन्न गीते तितकीच लोकप्रिय झाली. किंबहुना त्या संगीतकाराला त्यांच्या गीतांसाठी बाबूजींचाच स्वर हवा होता. असा रियाजी व भावपूर्ण आवाज आपल्या गाण्याची उंची वाढवेल हा संगीतकारांचा विश्वास होता आणि तसेच झाले. ती सर्व गाणी सुपरहिट झाली म्हणूनच अन्य संगीतकारांकडे बाबूजींच्या स्वराचे हे एक अनोखे लावण्य उलगडणे आवश्यक वाटते.

सुगम गायनातील श्रेष्ठ गुरू आणि शब्दप्रधान गायकीचे अभ्यासक संगीतकार यशवंत देव यांच्याकडे बाबूजींनी जवळपास वीस-पंचवीस गीते गायली. त्यातील काही भावगीते व चित्रगीते पट्कन आठवतात. चार लोकप्रिय भावगीते कविवर्य मंगेश पाडगावकरांची 'तुझे गीत गाण्यासाठी', 'कधी बहर कधी शिशिर', 'अशी पाखरे येती' आणि 'कुठे शोधिसी रामेश्वर' ही लोकप्रिय भावगीते रसिकांना म्युझिकसकट मुखोद्गत आहेत. अर्थवाही शब्द, अर्थानुसार चाल व बाबूजींचा स्वरभारला आवाज हे सारे एकत्र येणे हा आपला भाग्ययोग आहे. 'सुखी संसार' (१९६७) या चित्रपटासाठी जनकवी पी. सावळाराम यांनी लिहिलेले व यशवंत देव यांनी संगीतबद्ध केलेले एक गीत लोकप्रिय झाले. 'सारी भगवंताची करणी, अधांतरी हे झुले नभांगण, शेष फणावर धरणी' हे ते गीत. कविवर्य वा.रा. कांत यांची दोन गीते बाबूजींनी गायली, 'आज राणी पूर्वीची ती प्रीत तू मागू नको' आणि दुसरे 'त्या तरुतळी विसरले गीत'. एक गीत वेगवान लयीत आणि दुसरे संथ लयीत भावार्थ सांगणारे. ही दोन्ही गाणी मूळ कविता म्हणून पाच ते सहा अंतरे आहेत,

विनायक जोशी

# एक अनोखे लावण्य...

**बाबूजी स्वत: संगीतकार होतेच पण त्यांनी अन्य संगीतकारांकरताही आवर्जून गाणी गायली. त्यांच्या संगीतमय प्रवासातील हे महत्त्वाचे टप्पे! त्यांचे लावण्य उलगडून सांगताहेत, गायक आणि संगीताचे जाणकार अभ्यासक विनायक जोशी!**

पण ध्वनिमुद्रिकेसाठी त्यातले चार अंतरे निवडले. गीतकार शांताराम नांदगांवकर यांनी लिहिलेले व बाबूजींनी गायलेले 'विसर प्रीत, विसर गीत, विसर भेट आपुली' हे गीत लोकप्रिय झाले. देवांची ही अप्रतिम स्वररचना आहे. 'अरे देवा तुझी मुले अशी का रे भांडतात' हे संगीतकार देवांचे रसिकांना आवडलेले गीत आहे. 'झालं गेलं विसरून जा' (१९५७) या सामाजिक चित्रपटातील पाचही गीतांत बाबूजींचा स्वर आहे. त्यात सर्वाधिक पसंती मिळालेले गीत म्हणजे श्रेष्ठ गायिका आशा भोसले यांच्यासह गायलेले.. तू नजरेने हो म्हटले पण वाचेने वदणार कधी? 'कामापुरता मामा' (१९६५) या चित्रपटातील शीर्षक गीत बाबूजींनी गायिका कृष्णा कल्ले यांच्यासह गायले. उतावळा नारद (१९५७) या चित्रपटात बाबूजींनी चार गीते गायली, पण या गीतांच्या ध्वनिमुद्रिका आल्या नाहीत. गीतकार अ.प्र. दिवेकर यांचे 'हा हात प्राणनाथा' हे बाबूजींनी आशा भोसले यांच्यासह गायलेले गीत सहसा ऐकायला मिळत नाही. 'कथा ही राम-जानकीची' या नाटकासाठी यशवंत देवांनी संगीत दिले. सर्व गीते ग.दि. माडगूळकरांची आहेत. त्यातील 'रामचंद्र स्वामी माझा, राम अयोध्येचा राजा' हे गीत गाजले.



संगीतकार राम फाटक हे नाव उच्चारताच बाबूजींनी गायलेली चार अफाट लोकप्रिय भावगीते चटकन आठवतात. त्यात कवी ना.घ. देशपांडे यांची दोन गीते व कवी सुधीर मोघे यांची दोन गीते आहेत. ना.घ. देशपांडे यांची दोन गीते... 'डाव मांडून भांडून मोडू नको' आणि 'अंतरीच्या गूढगर्भी एकदा जे वाटले सखी प्रेम आता आटले'. सुधीर मोघेंची दोन गीते... 'सखी मंद झाल्या तारका' आणि 'दिसलीस तू फुलले ऋतू'. प्रत्येक कवितेतील भावना वेगवेगळी पण स्वर मात्र एकच – सुधीर फडके! 'सखी मंद झाल्या तारका' हे गीत आकाशवाणी पुणे केंद्रासाठी खूप वर्षांपूर्वी पं. भीमसेन जोशी यांनी गायले होते. पुणे केंद्रावर या गीताचा रौप्यमहोत्सव देखील साजरा झाला. ध्वनिमुद्रिकेसाठी हे गीत बाबूजींनी गायले. मराठी गीत संगीताचा एकही कार्यक्रम या गीताशिवाय पूर्ण होत नाही. 'दिसलीस तू फुलले ऋतू' हे गीत गायनासाठी आव्हान आहे. 'अंतरीच्या गूढगर्भी'ची चाल सुद्धा कठीणच. या गीताचे संगीतसंयोजन ऐकण्यासारखे आहे.

उत्तम व्हायोलिन वादक, साँग व्हायोलिनिस्ट या नात्याने संगीत क्षेत्रातील भरीव काम, उत्तम संगीत संयोजक आणि आपला स्वतंत्र ठसा उमटविणारे संगीतकार प्रभाकर जोग यांच्याकडे बाबूजींनी अनेक गीते गायली. बाबूजींच्या प्रत्येक कार्यक्रमात व ध्वनिमुद्रणात प्रभाकर जोगांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. त्यांच्या संगीतावर बाबूजींच्या संगीत शैलीचा प्रभाव दिसतो. अर्थात स्वतंत्र मुद्रा ही आहेच. तीन संगीतकारांचा सहभाग असलेलं मराठी भावगीतातील एक विक्रम ठरलेलं गीत ...'स्वर आले दुरूनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी'. संगीतकार यशवंत देवांनी हे शब्द लिहिले. जोगसाहेबांनी पाठविलेल्या नोटेशनवरून हे गीत लिहिले. बाबूजींच्या आवाजात ध्वनिमुद्रित झाले व अफाट लोकप्रिय झाले. याच मालिकेतील आणखी एक गीत. 'प्रिया आज माझी नसे साथ द्याया...' प्रभाकर जोगांच्या चित्रगीतांमध्ये ..'दाम करी काम', 'रवि आला हो रवि आला' (देवघर १९८१), 'बाजार फुलांचा भरला' आणि 'देऊ नको हुंदका' (ओवाळिते भाऊराया १९७५) ही गीते गाजली. 'कुंकुवाचा करंडा' या चित्रपटातील बाबूजी-आशा भोसले यांनी गायलेले युगुल गीत.. 'आज प्रीतीला पंख हे लाभले रे..' हे गीत सर्वतोमुखी झाले.

*असेच होते म्हणायचे तर अशी अचानक भ्यालीस का?*
*अर्ध्या वाटेवरती जाऊन पुन्हा परत तू आलीस का?*

ही कविवर्य विंदा करंदीकरांची कविता आठवते का? ही कविता ज्येष्ठ संगीतकार दत्ता डावजेकर यांनी आकाशवाणीकरता स्वरबद्ध केली आणि बाबूजींनी ती गायली. आवर्जून ऐकावे असे हे गीत आहे. संगीतकार दत्ता डावजेकर हे संगीत क्षेत्रातील फार मोठे नाव आहे. १९६७ या वर्षी एक चित्रपट प्रदर्शित झाला.. 'संथ वाहते कृष्णामाई' हे शीर्षकगीत डावजेकरांनी बाबूजींकडून गाऊन घेतले. या गीताचे संगीत उत्तम झालंय. गूढरम्य वातावरणातील संगीत व बाबूजींचा भावपूर्ण स्वर यामुळे हे गीत सुपरहिट झाले. गीतामधील हे शब्द... 'जाणीव तिजला नाही' म्हणजे अप्रतिम सांगीतिक जागा व उच्चारण असा संगम आहे. गाणे ऐकताना आपण इतके तल्लीन होतो की आपण वाईमधील कृष्णाबाईच्या तीरावर उभे आहोत असे वाटते. 'धरतीची लेकरं' (१९७०) या चित्रपटातील दोन युगुलगीतांमध्ये बाबूजींचा गायन सहभाग आहे. पहिले गीत 'आवडला तो मनापासूनी गडी तो घोड्यावरचा' हे माडगूळकरांचे गीत बाबूजी व रेखा डावजेकर (अपर्णा मयेकर) यांनी गायले. याच चित्रपटातील एक गीत 'कृष्ण तुझा बोले कैसा ऐक ग यशोदे', 'लपविलास चेंडू म्हणतो उरी तूच राधिके हे लोकप्रिय गीत सुधीर फडकेंसह आशा भोसले यांनी गायलेले आहे. संत चांगदेव (१९५८)

या चित्रपटासाठी बाबूजींनी गाणी गायली.

लावणीबाजाची उत्तम गाणी करणारे संगीतकार राम कदम यांच्याकडे गायक सुधीर फडके यांनी काही गीते गायली. भाग्यलक्ष्मी (१९६२) या चित्रपटासाठी कवयित्री शांता शेळके यांचे एक गीत बाबूजींनी गायले, 'चंद्र दोन उगवले' हे गीत. रमेश देव-जयश्री गडकर यांच्यावर चित्रित झालेले हे गीत. पुढारी (१९७२) या चित्रपटासाठी 'या पैशाची भूक लई मोठी रं..' हे गीत बाबूजींच्या स्वरात आहे. याच वर्षी एक सुपरडुपर हिट चित्रपट आला. 'पिंजरा'. या चित्रपटाचा प्रत्येक खेळ रसिकांनी हाऊसफुल्ल केला. त्यातील क्लायमॅक्स साँग बाबूजींच्या आवाजात आहे. या गीतात चित्रपटाची पूर्ण पटकथा येते. लोकप्रिय गीतकार जगदीश खेबूडकर यांनी हे गीत लिहिले. अभिनेते श्रीराम लागू व अभिनेत्री संध्या यांच्यावर चित्रित झालेले हे गीत या चित्रपटातील इतर गीतांप्रमाणेच तुफान गाजले. संगीतकार राम कदम यांनी तोडी रागात हे गीत स्वरबद्ध केले. 'कशी नशिबानं थट्टा आज मांडली..' हे गीत मनामनांत पोहोचले. गीताचा आरंभ टिपेच्या सुरातील व अॅडलिब पद्धतीचा आहे. बाबूजींच्या गायनाला तितकीच दाद द्यावी. गीतकार खेबूडकर, निर्माते व्ही. शांताराम, दिग्दर्शक अनंत माने, संगीतकार राम कदम या सर्वांनाच या गीतासाठी बाबूजींचाच स्वर हवा होता. 'झुंज' (१९७५) या चित्रपटात 'झुंजार माणसा, झुंज दे..' हे गीत बाबूजींना गायले. या गीतात वेगळा असा जोशपूर्ण आवाज दिसतो. 'पाहुणी' (१९७६) या चित्रपटात 'किती करशील लाडिक लाडिक चाळा' हे गीत बाबूजींच्या आवाजात आहे. 'देवकीनंदन गोपाळा' (१९७७) या चित्रपटात 'छिन्नी हातोड्या घाव' हे गीत बाबूजींच्या स्वरात आहे.

संगीतकार श्रीनिवास खळे यांची गाणी हा नेहमीच स्वतंत्र अभ्यासाचा विषय असतो. राम गबाले दिग्दर्शित 'जिव्हाळा' (१९६८) या चित्रपटातील सर्व गीते गाजली. एका खास गीताची चाल ही बाबूजींनी गाण्यासाठीच तयार झाली असे प्रत्येकालाच वाटते. भावपूर्ण स्वरात हे गीत ऐकताना अश्रूधारा येतातच. बाबूजींचे प्रभावी गायन व गदिमांचे शब्द असलेले हे गीत.. 'लळा, जिव्हाळा शब्दच खोटे... कुणी कुणाचे नाही राजा...' अनेक संगीत कार्यक्रमात हे गीत हमखास दाद मिळविणारे ठरते.

'अवघाची संसार' (१९६०) या चित्रपटातील दोन युगुल गीतांमध्ये आशा भोसलेंसह बाबूजींचा स्वर आहे. 'जे वेड मजला लागले' आणि 'रूपास भाळलो मी..' ही ती दोन गाणी. आजच्या गायक-गायिका ही दोन गाणी विविध कार्यक्रमातून गातात. संगीतकार आहेत वसंत पवार. याच संगीतकाराचे 'वरदक्षिणा' चित्रपटातील लोकप्रिय गीत. 'एकवार पंखावरूनी फिरो तुझा हात..' या गीतातील बाबूजींचे गायन अतिशय भावपूर्ण आहे. वरच्या सप्तकापर्यंत जाणारा बाबूजींचा आवाज आपले काळीज पिळवटून टाकणारा आहे. त्या गीताचे नायक 'आपण' कधी होतो हे समजत नाही, हे या गाण्याचं यश आहे. 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी' (१९५२) यामधील 'हृदयी अमृत नयनी पाणी' हे गीत गाजले.

मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांनी संगीत दिलेला 'कीचकवध' हा चित्रपट १९५९ या वर्षात प्रदर्शित झाला. त्यातील एका गीताची सुरुवात 'दिर दिर तनम तन देरेना' या तराण्यातील अक्षरांनी होते. या गीतात जवळपास पंधरा नृत्यकलाकार पडद्यावर दिसतात. हा पौराणिक चित्रपट आहे. असा 'नेसून शालू हिरवा...' हे आरंभीचे शब्द. सुधीर फडके, लता मंगेशकर व सहकारी यांनी गायलेले हे गीत विलक्षण लोकप्रिय झाले. मा. कृष्णरावांची ही एक जोरकस संगीतरचना आहे. गीताचे शब्द माडगूळकरांचे आहेत.

संगीतकार विश्वनाथ मोरे यांच्याकडे बाबूजींनी मोजकी गीते गायली. 'मायमाऊली' (१९७१) या चित्रपटातील एक गीत 'खरा ब्राह्मण नाथची झाला, तो महाराघरी जेवला' हे बाबूजींनी गायले. यात बाबूजींचा आरंभीचा आलाप ऐकावाच असा आहे. जनकवी पी. सावळाराम यांनी हे गीत लिहिले. या गीताच्या म्युझिक अरेंजमेंटमधे 'सनई' या वाद्याचा उचित उपयोग दिसतो. 'भालू' (१९८०) या चित्रपटातील पी. सावळाराम यांनी लिहिलेले 'पर्ण पाचू सावळा सावळा, विठ्ठल माझा मळा, मी वारकरी आगळा' हे गीत बाबूजींचा स्वर घेऊन आले. निर्माते-अभिनेते प्रकाश भेंडे-उमा भेंडे यांची ही निर्मिती आहे. 'नंदिनी' (१९६९) या चित्रपटासाठी विश्वनाथ मोरे यांनी एक ड्युएट साँग केले. 'नीज माझ्या सोनुल्या, चांदण्यांची शेज करूनी, शांत निजल्या सावल्या' हे गीत सुधीर फडके व सुमन कल्याणपूर यांच्या सुरेल, मधुर आवाजात आहे.

'अरे संसार संसार' (१९८१) या चित्रपटासाठी तीन गायकांनी एकत्र गायलेले 'विठुमाऊली तू माऊली जगाची' हे गीत कानामनांत पोहोचले. त्यात बाबूजींचा स्वर प्रामुख्याने दिसतो. या गीतातील बाबूजींनी गायलेले आलाप हे 'ऐकायला सोपे-सहज पण गायला कठीण' असे आहेत. 'माहेरची साडी' (१९९१) हा ज्येष्ठ व्हायोलिन वादक अनिल मोहिले यांनी स्वतंत्रपणे संगीत दिलेला असा चित्रपट आहे. बॉक्स ऑफीसवर हा चित्रपट सुपरहिट ठरला. त्यातील बाबूजींनी गायलेले.. 'दुभंगली धरणीमाता, फाटले आकाश, कधी संपणार नारी तुझा वनवास' हे गीत लोकप्रिय झाले. या गीतातले म्युझिक अरेंजमेंट उत्तम झाले आहे.

'पहिलं प्रेम' (१९५७) या चित्रपटाला संगीतकार शंकरराव कुलकर्णी यांनी संगीत दिले. मधुसूदन कालेलकर लिखित एका गीतात आशा भोसले व बाबूजी यांचा स्वर आहे. 'क्षणांत कळली, क्षणांत जुळली, भूल कशी पडली, तुझी माझी प्रीत जगावेगळी' हे ते गीत. वेगवान चालीतले हे उत्तम युगुलगीत आहे. 'वरदक्षिणा' (१९६२) या चित्रपटासाठी काही गीतांसाठी वसंत पवार हे संगीतकार असले, तरीही एक गीत, संगीतकार लक्ष्मण बेरळेकर यांनी संगीतबद्ध केले. गदिमांचे हे गीत बाबूजींनी गायले. गीताचे शब्द आहेत 'तारुण्यातही बाळपणाचा खेळ वाटतो हवा हवा'. 'दैव जाणिले कुणी' (१९६७) या चित्रपटाकरिता संगीतकार कुमारसेन गुप्ते यांनी श्रेष्ठ गीतकार जगदीश खेबूडकर यांचे एक गीत स्वरबद्ध केले. 'पतिव्रतेच्या पुण्याईवर बनतो देव पतीची, जगी या महिमा थोर सतीचा' या गीताला बाबूजी आणि आदिनारायणराव यांचे



पित्याचा सुमधुर वारसा



असंख्य अजरामर भावगीते उमलली...
आशा भोसले व बाबूजी



बाबूजी, माणिक वर्मा, लता आणि प्रभाकर जोग

संगीत आहे. 'भक्त पुंडलिक' (१९७५) हा संगीतकार भास्कर चंदावरकर यांनी संगीत दिलेला पहिला चित्रपट आहे. 'नकोच जगणे प्रभो दया कर' हे त्या चित्रपटातील गीत बाबूजींनी गायले. 'करावं तसं भरावं' (१९७५) या चित्रपटात जगदीश खेबूडकरांची गीते व बाळ पळसुले हे संगीतकार आहेत. त्यात बाबूजींनी 'विठ्ठला न्याय तुझा कुठला.. आज दयेचा सागर आटला.. डोंगर का फुटला..' हे गीत गायले. १९८० या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'हीच खरी दौलत' या चित्रपटाला राम-लक्ष्मण यांचे संगीत आहे. खेबूडकरांची गीते आहेत. 'रंजल्या जिवाची, गांजल्या जिवाची जो धरी खंत, तोचि खरा साधू तोचि खरा संत..' हे गीत बाबूजी व गायिका उत्तरा केळकर यांनी गायले.

राजकवी भा.रा. तांबे यांनी १८९७ या वर्षी लिहिलेली एक कविता पुढील काळात संगीतकार वसंत प्रभू यांनी स्वरबद्ध केली. भावा-बहिणीच्या प्रेमाचे हे गोड गाणे आपल्या नजरेसमोर प्रसंग उभा करते. बाबूजी आणि आशा भोसले यांनी गायलेले हे गीत सुमधुर गायन व चाल यामुळे लोकप्रिय झाले. 'तुझ्या गळा माझ्या गळा, गुंफू मोत्यांच्या माळा' हे गीत. सुगम गायनाच्या अनेक कार्यक्रमात या गीताला वन्समोअर ठरलेलाच असतो. गायनामध्ये लटका राग, हट्ट, लाडिकपणा हे चालीमधे व उच्चारामधे आलंय. *'दादा सांगू बाबांना, सांग तिकडच्या स्वारीला, तर मग गट्टी कोणाशी, गंमत ताईची खाशी, आणखी गोफ कोणाला..'* अशी मधुर भांडणाची प्रश्नोत्तरे गाण्याची रंगत वाढवतात. हसूहसू, रुसूरुसू, खुसूखुसू या शब्दांनी मजा आणली आहे.

संगीतकार मधुकर गोळवलकर यांचे लोकप्रियतेचा विक्रम असणारे गीत म्हणजे.. 'समाधी साधन संजीवन नाम'. या गीतातील 'शांती दयासम सर्वाभूती' ओळींमधील 'सर्वा' या शब्दाची शास्त्रीय जागा काळजीपूर्वक ऐका. ॲडलिबमध्ये व मुखडा सुरू केल्यानंतर सुद्धा. आलाप, बोलताना यांनी सजलेलं यमन रागातील हे गीत. 'बाबूजींच्या गायनातील शास्त्रशुद्ध पायाचा संगीतकाराने केलेला अत्युत्तम उपयोग' असे या गीताचे वर्णन करता येईल. गायनाने सजलेले हे गीत पुन्हा पुन्हा ऐकावे असे आहे. या गाण्याचा सराव हा एक रियाझ होऊ शकतो. संत ज्ञानदेवांची आणखी एक आर्तता असलेली हाक म्हणजे.. 'तुज सगुण म्हणो की निर्गुण रे'. संगीतकार गोळवलकर यांना दाद द्यावीच लागेल.

'नाम घेता मुखी राघवाचे, दास रामाचा हनुमंत नाचे' हे बाबूजींनी गायलेले गाणे अण्णा जोशी यांनी लिहिले. श्रेष्ठ तबलावादक अण्णा जोशी यांनी इतके उत्तम शब्द लिहिले आणि संगीत आहे निळकंठ अभ्यंकर यांचे! 'दिमडी' या वाद्याच्या साथीने गाणी सुरू होते व अंतरा सुरू झाल्यानंतर तबला वाजलेला समजतो. मधुर चाल, मधुर शब्द हे या गीताचे वैशिष्ट्य आहे. निळकंठ अभ्यंकर यांचे एक गीत नाटकासाठी केलेले आहे. 'गोकुळचा चोर' या नाटकासाठी विद्याधर गोखले यांनी लिहिलेले व बाबूजींनी गायलेले गीत रसिकांना आवडले. 'थोराहून ही थोर श्रीहरी गोकुळचा चोर' हे ते गीत.

कवी-गीतकार मनोहर कवीश्वर यांनी संगीत दिलेली दोन गीते अवघ्या विश्वात लोकप्रिय झाली. 'माना मानव वा परमेश्वर' हे एक गीत व दुसरे 'विमोह त्यागून कर्मफलांचा सिद्ध होई पार्था' बाबूजींच्या उत्तम गाण्यांच्या यादीत या गीतांचा अग्रक्रम लागतो.

'अशाच होत्या संध्याछाया, अशी पश्चिमा जाभुंळलेली' हे राम

उगांवकर यांनी लिहिलेले व विठ्ठल शिंदे यांनी स्वरबद्ध केलेले गीत, बाबूजींनी गायले. काही वर्षांपूर्वी मुंबई दूरदर्शनवर 'अष्टनायिका' हा कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमासाठी बाबूजींनी संगीतकार सुहासिनी मुळगांवकर यांच्याकडे दोन गीते गायली. मी 'एक भ्रमर छंदी' आणि दुसरे गीत 'मजवरी रुसला कान्हा'.

संपूर्ण विश्वात लोकप्रिय असलेले गायक-संगीतकार श्रीधर फडके (बाबूजींचे सुपुत्र) यांच्याकडे ओघाने हा वारसा आला. श्रीधर फडके यांचे संगीत तितकेच मधुर व श्रवणीय असे आहे. शब्दातील आशय, भावना, उच्चार ही बलस्थानं त्यांच्या गायनात सुद्धा दिसतात. या संगीतविश्वात 'मुलाने वडिलांकडे गायले' असे गीत मिळू शकते, पण वडिलांनी गायक म्हणून आपल्या मुलाच्या संगीत दिग्दर्शनात गाणे हे अनोखे उदाहरण दुर्मीळ आहे. 'लक्ष्मीची पाऊले' या चित्रपटात बाबूजींनी श्रीधर फडके यांच्या संगीत दिग्दर्शनात गीत गायले. अवघ्या विश्वात लोकप्रिय झालेले हे गीत. 'फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश' या गाण्यामध्ये 'दरीखोऱ्यातून वाहे' या शब्दांत 'वाहे' हे शब्द दरीखोऱ्यात उमटणाऱ्या प्रतिध्वनीसारखा 'ए'करात पुढे नेला आहे. अंतऱ्यामध्ये जिथे असा शब्द लांबवलाय तिथे संगीतकाराचा त्यामागचा ठोस विचार दिसतो. आशा भोसलेंसह बाबूजींनी गायलेल्या गीताचे वर्णन 'एक अनोखे लावण्य' असेच करावे लागेल. अर्थात अन्य संगीतकारांकडे गायलेली ही गाणी म्हणजे अनोखे लावण्यच आहे. हा शोध घेताना मित्रवर्य अरुण कृष्णराव टेंबे व विश्वास नेरूरकरांचे स्वरगंधर्व (पुस्तक) या गोष्टीची खूप मदत झाली. टेंबेसाहेबांनी गाणी उपलब्ध करून दिली. गायिका अपर्णा मयेकरांनी डी.डीं.ची दोन दुर्मिळ गाणी दिली. विश्वास नेरूरकरांचे कोणतेही 'फिल्मोग्राफी' स्वरूपाचे पुस्तक हे आयुष्यभर संदर्भासाठी पुरेल असे असते म्हणूनच या वेगळ्या लावण्याचा-सौंदर्याचा खजिना उपलब्ध झाला. जेव्हा शक्य होईल तेव्हा ही सारी गीते ऐकणे व आनंद घेणे हे आता आपले काम आहे.

– विनायक जोशी
भ्रमणध्वनी : ९८२१२३७११३
vinayakjoshi@yahoo.coms

ग्रंथाली

## यशवंत पाठक यांची तीन पुस्तके



### कैवल्याची यात्रा

ज्ञानदेवांचा ज्ञानयोग आणि स्वामी विवेकानंदांचा ज्ञानयोग आपल्याला नेमका काय सांगतो. यातून मन कसे घडते. अभ्यास कसा साधावयाचा असतो. वर्तमानाचा अनुबंध माणूसपणाशी कसा जोडावयाचा असतो, याचा विचार या पुस्तकात आहे.

**मूल्य ३२० रु. सवलतीत २०० रु.**

### आनंदाचे आवार



काही विषय संपादक शब्दमर्यादा पाळायचे भान देऊन लिहवून घेतात. या साऱ्यातून 'आनंदाचे आवार' येते. कोण-ताही विषय जुनाट होत नाही. अभ्यासातले सत्त्व कळते. या साऱ्यातून अभ्यास पुढे करावा, आनंद वाटावा असे मला वाटते.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



### चंद्राचा एकांत

कलात्मक अनुभवाचा अवकाश अलौकिक असतो. त्याच्याशी खेळता खेळता मन सुदृढ होते. ते आपला परिसर पक्के करीत, पुढे जाते. यात विश्व कसे सामावते, ते बघून मन थक्क होते. 'चंद्राच्या एकांता'त सामील होतो.

**मूल्य २८० रु. सवलतीत १८० रु.**


“पपा आजोबा ऊठ, तू समोर बैस.”

अडीच वर्षांचा मी आपल्या आजोबांच्या बोटाला धरून हळूच ओढत म्हणालो. “बरं सोन्या..” मानमरातबाची सारी महावस्त्रे टाकून नातवासाठी शैशवात शिरलेले आजोबा माझा तो अजाण हट्ट आनंदाने पुरवीत होते. आतून दरडावणीच्या स्वरात आईचा आवाज आला, “सुमित, मोठ्या माणसांना असे...”

तिला मधेच थांबवत आजोबा म्हणाले, “माया, नको रागवूस त्याला, माझ्या सिंहासनावरून मला उठवणारा हा एकमेव! माझा आजा 'बाबा बामण'च जन्माला आला आहे! हाच माझे नाव पुढे चालवेल!”

पंचवटीच्या हॉलमध्ये पांढऱ्या चादरीखाली काहीतरी झाकलेले होते. माझे लाडके आजोबा कुठेच दिसत नव्हते, अगदी त्यांच्या निळ्या कोचावर सुद्धा! घरातले सगळे रडत होते, प्रचंड माणसे जमली होती. सगळे का रडत आहेत मला काहीच कळत नव्हते. त्यांना हसवावे म्हणून मी जास्तच चेकाळलो होतो, कधी नव्हे ते वेड्यासारखा इकडून-तिकडून पळत होतो. शेवटी माझी रवानगी वरच्या मजल्यावर झाली.

“पपा आजोबा ऊठ...,” माझा बालहट्ट आता पुरविला जाणार नव्हता. एक महाकवी आपल्या शेवटच्या प्रवासाला



गदिमा नातू सुमित्रसह

सुमित्र माडगूळकर

# माझिया रक्तात थोडा 'गदिमांचा' अंश आहे...

**गदिमांबद्दल लिहायचे म्हटले तर अनेक पाने सुद्धा पुरणार नाहीत असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व! मराठी चित्रपट, साहित्य, राजकारण, समाजकारण सर्वच क्षेत्रात त्यांचा मुक्त वावर होता. १ ऑक्टोबरला त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. त्यांचा नातू सुमित्र माडगूळकर यांनी गदिमांच्या साहित्याचा अनमोल ठेवा आज नव्या तंत्रमाध्यमातून रसिकांसाठी खुला करून दिला आहे.**

निघालेला होता. माझ्या लाडक्या आजोबांचा हात माझ्या हातातून कायमचा सुटलेला होता.

आम्हा नातवंडांचे 'पपा आजोबा', जवळच्या मित्रांचे 'अण्णा', ज्यांना मराठी माणूस 'गदिमा' या लाडक्या नावाने ओळखतो, महाराष्ट्राच्या लोकजीवनात सुगंधासारखा शिरलेला एक प्रतिभासंपन्न साहित्यिक, कलाकार अर्थातच 'गीतरामायणकार महाकवी ग. दि. माडगूळकर'.

एकदाच ते माझ्यावर खूप रागवले होते. पंचवटीच्या मागच्या अंगणात तुळशीकट्ट्याजवळ मी माझ्या लाल रंगाच्या मोटारीत बसून खेळत होतो, छोटी पायडलची मोटार होती पण पायानेच ढकलत मी खेळत होतो. जवळच माझी पणजी आजी म्हणजे गदिमांच्या मातोश्री बनुताई उभ्या होत्या. खेळता-खेळता मी गाडी जोरात ढकलायचो व पणजी आजीच्या जवळ जाऊन एकदम थांबायचो, असा माझा खेळ सुरू झाला. पणजी आजी, मी जोरात जवळ गेलो की घाबरून 'नको रे बाबा!' असे म्हणायची. ते ऐकून मला आणखीनच गंमत वाटून चेव चढायचा व हे मी वारंवार करू लागलो. पपा आजोबांनी ते बघितले व एकदोनदा समजावून सांगितले की, 'सोन्या असं करू नकोस', पण माझी गंमत चालूच होती. शेवटी व्हायचे तेच झाले. पपा आजोबांची एक सणसणीत माझ्या कानाखाली बसली आणि दोन-अडीच वर्षांचा मी कळवळलो, रडून-रडून लाल-लाल झालो. पुढे थोड्या वेळाने त्यांचा राग शांत झाला व आपण लाडक्या सोन्याला मारले याचे त्यांना खूप वाईट वाटले. त्या दिवशी ते दुपारी जेवले पण नाहीत तसेच आपल्या खोलीत जाऊन पडले. संध्याकाळी मला उचलून घेतले, पटापटा पाप्या घेतल्या व म्हणाले, ''चल रे सोन्या, आपण जेम्सच्या गोळ्या खायला जाऊ.'' असे म्हणून मला फिरायला घेऊन गेले.''

आपल्या आईविषयी गदिमांना किती प्रेम होते हे त्यांच्या साहित्यातून प्रकट झालेच आहे. त्यांना एका ज्योतिषाने सांगितले होते की तुम्ही ज्या दिवशी स्वतःची मोटार घ्याल त्याच दिवशी तुमच्या माथ्यावरचे आईचे छत्र हरवेल, त्यामुळे गरज असूनसुद्धा त्यांनी कधीही स्वतःची मोटार घेतली नाही. कदाचित त्यांच्या आईबद्दलच्या हळव्या मनाला माझ्या खेळण्यातल्या मोटारीने आईच्या अंगावर जाणेसुद्धा सहन झाले नसावे व मुलांना नाही पण नातवंडांना सगळे गुन्हे माफ करणारे पपा आजोबा त्या एका प्रसंगात मात्र माझ्यावर खूप रागावले असावेत.

आजोबांचा मला लाभलेला हा केवळ अडीच वर्षांचा सहवास! मनातल्या कोपऱ्यात अंधुकसा वसलेला. पुढे जसे माझे वय वाढत गेले तसे त्यांच्या साहित्याच्या अभ्यासातून खरे 'गदिमा संस्कार' माझ्यावर होत गेले, याच संस्कारातून मी नातवाच्या भूमिकेतून एका गदिमा भक्ताच्या भूमिकेशी समरस होत गेलो. आज त्याच भूमिकेतून कथा एका महाकवी जन्माची...

गदिमांना जन्मतःच मृत घोषित करण्यात आले होते. लहान मूल असल्यामुळे दफनासाठी खड्डाही खोदण्यात आला, पण सर्वात वर बसलेल्या पटकथाकाराची 'पटकथा' सुरू होण्याआधीच कशी संपेल? आपल्या हिंदू संस्कृतीत 'व्दिज' (दोन जन्म) ही संकल्पना आहे. आपण प्रथम मातेच्या पोटातून गर्भावस्थेतून जेव्हा बाहेर येतो तो आपला पहिला जन्म! पुढे वर्णानुसार माणूस जेव्हा ज्ञान, शिक्षण, संस्कार प्राप्त करतो व आपल्या आत्म्याची खरी ओळख करून घेतो तो त्याचा दुसरा जन्म मानला जातो म्हणून आपण 'व्दिज', गदिमा स्वतःला 'त्रिज' म्हणायचे कारण त्यांचा तीनदा जन्म झाला होता!

त्यावेळचा सातारा तर आताच्या सांगली जिल्ह्यातले 'शेटफळ' हे गदिमांचे आजोळ. हे गाव गायकवाडांचे, अस्सल मराठी वस्ती! गदिमांचे आजोबा (आईचे वडील) त्या गावचे कुळकर्णी. गदिमांच्या आधी सर्वात मोठी बहीण, नंतर झालेला मुलगा पाळण्यातच वारला त्यामुळे गदिमांच्या आईने नुसती खडीसाखर खाऊन सोळा सोमवार केले. मुलगा झाला पण तो जन्मतःच मेलेला.

'१ ऑक्टोबर १९१९' हवा बिघडलेली होती, जोरात पाऊस पडत होता, लाडकी लेक 'बनूताई' प्रसूती वेदना सोसत होती, बाहेर चिंताक्रांत वडील (गदिमांचे आजोबा) फेऱ्या मारत होते. त्या काळात प्रसूती घरातच होत असत व हे काम बेमालूमपणे सुईण किंवा गावातली जाणती स्त्री करत असे.

प्रसूती करणारी प्रौढ स्त्री बाहेर आली. कोणीतरी अधिरपणे विचारले, ''काय झालं?''

''झालं, पण देवाने दिलं ते कर्मानं नेलं!''


''व्यंकोबाची मर्जी'' असे म्हणत गदिमांचे आजोबा उठले.

''बाळंतिणीला सांभाळा, तो मांसाचा गोळा परसदारी निजवून टाका...''

परसदारी खोरी-कुदळी वाजायला लागल्या, खड्डा तयार होऊ लागला. आईला अजून पूर्ण जाग आली नव्हती. इकडे म्हातारी सुईण मात्र चिंताक्रांत झाली होती. बाजेवरचे पोर तासाभरात मातीखाली दडपले जाणार होते. शेवटचा प्रयत्न म्हणून तिने शेगडीसाठी केलेला विस्तव तव्यावर घेतला आणि बाळाच्या बेंबीजवळ नेला, आणि काय आश्चर्य बाळाने टाहो फोडला ''कोहम् कोहम्...''

''मूल जिवंत आहे..... मूल जिवंत आहे....'' सगळीकडे आरडाओरडा झाला, गावभर आरोळी उठली. सगळीकडे आनंदीआनंद झाला. दफनासाठी खणलेला खड्डा धरणीला आस लागू नये म्हणून जिवंत कोंबड्याने बुजवण्यात आला, आणि गदिमांचा पुनर्जन्म झाला. गदिमा 'त्रिज' झाले.

गदिमांचा मरणापासून सुरू झालेला हा उलटा प्रवास. त्यांचा जन्म अठराविश्व दारिद्र्य असलेल्या एका गरीब कुलकर्णी परिवारात झाला. आटपाडी जवळचे माडगूळे हे गदिमांचे गाव, वडील औंध संस्थानात कारकून होते, गदिमांचे आजोबा मोठे कर्तृत्ववान, ते मरताना गदिमांच्या आईला सांगून गेले, ''बाळ, यापुढे काळ कठीण आहे, तुझा नवरा साधू-संत आहे, आज मिरची आणली तर



गदिमा व विद्याताई माडगूळकर

चार दिवसांनी मीठ आणेल. तुलाच यापुढे खंबीर व्हायला हवे...'' झालेही तसेच, अठराविश्व दारिद्र्य गदिमांची वाटच पहात होते, ना देवाने रुप दिले होते ना आर्थिक सुबत्ता.

पुढच्या शिक्षणाकरता गदिमा औंधला आले. औंधचा राजे 'भवानराव पंतप्रतिनिधी' एक जाणता राजा होता. अनेक गरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची, राहण्याची व अन्नाची फुकट सोय त्यांनी केली होती. इथं होण्याऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे व राजाच्या विविध उपक्रमांचे गदिमांवर संस्कार होत गेले. घराची परिस्थिती आता आणखीनच बिकट होत चालली होती. वडील थकले होते. खाणारी तोंडे वाढत होती व त्यातच दहावीत गणिताने घात केला व पुढे शिकावे इतका पैसा व बळही त्यांच्याजवळ नव्हते.

वयाच्या अठरा-एकोणिसाव्या वर्षीच गदिमा आपल्या शिक्षकांची चिट्ठी घेऊन कोल्हापूरला आचार्य अत्रे यांना भेटले. अत्र्यांनी त्यांना मा. विनायकांकडे पाठविले व मराठी चित्रपटसृष्टीत त्यांचा चंचूप्रवेश झाला. 'ब्रह्मचारी' व 'ब्रँडीची बाटली'सारख्या चित्रपटांत विनापगारी पडेलती एक्स्ट्रा नटांची कामे करत-करत गदिमा शिकत गेले. त्यांच्यातील अभिनयाचे गुण मा. विनायक व बाबूराव पेंटरांनी ओळखले होते. विनापगारी काम करणाऱ्या गदिमांचे ते दिवस खूप हलाखीचे होते. वाण्याच्या दुकानाच्या पायरीवर झोपून वेळप्रसंगी भूक लागू नये म्हणून पोटाला ओले फडके गच्च बांधून केवळ पाण्यावर गदिमांनी अनेक दिवस काढले होते. गदिमांना प्रथम गीतलेखनाची संधी मिळाली ती 'पहिला पाळणा' या चित्रपटासाठी! या चित्रपटातली गाणी खूप गाजली पण गदिमांना खरी गीतकार व अभिनेता म्हणून मान्यता मिळाली ती व्ही. शांताराम यांच्या 'लोकशाहीर रामजोशी' या चित्रपटातून. यानंतर गदिमांनी मागे वळून पहिले नाही व मराठी चित्रपटसृष्टीत एक स्वत:चे अनभिषिक्त सम्राटपद निर्माण केले.

मराठी चित्रपटांसाठी त्यांनी १५७ पटकथा तर २००० पेक्षा जास्त मराठी गाणी लिहिली. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांमध्ये 'रामजोशी', 'वंदे मातरम्', 'पुढचे पाऊल', 'गुळाचा गणपती', 'लाखाची गोष्ट', 'पेडगावचे शहाणे', 'ऊनपाऊस', 'सुवासिनी', 'जगाच्या पाठीवर', 'प्रपंच', 'मुंबईचा जावई', 'देवबाप्पा'सारख्या उत्तमोत्तम चित्रपटांचा समावेश होता. हिंदी चित्रपटसृष्टीतही २५ पटकथा लिहून गदिमांनी आपला ठसा उमटवला. व्ही. शांताराम यांचा 'दो आंखे बारह हाथ', 'नवरंग', 'गूँज ऊठी शहनाई', 'तूफान और दिया' हे चित्रपट गदिमांचेच!.

मराठी साहित्यात गदिमांनी कवी, कथालेखक, कादंबरीकार, नाटककार, संपादक अशा सर्व क्षेत्रात वावर केला. जवळजवळ ३७ पुस्तके गदिमांच्या नावावर आहेत. गदिमांनी स्वातंत्र्यलढ्यातही भाग घेतला होता, खूप मोठ्या कुटुंबाची जबाबदारी, त्यात अठराविश्वे दारिद्र्य यामुळे गदिमांनी स्वातंत्रलढ्यात प्रत्यक्ष उडी न घेता शाहिरी कवने, पोवाडे लिहून जनजागृती केली. सातारा-सांगली भागात प्रतिसरकारचा प्रचार करण्यासाठी शाहिर निकम, पिराजीराव सरनाईकसारख्यांनी त्याकाळात गदिमांची कवने, पोवाडे गाऊन स्वातंत्र्यलढ्यात रान उठवले होते. क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी यांचे पत्री सरकार त्यावेळी सातारा-सांगली भागात कार्यरत होते. गदिमांचे घर म्हणजे या क्रांतिकारकांचे लपण्याचे मुख्य ठिकाण होते. अनेकदा लुटलेली हत्यारे, पैसे, दागिने गदिमांच्या घरात लपवली जात असत.

गदिमांच्या या सर्व काळात त्यांच्यासोबत खंबीरपणे उभी राहणारी व्यक्ती म्हणजे गदिमांची गृहिणी-सखी-सचिव अर्थातच विद्याताई माडगूळकर, गदिमांच्या यशात विद्याताईंचा खूप मोठा वाटा होता. गदिमांचा त्याकाळातला प्रेमविवाह! गदिमा देशस्थ ब्राह्मण तर विद्याताई कोकणस्थ ब्राह्मण! ऐन लग्नात भटजी उठून

माझ्या आयुष्यात आली दिवाळी !

# यशकथा

## समृद्धीचा 'रेशीम मार्ग'

रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला व ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत करणारा उद्योग आहे. देशभरात रेशीम उद्योग आणि तुती लागवड यांची झपाट्याने वाढ होत आहे. महाराष्ट्रात विशेषत: विदर्भात रेशी' उद्योग जास्त प्रमाणात दिसून येतो. रोजगाराची प्रचंड क्षमता असणाऱ्या या उद्योगाचे ग्रामीण विकासात मोठे योगदान आहे. या उद्योगातून ग्रामीण भागातील लोकांना तुती लागवड, कीटक संगोपन व धागानिर्मितीमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होत आहे.



वर्धा शहरापासून २५ किलोमीटर अंतरावर असणारे हे रेशीम गाव म्हणजे झाडगाव. अडीच हजार लोकसंख्येचे हे गाव काही वर्षांपूर्वी इतर गावांसारखेच एक सर्वसामान्य गाव होते. या गावातीलच भोजराज भांगडे यांनी गावात पहिल्यांदा १२ वर्षांपूर्वी १ एकरमध्ये रेशीम शेतीचा प्रयोग केला. रेशीम कार्यालयातून त्यांनी याविषयी माहिती घेतली. गावातील इतर शेतकऱ्यांनी भांगडे यांना त्यावेळी वेड्यात काढले होते. पण त्यांनी लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देता आपले काम चालू ठेवले. सहा महिन्यातच त्यांना दरमहा उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण झाला. एक एकरमध्ये उत्पादित केलेले कोष त्यांनी कर्नाटक, आंध्र प्रदेशमध्ये जाऊन विकले. यातून त्यांना फायदा दिसू लागल्यावर त्यांनी हळूहळू लागवड क्षेत्र वाढवले.

### एक वर्षात १४ लक्ष रुपयांचे उत्पन्न !

भांगडे यांची आता साडेचार एकरमध्ये तुतीची लागवड आहे. आज त्यांच्या साडेचार एकर शेतीतून ते आठ वेळा रेशीम कोष उत्पादन घेतात. एका वेळी ५०० अंडीपुंजापासून सरासरी ३.५० क्विंटल उत्पादन एक महिन्यात होते. एक क्विंटलला साधारणपणे ५० हजार रुपये भाव मिळतो. म्हणजे एक महिन्यात ते सुमारे १ लक्ष ७५ हजार रुपये उत्पन्न घेतात आणि वर्षाला १४ लक्ष रुपये कमावतात.

### उन्हाळ्यात शेती

उन्हाळ्यात त्यांना पिकासाठी विहिरींचे पाणी पुरेसे नसते. त्यामुळे शेजारच्या शेतकऱ्यांकडून ते १० हजार रुपयांचे पाणी विकत घेऊन रेशीम कोषाचे उत्पादन घेतात.

### रेशीम शेती

श्री. भांगडे यांची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती पाहून झाडगावातील इतर शेतकऱ्यांनी हळूहळू तुती लागवडीकडे आपला मोर्चा वळवला. सध्या गावातील २० शेतकरी आज रेशीम शेती करायला लागले आहेत. कर्नाटकमधील रामनगर येथे एकत्रितपणे कोष विक्रीसाठी पाठवतात. तर कधी व्यापारी गावात येऊन कोष खरेदी करतात. यामळे गावात ७५ लक्ष ते १ कोटी रुपयांची उलाढाल होते.

### तुती लागवड अशी ठरते फायदेशीर

तुती लागवड करण्यासाठी सिंचन व्यवस्था असणे आवश्यक आहे. एकदा तुती लागवड केली की, १२ ते १५ वर्ष यापासून उत्पन्न मिळू शकते. पुन्हा लागवड करण्याची गरज नाही. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून यासाठी अनुदानसुद्धा मिळते. तीन वर्षात २ लाख ९० हजार रुपये प्रति एकर अनुदान दिले जाते. यामध्ये शेड बांधकाम व इतर साहित्य खरेदी आणि तुतीची बियाणे दिली जातात. याशिवाय प्रत्येक पिकासाठी लागणारे अंडीपूंज खरेदी करण्यासाठी रेशीम विकास अधिकारी कार्यालयामार्फत १७५ रुपये १०० अंडीपूंजाप्रमाणे अनुदान दिले जाते.

तुतीच्या वाढीसाठी सेंद्रिय खताशिवाय कोणतेही रासायनिक खत, फवारे देण्याची गरज नाही. लागवड खर्च, खते, फवारणी या खर्चातून सुटका. मजुरांचा खर्च एकदम कमी. महिन्यातून आठ दिवस एक मजूर पुरेसा आहे.



श्री.नरेंद्र मोदी
मा.प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबद्दल

**धन्यवाद**

जन हो ! आपणही घ्या योजनांचा लाभ

माझ्या आयुष्यात आली दिवाळी!

# यशकथा

## सिंचनाची हमी

मेहकर तालुक्यातील साब्रा-काब्रा गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेत जलसंधारणाची विविध कामे पूर्ण करण्यात आली. ही कामे होण्यापूर्वी गावशिवारात पाणी अडवण्याचे जलसंधारणाचे काम नसल्यामुळे, शिवारातील नाल्यांमध्ये पावसाचे पडलेले पाणी वाहून जायचे. परिणामी, गावशिवारात भूजल पातळी वाढत नव्हती आणि पिकांना संरक्षित सिंचन मिळत नव्हते. मात्र गावशिवारात दोन नाल्यांवर सिमेंट नाला वांध घेण्यात आले. साब्रा आणि काब्रा शिवारातील नाल्यावर सिमेंट नाला बांध घेण्यात आला. या दोन्ही बांधाची पाणी साठवण्याची क्षमता अनुक्रमे ४.६५ टिसीएम व ३.४५ टीसीएम आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे पावसाचे पडलेले पाणी सिमेंट नाला बांधमध्ये साचले.



परिणामी, भूजल पातळीत वाढ झाली. त्यामुळे शेतकऱ्याच्यां विहिरीत पाणीपातळी वाढली. पावसाचे पाणी या बांधामध्ये तुडुंब भरले. त्यामुळे शिवारातील विहिरींना पाझर फुटले. पावसाने मोठा खंड दिला, तेव्हा या संरक्षित सिंचनाच्या सुविधेमुळे शेतकर्यांनी करपणारे पीक वाचवले. नाल्याशेजारील शेत असणारे शेतकरी विजय रामकिसन ठोकरे यांनी सांगितले. पावसाने मोठा दगा दिला आहे. अशा परिस्थितीत आमचे सोयाबीन पीक करपल्याशिवाय राहणार नव्हते. पण आम्ही संरक्षित सिंचन केले, सोयाबीन वाचवले. त्यामुळे हाती न येणारे सोयाबीनचे उत्पन्न आता हमखास येणार आहे.'या अभियानाच्या प्रथम, द्वितीय टप्प्यात जिल्ह्यातील ५७५ गावांमध्ये विविध विभागांच्या समन्वयाने १२ हजारांवर कामे पूर्ण करण्यात आली. या कामांमुळे हजारो हेक्टर क्षेत्रावर संरक्षित सिंचन उपलब्ध झाल्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली आहे.



श्री.नरेंद्र मोदी
मा.प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबद्दल

**धन्यवाद**

जन हो ! आपणही घ्या योजनांचा लाभ

माझ्या आयुष्यात आली दिवाळी!

# यशकथा

## दुग्ध भरारी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेऊन सुरेश शेळके यांनी व्यवसाय भरारी घेतली. परभणी शहरापासून सुमारे ८ कि.मी.अंतरावर असलेल्या तरोडा नावाच्या खेड्यातील सुरेश काशिनाथ शेळके या तरुणाची यशोगाथा प्रेरणादायी आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असताना बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण केलेल्या सुरेशला स्वत:चा व्यवसाय सुरु करून स्वावलंबी कुटुंबाला आधार स्वस्थ बसू देत त्याला एका मित्राकडून आर्थिक मागास महामंडळाच्या कर्ज योजनेची माहिती त्याच्या स्वावलंबी सुरुवात झाली. शहरातील जिल्हा रोजगार मार्गदर्शन अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या आपल्या बंधूसमवेत संपूर्ण माहिती घेतली ग्रामीण बँकेत केली. या दोन्ही मिळालेल्या आधारे त्याने तरोडा करण्यासाठीचा बँकेत प्रकल्प अहवाल, यासह इतर कागदपत्रे



होण्याचा व आपल्या देण्याचा संकल्प नव्हता. एके दिवशी अण्णासाहेब पाटील विकास व्याज परतावा मिळाली आणि होण्याच्या प्रयत्नांना सुरेशने परभणी कौशल्य विकास व केंद्रातील आर्थिक मागास कार्यालयास भेट देऊन योजनेची आणि महाराष्ट्र जाऊनही चौकशी संस्थाकडून मार्गदर्शनाच्या गावात दुग्धव्यवसाय प्रस्ताव सादर केला. सातबारा उतारा, परिपूर्णपणे जोडून

पाठपुरावा केला. या महामंडळाच्या योजनेचे ऑनलाइन सशर्त प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन प्रस्तावास जोडले. यामुळे त्याला बँकेने दुग्ध व्यवसाय सुरू करण्यासाठी ३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले. बँकेने दोन टप्प्यात कर्ज दिले. पहिल्यांदा सुरेशने पाच चांगल्या म्हशींची खरेदी केली. जेव्हा त्याला ते दीड लाख रुपये मिळाले त्यानंतर म्हशींचा गोठा, शेड इत्यादी सुविधा निर्माण केल्यावर दीड लाख असे एकूण तीन लाख रुपये कर्ज मिळाले. दुग्ध व्यवसायात त्याला भावांची साथ मिळाली असून घरची मेहनत आणि योजनेची साथ मिळाल्याने दुग्ध व्यवसाय जोर धरू लागला आहे. कुटुंबाकडे असलेल्या २० एकर शेतीमध्ये पशूंसाठीचा ताजा चारा उत्पादित केला जात असल्यामुळे व इतर पिकांचे उत्पादनही घेतले जात असल्यामुळे आर्थिक मदत होत गेली. बँकेने मंजूर केलेल्या ३ लाख रुपये कर्जाच्या १२ टक्के दरमहा व्याजाची परतफेड शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून केली जात असून, दरमहा मुद्दलाची रक्कम ८ हजार रुपये सुरेशकडून आणि महामंडळाकडून दरमहा व्याजाची रक्कम कर्ज खात्यावर जमा होत आहे. कर्जाच्या व्याजाची रक्कम सुरेशला भरावी लागत नसल्याने तो पूर्णत: मुद्दल परतफेड करण्यावर भर देत आहे. ३ लाख रुपये कर्जातून उभ्या केलेल्या दुग्ध व्यवसायातून ५ म्हशींपासून सुमारे ५० लीटर दूध दररोज मिळते. हे दूध तो आणि त्याच्या बंधूमार्फत परभणी शहरातील घरोघरी विकून जवळपास दरमहा १० ते १५ हजार रुपयांचा निव्वळ फायदा मिळवत आहे. यामुळे त्या कुटुंबाची प्रगती होत असून आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे.



श्री.नरेंद्र मोदी
मा.प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबद्दल

**धन्यवाद**

जन हो ! आपणही घ्या योजनांचा लाभ

माझ्या आयुष्यात आली दिवाळी!

# यशकथा

## २.८० कोटी गॅस जोडण्या



प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना गॅस जोडण्या वितरित करण्यात येत आहेत. त्यापैकी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत जून २०१८ पर्यंत २५.२६ लक्ष कुटुंबांना गॅस जोडण्या वितरित करण्यात आल्या. राज्यातील एकूण गॅस जोडण्यांची संख्या २.८० कोटी इतकी झाली आहे. त्यामुळे राज्याच्या केरोसीन कोट्यात पुन्हा बचत होण्याची शक्यता आहे.

## धान्य मिळणे सुलभ झाले...

## रांग लावावी लागत नाही

जालना येथील विजया शाम खुरपे यांनी स्वस्त धान्य दुकानदाराकडे एक वर्षापूर्वी कुटुंबातील सदस्यांचे आधार कार्ड जमा केले. आता त्यांच्या घरातील कोणताही सदस्य रेशन दुकानात जाऊन अंगठा लावून धान्य घेऊन येतो. पूर्वीसारख्या रेशन दुकानात चकरा माराव्या लागत नाहीत. महिन्याच्या १० तारखेनंतर रेशन दुकानात गेले की हमखास धान्य मिळते. आता दुकानात जास्त वेळ रांग लावावी लागत नाही. अंगठा दिला की लगेच पावती व धान्य मिळते. दुकानदारसुद्धा चांगली वागणूक देतो.





श्री.नरेंद्र मोदी
मा.प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

शासकीय योजनांचा लाभ घेतल्याबद्दल

**धन्यवाद**

जन हो ! आपणही घ्या योजनांचा लाभ

पळून जाऊ लागले की देशस्थ आणि कोकणस्थ लग्न पत्रिकेत होऊच शकत नाही. शेवटी 'नागूदेव भटजी' नावाच्या ओळखीच्या भटजींनी त्यांना शास्त्राचा आधार घेऊन लग्न कसे जमते हे पटवून दिले व शेवटी लग्न पार पडले. त्यात लग्नात पाण्याची टंचाई! शेवटी गदिमांच्या मित्रांनी लग्नमंडपापासून एका विहिरीपर्यंत मोठी रांग लावली व पाणी भरले. या पाणी भरणाऱ्यांमध्ये होते सुधीर फडके, मधुकर कुलकर्णी, पातकर, नेमिनाथ हे गदिमांचे मित्र व सर्व वऱ्हाडी महिलामंडळ!

विद्याताईंचा आवाज तर अप्रतिमच होता. गदिमांनी लिहिलेले, सुधीर फडक्यांनी संगीतबद्ध केलेले व पहिले रेकॉर्ड झालेले गाणे विद्याताईंनीच गायले होते. लग्नानंतर गदिमा कोल्हापुरातच स्थायिक झाले. कोल्हापुरात गदिमांचे शेजारी होते 'मंगेशकर कुटुंबीय'. त्याकाळात 'एचएमव्ही'ने विद्याताईंची 'चांदाची किरणे विरली' ही ध्वनिमुद्रिका काढली होती. ती खूप गाजत होती. लता मंगेशकर



**गदिमा व विद्याताई माडगूळकर, नातू सुमित्र व व्याही वि.म.आरेकर व सुशीला आरेकर**

विद्याताईंकडे जायच्या व म्हणायच्या, ''वहिनी, मी तुमच्यासारखे गाऊन दाखवू?'' विद्याताई म्हणायच्या, ''आणि माझ्यापेक्षा कितीतरी सहजतेने ते गाणं ती म्हणून दाखवायची. तिच्या गोड गळ्यातून ते गाणं ऐकल्यावर हे गाणं माझं की लताचं? असा प्रश्न कधीकधी मला पडायचा.'' गदिमांची प्रतिभा बहरावी म्हणून लग्नानंतर मात्र त्यांनी गाणं सोडले व शेवटपर्यंत गदिमांच्या संसाराकडेच लक्ष दिले.

यशवंतराव चव्हाण हे गदिमांचे खास मित्र, चांगल्या लोकांनी राजकारणात यावे म्हणून त्यांनी गदिमांना साहित्यिकांचे प्रतिनिधी म्हणून जवळजवळ बारा वर्षे विधानपरिषदेचे नामनियुक्त सदस्य म्हणून संधी दिली होती. ते जेव्हा विधानपरिषदेत भाषण करणार असायचे तेव्हा ते ऐकण्यासाठी विधानसभेतील अनेक आमदार खास त्याचे भाषण ऐकण्यासाठी विधानपरिषदेत येऊन बसत असत. या काळात त्यांना स. गो. बर्वे, शरदरावजी पवार, सुशीलकुमार शिंदे, राम नाईक, मनोहर जोशी अशा अनेकांचा स्नेह लाभला.

गदिमांना 'महाकवी' व 'आधुनिक वाल्मिकी' ही पदवी ज्यांच्यामुळे प्राप्त झाली ते महाकाव्य म्हणजे गीतरामायण. 'गीत रामायण' हा एकाच कवीने वर्षभर रचलेला, एकाच संगीतकाराने संगीतबद्ध केलेला, वर्षभर अखंडितपणे चाललेला आकाशवाणीच्या इतिहासातील एकमेव, अभूतपूर्व असा संगीत कार्यक्रम ठरला. १ एप्रिल १९५५ ते १९ एप्रिल १९५६ पर्यंत तो पुणे आकाशवाणीने प्रसारित केला. साधारण १९५३ साली पुणे आकाशवाणी हे केंद्र सुरू झाले. सीताकांत लाड नावाचे गदिमांचे मित्र कार्यक्रम नियोजक म्हणून पुण्याला आले होते. नभोवाणीसाठी काहीतरी सातत्याने लिहावे, असा त्यांनी गदिमांना खूप आग्रह केला आणि एका महाकाव्याचा जन्म झाला. रामायणात वाल्मिकींनी अठ्ठावीस हजार श्लोकांत रामकथा लिहिली आहे. गदिमांनी तीच रामकथा एकूण ५६ गीतांत शब्दबद्ध केली आहे. गीतरामायणाचे आजपर्यंत हिंदी, गुजराथी, कन्नड, बंगाली, आसामी, तेलगू, मल्याळी, संस्कृत, कोकणी अशा विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. गदिमांनी श्रीकृष्ण चरित्रावर लिहिलेले 'गीतगोपालही' गीतरामायणाच्या तोडीस तोड आहे.

पुरस्कारांच्या बाबतीत तर गदिमांची 'देता घेशील किती दोन करांनी तू' अशी अवस्था व्हायची, गदिमांना भारत सरकारने 'पद्मश्री' (१९६९) हा सन्मान बहाल केला. ते 'संगीत नाटक अकादमी' व 'विष्णुदास भावे सुवर्णपदक' या पुरस्कारांचे मानकरी ठरले. १९६९ला ग्वाल्हेरला झालेल्या 'अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलना'चे अध्यक्षपद, १९७३ साली यवतमाळ येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे' ते अध्यक्ष होते. त्यांच्या अनेक चित्रपटांना कथा, पटकथा, संवाद, गीतलेखनासाठी महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार मिळाले. अनेक पुस्तकांना राज्य व केंद्र शासनाचे पुरस्कार लाभले.

१४ डिसेंबर १९७७..! नियतीचे खेळ किती अजब असतात. खरे म्हणजे हा आम्हा माडगूळकर कुटुंबियांसाठी आनंदाचा दिवस

ठरला असता. ग. दि. माडगूळकर व व्यंकटेश माडगूळकर या दोन थोर साहित्यिकांच्या जन्मदेचा त्या दिवशी आदर्श माता पुरस्काराने सन्मान होणार होता. गदिमा स्वतः उपस्थित राहणार होते, पण दैवदुर्विलास असा की एकीकडे गदिमांची आई आदर्श माता पुरस्कार स्वीकारत होती व इकडे पंचवटीमध्ये गदिमांची प्राणज्योत मालवली. सगळेच अतर्क्य...! इतकी मोठी अंत्ययात्रा पुण्याने फार क्वचित बघितली असेल. स्त्री-पुरुष, वृद्ध, राजकारणी, कलावंत, अगदी दप्तर-पुस्तके घेतलेल्या लहान मुलांपासून सर्वजण त्यात सामील झाले होते. अनेक घरांत त्या दिवशी चुली पेटल्या नाहीत.

१९९८ साली माझे अधिस्नातक शिक्षण पूर्ण झाल्यावर माझा संगणक-इंटरनेटच्या जगाशी संबंध आला व काहीतरी वेगळे करावे असे वाटू लागले. गदिमांचे साहित्य-गाणी टिकावीत, ती पुढच्या पिढीपर्यंत जावीत यासाठी हा अनमोल ठेवा त्यांना त्यांच्या माध्यमात देणे आवश्यक होते. एक दिवस कल्पना सुचली की गदिमांची वेबसाईट केली तर? त्या काळात इंटरनेटवर मराठीचे फारसे अस्तित्व नव्हते. युनिकोड फॉन्टही प्रारंभिक अवस्थेत होते. वाचकांना मराठी वाचण्यासाठी संगणक प्रणालीत मराठी फॉन्ट इन्स्टॉल करावा लागत होता. ब्राउझरची सेटिंग चेंज करावी लागत होती. अनेक अडचणी होत्या. गदिमांचे साहित्य विखुरलेले होते, छायाचित्रे उपलब्ध नव्हती. गाणी जुन्या एल.पी., कॅसेट फॉरमॅट मध्येच उपलब्ध होती, त्यांचे डिजिटायझेशन करणे आवश्यक होते.

शेवटी कामाला सुरुवात केली. जुन्या गाण्यांची रेकॉर्डिंग्स मिळवली. दुकानात फिरून जुन्या कॅसेट्स मिळवल्या. मूळ गीतरामायणाचे रेकॉर्डिंग मिळवले. गदिमांच्या आवाजातील भाषणे, कविता मिळवल्या. गदिमांचे साहित्यिक मित्र-सहकारी राजा मंगळवेढेकर, म. गो. पाठक, ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनाबाई यांच्याकडून गदिमांची छायाचित्रे, हस्तलिखिते, लेख मिळवले. सर्वांचे डिजिटायझेशन स्वतः केले. शेवटी ऑक्टोबर १९९८ मध्ये एका लेखकाला अर्पिलेल्या मराठी साहित्यातील पहिल्या मल्टिमिडीया वेबसाईट 'गदिमा.कॉम'चा जन्म झाला. देशा-परदेशातून या वेबसाईटला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अमेरिकेत जेथे मराठी शब्द कानावर पडत नव्हता तेथे लोकांना गीतरामायणाचे सूर ऐकू येऊ लागले. गदिमांची अवीट गोडीची गाणी ऐकता येऊ लागली. गदिमांचे साहित्य वाचता येऊ लागले, जगभरातून कौतुकाच्या ईमेल्सचा अक्षरशः पाऊस पडला. पुढे गदिमांचे साहित्य-गाणी सीडी/डिव्हीडी/पेन ड्राईव्हसारख्या माध्यमातून उपलब्ध करून दिले. गदिमांच्या 'जोगिया' काव्यसंग्रहातील निवडक कविता म्युझिक अल्बम स्वरूपात उपलब्ध केल्या. गीतरामायण हीरक महोत्सवात अँड्रॉइड मोबाइल्ससाठी गीतरामायणाचे ॲप तयार केले. फेसबुकसारख्या माध्यमात गदिमांची पाने तयार केली, त्यालाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. आज गदिमांचे साहित्य-गाणी-चित्रपट येण्याऱ्या नवीन पिढीसाठी त्यांच्या आवडीच्या संगणक-इंटरनेट-मोबाईल माध्यमात सहज उपलब्ध आहेत.

गदिमांबद्दल लिहायचे म्हटले तर अनेक पाने सुद्धा पुरणार नाहीत असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व! मराठी चित्रपट, साहित्य, राजकारण, समाजकारण सर्वच क्षेत्रात त्यांचा मुक्त वावर होता, १ ऑक्टोबरला त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे. गदिमा द्रष्टे होते. ते म्हणायचे, ''हाच माझे नाव पुढे चालवेल. मी त्यांच्यासारखा लेखक, कवी झालो नाही पण त्यांचे साहित्य पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यात माझा थोडा हातभार लागला हेच माझे भाग्य! कदाचित तेच त्यांना अभिप्रेत असावे, शेवटी त्यांच्याच ओळीत थोडा बदल करून म्हणावेसे वाटते...

*ज्ञानियाचा वा तुक्याचा, तोच माझा वंश आहे*
*माझिया रक्तात थोडा, 'गदिमांचा' अंश आहे...*

**– सुमित्र माडगूळकर**
भ्रमणध्वनी : ९३७०१४४३०९

ग्रंथाली

# अलूफ
## सदानंद डबीर




**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७० रुपये**

पायांत मोडले काटे... हा जन्म तसा अनवाणी
तू दिलीस तरिही माझ्या, अधरांवर शीळ दिवाणी!
बहरून मोगरा येतो, प्राजक्त शांत दरवळतो
सांगती शब्द हे माझे... कुसुमांची गंध घराणी!
तळहाती उमटत आहे... ह्या वयात कुठली रेषा?
ही उशिराने आलेल्या, भाग्याची एक निशाणी!
शोधीत मला आलेले, हे शब्द कसे नाकारू?
बघ, ओंजळ भरली माझी, लखलखत्या नक्षत्रांनी!
मी पान उलटतो आहे... हे माझ्या आयुष्याचे
हरक्षणी सुरू होणारी... ही आहे गूढ कहाणी!

रविप्रकाश कुलकर्णी

# अफाट अमृता प्रीतम

**ज्ञानपीठ विजेत्या अमृता प्रीतम या कवयित्रीचे, कथा-कादंबरीकार लेखिकेचे हे जन्मशताब्दी वर्ष. (जन्म ३१ ऑगस्ट १९१९) यानिमित्ताने तिला व तिच्या साहित्याला समजून घेणे अपरिहार्य आहे...**



अमृता प्रीतम एक कवयित्री, कथाकार, कादंबरीकार अशी तिची ओळख केव्हाच झालेली आहे. तिला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला, ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला, शिवाय छोटे मोठे कितीतरी पुरस्कार मिळाले.

अमृता प्रीतमच्या लेखनामागे अमृताचे मनस्वी आणि आवेगी मन होते. ह्या सगळ्याला एक शायराना अंदाज-कवी मनाची जोड आहे. त्याचे प्रतिबिंब तिच्या सगळ्या साहित्यात दिसते. ती एखाद्या कवीबद्दल देखील कसं बोलते ते सांगायला हवं. आपल्या वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्या निमित्ताने त्यांचे मोजकेच सत्कार झाले. त्यातील एक दिल्लीला झाला. त्यावेळी कुसुमाग्रजांबद्दल अमृता प्रीतम म्हणाली, ''हर सुबह की रोशनी, रात की कोख से जनम लेती है। ये आग की चिता पर जलती हुई हमारी लाशें, इन्ही की लपटोसे हमारे कल की क्रांती के नेता जन्मेंगे। दोस्तों, ये थे शिरवाडकर के शब्द. खांडेकर साहब ने कहा था, अरे, ये हमारा शायर कुसुमाग्रज अब अवाम का, लोगोंका शायर बन गया है। सामाजिक नाइन्साफियों का जो लावा खौल रहा है, उसीकी उडती हुई चिंगारियाँ कुसुमाग्रज की नज्म है। कहना चाहती हूँ, की ऐसी क्रांती, कर्म की बुनियाद पर होती है। प्रतिकर्म की बुनियाद पर नही होती. लोगोंकी मुहब्बत इसकी बुनियाद है। कुसुमाग्रज का चिंतन है, शायरी बिरानेमे नहीं खिलती। इसीसे करुणा की जलधारायें बहती हैं।

मुझे याद आते है, हमारे उर्दू के शायर फिराक गोरखपुरी.

एक रात सुनाया करते थे की जब दुनियावालोने देखा कि ये जो आशिक लोग है, शायर लोग है, अदिब लोग, ये अजीब लोग होते है। मुहब्बत के एहसासोंको जाने किस कदर जिते हैं, कि अवाम के दुखदर्द भी अपने दिलपर झेलने लगते हैं और फिर ये लोग जिंदगी भर तडपते रहते है और दुनियावालोंने कहा, ''अरे, ये तो जहन्नूम है, जिसकी आगमे ये लोग जलते रहते हैं और हम लोग कवी के दर्द को अपना नहीं कहते। हम तो आरामसे जन्नत मे जिते है।'' और दुनियावाले हसते रहे।

अजी ये लोग तो मर कर भी जहन्नूम मे जायेंगे और हमारे लिये तो यहां भी जन्नत हैं और वहाँ भी जन्नत है और फिराक हँसते थे। सुनाया करते थे कि वहाँ दुसरी दुनिया मे एक बार जन्नत मे इतना मेघ बरसा, दिन रात बरफबारी होती रही, इतनी कि लोग सर्दीसे काँपने लगे और उन्होने सोचा अरे, सुना है जहन्नूम मे बहुत आग जलती है। वहाँसे कुछ आग माँग लेनी चाहिये और उन्होने जहन्नूम मे अपनी फर्माईश भेज दी। कहते हैं वहाँ से जवाब आया, अजी यहाँ फालतू की आग नही होती। ये आशिक लोग, ये शायर लोग जो यहाँ आते है, अपनी-अपनी आग साथ लेकर आते है। ये आग तो उनके मनमस्तिष्क मे जलती है, जिसे दुसरा कोई नही नाँप सकता। इस आग को नाँपने के लिये तो आशिक होना होता है, शायर होना होता है और मैं कहना चाहूँगी की इस आग को कागज पर उतारने के लिये शिरवाडकर होना पडता है। दुवा मांगती हूँ आज के मन के दायरोके अंधेरे मे ये चेतना की आग जलती रहे।''

अमृता प्रीतमचे हे भाषण विस्ताराने द्यायचे कारण 'घायल की गती घायल जाने' याचेच हे द्योतक आहे. इथे हेही सांगता येईल (असं वाटतं की) ही अमृताचीच कैफियत (तर) नव्हे?

वरील भाषणातील विचार अमृताला सुद्धा लागू पडतात, पडावेत. जणू त्यावेळी अमृता प्रीतमच्या समोर आरसाच असावा!

अमृता प्रीतमने उदंड लिहिले. प्रामुख्याने ती पंजाबीमध्येच लिहीत असे आणि लगेचच त्याचा हिंदी/उर्दू अनुवाद होत असे. अमृता मूळची लाहोरची. फाळणीनंतर ती भारतात आली. त्या प्रवासात तिने जे पाहिलं, जे भोगलं त्याची कायमची भगभगती जखम राहिली. हे सोसणारे दोन्हीकडे लोक होते, पण त्यांना सांगता येत नव्हते. अमृताने या दु:खाला, वेदनेला शब्द दिले, जे अनेकांना आपलेच शब्द वाटले. अमृता लोकांना आपली वाटली त्याचे हे एक कारण आहे. त्या वेळची अमृताची एक कविता आहे, 'अज आखां वारस शहानु' या कवितेत भारत-पाक विभाजनाचे दुर्दैवी चित्र आहे. पंजाबीत हीर-रांझा ही प्रेमगाथा वारिस शहाने सांगितलेली आहे. त्याला ही कवयित्री म्हणते,

अज आखां वारस शहानु
कितो कब्रा विच्चो बोल!
ते अज किताबे इश्क दा,
कोई अगला वर्का फोल!
इक रोयी सिधी पंजाब दी,
तू लिख लिख मारे वैन,
अज लक्खा धियां रोन्दिया,
तैनू वारस शहानु तैहन

(आज मी वारिस शहाला आवाहन करते की, तू आपल्या थडग्यातूनच बोल आणि आज प्रेमगाथेचे नवे पान उघड! प्राचीन काळी पंजाबची एक कन्या रडू लागली तरी तू केवढा विलाप केला होतास. पण आज पंजाबच्या लाखो कन्या तुला हाक देत आहेत.)

या विलापिकेने पंजाबी कवितेचे पूर्वसुरीचे सर्व संकेत धुडकावून लावले. अमृताची ही कविता लोकांच्या हृदयाला तर भिडलीच पण ती ओठावर ही खेळू लागली. त्यामुळेच अमृताची इक कुडी दा गीत (एका मुलीचे गाणे), पंखेरूआ (हे पाखरा), यादों के हवाले (स्मृतींच्या ताब्यात) अशा कवितांनी पंजाबचे नवे चित्र चित्रित केले. अमृता प्रीतमचे नाव कवितेच्या क्षेत्रात ठळक झाले. ही धग कायम राहिल्यामुळेच पुढे या काव्याला सहस्त्रकातील श्रेष्ठ काव्य मानले गेले. 'ही युगायुगांची कहाणी आहे', असे म्हटले गेले.

व्यक्तिगत आयुष्यातील घडामोडींमुळे ती कायम चर्चेत राहिली. तिचे लहानपणीच लग्न झाले. तिला दोन मुले झाली, पण त्या नवऱ्याशी तिचे कधीच भावबंध निर्माण झाले नाहीत. अमृता प्रीतम दिसायला सुंदर होतीच त्यात तिचे पुरुषांमध्ये निर्भय वागणे! त्यामुळे तिच्याबद्दल भल्याभल्यांनी गैरसमज करून घेतले, पण ह्या सगळ्याला अमृता बेडरपणे सामोरी गेली. हे वादळ तिने बदनामीची किंमत देऊन झेलले. याचे सुद्धा चित्रण तिने कलात्मकतेने आपल्या साहित्यात केले. आपले साहित्य म्हणजे आयुष्याचे तुकड्या-तुकड्याचे प्रतिबिंब आहे असं ती म्हणे. याचा हाच अर्थ आहे.



अमृता प्रीतमच्या आयुष्यातील एक वादळी पर्व म्हणजे साहीर लुधियानवी! अमृताने आपले त्याच्याबद्दलचे प्रेम कधीच लपविले नाही. ते क्षण तिने आपल्या साहित्यातून प्रगट केले. त्यामुळे या प्रेमकहाणीचा बभ्रा फार झाला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे हे प्रेम एकतर्फीच ठरले. त्याबाबत साहिरला कोणताच निर्णय घेता आला नाही. कधीच घेता आला नाही.

या वळणावरच तिच्या आयुष्यात चित्रकार इमरोज आला! अमृता प्रीतमला नवऱ्याकडून घटस्फोट मिळत नव्हता. तरी



इमरोजशी भावबंध जडताच ती जगजाहीरपणे त्याच्या बरोबर राहू लागली. आजच्या जमान्यात देखील अशी गोष्ट वादग्रस्त ठरते. अशा वेळी त्या वेळच्या जगात  काय हाहा:कार उडाला असेल हे वेगळे सांगायला नको.

लैला-मँजनू , शिरी-फरहाद, हीर-रांझा ह्यांच्या प्रेमकहाण्या काळाचे बंधन तोडून अजरामर झालेल्या आहेत. त्या तोडीचीच अमृता प्रीतमची कहाणी सांगता येईल. फरक इतकाच इथे प्रेमाचा त्रिकोण आहे.

या संबंधात एक हकिकत सांगण्यासारखी आहे.  अमृता प्रीतम आणि इमरोज एकमेकांचे झाले. त्याकाळात इमरोज अमृताला रेडियो स्टेशनवर स्कूटरवरून सोडत असे. मागच्या सीटवर बसून अमृता इमरोजच्या पाठीवर बोटाने लिहित असे साहीर-साहीर-साहीर.

हे सर्व इमरोजने कसे झेलले हे त्याचे त्यालाच ठाऊक! मात्र जगात, विशेषत: हिंदी पंजाबी साहित्यसृष्टीमध्ये नाना वावड्या उठल्या. त्या सगळ्या हिच्या घरापर्यंत न आल्या तरच आश्चर्य होते.

अमृताचा मुलगा नवरोज एकदा तिला म्हणाला, ''आई, मी साहीर अंकलचा मुलगा आहे का?''

यावर अमृताचे उत्तर होते, ''नाही. तू तुझ्या वडिलांचाच मुलगा आहेस.'' ह्यापुढे अमृता जी बोलली ते फक्त तीच बोलू शकते. आजच्या काळातही एखादी स्त्री असं उत्तर द्यायला धजावेल असं वाटत नाही. ती म्हणाली, ''पण तू साहिरचा मुलगा असतास तर मला आवडले असते.''

ही कंडी, विख्यात लेखक राजेंद्रसिंग बेदी यांनी उठवली. त्याबाबत अमृताला विचारले असता ती म्हणाली, ''ये सच है, लेकिन ये बेदी का सच है.''

हे असलं फक्त अमृतालाच सुचू शकतं.

अमृताच्या ह्या बिनधास्त स्वभावाने आणि येईल त्या प्रश्नाला बेदरकारपणे सामोरे जाण्याच्या वृत्तीमुळे ती अनेक वेळा गैरसमजांच्या भोवऱ्यात अडकली, पण ती त्याबाबत खुलासे वगैरे करत बसली नाही. आहे हे असं आहे आणि मी माझ्याच वाटेने जाणार आहे. तिला माहीत होतं, ही वाट एकटीची आहे. तरीसुद्धा त्याची किंमत देऊन सगळ्या गोष्टींना ती धैर्याने सामोरी गेली.

एकदा खुशवंतसिंग तिला भेटला तेव्हा तो म्हणाला, ''सध्या काय चाललंय?''


तेव्हा अमृता म्हणाली, ''आत्मचरित्र लिहितेय.''

''तू आणि आत्मचरित्र? असं एवढं काय तुझं आयुष्य आहे? रेव्हेन्यू स्टॅम्प एवढा कागद सुद्धा तुझं आत्मचरित्र लिहायला पुरेसा आहे.'' - इति खुशवंतसिंग.

दोघांचा संवाद तिथेच संपला, पण अमृताला आपल्या आत्मचरित्राला नाव काय द्यायचे हे सापडले. तिने नाव दिले, -'रसीदी टिकट' त्याबाबत तिने म्हटलं आहे, ''एरव्ही सगळ्या स्टॅम्पस्चे आकार बदलतात पण रेव्हेन्यू स्टॅम्प म्हणजे 'रसीदी टिकट'चा आकार कायम एकच असतो. तो बदलत नाही. आयुष्याच्या हिशोबाला ही स्टॅम्पची मोहोर लावून मी सत्यता जपली आहे.''

अपेक्षेप्रमाणे 'रसीदी टिकट' प्रचंड गाजले. त्यातील स्त्री-पुरुष संबंधाबाबत, तिने हयात असलेल्या व्यक्तींबाबत लिहिताना देखील हात आखडता घेतला नाही. भल्याभल्यांचे मुखवटे तिने उतरवले. तरीही तिने याला काही आशिक-माशुकांच्या  थिल्लर प्रकरणांची अवकळा येऊ दिली नाही. हे सत्याचे प्रयोग भल्याभल्यांना







स्वीकारणे अवघड होऊन गेले हेच खरे. विशेष म्हणजे अमृताने हे सगळे लेखन शायराना अंदाजाने लिहिले आहे म्हणून त्याचे महत्त्व. एरव्ही ज्यांनी ढुंकूनही पुस्तक हातात घेतले नसेल त्यांनी, 'यात आहे तरी काय? या उत्सुकतेने हे पुस्तक वाचले, या संबंधात तिची भेट झाली असता मी विचारता ती म्हणाली, ''तुमचे म्हणणे खरे आहे. जे मला माझ्या साहित्यातून सांगायचे होते ते सामान्य वाचकांपर्यंत कधी पोहोचलेच नाही. चलो, इस बहाने, मेरी कहानी लोगोंतक पहुँची, ये क्या कम उपलब्धी है?''

अमृताला समजून घ्यायचे असेल तर 'रसीदी टिकट'ला पर्याय नाही.

अमृताला समजून घेण्याकरता असंच एक पुस्तक आहे 'अमृता के प्रेमपत्र' हे संपादित केले आहे, इमरोजने!

अमृता-इमरोज एकमेकांना भेटले १९५६ च्या सुमारास..! १९५७ ते १९५९ या वर्षांत ही कहाणी उमलू लागली. सगळ्याच प्रेमकहाण्यांमध्ये प्रेमिकांना विरह सहन होत नाही. ती उणीव, तो आवेग ही माणसे पत्रातून व्यक्त करू पाहातात. इमरोज मुंबईला गेला असताना काम वाढल्याने, त्याचा मुक्काम वाढला. तेव्हा अमृताचे पत्र आहे -

गाडी मे सीट ना मिले तो हवाई जहाज मे सीट लेना। पैसों का खयाल न करना। जो ज्यादा लगे वो पैसे मेरे जिम्मे। मुझे विरहाके गीतोंसे प्यार नही, मिलन की उस मंजिल से प्यार है, जिसकी कठीन राह को काटने के लिये मैने विरहा के गीत लिखे। मुझे शोहरत प्यारी नही, जो विरहा के गीतों से मिली है। मैं जिंदगी के उस जलवे का इंतजार करती हूँ, जो मेरी मंजिल मुझे दिखायेगी। आओ, और मुझसे अपनी दिवानगी को नाप लो ! मुझे लगता है, जैसे साहीर की मुहब्बत के चौदह साल भी तुम तक पहुँचने की एक राह थे......।

अमृता प्रीतमने १९६१ मध्ये स्वत:चे घर बांधले आणि १९६३ पासून अमृता आणि इमरोज यांनी एकत्रित राहाण्याचा निर्णय घेतला. आणि तो शेवटपर्यंत निभावला, पण कधीतरी काहीतरी कारणाने, तू तिथे तर मी, इथे अशी अवस्था होई, त्यावेळी दोघेही एकमेकांना पत्रे लिहून ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करत. विशेषत: अमृताला परदेशात लेखक म्हणून आमत्रंण मिळे, त्याकाळात या पत्रलेखनाच्या असोशीबद्दल, अमृताने म्हटले आहे, ''इस बार लगता है, केवल तुम्हे खत लिखने के लिये ही मै यहाँ आयी हूँ।''

अमृताची ही पत्रअसोशी वेळोवेळी दिसलेली आहे. एका पत्रात तिने म्हटले आहे- ''वे मुझे वहाँ भी बुलाते है, और यहाँ भी ठहराते है।'' लेखनातील ही कोवळीक आणि शायराना अंदाज विलक्षणच म्हणायला हवा.

या दोन्ही प्रेमिकांनी एकमेकांना वेगवेगळ्या नावांनी संबोधले आहे. इमरोजने 'जोरबा द ग्रीक' वाचले, तेव्हा त्याने अमृताचे नाव जोरबा ठेवले. 'स्पॅनिश कलाकार गोया'च्या आयुष्यावरची कादंबरी 'द नेकेड माजा' वाचल्यावर इमरोजने अमृताला नाव दिले 'माजा'. याचीही एक गंमत आहे. इमरोज म्हणतो, ''बादमे मुझे पता लगा की मराठी मे माजा का अर्थ मेरा होता है. शायद इस लिये यह बहुत अपना-अपना लगा है।''

इमरोजच्या मुंबई मुक्कामात मराठी शब्द 'माझा' त्याच्या कानावरून गेला असणार, तो हा संदर्भ असणार.

हा पत्रसंग्रह इमरोजने प्रकाशित करायचे ठरविले. तो तसाच प्रकाशित होऊ शकला असता, पण अमृता त्याला म्हणाली, ''हे पाहा इमरोज, ही अपूर्ण माहिती झाली. जर्मनीचा विख्यात लेखक फ्रांझ काफ्काची प्रेयसी मिलेना, नाझींच्या क्रूर यातनाकांडात मारली गेली. काफ्काच्या या प्रेयसीवर लिहिलेल्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिताना आर्थर कोस्लर म्हणतो, ''काफ्काची पत्रे मिळाली पण मिलेनाच्या पत्राखेरीज काफ्काचे पोर्ट्रेट अपूर्ण राहिले आहे कारण तो मिलेनाच्या पत्रांना माझ्या तप्त मस्तकावर पडलेले पावसाचे थेंब म्हणायचा आणि हेच पावसाचे थेंब उपलब्ध नाहीत.'' सुदैवाने मला लिहिलेली तुझी पत्रे गहाळ झाली नाहीत. ती पत्रे देखील तू संपादित केलेल्या या पुस्तकाचा महत्वाचा अंश आहेत. ही सारी तुला लिहिलेली पत्रे तुला पुस्तकासाठी म्हणून उधार द्यायला तयार आहे.अमृताच्या या निर्णयामुळेच 'अमृता के प्रेमपत्र' याला दुसरी बाजू देखील आली आहे. आणि हेच या पुस्तकाचे वेगळेपण आहे.. या प्रसंगी, सुनिता देशपांडे यांना जी.ए. कुलकर्णी यांच्याकडून जी पत्रे आली अशा पत्रांचा संग्रह 'जी.ए. यांची निवडक पत्रे -खंड एक' प्रकाशित झाला आहे याची आठवण होते. मात्र सुनिताबाईनी जी.एं.ना लिहिलेल्या पत्रांसाठी प्रिय जी.ए. हे स्वतंत्र पुस्तक पाहायला लागते!

एकूण अमृता काय, साहीर काय, आणि इमरोज सुद्धा... ही जगावेगळी माणसे! त्यांच्याबद्दलच्या कहाण्या नकळतपणे त्यांच्या पत्रातून येतात हे आश्चर्यच!

या पुस्तकाला खुशवंतसिंग यांची प्रस्तावना आहे. त्यांनी म्हटले आहे, ''इमरोजने अमृता को जिंदा रख्खा है। इससे ज्यादा एक औरत अपने प्रेमीसे क्या अपेक्षा कर सकती है?''

खुशवंतसिंग यांच्या या दोन ओळीत सर्व काही आलेले आहे.

कालगतीप्रमाणे अमृताचा मृत्यू ३१ ऑक्टोबर २००५ रोजी झाला. आज इमरोज जवळजवळ ९६ वर्षांचा असून दिल्लीत सुखेनैव जगत आहे. आपल्या चित्रकारीबरोबरच अमृताच्या संगतीत त्यालाही कविता सुचू लागल्या. आता त्याचा पण कविता संग्रह प्रकाशित झाला आहे. अमृताबाबत तो म्हणतो-

हर कोई कह रहा है  
की वह नही रही  
मैं कहता हूँ  
वह है  
कोई सबूत?  
मैं हूँ...  
अगर वह न होती  
तो मैं भी ना होता।

सच्चे प्रेमिक म्हणजे 'दो जिस्म-एक जान' असं म्हणतात ते खरंच म्हणावे का?...

(हा लेख लिहिताना अजित पाटणकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले आहे. त्याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद)

**- रविप्रकाश कुलकर्णी**  
भ्रमणध्वनी: ९२२४८७२८७०

# कीर्तिमान दोनशे वर्षे

संजीवनी खेर

**कादंबरीकार आणि कवयित्री एमिली ब्रॉन्टे हिचे हे द्विजन्मशताब्दी वर्ष! तिच्या बहिणींसह तिच्या भावविश्वाचा संजीवनी खेर यांनी घेतलेला हा वेध, स्त्रीमनाचे नाजूक धागेदोरे उसवत जातो...**

एकच कादंबरी लिहून दोनशे वर्षे इंग्रजी साहित्यात चमकत राहण्याचं भाग्य एमिली ब्रॉन्टे ह्या लेखिकेला लाभले. आज देखील इंग्रजीतील अव्वल दर्जाची कादंबरी म्हणून 'वुदरिंग हाइट्स'चा उल्लेख होत असतो. असं भाग्य क्वचितच कुठल्या कादंबरीला लाभलं असेल. १८४८ साली तिची ही एकमेव पण अद्वितीय कादंबरी प्रकाशित झाली, तीही टोपण नावाने. अशी कादंबरी ज्यात हिंसा, क्रौर्य नि भावनिक तीव्रता आहे, ती एखाद्या स्त्रीने लिहिली असेल ह्यावर वाचकांचा विश्वास नसता. 'एलिस बेल' ह्या नावाने ती प्रसिद्ध झाली. त्याअगोदरच स्वत:च्या खर्चाने तिघी कवयित्री बहिणींच्या टोपण नावांनीच कवितांचे एक पुस्तक प्रकाशित झाले होते. 'वुदरिंग हाइटस'ची लोकप्रियता अनुभवण्याइतके आयुष्य लेखिकेला लाभले नाही. तिचा जीवनसंघर्ष म्हणजे एक शोकांतिकाच आहे. नियतीचा हा अजब खेळ म्हणावा लागेल.

३० जुलै १८१८ रोजी एका गरीब कुटुंबात एमिलीचा जन्म झाला. आजूबाजूचे वातावरण हे मनाला हिरमुसलं करणारं होतं. वडील एका आडगावात धर्मोपदेशकाचं काम करीत होते. सहा भावंडातील  ही चौथी. घरचे वातावरण कडक शिस्तीचे. वडिलांना आपण आवडत नाही असा न्यूनगंड एमिलीला



बालपणापासूनच होता. तिचे सारे आयुष्यच ह्या न्यूनगंडाने ग्रासलेले होते, पण तिला आणि तिच्या दोन बहिणी, शार्लट आणि ॲनी यांना वाचनाचा छंद होता आणि तोच त्यांना ह्या वातावरणात तारणारा ठरला. त्यांनी आपल्या मनातील भावनांना लेखणीचा आधार दिला. अनुत्साही घरात तोच त्यांचा आनंदाचा

झरा होता. कुठल्याही स्थितीत लेखनाचा उत्साह कमी होऊ दिला नाही.

आईवडिलांचे आयुष्यही गरिबीशी झगडाण्यातच संपले. वडिलांचे शिक्षण जेमतेमच झालेले! कसेबसे त्यांनी धर्मोपदेशक होण्याकरिता आवश्यक शिक्षण पुरं केलं नि हेवर्थ गावी व्हिकार म्हणून त्यांची नेमणूक झाली. पैसे कमी असले तरी राहायला जागा, नियमित आवक होऊ लागली. त्याची पत्नी मारिया कष्टापेक्षा वारंवार होणाऱ्या बाळंतपणाने जेरीला येत होती. घर मिळाल्याने निदान थंडीपासून निवारा होता. ह्या जोडप्याला पाच मुली आणि एक मुलगा झाला. हे सारे वाचताना ह्या शतकात आपल्याकडेही सामान्यांची हीच स्थिती होती हे लक्षात येईल, शिक्षित जोडप्यांना कमाईची साधनं, वाव कमी, कधी एकत्र कुटुंबात कशीबशी गुजराण हीच अवस्था होती. गरिबीइतकीच तेथील थंडीही घायाळ करीत होती. संततीनियमनाची सोय नव्हती, त्यामुळे निसर्ग देईल ते स्वीकारण्याला पर्याय नव्हता. अशा परिस्थितीत हे कुटुंब सन्मानाने जगत होतं.


मुलींना शाळेत पाठवणं अवघड होतं. आईची स्थिती, घरची अनंत कामं, काटकसरीचा संसार ह्यात लहान भावंडांना सांभाळत, स्वयंपाकपाणी, धुणीभांडी ही कामं करत ह्या तिघीजणी एकमेकींना धीर देत होत्या. आजारपणाने दोन बहिणींचा नि आईचा मृत्यू झाला आजारपण, मरण ह्यांनी जणू घराला घेरलं होतं. अशा असहाय्य करणाऱ्या वातावरणातही ह्या मुलींमधील प्रतिभा फुलत होती. शार्लट, ॲनी आणि एमिली वेळ मिळाला की वहीत काही बाही लिहून मन हलकं करीत असत. वडिलांनी चर्चच्या सेवकांच्या मुलांसाठी असलेल्या शाळेत मुलांना पाठवायला सुरुवात केली, पण तेथील वसतिगृह आणि व्यवस्था मुलींना मानवली नाही. मारिया अणि एलिझाबेथ दोघी आजारी पडून परत आल्या. त्यातच त्या गेल्या. त्यामुळे मग इतरांच्या शाळेवरही गदा आली. मग घरीच वडील शिकवत नंतर मावशीने शिकवले. शार्लटला बाहेर जाऊन फ्रेंच व दुसऱ्या भाषा शिकून स्वत:ला सबळ करायचं होतं नोकरीसाठी काही  शैक्षणिक कौशल्य हवे म्हणून ती धडपडत होती.

घर कर्त्या स्त्रीशिवाय चालणं अवघडच पण इतक्या गरीब नि मुलांची जबाबदारी असलेल्या माणसाशी लग्न तरी कोण करणार? अखेर मुलांची मावशी एलिझाबेथ ब्रानवेल त्यांच्या मदतीला आली. तिने मुलींना लिहायला, वाचायला, शिवणटिपण शिकवले. मुलींना थोडी सवड मिळू लागली. एमिली तर केवळ सहा वर्षांची होती. एमिली मुळातच खूप अबोल होती. तिला शाळा म्हणजे बंदिवास वाटे. मुक्तपणे माळरानावर भटकावे, प्राण्यांशी मैत्री करावी, त्यांचे मूक साहचर्य तिला आवडे. तिने कुत्रा, मांजर, बदकं पाळली होती. अनाथ प्राण्यांची देखभाल करणं तिला आवडे. तिला मोकळ्या हवेत, झाडांच्या छायेत खूप कविता सुचत असत. मन प्रसन्न होई. त्यात तिचा कुत्रा तिची सोबत करायला सज्ज असे. मांजर तर ती कधी घरी येते नि आपल्याला कुरवाळते याची वाटच पाहत असे. वडिलांना मांसाहार पसंत नव्हता त्यामुळे घरात फक्त बटाटे व इतर धान्ये असत. त्यांच्या त्या हवेतल्या कुपोषणाला हा आहार सुद्धा कारणीभूत होता. त्यातून चर्चमधला माणूस म्हणजे वागण्या–बोलण्यावरही शिष्टाचाराची बंधने होतीच. त्यामुळे मुलांच्या मनावर सतत दडपण असे. वडिलांना आपण आवडत नाही असा एमिलीचा समज असला तरी एकाबाबत वडिलांना तिची मदत लागे, ती म्हणजे पिस्तुल शूटींगसाठी. त्यावेळी भोवताली बंडखोरांचा उपद्रव माजला होता. त्यांना घाबरवण्यासाठी चर्चच्या मनोऱ्यावरून ते पिस्तुलाचे बार काढत. ते करायला त्यांनी एमिलीला हाताशी घेतलं होतं. तिचा नेम पक्का होता. तिने तसा सराव करावा म्हणून तिला ते उत्तेजन देत. तो तिला दिलासा होता.

शार्लट कविमनाची होती. तिने एक कादंबरीही लिहिली, (जेन आयर) जी एमिलीवरच होती. ॲनी देखील कविता करीत असे. तिघींना वाटले आपल्या कविता प्रसिद्ध व्हाव्यात. मग त्यांनी एक प्रकाशक गाठला. पुस्तकाचा खर्च आपणच करायचे मान्य करून तीनशे प्रती काढायच्या ठरल्या. त्यात प्रत्येकीच्या २५–३० कविता त्यात होत्या. एमिली आपल्यात सर्वात अधिक प्रतिभावान आहे ह्याची जाणीव दुसऱ्या दोघींना होती. शार्लट ही बडबडी नि धडपडी होती. मुलींनी लिहिलेल्या कविता तेव्हाच्या शिक्षित समाजाने स्वीकारल्या असत्याच असे नाही, म्हणून क्युरर, एलीस आणि ॲक्शन बेल अशा नावाने ह्या तिघींच्या ६१ कविता प्रसिद्ध झाल्या (१८४६). घरचं वातावरण मनावर ताण आणणारं, निराशेनं घेरून टाकणारं नि दु:खाने काळवंडलेलं होतं, पण त्यातही ही तरुण मनं निसर्गाचं चित्रण करण्यात, काल्पनिक प्रणयचित्रण करण्यात रमत होत्या. तिघींना खास करून एमिलीला वाचनाची प्रचंड ओढ नि आवड होती. त्यामुळे ती दोन–चार मैलांवर असलेल्या वाचनालयातून पुस्तकं आणून वाचनात गुंग झालेली असे.

त्यांचा एकुलता एक भाऊ खूप गुणी होता पण अतिलाडाने तो बिघडू लागला. त्या काळात तो जिथे काम करीत होता, ते सोडावं लागलं. त्यातच त्याचा प्रेमभंग झाला. मग तर तो स्वत:तच दंग राहू लागला.त्यालाही वाचनाची नि चित्रं काढण्यात रुची होती. त्याने आपल्या तिघी बहिणींचे पेंटींग केले होते. तेच आज सर्वत्र वापरले जाते. तेव्हा होतकरू तरुणांना शिक्षकीचा व्यवसाय सोयीचा असे. बाकी काही वावच नव्हता. मुली धडपड्या असल्याने दुसरीकडे जाऊन इतर भाषा शिकून नोकरी करू लागल्या. एमिलीही ब्रुसेल्सला शिकण्यासाठी राहिली होती, पण असं बंदिवान होऊन राहणं तिला भावेना. तिच्या  हेगर ह्या शिक्षकांना तिच्याकडून खूप अपेक्षा होत्या, कौतुकही होतं. त्यांनी तसं लिहूनही ठेवलं होतं. त्यांच्यावर शार्लटचा जीव जडला होता पण ते प्रेम सफल झाले नाही. या पोरींच्या आयुष्यात रोमान्स, विवाह, सुस्थिर आयुष्यच नव्हतं, ही शोकांतिकाच होती.

एमिली पहिल्यापासूनच एकांतप्रेमी होती. आपल्याच कल्पना विश्वात ती रमलेली असे. घरीच शांत नि परिचित परिसरातच लेखन वाचन करायला तिला हवेहवेसे वाटत होते. घरी किती




शांतता मिळाली असेल हे शंकास्पदच आहे कारण घरी आली तरी घरची कामं करण्यात तिचे तास न् तास जात. त्यांचं गाव तसं आडमार्गावरच होतं. त्यामुळे काहीही हवं असलं तरी दूरवर गेल्याखेरीज दुष्प्राप्यच असे. साधी पुस्तकं वाचायला हवी, तरी दोन-तीन मैल पायपीट करावी लागे. जवळपास फारशी वस्ती नाही. कुणी मित्रमैत्रिणी नाहीत नि तिचा स्वत:चा स्वभावही एकलकोंडा नि चेहऱ्यावर एक निराश उदासी! लहान वयातच गरिबी, मृत्यू यांचे धक्के सोसावे लागल्याने नको इतकी प्रौढ झालेली ही तरुणी. जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दबलेली, उत्साह असे तो फक्त पुस्तकांच्या सहवासात. प्रचंड थंड हवामान, अपुरी वस्त्रे, कुपोषण यामुळे घरातील सर्वांनाच क्षयाने ग्रासले होते. एमिलीला कफाचा नि फुफ्फुसाचा विकार जडला होता. हे सारे तिच्याबद्दल लिहिताना गरजेचं कारण अशा परिस्थितीत जेव्हा मुलांनी कमाई करून घराला हातभार लावावा अशी स्थिती होती. तेव्हा आजारांनी तरुण मुलींना धरलं होतं. त्यातून तिघीही प्रतिभावान होत्या, त्यातील शार्लटने आपले भाषांचे शिक्षण करून नोकरी सुरू केली. एमिलीने पण काही काळ शिक्षिकेचं काम केलं. मुलांच्या हातात कला होती. भाऊ उत्तम चित्रं काढी, पोर्ट्रेट्स काढी, पण एक तर बहिणीच्या अतिलाडाने तो एककल्ली होत गेला नि प्रेमभंगाने पार खचला. एमिली ही न्यूनगंडाने ग्रस्त होत गेली. आपल्यातील प्रतिभा तिच्याहून तिच्या बहिणीने अधिक ओळखली होती. आपण काही करू शकत नाही. मुलांपेक्षा आपण कमी आहोत (तेव्हा तसा समज होताच) ह्या भावनेने स्वत: लिहिलेले ती कुणाला दाखवत नसे. एमिलीला चित्रकलेचे अंग होते. तिने काढलेली निसर्गचित्रे, प्राण्यांची चित्रे संग्रहालयात जतन केलेली आहेत. तिच्या कलासक्त स्वभावात संगीताचे अंग होते. घरात एक जुना पियानो आणला गेला तेव्हा तिने त्या काळातील श्रेष्ठ संगीतकारांच्या संगीताचा सराव त्यावर केला. वाचन केले तेही श्रेष्ठ साहित्यिकांच्या कृतीचे. हे शहाणपण तिनं कुठून आत्मसात केलं तिचं तिलाच ठाऊक!

काल्पनिक जगात रमायचेच त्यांचे खरंतर वय होतं, पण भोवताल फार क्रूर होता. त्यातच एमिलीने 'गोंडाल' ह्या काल्पनिक बेटावरील स्त्रीप्रधान जीवनाचं चित्रण करणाऱ्या कविता लिहिल्या. ॲनीनेही त्यात कविता लिहिल्या. त्यात कुटुंबाचे परस्पर हेवेदावे आहेत, संघर्ष आहे. नायक-नायिका प्रेमविव्हल आहेत पण वेळ येते तेव्हा कडवटपणे, क्रूरपणेही वागताना दाखवल्या आहेत. नायक नायिकांच्या जीवनात साहजिकच तिचीही दु:खे, वेदना प्रतिबिंबित झाल्या आहेत. ते वाचून जणू आजूबाजूचे त्रास, एकाकीपण तिला स्पर्शच करीत नव्हते की काय असे वाटते. ती शब्दांच्या सहवासात रमत असे. शब्दांचे खेळ तिला नि तिच्या भावंडांना जादूची किल्लीच मिळाल्यासारखे होते. तिच्या वयाच्या मानाने खूप प्रौढ, गंभीर, अध्यात्म, परलोक वगैरे बाबतीत लेखन आहे.

'वुदरिंग हाइट्स' ही प्रेम नि सूड यांनी भरलेली कहाणी आहे. तिची भाषा, वर्णन शैली वाचली नि ज्या प्रकारे त्या कादंबरीचा पट रचला आहे तो वाचला की वाचक थक्क होतो. हॅथक्लिफ हा अनाथ मुलगा एका धनाढ्यांच्या घरात दत्तक असावा असा स्वीकारला जातो. 'वुदरिंग हाइट्स' हे ओसाडशा माळरानावरचे एक फार्म हाऊस तिथे अनेक गूढ घटना घडतात. हॅथक्लीफचे प्रेम घरातल्या तरुणीवर बसते. तीही त्याच्यावर भाळलेली असते, पण ऐनवेळी ती दुसऱ्याशीच लग्न करायचे ठरवते. हा पळून जातो नि काही काळानंतर श्रीमंत, ऐटबाज गृहस्थ बनून परत येतो. एकेकाचा सूड घेतो. पुढे काय होते? नेटवर कादंबरी उपलब्ध आहे. अत्यंत रंजक अशा ह्या कादंबरीने इतिहास निर्मिला आहे, पण ह्या कुटुंबाला त्याचा निर्भेळ आनंद घेता आला नाही कारण कादंबरी १८४८ मध्ये प्रसिद्ध झाली नि एमिलीचा भाऊ वारला नि त्यानंतर तिची प्रकृतीही गंभीर बनली. आपल्या लेखनाचे कौतुक अनुभवायला ती ह्या जगात राहिली नाही (१८१८ -१८४८) पण तिचे शब्द आजही वाङ्मयात अजरामर झाले आहेत.

No coward soul is mine
No trembler in the world's storm-troubled sphere
I see Heaven's glories shine
And Faith shines equal arming me from Fear

**– संजीवनी खेर**
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२
sanjeevanikher@gmail.com

अरुणोदय

# आठवणीतले 'स्नेहल' स्वर

**बाबूजी, गदिमा आणि पुल यांच्या जन्मशताब्दीचा आवर्जून सर्वत्र उल्लेख होत असताना संगीतकार स्नेहल भाटकर हे नाव कळत-नकळत अस्फुट राहिले. 'कभी तनहाईयों में यूँ हमारी याद आएगी' हे त्यांनी स्वरबद्ध केलेले प्रसिद्ध गीत. या गीतातील पहिल्या ओळीतले विधान जणू प्रश्नचिन्ह बनून रसिकांना विचारते आहे, ''कभी तनहाईयोंमें यूँ हमारी याद आएगी?'' वासुदेव (स्नेहल) भाटकर यांच्या संगीतमय कामगिरीचे हे ठळक व काहीसे अज्ञात पैलू.**

हिंदी-मराठी सुमारे चाळीस चित्रपट, बारा मराठी नाटके, एक महाकाव्य गायन, एक गझल-गायन कार्यक्रम आणि सुमारे बारा हजार भजन मैफिली एवढे कार्य स्नेहल भाटकर यांच्या गाठीला आहे. सुमारे सत्तर वर्षे ते या क्षेत्रात कार्यरत राहिले.

ऋजू स्वभाव असला तरी तत्त्वासाठी बंडखोरी हाही त्यांच्या स्वभावाचाच भाग होता. वारकरी मंडळी रामदासांचे अभंग आपल्या भजनांत गात नसत. अशा वेळी प्रचंड विरोध सोसून आणि धमक्यांचे पर्वा न करता त्यांनी ''आम्ही काय कुणाचे खातो। रे तो राम आम्हाला देतो'' हा अभंग त्यांनी गायला आणि वारकरी भजनाचा मार्ग रामदासांसाठी प्रशस्त झाला.

रामायण विडंबनाच्या त्यांच्या ध्वनिमुद्रिकांवर संस्कृति-संरक्षकांनी बंदी जाहीर केली होती, पण भाटकरांच्या लोकप्रियतेपुढे बंदी हरली.

मुंबईत 'जागतिक युकॅरिस्टिक काँग्रेस' भरली होती. तेव्हा त्या मेळाव्यात ख्रिस्तभजने गाण्यासाठी भाटकरांना सन्मानाने पाचारण करण्यात आले होते.

बॉम्बे सिंफनी ऑर्केस्ट्राचे कंडक्टर मेहली मेहता यांच्याबरोबर भाटकरांनी भारतातले पहिले फ्युजन केले होते. न्यूयॉर्क फिलहार्मोनिक ऑर्केस्ट्राचे झुबिन मेहता हे मेहली यांचे चिरंजीव. संगीतकार-गायक या ओळखीशिवाय हार्मोनियम ऑर्गन आणि पियानो या वाद्यांवर त्यांनी प्रभुत्व प्राप्त केले.

'उषास्वप्न' हा मराठीतला पहिला ऑपेरा भाटकरांनी केला, पण ऑपेरा चालू असताना मुंबईच्या गोदीत स्फोट झाले आणि ऑपेरा संपता-संपता बंद घडला. त्याचा दुसरा प्रयोग नंतर कधीच झाला नाही.


महाराष्ट्र सरकारने 'सेंट्स ऑफ महाराष्ट्र' ही डॉक्युमेंटरी केली होती. तिच्यात बत्तीस गाणी होती. स्नेहल भाटकरांनी स्वत:च्या वाट्याची सत्तावीस आणि सुमन कल्याणपूरांची पाच गाणी एकाच दिवसात ध्वनिमुद्रित केली.

सिनेमाक्षेत्रात अत्यंत लक्षणीय गोष्टी त्यांच्याकडून घडल्या.

संगीतकार रोशन यांना त्यांचा पहिला चित्रपट 'नेकी और बदी' भाटकरांनीच दिला. तो न चालल्यामुळे पुढचा 'बावरे नैन'ही दिला आणि रोशन लोकप्रिय झाले.

महेंद्र कपूर आणि गीता दत्त यांची पहिली ध्वनिमुद्रणे भाटकरांकडे झाली, पण महेंद्र कपूर हे नाकारत राहिले कारण एका स्पर्धेत त्यांना नवोदित गायक म्हणून उतरायचे होते. (ही स्पर्धा त्यांनी जिंकली आणि लपवाछपवीला यश आलं.)

राज खोसला आणि मदनमोहन सिनेसृष्टीत गायक म्हणून




आले आणि त्याची पहिली ध्वनिमुद्रणे भाटकरांनी केली.

नायक राज कपूर यांना पहिला उसना आवाज स्नेहल भाटकरांनी दिला.

विष्णुपंत पागनीसांचा 'संत तुकाराम' हिंदीत करताना हिंदी गाणी भाटकरांनी गायिली. 'आदि बीजे एक रे, बीज अंकुरके रोप बढ गए' अशी ती गाणी होती.

दाक्षिणात्त्य गायिका विदुषी सुब्बलक्ष्मी यांचे पहिले हिंदुस्तानी संगीतगुरू स्नेहल भाटकर. सुरुवातीला त्या मीरा भजने भाटकरांकडेच शिकल्या, पण 'मीरा' हा चित्रपट भाटकरांना मिळाला नाही. तरीही प्रचंड हट्ट करून सुब्बलक्ष्मी यांनी भाटकरांचेच गाणे चित्रपटात ठेवून घेतले. हे गाणे म्हणजे 'पग घुंगरू बांध मीरा नाची रे.'

अभिनेत्री नूतनला सहा महिने तालीम देऊन तिला यशस्वी गायिका म्हणून त्यांनी उभे केले. (गाणे : ए मेरे हमसफर) स्वत:च्या संगीताखेरीज हिंदीत त्यांनी अनिल विश्वास, सी. रामचंद्र, भरत व्यास आणि के. दत्ता यांच्या निर्देशनाखालीही गायिलेले आहे.

वासुदेव (भाटकर)-सुधीर (फडके) ही मराठीतील पहिली संगीतकार जोडी. (चित्रपट-रुक्मिणी स्वयंवर). मात्र भाटकरांचा हिंदी चित्रपटसृष्टीतला गायक-संगीतकार म्हणून प्रवेश १९४३-४४ साली आलेल्या 'कालिया' चित्रपटामधूनच झाला होता. केदार शर्मा कोलकात्याहून मुंबईला येताना हा तयार चित्रपट घेऊन आले होते. यातली गाणी दोन-दोन मिनिटांची होती. ती तीन मिनिटांची करण्याचे काम त्यांनी भाटकरांकडे सोपवले. मात्र हे करताना त्यांनी दोन नवी गाणी वाढवली. 'कालिया'चे संगीत आणि गायन भाटकरांचे होते.

'बाप माझा ब्रह्मचारी', 'बावरे नैन' आणि 'चिमुकला पाहुणा' या तीन चित्रपटांत त्यांचे दर्शन घडले होते.

शास्त्रीय संगीतातल्या गायकांबरोबर त्यांचे घनिष्ट मैत्र होते. सुब्बलक्ष्मींचा उल्लेख वर झालेलाच आहे.

पंडिता केसरबाई केरकर यांची जी एक ध्वनिमुद्रिका अंतराळात जतन केलेली आहे, तिच्यासाठी हार्मोनियम वादन स्नेहल भाटकरांनी केलेले आहे.

पं. मल्लिकार्जुन मन्सूर आणि पं. मोगूबाई कुर्डीकर यांनी भाटकरांकडे 'लाईट म्युझिक' गायलेले आहे.

उस्ताद हफीज हुसेन खां यांनी भाटकरांच्या मैत्रीखातर राजा बढे यांचे 'आला चांदण्यांचा ग थवा माझ्या पारिजातकापरी' हे मराठी गीत गायले आहे.

उस्ताद निसार हुसेन खां साहेबांना भाटकरांची हार्मोनियम साथ आवडत असे.

हिंदी आणि मराठी चित्रपटांखेरीज काही मराठी नाटकांना त्यांनी दिलेले संगीत अजरामर आहे. ('लिलाव' या नाटकात पं. प्रभा अत्रे नायिका होत्या.)

स्नेहल भाटकर संत तुकारामांची भूमिका करायला तयार नसल्यामुळे आचार्य अत्रे यांनी 'तुकाराम' हे नाटक कधीच लिहिले नाही.

'शिवायन' या महाकाव्याचे गायन भाटकर करत होते. या संपूर्ण महाकाव्याच्या अठ्ठावीस हजार ओळी 'चंद्रकांता' या एकाच वृत्तात आहेत. त्यांनी त्यातल्या सातशे ओळी स्वरबद्ध केल्या होत्या.

सुरेश भटांच्या मैत्रीसाठी ते काही काळ मराठी गझल गायन करत होते.

फडकती लावणी (तुला बघून) आणि अध्यात्मिक लावणी (कसे कसे बाई) हा फरक त्यांनी ठसठशीतपणे दाखवला आहे.

एक महान भजनी कलावंत 'कभी तनहाइयों में यूँ हमारी याद आएगी' या चित्रपटीय गाण्यामुळे जगासाठी ओळख बनून राहिला.

कित्येक गरिबांचे संसार त्यांनी उभे करून दिले हे त्यांचे मोठेपण!

**– अरुणोदय**

भ्रमणध्वनी : ९८१९१५४४११

# व्यक्ती आणि वल्ली ..आजच्या काळात

- विवेक मेहेत्रे




*काय? तुला शरयू ठाऊक नाही?
श्यामा चित्रे, लिली पेंडसे माहीत नाहीत?
शांता गोळे आठवत नाही? बाबा रे....थांब!
तुला व्हॉटसॲपवरच्या 'चमन-ए-बहार शबनम'
ह्या ग्रुपमधून रिमुव्हच करून टाकतो!*




*सायेब...वेगवेगळ्या ष्टेपन्यांबरोबर
सेल्फी काढून फेसबुकवर टाकायचे
म्हंजे माझ्या अंगाला बराबर येणारी
गिऱ्हायकाचीच कापडं घालावी लागतात !*




*पुराव्यानं शाबीत करीन!
महाराजांच्या, तुकाराम-रामदासांच्या काळात
मुलंच काय पण कल्याणच्या सुभेदाराची
सूनसुद्धा कॅल्क्युलेटर किंवा मोबाईलमध्ये
न बघता गुणाकार भागाकार करायची...
मी पाहिलंय स्वतः!!*


रात्रीचा दिवस करून मी सरांनी सांगितलेली सगळी ई-बुक्स टॉरेंटवरून डाऊनलोड करून वाचतो. पण रोज रात्री साहित्याशी एकनिष्ठ राहण्याचे माझे जीवनध्येय वडिलांना कळत नाही... त्यांनी शादी डॉट कॉमवरून माझं लग्न ठरवलंय हो!
Kindle
सखाराम गटणे
परोपकारी गंपू
गंपू इव्हेन्टस
बारसं ते श्राद्ध
PARTY
बापाची एकसष्टी असो की सासूची प्रेतयात्रा ... थिस इज व्हॉट आय फिल की बुवा वुई मस्ट सेलिब्रेट इट ॲज ए ग्रॅन्ड इव्हेन्ट!
अ मंगल कार्यालय
BANDU WEDS CHINTU
हे 'असले' विवाह हल्ली होऊ लागलेयत.... दोन्ही बाजूला वर पक्षच! ' नारायण ही काय संस्था आहे' हे काय डोंबल कळणार ह्यांना?
नारायण
पुलं जर आज असते तर त्यांनी दिवसातून सात-आठ वेळा तरी ट्वीट आणि चार-पाच वेळा व्हॉटसॲपवरून ताजे विनोद ब्रॉडकास्ट केले असते !

**ती** (सोरेल) आमच्या घरात येणार होती आणि एक महत्त्वाची व्यक्ती होणार होती. आमच्या घरात येणे हा निर्णय आमच्यापेक्षा तिचाच असावा असं आता साडेतीन वर्षांनंतर वाटतंय कारण अनेक किंतु होते आणि तिनेच ते दूर केले. ही घटना घडली, यावर विश्वास बसणं आता कठीण होतंय!

मी, माझी बायको शिवरंजनी, मुलगी प्रभा (तेव्हा १२ वर्ष) व आमच्या जवळ राहणारी सासू अर्चना पांडे असं छोटं कुटुंब आणि यात घरी पाळीव प्राणी, कुत्रे पाळण्याचा अनुभव म्हणण्यापेक्षा आठवण असलेला मी एकटाच, म्हणजे मी लहान असताना आमच्या मोठ्या एकत्र कुटुंबात. कुटुंबप्रमुख माझे आय्. ए. एस्. वडील अरुण दत्तात्रेय कुलकर्णी. त्यांच्या ऑफिसमधल्या मित्रांनी आणून दिला एकदा ससा, नंतर डॉबरमन कुत्रा डॅनी आणि शेवटी लॅब्रेडॉर काळा कुत्रा सनी! या सगळ्यांचं खूप काही केलं असं नाही पण एक मात्र समजलं की आपल्याला कुत्रा हा प्राणी आवडतो परंतु परिवाराने कुत्रा असतो घराबाहेर, याच पद्धतीने पाळलेला. पूर्वी बंगलेवजा घर आणि परसात घराचं रक्षण करणारा कुत्रा अशीच कल्पना होती. माझे नाते तयार झाले ते सनीबरोबर, मला १४-१५ वर्षांचा असताना असं कळलं की हा मला वेगळं ओळखतो. त्याला आजार झाला व विष देऊन मुक्ती द्यावी लागली. मला रडल्याचं देखील आठवतंय. या



नितीन अरुण कुलकर्णी

# सोरेल व आम्ही

**चित्रकार आणि कवी नितीन कुलकर्णी यांच्या घरात, आयुष्यात 'सोरेल'ने केवढा मोठा अर्थ भरलाय. तिचे माणसांना समजून घेणे आणि सोबत असणे केवळ शब्दातीत आहे.**



सगळ्यातून एकच वाटले की आपल्याला खरंच जबाबदारी घ्यायची असेल तरच कुत्री पाळावीत. यानंतर कधी अशी वेळ आली नाही. सनीच्या केसचा धसका घेतल्यासारखं झालं होतं. वेळ जवळ आली ती एवढ्यात, चार वर्षांपूर्वी, माझी पन्नाशी जवळ येऊ लागली तशी; आमची एकुलती एक मुलगी प्रभा कसोशीने मागे लागली तेव्हा. 'बाबा, आपण कुत्रा आणायचा का?' माझं आपलं 'हं', दुसऱ्यांदा 'हं-हं', नंतर 'बघू' वगैरे करत हे प्रकरण बरेच महिने टोलवलं. ह्या प्रक्रियेत माझ्या मनात 'नाही'चं 'हो'मधे रूपांतर झालं. खरंतर मलाही घरी हवा होताच कुत्रा! अखेर शेवटी धाडसं करून घरी विषय झाला. अपेक्षेप्रमाणे घरातील स्त्रीवर्गाने आपली नाखुशी दर्शवली. सामान्यपणे मध्यमवर्गात कुत्रा न पाळणाऱ्या लोकांचा जो धोशा असतो तसाच. त्याचे कोण करणार?, फ्लॅटमधे? नॉनव्हेज लागते!! (आपण ब्राह्मण) केस गळतात, इनफेक्शन होतं, शिशूचं काय? वगैरे, वगैरे! माझी व प्रभाची इच्छा प्रबळ होत होती, त्यातच घराजवळील कर्वे कॅनल बऱ्याच वेळा बघितले होते, पण आत जाण्याचं धाडस प्रथमच केले. कर्वेंचे आश्वासक भाष्य आणि मदत करण्याच्या तयारीने जवळपास निश्चिती झाली. अर्थात धागधुगी होतीच. अखेर शेवटी असा तोडगा निघाला की प्रभाच्या सोबतीसाठी तिच्या स्वास्थ्यासाठी का होईना हे केलं पाहिजे. आता वक्तव्यांमधे झालेले बदल. ''तुम्हीच, प्रभानेच त्याचं सर्व करायचं. बाल्कनीतच बांधून ठेवायचे, नॉनव्हेज द्यायचे नाही. आमच्या जवळ आलेलं चालणार नाही! वगैरे वगैरे!''

कर्व्यांच्या कुत्रीला बाळं व्हायला थोडा काळ होता. दरम्यान त्यांनी सर्वच माहिती दिली होती. जवळपास दोन महिन्यांच्या अवधीनंतर त्यांचा फोन आला व आम्ही आपल्या पिल्लाची निवड करायला गेलो, सहा पिल्लांपैकी एकच नर बाकी सर्व माद्या होत्या. तो दिवस आजही आम्हा दोघांच्या लक्षात आहे. प्रभाने मादीची निवड केली. ती पण सगळ्यात छोटी व शांत दुधाळ रंगाची. घरी येऊन नावं शोधण्याचे काम चालू झाले. इटालियनमधे Sorelle (सोरेल्ल) म्हणजे बहिणी. दोघींच्याही नात्याचे नाव म्हणजे तिचे नाव ठरलं. त्या दिवशी आपल्या हातातून हलणारा कापसाचा गोळा आणल्यापासून आमच्या घराची वीणच बदलून गेली आहे. अक्षरश: घराचा ताबाच घेतला आहे तिने अलगदपणे, आम्हाला जाणवू न देता! ती वेगवेगळ्याप्रकारे सोबत करत असते आणि घरातल्या प्रत्येकासाठीचं कस्टमायझेशन वेगळं. प्रत्येकाचा स्वभाव ओळखून त्याप्रमाणे वागणं, ते देखील न शिकवता! हे अगदी अनोखं आहे. आजीला लगट केलेले आवडत नाही, पण जेवणासाठी आजी! मनसोक्त चाटवून फक्त मीच घेऊ शकतो मात्र खाण्याचे लाड माझ्याकडे चालत नाहीत. खेळ, गडबड व खाणे शिवरंजनीच करते व प्रभावर हक्क गाजवता येतो, दुर्लक्षही करून चालतं. हे सर्व तिने स्वत:च आत्मसात केलं. हे करण्यासाठी ती केवळ आतली शक्ती, संवेदना वापरते. हे अगदी आगळंवेगळंच अनुभवायला येतय. आपल्यावर प्रेम न करणाऱ्या माणसाला कसं मोहून घ्यायचं याचं तंत्र तिला चांगलच अवगत आहे.

ती तुम्हाला सहवास देते वेगवेगळ्या प्रकारचा, नुसती सोबत! तुम्ही आंघोळीला गेलात की ही दरवाजा बाहेर. वाचत किंवा जेवायला बसलात की पायाजवळ किंवा खुर्ची खाली. बाहेरगावी जायचं असलं की हिला आधीच कळतं, मग पुढे मागे गोंडा घोळायला लागते. आपण बॅग भरायला लागलो की चेहरा पाडून, डोळे वर करून बघत राहते. शेपटी न हलवता! हीच गत रोज ऑफिसला जातानाची. तिला खूप विनवावं लागतं, मग शेपटीचं टोक थोडंसं हलवते उपकार केल्यासारखं. घरी परत येतानाचीही गत अशीच, आजी सांगते की आमच्यापैकी कुणीही घरी येणार असले की हिला आधीच कळते आणि ही दरवाजाजवळ येऊन बसते, तेही जागरूक पावित्र्यात. ही गोष्ट अद्भुत वाटून बघितले तर असे कळले की जगातले बहुसंख्य पाळीव कुत्रे आपल्या मालकाच्या



आगमनाआधी असेच दरवाजा जवळ येऊन थांबतात. यावर सिद्ध केलेला एक रिसर्च उपलब्ध आहे.

आपण दरवाजा उघडून आत आलो की आपल्याला तिच्या स्वाधीन करण्याखेरीज गत्यंतर नसते. मला तर ती नखशिखांत चाटून काढते, त्याखेरीज सुटतांच येत नाही. प्रत्येकाचे स्वागत ती वेगळ्या प्रकारचे, ज्याला जसे आवडते तसे करते.

तिने आज स्वत:चं व्यक्तिमत्त्व तयार केलंय. घरात, सोसायटीत, रस्त्यावर-परिसरात, आमच्या गाडीत आणि आता प्रभाच्या शाळेतसुद्धा. आय्.बी.च्या अकरावीच्या अभ्यासक्रमात प्रभाने सायकॉलॉजी घेतलं आहे. त्या अंतर्गत ऐच्छिक प्रोजेक्टमधे 'ॲनिमल असिस्टेड थेरपी'चा विषय निवडला होता, त्यासाठी सोरेल शाळेत देखील जाऊन आली. सगळ्यांचे मन मोहून आली. दहावीच्या मुलांचा परीक्षेचा ताण कुत्र्यांच्या मदतीने कमी करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता आणि सोरेलने तो यशस्वीरित्या पार पाडला. काही मुलींची कुत्र्यांची भीतीही तिने घालवली. निव्वळ तिच्या मनस्वी स्वभावामुळे.

सोरेल आयुष्यात आल्यापासून एक प्रकारची संयत जीवन धार वाहत असल्याचा अनुभव येतो. तिने आपल्याला स्वत:च्या आत ठेवलेले असते आणि असे तिने ठेवण्याची जाणीव आपल्याला आपल्या आत जागरूक ठेवते. काहीही न बोलता ती जे आपल्याला सांगत असते. ते सांगणे कालातीत असते. असाच अनुभव आपण रस्त्यावरून ती आपल्याबरोबर चालत असताना येतो, तिचे आपल्याबरोबरचे साहचर्य हाच संवाद असतो, आणि हे जर आपण तिच्याप्रमाणेच समजून घेतले तरच समजते. आपल्या मनाला पूर्ण व्यापून टाकण्याचा अनुभव येतो. हा शिकलेला भाग आपण आपल्या जीवनव्यवहारात वापरू शकतो का? तसाच प्रयत्न करण्याचा प्रयास आहे, परंतु हे करणे अतिशय कठीण आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अडसर ठरणारी आपली वाचा. शब्दांमधे व सतत व्यक्त होण्यामधे आपण खरे अनुभवणेच गमावून बसलोय, व्यक्तिमत्त्वांचा प्रत्यक्ष अनुभवच येणे बंद होतंय आणि हेच बदलायला हवे. मोजकं, हवं तेवढचं बोलणं याने ही प्रक्रिया चालू होऊ शकते. हीच शिकवणी सोरेलची, अमूल्य ठरतेय.

**– नितीन अरुण कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९९२०८०७०९४
nitindrak@gmail.com

**ग्रंथाली**

# सुंदर माझी शाळा
**गणेश घुले**





**मूल्य १०० रुपये**
**सवलतीत ६० रुपये**

अभ्युदय फाउंडेशन प्रस्तुत 'सुंदर माझी शाळा' हा बालकवितांचा सांगीतिक कार्यक्रम आम्ही महाराष्ट्रभर विविध शाळांमध्ये सादर करीत आहोत. बदलत्या काळात विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील दुरावत चाललेला संवाद, शिक्षणाचे होत असलेले बाजारीकरण आणि मराठी शाळांची गुणवत्ता यांवर नेमके भाष्य करणारा हा कार्यक्रम आहे. आजवर या कार्यक्रमाने विविध शाळा व बालसाहित्य संमेलनात रसिकांची मने जिंकली आहेत. विद्यार्थ्यांचे आत्मबळ वाढविणारा बालकवितांचा बहारदार सांगीतिक कार्यक्रम म्हणजे 'सुंदर माझी शाळा!'



आकर्षक व्याजदराने गृहकर्जाचा लाभ घ्या
ज्यामुळे तुम्हाला घेता येईल अधिक मोठे घर
शुभ दिपावली
युनियन होम
• कमी व्याजदर
• 5 दिवसात मंजुरी
• परतफेडीची मुदत 30 वर्षापर्यंत
प्रधानमंत्री
आवास योजना (PMAY)
क्रेडिट लिंकड् सब्सिडी स्कीमच्या अंतर्गत
₹ 2.67 लाख*
पर्यंतचा कमाल अनुदानाचा लाभ मिळवा
*नियम आणि अटी लागू
कर्जासाठी ऑनलाईन अर्जाची सुविधा । दैनिक घटत्या शिलकीवर व्याजआकारणी
गौरवशाली भागीदार
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
हेल्पलाइन नं.: 1800 208 2244 / 1800 22 2244 (टोल फ्री नं.) | 080 2530 0175 (सशुल्क) | +91 80 2530 2510 (एनआरआय साठी)
www.unionbankofindia.co.in | @unionbankofindia @UnionBankTweets UnionBankInsta YouTube UnionBankofIndiaUtube unionbankofindia


न्यू इन्डिया एश्योरन्स
परिवाराकडून सर्वांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
निरंतर उत्कृष्ट सेवेची १०० वर्ष...
100 YEARS
A JOURNEY OF TRUST
www.newindia.co.in | Toll free 1800-209-1415
NEW INDIA ASSURANCE
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd



सोनेरी प्रकाशात पहाट न्हाऊन गेली
उत्कर्षाची उधळण झाली, आली दिवाळी आली
टीजेएस्बी बँक परिवारातर्फे ग्राहकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
tjsbonline
tjsbbank
tjsbbank
tjsb-sahakari-bank-ltd
मुख्य कार्यालय: टीजेएस्बी हाऊस, प्लॉट नं. 5 बी, रोड नं 2, वागळे इस्टेट, ठाणे (प)-400604
टेली.: 022 2587 8500 फॅक्स: 022 2587 8504 ई-मेल: response@tjsb.co.in | www.tjsbbank.co.in

# 'ग्रंथाली' वाचक चळवळ 'शब्द रुची' दिवाळी अंकास हार्दिक शुभेच्छा!



नरेश गणपत म्हस्के
सभागृह नेते
ठाणे महानगरपालिका, ठाणे
शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख

# माझा मोत्झार्ट

शशिकांत सावंत

**शशिकांत सावंत हा पुस्तकांत रमणारा मुक्त अवलिया! मोत्झार्टने त्याला कसं बांधून टाकलं नि मोत्झार्टसाठी शशिकांतसारखा सडाफटिंग माणूस कसा कसा बदलत गेला त्याची ही गोष्ट!**

माझ्या कुत्र्याचं नाव आहे 'मोत्झार्ट'. अपघातानेच तो माझ्या आयुष्यात आला. खरं तर मला कुत्रा अ‍ॅडॉप्ट करायचाच होता. माझ्या मित्राची- किरणची पत्नी कुत्र्यांच्या एनजीओचं काम करायची. तिला मी म्हटलं की, 'मला एक कुत्र्याचं पिलू हवं आहे.' तेव्हा ती मला म्हणाली की, कुत्रा अ‍ॅडॉप्ट करणं ही सोपी गोष्ट नाही. ती खूप जबाबदारीची गोष्ट असते. मला हे ऐकून जरा धक्का बसला. मी सडाफटिंगासारखा राहत होतो हे तिला आणि अनेकांनाही माहीत होतं. त्यामुळे मी कुत्र्याची जबाबदारी घेऊ शकेन की नाही अशी शंका तिच्या मनात डोकावली असणार. मी तो विचार सोडून दिला.

२६ जुलै २००५ च्या पुरात दोन दिवस मी रेल्वे स्टेशनवर अडकलो होतो. नंतर परत किरणच्याच घरी गेलो. नलेश पाटील देखील तिथेच होता. छान रम पित गप्पा झाल्या. कुत्र्यांचा विषय निघाला. त्याच्याकडे असलेल्या दोन-तीन कुत्र्यांचा विषय निघाला. मी त्याच्या अलिबागच्या फार्महाऊसवरही गेलो आहे. प्रामुख्याने गावठी कुत्र्यांना अ‍ॅडॉप्ट करावं असं किरण आणि त्याच्या पत्नीचं म्हणणं असायचं म्हणून त्याने ते अंमलात आणलं होतं. दोन दिवसांनी मी गीतांजली या माझ्या मैत्रिणीच्या घरी जायला निघालो. तिचा फोन बंद पडला होता. ती कशी असेल अशी काळजी वाटली म्हणून भेटून यायचं ठरवलं. तसंही



सांताक्रूझला जाणं व्हायचंच. वाशीहून मी सांताक्रूझला जायला निघालो. वाटेत चहा घ्यायला थांबलो तर कुत्र्याचं एक छोटं पिल्लू बागडताना दिसलं. मी म्हटलं, 'कुत्रं छानच दिसतंय.' मी त्याला उचलून घेतलं, तेव्हा चहावाला म्हणाला, 'माझ्या मुलाने इथे आणलं होतं. मी ओरडल्यावर पुन्हा रस्त्यावर सोडून दिलं.' बहुधा २६ जुलैच्या पावसात ते आईपासून वेगळं झालं

असावं. मी त्याला तसंच हातात घेऊनच गीतांजलीच्या घरी गेलो. ती सुखरूप होती. थोड्या गप्पा मारल्या आणि दुसरा चहा पिऊन मी तिथून निघालो. एका हातात कप आणि दुसऱ्या हातात पिल्लू!! मी विचार केला की याला बाहेर जाऊन दूध पाजावं आणि मग सोडून द्यावं, पण मी त्याला छातीशी धरल्यापासूनच अनेक वर्षांचं नातं असावं तसं ते माझ्या कुशीत शांत बसलं होतं. त्याने पळायचा वगैरे अजिबातच प्रयत्न केला नाही. मी दुधाची पिशवी घेतली, थोडी फोडली आणि त्याला दूध दिलं. तेव्हा मी ज्यूटची मोठी पिशवी हातात घेऊन फिरायचो. पुस्तकं ठेवायला ती सोयीस्कर पडायची. त्या पिशवीत त्याला ठेवलं. ट्रेनच्या प्रवासात ते मधून मधून पिशवीतून बाहेर यायचा प्रयत्न करत होतं. लोकंही बघायला लागले. मी कुर्ल्याहून वाशीपर्यंत त्याला गुपचूप ट्रेनमधून आणलं. या कुत्र्याचं नाव मी 'मोत्झार्ट' ठेवायचं असं ठरवलं.

श्रद्धा साखळकर ही माझ्या मित्राची मैत्रीण. वयाने लहान, पण तिची माझी चांगली मैत्री झाली होती. तिने रुईयातून पदवी घेतली होती. तिला लिहा-वाचायची आवड असल्याने ती घरी नेहमी येत असे. तिला मी म्हटलं की, मी कुत्र्याचं पिलू आणलं आहे. ती ताबडतोब टॉवेल, टूथब्रश वगैरे गोष्टी घेऊन आली. तिच्याकडेही असाच एक गावठी कुत्रा होता. तिने मोत्झार्टसाठी या सगळ्या गोष्टी तर आणल्याच; वर मला समजावलं की, त्याला शी-शू करायची असेल तेव्हा ते आधी उड्या मारेल, त्याला आंघोळ घालताना अचानक त्याच्या तोंडावर पाणी ओतू नये. अशा बारीक-सारीक अनेक सूचना तिने दिल्या आणि त्यांचा मला खूपच उपयोग झाला. पण माझ्या एक लक्षात आलं की, कुत्रा सांभाळणं ही खरंच खूप मोठी जबाबदारी आहे. आतापर्यंत मी सहज दरवाजा बंद करून जायचो. आता जर त्याला आत ठेवलं तर ते कसं राहील? म्हणजे मला घरी राहणं भाग आहे किंवा त्याला कोणाकडे तरी ठेवणं भाग आहे. मी त्याला डॉक्टरकडे घेऊन गेलो. एका इंजेक्शनचे अडीचशे रुपये असे साधारण पाचशे रुपये गेले. तेव्हा माझं महिन्याचं उत्पन्न साधारण पाच हजार असेल. मी रोज पुस्तकं विकायचो, कधी-मधी लेख लिहायचो, त्यातून जे पैसे मिळायचे त्याच्यावर घर चालायचं. रोजच पैसे मिळवायचे आणि रोजच खर्च व्हायचे. आता मोत्झार्टला जर रोज जेवण द्यायचं तर चांगलं खाणं देणं आवश्यक होतं. डॉग-फूड तेव्हाही महाग होतं आणि आत्ताही महागच आहे. बरं, दुसरं काही घरगुती जेवण मागवायचं तर मी स्वतःच इडली-सांबार खाऊन राहायचो. त्यामुळे त्याला नियमित खाणं देणं, डॉग-फूड विकत घेणं ही एक मोठी खर्चिक बाब झाली आणि पहिल्यांदाच मला पैसे साठवायला सुरुवात करणं भाग पडलं. मोत्झार्टमुळे ताबडतोब घडून आलेला हा माझ्यातला एक मोठा बदल!

त्याला कुठे घेऊन जायचं असलं तर मी पिशवीत टाकायचो आणि ते दोन्ही बाजूंनी सरसर वर चढायचं. आरती कुलकर्णीने त्याचे पिशवीतले आणि बाहेरचेही फोटो काढले. पंकज सोनावणे या मित्रानेही एक छान फोटो काढला. बऱ्याचदा मी त्याला घेऊन जायचो. माझ्या लक्षात आलं की, तुमच्याकडे कुत्र्याचं पिलू असलं की लोकं तुमच्याशी सहज बोलायला येतात किंवा सहजपणे त्याची चौकशी करतात. हा एक नवीनच बदल होता. कारण मी अनेक वर्षं वाशीतल्या एका सोसायटीत रहातो; पण बिल्डिंगमधली लोकंही मला ओळखत नव्हती. मुलं तर सोडाच! पण आता ती म्हणू लागली, 'सर, आप मोत्झार्ट के पापा हो ना?' मला गंमत वाटायची.

मी मोत्झार्टला अॅडॉप्ट केल्यावर, एकदा तेंडुलकरांशी कुत्र्यांविषयी बोलत होतो. विजय तेंडुलकरांना कुत्र्यांची खूपच आवड होती. त्यांचा स्वतःचा कुत्रा होताच. त्यांनी मला दोन-तीन मुद्दे सांगितले. ते म्हणाले की, 'त्याला जितकी मोकळीक देशील तितका तो छान होईल.' दुसरी त्यांनी सांगितलेली गोष्ट म्हणजे, 'माणसांना होणारे सगळे आजार त्याला होऊ शकतात हे लक्षात ठेव.' या दोन्ही गोष्टी मी पाळल्या. सुरुवातीचा लहानपणीचा काळ सोडला तर मी त्याला बेल्ट बांधत नाही. आजही तो मोकळाच असतो. अर्थात या मोकळेपणाचे अनेक तोटेही आहेत. मी त्याला बागेत किंवा इतरत्र घेऊन जायचो तेव्हा, धावत सुटायचा. एक दिवस तो असाच थेट रस्त्यावर गेला आणि त्याच्या अंगावरून गाडी गेली. पण त्याला काहीही झालं नाही. त्यानंतर मात्र तो त्या दिशेलाही जायला घाबरू लागला. हळूहळू कुत्रे जगाकडे कसं बघतात हे मला समजू लागलं. एकदा त्याला बागेत नेलं. तिथे एक माणूस बाळ घेऊन आला होता आणि त्याच्या हातात रुमाल होता. मोत्झार्ट तो रुमाल दातात धरून धावू लागला. त्या माणसाला त्याला पकडता येईना, माझ्याही हातात तो येईना. त्या माणसाने म्युन्सिपालिटीला फोन करतो अशी धमकी दिली. थोड्या वेळाने मी त्या माणसाला त्याचा रुमाल परत केला आणि तिथून निघालो, पण ही एक नवीनच आफत होऊन बसली.

माझ्या घरापासून दहा मिनिटांच्या अंतरावर एक बाग आहे. तिथे मी मोत्झार्टला सकाळी घेऊन जायचो. त्या रस्त्यावरचे आजूबाजूचे कुत्रे भुंकायला लागायचे. तिथे राहणारा एक माणूस मोत्झार्टशी नेहमी खेळायचा. त्याला मोत्झार्टचा इतका लळा लागला की, त्याने स्वतः कुत्रा अॅडॉप्ट केला. तो नेहमी म्हणायचा, तुमच्या कुत्र्यामुळे मी कुत्रा अॅडॉप्ट केला. याच रस्त्यावर ढोले म्हणून एक शिक्षक आहेत, ते ट्युशन्स घ्यायचे. त्यांचा एक कुत्रा होता-पॉमेरियन! तो आणि मोत्झार्ट सुरुवातीला एकमेकांवर भुंकायचे. नंतर ते एकमेकांचे दोस्त झाले.

मोत्झार्टला रस्त्यावरून, साखळी लावून किंवा न लावता देखील घेऊन जाणं ही मोठीच आफत होती. तो कोणाशीही दोस्ती करायचा किंवा मारामारी करायचा. एकदा तर त्याने चक्क एका अल्सेशिअन कुत्र्याशी हाणामारी केली. त्या कुत्र्याचा मालक म्हणाला, ''आता हा मरणार आहे, तू निघून जा.'' इतक्यात मोत्झार्टने चक्क त्या अल्सेशिअन कुत्र्याच्या अंगावर झेप घेतली आणि त्याच्या पाठीचा चावा घेतला, पण तो वाचला. तर असं हे पिल्लू फारच द्वाड निघालं.

मोत्झार्टला कुठेतरी ठेवणं भाग होतं. तोही खर्च कमी नव्हता कारण मी असं ठरवलं की, मुलांना पाळणाघरात जितके

पैसे लागतात तितके द्यायचे. खरं तर आठवड्याला शंभर एक रुपये दिले असते तरी त्यांना चालण्यासारखं होतं. वावळे नावाच्या कुटुंबाकडे मी त्याला ठेवलं. घरात एकट्याला ठेवलं तर तो चार-पाच तास राहायचा, पण नंतर पेपर वगैरे फाडायचा. लहान असताना, सुरुवातीला त्याने घरातल्या गाद्या आणि उशा फाडल्या. त्यामुळे मी आजही उशी किंवा गादी शिवायच राहतो. मी एका लाकडी बाकावर झोपायचो आणि मोत्झार्टला खाली ठेवायचो. तो चादरीला धरून वर यायचा आणि माझ्या छातीवर उभा राहायचा. मग गळ्याला चाटायचा आणि मग झोपी जायचा. बऱ्याचदा तो माझ्या पायाजवळच झोपायचा. आता तो मोठा झाल्यावर त्याची ही सवय मोडली.

मोत्झार्टसाठी हिरॉईन शोधणं आवश्यक होतं, पण एक दिवस त्यानेच त्याचा शोध लावला. एका ट्रकखाली एक कुत्री बसली होती. वयाने बरीच प्रौढ! मोत्झार्टचं तिच्यावर लाईन मारणं सुरू झालं. मग मी त्याला ट्रकलाच बांधून टाकलं. म्हटलं बेअब्रू व्हायला नको. याप्रकारे त्याची दोन-तीन प्रेम-प्रकरणं झाली, पण माझ्याप्रमाणेच त्यालाही बहुधा एकटं राहायची सवय झाली होती. मोत्झार्ट कुठेही गेला की कुत्रे जमवून येई. याला एक कारण कदाचित त्याचा देखणेपणा असावा. एक तर त्याचा चेहरा अल्सेशिअन कुत्र्यासारखा आहे आणि बाकी शरीर छोटं! अल्सेशिअन कुत्र्याची रगही त्याच्यात आहे. आता चौदा वर्षांचा झाल्यावरही तो इतक्या वेगाने धावतो की सापडत नाही.

खरं तर हे कुत्रं-पुराण म्हणजे आपल्या लहान मुलाबद्दल बोलण्यासारखंच आहे. पण मोत्झार्टमुळे आयुष्यात खूप बदल झाले. डॉग-फूड, पाळणा घर, असा त्याचा खर्च खूप असल्याने पैसे कमावणं भाग पडू लागलं. कधी बाहेर गावी गेलं तर त्याचं जेवण देऊन जावं लागायचं. बरं ते नक्की त्याला दिलं जातं आहे की नाही याचीही शाश्वती नसायची. वावळेंकडे आणखीही दोन-तीन कुत्रे होते. मी त्यांच्या घरी गेलो आणि मोत्झार्टला घेऊन यायला निघालो की, ते दोन्ही कुत्रे मला दूरपर्यंत सोडायला यायचे. मोत्झार्टने त्यांची ही सवय उचलली. मोत्झार्ट आमच्या कॉलनीच्या दारात बसायचा. तिथे नऊ इमारती आहेत. आणि रात्री-विशेषतः कॉलसेंटरमधून येणाऱ्या मुलींना तो अगदी घरापर्यंत सोडायला जायचा. त्याला खाली सोडलं की, मध्येच फुटबॉल खेळणाऱ्या मुलांचा बॉल घेऊन खेळायला लागायचा. सगळी मुलं किंचाळायची. पण मोत्झार्टमुळे हळूहळू माझी सगळ्यांशी दोस्ती झाली. मध्यंतरी एक मुलगी म्हणाली, ''अंकल, देखो ना, मोत्झार्ट कितना बडा हो गया। छोटा था, तब कितना क्युट था।'' मी मनात म्हटलं, अरे एकेकाळी तूही लहान होतीस. आता ती मुलगीही मोठी झाली आणि बोलेनाशीही झाली. पण मोत्झार्टमधला हा बदल अर्थातच नैसर्गिक होता. तरीही मोत्झार्टचं बालपण जास्त आठवतं- आजूबाजूच्या लहान मुलांच्या सारखंच!

माझ्या बऱ्याच मित्र-मैत्रिणींकडे मी मोत्झार्टला घेऊन जायचो. एका मित्राकडे मी त्याला घेऊन गेल्यावर त्या मित्रालाही कुत्रा ॲडॉप्ट करावासा वाटला. मी त्याला कुत्र्याचं एक छान



पिल्लू दिलं, पण त्याने ते दोन दिवसात परत केलं. तो मित्र त्याच्या मुलाला घेऊन एक दिवस घरी आला. माझ्या दाराला कुलूप नसतं. त्यामुळे त्यांनी दार उघडलं. नंतर मित्राच्या मुलाने मला ॲक्शन करून दाखवली की मोत्झार्ट कसा वागत होता. मोत्झार्ट त्याच्या वडिलांवर भुंकत होता आणि त्याला चाटत होता. पुन्हा वडिलांवर भुंकत होता आणि मुलाला चाटत होता. मोत्झार्टच्या अशा अनेक गोष्टी आजही आठवतात.

मी पहिल्यांदा गोवा फिल्म फेस्टिव्हलला गेलो. मी तिथे दहा दिवस राहणार होतो. वावळेंकडे त्याला ठेवला आणि दोन-तीन दिवसांनी वावळेंचा फोन आला की, 'मोत्झार्ट काही जेवत नाही, तुम्ही परत या.' पण मी गेलो नाही. हळूहळू तो जेवू लागला. आता तर तो माझ्याशिवाय वाटेल तितके दिवस रहातो. तरीही माझा मित्र अमित कुंभार किंवा इतर कोणीतरी त्याला सांभाळायला लागतं. वावळेंकडे मोत्झार्टला ठेवल्यावर त्याला कधीही आणायला गेलो की तो नाचायला लागायचा. आता दोन-तीन दिवस बाहेर जाऊन परत आल्यावर देखील तो नाचत नाही, पण फक्त कुतूहलाने बघतो. चाटत-बिटत तर अजिबात नाही. थोडक्यात, आता तो प्रौढ झाला आहे.

मोत्झार्टच्या आजूबाजूच्या कुत्र्यांशी दोस्तीमुळे विशेषता मादी कुत्र्यांशी त्याच्या दोस्तीमुळे एक छोटी पिल्लावळ आजूबाजूला निर्माण झाली आहे. त्यातील दोन, तीन कुत्रे कंपाउंडमधेच असतात. त्यामुळे रोज त्यांना बिस्किटं आणणं, हा भाग असतो. मोत्झार्टचं खाणं रोज विकत घेणं तशी ही कंटाळवाणी गोष्ट असते. याचं कारण असं की, एक तर त्याला साधं खाणं चालत नाही. चपाती वगैरे तो खातो, पण 'चिकन बिर्याणीची' त्याला सवय लागली आहे. आता दोनच पर्याय उरतात. 'चिकन बिर्याणी' घेऊन ती दोघांनी, थोडी थोडी खाणं. तसंही रोज मांसाहार खाणं माझ्या प्रकृतीला

योग्य वाटत नव्हतं. रोज एक गोष्ट चांगली होती, ती म्हणजे तो एकदाच खात असे.

एक दिवस झालं असं 'मोत्झार्ट' कुठं दिसंना? मी बघितले, तर तो बिल्डिंगच्या बाजूला निपचित पडला होता. त्याचे डोळे मंदावले होते आणि हालचाल फारशी नव्हती. मला वाटलं, झालं संपलं आता? मी त्याला तसंच उचलून आणलं, रिक्षात घातलं आणि डॉक्टरांकडे घेऊन गेलो. त्यांनी त्याला 'डेंग्यू' झालाय असं निदान केलं. अर्थात भरपूर पैसे गेले पण 'मोत्झार्ट' बरा झाला. लहानपणी जेव्हा त्याच्या पायाला लागलं, तेव्हा तो लंगडत चालत होता. मला असं वाटलं की, अरे आता हा आयुष्यभर लंगडणार की काय? पण डॉक्टरांनी त्याचा पाय बांधला. दोन दिवसात त्यांनी पायाला बांधलेली पट्टी त्याने स्वतःचं तोडून टाकली आणि टनाटन चालूही लागला. त्यानंतर माझ्या लक्षात आले की, प्राण्यांची प्रतिकारशक्ती ही, खूपच भरीव आणि मजबूत असते.

'मोत्झार्ट'मुळे खूप गोष्टी शिकायला मिळाल्या. प्राण्याचे इन्ट्यूशन कसे असते. उदा. पोटासाठी ते विशिष्ठ प्रकारचे गवत खाऊन उलटी करतात किंवा तरगासारख्या वनस्पती खातात. हे खाल्ले पाहिजे हे त्यांना कसे कळते? कुत्र्यांचा मूड ओळखणे किंवा स्वभाव ओळखणे हे सवयीने उमगत जाते. आमच्या कंपाऊंडमध्ये एक जुना कुत्रा होता तो अतिशय शांत असे. नंतर त्याला पोलीओ झाला. मी दिसलो की तो पाय घासत येत असे. इतर कुत्र्यांना खाणे दिलेले मोत्झार्टला सुरुवातीला आवडायचे नाही, पण हा कुत्रा त्याला अपवाद होता कारण बहुदा त्याचे अपंगत्व. लहान मुलांशी ते प्रेमाने वागतात हेही पाहिले.

गजानन भागवत यांच्याबरोबर मी बराच काळ होतो त्यांच्याकडे करीना आणि लोरा अशा कुत्र्या होत्या (त्यांना कुत्रे म्हटलेले भागवत यांना आवडायचे नाही.

त्यांनीही मला कुत्री पाळण्याबद्दलच्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या. आता त्याचं नाव 'मोत्झार्ट' का ठेवलंय तेही सांगतो. त्या काळात अर्थातच 'टेपरेकॉर्डर' हेच गाणं ऐकण्याचं साधन होतं. २००५-०६ साली मी छोटे-छोटे 'टेपरेकॉर्डर' विकत आणायचो. 'असेम्बल' केलेले होते आणि त्याला स्पीकर लावून गाणी ऐकायचो. अनेक ठिकाणी रद्दीत पुस्तकं विकत घेताना का कुणास ठाऊक, पण पुस्तकांबरोबर कॅसेटस्ही मिळायच्या आणि काही कॅसेट नव्या घ्यायचो. या प्रकारे गाणी ऐकताना 'बिथोवनची नाईन सिंफनी' मी बऱ्याच वेळा ऐकायचो. विशेषतः 'वेस्टर्न म्युझिक' चालू असताना तो शांत झोपी जायचा. 'बिथोवनच्या नाईन सिंफनी'मध्ये शेवटी कोरस आहे. पहिले वाद्यांचे तीन भाग संपल्यावर, चौथ्या भागाला कोरस सुरू होतो. त्यावेळी मात्र तो कितीही झोपला तरी, ताड्कन उठून स्पीकरकडे बघायचा. हे मला नवल वाटायचं.

त्याला संगीत आवडतं असं वाटत असल्यामुळे 'बिथोवन' नाव ठेवावं असं वाटतं होत. पण 'बिथोवन' या नावाचा सिनेमाही आहे. त्यामुळे त्याचं नाव 'मोत्झार्ट' ठेवलं. माझ्याकडे काम करणारी 'मधुरा नायक' ही स्वतः गाणी गाणारी मुलगी होती. ती या नावामुळे खूप वैतागायची किंवा तिच्या आधी काम करणारी 'योगिता जाधव'. योगिताचं त्याच्याशी अजिबात जमत नसे. माझ्याकडे कार्यालय नसल्यामुळे 'योगिता' घरूनच काम करायची. आणि सगळ्या कुत्र्यांप्रमाणे 'मोत्झार्ट' 'पझेसिव्ह' होता. त्यामुळे तो तिच्यावर भुंकायचा, पण नंतर हळूहळू त्यांची गट्टी झाली. आता कधीही 'योगिताचा' फोन आला तर ती, 'मोत्झार्ट'ची चौकशी करते. 'अमोल देठे' किवा आताचा 'निखिल जाधव' किंवा राम असेल ही सारी मंडळी मोत्झार्टला सांभाळण्यात मदत करायची. रामचं चपलांचं दुकान होतं. तो 'अविष्कार'मध्ये जायचा, काम करायचा, कधीमधी लिहायचा. जर मित्रांकडे गेलो आणि तिथेच थांबावंसं वाटलं तर मी रामला सांगायचो की, 'तू त्याला काहीतरी खायला दे आणि राम जाऊन खायला द्यायचा.' माझं बाहेर जाणे मोत्झार्टमुळे कमी झालं. याचं कारण त्याला एकट्याला घरात सोडणं अशक्य असायचं. 'मोत्झार्ट' यायच्या आधी असं असायचं की, एक-दोन दिवस तरी माझा मुक्काम मित्रांच्या घरी असायचा. रात्रभर बाहेर राहायचं, गप्पा मारायचो, ड्रिंक घ्यायचो. हे सगळं 'मोत्झार्ट'मुळे बंद झालं. अर्थात, आजही मी प्रवास करतो. पण 'मोत्झार्ट'ला सांभाळून प्रवास करणं ही फार वेगळी गोष्ट आहे. त्याची दोन तीन दिवसाची सोय लावून जावंच लागतं. त्यामुळे माझ्या मुक्त फिरण्यावर बरंच बंधन आलंय. अनेक गोष्टी मोत्झार्टमुळे बदलाव्या लागल्या. त्याचे चांगले फोटो श्रद्धाने काढले होते आणि एक छानपैकी व्हिडिओ केला होता. मी झोपलो जमिनिवर तर तोही आडवा व्हायचा, अशा तो अनेकदा नकला करायचा. तो वरून खूप शांत, साधा दिसतो खरा पण भुंकायला लागला तर अख्खी बिल्डींग हादरते. मोकळा सोडल्यामुळे बिल्डिंगमध्येही लोकांना येऊ द्यायचा नाही. पेपरवाल्याशी त्याचे खूप झगडे व्हायचे आणि होतात. त्यामुळे अनेकदाही इमारतीच्या, सार्वजनिक मिटिंगमध्ये 'मोत्झार्ट' हा चर्चेचा विषय असायचा. मग मी म्हणायचो, 'मी त्याला बांधून ठेवीन.' दोन-चार दिवस ठेवायचो, पण परत तेच, आता मात्र मी त्याला ऑफीसमध्ये घेऊन जातो. त्याला आंघोळ घालणं, फिरायला नेणं, या साऱ्या गोष्टी अर्थात निमूटपणे कराव्या लागतात, पण त्याचं आजूबाजूला असणं, वावरणं, रानात त्याच्याबरोबर फिरायला जाणं, या खूप आनंद देणाऱ्या गोष्टी आहेत. गडचिरोलीला मी हेमंत कर्णिकांबरोबर गेलो होतो. अभय बंग याच्याकडे दोन कुत्रे होते आणि सकाळी आम्ही त्या चार दिवसात फिरायला जायचो तेव्हा बंग म्हणायचे, ''कुत्रा असणं ही काय गोष्ट आहे हे ज्याचं त्यालाच कळू शकतं.'' आज 'मोत्झार्ट'मुळे मला ते कळले आहे.

**– शशिकांत सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२१७८५६१८
shashibooks@gmail.com

डॉ. विजय ढवळे

# आमचा ऑस्कर

**उद्योजक आणि लेखक डॉ. विजय ढवळे गेली चार दशके कॅनडामध्ये राहात आहेत. अठरा मराठी व आठ इंग्रजी पुस्तके लिहिणाऱ्या डॉ. ढवळे यांची तीन पुस्तके 'बेस्ट सेलर्स' ठरली आहेत. भरभरून देणाऱ्या त्यांच्या लाडक्या 'ऑस्कर'च्या आठवणींचा हा भावस्पर्शी कोलाज.**

ऑस्कर! आमचा लाडका कुत्रा. त्याने गुरुवार, ६ सप्टेंबर २०१८ रोजी, दुपारी दोन वाजता अखेरचा श्वास घेतला. आणखी काही आठवड्यांनीच त्याचा अकरावा वाढदिवस येणार होता. पण तोपर्यंत थांबण्याची त्याच्या शरीराची तयारी नव्हती. तो 'स्नाकक्षर' जातीचा कुत्रा होता. लहानग्या चणीचा. वजन नेहमी १५ ते १८ पौंड ह्या दरम्यान असायचे. तो आमच्या घरात एक दशकापूर्वी अवतीर्ण झाला याला कारण आमची कन्या गौरी! जशी टाकून दिलेल्या मुलांची देखभाल करण्यासाठी अनाथगृहे असतात तशी कॅनडामध्ये प्राणिप्रेमी संस्थांनी कुत्रे, मांजरी आणि इतर पाळीव प्राण्यांकरता विश्रांतिगृहे उभारली आहेत. नको असलेले प्राणी त्यांचे मालक ह्या संस्थांकडे आणून देतात आणि ते प्राणी आपणास कोणी मालक लाभतो का, ह्याची वाट पहात कालक्रमणा करत असतात. ओटावा हे कॅनडाच्या राजधानीचे शहर. त्यामध्ये ९३,००० कुत्रे आहेत. लोकसंख्या दहा लाखांच्या आसपास. म्हणजे सुमारे सात माणसांमागे एक पाळीव प्राणी असे प्रमाण पडते! कारण कुत्र्यांप्रमाणे मांजरी पाळणारे देखील भरपूर लोक आहेत. ससा, पोपट, हॅमस्टर ह्यांनाही घरामध्ये ठेवून त्यांची प्रेमळपणे देखभाल करणारे देखील बरेच लोक आहेत. गौरीने ऑस्करला पाहिले आणि ताबडतोब निर्णय घेतला. ह्याला घरी आणायचे आणि जन्मभर सांभाळ करायचा. त्याला कुत्र्यांच्या 'अनाथगृहातून' आणल्यामुळे त्याला 'रेस्क्यू डॉग' असेच म्हणणे योग्य ठरेल.

माझी पत्नी इंदिरा हिच्या मुंबईच्या घरात अनेक वर्षे मांजर होते, तिच्या मावशीलाही कुत्र्यांचा लळा होता. त्यामुळे घरात पाळीव प्राणी ठेवणे ही तिच्या दृष्टीने मुळीच नावीन्यपूर्ण घटना नव्हती. माझा स्वत:चा अनुभव जरा वेगळा होता. लहानपणी मला कुत्रा चावला होता. त्यामुळे मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये जाऊन १४ इंजेक्शन्स घ्यावी लागली होती! त्यामुळेच कुत्रा हा कितीही उपयुक्त, जीव लावणारा प्राणी आहे हे जरी मान्य असले, तरी त्याला पाळण्याकरता माझे मत फारसे अनुकूल नव्हते! त्याशिवाय ऑस्करला शिस्त लावण्याकरता काही महिन्यांची तरी गुंतवणूक करणे क्रमप्राप्त होते. तेवढ्या सहनशक्तीचा अभाव माझ्यामध्ये होता. त्यामुळे पहिले काही दिवस तरी ऑस्कर त्याचे शारीरिक विधी घरातच 'सोईस्कर' जागा सापडली की तेथे करायचा. माझ्यासारख्या शिस्तप्रिय व टापटिपीची आवड असलेल्या माणसाला ते रूचत नव्हते. मग विचार केला, बिचाऱ्या त्या कुत्र्याचा तरी काय दोष? तो बेवारशी म्हणून वाढला तेव्हा त्याला शिस्त लावणे आमचेच काम आहे. तेव्हापासून रोज दिवसांतून तीन वेळा तरी त्याला घराबाहेर नेण्याचा प्रघात पडला. सहसा सकाळीच तो आपले



बागडायचा. जिन्यांवरून तर तो दिवसांतून दहा-बारा वेळ तरी वर-खाली करायचा. परंतु त्याच्या अतिउत्साही वृत्तीने आम्हाला एकदा अगदी रडकुंडीला आणले होते.

तो फेब्रुवारी महिना होता. सर्वत्र बर्फाचे डोंगर दिसत होते. आमचे मित्र घरी आले होते. त्यांना निरोप देण्याकरता आम्ही बाहेरचे दार उघडले. भारतीय परंपरेनुसार जाण्याआधी दरवाजामध्ये किमान पाच मिनिटे तरी बोलत राहण्याची प्रथा आहे. ती जागृत ठेवण्यात आम्ही कधीही कुचराई करत नाही. बाहेर थंडीसाठी गरम कोट अंगावर चढवून पोर्चवर गप्पा मारत होतो. तेव्हा लहानग्या ऑस्करची स्वारी सर्वांचा डोळा चुकवून धूम पळाली. आम्हाला पत्ताच नव्हता. मित्र गेल्यावर घराच्या आत आलो. ऑस्करचा पत्ता नाही. घराच्या तिन्ही मजल्यांवर शोध घेतला. महाराज गुप्त झाले होते. मग बाहेर त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला कारण त्याला बर्फात खेळायला आवडायचे. त्याचा सुगावा लागेना. इंदिरा तर प्रचंड अस्वस्थ होती. आमच्या शेजारच्या घरात वा जवळपास शोध सुरू केला. तेव्हा समोर रहाणारी इटालियन स्त्री दार उघडून आली. म्हणाली, ''कोणता तरी काळ्या रंगाचा प्राणी आमच्या घराच्या बाजूने बॅकयार्डमध्ये धावत गेलेला पाहिला.'' मी तिथे गेलो. तिच्या कंपाऊंड वॉलवरून उडी मारून ऑस्करबुवा शेजारच्या घराच्या बॅकयार्डात असलेल्या बर्फाच्या ढिगाऱ्यावर पडलेले होते.

विधी उरकून घ्यायचा. मग त्याला इतकी चांगली सवय लागली की लघुशंकेला जायचे असले तरी त्याला घराबाहेर नेल्याशिवाय किंवा घरामागील अंगणात सोडल्याशिवाय तो त्याचे मूत्राशय रिकामे करायचा नाही.

रशियन शास्त्रज्ञ पॉवलॉव्ह ह्याने एक प्रयोग केला होता. त्याच्या कुत्र्याला तो रोज दुपारी तीन वाजता मांसाचा तुकडा द्यायचा. कुत्र्यांच्या मनामध्ये एक अदृश्य घड्याळच बसवले असते. ती वेळ झाली की पॉवलॉव्हचा कुत्रा जिथे असेल तिथून मालकाकडे धाव घ्यायचा आणि दोन पायांवर उभा राहून खाण्याची वाट पहात असायचा. असे महिनाभर झाल्यावर मग एके दिवशी पॉवलॉव्हने मांसाचा तुकडा दिलाच नाही, पण तो मिळेल ह्या अभिलाषेने उभा ठाकलेल्या कुत्र्याच्या तोंडून मात्र लाळ गळत राहिली. त्यावरून निष्कर्ष असा काढला गेला की अमुक वेळी घडणार हे गृहीत धरूनच कुत्र्याकडून किंवा कोणत्याही पाळीव प्राण्याकडून Reflex Action घडत असते. ऑस्करच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवायचे. त्याला मी रोज सकाळी सहा, नंतर नऊ वाजता आणि संध्याकाळी चार वाजता बाहेर घेऊन जायचो. कधी उशीर झाला की बाहेरच्या दाराशी तो उभा राहायचा. तो घरात आला तेव्हा काही महिन्यांचाच होता. त्यामुळे त्याच्या अंगात खूप ऊर्जा होती. घरभर तो स्वच्छंदपणे

त्याचे मुख्य कारण होते, आमचे कंपाऊंड व त्या शेजारी असलेल्या इटालियन बाईच्या घराचे कंपाऊंड अगदी सारखे होते. त्यामुळे ऑस्करला ते ओळखीचे वाटले असावे, पण त्याला चूक समजली असावी कारण तो बर्फातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत होता. सुदैवाने बर्फ दगडासारखा घट्ट बनला होता. त्या दिवशी हिमवर्षाव झाला नव्हता. नपेक्षा त्या कडक बर्फावर, भुसभुशीत बर्फाची चादर पसरली गेली असती व बुडत्याचा पाय खोलात, ह्या म्हणीनुसार ऑस्कर बर्फामध्येच बुडाला असता. तो पंधरा मिनिटेच नाहीसा झाला होता पण आमचे धाबे दणाणले होते. त्याला ताबडतोब उचलून घरी आणले. त्याचे अंग खसखशीत टॉवेलने पुसून काढले आणि काही काळ त्याला ब्लँकेटमध्ये गुंडाळून ठेवले. थोडा वेळ तो स्थिर होता, मग त्याने अंगावरचे ब्लँकेट झुगारून दिले व पुन्हा घरभर पळायला सुरुवात केली.

ऑस्करचा रंग काळा असला तरी त्याचा उजवा पाय पूर्णपणे पांढरा होता, हे त्याचे वैशिष्ट्य. भोवतालच्या श्वानमालकांना हे खूप आवडायचे. थट्टेने ते त्याला मायकेल जॅक्सन म्हणायचे. ऑस्करचा आवाज खणखणीत होता. त्याला राग येत नसे. त्याचा सर्व जीव इंदिरावर होता. तिच्या भोवती-भोवती असायचा. काही वर्षे तर तो तिच्याजवळ झोपत असे. नंतर त्याच्या स्वतंत्र खोलीत

तो झोपू लागला. इंदिरासाठी बेसमेंटमध्ये मोठे मंदिर आहे. रोज साग्रसंगीत पूजा करणे, पोथी वाचणे ह्यामध्ये एक तास तरी जातो. तो सर्व वेळ ऑस्कर देवळापासून थोड्याच अंतरावर, दोन पायांवर ध्यानस्थासारखा बसून असायचा. तेव्हा इंदिरा अर्धवेळ नोकरी करत होती. तिची येण्याची वेळ झाली की जणू अंतर्ज्ञानाने ऑस्कर गॅरेजच्या दरवाजाच्या जवळ ठाण मांडून बसायचा. रिमोटने गॅरेजचे दार उघडले की तो भुंकायला सुरुवात करायचा तो थेट इंदिरा घरात येईपर्यंत. मग त्याला तिने थोपटले की शांत व्हायचा व त्याच्या ठराविक जागेवर जाऊन स्थानापन्न व्हायचा. त्याचे खाणेपिणे इंदिराच सांभाळत असे. त्यामुळे थोडावेळ जरी ती दृष्टिआड झाली की तो अस्वस्थ व्हायचा. घरभर फिरून शोधायचा.

ऑस्करच्या आगमनाच्या वेळी माझी आई घरात होती. तिला आरोग्याच्या गंभीर समस्या उद्‌भवल्या. शस्त्रक्रिया करणे अपरिहार्य होते. त्यासाठी हॉस्पिटलमध्ये नेण्याकरता रुग्णवाहिका आली तेव्हा पॅरॅमेडिक्सवर ऑस्कर इतक्या त्वेषाने भुंकत होता की ते सुद्धा घाबरले. त्यांच्या सांगण्यावरून ऑस्करला त्याच्या खोलीत बंदिस्त करून ठेवले होते. तरीही त्याचा भुंकण्याचा जोरदार आवाज येतच होता. जेव्हा स्ट्रेचरवरून मातोश्रींना खाली मुख्य दरवाजापाशी नेले तेव्हा घराबाहेर नेण्याआधी ऑस्कर दारावर धडका देत होता. असे त्याने ह्यापूर्वी कधीही केले नव्हते. कदाचित त्याला अशुभाची चाहूल लागली असावी. आईवरची शस्त्रक्रिया यशस्वी झाली, पण नंतर ती कोमात गेली. तीन आठवडे अतिदक्षता विभागामध्ये होती. नंतर तिने जगाचा निरोप घेतला. वडिलांप्रमाणेच तिनेही देहदान केल्याने अंत्ययात्रा वगैरेचा प्रश्नच नव्हता. संक्रांतीच्या दिवशी, १४ जानेवारी २००९ रोजी तिचे निधन झाले. त्या दिवशी रक्त गोठवणारी थंडी होती. तरीही आमच्या सांत्वनाकरता सुमारे ऐंशी लोक येऊन गेले. एरव्ही कोणीही अनोळखी व्यक्ती घरात आली की भुंकून त्याची नोंद घेणारा ऑस्कर एवढ्या लोकांची ये-जा चालू असताना कोपऱ्यात स्वस्थ बसून होता. तो रात्री जेवलाही नाही. आणखी चार महिन्यांनी माझे खास मित्र, खासदार डेव्हिड मॅगेंटी ह्यांनी आईला कॅनडाच्या पार्लमेंटमध्ये श्रद्धांजली वाहिली. एका इंडोकॅनेडियनचा असा गौरव होण्याची कॅनडाच्या दीडशे वर्षांच्या इतिहासात ती पहिलीच आणि आतापर्यंत एकमेव अशी घटना होती!

आजार असा कधी ऑस्करच्या वाट्याला आलाच नाही. आम्ही घराबाहेर निघण्याची तयारी केली की हा आमच्याजवळ यायचा. पुढचे दोन पाय आमच्या अंगावर ठेवून मलासुद्धा बरोबर न्या, अशी याचनाच करत असायचा. प्रत्येक वीकएंडला आम्हाला तरी जेवणाची आमंत्रणे असायची किंवा आमच्या घरी तरी जंगी मेजवानी असायची. पंचवीसपासून साठपर्यंत पाहुण्यांची उपस्थिती असायची पण ऑस्कर तेव्हा स्थितप्रज्ञासारखा शांत असायचा. भुंकणे वगैरे काही नाही. हॅलोविनच्या दिवशी किमान पाऊणशे मुले तरी येत असत. त्यावेळी दरवाजाची बेल वाजली तरी तो शांतच असायचा. ही समज त्याला उपजतच असावी. घराचा दरवाजा ओलांडून आत आलेली प्रत्येक व्यक्ती ही मित्रच असते असा त्याने त्याच्या मनाशीच ठोकताळा बांधलेला असावा. त्याच्यावर आम्ही भरभरून माया केली आणि त्याने आम्हाला त्याच्या दसपट तरी आनंद दिला. माझी प्रकृती तंदुरुस्त ठेवली कारण त्याला बाहेर घेऊन फिरायला जाणे ही कामगिरी मी स्वखुषीने अंगावर घेतली होती.

गेली दोन तपे आम्ही उभयता प्रत्येक वर्षाच्या जानेवारी महिन्यात भारतात जातो कारण तेव्हा कॅनडात वजा ३५° इतके तापमान खाली जाऊ शकते. प्रत्येक वेळेला ऑस्करची सोय करणे हे तर क्रमप्राप्तच असायचे. सुदैवाने आमच्या मित्रपरिवाराची त्यासाठी अनमोल मदत व्हायची. एकदा माझ्या लॉरी ट्रेव्हर डॉईच ह्या ज्युईश मित्राची मुलगी आमच्या घरीच तीन आठवडे येऊन राहिली होती. पुढच्या वर्षी त्याच्या घरी ऑस्करला ठेवले होते. पण त्याला कधीही पाळणाघरात ठेवण्याची वेळ आली नाही. गौरीच्या कॅनेडियन मित्रांकडे त्याची अनेकदा सोय झाली होती. त्याची प्रवासाची आवड लक्षात घेऊन आम्ही त्याला शॉपिंगकरता गेलो तरीही सोबत घेऊन जायचो. टोरांटोला तर त्याच्या पंधरा, सोळा तरी खेपा झाल्या असतील. त्याला विमानप्रवास घडावा म्हणून हौशीने दोनदा विमानानेही टोरांटोला नेऊन आणले, पण ते त्याच्या पचनी पडले नाही कारण त्याला चार तास तरी पिंजऱ्यात जखडून राहायची सक्ती होती. अशा बंदिस्त जागेची त्याला सवय नव्हती. विमानप्रवास तासाचाच पण विमान सुटायच्या आधी किमान तासभर तरी कार्गो ऑफिसमध्ये त्याचा पिंजरा सुपूर्द करायला लागायचा. टोरांटोत तर कार्गोचे ऑफिस अर्ध्या तासाच्या अंतरावर आहे. तेथील ट्रॅफिकमुळे आणखी पाऊण तास व्यतीत होण्याची निश्चिती. आम्ही ऑस्करचे लाड करतो आहोत अशा भ्रमात मश्गुल होतो, पण आमच्या लक्षात आले की असे चार तास बसणे त्याला मान्य नाही. त्याची सहनशीलता इतकी जबरदस्त होती की पिंजरा उघडला की तो आपसूकपणे आत शिरायचा व स्वत:ची गैरसोय सहन करायचा.

त्याच्याकरता आम्ही विविध प्रकारच्या ट्रीट्स (Treats) आणायचो. त्या सर्व एका फडताळात ठेवलेल्या असायच्या. त्या हव्या असल्या की ऑस्कर त्या कपाटाच्या खणाजवळ जाऊन उभा राहायचा. मग आम्ही त्याची आवड पुरवायचो. संतुष्ट होऊन तो त्याच्या वाडग्यामधील पाणी प्यायचा आणि त्याच्या बिछान्यावर आडवा व्हायचा. इंदिराने तिची नोकरी सोडल्यावर ऑस्करची चंगळच झाली कारण दिवसभर तिचा सहवास मिळायचा. गौरीने त्याला घरात आणले खरे, पण नंतर काही आठवड्यातच नोकरीच्या निमित्ताने ती न्यूयॉर्कमध्ये गेली. दर दोन महिन्यांनी ती घरी यायची. तिला विमानतळावरून आणण्याकरता जेव्हा जायचो तेव्हा हमखास ऑस्करला घेऊन जायचो. त्याला रोड सेन्स (Road sense) इतका अचूक होता की, विमानतळ जवळ आला की तो त्याच्या सीटवर उभा राहायचा. खिडकीबाहेर पहात राहायचा आणि मंद आवाजात भुंकायला सुरुवात करायचा. गौरी दिसली की आनंदाने

उड्या मारायचा. त्याला जवळ घेऊन कुरवाळले की मग तो शांत व्हायचा. त्याला आम्ही क्षणभरही नजरेआड करायचो नाही कारण त्याचे असणे हा आमच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले होते. तोही आमच्या नेहमी दृष्टीच्या टप्प्यातच रहायचा.

तीन वर्षांपूर्वी गौरीने आणखी एक कुत्रा आणला बर्गर! तो अगदी पिटकुळा आहे, वजन ६ पौंड. तिच्याबरोबर तो विमानाने न्यूयॉर्कहून आठ-दहा वेळा तरी घरी आला व तिच्याच बरोबर परत गेला. ह्या पाहुण्याशी ऑस्कर जमवून घ्यायचा. नंतर बर्गरला आमच्या घरीच कायम ठेवण्याचा निर्णय झाला. त्यामुळे ऑस्करचे एकछत्री साम्राज्य लयास गेले. दोन्ही कुत्रे एकमेकांच्या वाट्याला जायचे नाहीत. 'शांततामय सहजीवन' हा सुखी जीवनाचा मूलमंत्र आहे, हे त्यांना शिकवावेच लागले नाही.

दर काही महिन्यांनी आम्ही ऑस्करला डॉक्टरकडे घेऊन जायचो. पूर्ण तपासणी व्हायची सर्व आलबेल आहे असा निर्वाळा दिला जायचा. ऑस्करला थंडी कधी बाधली नाही पण पाऊस त्याला अत्यंत अप्रिय होता. त्यामुळे पावसाच्या दिवसात त्याला जबरदस्तीने अंगावर रेनकोट घालून न्यावे लागायचे. विंटर कोट चढवताना मात्र त्याने कधीही खळखळ केली नाही. आम्ही राहतो त्या कोर्टमध्ये फक्त तेरा घरे आहेत, पण सर्वांचे मिळून आठ कुत्रे आहेत. एकाने मांजरही पाळले आहे. ते नजरेस पडले की ऑस्करची गुरगुर चालू व्हायची. एरव्ही इतर कुत्र्यांशी कधी त्याचा संघर्ष झाला नाही. त्याला फिरायला घेऊन गेले की मला बऱ्याचदा कोणी ना कोणी मित्र भेटायचाच. आमच्या गप्पा चालू असताना ऑस्करने कधीही नाराजी प्रगट केली नाही.

ऑस्कर हा सुखी, प्रेमळ व कनवाळू कुत्रा होता. ईमान, एकनिष्ठता, मालकासाठी स्वत:चे प्राणही गमावण्याची तयारी ही कुत्र्यांची सर्व वैशिष्ट्ये त्याच्यामध्ये प्रकर्षाने होती. जगातल्या सर्वात इमानी प्राण्यांची यादी केली तर त्यातली पहिली तीन नावे-कुत्रा, घोडा व हत्ती ह्याच क्रमानुसार येतील! न्यूयॉर्कचे दोन व्यापारी मनोरे ओसामा बिन लादेनच्या आतंकवाद्यांनी ११ सप्टेंबर २००१ साली उडवले. तीन हजार निरपराध अमेरिकनांचे प्राण हकनाक गेले. त्या गदारोळात अठ्ठ्याण्णवाव्या मजल्यावर एक अंध माणूस अडकला होता. त्याला त्याच्या 'गाईड डॉग'ने जिन्यावरून सुखरूप खाली आणले होते. त्या कुत्र्याचा 'लॅरी किंग लाईव्ह' ह्या कार्यक्रमांत सत्कारही केला गेला होता. इस्त्रायलमध्ये सैनिक श्वानपथक आहे. लपलेल्या मुस्लीम दहशतवाद्यांना शोधून काढणे आणि त्यांना दडवलेल्या स्फोटक द्रव्यांचा मागोवा घेणे हे त्यांचे मुख्य काम असते. कधी-कधी युद्धात त्यांचा प्राणही जातो. अशा वेळी त्यांचे अंत्यसंस्कार सन्मानाने केले जातात. एकवीस तोफांची सलामी दिली जाते. मात्र माणसासारखा कृतघ्न प्राणी ह्या भूतलावर दुसरा नाही! सिनेमांतही खलनायक 'कुत्ते-कमिने' अशाच शिव्या हासडतो.

संपूर्ण जीवन सुखात घालवलेल्या ऑस्करच्या आयुष्यातला शेवटचा पंधरवडा फारसा सुखावह नव्हता. त्याने अचानक माती खायला सुरुवात केली. त्याची अन्नावरची वासना हळूहळू कमीकमी होत गेली. त्याच्या आवडीचे पदार्थ समोर ठेवले की तो मान फिरवून बाजूला व्हायचा. अन्न पोटात टिकायचे नाही. सर्व ओकून पडायचे. डॉक्टरने स्टिरॉईडचे इंजेक्शन दिले. त्यामुळे त्याची भूक वाढायला हवी होती, पण त्याच्या हालचाली मंदावतच गेल्या. एरव्ही घराबाहेर मोकळ्या हवेत जाण्यास उत्सुक असलेला ऑस्कर एका जागेवर झोपून रहाणे पसंत करू लागला. त्याला दर दोन दिवसांनी पशू डॉक्टरकडे नेत होतो. रक्त तपासणी केली. एक्सरे काढले. गोळ्या देत होतो पण त्याची प्रतिकारशक्ती कमीच होत होती. शेवटी त्याला 'हिमोलेटिक ॲनमिया' झाल्याचे निदान केल्यावर आमचा धीर सुटला. ताबडतोब ॲनिमल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्याला पिंजऱ्यात ठेवून ऑक्सिजन चालू केला. ऑस्करच्या शरीरात त्राणच उरले नव्हते. तीन दिवस त्याने अन्नाचा एक कणही ग्रहण केला नव्हता. आम्ही दिवसातून तीनदा तरी जायचो. तो केविलवाण्या नजरेने पहायचा. पायांवर उभे रहाण्याचा प्रयत्न करत असताना एकदा तो कोलमडून पडला. तीन वेळा बाहेरून रक्त शरीरात घातल्याने त्याचा दुष्परिणाम म्हणून रक्ताच्या गुठळ्या झाल्या होत्या व त्यातली एक त्याच्या पायांत जाऊन अडकली होती.

मृत्यू समीप आला तरी ऑस्करने त्याची धीरगंभीर वृत्ती कायम ठेवली होती. त्याला वेदना होऊ नयेत म्हणून इंजेक्शन देऊन गुंगीत निजवले. आम्ही अत्यंत नाईलाजाने, काळजावर अक्षरश: धोंडा ठेवून 'युथनेशिया'चा निर्णय घेतला. तो मलूल होऊन पडला होता. त्याला प्रथम गुंगीचे इंजेक्शन दिले आणि नंतर आयुष्याची इतिश्री करणारे. गौरीच्या मांडीवरच त्याने आपला प्राण सोडला. ती व इंदिरा धाय मोकलून रडत होत्या. मलाही अश्रू व हुंदके अनावर झाले होते. एक अत्यंत सुरेख, लाघवी व इमानी प्राणी ह्या भूतलावरून चिरयात्रेच्या प्रवासाला निघून गेला. त्याचे शरीरदान करण्याची आमची इच्छा मात्र अपूर्ण राहिली कारण ओटावात व्हेटर्नरी कॉलेजच नाही. दोनच पर्याय होते पुरणे किंवा अग्नी देणे. हिंदू धार्मिक परंपरेनुसार आम्ही अग्नी देण्याचा पर्याय मान्य केला. त्याने आम्हाला पसापसा भरून आनंद दिला. कधीही कोणत्याही प्रकारचा त्रास दिला नाही. महाभारतात शेवटी पांडव त्यांच्या अखेरच्या प्रवासाला निघतात. स्वर्गाच्या दारापर्यंत फक्त युधिष्ठिर जाऊन पोहचतो - त्याच्या कुत्र्यासह! महर्षी व्यासांनी कुत्र्याचे महत्त्व पुरेपूर ओळखले होते. त्याची चुणूक आम्हाला याचि देही, याचि डोळा - पहायला व अनुभवायला केवळ ऑस्करमुळेच मिळाली! त्याची आठवण चिरंजीव आहे. ती आमच्या मन:पटलावरून कधीही पुसली जाणार नाही.

**- विजय ढवळे**
vijaydhavale82@gmail.com

RUTU™

Group of Companies

*Built for life... since 1979*

# तर्फे
# दीपावलीच्या
# हार्दिक शुभेच्छा

**Dr.Sangeeta Patil**

## RUTU Group of Companies

501, Rutu Business Park, Off.L.B.S. Marg, Thane (West) - 400601.
Tel : 022-25342255/44, 022-25341999. Cell : 9820274748.
Email : sangeeta.patil@rutugroup.com. Web : www.rutugroup.com

# Well Wisher

From

## Sunil Vasant Bhosale

## Someel Creations

Mobile : 9820833650

The Right Chemistry for a Brighter Tomorrow

With Best Compliments From

# AARTI INDUSTRIES LIMITED

Manufactures and Exporters of
Benzene based intermediates, Bulk Pharmaceuticals; Agrochemicals;
Speciality Chemicals and Sulphuric Acid & Allied Products

Head Office : 'Udyog Kshetra', 2nd floor, Mulund-Goregaon Link Road,
Off. L.B.S.Marg, Mulund (W), Mumbai-400 080
Phone : 6797 6666 / 2591 8195 ı Fax : 2590 4806

Factory & Regd. Office : Plot No. 801, 801/23, GIDC Estate, Phase-III,
Vapi-396 195, Dist. Valsad
Phone : 0260 2400059 / 2431306
Fax : 0260 2401322


86 YEARS
IPW
CONCEPT TO COMPLETION
INDIA PRINTING WORKS
EVERY THING UNDER ONE ROOF
Pre Press, Press, Post Press & Digital
धनंजय
रुची
सुखकर्ता
या 'झी' ग्रुपच्या
लोकप्रिय विशेषांकांचे मुद्रक
National Awards for Excellence in Printin
Efforts... Appreciated! Excellence... Awarded !!
All India Federation of Master Printers
DECEMBER 20, 2017
इंडिया प्रिंटिंग वर्क्स : 'उत्सव नात्यांचा' उत्कृष्ट मुद्रणाचे राष्ट्रीय विजेते
सारे काही एका छत्राखाली
डिझायनिंग
टाइपसेटिंग
प्रिंटिंग (कृष्ण-धवल व चार रंगी)
बाइंडिंग
तत्पर सेवा
माफक दर
वेळेची खात्री
ऑफसेट
वेब ऑफसेट
डिजीटल प्रिंटिंग
८६ वर्षांची परंपरा
दर्जेदार ग्रंथ छपाईसाठी अवश्य भेटावं असं नाव
एक दिवसात १ ते २०० प्रती छापून देण्याची सुविधा
आनंद लिमये, इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२, गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.
दूरध्वनी: ०२२ २४१२२७५५/५६ • इमेल: anandlimaye55@gmail.com

# अडसर

अपर्णा महाजन

**समाजाचा चेहरा कोणता? कोणताच नाही. समाजाची जीभ सगळ्या बाजूने बोलणारी. तुला समाजाचा ताण येतोय. म्हणून तू त्याला त्याच्या आनंदापासून वंचित केलंस. त्याने केलंय तुला कुठल्या आनंदापासून दूर?**

इराचे वडील इरिगेशन विभागातले एक मोठे अधिकारी. आईचे उत्तम चालणारे बुटिक आणि स्वतः इरा संस्कृतची विद्यार्थिनी. ती तिचा पीएच.डी.चा अभ्यास करत असतानाच हे स्थळ आले. स्थळ लाखात एक म्हणावे असे. प्रतिष्ठित वकिलांचे घर. पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले नावाजलेले वकील तिचे सासरे. जगन्नाथ पंडित स्कॉलरशिप मिळवलेली आणि आता फार मोठ्या नाही पण नावाजलेल्या कॉलेजमध्ये संस्कृत विषय शिकवणारी सासू, 'एनआयडी'मधून मेरीटवर फॅशन डिझाइनरची पदवी मिळवलेली धाकटी नणंद प्राची आणि 'आयआयटी' खरगपूरमधून मेकॅनिकल इंजिनिअर झालेला आणि मुंबईत, सायन इथे कंपनीमध्ये नोकरी करणारा सौमित्र, तिचा होणारा नवरा. प्राचीने 'आयआयएम'मधल्या एम.बीए. झालेल्या प्रांजलशी लग्न ठरवले होते आणि सध्या ते ह्युस्टनला एकत्र राहत होते. कोण म्हणेल हे वाईट स्थळ आहे म्हणून?

पहिल्याच ओळखीत तुला स्वयंपाक येतो का, गाता येते का अशा प्रश्नांऐवजी सासूशी 'शाकुंतल', 'कुमारसंभवम्' वगैरे कालिदासाची नाटके, 'गंगालहरी'चे त्या करत असलेले भाषांतर यावर त्यांचे बोलणे झाले त्यामुळे इरा खूप आनंदली होती. घरातले सुसंस्कृत वातावरण आजूबाजूच्या गोष्टींवरून जाणवत होते. घरात संगीताचे वातावरण असावे. अत्यंत अदबशीरपणे कडेला एका तपकिरी जाजमावर एक तंबोरा स्वच्छ खोळीत ठेवला होता. शेजारी आयताकृती कप्प्यात कॅसेट्स, भिंतीलगत असलेल्या सागवानी कपाटांमध्ये हरतऱ्हेची पुस्तके. मराठी, इंग्रजी आणि संस्कृत साहित्य. वेगवेगळे शब्दकोश, 'भरतमुनींचे नाट्यशास्त्र', किशोरीताई आमोणकरांचे 'स्वरार्थ रमणी', अगदी विजयाबाईंचे 'झिम्मा' सुद्धा. मधल्या कप्प्यात लेदरचे बाईंडिंग असलेले शेक्सपिअरच्या नाटकांचे खंड, प्रेमचंद, अमृता प्रीतम आणि कित्तीतरी अनेक आणि आबा- तिच्या सासऱ्यांच्या ऑफिसमध्ये तर सगळे छान ओळीने लावलेले 'एआयआर'चे खंड असलेली कपाटे.

सौमित्र उंच, दिसायला आकर्षक. त्यापेक्षा त्याच्या बोलण्यातला सहजपणा, शाब्दिक विनोदी कोट्या करणारा, सहजपणे कोणालाही आवडेल असाच.

अतिशय संस्कारित, छोटेखानी पद्धतीने लग्न झाले. सगळेच अत्यंत आनंदात होते. लग्नानंतर ठरावीक पद्धतीने हनीमूनला जाण्याऐवजी ते दोघे त्यांचे कुटुंबमित्र सरपोतदार यांच्या शेतघरी, त्यांच्या प्रेमळ आग्रहाखातर गेले. गाडीत जाताना रफी, किशोर कुमार यांची गाणी लावली होती. त्याबरोबर गाणी म्हणत



ते पोचले. सरपोतदार काका आदरातिथ्य व्यवस्थापनातले एक मोठे अधिकारी. त्यांचं शेतघर म्हणजेच एक व्यवस्थापन शिकवणारी संस्था होती असे वाटावे. एका जलाशयाच्या कडेला असलेली तीनेकशे एकर जमीन. त्यात लावलेली लक्षावधी झाडे. देखरेख ठेवणारे, देखभाल करण्यासाठी नेमलेले, माळी कामातले तज्ज्ञ, कीटकनाशकासाठीचे नेमलेले वेगळे लोक, असे त्या शेतघरात बरेच विभाग आणि त्या प्रत्येकाचा वेगळा स्टाफ असे पस्तीस चाळीस लोक त्या शेतघराच्या तैनातीत असत.

इरा आणि सौमित्र ठरल्यानुसार सकाळी साडेआठ वाजता तिथे पोचले. रस्त्याकडेने दुतर्फा असलेल्या झाडांपासून ते आतल्या छोट्या-छोट्या कुंड्यांमधल्या सगळ्या झाडांना अद्ययावत झारीने आंघोळी घातल्या होत्या, त्यामुळे हिरवीगार, टवटवीत झाडे. त्यांचा गारवा अनुभवत दोघे नक्षीदार भल्यामोठ्या गेटपाशी पोचले. दमदार मिशांच्या उंच आणि धिप्पाड वॉचमनने मिशीतल्या हसण्याने त्यांचं स्वागत केलं. समोरच शेडखाली गाडी लावली आणि उतरून आठ पावलं जाऊन हिरवाईचा अनुभव घेत असतानाच एक मुलगी हातात ट्रे घेऊन उभी. इराने पाहिले तर त्या ट्रेमध्ये स्फटिकांच्या वाटीमध्ये पाच सोललेले टप्पोरे बदाम आणि तसल्याच काचेच्या ग्लासमध्ये शहाळ्याचं पाणी. अशा प्रसन्न स्वागतांनी सुरुवात. सरपोतदार काका साध्या, पण इस्त्रीच्या पांढऱ्या मलमलच्या कुडत्या पायजाम्यात हातात झाडे कापण्याची कात्री घेऊन नको असणारे फांद्यांचे धुमारे हलक्या हातांनी कापत होते. नव्या दांपत्याला पाहिल्यावर तोंडभर हसून आणि कौतुकभरल्या डोळ्यांनी त्यांनी खूप प्रेमाने त्यांचे स्वागत केले. नमस्काराला शुभाशीर्वाद दिले आणि त्यांना नाष्ट्यासाठी घेऊन गेले. गेल्यागेल्या एका पिंट्या पोराने हात स्वच्छ करायला सुवासिक द्रव्य दिले. अप्रतिम नाष्टा. एखाद्या पंचतारांकित हॉटेलपेक्षा कैकपटीने सोयी, सुविधा आणि सुंदरता तिथे भरून राहिली होती. थोडे चालून झाल्यावर पाण्याची आठवण आली की तिथे पाण्याची सोय असेच. झगझगीत नसलेल्या पण उच्च अभिरुचीने सजवलेल्या त्या घराशेजारी एका बाजूला लायब्ररी होती, त्याच्या शेजारी एक बॅडमिंटनचे कोर्ट, नुसतं डुंबण्यासाठी सुरेख चिमुकला स्विमिंग पूल. खाण्यापिण्याची काळजी घेणारी सत्यभामा मावशी. यापेक्षा अधिक सुख ते काय असा विचार करत इरा आणि सौमित्रचा तो अख्खा दिवस अशा सुखासीन गोष्टी अनुभवण्यातच गेला.

सरपोतदार काकांनी त्यांची हनिमूनसाठीची खोली पण सुंदर सजवली होती. शेतातले गुलाबी पेरू, रसरशीत चिक्कू भरून ठेवलेली फळांची टोपली, सौम्य शांत संगीत, मनोहर पडदे, चांदणी-प्रकाशाचे दिवे. खिडकीतून चंद्र दिसेल अशी कॉटची मांडणी.

आंघोळी करून नवाच घेतलेला छोट्या फुलांचा गुढग्यापर्यंतचा गाऊन अडकवून इराने कॉटवर आपले अंग सैलावले आणि सौमित्र येईपर्यंत दिवसभराच्या, गेल्या आठवड्याभरातल्या गोष्टी आठवत राहिली. अजून सगळ्याच नव्या गोष्टी समजून घेण्यात तिची थोडी तारांबळ होत होती पण कसला ताण नव्हता. असले तर कौतुकच होते. पाच दहा मिनिटे गेली. सौमित्र आला. तिने हसून डोळे उघडले. नव्या रात्री, नवे नाते फुलत होते. जॉन डनच्या कवितेतल्या सारखे, 'she is all states, and all princes, I, Nothing else is!' अशा तुडुंब आनंदात आयुष्याला सुरुवात झाली.

इराने भारी, भरजरी, कपडे एका छान रेशमी पिशवीत भरून ठेवले. सौमित्रचे पण लग्नातले रेशमी कुडते, नवे शर्ट दुसऱ्या एका रेशमी पिशवीत लावून ठेवले. एकाच कपाटात दोघांचे कपडे नीट लावताना, कपड्यांना हाताळताना देखील तिच्या मनात 'सौमित्र आपला' त्याच्याबरोबरच्या सहजीवनाची, एकरूपतेची भावना दाटून आली होती त्याच्या सॅम्सोनाइटच्या सूटकेसमधले कपडे लावण्यासाठी तिने ती उपडी केली. आणि..

आणि... अवाक होऊन ती त्या झिप असलेल्या पाऊच मधला हलक्या बदामी रंगाचा, त्याला सुंदर त्याच रंगाची वरपासून खालपर्यंत बटणे असलेला लांब झुळझुळीत फ्लेअर स्कर्ट, एक सूर्यफुलाच्या रंगाचा प्लाझो आणि एक दोन नाजूक फुलांचे, स्ट्रॉबेरीचं डिझाईन असलेले मऊ मऊ टॉप्स तिच्या पुढ्यात पडले.

हे काय? कुणाचे? सौमित्रची गर्ल फ्रेंड? की आणखी कोणी? की....त्याचेच स्वतःचे? की तो तृतीय पंथी .......???

इराचे डोके चक्रावले आणि मघाचा सगळा मूड ओहोटी सारखा ओसरून गेला. किनाऱ्यावर घाण पसरल्यासारखा.

संध्याकाळी सौमित्र आला पण तिचे घरात काही काम चालू होते, सौमित्रच्या आईबरोबर. ते आवरून, मनात त्या झिपर पाऊचचा अस्वस्थ विचार करत ती त्यांच्या खोलीत गेली. सौमित्र तो झिपर पाऊचमधला बदामी स्कर्ट आणि स्ट्रॉबेरीचं डिझाईन असलेला टॉप घालून रिचर्ड बाखचे 'इल्यूजन' वाचत पहुडला होता. उशीत डोकं रुतवून. अगदी निवांत, आनंदात, तृप्त भावनेने. इराची वाटच बघत.

ती त्याच्याकडे पाहू लागली. याहून डोळे मोठे होणे शक्य नव्हते एव्हढ्या मोठ्या डोळ्यांनी.

''हे काय आहे अरे सौमित्र? याचा काय अर्थ लावायचा सौमित्र?''

आश्चर्य, भीती, घृणा आणि अशासारख्या सगळ्या संमिश्र भावनेने इरा पाहत होती. थरथरत...

सौमित्रने तिच्याकडे पहिले. नीट आवरलेले कपाट पहिले, व्यवस्थित लावलेले कपडे आणि त्यामध्ये उघडून ठेवलेला तो झिपर पाऊच. इराच्या नजरेला तो घाबरलेलाही दिसला नाही आणि अपराधी तर मुळीच नाही. त्यामुळे ती आणखीच गोंधळात पडली.

''इरा, मी जेव्हा खूप आनंदात, मोकळा ढाकळा असतो नं गं,'' सौमित्र अत्यंत आश्वासक सुरात बोलत होता. ''तेव्हा नेहमी नाही पण क्वचित मला असे कपडे घालावेसे वाटतात.. फारच क्वचित. पण हो!''

इरा घाबरून, बावरून, विमनस्क, अनपेक्षिततेला सामोरी जायचा प्रयत्न करत होती. त्याने तिच्या मान्यतेच्या हुंकारासाठी अपेक्षेने पाहिलं पण इरा कोलमडून गेली होती. सौमित्रच्या इतक्या ठार प्रेमात असताना त्याच्याशी वितंडवाद करावा असं वाटत नव्हतं. पण हे मान्यही करता येत नव्हतं. संभ्रमित अवस्थेत असताना तो त्याच समजुतीच्या सुरात म्हणाला,

''काही जण कसे मज्जा म्हणून हुक्का पितात, कधीतरीच वाईन घेतात. हो की नै? तसंच. ते व्यसनी नसतात. पण मज्जा म्हणून कधीतरी स्वतःला सैल सोडणं.''

इरा ऐकत होती. तिला ते सारे पटत होते पण ती पटवून घ्यायला मुळीच तयार नव्हती. तिला पटत होतं आणि नव्हतंही.

''अरे पण मर्दानी...''

यावर काही उत्तर न देता सौमित्र हसला. तिला प्रेमाने जवळ घेतलं आणि म्हणाला, ''इरा, तुला त्रास व्हावा असं मी वागणार नाही. पण माझं असे हे कपडे घालणं गैर आहे असा त्याचा अर्थ होत नाही. मात्र तुझ्यासाठी मी आत्ता या क्षणापासून इथून पुढे कधीच घालणार नाही हे कपडे. कित्तीही वाटले तरी. चालेल?''

''माझ्यासाठी करच रे एवढं.'' अशा अविर्भावात तिने मान्यता दिली. त्याला आश्वासक मिठी मारली.

इराने मनातून हा प्रसंग काढून टाकला. ते झिपर असलेले पाऊच कधीच न काढण्याच्या एका ट्रंकेत टाकून दिले. सौमित्रने कुठेही ओरखडा येऊ न देता आयुष्यातला त्याचा आनंद एका कप्प्यात बंद करून टाकला. परत कधी उल्लेखही न करता. जाणवू ही न देता. त्यांचे आयुष्य आनंदात सुरू झाले. सौमित्र नेहमीप्रमाणे सगळ्यांशी प्रेमाने, चेष्टेने, गंमतीने बोलत होता. इरावर निरतिशय प्रेम करत होता. त्याच्या शृंगारामध्ये पण एक आदर दिसे. हळुवारपणा होता, माप ओसंडून उतू जावं इतकं समाधान होतं त्याच्या बरोबरच्या सहजीवनात.

***

मधूनच मासोळीसारखा तो प्रसंग तिच्या मनात उसळी मारे आणि ती अस्वस्थ होई. मी मला पाहिजे तसं, पाहिजे तेव्हा माझ्या आनंदाचा, माझ्या कंफर्टचा विचार करते. सौमित्रला त्याचा आनंद मिळवू न देणं, हा माझाच कंफर्ट होता. माझ्यासाठी त्याने केवढा त्याग केलाय, कधी चुकून बोलत नाही, मी चुकीचं वागतेय का? हे नॉर्मल आहे का? मी नाही त्याचे शर्ट घालत? पण ती सौमित्राशी हा विषय बोलणं टाळत असे. पण त्याचमुळे तिची अस्वस्थता वाढायला लागली होती. तो विषय त्याच्या मनात किती होता आणि तिच्या मनात किती याचे मोजमाप नसले तरी त्या एका गोष्टीवर न बोलता त्यांच्यात फारकत होतीच. ही सुखासुखी केलेली तडजोड होती की मन मारून? इराला कमीजास्त प्रमाणात अपराधी वाटे. एखाद्या किड्याने हळू हळू कुरतडावे, तसा तिचा अपराधी भाव तिचे मन कुरतडत होता.

दोन-तीन महिन्यांनतर ती आईकडे गेली. बरोबर सौमित्र पण होताच. जोडी तर दृष्ट लागण्यासारखी दिसत होती. सौमित्रचा खळाळता झरा सगळ्यांना बरोबर घेऊन वाहत होताच. इरा मध्येच गप्पगप्प होई. हे बघून आईचा जीव कासावीस होई. पण ती अदमास घेण्याचा प्रयत्न करी. सापडत तर काहीच नव्हतं. सौमित्र सगळ्यांशी मनमुराद गप्पा मारत होता. आईबरोबर मटार सोलायला बसे आणि त्याच्या ऑफिसमधल्या गंमतीजमती सांगून आईला हसवे. वडिलांबरोबर त्यांच्या विभागात जाऊन त्यांचे काम पाहा, कुठे कुठे सुधारणा सुचव. असा सगळ्यांना तो अधिकच आवडू लागला होता. त्याच्या वागण्यातून काही बिनसले असेल असे वाटण्याची सुतराम शक्यता नव्हती. मग इराचं हे मध्येच गप्प राहणं का? आईच्या मनात पाल चुकचुके पण तरी तिला विचारणे काही अनामिक कारणास्तव ती पुढे ढकलत राहिली. वडिलांना पण जाणवले होते, इराचे अधून मधून माणसात नसणे. पण त्यांनी समज करून घेतला की, नवीन आयुष्याला रुळताना लागतो वेळ कोणाकोणाला! आईची पण त्यांनी अशीच समजूत काढली. नसती चिंता!

इराला भेटायला तिच्या वर्गातली आणि आता मानसशास्त्रज्ञ असलेली तिची बालपणीची अगदी जवळची मैत्रीण, सुधा आली होती. नेहमीचा आरडओरडा करीत. जाताजाता आई भाजत असलेल्या शेंगदाण्याची मूठ भरून घेत ती तडक इरा होती तिकडेच गेली.

''इरा...... नाही आधी मुद्दाम हाक मारली गं.. उगाच व्यत्यय नको माझा.'' असं म्हणून डोळे मिचकावत आली.

''फारच सूज्ञपणा आहे हं तुझ्यात'' असे म्हणून सौमित्रने सुधाच्या डोक्यावर टपली मारली आणि मैत्रिणींना एकटेपणा दिला.

दोघी बोलत राहिल्या. पूर्वीसारख्याच. विषय संपले तरी बोलत होत्या.. आणि आकस्मिकपणे सुधा म्हणाली, ''इरा, सगळं ठीक आहे नं?'' इराच्या डोळ्यांतले तरळते भाव सुधाच्या डोळ्यांना भिडले आणि दोघी काही क्षण एकमेकींकडे एकटक पाहत राहिल्या. सुधाची नजर टिपकागदासारखी होती. म्हणूनच ती ख्यातनाम मानसशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध होती.

''सुधा...''

एव्हाना इराचे मन मोकळेपणाने बोलायला राजी झाले होते पण खूप रात्र झाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्या क्लिनिक मध्ये इराने यायचं असं सांगून ती घरी गेली.

***

सुधाचे क्लाएन्ट येण्याआधी इरा सुधाकडे पोचली. सुधाच्या केबिनमधला आकाशी निळा सौम्य रंग, संथ चालू असलेली तोडी रागातली सतारीची सीडी, डोळ्यांना खुपणार नाहीत पण मनाला टवटवीत करणारे सौम्य पांढऱ्यावर पिवळ्या फुलांचे पडदे आणि हसतमुख सुधा.

शेजारच्या पांढऱ्या, सोनेरी कड असलेल्या किटलीतून केशर घातलेला चहा ओतत सुधाने इराला बोलकं केलं.

''इरा, काय खुपतंय? मोकळेपणाने बोलूया.''

''सुधा, मुलांनी मुलींचे कपडे घालणं नॉर्मल आहे? बरं वाटण्यासाठी स्वतःला?'' इराने विषयालाच तोंड फोडले. सुधाने का कशासाठी असे प्रश्न न करता अतिशय अभ्यासपूर्ण चर्चेला सुरुवात केली.

''अगदीच! More than what you imagine.''

''नॉर्मल'! या नॉर्मल असण्याच्या कल्पना कधी तपासून बघतो आपण? कोणी ठरवलं काय नॉर्मल आणि काय नॉर्मल नाही ते? लहानपणी मुलासारखे कपडे घालू नकोस, मुलांसारखी पाय फाकवून बसू नकोस भिंतीवर, मुलांसारखी मोठ्याने बोलू नकोस, मुलासारखी उलट उत्तर देऊ नकोस, म्हणून मुलीला छाटलं जातं. पटतंय तुला? तसंच मुलाला पण. मुलीसारखा रडू नकोस, झुरळाला-अंधाराला घाबरायला मुलगी आहेस काय? अरे, बाहुलीशी काय खेळतोयस मुलीसारखं अशा किती गोष्टी बघतो आपण. तू आणि मी देखील गेलोय यातून.''

इरा, डोळ्यांनी ऐकत होती.

''मुली नाही घालत मुलांचे कपडे? त्यांना स्मार्ट म्हणतो समाज. का तर मुलांसारखं म्हणून. मुलींनी बुलेट चालवणं हा त्यांचा स्मार्टपणा. मुलांना न येणं, त्यांचा पुचाटपणा. कधी तरी एकच मुलगा मुलाच्या आणि मुलीच्या आवाजात गाणं म्हणलेलं ऐकलं असशील.. 'ये रातें, ये मौसम नदी का किनारा... सारखं. वन्स मोअर मिळतो त्याला. क्या बात! म्हणून टाळ्या मिळतात. त्याला नॉर्मलपेक्षा वेगळा नाही समजत, पण प्रत्येक वेळेस पारडी वेगळी असतात गं समाजाची नॉर्मल ठरवायची.

आणि नं इरा, या सगळ्याला अतिशय दुर्दैवाने ही पुरुषप्रधान संस्कृती कारणीभूत आहे बघ. या विचाराला ऐरणीवर ठेवून पाहिलंस तर अनेक पातळ्यांवर तुला पटेल बघ हे. मुलींनी नाजूक, दुसऱ्यावर अवलंबून राहणं, लाजणं, हळुवार वावरणं, खरेतर प्रसंगी बावळट असणं, हे समाज मान्य करतो; कुठला? पुरुषप्रधान समाज. म्हणून तर मग सिनेमात हिरो येतो उडी मारून तिला वाचवायला. केवळ पुरुष आहे म्हणून तो धीट नसतो अगं इरा. हा समाज मनासारखं नाही वागू देत लोकांना. कित्तीतरी प्रसंगात. आपल्या आयुष्याच्या दोऱ्या अदृश्यपणे आपण त्यांच्या हातात देतो आणि स्वतःच दुःखाला कारणीभूत होतो.

''पण का विचारतेयस हे सांगशील मला?''

इराने तिच्या आयुष्यात कुलुपबंद केलेला प्रसंग तिला सांगितला आणि खरं तर तिला खूप हलकं वाटलं त्या क्षणी.

''सौमित्रने काल कोणता शर्ट घातला होतं तुला आठवतोय?''

मध्येच काय विचारतेय अशा नजरेने तिने नकारार्थी मान हलवली.

बघ इतके आपले डोळे रुळलेले असतात या गोष्टींना. केवळ त्याच्या निवांत वेळी त्याने त्याला हवं ते घालण्याने एकांतात सुद्धा बिथरलीस बघ तू हो नं? तू जितकं बोलशील आजूबाजूला, तितकं तुला वाटेल हे किती नॉर्मल आहे. समाजाच्या चाकोरीतून मोजणं हे खरंच अन्यायकारक आहे कोणत्याही व्यक्तीसाठी. तू नाही जीन्सवर

त्याचा स्वेटशर्ट घालत? किती मुलं पोनी घालतात, हातात कडी घालतात. मुलं, मुली तो अलिबाबासारखा हारेम स्कर्ट घालतात बघ! त्यांना आपण तृतीयपंथी म्हणतो का? माझ्याकडे येणारे कितीतरी जण या पेचातून बाहेर येण्यासाठी धडपडत असतात. काही स्त्रीचा वेश करून बाहेर पडतात, हेल्मेट घालून जातात. कितीतरी जणांचा स्वतःचा कंफर्ट झोन असू शकतो तो.

इरा, रंगपटलावरचे सगळे रंग मानवी नजरेला दिसत नाहीत. जे दिसतात त्याच्या किती छटा असतात. हो नं? तितकेच न दिसणारे रंग आणि त्याच्याही तेवढ्याच छटा आहेत. म्हणून त्यांना नाकारणं योग्य आहे? हं ! जसे डावखुरे लोक कमी असतात, साधू होण्याची इच्छा काहींनाच असते, गे, लेस्बियन यांची पण टक्केवारी कमी असेल, पण माणसच आहेत नं ती? ही सगळी तुझ्यामाझ्या सारखीच मन असलेली माणसं आहेत इरा. अगदी असंच, मुलींचे कपडे घालावेसे वाटणं, असं वाटणाऱ्यांची टक्केवारी कमी असेल पण ते अगदी तुझ्या माझ्या इतकेच नॉर्मल आहेत इरा. समाजाचा चेहरा कोणता? कोणताच नाही. समाजाची जीभ सगळ्या बाजूने बोलणारी. तुला समाजाचा ताण येतोय. म्हणून तू त्याला त्याच्या आनंदापासून वंचित केलंस. त्याने केलंय तुला कुठल्या आनंदापासून दूर? अशा विचारांचा अडसर लवकरात लवकर दूर करायलाच हवा. रसरशीत नात्यासाठी, इरा!''

आणि आता इराला रडू येऊ लागलं. सुधाने तिला पोटभर रडू दिलं. तिच्या मनातली सगळी किल्मिषं नाहीशी झाली. खोडरबराने खोडावीत तशी. या अडाणीपणातून इतक्या हळुवार आणि बुद्धिवादी विचाराने आपल्याला बाहेर काढलं, इतक्या दिवसाचं हे ओझं किती अलगदपणे काढून घेतलं या विचाराने इराने अश्रूंनी डबडबलेले डोळे पुसण्याची तोशीस न घेता, सुधाला घट्ट मिठी मारली. तिला सोडायला दारापर्यंत सुधा आली. हसून निरोप घेतला.

***

घरी दुपारच्या जेवणानंतर गप्पाटप्पा झाल्यावर सौमित्र आणि इरा निघाले, परत लवकर येण्याच्या बोलीवर. घरी गेले. आपापली कामे करून दोघं आपल्या खोलीत गेले. आरती प्रभूंचं 'नाही कशी म्हणू तुला...' गाणं सुरू होतं. चंद्रप्रकाशाने खोली भरली होती. बाहेरच्या रातराणीचा सुगंध खोलीभरून व्यापला होता. इरा गादीवर निवांतपणे पडली होती. सौमित्र आला. आणि उशीशेजारचे, 'ते' झिपर पाऊच उघडे करून ठेवलेले त्याने पहिले. हसऱ्या, तिरप्या नजरेने इरा त्याच्याचकडे बघत होती. त्याने चमकून इराकडे पहिले. आणि...

आणि दोन डोळ्यांमधल्या एकमेकांबद्दलच्या विश्वासाची नजर एकमेकांत गुरफटून गेली.


**– डॉ. अपर्णा महाजन**

भ्रमणध्वनी : ९८२२०५९६७८

aparnavm@gmail.com




**स्त्रीपुरुष नातेसंबंधांचा पूर्वग्रहरहित मनाने वेध घेणारा वैशिष्ट्यपूर्ण अंक**

२०१८

संपादक : हरीश सदानी  **विशेष संपादन सहाय्य :** मुक्ता चैतन्य

मुखपृष्ठ : अनिल दाभाडे  मूल्य : **१७५ रुपये**

***यंदाच्या 'सोशल मीडिया व जेंडर' या विशेष विभागात सहभागी :***



**लेख** – गणेश मतकरी, हर्षद सहस्रबुद्धे, प्रसन्न जोशी, दिशा पिंकी शेख, रेणुका खोत, अलका गाडगीळ, अमोल उद्गीरकर, मेघना वाहोकार, मुक्ता चैतन्य.

**इतर लेख** – संजय भास्कर जोशी, भूषण कोरगावकर, श्रीपाद ब्रह्मे, राहुल बनसोडे व इतर

**कथा** – ऐश्वर्य पाटेकर, माधव गवाणकर, गुरुनाथ तेंडुलकर, वंदना भागवत, डॉ. विजय पांढरीपांडे, रोहिदास कवळे

**कविता** – हेमंत जोगळेकर, प्रशांत असनारे, इंद्रजित भालेराव, राज चिंचणकर, पद्मरेखा धनकर, भारती डिग्गीकर, अंजली कुलकर्णी, प्रशांत मोरे, वसंत वाहोकार व इतर

**विशेष** – सर्वोच्च न्यायालयाने समलैंगिकता वैध ठरविणारा निकाल दिल्याच्या पार्श्वभूमीवर अनिकेत गुळवणी व संदेश कुडतरकर यांचे लेख
समीर समुद्र व अमित गोखले या जोडप्याची पत्रकार ओंकार करंबेळकर यांनी टिपलेली स्पंदनं

प्रकाशक : **मेन् अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा)**
७०५, परिश्रम बिल्डिंग, भंडार गल्ली, ले. ज. रोड, माहीम, मुंबई – ४०० ०१६.
दूरध्वनी : ९८७०३०७७४८  इ-मेल : saharsh267@gmail.com

मूळ कथा : प्रतिभा राय

अनुवाद : वसुधा सहस्त्रबुद्धे

# चंद्रभागा आणि चंद्रकला

**अपरिचित-अवांछित देह निष्काळजीपणे पलंगावर टाकून चंद्रा निश्चिंतपणे पडली होती. बारा वर्षांचं निष्ठुर सत्य प्रत्येक क्षणी पुन्हा-पुन्हा स्वीकारून अविचलपणे ती माझ्याकडे बघत होती. तिच्यावर दया दाखवून दु:ख व्यक्त करण्याची इच्छा अचानक नाहीशी झाली.**

चंद्रकलांचा ऱ्हास आहे आणि वृद्धीसुद्धा म्हणूनच खंडित चंद्र इतका सुंदर दिसतो कारण त्याच्यामागे एक अदृश्य कुंचला पूर्णतेचं चित्र बनवित असतो, परंतु तिच्याकडे बघितल्यावर, मी विचार करतो तेव्हा असं जाणवतं की तिचा जणू दिवसेंदिवस क्षय होतो आहे. हळूहळू ती संपते आहे.

तिच्याकडे बघून बुद्धाच्या अमर वाणीची आठवण येते. पहिलं आर्यसत्य दु:ख. माणसाच्या जीवनातील दु:ख हे एक विदारक सत्य आहे, परंतु दु:खातही माणूस सुख शोधण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्या प्रकारांनी दु:ख कमी करतो म्हणूनच रोगग्रस्त माणूस औषधोपचारांची मदत घेतो. मनाला समजावतो, रोग क्षणिक आहे. निरोगी जीवन शाश्वत सत्य आहे परंतु माणसाला माहिती आहे की प्रतिकूल गोष्टी दृढ असतात. खरं तर आशा माणसाच्या दु:खाचं कारण आहे, परंतु आशाच माणसाला जिवंत ठेवते. आशाच माणसाला आनंद देते. मात्र आनंद क्षणिक आहे.

मला समजत नव्हतं, ती कोणत्या आशेवर जगते आहे? ती तिच्या मनाचं सांत्वन कसं करून जगते आहे, हे माझ्या समजण्यापलीकडे आहे. डॉक्टरांनी तिच्या जीवनातलं शेवटचं सत्य सांगितलं आहे. आज त्या रोगावर कोणताही उपाय नाही. कितीही फी दिली तरी कोणताही डॉक्टर तिला बघायला येण्याचं साहस करीत नाही. तरीही ती जगते आहे आणि जगण्यावर प्रेम करीत जगते आहे. मला तिच्या मनाच्या सामर्थ्याचं आणि सहनशीलतेचं आश्चर्य वाटतं. मी गोंधळून जातो. असं वाटतं प्रतिकूल परिस्थितीच माणसाला जगायला बळ देते.

तिच्याशी माझ्या परिचयाचं कारण ती स्वत:च आहे.

एक दिवस अचानक तिने फोनवर सांगितलं, ''नमस्कार, मी चंद्रा बोलते आहे. चंद्रभागा दास. मला तुमचं लेखन आवडतं. मी तुमची वाचक आहे. तुमचं जवळजवळ सगळं लेखन मी वाचते आहे. तुम्हाला बघण्याची खूप इच्छा आहे.''

मी नम्रपणे म्हटलं, ''दररोज संध्याकाळी मी घरीच असतो. कधीही या.''

शांततेचा उदास स्वर मला आग्रहाने स्पर्श करीत होता. पुन्हा आवाज आला, ''मागील बऱ्याच दिवसांपासून मी आजारी आहे. असं ऐकलं की तुम्ही आमच्या घराजवळच राहता. कृपा करून जर तुम्हीच एकदा आला असता...''

कृपा करायची म्हणून नव्हे, तर उत्सुकतेपोटी मी तिच्या घरी गेलो आणि त्यानंतर पुन्हा-पुन्हा जात राहिलो. सगळ्या कार्यव्यवस्थेमध्ये एक अदृश्य आकर्षण मला तिच्याकडे खेचून नेत होतं.

पहिल्या दिवशी गेलो तेव्हा ती एक लांबलचक गाऊन



घालून पलंगावर पडून होती. तिच्या वडिलांनी- लंबोदरबाबूंनी माझी ओळख विचारली आणि आग्रहाने मला आत घेऊन गेले. मुलीशी माझी ओळख करून दिली. तुला ज्यांचं लेखन खूप आवडतं, ते हे लेखक प्रभात राय. तूच फोन करून त्यांना बोलावलं ना?

हात जोडून तिने नमस्कार केला, परंतु पलंगावरून उठली नाही. उठण्याचा प्रयत्नही केला नाही. कदाचित तब्येत बरी नसल्यामुळे अशक्तपणा वाटत असेल किंवा डॉक्टरांनी उठण्याची मनाई केली असेल. तिचा चेहरा एखाद्या पांढुरक्या आणि मरगळलेल्या पानासारखा वाटत होता. सरळ धारदार नाक रहस्यमय आवेगाने थरथरत होतं. एक प्रकारच्या निष्पाप कांतीने तिचा चेहरा आकर्षक वाटत होता. हरवलेले उदास डोळे भावपूर्ण होते. तिची दृष्टी गूढ, मनाला भिडणारी होती. ती माझ्याकडे एकटक बघत होती. जणू काहीतरी शोधत होती. त्या तेजस्वी, सडपातळ तरुणीची सहज नि:संकोच नजर! मला वाटलं, एका अपरिचित लेखकाला घरी बोलावून ही मुलगी नि:संकोचपणे जीवनातील (कोणत्या तरी) गहन गूढ प्रश्नाचं उत्तर शोधत असेल का?

मी विचारलं, ''तुम्हाला काय झालंय? केव्हापासून आजारी आहात? ताप आहे का? डोकं दुखतं का?''

माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता ती उदासपणे हसली. त्यानंतर माझ्या अनेक पुस्तकांवर बोलू लागली. मी सुद्धा तिचं आजारपण विसरून माझ्या पुस्तकांवर चर्चा करू लागलो. त्या मुलीला माझ्या पुस्तकांवर लेखन जितकं आवडलं होतं, त्यापेक्षा अधिक ती मुलगी मला आवडली होती. मध्येच तिची आई चहा व नाश्ता देऊन गेली. घरातल्या माणसासारखं साधं पान बनवून दिलं. पहिल्याच भेटीत तिचं आजारपण विसरून तिच्याशी दोन तास गप्पा मारीत बसलो. उठता-उठता आपल्या घरच्या माणसासारखं म्हणालो, ''आता भेटायची तुझी पाळी. खूप लवकर बरी होऊन आईबरोबर माझ्या घरी येशील अशी आशा करतो. माझ्या पत्नीलाही खूप आनंद होईल.'' उत्तरादाखल पडल्या-पडल्याच तिने मरगळलेलं मूक स्मित केलं. ज्यामध्ये माझ्या घरी येण्याचं वचन नव्हतं.

उभ्याउभ्याच मी विचारलं, ''माझ्या लेखनाबद्दल खूप काही बोललीस तू, परंतु स्वत:बद्दल काहीच सांगितलं नाही. कोणत्या कॉलेजमध्ये जातेस? आर्ट्स की सायन्स? डॉक्टरांनी किती दिवस आराम करायला सांगितला आहे? पहिल्याच भेटीत यापेक्षा अधिक

तिला काय विचारणार?

निराशपूर्ण आवाजात ती म्हणाली, ''माझ्याबद्दल काय सांगू? जाऊ दे, पुन्हा केव्हातरी! आज मी तुमचा खूप वेळ घेतला, परंतु तुम्हाला भेटून खूप बरं वाटलं. पहिल्याच भेटीत तुम्ही तुमच्या साहित्यासारखे खूप जवळचे - आपले वाटलात. माझ्या फोनवरील बोलावण्याने तुम्ही आलात हेच माझं भाग्य.'' धन्यवाद देऊन अतिशय संतुष्टपणे स्मितहास्य करून मी खोलीबाहेर पडत होतो. तोच गॅलरीतील एक कोपरा बघून स्तब्ध झालो. मला वाटलं, माझा तरुण उष्ण रक्तप्रवाह थंड होऊन गोठू लागला आहे. मी थबकलो. घसा कोरडा पडला. छातीत धडधडू लागलं. माझी भयकातर दृष्टी त्या अनपेक्षित वस्तूपाशी थांबली. मनात विचार आला नशिबाचं उत्थान आणि पतन किती दुःखमय आहे! दवबिंदूसारख्या स्वच्छ, निष्पाप या कोमल वयातील मुलीच्या कृतकर्माचं फळ इतकं विषमय होऊ शकत नाही की ज्यासाठी तिला इतका मोठा शाप मिळाला आहे. तिच्या नशिबाची ही क्रूर थट्टा आहे.

तिचे वडील निर्विकार स्वरात म्हणाले, ''बारा वर्षांपूर्वी चंद्रा सरळ कंबर ठेवून ताठ बसत असे. हल्ली बसायलाच येत नाही. किती दिवस झाले व्हिलचेअर तशीच पडून आहे. आता बहुतेक तिचा कधीच उपयोग होणार नाही.''

''हे प्रभू!'' माझ्या इच्छेविरुद्ध नकळत व्याकूळ शब्द बाहेर पडले.

तिचे वडील म्हणाले, ''डॉक्टर जेव्हा चंद्रा बरी होण्याची खोटी आशा दाखवायचे तेव्हा सुरुवातीला मी सुद्धा देवाचं स्मरण करायचो. आता डॉक्टरांनी चंद्राबद्दल त्यांचा शेवटचा निर्णय सांगितला आहे. आता मी देवाचं स्मरण करीत नाही. हल्ली देवळात जायला लागत नाही की हॉस्पिटलमध्ये जायला लागत नाही. त्यामुळे धावपळ कमी झाली आहे. चंद्रा नर्सिंग होममध्ये पाच वर्ष होती. त्यावेळी हॉस्पिटलमध्ये आणि देवळात धावता-धावता मी अगदी अर्धमेला झालो होतो.''

मी गप्प राहून सगळं ऐकत होतो. उभ्याउभ्याच त्यांनी आपलं मन मोकळं केलं. ''तेव्हा चंद्रा दहा वर्षांची होती. कमरेजवळ पाठीच्या कण्यात वेदना होऊ लागली.'' डॉक्टर म्हणाले, ''ऑपरेशन करावं लागेल.'' ऑपरेशननंतर कमरेखालच्या भागात दोष निर्माण झाला. तिला स्थिर बसता येत नव्हतं की शांतपणे चालता येत नव्हतं. त्यामुळे घरी आणि शाळेत रोजच रागावलं जायचं. बारा वर्षं झाली आज ती शांत पहुडली आहे. ही अंधारी खोली हेच तिचं जग आणि हे इथलं छतच तिचं आकाश आहे. देवाने तिला जिवंत का ठेवलं आहे मला समजत नाही. आता आमचं आयुष्य किती उरलं आहे? आमच्यानंतर तिची काय दुर्दशा होईल, याचा तुम्ही विचार करू शकता?''

मी चंद्राकडे पाठ करून उभा होतो. ती आमचं बोलणं ऐकत होती, परंतु तिच्याकडे वळून बघायचं धैर्य मला होत नव्हतं. माझ्या डोळ्यांत या वृद्धाच्या डोळ्यांतील असहाय्यतेचा एखादा कण जरी असता तर मी तिला काय दिलासा देणार होतो? माझ्या लेखनावर चंद्राची खूप श्रद्धा आहे. आपल्या आयुष्यातील समस्येचं उत्तर जर तिने माझ्याकडे मागितलं तर मी तिला काय उत्तर देणार?

धीर करून मागे वळलो. चंद्राला सामोरं जायचं ठरवलं. तिच्या आजारपणाबद्दल कळल्यानंतर काही एक न बोलता गुपचूप निघून गेलेलं चंद्राला आवडलं नसतं कदाचित, परंतु चंद्राला तिच्या अर्धमृत देहाबद्दल काय सांगू? काही तरी सांगायचं ठरवून मन कठोर केलं, मनातील सगळी कोमल सहानुभूती नष्ट करून ''मला खूप दुःख झालं आहे.'' असं सांगायचं ठरवून चंद्राकडे वळून बघितलं आणि मी स्तब्ध झालो.

अपरिचित-अवांछित देह निष्काळजीपणे पलंगावर टाकून चंद्रा निश्चिंतपणे पडली होती. बारा वर्षांचं निष्ठुर सत्य प्रत्येक क्षणी पुन्हा-पुन्हा स्वीकारून अविचलपणे ती माझ्याकडे बघत होती. तिच्यावर दया दाखवून दुःख व्यक्त करण्याची इच्छा अचानक नाहीशी झाली. मी बघितलं, तिचे डोळे दगडासारखे स्थिर होते. चेहरा इतका निर्विकार की वास्तविक वेदनेचा मागमूसही नाही. जणू चंद्रा नव्हे, मीच असहाय्य होऊन चंद्राकडे करुणेची भीक मागत होतो. काय म्हटलं तर चंद्राच्या निष्पाप, निर्भय आत्म्याला त्रास होणार नाही, ती अपमानित होणार नाही, हे जाणून घेण्यासाठी मी मनातल्या मनात चंद्राजवळ विनंती करतो. चंद्राला माझी लाचारी समजते आहे. बारा वर्षांत तिने किती ओळखी-अनोळखी लोकांना तिच्या दुःखाने लाचार होताना बघितलं आहे. दुसरी माणसं जेवढी असहाय्य झाली, तिने तेवढीच शक्ती तिच्या आत मिळवली. कारण तिला समजतं दया, करुणा मिळाल्याने कोणाचं दुःख कमी होत नाही. जे गेलं आहे ते परत येत नाही. तिने जे भोगलं आहे ते खोटं होणार नाही.

चंद्राने शांतपणे स्थिर आवाजात म्हटलं, ''किती वेळ उभे राहणार? तुम्हाला बोलावून मी खरंच त्रास दिला.''

संकोचत मी म्हणालो, ''नाही, नाही मला काहीच त्रास झाला नाही.'' मी आणखी काही बोलू शकलो नाही.

चंद्राने पटकन म्हटलं, ''तुम्ही जर माझ्याबद्दल विचार करीत असाल, तर माझ्यासाठी एक काम कराल?''

''सांग ना, माझ्या आवाक्यात असेल तर नक्कीच करीन. वचन देतो तुला.''

चंद्रा दृढपणे म्हणाली, ''तुम्हाला माझी विनंती आहे. तुम्ही माझ्यावर कधीही दया करू नका. गेल्या बारा वर्षांत लोकांनी मला इतकी दया दाखविली आहे की त्यामुळे मी अधिकच दीन झाले आहे. हा देश दरिद्री आहे असं म्हणतात, परंतु आपल्याकडे दया-दक्षिणा इतकी आहे की त्यावर माणसं जगतात. वाईट वाटून घेऊ नका.''

त्या अचल शरीराच्या तेजस्वी बुद्धिमान मुलीकडे एकटक बघत मी विचार करीत होतो, माझी लाचारी बघून चंद्रा माझ्यावर दया तर करीत नाही ना? खरं तर ज्या मुलीची चिंतनशक्ती इतकी प्रखर आहे की तिला दया दाखविणं म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे.

''पुन्हा येईन, शुभ रात्री.'' एवढंच म्हणून निरोप घेतला व बाहेर आलो. गॅलरीतल्या व्हिलचेअरकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केलं.

चंद्राची विकलांगता जाहीर करणारी ही निर्जीव वस्तू खुर्ची सत्य आहे, हे मानायला मन तयार नव्हतं.

गेटपर्यंत सोडायला आलेल्या वडिलांनी हळूच म्हटलं, ''खरं तर चंद्राला सांगून मीच तुम्हाला इथे बोलावलं. तुम्ही चंद्राला एक मदत कराल?''

मी आग्रहाने म्हटलं, ''माझ्याकडून जेवढं शक्य होईल आणि ज्यामुळे चंद्राचं कल्याण होणार असेल, तेवढं मी नक्की करीन.''

दु:खपूर्ण स्मित करीत ते म्हणाले, ''होय, त्यामुळे चंद्राचं कल्याणच होईल. त्याशिवाय आणखी कशानेच तिचं कल्याण होणार नाही.''

मी चकित होऊन उभा होतो.

ते म्हणाले, ''मी विचार केला आहे, चंद्राला सांगेन तिने सरकारला एक विनंतीपत्र सादर करावं, परंतु ते तुम्ही चांगल्या भाषेत लिहून द्या.''

मी उत्सुकतेने विचारलं, ''सांगा तर, काय लिहायचं?''

निश्चयपूर्ण स्वरात ते म्हणाले, ''ती आत्महत्या करील. सरकारकडे त्यासाठी अनुमती मागणारं निवेदन करील. माझ्या मृत्यूपूर्वी तुमच्या प्रयत्नाने एवढं काम जरी झालं तर मी शांतपणे मरू शकेन. लाड, प्रेम, सेवा-शुश्रूषा चालू असताना ती गेली तर मला आनंद होईल. तसंही आमच्यानंतर तिचा मृत्यू निश्चितच आहे. परंतु अतिशय हाल आणि बेपर्वाईमुळे तिला मरण येईल, याची तुम्ही कल्पना करू शकता?''

वृद्धाच्या या निष्ठुर वात्सल्याने माझे डोळे पाणावले. चंद्राची आईसुद्धा निर्जीव डोळ्यांनी माझ्याकडे बघत होती. मला तिथून पळून जावंसं वाटत होतं. असं वाटलं जणू कोणाच्या तरी हत्येच्या अपराधात मी बांधला गेलो आहे. काय उत्तर देऊ?

मी विचारलं, ''ही गोष्ट चंद्राला माहिती आहे?''

वृद्ध म्हणाला, ''होय, एक प्रकारे मीच तिला आत्महत्येसाठी तयार करतो आहे. तडफडून प्राण जाण्यापेक्षा हे चांगलं आहे. आमच्या डोळ्यांसमोर तिच्या भग्न शरीरातील शिल्लक असलेल्या भागातून तिचा इवलासा प्राण निघून जाईल.

''यासाठी चंद्रा तयार आहे?''

विद्रूपपणे हसत वृद्ध म्हणाला, ''जर चंद्राच्या सहमतीने ही दुनिया चालली असती, तर चंद्रा एकाच जागी बारा वर्षं पडून राहिली असती? तुम्हाला सांगतो, लहानपणी ती खूप सुंदर नाचायची! परंतु आज भिंतीवरच्या सरपटणाऱ्या पालीपेक्षा ही दीनवाणी होऊन पडली आहे. या भितीने मी तिच्या खोलीतील भिंतीवर एकही पाल दिसू देत नाही. दुष्टपणे त्यांना मारून टाकतो. मला असं करताना बघून बऱ्याच लोकांना वाटतं की मी वेडा झालो आहे.''

खरं तर आज त्या वृद्धाला पालीला मारताना बघितलं आणि मी सुद्धा हाच विचार केला. त्या दिवशी काहीच उत्तर न देता मी तिथून निघून गेलो.

त्यानंतर जितक्या वेळा मी चंद्राच्या घरी गेलो, तिच्या वडिलांनी प्रत्येक वेळी विचारलं, ''विनंतीपत्र लिहिलं का? चंद्रासाठी जगण्यापेक्षा मृत्यू खरंच चांगला नाहीये का? तुम्ही याला जगणं म्हणता का? आईवडील होऊन आम्ही हे सगळं किती दिवस बघायचं? मी चंद्राला सूक्ष्मपणे बघतो. रोज-रोज माझ्या डोळ्यांसमोर ती हळू-हळू निराश होते आहे. आता अर्धांग तिच्या पोटापर्यंत पोचला आहे, परंतु चंद्राचं मन, बुद्धी, विचार, भावना यावर पक्षाघात आक्रमण करू शकला नाहीये. चंद्रा अतिशय बुद्धिमान आहे. अनेक आवेगाने तिचं हृदय धडधडतं आहे. जर कोणाला माहिती नसेल तर त्यांना असंच वाटेल की चंद्राला फक्त फ्लूचा ताप येतो आहे.''

जेव्हा मी बघतो तेव्हा चंद्राचे दोन्ही हात सतत काही ना काहीतरी करीत असतात. घरभर चंद्राने केलेलं भरतकाम आणि पेंटिंग टांगलेली आहेत. चंद्राने विणलेला स्वेटर फक्त तिच्याच वडिलांनी नाही तर आजूबाजूच्या मुलांनी, एवढंच नाहीतर आता येणाऱ्या थंडीत मी सुद्धा घालणार आहे. चंद्राचं शरीर अर्धमृत आहे. परंतु चंद्रा जणू जीवन-स्पंदनाचा स्फुल्लिंग आहे. चंद्राचे दोन्ही हात, आपल्या शक्तिहीन पायाच्या अक्षमतेची अवहेलना करून आपली सृजनशीलता निरंतर चालू ठेवतात.

आता चंद्राकडे जाणं माझं रूटीन झालं होतं. एक दिवस चंद्राला बघितलं नाही तर माझं मन उदास व्हायचं. चंद्राला बघताच माझं मन कर्म-प्रेरणेने स्पंदित व्हायचं. चंद्राचं विशुद्ध मंद मधुर स्मित बघितलं नाही तर माझे हात जणू अचेतन व्हायचे. चंद्रा तर माझी प्रेरणास्रोत बनली होती. तिची अविरत, कर्मरत बोटं मला टोचून-टोचून सांगायची, जे कर्मविमुख आहेत, खरं तर तेच अर्धांगवायूचे (पक्षाघाताचे) रोगी आहेत. मी अचल असूनही रोगी नाही. निरुद्योगी नाही.

चंद्राकडे बघून मी तिच्या वृद्ध पित्याची विनंती जाणून-बुजून टाळीत होतो. त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देत नव्हतो. कधी कधी चंद्राच्या समोर मला तिचे वडील विचारीत की, ''चंद्राच्या आत्महत्येचं विनंतीपत्र तुम्ही लिहिलं का? कसला विचार करता आहात? काही अडचणीत सापडू म्हणून घाबरताय का? तुम्ही काळजी करू नका, त्यावर चंद्रा स्वत: सही करील. आमचं आयुष्य आता लवकरच संपणार आहे. याकडे तुमचं कधी लक्ष गेलंय का? आमच्यानंतर तिच्या तोंडात पाण्याचा थेंबही घालायला कोणी नाही. तहानेने व्याकूळ होऊन तडफडून तिला मरण यावं असं तुम्हाला वाटतं का?''

प्रतीक्षा थकवणारी आणि असह्य असते. मृत्यूची प्रतीक्षा करीत पडून राहाणं मृत्यूपेक्षा भयानक आहे, परंतु चंद्राकडे बघून चंद्राचं जगणं मृत्यूची प्रतीक्षा करीत आहे यावर माझा विश्वास बसत नव्हता. मृत्यूच्या प्रतीक्षेत जीवन अमावस्येलाही चंद्रोदयाइतकं उज्ज्वल आणि सुंदर असू शकत नाही.

त्या दिवशी चंद्रा क्रोशियाच्या सुईवर सोनेरी-चंदेरी चमचमत्या धाग्यांनी जगन्नाथाचा चेहरा विणीत होती. तिच्या उरलेल्या अर्ध्या शरीरातून गुणगुणारी मधुर बेहोषी पाझरत होती. मला वाटलं चंद्राचं कोणावर तरी प्रेम बसलं आहे. हीच अभिलाषा चंद्राला जगवते आहे.

तिच्या अंर्तमनात संगीताचा वर्षाव करते आहे. तेच प्रेम तिच्या हातून फूल बनून उमलतं आहे. प्रेमाशिवाय चंद्रा असं जगू शकणार नाही.

धीर धरून मी विचारलं, ''चंद्रा गैरसमज करून घेऊ नको. मान्य आहे तुझं शरीर अर्धांगाने ग्रासलं आहे, परंतु तुझ्या मनात रंगीत स्वप्नं उमलली आहेत. हे कसं शक्य झालं? तुझं कोणावर तरी प्रेम बसलंय?''

माझ्याकडे न बघता विणलेल्या जगन्नाथाच्या चेहऱ्यावर दृष्टी खिळवून थोडंसं स्मित करीत ती म्हणाली, ''माझ्या मनातली गोष्ट तुम्हाला कशी कळली?''

मी हळूच म्हटलं, ''तुझं जगणं सांगतं आहे. निरोगी असूनही कितीतरी माणसं तुझ्यासारखं भरभरून जगत नाहीत. त्यापैकी मी सुद्धा एक आहे. हे खरं आहे की जगतो आहे, परंतु जगण्यातलं माधुर्य हळूहळू नष्ट होत चाललं आहे. जीवनातील कटकटींमुळे...''

चंद्रा मान हलवून म्हणाली, ''होय, मी त्यांच्यावर प्रेम करते. त्यांच्यावर प्रेम केल्यावर मला कळलं मी अपूर्ण नाही, अपंगही नाही. त्यांच्यावर प्रेम केल्यावर मी माझ्या आयुष्यावर प्रेम करू लागले. जगण्यात सुख आहे याची मला जाणीव झाली.''

''कोण आहे तो?'' मी संकोचत विचारलं.

माझ्याकडे बघून गोड हसत चंद्रा म्हणाली, ''तुम्ही त्यांना ओळखता.''

''कोण आहे तो?'' मी विचारलं आणि रोमांचित होऊन विचार करू लागलो. कदाचित चंद्रा म्हणेल- 'ते तुम्हीच आहात. माझे प्रिय लेखक. प्रभातबाबू मी तुमच्यावर प्रेम करते...'' आता या भावनेने मी स्वत: स्पंदित होत होतो. शरीराच्या भग्न स्तंभातील नक्षत्रासारख्या चमकणाऱ्या चंद्राच्या जागृत सुंदर आत्म्यावर मी प्रेम करू लागलो.

चंद्राने एकदा माझ्याकडे बघितलं. त्यानंतर समोरच्या भिंतीवर टांगलेल्या दोन वृत्ताकार विशाल डोळ्यांकडे, नंतर सोनेरी जरीच्या धाग्यांच्या कलाकुसरीत आपल्या बोटांच्या कौशल्याने उमलणाऱ्या जगन्नाथाच्या चेहऱ्याकडे बघितलं. ती नम्र मधुर स्वरात म्हणाली, ''मी त्या खंडित शरीराच्या विकलांग प्रभू जगन्नाथावर प्रेम करते. जर माझे प्रभू खंडित असूनही स्वयंपूर्ण आहेत. अथर्व असूनही सर्वव्यापी आहेत, मग मी का माझ्या शरीराच्या अपूर्णतेसाठी माझ्या आत्म्याला त्रास देऊ? आपलं शरीर सुख-दु:खाचा अनुभव करू शकतं का? अनुभव घेण्याची शक्ती तर मेंदूत असते. देवाने माझा मेंदू-बुद्धी निर्जीव केली नाही, तर मग मी का दु:खी व्हावं? माझं हृदय अजूनही धडधडतं आहे. मग मी का भरभरून जगू नये?'' चंद्राच्या सुंदर कोमेजलेल्या चेहऱ्यावर एक अपूर्व ज्योत चमकत होती.

जिचं हृदय भरलेलं आहे, तिचं शरीर खंडित समजून आजपर्यंत मी स्वत:ला दु:ख दिलं, या विचाराने मला स्वत:ची दया आली. मला वाटलं चंद्रा मर्यादित सुखाच्या खूप पलीकडे आहे.

क्षय होणाऱ्या चंद्रभागेच्या शाश्वत आत्म्याला नमस्कार करून मी बाहेर जात होतो. चंद्राचे वडील दरवाजाशी उभे राहून आमचं बोलणं ऐकत होते. पहिल्या दिवशीसारखंच शांतपणे ते म्हणाले, ''कृपया, आता विनंतीपत्र लिहू नका. कारण माझी चंद्रा शरीराने नव्हे, आत्म्याच्या स्तरावर जगते आहे. आता आत्म्याची हत्या शक्य आहे का? मला हे माहिती नव्हतं, म्हणून मी तुम्हाला त्रास दिला. आता मी क्लेषमुक्त झालो.''

माझ्या हृदयाच्या स्पंदनात मिसळला गेलेला एक शांत स्वर माझ्या चेतनेला स्पर्श करून म्हणत होता, ''कौरव सभेतील द्रौपदीच्या वस्त्राप्रमाणे या जगात न संपणारी दु:खं आहेत, परंतु दोन्ही हात वर करून ते दु:ख कोणाला तरी समर्पित केल्यावर द्रौपदीची लाज वाचवण्याचं दु:खही दूर निघून जातं... दूर निघून जातं...'' माझ्या हृदयात निनादणारा हा स्वर जणू चंद्राचाच होता.

मागे परतलो आणि विचारलं, ''चंद्रा, मला तू काही म्हणालीस का?''

चंद्रकलेसारखी क्षय होणारी चंद्रभागा पूर्ण कोमल स्मित करीत होती.

**मूळ ओडिसी कथा : लेखिका प्रतिभा राय**
**अनुवाद : डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे**
भ्रमणध्वनी : ९८२०००९८५९


ग्रंथाली

**लाखो इथले गुरू**
**फ्रान्सिस डिमेलो**




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

उत्तम शिक्षक केवळ शिकवित नाहीत तर ते कसबी कलाकाराप्रमाणे आपल्या विद्यार्थ्यांना घडवीत असतात. डिमेलोसर हे आचार्य कुळातील आहेत. त्यांनी केवळ ज्ञानदान नाही तर आत्मदान केले. विद्यार्थ्यांवर अपार माया केली आणि त्यांच्यासाठी आपल्या काळजात घरटी बांधली. डिमेलोसरांचे प्रस्तुत पुस्तक म्हणजे आर.एम.भट हायस्कूलचे चरित्र आणि त्यांचे शिक्षक म्हणून जगलेले आत्मचरित्र आहे. प्रांजळ, प्रामाणिक, हृदयस्पर्शी, उद्बोधक आणि मार्गदर्शक!

**- फादर फ्रान्सिस दिब्रिटो**

# एक्सआराझेड

साधना गोरे

**ऋचाला खिजवण्यासाठीच तर आपल्याला तो हनिमूनचा फोटो एफबीला पोस्ट करायचा होता. तिला दाखवायचं होतं की, बघ तुझ्याहून देखणी परी आणली की नाही? पण तिनं आमचा तो फोटो पाहिला की नाही हे कळणार कसं आपल्याला?**

गेले आठदहा दिवस झाले रजत एफबीवर पडीक असतो. अन् करतो काय तर, नुकतीच लग्न झालेली लोकं आठवून आठवून त्यांची अकाउन्ट स्क्रोल करतो. त्यांच्या लग्नाच्या आधीच्या पोस्ट, त्याच्या तारखा, लग्नानंतरच्या पोस्ट तपासतो. तास न् तास खर्चून त्यानं रिलेटिव्हसची, फ्रेंड्सची, ऑफिसातल्या कलिग्सची, एफबीच्या ओळखीतल्यांची बिनओळखीतल्यांची अकाऊन्टस खुळावल्यागत खोदून काढलीयत, तरी त्याच्या डोक्यातला किडा काही जात नव्हता. अन् प्रत्येक अकाऊन्ट तपासताना त्याला एफबीलाच वाचलेल्या त्या पोस्टचा स्वत:च्या संदर्भात प्रत्यय यायचा. अन् मग तो सगळं मागचं एकएक वेचत राहायचा. पण वेचलेलं सगळं त्या पोस्टला लागू पडणारच वाटायचं. यावर कुणाशी काही मोकळेपणी बोलावंसंही वाटत नव्हतं त्याला.

आताही रजत ऑफिसातल्या लॅपटॉपवर स्क्रोलतोच आहे. राजीनं कॅन्टीनला चल म्हणून त्याला आवाज दिला पण तोही त्याच्यापर्यंत पोहचला नाही. ''रजत, काम छोडके ये क्या एफबी पें टाइमपास कर रहा है । चल ना चाय पीते है।'' मग तो साऱ्याचाच कंटाळा आल्यागत सगळ्यांसोबत कॅन्टीनमध्ये जातो, पण त्याचं मन मात्र अजून त्या एफबीच्या गुंतावळ्यातच गुंतलंय. तो आज नव्यानेच ऑफिसातल्या सगळ्यांकडे पाहतोय. त्याच्या मनात येतं, गेली तीन वर्षं आपण या ऑफिसात काम करतोय. तसे सगळे सांभाळून घेणारे आहेत, पण मनातलं एखाद्याला सांगावं असं कुणीच नाही. लग्नाआधी आपण सगळं ऋचाला सांगायचो. ऋचाला आता हे सांगितलं तर ती काय विचार करेल आपल्याबद्दल. गेल्या कित्येक दिवसांत आपला तिच्याशी कॉन्टॅक्ट नाही.

लग्न करायचं ठरवल्यावर मुली पाहायला म्हणून आईनं गावी बोलावून घेतलं. आईनं आधीच बऱ्याच मुलींच्या फोटोंची थप्पी नसली तरी मोठा अल्बम होईल एवढे फोटो कुठूनकुठून गोळा केलेले. त्यातला मोहिनीचा फोटो आपल्याला पाहताक्षणी आवडला होता. नुसता आवडला काय, तिच्या फोटोशिवाय काही दिसायचंच नाही आपल्याला. इतकं आपण भाळलो होतो तिच्यावर. म्हणजे आताही भाळलेले आहोतच तसे. दोनच महिने तर झाले लग्नाला. तिच्या स्पर्शाची धुंदी अंगभर असते आपल्या. पण हेही काही खरं नाही. गेल्या आठवड्यापासनं आपल्याला भलताच चाळा लागलाय. लग्न झालेल्यांचे एफबी अकाऊंट चाळायचा. मोहिनीचंही अकाऊंट कितींदा चाळलं आपण. गेल्या अडीच वर्षात तिनं एकही पोस्ट टाकली नाही. अन् त्याला



आठवलं की, लग्नाआधी त्याने एकदा मोहिनीला विचारलंही होतं, तू एफबीवर नाहीस का? कारण तिच्या पोस्ट-फोटोवरनं तिच्या नेचरचा काहीएक अंदाज येईल म्हणून जस्ट चेक करत होतो आपण. तेव्हा ती म्हणालेली, आता परीक्षा चालू आहेत तर मी टेम्परी अकाऊन्ट डिॲक्टिवेट केलंय. अन् आपल्याला तेव्हा तिचं किती कौतुक वाटलं होतं. पण तिनं तेव्हा दिलेलं ते कारण आता आपल्याला खरं का वाटेना झालंय?

आपण भावजींचंही अकाऊन्ट चेक केलं. चार वर्षापूर्वी ताईचं लग्न झालं. तेव्हाच आपल्या आयुष्यात ऋचा आली होती. आपण ताईच्या लग्नाचे किती फोटो ऋचाला पाठवलेले. ताईच्या पाठवणीच्या वेळी रडतानाचे फोटोही पाठवले होते. अन् आपला रडतानाचा फोटो पाहून ऋचा आपल्या अजूनच प्रेमात पडत गेली. पुरुषांच्या - बाईच्या वागण्याबद्दल समाजाचे किती समज असतात यावर किती बोलायची ती. त्यातलं बऱ्याचदा आपल्या काही पल्ले पडायचं नाही. पण ती बोलत असताना ऐकत राहावंसं वाटायचं. फार मनापासून बोलायची. बोलताना चिडायची. तिचं चिडणंही मनापासनं असायचं. मोहिनीसारखं लाडानं 'माझं पिल्लू-माझा बच्चा' असलं तिनं कधी केलं नाही. एकमेकांना प्रेमाची कबुली देऊन झाल्यावर एकदा आपण ऋचाला 'जानू' म्हटलं तेव्हा कसली चिडली होती ती. म्हणालेली, कसला फिल्मीयस तू? जानूफिनू काय? कितीजणांनी घासलाय तो शब्द! तू असलं काही फिल्मी वागणार असशील तर प्रेम तर दूरच, आपली मैत्रीसुद्धा संपली समज. त्यानंतर मात्र आपण कधी तो शब्द वापरला नाही.

ख्रिसमसच्याच दिवशी ताईचं लग्न झालं. त्याच्या आसपासच्या भावजींच्या पोस्ट पाहिल्या तर त्या दरम्यान भावजींचा जवळजवळ वर्षभर मि. इंडिया झालेला दिसला. ताईचं एफबीला अकाऊन्टच नसल्यानं प्रश्नच नव्हता. हल्ली तर भावजी नाही म्हटलं तरी आठवड्याला दोनचार पोस्टस तरी टाकतात. मग तिथंच का भावजींचा मि. इंडिया झालाय? की त्या पोस्टमध्ये म्हटल्याप्रमाणे भावजींची कुणी एक्स होती अन् भावजींना तिला दुखवायचं नव्हतं.

रजतला मग गेल्या काही दिवसांतलं त्याच्या ताईचं अन् भावजींचं सगळंच वागणं डोळ्यांसमोरून सरकू लागलं. भावजींची नोकरी हैद्राबादला होती. ताईही लग्नानंतर भावजींसोबत हैद्राबादला गेली. तिथल्या नव्या ठिकाणी कुणाचीच ओळख नसल्यानं ताईला दिवसभर करमायचं नाही. मग ती घरी आईला फोन करायची. तासन् तास बोलायची. भावजीही ताईची खूप काळजी घ्यायचे. ऑफीस घराजवळच असल्यानं लंचब्रेकमध्ये घरी यायचे. ताई खूप कौतुकानं सांगायची भावजींचं सगळं. तशी आपली ताई आठवी शिकलेली, अगदीच काकूबाई आहे म्हणा. भावजींचं कुठं काय चालू असलं तरी काय घंटा कळणाराय तिला. अभिज्ञच्या जन्माच्या वेळी अन् आधीही बारीकसारीक दुखण्यामुळं ताई सारखी गावीच आलेली असायची. या दिवाळीत तर भावजी आलेच नव्हते. रजा मिळत नाही म्हणाले. आमच्यासारख्या कॉर्पोरेटवाल्यांनाही दिवाळीत दोनतीन दिवस सुट्टी असते. अन् भावजींच्या सरकारी कामात सुट्टी नसते यावर फक्त ताईसारखी बाईच विश्वास ठेवू शकते म्हणा. पण आपलाही तेव्हा विश्वास बसला होताच की. असेल एखादी इमर्जन्सी असं वाटलं होतं. पण आता ही पोस्ट वाचल्यावर डोक्यात वेगळाच उजेड पडल्यासारखं झालंय. मध्ये एकदा ताई भावजींना ऑफीसच्या कामानिमित्त दिल्लीला जायचंय म्हणून गावी आलेली. पुढे शिमगा अन् पाडवा आला. नंतर उन्हाळ्यात तिकडं खूप ऊन असतं म्हणून पंधरा दिवसांसाठी आलेली ती चार महिने गेलीच नाही. अन् तरी भावजी बायकोला सोडा लेकालाही पाहायला आले नव्हते. हे सगळं रजतच्या मनात भावजींचं एफबी अकाऊन्ट आज पुन्हा एकदा स्क्रोलताना येत होतं. अन् आता नव्यानेच त्याला क्लिक झालं की अकाऊन्टवर ताईचा तर नाहीच पण अभीसारख्या गुटगुटीत लेकाचाही फोटो पोस्ट करावासा वाटला नाही भावजींना. स्वतःचे तर ढीगभर फोटो अपलोड केलेत.

भावजींच्या ब्लॅक गॉगल लावलेल्या एका प्रोफाईल फोटोला विक्यानं कमेंट केलेली, 'काय कुठं बघताय पाहुणं?' विक्या आपला कॉलेजपासनं मित्र. त्याच्या लग्नावेळी ऑफिसात कामाची एवढी गडबड होती, तरी आपण फ्लाईटचं बुकींग करून गेलो. लग्नात सगळा थाटमाट होता. आपण त्याच्या लग्नातल्या कितीतरी गमतीजमती नंतर ऋचाला सांगितलेल्या. विक्याचं अन् माधुरीचं कॉलेजपासनं अफेअर होतं. दोघं एकाच जातीतले होते. तरी विक्या सेटल होईपर्यंत माधुरीचे पपा लग्नाला तयार होत नव्हते. तेव्हा ऋचानं विचारलं होतं, जात पाहून लोक कसे काय प्रेमात पडत असतील रे? अन् पुन्हा सुनानातवंडांना सांगायला मोकळे, 'आम्ही लव्हमॅरेज केलं.' असं म्हणून ती नेहमीसारखीच मोकळं हसली होती.

रजत परत स्वतःचे फोटो पाहण्यात रमला. लग्न मोहिनीच्याच घरी होतं. तिच्या घरच्यांनी कशाचीच कमतरता ठेवली नव्हती. एकुलती एक मुलगी म्हणून सगळं न मागताच दिलं होतं. आपल्या गावावरून मोहिनीचं गाव दूर म्हणून आदल्या दिवशीच जायचं ठरत होतं. पण शनिवार अशुभ, त्यादिवशी कसं निघायचं म्हणून आईनं शक्कल लावली की, मोजक्या माणसांनी शुक्रवारीच निघायचं. अन् गावातल्या बाकीच्या लोकांना घेऊन भाऊ बसने येईल. एन्गेजमेंट लग्नाच्या आदल्या दिवशीच होती. आपण तर एन्गेजमेंट झाल्याच्या चारच तासात एफबीचं सिंगल स्टेटस बदलून 'गॉट एन्गेज्ड' केलं अन् अंगठीच्या सिम्बॉलसकट पोस्टही टाकली. नंतर लग्नाच्या गडबडीत आपण लाईक्स, कमेंटस वेळ मिळेल तसं पाहत होतो. पण लगेच रिप्लाय नाही दिला. नाहीतर उगीच लोकांना वाटलं असतं की, हा लग्न एन्जॉय करायचं सोडून कमेंटला रिप्लाय देत सुटलाय. ऋचा अन् मी अन्फ्रेंड होतो. पण तिनंही आपल्या पोस्टला लाईक करून अभिनंदन केलं होतं. मी मग निवांत दोन दिवसांनी सगळ्यांना 'थँन्क यू' म्हणून स्मायली टाकली होती. ऋचालाही हाच रिप्लाय दिला होता. सर्वात जास्त लाईक अन् कमेंट याच पोस्टला मिळाल्या होत्या आतापर्यंत. मग मोहिनीच्या गावाहून आमच्या गावी आल्यावर रिसेप्शन, देवदेव करण्यात अन् आलेले पाहुणे वाटेला लावण्यात आठवडा सरून गेला. तोवर आमचाही बंगलोरला यायचा दिवस उजाडला. आता रजेचा एकच आठवडा राहिला होता अन् अजून आमचा हनिमून व्हायचा होता. तसा तो फॉर्मली गावीच झाला असला तरी सगळं साग्रसंगीत करायचं म्हणून मी कुर्गच्या हॉटेलचं बुकींग महिनाभर आधी करून ठेवलं होतं. शिवाय लग्नाच्या कपड्यांची खरेदी करतानाच मी अन् मोहिनीने हनिमूनसाठीही खरेदी केली होती. त्यात तिनं जो गुडघ्यावर असणारा ब्लॅक-क्रिम कॉम्बिनेशनचा ड्रेस सिलेक्ट केला होता, त्याच रंगाची मॅचिंग जीन्स अन् शर्ट मीही घेतला होता. इतरही बरीच खरेदी केलेली. पण हा ड्रेस हनिमून स्पेशल असणार होता आमच्यासाठी. लग्नाच्या कितीतरी आधीपासून मी आमच्या दोघांच्या या ड्रेसमधल्या पोझेस् इमॅजिन करत होतो. अन् तशा त्या पोझेसच्या पोस्ट एफबीवर टाकायच्या हेही खूप आधीपासनं माझ्या मनात होतं. बंगलोरला पोहचल्यावर एक दिवसच घरात काढला असेल आम्ही. खरं तर गेले पंधरा दिवस घर बंद असल्यानं कुबट झालं होतं. अन् त्याच्या महिनाभर आधीच हे घर मी रेंटनं घेतलं होतं. वनबीएचकेच्या भाड्यात हे टूबीएचके घर सहज मिळून गेलं होतं. पण एकमेकांच्या स्पर्शाला आसुसलेल्या आम्हाला ओशटकुबट हुंगायला फुरसत कुठं होती? दुसऱ्याच दिवशी आवरून आम्हाला कुर्गला निघायचं होतं. कुर्ग तसं पाचेक तासाच्या अंतरावरच. गेल्याच्या दिवशीच जवळचा परिसर पाहून झाला. मग दुसऱ्या दिवशी तो हनिमून स्पेशल ड्रेस घालून वेगवेगळ्या पोझमधल्या सेल्फ्या काढल्या. आमचं पॅकेज हनिमून कपलचंच असल्यानं तिथं आमचे फोटो काढायची वेगळी सोय आहे हे कळल्यावर तिथंही फोटो काढले. त्या शाही हॉटेलच्या शाही बॅकग्राऊंडवरचा एक फोटो तर मी मनात रंगवला होता तसाच आला होता. मोहिनी भिंतीशी उभी आहे अन् मी थोडा तिरका तिला कवेत घ्यायला आसुसलेला. हे मनात येताच पुन्हा त्याच्या डोक्यात वाचलेल्या पोस्टचे शब्द ठळक होऊ लागले. जणू काही लिहिणाऱ्याने आमचा फोटो पाहूनच ती पोस्ट लिहिली होती. अशावेळी ऋचा म्हणाली असती, ''यासाठी तुझा फोटो पाहायची काय गरजंय पोस्ट लिहिणाऱ्याला? जगातले नव्वद टक्के

लोक तुझ्यासारखेच सपाट विचार करणारे अन् बोलणारे असतात. फोटोसुद्धा त्याचाच एक भाग नाही का?'' तिच्या असल्या बोलण्यावर आपल्याला काही सुचायचंच नाही. आपण भोटसारखं तिच्या खिदळण्याकडं पाहत राहायचो. ऋचाला खिजवण्यासाठीच तर आपल्याला तो हनिमूनचा फोटो एफबीला पोस्ट करायचा होता. तिला दाखवायचं होतं की, बघ तुझ्याहून देखणी परी आणली की नाही? पण तिनं आमचा तो फोटो पाहिला की नाही हे कळणार कसं आपल्याला? अन्फ्रेन्ड केल्यानंतर आपल्या 'गॉट एन्गेज्ड'च्याच स्टेटसला फक्त लाईक केलेलं तिनं. अन् मी वाचली तीच एफबीची पोस्ट तिच्याही वाचनात आली असेल तर ती खिदळलीच असेल आपला हनिमूनचा अन् लग्नातला डिट्टो त्या पोस्टमध्ये सांगितलेल्या पोझसारखाच फोटो पाहून. तसंही ऋचाला विचार करायला असल्या पोस्ट वाचायची गरज नाही म्हणा.

लग्नाआधी एकदा अंदमानला राहणाऱ्या मावसभावाकडं जाताना मोहिनी बंगलोरला आपल्याला भेटायला आली होती. तेव्हा ती आमची दुसरी भेट होती. एका भेटीतल्या ओळखीवरच तिने आपला फोन घेऊन व्हॉट्सअपचा डिपी बदलला होता. आम्ही दोघं एकमेकांच्या डोळ्यात आकंठ बुडाल्याचा डिपी ठेवला होता. मीही मग ऋचानं पाहावं म्हणून तो डिपी तसाच ठेवला. वर स्टेटस म्हणून डोळ्यांवर दिल असलेल्या इमोजीची रांग लावली. ऋचानं आपलं ते स्टेटस, डिपी पाहिलं की नाही आपल्याला कधीच कळू नाही शकलं, पण चारेक वर्षांच्या प्रेमात ऋचानं आपला डिपी बदलण्याएवढा अधिकारही कधी गाजवला नाही. की लग्न नावाची गोष्टच असा अधिकार देते एकमेकांना?

आपला तो व्हॉट्सअप डिपी गावातल्या घराजवळच्या एका मित्राने आईला दाखवल्यावर आई किती खवळलेली आपल्यावर. ''अजून कशात काय अन् फाटक्यात पाय म्हणायवानी, अन् तू फुटू फोनात ठिव. आन् सगळ्या गावाला सांगत सुट.'' आपण तेव्हा असंतसं करून आईला गप केलेलं. पण मोहिनीच्या रूपानं पागल झालो होतो आपण तेव्हा. ऋचा तशी चारचौघीत मिसळून जाईल अशी होती खरी, पण मोहिनी शंभरजणीत उठून दिसेल अशीय. लग्नाला दोन महिने झाले तरी ऑफिसात मध्येच आठवण आली की आपण तिचे वेगवेगळ्या पोझेसमधले फोटो फोनमध्ये पाहत बसतो.

नंतर आपण कधी सिंगल डिपी ठेवलाच नाही. पण मोहिनीने मात्र लग्नाआधी कधीच दोघांचा डिपी ठेवला नाही. आताही तिनं दोघांचा जो डिपी ठेवलेला तो त्याने तिच्या व्हॉट्सअप अकांऊन्टवर जाऊन पाहिला. एवढे छान-छान फोटो असताना हिनं हा का ठेवलाय असं आता पहिल्यांदा त्याच्या मनात आलं. लग्नातला हा फोटो नेमका कधीचाय बरं? बहुतेक हळदीचा असणार. एवढ्या माणसांच्या गराड्यात तो भट एकीकडं कायकाय बोंबलत होता. 'असं करा, तसं करा.' ही फोटो काढायची सोय आहे म्हणून बरंय. नाहीतर एका दिवसात, एक दिवस तर कुठं, मिनिमम चारपाच तासात आपण भटाने सांगितलेल्या एवढ्या गोष्टी फोलो केल्या, यावर आपलासुद्धा विश्वास बसला नसता. कधी सेल्फी घेऊया म्हटलं की कुठल्या त्या फ्रेंच फिलोसॉफरचं 'आय थिंक देअरफॉर आय एम' वाक्य सांगून ऋचा नेहमी चिडवायची आपल्याला की, 'आय क्लिक देअरफॉर आय एम'. अन् वर तिचं ते हसणं सुरूच असायचं. यात आपण पांढराशुभ्र कुर्ता अन् सलवारमध्ये आहोत तर मोहिनी नुकत्याच उरकलेल्या साखरपुड्याचा सगळा मेकअप, साजशृंगार तसाच ठेवून क्रिमिश अन् रेड कलरची साडी नुसती गुंडाळून बसलीय. आपला शुभ्र पोशाख अन् कपाळावर हातभर ओढलेला लालभडक गंध यामुळे मोहिनीला विधी सांगायला बसलेला भटजीच वाटतोय आपण.

मोहिनीने लग्नाआधी स्वतःच आपला डिपी बदलला म्हणजे तिच्या वाचनात कधी असली पोस्ट आली असेल का? अन् मग आपल्या होणाऱ्या नवऱ्याची कुणी एक्स असली तर तो असा डिपी ठेवतोय की नाही याची खात्री करायची होती तिला? मग अशी पोस्ट आपल्या वाचनात येईल तेव्हा आपण तिच्या एफबी अकाऊन्ट अपडेट न करण्याचा, लग्नाआधी तिनं आमच्या दोघांचा डिपी न ठेवण्याचा, व्हॉटसअपला असला भोट डिपी ठेवण्याचा काय अर्थ लावू? असा विचार आला नसेल का तिच्या मनात? नसणारच आला म्हणा. माझ्यासारखी स्वतःचा विचार आधी करणारी माणसंच तर जगात सगळ्यात जास्त असावीत. मी तर कुठं ऋचाचा विचार केला होता? आपण या ऑफीसच्या कामात दिवसदिवस गडबडून जातो. आता ही पोस्ट वाचली अन् नेमके आपण त्या सिच्युएशनमधून जातोय म्हणून आता आपण एवढा तरी हिशोब लावतोय.

लग्नानंतर आपणच मोहिनीनं टेम्परी डिॲक्टिवेट केलेलं एफबीचं अकाऊन्ट पुन्हा चालू केलं. तरी तिनं लग्नाचा एकही फोटो अपलोड केला नाही. आपल्यालाही तेव्हा त्याचं कारण विचारावंसं वाटलं नाही. उलट बायकोला एफबीत रस नाही पाहून बरंच वाटलं होतं. तरी तिच्या एफबीच्या सुरुवातीपासूनच्या सगळ्या पोस्ट आपण वाचल्या. त्यातले निम्मेअधिक फोटो तिनं लग्नाआधीच आपल्याला व्हॉट्सअप केले होते. आताही या फोटोतला तिचा उफाडा बांधा आपल्या डोळ्यांत मावेना झालाय. तिचे असे तंग कपड्यातले फोटो आवडले म्हणून तर आपण लग्नाला होकार दिला. तिचा तो उफाडा ती रात्री बेडवर दाखवतेच म्हणा. खूश करते आपल्याला एकदम. तिच्या चुलत बहिणीच्या लग्नातला साडी घातलेला हा फोटो. साडी ट्रेडीशन असते उगीच आपलं म्हणायचं. या फोटोत एका बाजूनं मोहिनीचं सगळं पोट उघडं पडलंय. त्यावरही बऱ्याच जणांच्या कमेंट आहेत. एका फोटोत शॉर्ट घालून जरा जास्तच झुकून बाईक चालवतानाची पोझ आहे. त्यावर एका मैत्रिणीने ''एकदम सेक्सी लग रही हो'' कमेंट दिलीय. मित्रांनी कडक अन् झकास असलं काही म्हटलं असलं तरी त्यांना काय म्हणायचंय हे अक्कल असणाऱ्याला कळतंच.

मोहिनीच्याच पोस्टफोटोचं काय माझ्यासकट लग्न झालेल्या सगळ्यांच्याच पोस्टफोटोचा वेगळाच अर्थ लागाय लागलाय आता आपल्याला. ऋचा म्हणायची तसा साक्षात्कार की काय होतोय की

काय आपल्याला. मोहिनी ही तशी आपल्या आयुष्यातली पहिली बाई नाही. ऋचाकडून तो अनुभव आधीच घेतला होता आपण. त्यातलं दोघांचंही नवंपण पाहिलंय आपण. नव्यातला धांदरटपणा, शरीराची भीड अन् तरीही आसुसलेलं शरीर भोगलंय आपण. अन् तरी आपल्या फॉर्मल हनिमूनमध्ये ते नवंपण अनुभवू शकलो नाही आपण असं एकीकडं वाटतंय, की आपण अनुभवी असल्यामुळं तसं वाटतंय. पण अनुभवी असल्यामुळंच नवंपण काय असू शकतं हे कळायला लागलंय आपल्याला. पण मग मोहिनीलाही माझं अनुभवीपण कळलं असेल का?

एका साध्या पोस्टने आपण काहीही विचार करत सुटलोय असं वाटून त्यानं मान वर करून पाहिलं. घड्याळात सात वाजले होते. आता घरी निघायला हवं असा विचार करून त्यानं ओला बुक केली अन् आवरायला घेतलं. दिवसभर लॅपटॉपच्या स्क्रीनने त्याचे डोळे थकून गेले होते. गाडीतल्या एसीच्या गारव्यात मानेला मनाजोगती पोझ देऊन त्याने डोळे मिटून घेतले.

**जगातले प्रेमींचे प्रकार**

***हतबल प्रेमी –*** *नवीन लग्न झालेला/झालेली एफबीवर एकही फोटो टाकत नाही, तेव्हा समजावं की त्याला/तिला आपल्या एक्सला दुखवायचं नाही, कारण त्यानेच/तिनेच जातीचं नाहीतर आर्थिक निमित्त पुढं करून त्याला/तिला डच्चू दिलेला असतो.*

***उट्टं काढणारे प्रेमी –*** *तो-ती असे छान मस्त हातात हात गुंफलेले, दोघांच्या कपाळावरून गालावर आलेली मंडोळ्याची लटकन अन् तिने पापण्या लवून दिलेली लाजरी अन् तो तिला चहूअंगांनी वेढावलेला इ. असे लग्नातले किंवा मग गालाला गाल चिकटलेले तिचे लाँग स्कर्टमधले किंवा अगदी शॉर्टमधलेही किंवा टाईट जीन्स अन् टी शर्टमधले, त्याचे तिच्याशी नाजूक जवळीक साधू पाहणारे जसे रणबीर अन् दीपिका किंवा मग गेला बाजार मराठीतलेही कुठलेही नटनटी घ्या इ. असे हनिमूनचे खूप फोटो टाकतात तेव्हा खुशाल समजावं त्याला/तिला एक्सने डच्चू दिलाय अन् हे फोटो ते उट्टं काढण्यासाठीच आहेत.*

***दळभद्री प्रेमी –*** *या दळभद्र्यांना अस्सल शंभर टक्के गुंतवणूक मिळते अन् यांचा स्पर्म गेली हजारो जन्म नालायक निपजल्याने ते याही जन्मात दळभद्री प्रेमीच ठरतात कारण यातले तो/ती ठगवायचं ठरवूनच प्रेमात पडतात. अन् अंगाला अंग लावूनही मन अस्पर्शित ठेवून डच्चूही देतात. वर यांचा दळिद्रीपणा एवढा की लग्नाहनिमूनचे फोटोही व्हॉट्सअप डिपी अन् फेसबुकला टाकतात. स्वतःला लागल्यावर रडू येण्यापुरतंच संवेदनपण त्यांच्याकडं जिवंत असतं*

***उदासीन पती-पत्नी –*** *लग्न झालेला तो/ती एफबीवर अकाउन्ट असूनही लग्नाचे फोटो अपलोड करायची तोशीस घेत नाहीत. अशी माणसं त्या लिटमस पेपरसारखी असतात, ज्यांना कोणत्याही रसायनात घातलं तरी त्यांच्यावर काहीच परिणाम होत नाही. स्वतःच्या लग्नाचा दिवससुद्धा त्यांच्यासाठी इतर सामान्य दिवसासारखाच असतो. सगळं जग लग्न करतं म्हणून वय झालं की अशी माणसं लग्न करून आयुष्यातली एक इतिकर्तव्यता पार पाडतात.*

***आदर्श प्रेमी किंवा आदर्श पती-पत्नी –*** *जेव्हा ते दोघंच एकमेकांचे एक्स असतात किंवा ज्यांना आधी कुणीच एक्स नसतं, तेव्हा अर्थातच त्यांनी लग्नाचे - हनिमूनचे फोटो शेअर/टॅग केलेले असतात, हे शहाण्यास काय सांगावं?*

*आता तुमची कॅटेगरी कुठली हे तुम्हीच ठरवा बाबांनो आणि बायांनो!*

*– जाता जाता एक निरीक्षण*

घर आल्यावर ड्रायव्हरनं 'साहब साहब' म्हणत त्याला जाग आणली. तरी त्याला आपण लॅपटॉपवर एफबीची पोस्टच वाचतोय असं वाटलं अन् त्याच्या मनात आलं, च्याआयला आपल्या एक्ससाठी तर आपण आयझेड ठरलोच आहोत. आता बायकोनं आपली आयझेड करू नये म्हणजे मिळवली.

लग्नात सासरवाडीहून मिळालेल्या नव्याकोऱ्या सोफ्यात बसून चहा पित असताना त्याच्या मनात पुन्हा आलंच, बायकोचं एकवेळ सोडून देऊ. पण साली आपली कॅटेगरी खरंच कुठली...? दुसरी का तिसरी? अन् तो खिशातला फोन काढून एफबीवर ती पोस्ट सर्च करू लागला. सहज नजरेखालून घातलेली ती पोस्ट पुन्हा वाचायला मिळावी म्हणून त्याने कितींदा एफबी स्क्रोलत नेलं होतं. अजून त्याचं स्क्रोलकाम चालूच आहे.

उद्यापासून ऑफीसमध्ये नवा प्रोजेक्ट लॉन्च होणाराय. कामाच्या धबडग्यात आपलं हे एफबी स्क्रोलणं आपोआप बंद होईल, असं स्क्रोलताना त्याच्या मनात येत होतं. पण...

**– साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ९९८७७७३८०२
sadhanagore82@gmail.com

॥ग्रंथाली॥


**डायरी एका चंद्राबाईची**
**डॉ. द.ता. भोसले**
एवढं सुख भोगूनही या माणसांचे जगण्यावरचे प्रेम लेखकाला जगण्याची उमेद देऊन गेली. रोजच्या आयुष्यात भेटणाऱ्या चंद्राबाईची ही डायरी वाचकांना नक्की आवडेल.
**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

आरशासमोर बसून पावडर लावत असताना अचानक तिचं लक्ष त्या फ्रेमकडे गेलं आणि ती क्षणभर दचकलीच !

ड्रेसिंग टेबलावरची ती फ्रेम वास्तविक रोजच दृष्टीला पडणारी – अफाट आभाळाखाली अगतिक उभी असलेली 'पाकिजा'मधल्या मीनाकुमारीची एवढीशी रुमझुम रेषा, पण आज त्या फ्रेमकडे पाहताना एकाएकी तिला उमगलं, आपल्याला हल्ली दररोज तारीख का अचूक आठवते ते. .... आज चौदा, उद्या पंधरा. उद्या एव्हाना त्याच्या-आपल्यात कितीतरी अक्षांश-रेखांश आडवे पडलेले असतील. रोज आपण सूर्य पाहिल्यावर मग कितीतरी तासांनी तो त्याच्या माथ्यावर उगवेल. मुळातलं बेहिशेबी मन गेले काही दिवस काळवेळ अचूक दाखवत होतं ते, त्या घटकेचं झुंबर केव्हा डोक्यावर कोसळून पडणार त्याची कुंडली मांडण्यासाठी तर!

त्या घटकेच्या अटळपणापुढे ती अगदी असहाय्य झाली. ...अफाट आभाळाखाली आपणही अश्राप उभ्या आहोत. जागच्या जागी खिळून आहोत. डोक्यावरून कर्कश चित्कार करत पक्ष्यांच्या झुंडी जातात. त्यांच्या अभद्र सावल्या आपल्यावर तुटून पडताहेत.

तिला जाणवलं, गेला महिनाभर ही भावना वेळीअवेळी दार ठोठावून जायची, पण आपली काचेरी तटबंदी एकाएकी मजबूत होऊन बसली होती! ... आज ती नाजुक भावना ह्या तीक्ष्ण वेदनेच्या हातात हात घालून आली, म्हणून तिला आपण घरात घेतलं.

आज ती जणू अंड्याचं कवच फोडून उघड्यावर आली होती – जगण्याचे व्यापताप सोसायला.

पण ह्या साक्षात्काराचं आश्चर्य वाटून घ्यायला सवड कुठे होती? एक उसासा टाकून तिनं परत स्वत:भोवती ते कवच गुंडाळून घेतलं. अर्धसुन्न अवस्थेतच सारं आवरून ती घराबाहेर पडली.

एरवी तिला कुठल्याही ठिकाणी जाण्याची इतकी घाई असायची की, घराबाहेर पडल्याबरोबर रिक्षात चढल्याखेरीज आणि रिक्षावाल्याला 'जरा जल्दी' म्हणून सांगितल्याखेरीज तिला राहवत नसे. मन क्रियाशील असलं म्हणजे शरीराची निष्क्रियता धकून जाते. स्वत:ला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याची फारशी गरज नसते, पण हल्ली मात्र तिला मैलोन्‌मैल चालणंच आवडू लागलं होतं. चालण्यामध्ये गती असते. जमीन मागे सरकते, त्याची प्रतिक्रिया म्हणून शरीर पुढे जातं. प्रतिक्रियात्मक का होईना, आपलं नियंत्रण असलेली काही

हेमा अंतरकर

# आभाळ कोसळलंच नाही!

**दुसऱ्याच क्षणी जिभेच्या पात्यानं सवयीच्या सफाईनं तिला सगळं सावरून दिलं. आपण विद्यार्थ्यांपुढे उभ्या आहोत, ह्या क्षणी आपल्याला आपल्या मनाच्या खाजगी प्रदेशात वावरण्याची परवानगी नाही; असं तिनं आतल्या आत स्वत:ला बजावलं आणि ती पुढे बडबडू लागली, पण चेहऱ्यावरच्या गळून गेलेल्या रेषांनी तिला दगा दिला होता.**



एकदा युनिव्हर्सिटीच्या लॉनवर दोघं दिसली होती. बाभळीचा पहिलाच धुंद मोहोर कशी नि:संकोचपणे, अगदी त्याच्या डोळ्यांत पाहू देत होती ती त्याला!

...पण आपण का हे आठवून व्याकूळ व्हावं? द्यायचं ते द्यावं अन विसरून जावं, ही वृत्ती आपली नव्हेच मुळी. आपण आपला मोहोर दहादा तपासून बघणार. त्याच्या खऱ्या-खोट्याचा, बऱ्या-वाईटाचा, औचित्या-अनौचित्याचा ऊहापोह करणार. ह्या सगळ्यात त्या नुकत्या पालवलेल्या मोहोराला चोळमटून टाकणार, आणि आता काही तो द्यायच्या लायकीचा राहिला नाही, असं ठरवून तो पुन्हा एका मजबूत कोशात बंदिस्त करून ठेवणार!

वर्गात ती पोचली केव्हा, आणि बरोबर पानावर पुस्तक उघडून तिनं डॉम मोरेसची ती कविता वाचायला सुरुवात केली कशी ... कशाचंच तिला भान नव्हतं. ते आलं ते त्या जिवघेण्या ओळींनी तिला डंख मारला तेव्हा –

"nd I, by shyness, am undone;
nd can't go out for fear I meet
My poems dancing down the street
Telling your name to everyone!'

कलात्मक तटस्थतेचं, नुसताच आस्वाद घेणारं, मनावरचं संरक्षक कवच एकदम गळून पडलं. क्षणभर आपण कुठे, कुणापुढे, कशासाठी उभ्या आहोत; ह्या सगळ्याच संदर्भातून गळून जाऊन ती फक्त त्या ओळींची उरली आणि त्या ओळीही फक्त तिच्यासाठी उरल्या शून्यतेचं आवरण फेडून तिचा चेहरा क्षणभर जिवंत झाला.

कृती आपण करतो आहोत ह्याचं समाधान असतं. जाब मागणाऱ्या घड्याळाला पुरवण्यासाठी थोडी सबब असते. अन् असतो अपार थकवा – दिवसाअखेर, आपल्याला झोपेची आवश्यकता आहे असं शरीराला बजावून त्याला मोहनिद्रेच्या कुशीत नेणारा...

कॉलेजच्या आवारात पाऊल ठेवताच तिथल्या हिरवाईनं आरतीला अलगद वेढून घेतलं. पाऊस नुकताच पडून गेला होता. विजेच्या राखाडी रंगाच्या तारा झाडांवरून जाताना रंग पालटून मोरपंखी बनत होत्या. अधूनमधून त्यांच्यावर पाण्याचे टपोरे थेंब चकाकत होते. तारांवर बसलेली चिमणी पाखरं शेपट्या वरखाली करत लकेरी मारत होती. वेस्टर्न म्युझिकच्या नोट्स जणू कुणीतरी जाताजाता आभाळात लिहून ठेवल्या होत्या.

अभयनं हे दृश्य कधी पाहिलं असेल का? असणार. ही वॉज व्हेरी सेन्सिटिव्ह टु सच सटल थिंग्ज. ...मग हे पाहून त्याला कुणाची आठवण झाली असेल? अतुलाची?

तास संपल्याची घंटा झाली, तशी तिला हायसं वाटलं अन् त्यामुळेच आपण किती यांत्रिकपणानं, केवढ्या दडपणाखाली शिकवलं ते लक्षात येऊन तिला स्वत:चंच आश्चर्य आणि कौतुक वाटलं. वेल डन बेबी! यू कॅन पुट ऑन अ गुड ॲक्ट!

कॉरिडॉरमधून जाताना प्रमथ मेहतानं तिला मागून गाठलं. ''मॅडम, युअर लेक्चर वॉज टेरिफिक टुडे! वुई रिअली एन्जॉइड द पोएम. शायनेसच्या ज्या शेड्स तुम्ही उलगडून दाखवल्यात, कवितेत त्यातलं फारच थोडं व्यक्त झालंय. ...मला वाटतं, त्यात प्राइडचाही थोडासा भाग असला पाहिजे, नाही का?''

कॉम्प्लिमेंट स्वीकारताना तिला नेहेमीच जरा अवघड वाटायचं. अन् आज आपण चांगलं शिकवलं असेल ह्यावर तिचा विश्वास बसणं आणखीच कठीण होतं. तरीही वरवर हसून तिनं प्रमथचे आभार मानले. ''आय थिंक, एव्हरी पोएम इज ऑल्वेज ओपन टु इंटरप्रिटेशन.''

''पण कधीकधी एखादी कविता फक्त तुमच्याशीच बोलते, नाही का?''

बोलणं आवरतं घेत आरती पुढे चालू लागली. मनातून ती थोडी चपापली होती. डिड आय प्रोजेक्ट मायसेल्फ ऑन द पोएम? हॅव द स्टुडंट्स रीअलाइझ्ड इट ?... जवळजवळ आपल्या बरोबरीची, मॅच्युअर मुलं ही. ह्यांना शिकवताना जरा जास्त कॉन्शस असायला हवं इथून पुढे.

विचारांच्या तंद्रीतच ती कॉमनरूमपाशी येऊन ठेपली, पण आतल्या गजबजाटात शिरण्याची तिला इच्छा होईना. दारुड्याची पावलं गुत्त्याकडे वळावीत तितक्या नकळत मग तिनं लायब्ररीचा रस्ता पकडला.

वाटेतल्या तळ्याकाठी थोडा वेळ उभं राहण्याचा मोह तिला झाला आणि अलिप्ततेचं शेवाळ क्षणभर बाजूला सरून पुन्हा ती आपल्या मनात डोकावली. ...त्या दिवशी अभय त्याला अतिशय शोभणारा तो लाइट मरून रंगाचा शर्ट पहिल्यांदाच घालून आला होता. नोटिस बोर्डावरच्या सक्त मजुरीच्या नोटिसा मन:पूर्वक वाचत असल्याचा बहाणा करून, तिनं तिथल्या काचेत चतुराईनं त्याचं प्रतिबिंब पाहून घेतलं होतं. इथे रेंगाळण्यात काय अर्थ आहे? पाण्याच्या तळाकडे लावलेली दृष्टी तिनं उचलून घेतली आणि ती लायब्ररीच्या दिशेनं चालू लागली.

पुस्तकांमधे गुंतण्याचं हे जुनं व्यसन अलीकडे तिला पुन्हा गाठत होतं. पूर्वीही, तिच्या कॉलेजच्या दिवसांत, जेव्हा तिला पाण्यावर तरंगणाऱ्या तेलाच्या तवंगाप्रमाणे एकटं, वेगळं भासू लागे तेव्हा ती पुस्तकांच्या आड दडायची. हल्ली तर भरमसाट पुस्तकं ती चक्क खरेदीसुद्धा करू लागली होती. त्यांच्या पहिल्या पानांवर ती स्वत:लाच गोंजारणाऱ्या ताठ, कोवळ्या अक्षरांत आपलं नाव घालायची.

आपल्या ह्या कृतीमागचा कणखर, वास्तववादी पळपुटेपणा आता असा लक्षात आला, तेव्हा ती स्वत:वर चिडली नाही. थँक्यू, मिस्टर टुमॉरो! तू आहेस म्हणून मनाचे हे पापुद्रे आज असे सुटून हाती लागताहेत. ऑन अ क्लीअर डे लाईक दिस, यू कॅन सी थ्रू. गेल्या महिन्याभरातल्या आपल्या वागणुकीच्या गूढांच्या सगळ्या किल्ल्या आत्ता हाती लागताहेत. हे सगळं तुला आज पाहून, ओळखून ठेवलं पाहिजे. कुणी सांगावं, उद्या पुन्हा त्या बधिर स्थितीत तू स्वत:ला विसरून जाशील. मुखवटा पृथ्वीवर आणि चेहरा अंतराळात ठेवून वजनरहित गरगरत राहशील, शून्यात!

लायब्ररीत ती पोचली. आपल्याला नेमकं काय वाचायचं आहे, हा प्रश्न स्वत:ला विचारण्याइतकी ती तिच्या तंद्रीतून बाहेर आली नव्हती. केवळ सवयीनं ती समोरच्या शेल्फवरची नवी पुस्तकं-मासिकं चाळू लागली. कव्हरांवरचे आकर्षक रंग, आतली अक्षरं तिच्यावर सुटीसुटी उमटू लागली. मन आणिकच कुठल्या सुट्या, विस्कळीत गोष्टी एकत्र विणण्यात गुंतलं होतं. आपल्या एकटेपणाची राणीव तिनं इथवर एखाद्या राजवस्त्रासारखी मिरवली होती. आज मन घट्ट करून त्यातली सगळी ठिगळं तपासून पहाण्याचा तिनं निश्चय केला. हे स्वत:ची कातडी सोलून स्वत:चाच एक्स रे काढण्यासारखं अवघड होतं.

आरतीनं दुसरं पुस्तकं हातात घेतलं आणि ती ते यांत्रिकपणे चाळू लागली.

''जिऑलॉजीचं पुस्तक? नि तुझ्या हातात? दगडावरची कविता शिकवत्येयस की काय एखादी?'' - अंजलीनं एका विद्यार्थ्याला पुस्तकं इश्यू करताकरता थट्टेखोरपणानं आरतीला हटकलं.

आरती ओशाळली. पुस्तक गडबडीनं शेल्फवर ठेवताना तिच्या सहज लक्षात आलं : अंजू आज विशेषच गोड दिसत्येय.

अंजू आणि आरती म्हणजे वास्तविक अगदी दोन टोकं. आरतीचं बोलणं मोजकं, संथ, थबकतं; तर अंजूचं भरमसाट, भरधाव आणि अव्याहत, पण मुलगी होती मोठी गोड, निर्मळ आणि निर्व्याज. तिच्याशी बोलताना एखाद्या अवखळ झऱ्याचे तुषार अंगावर घेतल्यासारखं उल्हसित वाटे. अंजू म्हणजे मूर्तिमंत जीवन होतं. आरतीला हे व्यक्त करायला कधी फारसं जमलं नसेल, पण तिचं अंजूवर अगदी धाकट्या बहिणीवर असावं तसं प्रेम होतं.

''आज तुझा शनिवार वाटतं? फारशी गोड दिसत्येयस?'' आरतीनं छेडलं. अंजूचा खास मित्र तिला दर शनिवारी भेटत असे. सुरुवातीच्या त्यांच्या गाठीभेटी आरतीला भोज्या करूनच घडल्या होत्या.

अंजू इश्यूइंगच्या काउंटरवर शोभू नये इतकी लाजली. मग पुस्तकं आत नेऊन टाकण्याच्या निमित्तानं ती उठली. आरतीचा हात धरून तिलाही तिनं आत ओढून नेलं. कधी नव्हे ते तिला 'काय सांगू, कसं सांगू' असं झालं. मग आरतीचा हात हातात घेऊन ती तिच्या कानात कुजबुजली, आता माझा रोजच शनिवार!

म्हणजे? - आरतीनं आनंदाश्चर्यानं विचारलं.

''काल रवी अचानक भेटला रस्त्यात. मला 'गार्डन कॅफे'त घेऊन गेला. कुठल्यातरी सिनेमातला हिरो, हिरॉईनला लग्नाचं विचारताना कसा बावळटतो, त्याची गोष्ट सांगत होता. मी एकदम म्हणून गेले, 'तुझ्यावर नाही कधी अशी वेळ यायची, नाही का? तू तुझ्या मैत्रिणीलाच प्रपोज करायला लावशील !' मग विचारलं त्यानं मला एकदाचं कसंबसं! लग्न एवढ्यात करता येईल की नाही कोण जाणे! त्याच्या घरी... माझी मोठी बहीण ... जागेचा प्रश्न... अगं, तू कुठे हरवलीस?''

अंजूच्या झऱ्यानं जरा अधिक ओढ घेतल्यानंतर आरती मागेच निश्चल होऊन थांबली होती. तिचं दचकून स्वत:ला सावरणं पाहून अंजूला हसू फुटलं. आरतीच्या डोळ्यांत रोखून पाहत ती म्हणाली, ''ए! तुझंही लक्षण काही खरं दिसत नाही हं!'' मग डोळे बारीक करून खाजगी सुरात तिनं विचारलं, ''हू इज दिस लकी गाय?''

''चल गं! प्रेमिकांना सगळं जगच प्रेमात पडल्यासारखं दिसतं!'' आरतीनं सारं वरच्या वर झेललं. ''चल आता! भिडे टवकारून आपल्याकडेच पहातायत बघ! अन् पार्टी कधी देत्येयस?''

अंजू काउंटरवर जाऊन आपल्या कामाला लागली.

एकामागून एक एक्स रे रिपोर्ट्स आरतीच्या हातात अलगद पडू लागले. ह्या मुलीच्या धिटाईचा आपण कुठेतरी हेवा करतो आहोत का? हिचं प्रकरण रांकेला लावायला आपण मदत केली, ती का? हिच्या आयुष्यातून आपण जगून घेतो आहोत की काय?

तिला आठवल्या त्या भयाण, अस्वस्थ, कुंद रात्री , जेव्हा तिच्या डोक्याचं इलेक्ट्रॉनिक्स पार बिघडून गेलेलं असायचं. डोक्यात सारखी शॉर्ट सर्किट्स होताहेत असं वाटायचं. 'राउंड पेग्जमध्ये स्क्वेअर होल्स' ठोकल्याची भावना व्हायची. छोट्याशाही आवाजानं दचकायला व्हायचं. भलभलते, विचित्र, असंबद्ध आभास कोपऱ्यात एक प्रचंड मोरपीस उभं आहे. त्यातला तो जिवंत, रात्रनिळा डोळा आपल्याकडे रोखून पाहत आपल्याला शोषून घेतो आहे. आपण त्यात ओढल्या जात आहोत. ...तो उंच मनोऱ्यावर, पाठीमागे हात बांधून येरझारा घालणारा इसम. त्याच्या बुटांचा टॉक्टॉक् असा कठोर ताल. त्याचा चेहरा मात्र नीट दिसत नाही. तो आपला मित्र आहे की वैरी? कुणीही असो, त्याचा चेहरा आपल्याला दिसलाच पाहिजे. ही भोवतालची अफाट गर्दी... तो केव्हाही त्या गर्दीत मिसळून हरवून जाईल. ...मला जाऊ दे. मला एकदा त्याला पाहू दे!

तिच्या मनाची स्थिती ताणलेल्या रबरासारखी झाली होती. ते वाचणं, नकळत कसलंतरी पाठांतर घोकणं, अशा पूर्ण सवयीच्या गोष्टींत सुरक्षितता शोधू पहात होतं. नेहेमीची फ्लेक्झिबिलिटी जाऊन त्या जागी ताठरपणा, यांत्रिकता आली होती.

आज तिच्या डोक्यात प्रकाश पडला : खरं म्हणजे ओठांना आकार यायचा त्याच्या नावाचा; पण एक साक्षेपी, पहारेकरी मन ते नाव नाकारत होतं.

आताही हे सगळं विच्छेदन त्या खबरदार मनाला पाहवत नव्हतं. कम ऑन, कम आउट ऑफ इट! त्यानं तिला हाक दिली. कुठलंसं कवितेचं पुस्तकं तिनं उघडलं. हे विश्व तिला एका मनोऱ्यावर सुरक्षित ठेवील. पण आज ते आतलं बंदीवान मन जिवाच्या करारानं उसळून उठलं होतं. त्या लखलखत्या ओळींना भिडून ते पुन्हा भळभळू लागलं...

'अभिलाषाच जर दु:ख झाली
तर तिच्यातून नंतर अलगणाऱ्या
नवीन दु:खाचे नाव काय?'

...नाही. डोळ्यातलं हे कुसळ आता वाहून जाऊ द्यायला हवं. नाहीतर थर्मासची काच जशी बाटलीतल्या बाटलीत फुटते, तसा मनाचा चक्काचूर होणार एक दिवस!

आपल्याच आत्मकरुणेचा हा साक्षात्कार असह्य होउन तिनं टेबलावर डोकं टेकलं. टेबलाचा दणकट आधार मिळताच मन जास्त कोवळं बनलं. हात लावला तर कोळपून जातील, अशा नाजुक आठवणी त्या कोवळिकीनं धिटावून मनात डोकावू लागल्या.

फिलॉसॉफी काँग्रेसच्या प्रतिनिधींचं स्वागत करण्यासाठी जी समिती कॉलेजतर्फे नेमली गेली होती, तिच्यात आरती नि अभय दोघांचा समावेश होता. त्या कामाच्या निमित्तानं प्रथम त्यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या. त्याच्या वागण्यातलं सौजन्य, बोलण्यातला हजरजबाबीपणा आणि कामातली तडफ ह्या सगळ्यानं तिला आकर्षून घेतलं. मोजक्याच शब्दांत, अदबशीर आविर्भावात, पण स्तुतीचा वासही येऊ न देता तो मोठमोठ्या व्याख्यात्यांचा परिचय अशा खुबीनं करून द्यायचा, की बस्स! त्याच्या बरोबरीनं त्या समारंभाचं यजमानपण सिद्ध करताना, त्याच्याबरोबर कुठेही वावरताना एक वेगळाच आल्हाद तिच्या मनावर पसरे. एखादा दिवस तो दुसरीकडे गुंतला असला, तर तिला चुकल्यासारखं वाटे. आपण सोबत नसलो तर त्याचंही चित्त कामातून सटकत असावं, असं तिला लांबून त्याच्यावर लक्ष ठेवताना वाटे. त्याचं तिला काहीतरी निमित्तानं सारखं हाक मारणं, कधी डिपार्टमेंटपर्यंत सोडायला येणं, तिनं दक्षतेनं पार पाडलेल्या एखाद्या गोष्टीची दखल घेणं, तिच्या एखाद्या मार्मिक शेऱ्याला दाद देणं, ह्या गोष्टींतून तिला त्याची तिच्यातली गुंतणूक जाणवत होती.

एकदा काही कामानिमित्त त्यानं निरोप पाठवून तिला आपल्या केबिनमध्ये बोलावून घेतलं होतं. आपण केवळ कामासाठी त्याला भेटतो आहोत असं स्वत:ला बजावत ती गेली खरी, पण त्याच्या टेबलाशी उभं राहीपर्यंत ती नकळत इतकी बावरून गेली. की तिच्या कापणाऱ्या हातांतली पुस्तकं खालीच पडली. त्यानं तिचा संभ्रम ओळखला होता का? असावा... कारण त्यानंच मोठ्या दाक्षिण्यानं तिला तो सावरून दिला होता. तिला बसायला सांगितलं होतं. कामाचं बोलण्याअगोदर पडलेल्या पुस्तकाच्या नावाचा आधार घेऊन थोडं इकडचं-तिकडचं संभाषण केलं होतं. जाताना केबिनचं झुलतं दार अदबीनं तिच्यासाठी उघडून धरलं होतं.

हे सारं आठवून तेव्हाप्रमाणेच आत्ताही ती शरमेनं चूर झाली. कॉलेजमधल्या मुलांना शिकवणाऱ्या लेक्चरर आपण अन् अजून आपल्यालाच खरी मॅच्युरिटी आली नाही का? कशा एखाद्या शाळकरी मुलीसारख्या बिचकलो आपण?

अशी बावरती का होईना, दोघांचीच अशी मुलाखत परत कधी झालीच नाही. तसं निमित्त घडलं नाही. मुद्दाम घडवून आणण्याइतकी ती धीट नव्हती. त्याचाही तो स्वभाव नसावा.तो त्याच्या फिलॉसॉफी डिपार्टमेंटच्या व्यापात, ती तिच्या.आमोरासमोर ती दोघं यायची ती इतरांच्या साक्षीनंच. केवळ श्वासांच्या भाषेत नि:शब्द सायुज्य अनुभवणं तिच्या स्वप्नातच राहिलं. प्रत्यक्षात पदरात आली ती कॉमन रूममधली संभाषणं. बऱ्याचदा एखाद्या वादाची एकच बाजू उचलून धरताना अनुभवलेली बुद्धीच्या पातळीवरची सलोकता. मात्र आपला मुद्दा पटवताना राहूनराहून त्याची नजर अभावितपणे तिच्याकडे वळे, जणू तो तिला एकटीलाच उद्देशून बोलतो आहे. कधीतरी 'आय विश आय हॅड सेड दॅट !' वगैरे. एकदा अवचित म्हणून गेला होता, 'वुई आर ट्विन सोल्स!'...क्वचित कुण्या अनाहूत पाहुण्याखातर दोघांनी वाटून घेतलेला कॉफीचा कप. टर्म एंडिंगच्या डिनरला त्यानं तिच्या शेजारी पटकावलेली जागा. जिन्यातून आपापल्या तंद्रीत जाताना दोघांनी सारख्याच कौशल्यानं चुकवलेली टक्कर. अकारण पाठ झालेला त्याच्या स्कूटरचा नंबर.

केव्हा तरी समोरासमोर उभं असताना घेतलेला त्याच्या उंचीचा अदमास. मनातच गुंफून घेतलेली त्याची निमुळती, कलासक्त बोटं.

अन् वेळोवेळी आपल्या आभासविश्वात जादूची कांडी फिरवावी तसा होणारा त्याचा प्रवेश. संध्याकाळच्या वेळी तिच्या गल्लीतलं शिरीषाचं झाड पाखरांच्या आर्त विराण्यांच्या गूढ डोहात बुडून जायचं, तेव्हा ती नकळत त्याच्या अबोल, काहीशा उदास आणि दूरस्थ डोळ्यांत हरवून जायची. तिला अतिशय प्रिय असलेल्या त्या झऱ्यावरच्या अरुंद पुलावरून, पाऊसधारांमधून ती त्याच्याबरोबर फिरायला जायची. पहाटेच्या धुक्यात दवाचे वितळते हिरे मिरवणारं पांढरंशुभ्र गुलाबाचं फूल तिनं अलगद त्याच्या ओंजळीत ठेवलं होतं. चांदण्यात झाडांच्या सावल्यांनी रेखलेल्या रांगोळ्या विस्कटत ती सात पावलं त्याच्याबरोबर चालत असे.

तिचं तिलाच आश्चर्य वाटलं, प्रत्यक्षातल्या पुसटशाही प्रतिबिंबाच्या आधारावाचूनच तिच्या मनात त्या बीजाचा एवढा वृक्ष कसा उभा राहिला?

अन् मग हे सारं बोलून दाखवू म्हणताना ओठ का शिवले जायचे? जगात वावरण्यासाठी बनवून घेतलेल्या पोलादी टोपणाआड कुठेतरी हळवेपणाचा पोपटी कोंब दडून बसला होता? अपेक्षाभंगाच्या दु:खाला भिऊन मागे राहत होता? – असेल. आणिकही बरंच काही उलटसुलट. ...त्याच्यावाचून असहाय्य बनणं आपल्याला कसं परवडेल? कोणत्या स्त्रीला आजवर परवडलं आहे हे? तो नाही मिळाला तरी, आतल्या आत फुटून जाऊनसुद्धा अभंग चेहऱ्यानं वावरलं पाहिजे. 'पृथ्वीचे प्रेमगीत' आपल्याला कधीच मानवणार नाही. आपण काय माणूस नाही आपल्याला कणा नसायला? आय वोन्ट टेल हिम एनिथिंग! मी मुळीच त्याच्याभोवती फेर धरणार नाही की जाळं विणणार नाही.

दुसरं, रवींद्रनाथांच्या साहित्यातल्या साध्या, समंजस शहाणपणावर पोसलेलं मन म्हणे, 'प्रेम हाच पाठीचा कणा असतो.'

पण ही सगळी वादळं कुठल्या किनाऱ्याला लागण्याआतच, चाललाय तो आपला समर्थपणा आहे की दुर्बळपणा हे कळायच्या आतच, तिच्या कानावर आलं की पोस्ट-डॉक्टरल रीसर्चसाठी तो कुठेतरी परदेशी चालला आहे.

ऐकताना तिनं निर्विकारपणे ऐकलं. तो निर्विकारपणाचा मुखवटा तिच्या चेहेऱ्यावर इतक्या इमानानं चिकटून बसला, की बस्स!

आज भूकंपासारखी कसलीतरी अनाकलनीय उलथापालथ होऊन मनाचा हिमनग उलटा झाला, कासवाचं मऊ पोट वर करून उताणा तरंगू लागला; तेव्हा अतिस्मृती होऊन काळजीपूर्वक पुसून टाकलेले हे सारे तपशील पुन्हा तिच्या हाती आले.

काय करू? आता काय करू?... अजून , आजच्या आज, मुंबईला जाऊ? एअरपोर्टवर त्याला निरोप द्यायला जाऊ? ... तीन वर्षं ... कदाचित जास्तही. एवढ्या काळात काहीही घडू शकेल. काहीच देवाणघेवाण न होता त्याला असंच जाऊ देऊ? पुन्हा दिसेल का तरी तो? काहीतरी लिहावं का? पण फार उशीर झाला. तो जायच्या गडबडीत असेल. बाकीच्या व्यापात ही आणिक भर कशाला? ...वेळ टळली आता!

तिला आठवलं : रोज संध्याकाळी ती घरात वाचत बसलेली असायची. मधूनच बाहेरच्या सुंदर उन्हांकडे लक्ष गेलं की मनात म्हणायची, 'एवढं वाचून झालं की जाऊ फिरायला.' पण पुस्तकातून डोकं वर निघायचं तेव्हा उन्हं हमखास निघून गेलेली असायची. त्यांचं देणं नेहेमी तसंच राहून जायचं.

अन् आज आता हे काळजाचंच देणं कायमचं राहून गेलं!... तिच्या गळ्यात हुंदका दाटून आला.

स्वत:च्याच डाव्या मनगटावर तिनं उजव्या हातानं थोपटलं. ...सबूर. जे भाळी लिहिलेलं असेल तेच होईल.

बराच वेळ स्वत:ला समजावल्यावर गळ्यातला तो हुंदका मुकाट्यानं परत गेला. एखादं अवघड ऑपरेशन पार पाडल्यासारखा थकवा तिला आला. त्याचबरोबर स्वत:च्या कौशल्याबद्दल कौतुक वाटून तिचा आत्मविश्वासही थोडा वाढला : काँग्रॅच्युलेशन्स, माय लेडी! यू आर क्वाइट फिट टु सर्व्हाइव्ह!

ताणलेल्या रेषांवर चर्या पेलत तिनं मान वर केली --

– आणि ती दचकलीच!

शेजारच्या खुर्चीत चक्क तो बसला होता.

थोडा वेळ ती अविश्वासानं पाहत राहिली. काय घडलं मधल्या काळात? आपण अशा किती वेळ बसून होतो? हा किती वेळ आपल्याला पहात असेल?

शेवटी तिला आवाज फुटला, ''तुम्ही ... इथे कसे काय?''

''कारण मला माहीत होतं, तुम्ही इथे असणार म्हणून.'' तो आपल्या नेहेमीच्या लाघवी शैलीत म्हणाला.

म्हटलं तर खोल, म्हटलं तर गमतीचे शब्द. जाताजाता एखादीला खुलवण्याची, मोजक्या शब्दांवर अर्थाचा अमर्याद भार टाकण्याची त्याची पद्धत तिला माहीत होती. तो काय शोधत थोडाच आला आपल्याला? छे:! हाऊ कुड ही मीन दिस?

तिनं स्वत:ला सावरत म्हटलं, ''म्हणजे मला म्हणायचं होतं, तुम्ही या गावात कसे? उद्याची फ्लाइट होती ना तुमची ? आज मुंबई....''

''थोडा घोळ झालाय. व्हिसा वगैरे लचांडात अडकलोय. सगळं क्लीअर झालं की जाईन आठवड्याभरात!'' त्यानं खुलासा केला.

तिच्या उरात एकदम सुटकेचा श्वास भरून आला. जणू जलप्रलय काही दिवसांसाठी पुढे गेला होता.

तिला आठवलं, अशाच एका कातर संध्याकाळी तिनं काढलेलं एक छोटं चित्र या क्षणी उगाचच तिच्या पर्समधे होतं. उगाच? की काही झालं तरी जाण्यापूर्वी तो भेटेलच, अशी निराश आशा तिच्या एका मनानं जपली होती म्हणून?

संध्याकाळचं कातर, सोनेरी वैभव उधळलेलं आकाशात. टेकडीची एक घडी जणू बुरखा पांघरून बसलेली, स्वमग्न. तिच्या वक्ष:स्थळी, पाठमोरा होत असलेला सूर्य. त्यानं जाऊ नये म्हणून निष्पर्ण झाडानं आपले रिते हात पसरून घातलेली मूक साद. मध्ये बिनलाटांचा रिता, गहिरा समुद्र.

ह्या साऱ्याचा गर्भितार्थ त्याला उमगेल?

- उमगावा.
- उमगू नये.

क्षणभर तिला वाटलं की, ह्यापेक्षा ह्याला कँटिनमधे चहा पाजून, इतके दिवस आपल्याला न सुचलेल्या कॅज्युअल रीतीनं त्याचं अभिनंदन करावं, त्याच्या नकळत त्याला निरोप द्यावा.

पण बंदिवान मन म्हणालं, हे फार झालं? दीर्घ वियोगाच्या नव्हे, एका असंभाव्यतेच्याच अलीकडल्या सीमेवर एवढाही, एका कातर संध्याकाळीच्या पोस्टकार्डएवढ्या लांबीरुंदीचा, निरोप द्यायचा नाही ह्याला? त्याच्याविना रित्या होणार असलेल्या माझ्या जगाची ही आठवण त्यानं वाटल्यास मोरपीस म्हणून मनाच्या पुस्तकात ती जपून ठेवावी. बर्लिनमधले अनोळखी रस्ते, परकी माणसं, अपरिचित इमारती एखाद्या एकाकी संध्याकाळी एकाएकी अजस्त्र बनून त्याला गिळू पाहतील. तेव्हा कदाचित त्याच्या मायदेशात राहून गेलेली, तितक्याच व्याकुळपणे मालवत असलेली ही सांजवात त्याला सोबत करील.

पर्समधून काढून तिनं ते चित्र हाती आलेल्या एका पाकिटात घातलं. न थरथरणाऱ्या अक्षरांत तिनं पाकिटावर एवढंच लिहिलं –'Best Wishes.'

ते पाकीट त्याच्यापुढे करून ती म्हणाली, ''मला हे बरंच उशिरा सुचतं आहे, पण प्लीज कीप दिस अँज अ पार्टिंग गिफ्ट!''

हसून तिचे आभार मानत त्यानं ते स्वीकारलं.

नंतरचे काही दिवस कसे पार पडले ते तिला कळलंच नाही. डोकं विलक्षण दुखत असायचं. बोलताना विचारांचे दारुड्यासारखे झोक जात. एकेक वाक्य संपवताना वाटायचं की, केलेल्या सुरुवातीशी शेवटाचा मेळ बसला असला तर मिळवलं! शिर तुटलेल्या बाजीप्रभूच्या जिद्दीनं ती एकेका तासाची खिंड लढवी.

एक दिवस कॉमनरूममध्ये पाऊल टाकताना तिच्या कानावर पडलं, ''ओ! व्हॉट अ पिटी!''

हे उद्‌गार बाहेर पडत होते, फिलॉसॉफीचे हेड ऑफ द डिपार्टमेंट तिथे बसले होते; त्यांच्या तोंडून!

त्यामुळे कान टवकारून तिनं त्यांना विचारलं, ''व्हाय? व्हॉट्स द मॅटर?''

''अवर पुअर अभय लॉस्ट द चान्स टु गो अब्रॉड. युजीसीनं ग्रँट कट् केली, त्याचा फटका बसलाय!''

प्रथम तिला निखळ आनंद झाला. म्हणजे अभय आता आपल्या अक्षांशरेखांशांतच राहणार तर! मग आपल्या जखडणाऱ्या बंधांची तिला शरम वाटली. त्याच्या करिअरचं होणारं नुकसान जाणवून तिला हळहळ वाटली. मग शेवटी तिला जाणवलं, ज्या भावनेची कबुली आपण मृत्युशय्येवरच कदाचित दिली असती, ती आपण एका कृतक् प्रलयदिवशी साठाउत्तरी, सुफळ संपूर्ण व्यक्त करून बसलो आहोत!

त्या जाणिवेच्या तडाख्यानिशी ती पुन्हा स्तब्ध पुतळा बनली. देवा! आय डोंट वॉँट टु सी हिम अगेन! का, का ते कार्ड त्याला देण्याची बुद्धी झाली मला? स्वप्न अशक्यतेची छाया बरोबर घेऊन येतं म्हणून सुंदर, निष्पाप भासतं. मी जे मागितलं ते खरंच समोर आलं, तर त्याच्या डोळ्याला डोळा देऊ शकेन मी?

डोंट बी अ फूल, माय डीयर! आपल्या प्रांजळ मनाची खूण कुणाला देणं हा गुन्हा आहे का? आफ्टर ऑल, यू डोंट एक्स्पेक्ट एनिथिंग फ्रॉम हिम.

मीनाकुमारीच सांगू लागली तिला, तिचं काय झालं ते –

*'यह मत पूछो, कल क्या हो?*<br>
*कौन कहे इस पल क्या हो?*<br>
*बहती नदी को बांधे बांध;*<br>
*चुल्लू में हलचल क्या हो?'*

त्या एका कागदी देण्याच्या क्षणानंतरचं, पुढचं काही उघड्या डोळ्यांनी बघितलं होतंस? कदाचित हे सारं अलगद झेललं जाईल. कदाचित बूमरँगसारखं उलटेलसुद्धा. तू तर आहेस तळ्यातमळ्यात. स्वत:ला दैवावर सोपवते आहेस. त्या दिवशीचा निर्णय तुझा नव्हता. तो इथे होता, म्हणून त्याला ती खूण मिळाली. आता तो इथेच राहणार म्हणून पुढचं काही. हे नेहेमीचंच. तू तलवार, मी ढाल. प्रतिक्रियात्मक वागणं. रस्ता मागे सरतो म्हणून आपण पुढे जातो, इतकंच!

त्याला ह्या साऱ्याचं काय वाटलं असेल? आपण त्याच्या–समोर झगझगीत प्रकाशात, पारदर्शकपणे खरं तर नग्नपणे उभ्या आहोत. त्याचा चेहरा मात्र आपल्याला दिसत नाही त्या मनोऱ्यावरच्या माणसाप्रमाणे...

ह्यापेक्षा तो काळजातला बाण काळजातच खुपत ठेवला असता तर तिथेच सुखरूप खुपत राहिला नसता? बाहेर काढल्यानंतरची ही बधिर, वांझ भळभळ. जवळ बाणही नाही, जखमही नाही. नुसता रितेपणा!

**– हेमा अंतरकर**
भ्रमणध्वनी : ९८६०००३६८१
hemantar@yahoo.co




रत्नाकर मतकरी

# लेखन आणि चित्रं : एक निरंतर शोध

**प्रत्येक कलेमध्ये एक शोध असतो जो माझ्या लेखनामध्ये आहे तसाच चित्रकलेमध्येही. माझ्या कथा, नाटकं पाहिली तर असं लक्षात येईल त्यात दृश्यात्मकता खूप आहे, ती या कलेमुळेच!**




लहानपणापासून मला चित्रकलेची आवड. पाटीवर, जमिनीवर खडूने चित्र काढत असे. मला अनॉटॉमीचा सेन्स होता. कोलकत्याहून निघणारी 'मॉर्डन रिव्ह्यू'सारखी मासिकं आमच्या घरी येत असत. ती वडिलांनी बाइन्डिंग करून ठेवली होती. ते अतिशय विद्वान, त्यांचं वाचनही चांगलं होतं. त्यामुळे अवनिंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस यांची चित्र जी आपण 'बेंगॉल स्कूल'ची मानतो ती मी पुन्हा-पुन्हा पाहत असे. तशी काढण्याचा प्रयत्न करत असे. मी शाळेत फार हुशार होतो आणि अभ्यासाक़डे या गोष्टींमुळे दुर्लक्ष होऊ नये म्हणून असेल कदाचित पण चित्रकलेला काही उत्तेजन कधी मिळालं नाही. सातवीला असताना बाईंनी 'केतकर आर्ट इन्स्टिट्यूट'चा उल्लेख केला होता तिथे शिकायची इच्छा होती. वडील घेऊनही गेले होते मात्र तो गिरगावात असल्याने तिथे शिकायचं स्वप्न तसंच राहिलं, पण मी चित्रकलेचं धरलेलं बोट काही सोडलं नाही. शाळेत असताना इलिमेंटरी, इंटरमिडीएट परीक्षांमध्ये मला उत्तम गुणही मिळाले होते. शाळेतून दखल घेतली जात असे. एकदा ऑस्ट्रेलियाला भरलेल्या एका फेस्टिव्हलला माझी चित्र पाठवली होती. अनेक स्पर्धांना माझी चित्र पाठवली जात.मात्र घरातून प्रोत्साहन नव्हतंच. त्यामुळे चित्रकलेचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेता आलं नाही. माझा मीच गुरू होतो आणि शिष्यही.

चित्रकलेमध्ये विचार हा खूप महत्वाचा असतो. विचार करायला लागल्यावर १९६५ पर्यंत म्हणजेच माझ्या वयाच्या सव्वीस-सत्तावीस वर्षापर्यंत मी खूप गंभीरपणे चित्र काढत होतो. त्यावेळची चित्रकला, प्रोग्रेसिव्ह ग्रुप, मॉर्डन आर्ट अशी चित्रकलेची विविध अंग चाचपडून पाहत होतो. झपाटल्यासारखी चित्रप्रदर्शने पाहत होतो. केवळ पाहत नाही तर त्याचा गंभीरपणे विचार करत होतो. मग मला वाटायला लागलं कमीत-कमी रेषांमध्ये, रंगांमध्ये आपण चित्र काढू शकतो का? तशीही मी काढून बघायला लागलो. शंकर वैद्यांनी त्यांच्या कवितांवर, बालकवींच्या कवितांवर चित्र काढायला सांगितलं होतं. ती काढली पण ते तेवढ्यापुरतंच होतं. चित्रकलेला थोडं अधिक गंभीरपणे घ्यावसं वाटलं तेव्हा कॅनव्हास, रंग असं सारं काही चित्रकार पद्मा सहस्त्रबुद्धे यांच्या मदतीने आणलंही, पण मग माझ्या मनात असा विचार आला की चित्रकार आणि लेखक या दोघांची विचार करण्याची पद्धत अगदी वेगवेगळी आहे. तोपर्यंत मी लेखनात स्थिरस्थावर झालो होतो, पण पूर्णवेळ चित्रकार मी नव्हतो. लेखनाला जसा विचार लागतो तसा चित्रकलेलाही. रात्रंदिन तुम्ही चिंतन केलं पाहिजे. त्यासाठी तुम्हाला तुमचा पूर्ण वेळ द्यावा लागतो. चित्रकलेचे लॅन्डस्केप, ॲबस्ट्रॅक्ट आर्ट, रिअलिस्टिक असे वेगवेगळे जे पैलू आहेत त्यापैकी आलेला विचार नेमका कोणत्या शैलीत उतरवावा असे प्रश्न पडतात. चित्रकलेमध्ये विचार हा खूप महत्त्वाचा असतो. प्रत्येक कलेमध्ये एक शोध असतो जो माझ्या लेखनामध्ये आहे तसाच चित्रकलेमध्येही. कमीत कमी रंगात, रेषात, कागदाचा जास्तीत भाग वापरून एकच चित्र वॉटर कलरमध्ये करू, ऑईल पेस्टल कलरमध्ये करून पाहू असं माझं संशोधन सतत सुरू असायचं. जर आपण चित्रकलेबाबत असं संशोधन करायला लागलो तर आपल्या लेखनाचं काय होईल म्हणून चित्रकलेचं धरलेलं बोट काहीसं सैल



करत मी लेखनाकडे वळलो.

माझ्या कथा, नाटकं पाहिली तर असं लक्षात येईल त्यात दृश्यात्मकता खूप आहे, ती या कलेमुळेच! चित्रकलेचा वापर मग मी गरजेपुरता करायला लागलो. नाटकाची वेशभूषा, सेट्सचे स्केचेस अशा प्रकारची कामं केली. 'पॉप्युलर' प्रकाशनाने जी लहान मुलांची पुस्तकं काढली आहेत त्यात माझी रेखाचित्र वापरली. विंदा करंदीकरांच्या 'अजबखाना', 'टॉप', जयवंत दळवींच्या 'विरंगुळा' पुस्तकाचं कव्हर, माझ्या काही पुस्तकांची कव्हर्स, आतली चित्र असं छोटं-मोठं काम सुरू होतं. कधी सहलीला जाण्याचा योग आला की मी सोबत चित्रकलेचं सामानही घेऊन जात असे.तिथे लॅन्डस्केप वगैरे करत असे. त्यामुळे चित्रकलेचा रियाज होत होता.

नर्मदा आंदोलन सर्वांनाच माहित आहे. या आंदोलनावर मी काही लिहावं असं मेधा पाटकरला वाटत होतं. मी तिथे गेलो नि तो सारा महौल पाहून मला तो विषय नाटकापेक्षाही चित्रकलेचा वाटला. त्यावेळी मी काही पंधरा एक चित्र तयार केली. या चित्रांचं कौतुकंही झालं. त्यातली काही त्यांनी निधी जमवण्यासाठी अमेरिकेला नेली आणि विकली. काही अजूनही माझ्याकडे आहेत. त्यामुळे काही तरी निमित्ताने मी चित्र काढत होतो. पण हवं तसं उत्तेजन मिळत नव्हतं.

आता 'दीपावली'च्या अंकात प्रभाकर कोलतेंनी माझ्या चित्रांवर लिहिलेलं आहे. ती चित्र म्हणजे थोडी सेमी अॅबस्ट्रॅक्ट आहेत. घरामध्ये ज्या वेगवेगळ्या वस्तू पडलेल्या असतात, त्या नीट जर पाहिल्या तर त्यांनाही एक आकार असतो. उदा. प्लॅस्टिकची गाठ मारलेली पिशवी ही बाईसारखी भासू शकते. तशी माझी काही स्केचेस होती ती मी त्यांना दाखवली.

'ग्रंथाली' प्रकाशनाने माझं कवितांचं पुस्तक काढलं आहे. त्यात माझी काही स्केचेस आहेत हे इतकंच. मात्र मी स्वतःहून कधी माझी चित्र कुणाला दाखवली नाहीत. जसं लेखनामध्ये मी कुणाच्याही ग्रुपमध्ये नव्हतो तसंच चित्रकलेमध्येही मी कुठल्याही ग्रुपमध्ये नव्हतो. माझा मीच होतो. लेखन असो वा चित्र अंतर्उर्मी महत्त्वाची. कधी योग जुळून आलाच तर कलाप्रेमींना ही चित्र दाखवायची निश्चितच इच्छा आहे.

**– रत्नाकर मतकरी**

**शब्दांकन : श्रद्धा पेडणेकर**

भ्रमणध्वनी : ९९३०११२००४


**ग्रंथाली**

# 'हे काही शब्द...'

**रत्नाकर मतकरी**



**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

रत्नाकरच्या सर्वच गीतांमध्ये एक सहजसुलभ अशी, अकृत्रिम गेयता मला आढळते. मी त्याच्या 'चुटकीचे नाटक', 'विठो रखुमाय', मुलांसाठीचे 'गाणारी मैना' या नाटकातल्या, आणि इतरही काही गाण्यांना चाली दिल्या. प्रत्येक वेळी मला हाच अनुभव येई. मी रत्नाकरला म्हणे, तुझ्या लिखाणात शब्द, ताल, लय असे काही एकत्र आलेले असतात, की त्यात गाण्याची चाल आपोआपच जुळलेली असते. त्या अर्थाने तुझ्यात एक संगीतकारच दडलेला आहे!... मी आजवर शेकडो कवींच्या रचनांना स्वरबद्ध केले आहे. त्या सर्वांच्या शब्दांना चाल लावण्यासाठी मी अगदी आतुर आणि अधीर होत असे. रत्नाकर मतकरीच्या या संग्रहातील गाणी वाचताना मी तीच अधीरता अनुभवली. **– यशवंत देव**



अविनाश सुपे

# कॅमेऱ्याची नजर ओळखणारे डॉक्टर

**छायाचित्र अनेक सुंदर क्षण पुन्हा जगण्याची, अनुभवण्याची उर्मी तुम्हाला देतात आणि हीच उर्मी तुमच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत तुम्हाला सोबत करते.**

आज प्रतिथयश डॉक्टर, केईएम रुग्णालयाचा डीन म्हणून अनेक जण मला ओळखतात. वैद्यकीय क्षेत्र हा माझा व्यवसाय आहे, ते एक व्रत आहे ते सद्भावनेने करतो आहे. पण दुसरीकडे फोटोग्राफीने मला नक्की काय दिलं? हे सांगणं खरंच शब्दातीत आहे. मी निसर्गाची सर्वांगसुंदर रूपं अनुभवली, अनेक उत्तमोत्तम मित्र मला मिळाले. जगण्यासाठी तुम्हाला एक ध्यास लागतो, आत्मतृप्तीची अनुभूती तुम्हाला हवी असते. तुम्ही किती पैसे कमवलेत, किती यशस्वी झालात यापेक्षाही तुम्ही तुमच्या आयुष्यात तृप्त, समाधानी आहात का? प्रतिभा, ज्ञान आणि कलात्मकता यांची सांगड घालून जीवन जगता आलं का? हे फार महत्त्वाचं आहे. खरं तर ही अनुभूती तुम्हाला तुमचा छंदच देऊ शकतो. मात्र छंद म्हणजे केवळ फावल्या वेळात करायच्या गोष्टी नव्हे, तर तो छंदही तुम्ही गांभीर्याने घेतला पाहिजे.

मी डॉ. रवी बापट यांचा विद्यार्थी. माझ्या विद्यार्थीदशेत असताना आम्ही सरांसोबत 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स'ला गेलो होतो. त्यावेळी सरांचा कॅमेरा त्यांनी आमच्या हातात दिला आणि 'तुम्ही स्वच्छंदपणे फोटो काढा' असं सांगितलं आणि त्याचवेळी या अद्भुत, जादुई दुनियेत माझा प्रवेश झाला.

मी जेव्हा एमएसला होतो तेव्हा मी असाच ट्रेकला गेलो होतो आणि डॉ. बापट सरांनी त्यांचा कॅमेरा मला दिला होता. खरं तर सर अभ्यासाबरोबरच छंद जोपासायलाही खूप प्रोत्साहित करायचे. तिथेच कुठेतरी माझ्या फोटोग्राफीची मुळं दडलेली आहेत असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

फोटोग्राफी छंद म्हणून करत होतोच पण फोटोग्राफीला गांभीर्यपूर्वक मी साधारण ९२च्या सुमारास घ्यायला लागलो. ९२मध्ये मनालीला जाताना माझा कॅमेरा हरवला आणि त्यानंतर मला नवीन कॅमेरा विकत घ्यावा लागला. त्यानंतर मी श्रीकांत मलुष्टे सरांकडे गेलो. त्यांचा बेसिक फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. तिथेच गोपाळ बोधे सर आणि त्यांच्या ग्रुपची भेट झाली. गोपाळ बोधेंना मी माझे छायाचित्रणातले गुरू मानतो. तिथे अधिक शिरोडकरही होते. मी, बोधे सर, आमचा ग्रुप मुंबई, बंगळुरू, राजस्थान अशा ठिकाणी निसर्ग छायाचित्रणासाठी सुट्टीच्या दिवशी जायचो. मनमुराद फोटो काढायचो. तिथे वाईल्ड लाईफ, नेचर अशी फोटोग्राफी करायला शिकलो. त्यानंतर बद्रीनाथ, कैलास मानसरोवर वगैरे केलं. अनेक छोटे मोठे ट्रेक्स केले. निसर्गाच्या कुशीत विसावण्याची संधी मला छायाचित्रणामुळे मिळत असे. अजूनही जेव्हा-जेव्हा मी ते फोटो पाहतो तेव्हा ते क्षण पुन्हा जिवंत होतात, रोमांच उभे करतात.

फोटोग्राफीमध्ये जसजसा रूळत गेलो, नित्यनियमाने 'फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडिया'मध्ये जायला लागलो. तिथे फॅशन, वाईल्ड लाईफ, मेडिकल अशा फोटोग्राफीवर, काढलेल्या फोटोंवर चर्चा होत असे. त्यात काही कमी राहिलं आहे का किंवा अधिक सुधारणेसाठी काय करता येईल यावर थोडं विचारमंथन होत असे. त्यानंतर आम्ही मेडिकल फोटोग्राफीची काही पुस्तकं काढली आणि मग ती आवड निर्माण होत गेली. तिथे भारतातले उत्तम फोटोग्राफर्स येत. त्यापैकी एक म्हणजे हणमंतराव. त्यांनी एकदा मला त्यांच्या घरी बंगळुरूला बोलवलं होतं. चांगले दहा दिवस माझा मुक्काम होता. तेव्हा तिथली आसपासची सगळी जंगलं आम्ही पालथी घातली. जंगलसफारीला जाताना पक्षाचा फोटो कसा काढायचा, वाघाचा फोटो काढताना नेमकं काय करावं किंवा एखाद्या कीटकाचा फोटो काढताना प्रकाश आणि कॅमेऱ्याची स्थिती कशी असावी, अशा एक ना अनेक सूचना ते करायचे





छायाचित्रणाची जी अनेक अंगं होती त्यातलं एक म्हणजे एरियल फोटोग्राफी. बोधेसरांबरोबर १९९६ मध्ये आम्ही त्याचं पहिलं प्रदर्शन केलं ते 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'मध्ये. त्यात मुंबईच्या प्रेक्षणीय स्थळांचा समावेश होता. त्यानंतर आम्ही अकॅडमिक फोटोग्राफीकडे वळलो. मग गोवा, मुंबई अशा ठिकाणांच्या छायाचित्रणाची आम्ही काही पुस्तकं काढली. महाराष्ट्रातली विविध देवस्थानं म्हणजे सिद्धिविनायक, महालक्ष्मी मंदिर, शेगाव यांचं डॉक्युमेंटेशन केलं, त्यात इंडियन पोस्टचाही समावेश आहे. बोधे सरांसोबत काम करणं आणि ती सगळी पुस्तकं निर्माण करणं हे माझ्या दृष्टीने खूप मोठं काम होतं. छायाचित्रणाची विविध अंगं पाहात होतो, त्यात भर पडली ती मेडिकल फोटोग्राफीची. माझे प्रोफेसर डॉ. मेहेंदळे यांच्याबरोबर प्लास्टिक सर्जरीला असताना मी मेडिकल फोटोग्राफीचं वर्कशॉप केलं. त्यावेळी पेशंटच्या ऑपरेशन आधी आणि नंतर यामधला फरक नेमका कसा अधोरेखित करावा हे पाहत होतो. त्यानंतर त्वचेपासून ते एन्डोस्कोपीपर्यंत असे फोटो घेऊन ते कसे सादर करावे याच्या कार्यशाळा घेतल्या. त्याचा आमच्याबरोबरच अनेकांनाही फायदा झाला.

त्यामुळे तिथे फोटोग्राफीची प्रात्यक्षिकं मिळत होती. असे अनेक अनुभव मिळत गेले आणि माझी छायाचित्रणाची श्रीमंती वाढत गेली. मला आठवतंय, अनेकदा आम्ही अधिक शिरोडकर सरांच्या ऑफिसमध्ये, घरी बसून फोटो, तंत्र, शैली यावर चर्चा करायचो. त्या चर्चा म्हणजे अर्थातच अभ्यास होता. त्याच काळामध्ये रोल फोटोग्राफी ते डिजिटल फोटोग्राफी असं स्थित्यंतरही आम्ही पाहिलं. आमच्यासमोर एक मोठं आव्हान होतं, ते म्हणजे तंत्राचं. कम्पोझिशन, लाईटिंग, स्पीड असं थोडं थोडं शिकत गेलो. नवनवीन कॅमेरे येत गेले. आम्हीही बदलत्या तंत्रज्ञानानुसार कॅमेरे बदलत गेलो. या नवीन तंत्रावर आम्हीही स्वार झालो.



हे सगळं करत असताना फोटोग्राफर्सची काही तत्त्वं असली पाहिजेत, जी पाळलीच गेली पाहिजेत असं मला प्रकर्षाने जाणवत गेलं. मग त्यावर २००४ मध्ये मी 'एथिक्स इन मेडिकल फोटोग्राफी'वर पेपर सादर केला. त्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा आधार घेऊन केलेल्या, ज्यात बारीक होण्यापासून ते केशरोपणापर्यंत किंवा चट्टे जाण्याच्या फसव्या जाहिरातींचा समावेश होता. एका अँन्गलने पडणारा फरक, तंत्राचा वापर यावर जनजागृती करत गेलो. २०१२ मध्ये 'फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडिया'ने मला ऑनररी मेम्बरशिप बहाल केली, त्यावेळी फोटोग्राफीचा सामाजिक किंवा आर्थिकरित्या गैरवापर होतो आहे. त्यावर जनजागृती करणं आपलं कर्तव्य असल्याचा पुनरुच्चार मी केला होता.

**– डॉ. अविनाश सुपे**
avisupe@gmail.com
**शब्दांकन : श्रद्धा पेडणेकर**
भ्रमणध्वनी : ९९३०११२००४

रामदास भटकळ

# शब्दांचा ध्यास नि सुरांची आस...

**आज वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षीही अशी कला-साहित्याच्या क्षेत्रात मुशाफिरी सुरू आहे. आणि ती सुरूच राहणार आहे अजून करण्यासारखं बरंच बाकी आहे....**

वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी अधुरं राहिलेलं गाण्याचं स्वप्न मी पूर्ण केलं. पूर्वी माझी ओळख 'पॉप्युलर'चे प्रकाशक म्हणून करून दिली जायची. त्यानंतर प्रकाशक आणि लेखक अशी ओळख करून द्यायला लागले आणि सध्या गायक-प्रशिक्षक अशी ओळख करून दिली जात आहे. हे मी काही आत्मप्रौढीने सांगत नाही तर माझा, माझ्या स्वप्नाच्या दिशेने झालेला प्रवास सांगतोय.

माझ्या रक्तातच गाणं होतं. आईचा भाऊ, माझा मामा चिदानंद नगरकर हे मोठे गायक. मोठा भाऊ, बहीण या साऱ्यांनाच गाण्यात रस. वयाच्या नवव्या वर्षी मी मुंबईत देवधर क्लासला जात असे. तिथे तबल्याचं शिक्षण घेत असे. साहजिकच वर्गात गाण्याचे सूर कानावर पडत असत, पण कधी गाणं गायलो नाही. त्यानंतर भारतीय संगीत विद्यापीठात मामा नगरकरांनी जे सुरू केलं तिथे दीड वर्ष गाणं शिकत होतो त्यानंतर एसएससी आली आणि आवाजही फुटायला लागला होता, त्यामुळे ते शिक्षण तिथेच थांबल, पण गाण्याच्या सेमिनार्सना उपस्थिती लाव, कुठे रेडिओवर गाणी ऐक असं सुरूच होतं. प्रत्यक्ष शिकत जरी नसलो तरीही गाण्याशी संबंध असायचा. मित्रांमध्ये गाणं गात होतो.

बघता-बघता तीस वर्ष गेली. महाविद्यालयीन काळात अभ्यास, नाटक यात गुंतलो. त्यानंतर प्रकाशकाचा व्यवसाय! त्यात केवळ मराठीपुरतं मर्यादित न राहता इतर भाषांतही पुस्तकं केली. कामाचा व्याप वाढत गेला. कालौघात गाणं शिकायचं मात्र राहून गेलं. मात्र तरीही प्रकाशनाच्या निमित्ताने मी गाण्याशी संबंधित होतोच. त्यानंतर मध्ये साधारण तीस वर्षांचा काळ लोटला. वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी अधुरी इच्छा शांत बसू देईना. मग पुन्हा ज्यांच्याकडे मी शाळेत असताना गाणं शिकत होतो ते माझे गुरू पंडित एस.सी.आर भट यांच्याकडे पुन्हा शिकवणी सुरू केली. त्यावेळी अनेकांना वाटलं हे काही फार वेळ चालणार नाही पण त्यानंतर जो गानयज्ञ सुरू झाला, तो तब्बल सत्तावीस वर्ष सुरू राहिला. अजूनही सुरूच आहे. आठवड्यातून तीनदा मी त्यांच्याकडे जाऊन शिकत होतो. माझ्या या गानयज्ञात माझ्या भावाचा आणि वहिनीचा मोठा पाठिंबा आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या गुरूंना सांगितलं होतं की माझ्या पन्नासाव्या वाढदिवसाला मी काहीतरी गावं अशी त्यांची इच्छा होती. त्यानुसार माझी पहिली मैफिल ही माझ्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला झाली. त्यानंतर 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान', 'केशवसुत स्मारका'च्या उद्घाटन सोहळ्याला माझ्या मैफिली झाल्या. त्यानंतर घरगुती



मैफिली होतच होत्या, त्याचप्रमाणे दिल्ली विद्यापीठ, अमेरिका, लंडनचं नेहरू सेंटर इथेही मैफिली झाल्या. माझी एक परीक्षा झाली होती, मात्र मला गाणं शिकवावं असं वाटू लागलं. तेव्हा मी गुरूंना विचारलं, गाणं ''शिकवण्यासाठी मला संगीत विद्यालयाच्या परीक्षा द्याव्या लागतील का? तर शिकवण्यासाठी गाण्याच्या ज्ञानाची गरज असते, जे ज्ञान तुझ्याकडे आहे.'' असं त्यांनी मला सांगितलं.

माझ्या वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षानंतर योजना शिवानंद पाटील या माझ्याकडे आल्या. त्यांना एक विशिष्ट राग शिकवायचा होता. तो एकच राग मी त्यांना वर्षभर शिकवला, मात्र त्या मला गुरू मानतात. त्यानंतर सारंगी आंबेकर, मनिषा भिडे माझ्याकडे सहा वर्षे गाणं शिकत होत्या असे एक-एक करून विद्यार्थी वाढत गेले. वयाच्या ऐंशीनंतर मी पंधरा ते वीस बंदिशी केल्या.

कोणतीही कला तुम्ही शिकत असताना ती कला कितपत तुमच्यात मुरली आहे हे जाणून घेण्यासाठी त्या क्षेत्रातील श्रेष्ठ-ज्येष्ठ व्यक्तीची कौतुकाची थाप हवी असते. त्यामुळे तुमचा हुरूप वाढतोच पण प्रोत्साहनही मिळत. अशीच एक खासगी मैफिल लॉस एंजिलिसला होती. साधारण शंभरेक रसिक असतील. तिथे माझे गुरूबंधू होते. त्याव्यतिरिक्त मला फारसं कोणी ओळखत नव्हतं. तिथे जे मला साथ करणारे साथीदार होते ते बरेच दिग्गज होते. त्यात रवी बेल्लारेही होते, पण रवी बेल्लारेंसारख्या कलाकाराचे 'वा, उत्तम झालं गाणं. व्यावसायिकासारखं गायलात' असे शब्द ऐकले आणि खरंच सांगतो, मन तृप्त झालं. तिथे सात राग मी जवळपास तीन तास गायलो.

किशोर मर्चंट या संगीतवेड्याने माझ्या काही मैफिलींचं रेकॉर्डिंग केलं होतं. मात्र त्याची क्वालिटी फारशी चांगली नव्हती. पण चिदानंद नगरकर यांच्या सेहेचाळीस बंदिशी, माझे गुरू भट, ज्यांनी दोनच बंदिशी केल्या त्या बंदिशी, तर श्रीकृष्ण नारायण रातंजनकर यांच्या तसं पाहता सातशे बंदिशी आहेत पण त्यांचे नवनिर्मित जे पंचवीस राग आहेत ते एक दोन वगळता फारसे कोणी गायलेले नाहीत. ते राग मी आणि माझे शिष्य मिळून ध्वनिमुद्रित करीत आहोत. एकीकडे माझं गांधी, सावरकरांवरील संशोधन लेखन, राजकीय लेखन, मी लिहिलेलं 'जगदंब' नाटक ज्याचे विविध भाषांत प्रयोग झाले, आज वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षीही अशी कला-साहित्याच्या क्षेत्रात मुशाफिरी सुरू आहे आणि ती सुरूच राहणार आहे. अजून करण्यासारखं बरंच बाकी आहे....

**- रामदास भटकळ**
भ्रमणध्वनी : ९८२०८७१४०८
**शब्दांकन : श्रद्धा पेडणेकर**
भ्रमणध्वनी : ९९३०११२००४

आजच्यासारखं माध्यमांचं जाळं आमच्या लहानपणी नव्हतं. त्या खेडेगावात जगाशी जोडणारं एकमेव माध्यम म्हणजे रेडिओ. रेडिओचा तो सुवर्णकाळ होता. गदिमा, यशवंत देव, व्यंकटेश माडगुळकर अशा दिग्गजांचे संगीत, साहित्याचे कार्यक्रम रेडिओवर होत. मूळ वाचनाची आवड होतीच पण या सगळ्या वातावरणामुळे त्याला खतपाणी मिळालं आणि ते रोपटं बहरत गेलं. रुक्ष आयुष्यात या वातावरणाने नवी पालवी फुटली. शाळेत कवितांमध्ये गेय प्रकाराचा माझ्यावर जास्त प्रभाव होता. मग पाडगावकर असतील, शांताबाई असतील, सुरेश भट या अशा अनेक साहित्यिकांचं वाङ्मय यानिमित्ताने झपाटून वाचलं. त्यात सुरेश भटांच्या गझलेने तर अक्षरशः वेड लावलं होतं. गझल म्हणजे दोन ओळींचा एक शेर एवढंच कळंत होतं आणि तेवढंच मी करत होतो. बीएससी झाल्यानंतर पुण्यात आदर्श कॉलेजमध्ये बीएडसाठी गेलो आणि पुण्यातल्या अनेक सांस्कृतिक, वाङ्मयीन कार्यक्रमांना हजेरी लावू लागलो. साहित्याच्या क्षेत्रात धडपड सुरू होती पण आपण काही लिहू शकतो असा आत्मविश्वास कॉलेजमध्ये आमच्या मॅगझिनचा सेक्रेटरी झालो तेव्हा आला. त्यानंतर बँकेत नोकरीला लागलो. पुण्यात जे 'मेनका' साप्ताहिक निघे, त्यात सुरेश भटांचा 'गझलिस्तान' हा कॉलम सुरू होता. त्यात इतर कवींच्या कविता, गझलाही प्रसिद्ध होत. मीही एकदा माझी एक गझल त्यांना पाठवली. ती काही त्यात छापून आली नाही पण चक्क सुरेश भटांचं पत्र मला आलं. तो काळ होता साधारण ८४-८५चा. त्यांनी त्यात म्हटलं होतं, तुमच्या गझलेत काही तांत्रिक चुका आहेत त्यामुळे आम्ही ती प्रसिद्ध करू शकत नाही. त्याचा रितसर अभ्यास केल्यास चुका दूर होतील. तुला भेटायला मला आवडेल. खाली लिहिलं होतं- 'तुझाच चाहता-सुरेश भट' आपण कल्पनाच करू शकू की एका नवशिक्या माणसाला दस्तुरखुद्द सुरेश भटांचं पत्र येणं आणि त्यात 'तुझाच चाहता' असं म्हणणं म्हणजे अगदी स्वर्ग मिळण्यासारखं होतं. मी त्यांना भेटलो आणि त्यांच्या बोटाला धरून गझल विश्वातला प्रवास सुरू झाला. खुद्द सुरेश भटांकडून गझल शिकणं हा माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट म्हणता येईल. त्याकाळी बारामतीच्या साप्ताहिकात वस्त्रहरण नावाचा राजकीय विडंबन असलेला विनोदी कॉलम लिहीत होतो. त्याला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. त्यानंतर एमपीएससी झालो. प्रशासकीय सेवेत आलो, पण दुसरीकडे साहित्यातली मुशाफिरी सुरूच होती. असंच एकदा एका कार्यक्रमाच्या निमित्ताने यशवंत देव भेटले. त्यांना गझला पाठवल्या, तेव्हा त्यांनी गझलांना संगीत देण्याची

दिलीप पांढरपट्टे

# नव्या वाटा नवे ठसे

**कोणत्याही एका साच्यात अडकू नये हा माझा स्वभाव! खरं तर आयुष्याच्या या प्रचंड कोलाहलातच गझल, लेख स्फुरतात. त्यासाठी स्वतंत्र वेळ काढावाच लागत नाही.**

आत्म्याशी कुठवर झगडावे मला कळेना
जगण्यासाठी किती मरावे मला कळेना

रस्ते-रस्ते, हजार रस्ते, लाखो रस्ते
किती असे मी चालत जावे मला कळेना


चुकणे अन् चुकचुकणे आहे प्राक्तन माझे
कसे स्वत:ला हे सांगावे? मला कळेना

विस्मरणाने दगा दिला, बघ, पुन्हा एकदा
कुणाकुणाला मी विसरावे मला कळेना

अशीच असते, 'दिलीप', दुनिया आपमतलबी
तुला कितीदा हे शिकवावे मला कळेना

परवानगी मागितली आणि मी खरंच सांगतो मला आकाश ठेंगणं झालं. मग देवांसोबत खूप काम केलं. त्यांनी माझ्याकडून केवळ गझलच नाही तर कोळीगीतंही लिहून घेतली. यानिमित्ताने आमचा स्नेह दृढ झाला. दुसरीकडे माझा प्रशासकीय सेवेचा प्रवासही सुरू होता. असंच अलिबागला असताना 'कृषिवल'चे संपादक एस.एम. देशमुखांनी 'गझल' या विषयावर कॉलम लिहायला सांगितला आणि मी तो लिहीत गेलो. तो खूप लोकप्रिय झाला. यथावकाश त्याचं पुस्तकंही झालं. तसंच एकदा 'सकाळ'च्या मंगेश विश्वासरावांचा फोन आला, बोधकथा लिहिण्यासाठी. माझा आणि गद्याचा कॉलम पुरताच संबंध होता, तरीही मी नवीन काही तरी करायला मिळतंय म्हणून तेही आव्हान स्वीकारलं. त्या बोध कथांमध्ये नेहमीच्या कथा येऊ नयेत, असा माझा अट्टाहास असायचा त्यासाठी मग खूप वाचन करायचो. त्यात वैविध्य आणण्याचा प्रयत्न केला. साधारण २००५ ते २०११ पर्यंत हा कॉलम चालला आणि तब्बल पाचशे कथा मी त्यात लिहिल्या. असंच एकदा कार्यक्रमाच्या निमित्ताने दिनकर गांगल भेटले. त्यांनी त्यांच्या पत्नी 'बोधकथे'च्या चाहत्या आहेत असं सांगितलं आणि विखुरलेल्या कथा 'ग्रंथाली' पुस्तकरूपाने काढू इच्छिते असंही सांगितलं. त्यानुसार कथांचे चार भाग ग्रंथालीच्या वतीने प्रसिद्ध होत आहेत.

गझलेच्या निमित्ताने अनेक मुशायरांना हजेरी लावत होतो. लिहिण्याबरोबरच गझला चांगल्या सादरही करू शकतो असा थोडा विश्वास यायला लागल्यावर, त्या सादरही करू लागलो. या गझलेच्या विश्वात मुशाफिरी करताना फैज अहमद फैज असतील, अहमद फराज असतील यांच्या शायरीच्या प्रेमात पडलो. त्यामुळे या गझलांकरता उर्दूही शिकलो, उर्दूत मीही काही गझला लिहिल्या. माझ्या रचना अगदी सुरेश वाडकरांपासून ते साधना सरगमपर्यंत आणि







श्रीधर फडकेंपासून ते भीमराव पांचाळेपर्यंत अनेकांनी गायल्या. प्रशासकीय सेवेतही प्रांताधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपसचिव त्यानंतर आयएएस अधिकारी अशी प्रगती करत होतो.खरं तर या निमित्ताने अनेक माणसांना भेटत होतो त्यामुळे माझ्या गझला, लेख, कथा या त्या माणसांभोवतीच फिरणाऱ्या आहेत. त्यांच्या अनुभवांचं खाद्य मला मिळत होतं आणि त्यातून गझल, कथेचा आविष्कार होत होता. अगदी एक आठवण सांगायची म्हणजे, मंत्रालयात उपसचिव होतो तेव्हा ट्रेनने प्रवास करत असे. एकदा असंच ठाण्याला ट्रेनमध्ये बसलो. मंत्रालयात पोहोचेपर्यंत माझी गझल डोक्यात तयार झालेली असे आणि कार्यालयात गेलो ती लिहूनही काढायचो. खरं तर आयुष्याच्या या प्रचंड कोलाहलातच गझल, लेख स्फुरतात. त्यासाठी स्वतंत्र वेळ काढावाच लागत नाही. बढतीसोबतच एकीकडे एलएलबी, एलएलएम, पीएच्‌डीही केली. पीएच्.डी.चा विषय निवडतानाही रायगडमधील 'सार्वजनिक प्रकल्पांमुळे भूसंपादन प्रक्रियेचे सामाजिक, आर्थिक परिणाम' हा विषय निवडला.

कोणत्याही एका साच्यात अडकू नये हा मूळचा माझा स्वभाव म्हणूनच प्रशासकीय, शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच गझल, कविता, लेख, कथा, विनोदी लेखन, गझलांचे सादरीकरण, उर्दूतून गझलरचना, सामाजिक प्रश्नांवर मंथन असे अनेक मार्ग मी चोखाळत गेलो. अजूनही नाटक, कादंबरी, पटकथा, संवाद अशी अनेक माध्यमं मला खुणावतायत.

*ते राजमार्ग सारे लखलाभ हो तुम्हाला*
*गेलो जिथे मी रस्ता तयार झाला...*


**- दिलीप पांढरपट्टे**
भ्रमणध्वनी : ९८२१०७५५४२
dilip.pandharpatte@gmail.com



# चांदण्याची मोजदाद करणारा कवी

मधुवंती सप्रे

**मानवी जीवनात नसलेली पूर्णता निसर्गात आढळते, या श्रद्धेतून लिहिणाऱ्या बालकवींचे हे स्मृतिशताब्दी वर्ष. त्यांची कविता आणि व्यक्तिमत्त्व यांचे विश्लेषण करणारा हा लेख...**

बा.सी. मर्ढेकरांनी ज्यांना आपलं गुरू मानलं ते कवी म्हणजे त्र्यबंक बापूजी ठोंबरे ऊर्फ बालकवी. ज्यांच्या मृत्यूला यावर्षी शंभर वर्षं झाली (५ मे २०१८). बा.सी. मर्ढेकरांनी 'काव्यातील नवीनता' या संकल्पनेवर लिहिताना, उदाहरण दिलं; ते बालकवींच्या 'मोहिनी' या कवितेतल्या दोन ओळींचं. 'तंद्रीच अर्धीमुर्धी। लुकलुकते ताराराणी'.

कवी नसलेल्यांना लुकलुकणारी तारका एवढीच अनुभूती जाणवते, परंतु लुकलुकणारी तारका - अर्ध्यामुर्ध्या तंद्रीतली बालिका, असे स्वरूप ज्या अनुभूतीचे, ती कवीची अनुभूती. कवीची अनुभूती म्हणजे भावनानिष्ठ समतानतेची प्रस्थापना. लुकलुकणाऱ्या तारकेतून ऐकू येणारा भावनासूर आणि अर्ध्या-मुर्ध्या तंद्रीतल्या बालिकेच्या स्वप्नातला भावनासूर. या दोन वेगवेगळ्या ओळी कितीही आल्हाददायक असल्या तरी त्यात काव्य नाही. काव्य उत्पन्न होते ते या दोन सुरात समतानता (equivalence)प्रस्थापित केल्यावर. 'तेव्हा कवीची प्रतिभा म्हणजे भावनानिष्ठ समतानता (emotional equivalence) प्रस्थापित करणारी शक्ती.'

मर्ढेकरांनी आपला काव्यविषयक सिद्धांत मांडताना बालकवींची योग्यता अभ्यासकांना जाणवून दिली. पुढे मर्ढेकर असंही सांगून जातात की आधुनिकता ही बव्हंशी अपरिहार्य असते. तर नावीन्य हे नेहमीच अनपेक्षित असतं. म्हणून केशवसुतांच्या युगात केशवसुत हे पहिले आणि इतर नंतरचे आधुनिक कवी. पण प्रतिभाधर्माने खरा नवीन कवी पहिला आणि

शेवटचाही म्हणजे तिशीच्या आत दिवंगत झालेले बालकवी ठोंबरे.

बालकवींनी आपल्या २८ वर्षाच्या आयुष्यात जवळजवळ साठ कविता लिहिल्या. लक्ष्मीबाई टिळकांकडे असताना, तर किती लिहिल्या, किती फाडून टाकल्या याला सुमारच नाही. असं खुद्द लक्ष्मीबाईंनीच लिहिलं आहे. बालकवींना निसर्गकवी म्हटलं जातं. वस्तुजातामधे असलेलं सौंदर्य या कवीइतकं अन्य कुणाला प्रतीत झालं नाही, . ही वस्तुस्थिती आहे. हे वस्तुजातामधलं सौंदर्य टिपण्याची त्यांची क्षमता कविता वाचताना, अभ्यासताना लक्षात येते ती त्यांची आत्यंतिक संवेदनशीलता! विशेष प्रकारचा हळुवारपणा, फुलांमधली कोवळीक, निसर्गातलं सौंदर्य याचा साक्षात्कार त्यांना त्वरेने होत असे.

बालकवी दैनंदिन आयुष्यात दु:खीकष्टी होते. त्यामुळे मानवी जीवनातल्या अपूर्णता, विरूपता, दु:ख या गोष्टी त्यांना सहन होत नसत. त्यावेळी त्यांना संपूर्ण जाणीव होई, ती निसर्गातल्या परिपूर्णतेची. तिथे स्थैर्य आहे, सौंदर्य आहे, आनंद आहे. मग त्यांना सर्वत्र, 'आनंदीआनंद गडे। इकडे तिकडे चोहिकडे।' याचा प्रत्यय येई.

सृष्टी आणि मानव यांच्यातला आत्यंतिक विरोध बालकवींना तीव्रतेने जाणवला. फुलं, झाडं-वेली, पाखरं, झरे, आकाश, तारे-तारका, चांदणं, पाऊस, ऊन त्यांना भारून टाकतात. 'बालविहग' या कवितेत ते लिहितात, 'सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनी घ्यावे। चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे।'

बालकवींना सृष्टीतला दिव्य सूर ऐकू येतो. मर्ढेकरांनी कवीच्या अनुभूतीतून ऐकू येणारा भावनासूर विशद केला, पण बालकवींची कविता दिव्य सूर आळवताना दिसते. बालकवींची 'अरुण' ही कविता आठ कडव्यांची आहे. त्यातले शब्द पाहा- 'दिव्य गायने, दिव्य शांतता, दिव्याचे झोत. तर 'निर्झरास' या कवितेत 'शिकवी रे शिकवी माते। दिव्य तुझी असली गीते।' त्यांना सगळं रान गाण्याने भरलेलं ऐकू येतं. ते लिहितात, 'त्या लहरी मधुनी झरती। दिव्य तुझ्या संगीतती।', 'दिव्यांची सुंदर माला, ओवाळी अक्षय तुजला।' तर 'फुलराणी' कवितेत त्यांना दिसतात ते 'जिकडे तिकडे उधळीत मोती। दिव्य वऱ्हाडी गगनी येती। वधुवरांना दिव्य रवानी। कुणी गाईली मंगलगाणी।' अथांग आकाशात त्यांना दिव्यत्वाची प्रचिती येते. त्यांचा कल्पनाविलास वाचकाला स्तिमित करतो. त्यांच्या शब्दांच्या मनोरम आविष्कारात आपल्याला गुंगवून टाकतो. आकाशाबरोबर पक्षी-पाखरं, फुलपाखरं, सुकलेली फुलं, फुलवेली, आनंदी पक्षी, यांच्यामधेही बालकवी रंगून जातात. सृष्टीतल्या रंगाची आसक्ती, हे बालकवींचं आणखी वैशिष्ट्य आहे. हिरवे गालिचे, हिरवळ, हिरवी गर्दी, निळासावळा झरा, पांढरी पायवाट, डोह काळा असतो तर लाटांवर गोड काळिमा पसरतो, पिवळंपिवळं ऊन, घननीळ लतावलय, लाल सुवर्णी झगे, गुलाबी फेटा, शुभ्र धुक्याचे वस्त्र, इंद्रमण्यांची कांती, मिश्र जांभळे; हे सगळे रंग बालकवींनी योजलेल्या शब्दांनी, विलक्षण कल्पनांनी आणखी गडद होत जातात. त्या रंगाची भूल वाचकालाही पडते आणि तो स्तब्ध होतो. या विराट सृष्टीचं धन ते आपल्यापुढे आणून शब्दश: ओतीत जातात!

एक 'कवी' शब्द घेतला तरी त्यातही 'कवी', 'कवीची इच्छा', 'काव्याची कल्पना', 'कवीचे अंतरंग', 'कवीबाळे', 'मी' इत्यादी त्यांच्या कविता आहेत. केशवसुतांनी कवींची उच्चकोटी सांगताना लिहिलं, 'आम्ही कोण म्हणून काय पुसशी? आम्ही असू लाडके। देवाचे, दिधले असे जग तये आम्हास खेळावया।'

तर बालकवी कवीचं अंतरंग उलगडून दाखवतात. ते लिहितात,

*'मी कवितेचा दास, मला।*
*कवी बोलती जगातला।*
*परी न झरे माझ्या गानी।*
*दिव्यांची असली श्रेणी।*
*जडतेला खिळून राही।*
*हृदय बंध उकलत नाही।'*

'मी' कवितेत 'मी न कुणाचा, मी न जगाचा, मी नच माझा' असं ते सांगतात. कवीचं अंतरंग कवितेतून वाचकांनी जाणावं, तसंच कवी म्हणजे निसर्गात रमणारं काव्यपाखरू आहे. 'प्रेमे मी गुंगे गानी' अशी अवस्था असलेला कवी. तर काव्याची कल्पना काय हे सांगताना, 'वस्तु वस्तुमधे काव्य विलसतं। मी तू पण ते क्षणि विसरवतं।'

बालकवींचा काव्यभाव हा सृष्टीत रमणारा. फुलराणीचं लग्न ते सूर्याबरोबर लावून मोकळे होतात. मात्र ती फुलराणी म्हणजे कोणतं फूल; हे न विचारता ज्यानं-त्यानं समजून घ्यावं असं फुलराणीचं मायाजाल ते कवितेतून पसरवतात. असे सृष्टीत रमणारे बालकवी 'धर्मवीर'सारखी पन्नास कडव्यांची कविता लिहितात. ज्येष्ठ समीक्षकांच्या मते ही कविता म्हणजे केशवसुतांच्या 'तुतारी'चं अनुकरण अनेक कवींनी त्या काळात केलं; त्यातील हे एक. बालकवींच्या काळात पुण्यात 'तुतारी मंडळ' स्थापन झालं होतं. केशवसुतांच्या सुधारणावादी ओजस्वी आविष्काराने त्यावेळी अनेक कवी भारावलेले होते, परंतु 'बालकवींच्या काव्याचं प्राणतत्त्व म्हणजे त्यांची शैशववृत्ती', असं कुसुमाग्रज म्हणतात. त्यामुळे बालकवींना केशवसुतांसारखे सुधारणावादी विचार सांगण्याचे धाडस इथे दिसत नाही.

या शैशववृत्तीचं एक उदाहरण लक्ष्मीबाई टिळकांनी लिहिलं आहे की 'ठोंबरे दुसऱ्यांच्या कविता आपल्या इतक्याच उत्साहाने वाचून दाखवी, काही गंमतीच्या कविता असल्या की त्याची टर उडवी, घरातच सभा भरवी, जादूचे खेळ करी, माझ्या लिहिण्याची चेष्टा करी, इतकंच काय रात्री अंगणात सगळे निजले असताना आकाशातल्या चांदण्यांची मोजदाद करून त्या वाटून घेणं आणि वाटणी बरोबर झाली नाही की भांडण करणं.'

'प्रीती हवी तर', 'दोष व प्रीती', 'प्रेमलेख', 'प्रेमाचे गाणे' अशा कविता बालकवींनी लिहिल्या. पण अन्य कवींप्रमाणे प्रेयसीला उद्देशून एकही कविता नाही. त्या प्रेम शब्दांनी लिहिलेल्या कविताही

निसर्गातील गोष्टींसाठीच आहेत. तेव्हा वाटतं बालकवींना अठ्ठावीस वर्षाच्या आयुष्यात कधी प्रेमाचा उत्कट अनुभव घेता आलाच नाही? त्यांचं तारुण्य इतकं रखरखीत होतं? म्हणून ते निसर्गात आपल्या भावना शोधत आणि त्यातच रमत असत? माणसापेक्षा निसर्ग त्यांना जवळचा वाटे असं लक्षात येतं. सृष्टीच्या सुंदरतेतून त्यात पुन्हा प्रेमाशा आहेत परंतु अभ्यासकाला या सगळ्यातून बाहेर पडून बालकवींच्या 'निराशा', 'उदासीनता', 'औदुंबर', 'पारवा', 'यमाचे दूत' अशा अनेक कविता वाचताना बालकवींच्या अंतरंगाचा एक कोपरा हा दुःख, चिंता, निराशा, विवंचना यांनी भरलेला दिसतो आणि आपल्याला एक धक्का बसतो. 'माझे गाणे, एकच माझे, नित्याचे गाणे'; अभंग, अक्षय असं गाणं ते सदैव गात असतात. आनंदी आनंद चोहीकडे पसरलेला असतो. वाऱ्याने केलेल्या गंमती त्यांना आनंद देतात. तारकांनी गायलेलं गाणं त्यांना ऐकू येतं. श्रावण सर्वत्र फुललेला असतो. सर्वत्र सृष्टीची तेजःपुंज प्रभा पसरलेली पाहून कवीचा आनंद द्विगुणित होत असतो. असं असताना उदासीनता का?

*'कोठुनि येते मला कळेना।*
*उदासीनता ही हृदयाला।*
*काय बोचते ते समजेना*
*हृदयाच्या अंतर्हृदयाला।'*

अंतरात तीव्र वेदना आहेत. जीव कुणाला हाका मारतो आहे, या उदासीनतेला एखादं दिव्य औषध ते शोधत होते. प्रत्येक कवी, लेखक आपल्या लेखनातून आत्मचरित्रच लिहीत असतो, असं विधान केलं जातं, ते बालकवींच्या बाबतीत प्रकर्षाने जाणवतं. त्यांचं अठ्ठावीस वर्षांचं आयुष्य, त्यांचा दहा वर्षांचा संसार अजिबात सुखाचा नव्हता.

बालकवींचा जन्म धरणगाव येथे १३ ऑगस्ट १८९० रोजी झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी पार्वतीबाई जोशी यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. जळगाव येथे १९०७ साली झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनात त्यांनी कविता वाचली त्यावेळी त्यांना 'बालकवी' ही पदवी बहाल केली गेली आणि त्र्यंबक बापूजी ठोंबरे हे त्यांचं मूळ नाव कागदोपत्रीच राहिलं. त्या संमेलनात कवी ना. वा. टिळक आले होते. त्यांनी बालकवींच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली आणि बालकवींनी पुढे शिक्षकी पेशाच पत्करला.

बालकवींनी 'पारवा', 'उदासीनता' यासारख्या कवितांतून कदाचित आपली व्यथा मांडली असावी. त्यांनाही पार्वतीशी संसार करण्याची इच्छा होती हे पार्वतीबाईंनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केलेल्या प्रसंगांवरून लक्षात येतं. कपटी असा मोठा भाऊ आणि पूर्वग्रहदूषित आईचे विचार यांच्या कात्रीत बालकवी सापडले. त्यांना स्पष्टपणे बोलून पार्वतीबरोबर वेगळं बिऱ्हाड करणं, भावाला खर्चापुरते पैसे देऊन दूर ठेवणं, आईची गैसमजूत दूर करून तिला आपल्याजवळ ठेवणं आणि पार्वतीला पत्नी म्हणून प्रेमानं वागवून पती-पत्नीच्या आयुष्यात थोडाफार तरी आनंद निर्माण करणं हे जमलं नाही. कवितेसाठी संवेदनशील असलेलं मन, ते घरी आले की मिटून जाताना दिसतं. बाह्य जगात त्यांना उत्तम मित्र मिळाले. ते लोकप्रिय होते. लक्ष्मीबाई टिळक व त्यांचा परिवार यांचा आधार मिळाला, पण ठोंबरे आणि कुटुंबाची नाती जपताना बालकवींच्या हातून आयुष्याचं मर्म मात्र सुटून गेलं. घरच्यांना त्यांचं, त्यांच्या कवितेचं मोल समजलं नाही, जे पार्वतीच्या वडिलांनी ओळखलं होतं.

आपल्या समाजातल्या विचित्र आणि जाचक रूढींपुढे बालकवी हतबल झाले. घरातल्या मोठ्यांना (आई व भाऊ) काही म्हणायचं नाही. कितीही ते चुकीचं वागले, त्यांनी अत्याचार केले तरी गप्प बसायचं. ही कुठली रीत? त्यापायी त्या काळात किती पती-पत्नींचं आयुष्य बरबाद झालं असेल? पतीशी पत्नीने बोलायचं नाही. त्यांना विचारल्याशिवाय त्याच्यापर्यंत जायचं नाही, असं अमृतराव, त्याची पत्नी आणि बालकवींची आई पार्वतीला खडसावत असत. हा काय प्रकार चालायचा हे कितीही विचार केला तरी त्यातला पीळ, ताण लक्षात येत नाही.

त्यांच्या सुहृदांनीच त्यांचा व पत्नीचा अतोनात छळ केला. या हळव्या मनाच्या कवीला ते सगळं सहन करण्यापलीकडे होतं. आपलं दुःख, वेदना विसरण्यासाठी ते निसर्गात आनंद शोधीत होते? केशवसुतांनी लिहिलं आहे, 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे। गाणे मनात मम होय सवेची जागे.' बालकवी अशा रम्य निसर्गात गाणं शोधताना 'निर्झरास' या कवितेत ते लिहितात, 'तेवि सृष्टीची सतार, गाईल मम गाणी काही.'

नव्हे त्यांना ते गाणं ऐकू येतं आणि ते कवितेद्वारे झालेला आनंद व्यक्त करतात, परंतु त्यांच्या 'औदुंबर' या कवितेने मला जास्त अस्वस्थ केलं.

*ऐलतटावर पैल तटावर। हिरवाळी घेऊन।*
*निळासावळा झरा वाहतो बेटा बेटातुन।*
*चार घरांचे गाव चिमुकले पैल टेकडीकडे।*
*शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढे।*
*पायवाट पांढरी तयातुनी आडवी तिडवी पडे।*
*हिरव्या कुरणांमधून चालली काळ्या डोहाकडे।*
*झाकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटावर।*
*पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर।*

या कवितेच्या पहिल्या सात ओळी म्हणजे निसर्गसंपन्न अशा शांत जागेचं वर्णन आहे. जणू समोर एक चित्राची चौकट उभी राहते, परंतु या चित्रातच झऱ्याच्या पाण्यात पाय टाकून (सोडून) बसलेला 'असला' औदुंबर. (उंबराचं झाड) ही ओळ 'असला' या शब्दाने घायाळ करते. 'असला' म्हणजे कोण? कवी? तत्त्वचिंतक, कोण बरं? आपण बोलीभाषेत 'असला' हा शब्द विशिष्ट, काही नावीन्यपूर्ण गोष्टींसाठी वापरतो. उदा. असला माल कुठे मिळाला? असला भव्य वाडा पूर्वी पाहिला नाही, वगैरे. परंतु इथे औदुंबर 'असला' या विशेषणाने एकदम औदुंबराचं झाड म्हणून न राहता, तो 'संन्यस्त' वाटतो. या कवितेतलं पहिल्या सात ओळीतलं

आनंदाचं निसर्गवर्णन नंतर 'काळा डोह', 'झाकळलेलं जल', 'गोड काळिमा' या शब्दांनी गूढ बनत जातं. इथे खिन्न वृत्ती जाणवते आणि 'असला' या शब्दाने आनंदाचं निसर्गवर्णन एकदम गर्रकन् फिरतं. मग कवीचं अंतरंग, त्याचं व्यक्तिमत्त्व दृश्यमान होतं. अत्यंत साधी पण वैशिष्ट्यपूर्ण भाषा सौंदर्याने नटलेली ही कविता एका शब्दाने वेगळंच रूप धारण करते. ही कविता काव्याचा गाभा समोर उभा करते.

बालकवींच्या निसर्गाचं वेगळं रूप दाखवणाऱ्या कविता सर्वांनाच आवडतात, पण 'पारवा', 'निराशा', 'उदासीनता', 'खेड्यातली रात्र', 'हृदयाची गुंतागुंत' या आणखी काही कवितां-मधून बालकवी प्रत्येक कलावंताचं तडफडणारं मन व्यक्त करतात. तेव्हा त्यांची कविता विश्वरूप होते. उदा. आधी उद्धृत केलेली कविता 'उदासीनता'. ही कविता प्रत्येक नवनिर्मितीकाराला छळत असते. ही उदासीनता अनेक कारणांनी येत असते. बालकवी लिहितात,

*'कोठून येते मला कळेना। उदासीनता ही हृदयाला।*
*काय बोचते ते समजेना। हृदयाच्या अंतर्हृदयाला।'*

या चार ओळीतच केवढी तरी कलावंताची आयुष्ये उभी राहतात. त्यांची कलेसाठीची आराधना, कष्ट, तळमळ, तगमग लक्षात येते. या वेदनांना दिव्य औषधी कोणती? हा बालकवींनी विचारलेला प्रश्न प्रत्येकालाच पडत असतो कारण यात बालकवींचं आयुष्य पणाला लागलं याचा भास होत राहतो. 'निराशा' कवितेतही ते भोवऱ्यात पडले आहेत. 'पारवा'मधेही ते पक्ष्याच्या रूपाने आपली मनस्थिती मांडीत आहेत. आधी उल्लेखलेल्या या कवितांमधून निसर्गाच्या साहचर्याने बाजूला ठेवलेलं आपलं दु:ख ते अशा काही कवितांमधून लिहितात. निसर्गकविता आनंद देतात तर बालकवींचं व्यक्तित्व, त्यातली आर्तता, वेदना, दु:ख सांगणाऱ्या ज्या थोड्या काही कविता आहेत. त्यामुळे आज शंभर वर्षांनीही (त्यांना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी अपघाती मृत्यू येऊन ५ मे २०१८ रोजी शंभर वर्षे झाली) बालकवींची कविता प्रत्येकाला आपली वाटते. ही कविता तरल अशा अनुभूतीचा पुन:पुन्हा प्रत्यय देते. म्हणून तर आजही बालकवी कालबाह्य वाटत नाहीत. मर्ढेकरांनी म्हणूनच त्यांना गुरू केलं असावं.

**– मधुवंती सप्रे**
भ्रमणध्वनी : ९८२११७५३४९
madhuvanti.sapre@yahoo.com

**ग्रंथाली**



मूल्य २०० रु.
**सवलतीत १२० रु.**

**शरयू घाडी** लिखित
**पंखाविना भरारी**
आणि
**The Wingless Flight**



मूल्य २५० रु.
**सवलतीत १५० रु.**

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई-वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

Prasad was a child with multiple disabilities. The weak movements of his hands below the elbow and his sharp intellect were his only strengths. He became a legend in the short span of just 21 years of his life due to his indomitable spirit and achievements. He excelled in academics, singing, oration, drawing and his accolades make us realize our shortcomings. Prasad was the embodiment of the divine spirit which is beyond our realm of comprehension. This is the story of his life as well as that of the sacrifice of his parents.

# के.ज. पुरोहितांचे आत्मपर ललित लेखन

किशोर सानप

**के. ज. पुरोहित यांनी 'शांताराम' या टोपणनावाने कथालेखन केले. नवकथा ऐन बहरात असताना 'स्वत:ची' वैशिष्ट्यपूर्ण शैली जपली. त्यांच्या 'आत्मपर' लेखनातून हा लेखक लख्ख वाचता येतो. तो समजून घेणे हीच भावांजली...**

के. ज. पुरोहित ऊर्फ शांताराम यांच्या व्रात्य-स्तोम, 'मी असता', 'आठवणींचा पार', 'ठेवणीतल्या चिजा' या चार लेखसंग्रहांचे स्वरूप हे आत्मचरित्रपर किंवा आत्मपर स्फुट ललित लेखनाचे आहे.

एकूणच मराठीत शांतारामांनी केलेले आत्मपर ललित लेखन आपली स्वयंसिद्ध गुणवत्ता सिद्ध करणारे आहे. सन १९५० ते १९७५ च्या दरम्यान आत्मचरित्रात्मक लेखनाचा आढावा घेतांना डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी, ''समकालीन आत्मचरित्र हा समकालीन वाङ्मय आणि वाङ्मयाभिरुची यांच्याशी कमीत कमी नाते सांगणारा लेखन प्रकार आहे.'' तसेच, ''कथा-कादंबरी आदी वाङ्मय प्रकारांचा आढावा घेताना आपण उमेदीच्या समकालीन प्रतिभावंतांच्या सहवासात असतो. आत्मचरित्राचा असा आढावा घेताना आपण ज्येष्ठ पण उमेद संपत आलेल्या प्रतिभावंतांच्या सहवासात जातो. ते खरोखरच गेल्या पिढीचे आत्मकथन असते.'' असे म्हटले आहे. हे जर खरे मानले तर असे म्हणता येईल की शांतारामांनी आत्मचरित्र न लिहिता, आत्मपर ललित लेखन केले हे बरेच झाले. ते ज्येष्ठ लेखक असले, तरी समकालीन वास्तव चित्रणामुळे, लेखनातील माणुसकीच्या जिव्हाळ्यामुळे, त्यांचे आत्मपर ललित लेखन हे कुणाही माणसांवर प्रेम करणाऱ्याला आपल्याच अनुभवाचे प्रतिबिंब वाटावे, असेच झालेले आहे.





## शांताराम यांच्या आत्मपर ललित लेखनाचे स्वरूप

हे सर्वच आत्मपर लेखन शांतारामांनी सदर लेखन, प्रासंगिक लेखन म्हणून केलेले आहे. 'व्रात्यस्तोम' हा आत्म-कथनपर लेखसंग्रह असून 'आठवणींचा पार' हा व्रात्यस्तोम-सारखा आत्मकथनपर लेखसंग्रह नसून, आठवणींच्या अभिव्यक्ती-करणासाठी लेखक केवळ साक्षीभूत आहे, असे खुद्द शांताराम इंनी 'आठवणींचा पार' या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. 'लोकमत'च्या रविवार पुरवणीसाठी डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी वर्षभर शांतारामांकडून लेखन करून घेतले, म्हणून जोशींचे मराठी साहित्यावर उपकारच झाले. तसेच उपकार पुन्हा शंकर सारडा यांनीही केले. 'लोकमत'च्याच अक्षररंग पुरवणीसाठी त्यांनीही वर्षभर शांतारामांकडून लेखन करून घेतले. याच संग्रहाच्या प्रस्तावनेत लेखक म्हणतो, ''या संग्रहासाठी लेखांचा क्रम ठरवताना मी साधारणपणे घटना आणि अनुभवांचा माझ्या आयुष्यातील कालक्रम लक्षात घेतला आहे. साधारणपणे असे म्हणावयाचे कारण असे की अनुभव एका सरळ रेषेत कधीच येत नसतो. अनुभव, भावना, विचार यांच्या पलिकडे असे काहीतरी नेहमीच असते.'' या संसूचनांतून 'व्रात्यस्तोम ते ठेवणीतल्या चिजा' असा लेखकाचा एक मोठा जगतानाचा दीर्घ प्रवास कालसंबंद्ध बदलांसह व्यक्त होतो.

शांतारामांच्या चारही लेखसंग्रहांचा एकत्रित विचार केल्यास एका परिपक्व, पारदर्शक लेखकाचे अत्यंत निखळ, शांत, तरल, सयंतपणे माणुसकीचे दर्शन घडवणारे सुजाण असे व्यक्तिमत्त्व साकार होते. आत्मचरित्राची किंवा आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांची रद्दी वाचण्यापेक्षा कुण्याही वाचकाला, मनुष्याने कसे जगावे? या प्रश्नाचे उत्तर देऊन जाते. आत्मचरित्रात्मक लेखनाचे जे काही दुर्गुण सांगितले जातात, त्या सर्वच दोषांपासून अंतर राखून शांतारामांचे लेखन आपले स्वत:चे एक निराळे वळण, स्वयंसिद्ध वाङ्मयीन गुणवत्ता सिद्ध करते. सदर, प्रासंगिक लेखन असूनही ते वाचनीय, मननीय झाले आहे. आत्मपर लेखन असूनही शांताराम कुठेच आपला तोल सुटू देत नाहीत. कुठेही आत्मप्रौढी किंवा आपल्याच व्यक्तिमत्त्वाचे उदात्तीकरण करीत नाहीत.

बालपणापासून म्हणजेच गतकाळापासून ते वर्तमान काळातील आजच्या म्हातारपणातही तारुण्याच्या मनमौजी उर्मी जोपासणारा हा लेखक आहे. लेखकाने किंवा कुण्याही सर्वसामान्य माणसाने कसे उमदे, प्रसन्न असावे, जीवनाकडे कसे सकारात्मक पहावे, समाजात जगताना, वागताना कसे संयमित, शांतपणे वागावे; याविषयीचे अनेक वस्तुपाठ शांतारामांनी आपल्या लेखनातून वाचकांना दिले आहेत. शांताराम कुठेच आपल्या प्रतिमेच्या, लेखकाच्या मोठेपणात गुंतून पडल्याचे दिसत नाहीत. आत्मचरित्रांसारखे त्यांचे लेखन नार्सिसस पद्धतीचे नाही. शिक्षक-प्राध्यापक-प्राचार्य-लेखक असूनही हा माणूस रिक्षावाल्या-टॅक्सीवाल्यांपासून ते चिंतामणराव देशमुख-मोरारजी देसाईंसारख्या सर्वच स्तरातल्या लोकांमध्ये वावरतो. समाजात जगताना अत्यंत पारदर्शकपणे समाजाकडे, समाजातल्या लोकांकडे पाहातो. निर्लेपपणे आपल्या अनुभवांची संयमित अभिव्यक्ती करतो. एकूणात, शांतारामांचे आत्मपर ललित लेखन हे लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांच्या जातकुळीतले आहे. मराठीतली बहुतांश आत्मचरित्रे, आत्मकथने, स्वकथने, स्त्रियांची आत्मकथने वगैरेंपेक्षा शांतारामांच्या लेखनाला अधिक गंभीर, सुजाण असे संदर्भ आहेत. अर्थातच हा लेखकाच्या जीवनदृष्टीचा एक अनिवार्य असा नैतिक परिणाम आहे.

## शांतारामांच्या लोकप्रियतेचं रहस्य

लेखक जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोणातून पाहातो. आपल्या सहवासात आलेल्या लोकांचाही नकारात्मक दृष्टिकोण सकारात्मक करतो. माणसाचं मन जसं आहे तसं त्याला जग दिसतं, हे खरं आहे. शांतारामांजवळ एक संतृप्त आणि संपृक्त मन आहे. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी गंभीर असूनही तिला निराशेचा, वैफल्याचा स्पर्श नाही. जीवनात फसवले जाणे, ठगवले जाणे वगैरेंकडेही लेखक अनुभव, जीवनाचे शिक्षण म्हणून पाहतो. ही मनाची आणि बुद्धीची प्रगल्भताच लेखकाचे जगण्याचे आणि लेखनाचेही बळ आहे. असे बळ सर्वसामान्य माणसाकडे असावे लागते म्हणून लेखक त्यांच्यासाठी लिहितो.

शांताराम आपल्या जीवनात एकटे नाहीत. मनानेही ते एकटे नाहीत. एकटेपण तर त्यांना अजिबात पसंत नाही. एकटे असतांना त्यांना पुस्तकांची, संगीताची, वर्तमानपत्रांची साथ हवी असते. एकटेपणा लेखकाला जीवघेणा वाटते, म्हणून लेखक सतत भटकंती करतो. समाजात वावरतो. लोकांत राहातो. बाजारांतून जितक्या आवडीनं शांताराम भाजीपाला आणतात तितक्याच आवडीनं त्यांना खाणंपिणंही आवडतं. जितकं त्यांना खाणंपिणं आवडतं तितकंच त्यांना लोकांशी बोलणं, लोकांना शहाणं करणं, लोकांना आपले अनुभव सांगणं, हेही मनापासून आवडतं. जीवन जगण्याचं प्रचंड आत्मबळ, आनंदबळ शांतारामांच्या लेखनांतून वाचकांनाही मिळतं.

शांतारामांच्या लोकप्रियतेचं रहस्य त्यांच्या नैतिक, प्रामाणिक, पारदर्शक व्यक्तिमत्त्वात दडलेलं आहे. ''माझा स्वभाव गोड वगैरे काही नाही हे मी जाणतो. पण तशी प्रशंसा त्या रागावलेल्या मन:स्थितीतही मला आवडली.'' (ठेवणीतल्या चिजा, पृ.६६); ''खरे तर मद्य मला चालते, कधी कधी आवडतेही.'' (ठेवणीतल्या चिजा, पृ.११); 'मी स्वत: फार बारकाईनं पेपर्स काढतो अशी माझी जेव्हा जेव्हा माझे सहकारी तारीफ करीत असत तेव्हा मला वाटायचं खरोखरच आपण विद्यार्थ्यांना फसविण्यासाठी आपल्या चातुर्याचा उपयोग करीत आहोत.'' (आठवणींचा पार, पृ. ३८); आपल्या जगण्यातले आणि स्वभावातले दोष-उणीवा कबूल करण्याएवढं शांतारामांचं मन मोठं आहे. मद्य अनेकांना चालते पण जाहीरपणे कबूल करणे शक्य नसते, हे धाडस शांताराम दाखवतात. आपल्या आवडत्या विद्यार्थ्याबाबत-सुरेश भटांबाबत शांताराम म्हणतात, ''तो मौला माणूस, भटका जीव. एक दिवस राजकमल चौकात सोड्याच्या दुकानात मी त्याला गाठले आणि विचारले, ''तू

अचानक वर्गात येणे बंद केलेस?'' सोडा रिचवित त्याने उत्तर दिले, ''अचानक नाही. विचारपूर्वक. म्हणजे?, काही अर्थ नाही त्या वर्गात. तुमचे बोलणे घरीच ऐकण्यासारखे असते.'' (ठेवणीतल्या चिजा, पृ. ११९); अत्यंत यशस्वी असलेल्या शिक्षकाने, लेखकानेही आपल्या आयुष्याला कुरतडणाऱ्या-काही नाजूक बाजू प्रामाणिकपणे मांडाव्यात, हेच खरे तर शांतारामांच्या निर्लेप-प्रामाणिक-पारदर्शक व्यक्तिमत्त्वाचे, लोकप्रियतेचेही गमक आहे. आपल्या उतरणीच्या आयुष्यात आपल्याला भरपूर यश मिळाल्याची भावनाही शांतारामांना स्पर्श करीत नाही. अनेकदा त्यांना 'यशाची हवा' झाल्याची जाणीव होते. अशा नाजूक, घायाळ करणाऱ्या अनुभवांचे अभिव्यक्तीकरण शांतारामांनी आपल्या आत्मपर लेखनात केलेले आहे.



'खुली कवाड' या लेखात शांताराम म्हणतात, ''शिवाशीव, स्पृश्यता, अस्पृश्यता वगैरे आता राहिली नाही असं मला पुष्कळांनी सांगितलं आहे. खरोखरच तसं झालं असेल तर उत्तम. नपेक्षा आपण स्वत:च्या तोंडावर थुंकलं पाहिजे.'' (आठवणींचा पार, पृ.३९); शांताराम हे माणूसप्रिय व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना माणसं आवडतात. माणसांच्या जाती व धर्माच्या भिंती त्यांच्या अनुभवाच्या आड येत नाहीत. माणसांविषयीचा करुणाभाव, सहानुभूती शांतारामांच्या लेखनांतून प्रकटते. अनेक सुखदु:खांच्या आठवणींतून शांतारामांचे डोळे पाणावतात. शांतारामांचं आत्मपर लेखन हे पिकलेल्या रसरशीत आंब्यासारखं आहे. कुणालाही ते चविष्ट, रुचकरच वाटणार. तुकोबाही म्हणतात, 'खादल्याची गोडी देखिल्याशी नाही.' शांताराम आपल्या आयुष्यातल्या अनुभवांना चिरंतन शिल्पाच्या रुपात जतन करतात. वाचकांनाही त्यांचे अनुभव आपलेसे वाटतात. कुण्याही सर्वसामान्य जीवनावर प्रेम करणाऱ्या माणसाला शांतारामांचं आत्मपर लेखन समृद्ध करणारं ठरतं.

**वस्तुचित्रण आणि व्यक्तिचित्रण**

शांतारामांच्या आत्मपर लेखनानुभवात देशविदेशातील माणसांना जसे स्थान आहे, तसेच ते भोवतालच्या जड वस्तूमात्रांनाही आहे. आनंदाचा शोध घेत भटकंती करणारा, अनुभवातून स्वत:चं व्यक्तिमत्त्व घडवणारा हा लेखक स्वत:-पेक्षाही दुसऱ्यांचं मोठेपण मान्य करतो, ही लक्षणीय बाब मानावी लागते. दोन विद्वानांचं आपसात पटत नाही, असं म्हटलं जातं. शांताराम अनेक विद्वानांसोबत राहून, त्यांच्याशी चर्चा करूनही विनयशीलपणे समरस होत, त्यांच्या स्वभावातील गुणांचा शोध घेतात. वैगुण्यांचाही निर्देश तितक्याच नम्रतेनं करतात. अशा-वेळी त्यांची शैली काहीशी खेळकर, विनोदी रुप धारण करते. शांतारामांना अनेकांचा सहवास लाभला आहे. चिंतामणराव देशमुख, मोरारजी देसाई, रमेश तेंडुलकर, सचिन तेंडुलकर, डॉ. रघुनाथ माशे-लकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. प्रभाकर उर्ध्वरेषे, कवी अनिल, डॉ. शं. गो. तुळपुळे, डॉ. वा. वि. मिराशी अशा अनेक क्षेत्रातील नावाजलेल्या लोकांसोबत शांतारामांचा संबंध येतो.

भटकंती करणारा, जीवनाचा मनमुराद आनंद लुटण्याची भावना नेहमीच मनात ताजीतवानी ठेवणारा, हा जिंदादिल लेखक; विद्यार्थी, पालक, शिक्षक, लेखक, शास्त्रज्ञ, राजकारणी, दलित, आदिवासी, विद्यापीठीय अशा निरनिराळ्या सामाजिक आणि लौकिक क्षेत्रातील लोकांना या ना त्या कारणाने भेटतो. त्यांच्याशी बोलतो. त्यांच्या सोबत राहातो. सर्व स्तरांत उठबस करणारा हा लेखक आहे. माणसांविषयी प्रेम, जिव्हाळा, करुणा, दया, क्षमा, शांती अशा मानवी मूल्यभावांनी काठोकाठ भरलेला अमृताचा पेला आपल्या व्यक्तिमत्त्वात रिचवणारा हा लेखक आहे. जराही कुठे तुच्छतावादी भावना लेखकाच्या मनाचा ताबा घेत नाही. ही निरलस, खुली जीवनदृष्टी दुर्मीळ आहे, म्हणूनच ती शांतारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव बनली आहे.

शांताराम व्यक्तिचित्रणासोबतच वस्तुचित्रणही करतात. त्यांच्या अनुभवातील वस्तू वाचकांच्या डोळ्यांसमोर जिवंत उभ्या राहतात. खाण्यातल्या, दैनंदिन जगण्यातल्या अनेक वस्तूंना मूर्त आकार देण्याचे लेखकाचे सामर्थ्यही मोठे आहे. अंगावर घालायच्या कपड्यांपासून ते फराळातल्या आलूबोंड्यांपर्यंत शांताराम वस्तूंचं वस्तुनिष्ठ चित्रण करताना दिसतात. आलूबोंड्याचं एकच उदाहरण पुरेसं आहे. ''आमच्या खाद्यसंस्कृतीचे सर्वात मोठे प्रतीक म्हणजे आमचा आलूबोंडा. या आलूबोंड्याला मुंबई वगैरे भागात बटाटावडा म्हणतात. हा केवळ भाषेचा भेद नाही. थेट मूलतत्त्वाचीच बाब आहे ही. महाल भागातला आलूबोंडा म्हणजे एकमेवाद्वितीय अशी चीज होती. तसा मी कधीकधी संध्याकाळी धंतोलीत म्हणजे तथाकथित सुसंस्कृत भागात गोविंदराव दोडक्यांच्या बरोबर आनंदाश्रमातला आलूबोंडाही खात असे, पण तो म्हणजे मूळ वस्तूची एक नक्कल, बरीच सौम्य प्रकृतीची नक्कल. जिथे गावातल्या गावात हा फरक तिथे दूरस्थ मुंबई-पुण्यातल्या मिळमिळीत बटाटेवड्याची काय बात? बटाटेवड्याबरोबर बारीक-बारीक तळलेल्या मिरच्या वाटल्यास वरून खायची पद्धत तर अजिबात उपरी. आलूबोंड्यात सगळा तेज मसाला आत ठासून भरलेला. तो खाऊन झाल्यावर पाणी प्या की चहा प्या. जीभ, ओठ, डोळे, त्यानंतर किती तरी वेळ झणझणत राह्यचे असा तो आलूबोंडा, महालातला आलूबोंडा, घाट्यांच्या हॉटेलचा आलूबोंडा.'' (ठेवणीतल्या चिजा, पृ. १७-१८)

शांताराम हे मूळचे विदर्भनिवासी. विशेषत: चंद्रपूर, नागपूर, अमरावती भागाशी त्यांचा अनेक वर्षांपासूनचा जवळचा संबंध. त्यांचं विदर्भातल्या झणझणीत रस्सेदार-तर्रीबाज आलूबोंड्यावर विशेष प्रेम असणं अस्वाभाविक नाही. आलूबोंड्याच्या खाद्य संस्कृतीचं सूक्ष्म असं दर्शन त्यांनी घडवलं आहे. सुसंस्कृत आळीत मिळणारा मिळमिळीत आलूबोंडा आणि सामान्यांच्या वस्तीत मिळणारा झणझणीत आलूबोंडा केवळ समाजातील विविध

सामाजिक स्तरात जगणाऱ्यांचीच खाद्य संस्कृती व्यक्त करतो असे नाही, तर त्या-त्या भागातील जगणाऱ्या लोकांची सामाजिक आणि सांस्कृतिक महत्ताही त्यातूनच लक्षणेने व्यक्त होते.


लोकांवर प्रेम करणारा हा लेखक उत्तम खवय्या, शानशौकी मिजास बाळगणारा असल्याचंही दिसतं. जगात जे-जे चांगलं खाण्याचं आहे ते ते खावं, अशी ह्या लेखकाची वृत्ती असते. खाणं, पिणं, मौज करणं, आनंद लुटणं ही जिंदादिली असते. ह्याच गोष्टी काही लोकांसाठी विकृतीचेही निमित्त बनतात. अत्यंत समजूतदारपणे शांताराम जीवनातल्या मौजेकडं पाहतात. हा समंजसपणा त्यांच्या लेखनांतून समाजात जर झिरपला तर खरोखरच समाजाचं आजचं बिघडलेलं स्वास्थ्य काही अंशी तरी ताळ्यावर येऊ शकतं. नेमाडे म्हणतात तशी, लेखन ही जर कृती असेल तर शांतारामांचं आत्मपर, अन्यही लेखन सामाजिक उत्तरदायित्वाची एक मोठी कृतीच मानली पाहिजे. शांतारामांच्या लेखनात जसं शहाणपण आहे, खिलाडूवृत्ती आहे, निरागसता आहे, पारदर्शकता आहे, देशीयता आहे, तसेच त्यांच्या लेखनात लेखकाच्या नैतिकतेचा समृद्ध आविष्कार असून, समाजाच्या सांस्कृतिक संवर्धनाची एक उमदी चाहूलही आहे.

**अकृत्रिम आणि स्वाभाविक आत्मपर ललित लेखन**

ललित लेखनाची भरभराट ही सन १९५० ते १९६०च्या दशकातली. एकूणात, शि. म. परांजपे-खांडेकर-फडके-काणेकर अशी ही लघुनिबंध-गुजगोष्टींची म्हणजेच काव्यात्म ललित लेखनाची परंपरा. गद्य अलंकारिक करून काव्याच्या पातळीवर त्याची मांडणी करण्याचा प्रयत्न ह्या ललित लेखन परंपरेतील लेखकांनी केला. भाषेतील काव्यत्मतेला-अलंकारिक जडण-घडणीला विशेष महत्त्व दिले गेले. परिणामत: ललित लेखनात कृत्रिमपणे लालित्य शिरलं. गद्याचं ललितपणही हरवलं. केवळ कृत्रिम काव्यात्मता म्हणजे ललित लेखन नव्हे, हे समजायलाही मराठीतल्या लोकांना पन्नास वर्षे लागली. ह्याच पिढीशी समकालीन असणाऱ्या के. ज. पुरोहितांना मात्र गद्यातलं लालित्य हे काव्यात्म तेवर, भाषेच्या अलंकारिक जडणघडणीवर, कृत्रिम भावभावनांच्या खोट्यानाट्या तरल, भावुक अनुभवांवर अवलंबून नसते, हे खूपच लवकर कळले. शांतारामांची अनुभवांच्या अभिव्यक्तीची भाषा ही दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. तिच्यात अकृत्रिम लालित्य आहे. स्वाभाविक ओघ, हृदयाला हात घालण्याची शक्ती आहे. गद्य कायम ठेवणारी अकृत्रिम काव्यात्मताही तिच्यात आहे. उदा. 'पेरू' या लेखात लेखक म्हणतो, ''आजही घराबाहेर पडताना खिशात पैसे असतात. पेरू दिसले की विकत घेतो. (आता चोरीचा विचारही मनात येत नाही.) पण सारखे आठवते ते पिलीच्या बागेतल्या माळ्याचे वाक्य, 'बाजारात चोरी करायची असेल तर खिशात पैसे पाहिजेत.' हे खरे आहे. असे का व्हावे कळत नाही. माझ्या गोड आठवणीतले हे मीठ आहे. ते नको म्हटले तरी मला पुरते.''(ठेवणीतल्या चिजा, पृ.१२.) भाषिक परिपक्वता हा या वाटेवरील थांबा आहे. देशीयतेच्या परिप्रेक्ष्यात त्यांच्या ललित लेखनाची जडणघडण झाली. शांतारामांची केवळ भाषाच परिपक्व आहे असे नाही, तर त्यांच्या आठवणींची मांडणीही चिंतनशील आहे. 'कल्पित' या एका लेखात शांताराम म्हणतात, ''कम्युनिस्ट राजवटी का पडल्या याविषयी माझ्या मनात गोंधळ नक्कीच आहे. अर्थकारणामुळे या राजवटी पडल्या असं लोक म्हणतात. खरंही असेल. मला मात्र सतत वाटतं की कल्पना आणि सत्य, मिथक आणि तथ्य, वर्तमान आणि भूत यांचा तिथं जो विसंवाद, विरोध होता त्यामुळेच सगळी उलथापालथ झाली असावी.''(आठवणींच्या पार, पृ.११८).

शांतारामांच्या लेखनात थोर विनोदी लेखक निर्माण करतात तसा विनोद नाही. घटना-प्रसंगाला अनुरूप सहजस्वभावी विनोद त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य ठरते. अर्थातच त्यांच्या लेखनातील विनोद हे आपल्याच दैनंदिन जीवनातले असतात. जसे, 'घर नसलेले घर' या लेखात शांताराम म्हणतात, ''माझे ज्येष्ठ मित्र डॉ. वि. भि. कोलते मला घर बांधण्यासाठी एक विनोदी सूत्र वारंवार सांगत असत. त्यांना घरे बांधण्याचा बऱ्यापैकी अनुभव असल्यामुळे ते सूत्र मी त्यांच्याकडून अनेकदा ऐकले होते. त्यांच्या मते घरबांधणीत तीन अवस्थांतून आपल्याला संबंधित लोक नेत असतात. त्यांचा उद्देश असतो पहिल्यांदा सुतवणे. (म्हणजे गुणा, सूत इत्यादींच्या सहाय्याने जुन्या पद्धतीचे मोजमाप घेणे.) त्यानंतर गुतवणे (म्हणजे घर बांधायला निघालेल्या माणसाला त्या व्यवहारात गुतवणे) आणि शेवटी कुथवणे (त्याचा अर्थ सांगायला नको.)''(ठेवणीतल्या चिजा, पृ. १०४.) याच लेखसंग्रहात 'ओटी' या लेखात लेखक म्हणतो,'' मी धोतर वापरतो याचे अनेकांना आश्चर्य वाटते. कारण साधे आहे. मी अजून धोतर सोडलेले नाही.'' (ठेवणीतल्या चिजा, पृ.१६१.) शांतारामांची लेखनशैली कलात्मकतेपेक्षा जीवनसापेक्ष भाषिक सहजतेला महत्त्व देते. भाषेत ओघ, तेज, निरलसता, बोलीभाषेचा गोडवा, जीवनातली सहजता, उपरोध, व्यंग अशा अनेक गुणांनी शांतारामांची भाषा वाचकांच्या मनाचा ठाव घेणारी आहे. 'व्रात्यस्तोम'पासून ते 'ठेवणीतल्या चिजा'पर्यंतचा त्यांचा प्रवास हा कुठेही आपली सहजता गमावत नाही. उलट सहजतेची वाट पुढे पुढे अधिकाधिक सौंदर्यशाली, हृदयस्पर्शी होताना दिसते. 'ठेवणीतल्या चिजा' हा त्यांच्या लेखनगुणांची महत्ता कळसाला पोहोचवणारा लेखसंग्रह आहे.

शांतारामांच्या लेखनावर काहीसा पारंपरिक मराठी ललित लेखनाचा प्रभाव आहेच. तो नाकारता येणार नाही. परंतु या प्रभावाचे स्वरूप मात्र अंशत: ललित लेखकांच्या भाषिक खुब्यांशी निगडित आहे. भाषिक कृत्रिमतेशी मात्र त्यांच्या भाषेचा, ललित लेखनशैलीचा दूरान्वयानेही संबंध जोडता येणार नाही. शांतारामांचे जीवनसंबद्ध असे व्यक्तिमत्त्वच त्यांच्या ललित लेखनातून साकार झाल्यामुळे, नैतिकता हाच त्यांच्या लेखनाचा आधार आहे. जीवनाचा शोध घेणे, आनंदाचा शोध घेणे, सत्य आणि वास्तवाचा शोध घेणे, हेच त्यांच्या लेखनाचे ध्येय असल्याचे दिसते. शांतारामांचे लेखन प्रासंगिक, सदर लेखनांतून




'ग्रंथाली' प्रकाशित

झालेले असले तरी त्यांच्या मनातला प्रामाणिक, परिपक्व, पारदर्शक, खऱ्या अर्थाने नैतिकतेची उंची गाठलेला लेखकच आपल्या जीवनभरच्या अनुभवांनी निखळपणे व्यक्त झालेला आहे. ह्या लेखकाला व्याज वास्तवाची, कृत्रिम अशा काव्यात्म भाषाशैलीची गरज न जाणवण्याचे कारणही; जीवनात अस्सलपणे अनुभव घेण्याच्या, त्या अनुभवांनी आपलं व्यक्तिमत्त्व संपृक्त करणाऱ्या, आंतरिक शोधप्रक्रियेत सापडते. *होय मनाशी संवाद, आपुलाचि वाद आपणाशी, सत्यअसत्यासी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता,* ही तुकोबाप्रणित अनुभव शोधाची समंजस जाण हे शांतारामांच्या ललित लेखनाचे प्राणतत्त्व आहे. शांतारामांचे लेखन म्हणजे जिवंत असलेल्या माणसाच्या अंत:करणातील श्वास होय. अशा सार्वकालिक आत्मप्रत्ययी लेखनाने समाजही सुसंस्कृत होत असतो.

शांतारामांचं लेखन कधीच म्हातारं होऊ शकणार नाही. ते सदैव चिरतरुणच राहील. एवढी तारुण्याची रसरशीत ऊर्मी त्यांच्या लेखनात अंतर्भूत असल्याचे प्रत्ययास येते. याचं महत्त्वाचं गमक म्हणजे; शांतारामांच्या लेखनातलं तरुण मन हे कालातीत आहे.

**संदर्भ :**


- द. भि. कुळकर्णी, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपादक : म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर, मुंबई, १९६८
- आनंद यादव, आत्मचरित्र मीमांसा, मेहता, पुणे, १९९८
- अ. द. वेलणकर, आजचे मराठी साहित्य, साहित्य प्रसार, नागपूर, १९९५
- निशिकांत मिरजकर, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपादक : म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर, मुंबई, १९६८
- भालचंद्र नेमाडे, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपादक : म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर, मुंबई, १९६८
- अशोक केळकर, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप संपादक : म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर, मुंबई, १९६८
- के. ज. पुरोहित, आठवणींचा पार, ऋचा प्रकाशन, नागपूर, प्रस्तावना.



**– डॉ. किशोर सानप**

भ्रमणध्वनी : ९३२६८८०५२३, ९५१८३६८९७६

dr.kishorsanap@gmail.com

Web-www.kishorsanap.com



ग्रंथाली

**खेळिया**

**डॉ. घनश्याम बोरकर**





**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

कविता आणि संगीताने माझ्या आयुष्यात जागृती, स्वप्न आणि सुषुप्ता ह्या तीनही अवस्थांमध्ये मला अहोरात्र साथ देऊन आनंद तर दिलाच. पण क्वचित कधीतरी अवचितपणे 'तुरीयावस्थे'तील आनंदाचीही अनुभूती दिली. कविता–स्वर माझे सोयरे सांगाती' ही माझी दृढभावना आहे. आणि म्हणूनच माझी कविता कशीही असली तरी मी तिच्या ऋणातही आहे आणि प्रेमातही आहे.

**– डॉ. घनश्याम बोरकर**

**मु.पो. आई**

**संपादन**
**संदीप रामराव काळे**




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

संदीप काळेंनी माध्यमांतील जाणकार संपादक मंडळींचे संपादित केलेले सगळे लेख वाचले की जाणवतं, आई म्हणजे प्रतिकूलतेशी अव्याहत झगडणारी, न डगमगणारी, मुलांसाठी तगमगणारी, कधी हळवी, कधी खंबीर, मुलांना घडवणारी वात्सल्यमूर्ती असते. ह्या पुस्तकाच्या बुद्धिजीवी संपादकांच्या हृदयातील हळवं संचित संकलनाच्या माध्यमातून वाचकांसमोर येतंय. हा ठेव जपून ठेवण्यासारखा आहे.

**– शरद पवार**

# अंतर्बाह्य नितळ कविता

अंजली कुलकर्णी

**सातत्यानं तीन वर्ष 'ती' आदिवासी समाज, स्त्रिया यांमध्ये सर्वेक्षण करीत होती. कदाचित त्या नोंदी करता-करताच वास्तव जीवनातही तिला आत्मशोधाचे अनेक कण सापडले असावेत...**

कविता महाजन अचानकच आपल्यातून गेली. ऊर्जेनं भरभरून असलेलं असं कुणी उत्फुल्ल व्यक्तिमत्त्व अचानक कसं संपू शकतं? विश्वास बसू नये अशा पद्धतीनं कविता गेली. त्यानंतर काही दिवस व्हॉटसअॅप, फेसबुकवर तिच्या कविता, तिच्या कादंबऱ्या आणि तिच्या वैयक्तिक आठवणींच्या चर्चा-पोस्ट्सची अक्षरशः बरसात होत होती, कारण लेखिका-कवयित्री म्हणून तिच्याविषयी प्रचंड कुतूहल तर होतच, परंतु एक व्यक्ती म्हणून, मैत्रीण म्हणूनही महाराष्ट्रभर असंख्यांशी ती जोडलेली होती. तिच्याविषयीच्या असंख्य आठवणी अनेकांजवळ होत्या. खरंतर कविता काही 'गुडी-गुडी' टाईप बोलणारी-वागणारी नव्हती. जिथे न सुचणारं काही असेल, तिथे ती झट्कन फटकारून मोकळी होत असे. अनेकांशी तिचे अनेक वाद झाले, परंतु त्या वादांपलीकडे माणसांशी अगदी जिव्हाळ्याची नाती जोडण्याची तिला असोशी असे. महाराष्ट्रभर फिरताना केवळ कवी-कवयित्री नव्हे तर त्यांच्या कुटुंबियांशीही तिचे फार जिवाभावाचे नाते निर्माण होत असे. तिचं वागणं-बोलणं, तिच्या आवडीनिवडी, तिचे वाद-तिचं प्रेम सारंच मनस्वी होतं. तिच्या अभिव्यक्तीतही तिचा विश्वास, मनस्वी व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्यांचं प्रतिबिंब स्पष्टपणे पडलेलं होतं. स्त्रियांच्या लेखनावर संकोचाचं, संस्कारांचं, अवघडलेपणाचं एक अवगुंठन असतं, त्याचा लवलेशही कविताच्या लिखाणात नव्हता. एरवी स्त्रियांच्या लेखनावर कुटुंबीय, नातेवाईक, शेजारीपाजारी, समाज, एवढंच काय तर अगदी साहित्यक्षेत्रातील सनातनी मंडळींचीही अदृश्य सेन्सॉरशिप असते. बायकांनी कसं वागावं, कसं बोलावं, कसं हसावं याचे जसे समाजमान्य संकेत आहेत, तसेच लिहिणाऱ्या स्त्रियांबाबतही आहेत. तिनं काय लिहावं आणि काय लिहू नये ह्याबद्दलचे अलिखित नियम समाजानं बनवले आहेत. पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या या अलिखित बंधनांचा काच इतका असतो की स्वतः स्त्रियाच स्वतःवर अशी बंधनं घालून घेतात, परंतु कवितानं अशी संकेत शरणवृत्तीची कधीच नव्हती. तिनं असे चुकीचे संकेत नेहमीच झुगारून दिले आणि आंतरिक धैर्यानं ती स्वतःला येणारं जगण्याविषयीचं भान लेखनातून उतरवत राहिली.

कविताच्या लेखनात एक झपाटलेपण होतं. तसाच लेखनाचा झपाटाही होता आणि आवाकाही. कविता, कादंबरी, ललितगद्य, अनुवाद, बालसाहित्य, संपादन, ब्लॉग लेखन




अशा सगळ्याच वाङ्मयप्रकारांत तिनं फार झपाटलेपणानं काम केलं. वास्तविक पाहता अनेक वाङ्मयप्रकार हाताळले तरी साहित्यकाराची घट्ट पकड कोणत्या तरी एका वाङ्मयप्रकारावर अधिक असते. त्याची ओळखही एका कुठल्यातरी वाङ्मयप्रकारानं नक्की होते, परंतु कवितानं कविता आणि कादंबऱ्या या दोन्हींतही आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली. कविता महाजन म्हटलं की 'तत्पुरुष', 'धुळीचा आवाज', 'मृगजळीचा मासा' हे तिचे कवितासंग्रह आठवतात. तितक्याच किंवा अधिक तीव्रतेनं तिच्या 'ब्र', 'भिन्न', 'कुहू' या कादंबऱ्या आठवतात आणि तितकेच तिचे ब्लॉगही आठवतात. 'ग्राफिटी वॉल'सारखं आगळंवेगळं ललित, 'जोयानाचे रंग' आणि 'बकरीचं पिल्लू'सारखं बालसाहित्य, 'रजई' हा इस्मत चुगताईंच्या कथांचा अनुवादित कथासंग्रह, 'वैदेही' यांच्या कथांचा अनुवादित संग्रह असं खूपसं काम करताना तिनं आपली वैचारिक भूमिका बिलकूल पातळ होऊ दिली नाही. किंबहुना आपलं जगणं-बोलणं आणि आपलं लिहिणं यातली तिची एकरूपता कधीच ढळली नाही. याचं कारण असं होतं की तिची वैचारिक भूमिका हा केवळ तिनं धारण केलेला मुखवटा नव्हता, तिच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाचाच तो भाग होता. त्यामुळे अगदी सहज कुठल्याही प्रयासाविना तो तिच्या जगण्या-वागण्यात येत असे तसाच तो लिखाणातही येत असे. अंतर्बाह्य नितळता हा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लिखाणाचाही आवश्यक गुणधर्म होता.

खरं तर नांदेडसारख्या ठिकाणी तिचा जन्म आणि महाविद्यालयीन शिक्षण झालं, परंतु तिच्या कवितेत 'नांदेड' कधीच डोकावलं नाही. ती सातत्याने महानगरी वास्तवाचा वेध घेत राहिली कारण 'नांदेड' तिच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नव्हता. तिचे व्यक्तिमत्त्व हे महानगरीच होते आणि त्याचाच आत्मशोध घेत ती कविता लिहीत राहिली. विशेषत: तिच्या 'तत्पुरुष' या संग्रहातल्या कवितांमधून तिचे आकलन फार ठळकपणाने जाणवते. कविताने आपल्या भोवतालाचा एक अन्वय लावण्याचा प्रयत्न आपल्या कवितांमधून केलाच परंतु विशेषत्वानं तिनं स्त्रीपुरुष आदिबंधातील सत्तासंघर्ष आणि त्यातील शोषक-शोषित नात्याचा अर्थ उलगडण्याचा प्रयत्न फार काव्यात्मपणे केला आहे. 'तत्पुरुष'मधील 'मालक' ही कविता या संदर्भात फार महत्त्वाची आहे. स्त्री-पुरुष संबंधात अनुस्यूत असलेला मालक-नोकर, शोषक-शोषित संबंध तिने फार चांगल्या पद्धतीने समजून घेऊन मांडला आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने निर्माण केलेली विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, बाईचे 'बाई'

म्हणून बालपणापासून घडविले जाणे, तिचे शरीर, तिचे मन, तिचे मातृत्व, तिचे सारे काही पुरुषांसाठी, कुटुंबासाठीच अशा संस्कारांनी तिचे स्वतंत्र अस्तित्व दडपून टाकणे, अपरिमित कष्टांनी तिचे भरडले जाणे, तिचे दैवतीकरण करून तिला खोट्या मखरात बसवून भ्रामक समजुतीत ठेवणे, आधुनिक युगात बाजारीकरणाच्या प्रक्रियेत तिचे शोषण करणे, केवळ वस्तू म्हणून तिचा उपभोग घेणे या साऱ्या बायकांवर अन्याय करणाऱ्या व्यवस्थेसंदर्भात कविताने फार धाडसी उद्गार तिच्या कवितेत काढले आहेत. या कवितेची भाषा स्त्रीवादी आहे म्हणून ही कविता अस्सल स्त्रीवादीच आहे. ती केवळ स्त्रीदु:खाचे वर्णन करीत नाही तर स्त्रियांना दु:ख भोगायला लावणाऱ्या संस्कृतीशी विद्रोहाची भाषा ती वापरते, पुरुषी मानसिकतेला ती आव्हान देते. समाजातील सर्व स्त्रियांशी स्वत:ला जोडून घेते. स्त्रियांची सुखदु:खं, आशाआकांक्षा, वेदना-संवेदना, शोषणपराधीनता, एकाकीपण, सोशिकता, हे सारं ती समजून घेते आणि तिथेच न थांबता स्त्रियांनी आत्मभान जागृत ठेवत संघर्षाची तयारीही करण्याचा संदेश ती देते. स्त्रियांमधील स्वसामर्थ्याला ती साद घालते. स्त्रियांच्या आंतरिक सामर्थ्याच्या दर्शनाने पुरुषांमधील घाबरट, भेकड, दुबळा माणूस उघडा होतो, हे वास्तव तिच्या कवितेत उघड होते, परंतु तरीही स्त्रीला मालक असणे समाजसंकेतांनुसार अनिवार्य असते. मालक असल्याची ठसठशीत निशाणी तिनं कपाळावर, गळ्यात, अंगाखांद्यावर मिरवली पाहिजे, ही गुलामीची मानसिकता बहुतांश स्त्रियाही धारण करतात आणि पुरुषप्रधान संस्कृतीची मुळं अधिक घट्ट करण्यात हातभार लावतात. याविषयीची खंत तिच्या कवितेत व्यक्त होते. एके ठिकाणी ती लिहिते-

*''मालक नसलेल्या बाईजवळ*
*जात नाहीत चुकूनही मालक असलेल्या बायका*
*तिला पाहताच आधी त्या नीट करतात आपलं कुंकू*
*चाचपतात मंगळसूत्र चुडे भरल्या हातांनी...''*

समाजात स्वत:च्या सामर्थ्यावर उभं राहू पाहणाऱ्या स्त्रीला नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला जातो, या कटू सत्यावर कविता प्रकाश टाकते.

कविताच्या लेखनाची सुरुवात तशी कवितेनंच झाली होती. तरीदेखील तिला एक व्यवच्छेदक, नि:संशय ताकदीची लेखिका म्हणून ओळख मिळाली ती 'ब्र' या तिच्या कादंबरीमुळेच. 'ब्र' या कादंबरीतून झळझळीतपणे एक विचारशील लेखिका म्हणून ती समोर आली. त्यानंतर तिच्या कवितांमध्ये देखील तो झळझळीतपणा उतरला. अर्थात या सर्व लिखाणाला वैयक्तिक आयुष्यात तिच्या तावून सुलाखून निघण्याचीदेखील एक बैठक होती. वैयक्तिक आयुष्यात आणि लेखनातही आत्मभानाचं सोनं गवसल्यानं झालेलं एक रूपांतरण प्रत्ययाला आलं. आत्ममग्नतेचा कोष फोडून तिनं स्वत:चं रूपांतर स्वतंत्र फुलपाखरात केलं होतं.

'ब्र' या कादंबरीत आत्मशोध घेणाऱ्या स्त्रीच्या संघर्षाची गाथा आहे, परंतु त्याचबरोबरीनं ज्या आदिवासी समाजातील स्त्रियांसाठी ती काम करते. त्या आदिवासी स्त्रियांचाही समाजाशी सुरू असलेला संघर्ष यात आहे. व्यक्ती ते समष्टी असा एक मोठा आवाका कादंबरीत मांडताना कवितानं वास्तव जीवनात ती आदिवासींमध्ये करीत असलेल्या अभ्यासाचा संदर्भ घेतला आहे. कादंबरी लिहिण्यासाठी म्हणून नाही, तर कामाचा भाग म्हणून सातत्यानं तीन वर्ष ती आदिवासी समाज, स्त्रिया यांमध्ये सर्वेक्षण करीत होती. कदाचित त्या नोंदी करता-करताच वास्तव जीवनातही तिला आत्मशोधाचे अनेक कण सापडले असावेत. आदिवासी स्त्रियांची सुखदु:खं तपासताना तिला त्यांच्या सुख:दुख, यातनांशी असलेला स्वत:च्या जीवनाचा भावबंध गवसला असावा. त्यातूनच 'ब्र'ची निर्मिती झाली असावी. कविताच्या अनेक मुलाखती खरंतर ऐकल्या आहेत, पण आता याक्षणी तरी 'ब्र'च्या उत्पत्तीच्या नेमक्या आरंभबिंदूविषयी तिनं काही लिहून, बोलून ठेवलंय का ते आठवत नाहीय, परंतु तशी शक्यता दाट होती एवढं नक्की जाणवतंय. 'ब्र' या कादंबरीनं मराठी कादंबरीला आणि कविताच्या जगण्यालाही एक वेगळं परिमाण, वळण मिळालं.

'ब्र' पूर्वीही कविता तितकीच लोभस, स्पष्टवक्ती, जीव लावणारी आणि परखड, बिनधास्त मोकळी अशीच होती. फक्त 'ब्र'मुळे तिच्या या सगळ्या व्यक्तिमत्त्ववैशिष्ट्यांना एक आधार प्राप्त झाला. अधिकार प्राप्त झाला असं म्हणायलाही हरकत नाही.

'ब्र'नंतरही तिनं वेगळ्या प्रकारचं कादंबरीलेखन करण्याचा सिलसिला जारी ठेवला. 'ब्र'नंतर आलेल्या 'भिन्न' या तिच्या कादंबरीनेही वाचकांचं लक्ष वेधून घेतलं. या कादंबरीत तिने एड्सग्रस्त स्त्रियांच्या यातनांचा वेध घेतला आहे. मुळात हा विषय मराठी कादंबरीसाठी अत्यंत धाडसाचा होता. बहुतांश वेळा स्वत:ची चूक नसताना स्त्रियांवर एड्सग्रस्ततेची बळी ठरण्याची वेळ येते. अशा वेळी कुटुंब, समाज, नातेवाईक, मित्रमंडळी यांच्याकडून मिळणारी तिरस्काराची, घृणेची वागणूक तिला आयुष्यातून उठवते. कित्येक वेळा तिला समाजजीवनातून बहिष्कृत केलं जातं. एकाकीपणात जीवन कंठताना, मुलांना वाढवताना तिच्या वाट्याला येणारी संकटांची मालिका तिला मुळापासून हादरवून टाकते. सामाजिक, शारीरिक, मानसिक दृष्ट्या ती खचून जाते. तिचं उध्वस्त होणारं भावजीवन हे या कादंबरीचा गाभा आहे. त्यानिमित्तानं तिनं समाजाच्या मानसिकतेवर नेमका प्रकाश टाकला आहे.

'कुहू' ही कादंबरी ही कवितानं आपलं सारं पणाला लावून निर्मिलेली मल्टिमीडिया साहित्यकृती होती. त्यात दृक्‌श्राव्य तंत्र, चित्रं अशा अनेक गोष्टींचा तिनं कल्पक वापर केला होता. खरंतर मराठी साहित्यविश्वात ही एक अपूर्व सुंदर घटना होती परंतु या प्रयोगाचं म्हणावं तेवढं स्वागत झालं नाही. मुख्यत: व्यावहारिक दृष्ट्या या कादंबरीला मोठा फटका सोसावा लागला. या कादंबरीच्या प्रकाशनानंतरच्या काळात फोनवर झालेल्या संभाषणात या नुकसानीविषयीची खंत तिनं बोलून दाखवली होती. 'ठकी आणि मर्यादित पुरुषोत्तम' ही तिची कादंबरी तर कधी आली आणि कधी विरून गेली हेही कळलं नाही. कधी कधी वितरणातले काही प्रश्नही

साहित्यकृती पोहोचवण्यात आणि यशस्वी करण्यात अडचणी ठरू शकतात. 'ठकी'ची अशीच काही शोकांतिका झाली असावी, असं वाटतं कारण वैयक्तिक माझ्यापर्यंतही ही कादंबरी पोहोचलेली नाही.

प्रकाशकांविषयी एकदा नाराजीचे उद्‌गार काढताना कविता म्हणाली होती की लेखकाच्या कष्टांची प्रकाशकांना किंमत नसते. मला वाटतं वितरक म्हणूनही प्रकाशकांविषयी तिचं हेच मत असावं. अर्थात, ती मतं लपवून ठेवून कुढत बसणाऱ्यांपैकी ती नव्हती. ती रोखठोक बोलायची. परखडपणे मतं व्यक्त करायची. कधी कवींचे बुरखेही टरकवायची. एकदा एका कविसंमेलनात नेहमी एकच कविता सादर करणाऱ्या 'आवाजी' कवीला तिनं स्टेजवरच उपरोधानं फटकारलं होतं.

वैयक्तिक माझ्याही तिच्याबरोबरच्या काही आठवणी आहेत. आमच्या वृत्तीवैशिष्ट्यांत, स्वभावात खूप फरक होता, तरीही आमच्यामध्ये एक चांगलं सौहार्द होतं. सुरुवातीला अनेक वेळेला आम्ही एकत्र कविता वाचल्या होत्या. अकोल्यात दोन दिवस एकत्र राहिलो. खूप गप्पा मारल्या. नारायण कुलकर्णी कवठेकरांकडे पुरणपोळीचं जेवण जेवलो. त्या आठवणी आता मनात पुन्हा-पुन्हा जाग्या होत आहेत. 'ब्र' नंतर कवितानं कविसंमेलनांतून कविता वाचणं बहुतांश बंद केलं. माझंही कमी झालं. तरीही आमचा संवाद अधूनमधून विशेषत: फोनवर सुरू राहिला. पुण्यात 'मिळून साऱ्याजणी'त एक-दोन वेळा तिची मुलाखत होती, तेव्हा आवर्जून आम्ही भेटलो. मध्यंतरी तिनं वजन खूप कमी केलं होतं. क्षणभर मी तिला ओळखलंच नव्हतं. त्यावेळी पट्कन मी म्हणून गेले होते, ''अगं तू आधीच किती छान दिसायचीस. मोकळंढाकळं व्यक्तिमत्त्व हेच तुझं खरं व्यक्तिमत्त्व आहे.'' यावर ती खळखळून हसली होती. त्या तिच्या हसण्याचा नाद माझ्या मनात आता पुन्हा निनादतो आहे. आम्ही दोघी अगदी फार घट्ट मैत्रिणी होतो असं मी म्हणणार नाही पण महाराष्ट्रभरात ज्या असंख्य मित्रमैत्रिणींच्या मनात तिच्याविषयी आकर्षण, आस्था आणि जिव्हाळा होता तोच आमच्यातही होता, हा धागा नक्कीच समाधान देणारा होता. मात्र ती पुण्यात कधी आली, कधी आजारी पडली आणि कुठल्या दुर्दैवी क्षणी तिला काळानं असं अवचित उचलून नेलं ह्याची गंधवार्ताही मला नव्हती याचं वाईट वाटलं. असं वाटलं की आजारी आहे कळलं असतं तर भेटून आलो असतो, पण या जर-तरच्या गोष्टींना काही अर्थ नसतो. २७ सप्टेंबरच्या संध्याकाळी पुण्यात 'मसाप'मध्ये एक कार्यक्रम होता. नीलिमा गुंडींनी बोलताना कविता महाजनच्या ब्लॉग लेखनाचा उल्लेख केला होता. तो कार्यक्रम संपून घरी आले तर व्हॉटसअ‍ॅप ग्रुपवर वाचलं- 'कविता महाजन व्हेंटिलेटरवर' तेवढं वाचते न वाचते तोवर पुढच्या पोस्टस्‌मध्ये 'कविता महाजन यांचं निधन' ही बातमी. टीव्ही लावला. टीव्हीवर 'ब्रेकिंग न्यूज' सुरू झाली होती. खरोखर ही 'हार्ट ब्रेकिंग' न्यूज होती. नंतर फेसबुकवरची तिची शेवटची नोंदही वाचली- 'कामं वाट पाहतायत.'

खरं आहे कविताचं! 'ब्र'पासूनचा सगळा काळ हा तिचा काळ होता. हात जोमदारपणे लिहिता होता. लेखणी बहरात होती. तनामनात ऊर्जा ओसंडून होती, लिहिण्याचे अनेक प्रकल्प डोक्यात होते. हात लावेल तिथे साहित्याचं सोनं झळझळत होतं. सारे वाङ्मयप्रकार हात जोडून समोर शरणागत होते. अशावेळी घोड्यावर पक्की मांड घालून बसलेल्या, कणखरपणे, आत्मविश्वासानं लगाम हाती धरलेल्या, चौखूर धावण्याची ईर्षा बाळगणाऱ्या घोडेस्वाराला असं अकस्मात खाली कोसळावं लागणं हा साहित्यसंस्कृतीसाठी केवढा मोठा आघात - तो कशानं भरून निघेल?


- अंजली कुलकर्णी

भ्रमणध्वनी : ९९२२०७२१५८

anjalikulkarni1810@gmail.com



ग्रंथाली



मूल्य १३० रु.
सवलतीत ८० रु.

दत्ता सावंत लिखित

पिटुकल्यांसाठी नाटुकल्या

आणि

अष्टनायिका




मूल्य १४० रु.
सवलतीत ९० रु.

'पिटुकल्यांसाठी नाटुकल्या' हा बालनाटिका संग्रह बाल-दोस्तांसाठी भेट देताना ते हडप यांचेच कार्य पुढे नेत आहेत. लहान मुलांच्या सोबत लहान मूल होऊन रमणारे त्यांच्यासाठी त्यांना भावेल, आवडेल असे लिखाण करणारे दत्ता सावंत, या बालनाटिकांद्वारे मुलांसाठी रुचकर, मनोरंजक हा उपहार छोट्या दोस्तांना नक्कीच आवडेल. - लीला विनोद हडप

'अष्टनायिका'मधील प्रत्येक एकांकिका कल्पकतेने लिहिलेली आहे. त्या ज्या समस्या मांडतात त्यामुळे त्या त्या व्यक्तींच्या आयुष्यात जी सुख-दुःख येतात ती वाचताना मन हेलावून जातं. आपल्याला परिपूर्ण कलाकृतीचा अनुभव देण्याची क्षमता यातील प्रत्येक एकांकिकेत आहे.

- निर्मिती सावंत

बीज़
अंकुरे
अंकुरे

वर्ष २६ वे । दिवाळी २०१८

ऋतुरंग

संपादक : अरुण शेवते

एखादं बीज आपल्या मनात निर्माण होतं, त्या बीजाचं रूपांतर सुंदर जाणिवेत होतं, ती जाणीव जगण्याला बळ देते. आपण जगत असताना, विचार करत असताना, भावनांचं, विचारांचं बीज आपल्या मनात रोवलं जातं. पुढे ते बीज वाढता वाढता, आपलं आयुष्यही वाढवतं.

■

ऋतुरंग

संपर्क । अरुण शेवते
भ्रमणध्वनी । ९८९२४३८५७४
shevatearun@gmail.com
मुल्य : २०० रुपये । पृष्ठसंख्या : २००

अंक सर्व विक्रेत्यांकडे उपलब्ध

**या अंकाचे मानकरी**

गुलज़ार
मेघना गुलज़ार
दिपिका पदुकोण
नागराज मंजुळे
जनार्दन वाघमारे
गिरीश कुबेर
डॉ. पी. डी. पाटील
नीळकंठराव जगदाळे
दिनेश गुणे
हेरंब कुलकर्णी
अनिल साबळे
अंबरीश मिश्र
आनंद नाडकर्णी
तात्यासाहेब आर. ओ. पाटील
प्रशांत गडाख
विजय पाडळकर
प्राजक्त देशमुख
केदार वैद्य
कल्पना दुधाळ
सतीश भावसार
किशोर मेढे
नितीन आरेकर
पूजा सामंत
जुई कुलकर्णी
मानसी होळेहोन्नूर
जयंती कठाळे
मुकेश माचकर
प्रदीप म्हापसेकर
सविता दामले
रवींद्र पांढरे

मुखपृष्ठ
अच्युत पालव

■

मांडणी । रेखाटणे
सतीश भावसार


*कहो तो डरो कि हाय यह क्यों कह दिया*
*न कहो तो डरो कि पूछेंगे चुप क्यों हो....*

हे शब्द आहेत हिंदीतील ज्येष्ठ कवी विष्णू खरे यांचे! गद्यातली लय शोधत जाणारी त्यांची कविता सर्वस्वी वेगळी आहे. 'पिछला बाकी', 'सबकी आवाज के पर्देमें', 'लालटेत जलाना', 'काल और अवधि के दरमियान' ही त्यांची काही पुस्तके. पत्रकारितेच्या जगातील उल्लेखनीय संपादक म्हणूनही ते ख्यातकीर्त होते. विविध देशी-विदेशी भाषांमध्ये त्यांच्या कवितेचा अनुवाद झालेला असून फिनलँड, हंगेरी, पोलंड इत्यादी देशांचे सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत. नुकताच विष्णू खरे यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांची ही अनुवादित कविता...

# 'तभी'
# विष्णू खरे यांची अनुवादित कविता

## तरीच

चराचर सर्व प्राण्यांचं
आतापर्यंतचं सगळं दु:ख
एकूणात किती असेल हे मी
माझ्या वास्तविक आणि काल्पनिक दु:खावरून
थोडं फार ओळखू शकतो
अन् त्यांच्यावर झालेल्या सगळ्या अन्यायाचं काय?
त्याची अगदीच जुजबी मोजपट्टी म्हणजे
माझ्यावर झालेले अन्याय
किंवा मी केलेले म्हणा हवं तर...
कित्येक करोडो पटीने जास्त होतील
इतकी दु:खं आणि अन्याय
क्षणोक्षणी वाढतंच जातायत!
ते आपल्याला जाणवत असल्याचा पुळका
व गोड गैरसमज पांघरून बसलेला हा मेंदू,
किती दिवस पुरेल आणखी...
पुरेपूर प्रयत्न करतोय...
शेवटपर्यंत त्यांचा विसर पडू नये म्हणून
माझ्यानंतर त्यांची पुरेपूर जाणीव असल्याची
फुशारकी मारणारा एक माणूस तरी
कमी होईल.
तरीही त्यांचा अंत होणार नाही.
म्हणूनच मी स्वत:ला डिवचत राहतो
तोपर्यंत तरी...
काही न काही करीत राहा अवचित!











**अनु. प्रकाश भातम्ब्रेकर**
भ्रमणध्वनी : ९३२४४०९४९०

# काव्यरंग

## घाबरण्याच्या कविता

लिहायचं तर असतंच. जरी मी यापुढं काहीही लिहिणार नाही म्हणालो होतो.
मीच म्हटलं होतं प्रकाशकाला, माझी पुस्तकं बाजारातून काढून घ्या,
आणि जाळून टाका. तुमचं नुकसान मी भरून देईन.
मी घोषित केलं की मी लेखक म्हणून आता मरून गेलो आहे,
माझं नाव असलेलं कोणतंही पुस्तक जगात कुठंही सापडणार नाही.
त्यांनी रस्त्यात फिरणं मुश्किल केलं, घरात थांबणंही कठीणच होतं.
दाराखिडक्यांवर दगडांचा मारा सतत, आग कशी लावली नाही
हातात जळते टेंभे असून, पण लावतीलही, काही सांगता येत नाही,
म्हणून मी मरून गेलो आहे हे मी जाहीर करून टाकलं.
माझं शरीर जिवंत होतं, पण मेल्यासारखाच झालो होतो मी.
भय माझ्या नसानसात शिरलं होतं. स्वतःपेक्षाही बायको आणि मुलं
यांचं काय होणारचं भय...
लिहिताना मला समजलंच नाही की मी माझ्याशी
आतड्याचं नातं असलेल्यांच्या जीवांशी जीवघेणा खेळ खेळतोय.
माझी अक्षरं त्यांचे ललाटलेख ठरू नयेत.
मी घाबरलो; घाबरणं, भिणं हे काहीतरी वाईट आहे
असंच मी समजत होतो. भित्री भागुबाई, डरपोक हे शब्द
कोण सहन करणार, अपमानच असतो, जरी कुणीही कधीतरी
भयंकर भ्यायल्याचा अनुभव घेतलेला असला तरी...
पिढ्याच्या पिढ्या गेलेल्या आहेत
कधी ना कधी घाबरलेल्या. भयानं चळचळा कापणाऱ्या.
अस्मानी असो की सुलतानी असो, संकटं आली की
लोक घाबरतातच. भयाक्रांत होतात. तरी प्रत्येकजण भासवतो की
आपण कशालाच घाबरत नाही.
मला कळलं, घाबरणं हे काय असतं. भयंकर भीती दाटून येणं.
घाबरणं. हातपाय थरथरा कापणं. मला कळलं.
मी माणूसपणाच्या वास्तविकतेपर्यंत पोचलो होतो.
घाबरलेल्या माणसांनीच देवधर्म निर्माण केले
आणि त्या देवधर्माचाच लोकांना घाबरवण्यासाठी उपयोग केला.
सगळे आतून घाबरलेलेच असतात, मग जमावात ते हिंस्र बनतात.
मग मी घाबरण्याच्या कविता लिहिल्या.
नाहीतरी या घाबरवण्याच्या काळात दुसऱ्या कोणत्या कविता लिहिल्या
असत्या?

**वसंत आबाजी डहाके**
भ्रमणध्वनी : ९८९०३६२७०३



रेखाटन : वसंत आबाजी डहाके

## कदाचित्!

देऊन हाक बघ तू, परतेनही कदाचित्
जे जे घडून गेले, विसरेनही कदाचित्!

पाठीस स्पर्श माझ्या– करताच लाजरा तू–
हलकेच कूस माझी, बदलेनही कदाचित्!

लटकीच वादळे ही,... विरतील ना पहाटे?
मी कोवळ्या उन्हात, बिलगेनही कदाचित्!

गाणे तुझे नि माझे गाशील ना कधी तू?
मी सूर एक माझा, मिसळेनही कदाचित्!

येतात क्षण असे की, कोमेजतेच जगणे...
येता–मिठीत तू... मी, बहरेनही कदाचित्!

**सदानंद डबीर**
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०

**प्रयत्न सुरु आहे...**

एक दाढीवाला लेखक
लक्षात राहिला होता

भेटायचा अधूनमधून
कधी छापील अक्षरांमधून
कधी व्याख्यानांमधून
कधीकधी प्रत्यक्षही

कुतूहल वाटायचं
कारण 'सुबोध' हा शब्द
पार निपचितच करून टाकला होता त्यानं
(मनात पुटपुट,
'कुणासाठी लिहित असतात हे असलं...
त्यांचं त्यांना तरी कळत असेल का पुन्हा वाचताना कोण जाणे...')
आणि तरीही
नेमकं काय म्हणायचं आहे त्याला,
काय असावा त्याचा दृष्टिकोन
कुतूहल वाटतच राहायचं

'दुर्बोध' लेखकाला जाणून घ्यायचं असेल तर
वाचकानं दोन पावलं
स्वतःच पुढे यायचं असतं म्हणे!
पण आमची दोनाची दोनशे झाली तरी
त्याचे शब्द आपले ढिम्मच जागच्या जागी

शेवटी आपलीच आकलनशक्ती तोकडी
संवेदनक्षमता कमकुवत ...म्हणून
नाद सोडूनच द्यावा म्हटलं,

पण पुन्हा एका अकल्पित भेटीत
हा गंभीर दाढीवाला
इतका प्रसन्न दिसला
प्रसन्न हसला, जवळच्या मित्रासारखा
मग मनातल्या मनात वजा करून टाकलं,
ते दुर्बोधपण वगैरे
म्हटलं ...
आता तो जुना ग्रह बदलून बघूया तरी
समजतंय का थोडं फार, त्यांनी लिहिलेलं 'ते'

...प्रयत्न चालू आहे!

**उषा मेहता**
भ्रमणध्वनी : ९८३३०८४२८३



**शब्द घेतील**

कुठून यावा असा शब्द ज्याने झगमगेल
ही चिंचोळी-निमुळती वाट.
ज्याच्या नुसत्या नादाने थरथरेल उभी रात
हात जोडून उभी असेल पहाट.
किती समुद्र हेलावताहेत आजूबाजूला.
किती लाटांमागून उसळतात शब्द, लाटा..
सारं खारटपण..कासाविशी करून जातं..
भिजल्याचा सर्वदूर फक्त बोभाटा...
माझ्या मनात हे काहूर.. तुमच्या असेल?
सांगा, बसतात का क्षणोक्षणी आत पीळ?
छान भराऱ्या घालतात तुमचे उनाड राघू
घुमवत जातात रानात शीळ.
जन्माचे मोल द्यावे.. साद घालावी.. शब्दासाठी
दाही दिशांना घुमवून बोल.
तुमचे मात्र 'जय हरी विठ्ठल'..
पुढे दिंडी कोरडे शेत, आटली ओल
नाही देवा!.. आरोप कसले.. आपण काय, साधूसंत?
घेतला नाही कधी हाती टाळ
नदी-नाले एक झाले.. पुरात गेला गाव-शेत जमीन
पिकात उरला शिल्लक गाळ.
अवघड वळण असेल पुढे... चालावे लागणार आहेच
चढणीचे-उतरणीचे कितीक घाट येतील,
नेतील सगेसोयरे.. घालतील गळ्यात गळा
शब्द घेतील बोट हातात
सापडेल आपली वाट!

**वसन्त वाहोकार**



## माणूस होण्याचा इतिहास

संस्कृती नावाचा अजस्र बॅकड्रॉप
लटकवून ठेवला आहे केव्हापासून
त्यावर  कोणाकोणाचे ठसे आहेत
याचा तपास घेतला जातोय
भिंग लावून...
कुठल्या जमिनीखाली कोणती थडगी पुरलीत,
कुणाच्या आक्रमणानंतर कोणाची श्रद्धास्थानं संपली
आणि कोणती उदयाला आली
याचा इतिहास नव्यानं रंगवला जातोय,
त्या अवाढव्य पडद्यावर
एकाच रंगात.
माझ्यातल्या चित्रकाराला सापडत नाही
एकही कोरा कोपरा
जिथे पसरता येतील
माझ्या मनात वहाणारे रंग.
चितारता येईल माणसाचा माणूस होण्याचा इतिहास.
दाखवता येईल जमीन, पाणी, नदी, जंगलं
आणि
संस्कृतीचा प्रवाही पट.
या पडद्यावर साचत चाललेल्या डबक्यातून
उधळला जातोय
एकच रंग
ज्वालामुखीच्या पोटात दडलेल्या लाव्हाचा
तो पसरत गेला या कॅनव्हासवर
तर हळूहळू तयार होतील
गडद लाल रंगाच्या हजारो जखमा,
ज्या भरून येण्यासाठी
पहावी लागेल वाट
विस्मरणात गेलेल्या अहिंसेच्या वारशाची.
माझ्या सोबत असलेला अथांग निळा रंग,
पसरवला या विस्तीर्ण कॅनव्हासवर
तर कदाचित हाती लागतील
हिरवे लाल गडद रेशमी रंग
जे नांदतील निळ्या अथांग डोळ्यांत
जपलेल्या करूणेसोबत!

**नीरजा**
भ्रमणध्वनी ; ९९६९८१०८९६

## कुटुंब



मागीलांच्या पुढीलांच्या नातेसंबंधांचा
निष्कर्ष संदिग्धच आहे
येऊ नये ती वेळ, पुन्हा-पुन्हा येते.
यावीशी वाटते ती, दुरूनच निघून जाते.
कृतक समाधानाला, निगरगट्ट आत्मवंचनेला
सेल्फ अप्रायझल मिळविण्याचा इरसाल
काळ आला...

होते कधी काळी प्रेम, जिव्हाळा, ओढ
मत्सर, असूया, द्वेष, वैरभाव
त्या रंगांत-बेरंगांत आतड्यांचे आर्त होते
आता हृदय फिल्मी गदगदते
पोटातले ओठात येऊच दिले जात नाही
त्यालाच मॅच्युअरिटी म्हणतात

**प्रकाश हरी कार्लेकर**
भ्रमणध्वनी : ९८३३३९१३४४

### तिच्या पर्समधे

खांद्याला भली मोठी पर्स लटकवणाऱ्या
कामकाजी स्त्रीवर
आपला प्रचंड विश्वास आणि आस्था आहे
हायसं वाटतं तिला बघून

या जगण्याशी ती लढायला निघाली असेल
आणि त्यासाठी लागणारी औजारं असतील
तिच्या पर्समधे...

ती आपलं जगणं सावरायला धडपडत असेल
त्यासाठी लागणाऱ्या काड्याकाटक्या असतील
तिच्या पर्समधे...

चिंचाबोरंआवळ्यांसारखी
बारीकबारीक अनवट अवचित अशी
काही सुखं तिला सापडली असतील
ती तिनं जपून ठेवली असतील
तिच्या पर्समधे...

ज्या घरट्यासाठी राबून राबून
तिचा जीव थकून लोळागोळा होतो
तो थकवा असेल
तिच्या पर्समधे

आपलं जगणं जगताना
तिच्या जिद्दीचे तुकडेतुकडेही झाले असतील
तुटले तरी कुठे फेकणार ती या तुकड्यांना?
शेवटी ते आहेत तर
तिच्याच हिंमतीचे तुकडे ना!
पुढे कधीतरी ते कामाला येतील
अशा भरोशानं ठेवले असतील तिनं ते
आपल्या पर्समधे

काहीना काहीतरी असेल
तिच्या पर्समधे
कदाचित
ही जी भोवतालची
अखिल जीवसृष्टी आहे,

तिचा जीव तर नसेल
तिच्या पर्समधे!

**चंद्रशेखर सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८२०१६६२४३



### मित्र मरून गेलाय एक वर्षापूर्वीच

अचानक कळतं की मित्र मरून गेलाय एक वर्षापूर्वीच
आणि आपल्याला कळलंच नाही काही
अचानक कळतं की
आपण वारंवार केलेल्या फोनची रिंग
नुसतीच वाजत राहिली
आणि पलिकडून ऐकूच आलं नाही
त्याचं नसणं
अचानकच कळून जातं
की मरून गेलाय मित्र
मरून गेलंय त्याचं अंतर्बाह्य देखणेपण
मरून गेलाय त्याच्यातला दाहक मनस्वी पक्षी
अचानक कळून जातं
अचानक
की आता कधीच येणार नाहीये तो
रामरतन नावाच्या भल्या माणसा
तू असा कसा काय वागू शकतोस अरे
अचानकच...

### अखेर भ्रम असेच फिटत असतात

अखेर भ्रम असेच फिटत असतात
कसला काटा टोचला असेल तुझ्या जिवड्याला
पडदा जिवंत होतो
मरून पडतो पुन्हा पुन्हा
काळोखाचं थेंब थेंब थारोळं साचतंय आमच्या डोळ्यांत
श्रीदेवी, तुझ्या असण्याचं गारुड
आज सकाळी सकाळी एक दंतकथा बनून गेलंय

**डॉ. प्रज्ञा दया पवार**

### त्रिवेणी

१//
सुईच्या अग्रावर पेलण्याइतकीही
घेऊन जाऊ शकत नाही जमीन

तुझ्या डोळ्यांत पाणी आलं तरी मिळालं सारं

२//
आयुष्यभर सोबत राहूनही
लागत नाही थांग

मनापुढे समुद्रही उथळच

३//
असं कवटाळून बसलं तर सोडत नाही पाठ
कितीही उंच उसळली तरी ओसरतेच लाट

दु:खाला निवू दिलं तरच जमते सुखाची साय

४//
उपवासाचा पवित्र महिना सुरू
घाटित शस्त्रसंधी जाहीर

हरेक दिवस असावा रमजान

५//
बायबल, गीता, कुराण, ग्रंथसाहिबा
सर्वांच्या पानांची केली अदलाबदल

बदलले नाही कुठल्याच धर्माचे सार

६//
आयुष्य टोकदार करण्याच्या नादात
तासत राहिलो पेन्सिलीसारखं

समजलंच नाही कधी गंजलं नात्यांचं ब्लेड

**गीतेश शिंदे**
भ्रमणध्वनी : ९८२०२७२६४६



### मी उभा आहे

मी जमिनीत पाय घट्ट रूतवून उभा आहे
मी आकाशाकडे हात फैलावून उभा आहे
माझ्या पायांना पांढरीशुभ्र मुळं फुटली आहेत
माझ्या शरीरभर हिरव्या फांद्या उगवल्या आहेत
माझ्या हातांना कोवळी पालवी फुटली आहे
माझ्या बोटांवर वेल्हाळ फुलं उमललेली आहेत
ऊन–वारा–पाऊस या सगळ्या ऋतूंना खांद्यावर घेऊन
मी जमिनीत पाय रूतवून उभा आहे!

माझी खात्री आहे की
आता लवकरच मला हवा असलेला मंतरलेला पक्षी येईल
माझ्या फांदीवर बसेल
झोका घेईल
आणि मुक्तपणे गाईल
माझ्या यशाचं उत्सवगाणं.

मी जमिनीत पाय घट्ट रूतवून उभा आहे!

**प्रशांत असनारे**
भ्रमणध्वनी : ९७६३७१४३०४

### त्यांचा मी आभारी आहे



त्यांचा मी आभारी आहे
जंगलझाडीत उत्क्रांत होताना
आदिम वेणा भोगणाऱ्या आदिमानवांचा

चाक घडवण्याचे
पहिले पाऊल उचलणाऱ्या चक्रवर्तीचा
सर्जनाच्या दिशेनं पहिलं पाऊल
टाकणाऱ्या मानवांचा
नागर संस्कृतीचा पाया उभारणाऱ्या
हडप्पा संस्कृतीचा

धरणीची माया अन् झाडाची छाया
देणाऱ्या जन्मदात्या मायचा

पाषाणाचा कणखरपणा देताना
स्वतः सालं महिने काढले अन्
मला शाळेत धाडलं त्या बापाचा

हागेस्तोवर मार देऊन
शाळेचा उंबरठा दावणाऱ्या
संबोधीशी मैत्र घडवणाऱ्या त्या मोठ्या बापाचा

ज्यांनी माझ्या हाडामांसाच्या वाढीसाठी
हातभार लावला त्या नात्यांचा

बोबड्या बोलाची घडी उकलताना
उठून पडताना, पडून उठताना
बोट धरले त्या जिवंत गावाचा

नदीची माया देऊन
प्रसंगी डोक्याला डोकं लावून
शिकण्याची आस लावणाऱ्या मास्तराचा

जे मी उदरभरण करतो
ते अन्न पिकवणाऱ्या साऱ्या कृषकांचा
फाटक्या वस्त्राने कापूस पिकवणाऱ्या
ऊन-वाऱ्यात राबणाऱ्या शेतमजुरांचा
रात्रपाळीत घर हरवून
गिरणीत काम करणाऱ्या कामगारांचा
घाणीला स्वच्छतेची रंगसफेदी करणाऱ्या
तमाम सफाई कामगारांचा

माझ्यासाठी ज्यांनी-ज्यांनी जे जे केलं
त्यांचा मी मनापासून आभारी आहे

हा भार उचलणारे जे काही आहात
ते आपण सगळे आहात
तुम्हीच सगळे मिळून हे जग चालवित आहात
मीही काहीतरी केलं पाहिजेत
रस्त्यातला अडथळा उचलून फेकला पाहिजे!

**मोहन शिरसाट**
भ्रमणध्वनी : ९४२१०५१८२३

### निंदतांना ओल थोडी

निंदतांना ओल थोडी जशी लागते हाताला
माती घुसळून घेते लाख अनोख्या गोताला.

किती खाऊन पिढ्यांना रोज पोसते ही माती
माती आडच्या जीवांना माती सामावून घेती .

उपजावु मृत्तिकेचा कोणी घोटतोय गळा
माती ऐकताच  फुटे कुणा लाख कळवळा!

लेक मातीच्या गुणाची लाख उलंगतो जीव
मनी फुलते उन्हात तिच्या हिरवे लाघव .

मातीविणा सुख नाही इथे कुणाही जीवाला
सर्जनाचे सुख लाभो ओल्या मातीच्या कणाला!

**कैलास दौंड**
भ्रमणध्वनी : ९८५०६०८६११

**चेकमेट**

अचानक कसला हा गोंगाट
कुणी मारला दगड मधमाश्यांच्या पोळ्यावर
हा जीवघेणा कल्लोळ, किंकाळ्या, खळ्ळ-खट्याक
लाट्याकाठ्याचे आवाज, बंदुका ठो...ठो

मी ओढून घेते झट्कन खिडकीचं तावदान
जीव गोळा करून बसते
पिंजऱ्यात बंद असलेल्या
उंदरांसारखी... हताश

काही वेळाने
शेत फस्त करून
उडून जावी टोळधाड तशी नीरव शांतता
मी किलकिलं करते तावदानं
दिसतो धुरच धुर-आकाशपूर
धुमसणाऱ्या ज्वाळा
झिजोंडून टाकणारा उग्र दर्प
कळत नाही नेमकं काय जळतंय बाहेर
गाड्याचे टायर्स?
माणसाचं मांस?
का मधाचा पोळा?

रस्त्यावर तुटून विस्कटून पडलं आहे
चपला-ओढण्या-टोप्या-झेंडे, दगड-सळ्या
अन् रक्तमांसाचे लचके
माणूस दिसत नाही दूरवर कुठे
आत शिरणारा धुर-धुळ आणि धाक तेवढा!

गच्च लावून दारे घराची
मी पळत सुटते बेडरूममध्ये
ओढते पांघरूण डोक्यावरून
थडथडत राहते नुसतीच पडून...

सकाळी...
उजेड असतो सगळीकडे रोजच्यासारखा
असतो पेपरवाला, दुधवाला, रिक्षावाला
कालच्या रस्त्यावरून धावताहेत गाड्या सराईत
रस्ता बिलकुल साफ

आताशा घरात शिरताना.
सतत भास होतो मला की



रस्त्यावरच्या रक्तमांसात लडबडलेल्या
पावलांचे दुर्गंधी ठसे
उमटत जात आहेत
माझ्या बेडरूमपर्यंत थेट नि
कुणीतरी खिदळत म्हणतंय 'चेकमेट'

**उषा परब**
भ्रमणध्वनी : ९४२३८१८८२८

**गझल**

संध्याकाळी दाह उन्हाचा...

संध्याकाळी दाह उन्हाचा सरतो आहे!
मित्र खरोखर कोण आपुला कळतो आहे!


दूरध्वनीवर 'कोण बोलते?' विचारल्यावर...
नात्यामधला स्वर परकासा सलतो आहे!

किती अजुनही लवचिक भिंती कुटुंबात या
एकच छप्पर म्हणुनी तर 'घर' म्हणतो आहे.

जरी सजवतो देह आपुला... कळते आतुन
खोल तळाशी मन-मासा तडफडतो आहे.

'थोडे जगणे कळते का हो वय झाल्यावर?'
कुणास ठाऊक मीच कसा डळमळतो आहे!

**प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८९२५३२७९५



### जे निरूपयोगी ते नामशेष झाले

जे धट्टेकट्टे त्यांच्या मानेवर जू आले
अर्थात नंतर त्यांचे ही आंड ठेचले गेले
इथे हरेकाला वापरले गेले
नंतर यथावकाश फेकून देण्यात आले

जे वाहायचे ओझी मणामणाची
ते तगले काही काळापुरते
पण मग यंत्र आले आणि यांची उपयुक्तता संपली

जे देतात दूध वा अंडी आणि मांस
तेवढेच जतन केले गेले

आता उरलेले आहेत
एकमेकांच्या रडारवर

तेच उरतील
जे जे सरपटतीत, रांगतील, घुटमळतील
तपासून घेतले जातील
त्यांचे दात आणि नखे ... अधूनमधून
आणि ठेवले जातील
सी सी टी व्ही च्या कक्षेत
नजरेच्या टप्प्यात

आधी श्वापदं गेली ... माणसं उरली
आता ती माणसं ही जातील ज्यांच्या आत
थोडाफार माणूस शिल्लक आहे

ज्यांच्या आत आहेत श्वापदं
तेच आणि फक्त तेवढेच उरतील!

**संजय चौधरी**
भ्रमणध्वनी : ९३७०११६६६५

### काही तुकडे पावसाचे

हातात घेतलेला हात सोड....
मला दोन्ही हातांनी
झेलायचा आहे पाऊस!

शहरभर कोसळतोय चिखलाचा पाऊस
पाणी प्यायला नाहीत झाडं
माळरानावरील झाडांची मुळं
शहराच्या दिशेनं पसरू लागलीत.

आभाळाची फाटलीय छाती
मी तुझ्यावर धरलीय छत्री
पावसात पुरता ओलाचिंब झालोय
अन
कोरडी ठणठणीत असूनही
तुझ्या डोळ्यांत पाणी?

पावसाच्या गळ्यात अडकलं हिरवं गाणं
तसंच तुझं हुंदका गिळून माझ्याकडं हसत पाहणं

दैवी संकेताचा अर्थ लावण्यात
मला नाही कसलाच रस
भर उन्हात पावसाचा झाला शिडकावा
अन् तू मला
आडोसा शोधताना लगबगताना दिसलीस.

**भगवान निळे**
भ्रमणध्वनी : ९७०२१४६८८०/९०८२६०२८०९

किरण येले

# स्त्री समजून घेताना...

**स्त्रीत्वाचा सातत्यपूर्ण शोध घेण्याचा प्रयत्न जगभरात अनेक अभ्यासकांनी-कलावंतांनी आजवर केला. तिच्या शरीर-मनाची रहस्यं मानसशास्त्रज्ञांकरताही आव्हानात्मक ठरली. स्त्रीत्वाच्या पाऊलखुणांचा हा अनेकांगी वेध...**

जपानी भाषेत एक म्हण आहे, की 'एका नदीत तुम्ही दोन वेळा पोहू शकत नाही.' प्रत्येकवेळी ती नदी वेगळी असते. नदी म्हटल्यावर तुमच्या नजरेसमोर पाण्याने भरलेलं पात्र आलं असेल, त्यातला प्रवाह, प्रवाहातल्या होड्या आणि हिरवागार काठ आला असेल, पण हे नदीचं बाह्यरुप आहे आणि बाह्यरुप म्हणजे नदी नाही. बाईचंही तसंच. बाई म्हटल्यावर आठवतं ते तिचं बाह्यरुप, पण बाह्यरुप म्हणजे बाई नाही. नदीप्रवाहात उतरल्यावर मिळणारं सुख शब्दात सांगता येत नाही. तो फक्त अनुभव असतो, जो मिळवण्यासाठी नदीत उतरावं लागतं. तसंच बाई समजून घेण्यासाठी बाई बनावं लागतं. ती अशी का वागते याचा विचार करावा लागतो. मोठ्या गोष्टी सोडून द्या, बायका खूप बोलतात असं लोक म्हणतात आणि ते खरंही आहे. बायका इतक्या का बोलतात? तुम्ही पाहिलंय की रिसेप्शनिस्ट आणि टेलिफोन ऑपरेटर पदासाठी बाईलाच प्राधान्य दिलं जातं. अनेकांच्या मते बाईचा आवाज गोड असतो म्हणून तिला अशा पदांवर निवडलं जातं पण तसं नाहीय. त्यामागे अनेक शास्त्रीय कारणे आहेत.

डिसेंबर २०१३ मध्ये एका संस्थेनं केलेल्या सर्वेक्षणात लक्षात आलं की स्त्री आणि पुरुषं दोघांच्या मेंदूची संरचना सारखी असली तरी स्त्रियांच्या मेंदूत संदेशवाहिन्यांचं जाळं मेंदूच्या डाव्या आणि उजव्या बाजूस अधिक प्रमाणात असतं तर पुरुषांच्या मेंदूमध्ये ते मेंदूच्या पुढील आणि मागील बाजूस असते. पुरुषांचा मेंदू डाव्या बाजूचा अधिक वापर करतो तर स्त्रियांचा मेंदू दोन्ही बाजूंचा कारण स्त्रियांच्या मेंदूमधील कॉर्पस कॉलोसम मोठा असतो. 'कॉर्पस कोलोसम' म्हणजे उजव्या आणि डाव्या भागांना जोडणारं वाहिन्यांचं जाळं! हे जाळं संदेशवहनाचं काम करतं. दोन भागातील संदेशात असंतुलन झाल्यास डिस्लेक्सीयासारखे आजार होतात. स्त्रियांचा मेंदू पुरुषांच्या तुलनेत आठ टक्क्यांनी आकाराने लहान असतो, मात्र त्यातील वाहिन्यांचं जाळं पुरुषांच्या तुलनेत अधिक असतं. त्यामुळे परिस्थितीचं आकलन स्त्रिया चांगल्या प्रकारे करतात तर परिस्थितीनुसार निर्णय घेणं पुरुषांना चांगलं जमतं. पुरुषात एकावेळी एकच काम पूर्ण करण्याचं कसब असतं तर स्त्रियांमध्ये एकाचवेळी अनेक कामे करण्याचं कौशल्य असतं. यामुळेच सामाजिक क्षेत्रात जनसंपर्क, वर्तन आणि कार्यात स्त्री पुरुषापेक्षा अधिक उजवी असते.

आपल्या मेंदूमध्ये 'लिंबिक सिस्टीम' आणि 'इन्फेरियर परेटल लोबल' असे दोन भाग असतात. लिंबिक सिस्टीम



या वाहिनीसदृश भागामुळे, घटना, स्थळ, काळ वस्तूंसंदर्भातील विचार, भावना, हळवेपणाची नोंद होते. स्त्रियांच्या मेंदूतील 'लिंबिक सिस्टीम' पुरुषांच्या तुलनेत मोठी असते. त्यामुळे त्यांना जन्मतारखा, घटना, वार वगैरे गोष्टी ठळकपणे लक्षात राहतात. या उलट 'इन्फेरियर परेटल लोबल' (IPL) हा भाग पुरुषांच्या मेंदूत स्त्रियांच्या मेंदूपेक्षा मोठा असतो. संख्याविषयक कार्य करणाऱ्या या आयपीएलमुळे पुरुष गणिती कार्य अधिक कौशल्याने करतात असं विज्ञान सांगतं.

भाषेच्या बाबतीतही स्त्रियांच्या मेंदूची घडण अशी असते की त्यांचा ओढा शब्द आणि आवाज यांकडे अधिक प्रमाणात असतो. त्यामुळे आवाजातील अनेकार्थ स्त्रिया अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतात. बाईला दुसऱ्यासाठी जगण्याची सवय एवढी झालेली असते की ती अगदी तिच्या साडीचा रंगही निवडते तो दुसऱ्याला कसा वाटेल याचा विचार करूनच. तुम्ही पाहिलं असेल स्त्रिया जेव्हा साडीच्या दुकानात जातात तेव्हा त्यांच्यासोबत मैत्रीण, आई, बहीण, मित्र असं कुणीतरी असतं. मग खूप वेळ त्या साडीचे रंग, पोत पाहत चर्चा करतात आणि पसंत पडलेली साडी खांद्यावर टाकून सोबतिणीला विचारतात, ''ही साडी कशी दिसते?'' या उलट खांद्यावर शर्टपीस टाकून मित्राला, ''कसा दिसतोय हा पीस?'' विचारणारा पुरुष मी तरी आजवर पाहिलेला नाही. नवी साडी नेसल्यावरही ती हमखास विचारते, ''कशी दिसतेय?'' पुरुष नाही. एखादा दागिना अंगावर चढवल्यावरही ती मैत्रिणीला विचारते, 'कसा दिसतो गं?' लग्नाआधीही वाग्दत्त वधूचा फोटो दाखवत पुरुष मित्राला म्हणेल, ''ही माझी होणारी बायको.'' मात्र तीच बाई असेल तर आपल्या होणाऱ्या नवऱ्याचा फोटो दाखवत ती मैत्रिणीला विचारेल, ''कसा वाटला?'' म्हणजेच पुरुष स्वत:ची कृती सांगतो, बाई आपल्या कृतीविषयी मत विचारते.

स्त्री आणि पुरुष हे समाजाचे दोन घटक आहेत आणि दोन्ही महत्त्वाचे आहेत आणि दोघांनी एकमेकांना समजून घेतलं तरच सृजन आहे. खूप जणांचं मत असतं की स्त्री-पुरुष या दोघांत स्त्री

सुंदर आहे, पण तुम्ही कधी नीट पाहिलं तर काय दिसतं. माझ्या 'बाईच्या कविता' संग्रहात एक कविता आहे.

*आई न् माझा नेहमी वाद चालायचा*
*ती म्हणायची बाई सुंदर*
*मी म्हणायचो पुरुष;*
*ती म्हणायची ती पृथ्वी, ती नदी, ती नक्षत्रे*
*मी म्हणायचो तो सूर्य, तो समुद्र, तो पाऊस*
*तसं ओठातलं हसू*
*पदरात लपवत ती म्हणयाची,*
*मग तो कचरा.*
*मत मी उदाहरणं द्यायचो-*
*मोर-लांडोरात मोर सुंदर;*
*हरिण-हरिणीत हरिण सुंदर;*
*कोंबडा-कोंबडीत कोंबडा तुर्रेदार;*
*घोडा-घोडीत घोडा ऐटदार;*
*गाय-बैलात बैल झोकदार;*
*सिंह-सिंहिणीत सिंह डौलदार;*
*पारवा घुमतो आणि कोकिळा नाही कोकीळ गातो*
*तसं मध्येच हात करत थांबवायची,*
*''तसं असेल तर*
*जगात स्तन नसलेले पूर्ण पुरुष फक्त दोन*
*एक अर्जुन आणि दुसरा घोडा*
*हसू लपवत आई म्हणायची*
*आणि वडिलांची नजर चोरत*
*डाव जिंकल्यासारखी उठायची.*
*त्या नेमक्या क्षणी*
*आई खूप सुंदर दिसायची*
*आणि वडील रुबाबदार.*

'व्हाय जेंडर मॅटर्स' ग्रंथाचे लेखक लिओनार्ड सॅक्स यांच्या मते पुरुषांच्या डोळ्याचा रेटिना जाड असतो. यातील 'मॅग्रोसेल्यूलर' (एम) आकाराने मोठे आणि रेटिनाभर पसरलेले असतात. या सेल्समुळे अस्थिर आणि वेगात हलणाऱ्या गोष्टींचे आकलन लगेच होत असतं, तर स्त्रियांच्या डोळ्यांचा रेटिना पातळ असतो. त्यात 'परवोसेल्यूलर' (पी) सेल्स अधिक असतात जे आकाराने छोटे आणि रेटिनाच्या मध्यभागाभोवती एकत्रित झालेले असतात. यामुळे रंग आणि पोत यांचे आकलन अधिक चांगले होते. यामुळेच हातरुमालापासून चपलांपर्यंत स्त्रियांच्या सगळ्या वस्तूंवर नक्षीकाम आणि रंग असतात. खरेदी करताना स्त्रिया नक्षी, रंग आणि पोत आधी पाहतात, मात्र पुरुष वस्तूंचा स्तर पाहतो.

'द फिमेल ब्रेन' या ग्रंथात लूॲन ब्रिझेन्डाईन या अमेरिकन न्यूरोसायकॅटिस्ट लिहितात, ''मेंदूच्या मध्यभागी भाषा आणि रव यांच्याप्रती कार्य करणारे न्यूरोन्स स्त्रियांमध्ये पुरुषांच्या तुलनेत अकरा टक्क्यांनी अधिक असतात. यामुळेच एखाद्याच्या बोलण्यातली खोच किंवा खोचक बोलणं पुरुषापेक्षा स्त्रीला अधिक चांगलं कळतं याच बरोबर कुणाशी बोलताना आपल्या स्वरात कोणता बदल करावा हे पुरुषापेक्षा स्त्रीला अधिक जमतं. आपण नाटक सिनेमामध्ये एक प्रसंग अनेक वेळा पाहत असतो, ज्यात बाई काही सांगत आहे आणि नवरा तिच्या बोलण्याकडे लक्ष न देता वर्तमानपत्र वाचत आहे. शेवटी कंटाळून ती म्हणते, ''हे नेहमीचं आहे तुमचं. मी काय बोलते त्याकडे तुमचं लक्षच नसतं.'' काय कारण असेल यामागे?

विज्ञान सांगतं की पुरूषाचा मेंदू नकोसे आवाज 'नकोसा पुनरुच्चित स्वर' म्हणून नोंद करतं आणि मग त्या स्वरांचा मेंदू आणि मनावर परिणाम होत नाही. परिणामत: तो आवाज सुरू झाल्यावर पुरुष गप्प राहतात किंवा प्रतिसाद देत नाहीत. नेदरलँडमध्ये एक प्रयोग केला गेला आणि त्यात १७ ते २५ वयाच्या मुलामुलींना 'व्हाईट नॉईज' आणि संगीत ऐकवलं गेलं. 'व्हाईट नॉईज' म्हणजे एकाच लयीतला स्वर. हे स्वर ऐकवल्यावर दिसलं की मुलींच्या मेंदूने दोन्ही आवाजांना समान प्रतिसाद दिला होता तर मुलांच्या मेंदूने पुनरुच्चित स्वराला देतात तसा प्रतिसाद दिला होता.

एका मजेदार सर्वेक्षणात काही गोष्टींचा निष्कर्ष आला तो असा की कोणतं वस्त्र नेसावं या गोष्टीवर विचार करण्यात स्त्रियांनी घालवलेल्या वेळेची मोजदाद केली तर तो एकूण काळ त्यांच्या आयुष्यातील किमान एक वर्षाइतका भरेल. स्त्रिया वर्षात तीस ते चौसष्ट वेळा रडतात तर पुरुषांच्या बाबतीत हेच प्रमाण वर्षात सात ते सोळा वेळा असं आढळून आलं. विज्ञान सांगतं की स्त्रियांचं हृदय पुरषांपेक्षा दुप्पट वेगात चालतं तसंच त्यांच्या पापण्याही पुरुषाच्या दुप्पट लवतात. त्यांच्या जिभेवर चव ओळखण्याच्या पेशी पुरुषांच्या जिव्हेवर असणाऱ्या पेशींपेक्षा जास्त प्रमाणात असतात. त्यांची त्वचाही पुरुषांच्या त्वचेपेक्षा संवेदनाशील असते. असं आढळून आलं आहे की स्त्रीला हाक मारली तर ती हाकेच्या दिशेने मान वळवते परंतु पुरुषाला कुणी हाक मारली पुरुष त्या हाकेच्या दिशेनं पाहताना मानेसोबतच त्याचे खांदेही काहीसे वळतात.

याच सर्वेक्षणात काही गंभीर गोष्टीही समोर आल्या. पुरुषामध्ये हृदयविकाराचं प्रमाण अधिक आढळून आलं तर स्त्रियांमध्ये नैराश्य, अपचन आणि खांदेदुखी वा मानदुखीचं. मासिक पाळीमधील आयुष्याची मोजदाद केली तर स्त्रिया आयुष्याची जवळपास चार वर्षे मासिक पाळीमधल्या वेदना सहन करतात. यापेक्षा गंभीर बाब अशी की सर्वेक्षणात असं आढळून आलं की जगभरात दरवर्षी सरासरी पाच हजार मुली स्त्रिया घराण्याला कलंक लावला म्हणून मारल्या जात आहेत आणि सन २०१२ मध्ये मारल्या गेलेल्या स्त्रियांपैकी जवळपास अर्ध्या स्त्रियांचे खून जोडीदारांनीच केले होते.

डॉक्टर ब्रिझेंडाईन त्यांच्या 'द फिमेल ब्रेन' पुस्तकात लिहितात की मेंदूतील या 'लिंबिक सिस्टीम'मध्ये 'अमिग्डेला' नावाचा एक भाग असतो ज्यामुळे उत्सुकता, ओढ, हक्क यासारख्या भावनांचं संप्रेषण म्हणजेच वहन होतं. खूप ताण आल्यावर या अमिग्डेलातून झालेल्या संदेशवहनामुळे पुरुष प्रणयोत्सुक होतो किंवा त्या ताणातून

मुक्त होण्यासाठी प्रणयाचा मार्ग निवडतो. याउलट खूप ताण असेल तेव्हा याच अमिग्डेलामुळे स्त्रियांच्या मनात प्रणयविचार नाकारले जातात. अशावेळी कोणताही प्रणय तिला ऑरगॅजमचा अनुभव देऊ शकत नाही.

याच पुस्तकात ब्रिझेंडाईन लिहितात की पुरुष त्याच्या नजरेसमोरच्या दृश्यामुळे प्रणयोत्सुक होतो तर स्त्रियांसाठी गंध, स्पर्श आणि परिसर यांचं महत्त्व प्रणयाराधन कल्पनेत अधिक असतं. कदाचित यामुळेच त्या अवस्थेत स्त्रीचे डोळे मिटले जात असावेत. स्त्रीचं डोळे मिटणं, वास्तव जगताना आत-आत हरवत जाऊन मनातल्या स्वप्नात्म प्रदेशात तर ती एकरुप होणं तर नसेल? म्हणजे त्या वास्तव क्षणात स्त्री स्वप्नात जगण्याचा प्रयत्न करत हरवत जाते तर याउलट पुरुष आतापर्यंतचं स्वप्नात्म जगणं विसरून समोरचं दृश्य डोळ्यांत साठवण्याचा प्रयत्न करत राहतो. स्त्रीला त्याचा केअरिंग स्पर्श महत्त्वाचा वाटतो म्हणूनच मिलनानंतरही स्त्रीला पुरुषाच्या कुशीत पडून राहावं असं वाटतं.

जर्मन वंशाची अमेरिकन स्त्री शास्त्रज्ञ शेरी हाईट यांनी १९७०च्या दशकात 'सेक्शुअल ऑनेस्टी बाय वूमेन, फॉर वुमेन', 'वूमेन फॉर लव्ह' आणि 'द हाईट रिपोर्ट' या प्रबंधांतून स्त्रियांच्या प्रणयेच्छांवर भाष्य केलं. त्यात त्या लिहितात, 'प्रणयादरम्यान बहुतेक स्त्रियांना ऑरगॅजम लाभत नाही, पण ऑरगॅजम किंवा कामपूर्ती हे स्त्रीचे लक्ष्य नसतं तर प्रेम आणि जवळीक हे स्त्रीचं उद्दिष्ट असतं.' त्यामुळे ऑरगॅजम न मिळताही स्त्री समाधानी असते. तर ज्यून रेनिश ही स्त्री शास्त्रज्ञ लिहिते, 'स्त्रीला पुरुषाच्या लैंगिक अवयवांचं आकर्षण नसतं. त्यांच्या लांबी-रुंदीचंही तिला आकर्षण नसतं. तिची कामपूर्ती त्यावर अवलंबून नसते तर भावनिक संबंध आणि शारिरिक जवळिकीतून मिळणारा विश्वास तिच्यासाठी महत्त्वाचा असतो.

'द मोराल ॲनिमल', या ग्रंथात लेखक रॉबर्ट राईट लिहितात की पुरुषाच्या प्रणयकल्पना दृश्यात्म असतात तर स्त्रीच्या स्वप्नात्म. त्यावेळी पुरुष स्वत:च्या अनुभवाशी केंद्रित झालेला असतो आणि स्त्री चराचराशी. आपल्याकडे गंमत अशी झाली आहे की प्रतिगामी लोकांनी स्त्रीला दासी बनवून ठेवलं आणि काही खोट्या पुरोगामी लोकांनी तिला देवी बनवून ठेवलं. त्यामुळे मग जसे प्रतिगामी लोकांनी तिच्यावर निर्बंध घातले तसंच 'तू देवी आहेस' असं म्हणून दुसऱ्यांनीही तिच्यावर देवासारखं वागण्याची बंधनं घातली आणि तिचं माणूसपणच हरवलं. माणूसपणच नाकारल्यानं तिनं मोठ्यानं हसू नये, मोठ्यानं बोलू नये याबरोबरच शरीराचं मागणंही कधी बोलू नये हे संकेत रुढ झाले आणि तिचा कोंडमारा झाला. म्हणजे एकीकडे आपल्या पूर्वजांनी तिला सांगितलं की 'तू भोजनेषु माता आणि शयनेषु रंभा' असं वाग पण त्याच वेळी तिनं शरीराचं काही बोलणंही निषिद्ध ठरवण्यात आलं, पण शरीराच्या गरजेपेक्षा तिला जास्त गरज जिव्हाळ्याने केलेल्या स्पर्शाची आहे. नेदरलँडमध्ये एका संस्थेतर्फे सर्वेक्षण केलं गेलं ज्यात स्त्री-पुरुषांना एकच प्रश्न विचारला गेला. प्रश्न होता, 'टायटॅनिक सिनेमातील तुम्हाला अतिशय आवडलेलं एकच दृश्य विचारलं गेलं तर तुम्ही कोणतं दृश्य सांगाल?' पुरुषांना जेव्हा हा प्रश्न विचारला गेला तेव्हा बहुतांश पुरुषांनी, टायटॅनिक बोट समुद्रात बुडताना मधून तुटते ते दृश्य स्मरणात असल्याचं सांगितलं, पण हाच प्रश्न स्त्रियांना विचारला गेला तेव्हा त्यांनी नायक टायटॅनिकच्या डेकवर नायिकेला घेऊन जातो आणि तिला बोटीच्या टोकावर उभं करत तिचे दोन्ही हात पंखासारखे पसरवतो, हे दृश्य आवडल्याचं सांगितलं कारण या दृश्यात नायक नायिकेला बोटीवरल्या सगळया गर्दीतून बाहेर काढत बोटीच्या डेकवर आणतो आणि तिला त्या डेकच्या टोकावर उभं करत तिचे दोन्ही हात पंखासारखे हळुवार पसरवतो. तो तिला जगाच्या गर्दीतून बाहेर काढत उंच टोकावर नेतो आणि संपूर्ण आकाश मोकळं करून देण्याच्या अनुभव देतो, पण त्याचवेळी तो तिच्या पुढे राहून तिला मार्गदर्शन करत नाहीय. तिच्या शेजारीही तो उभा नाहीय तर तिच्या मागे उभा राहत त्यानं तिच्या कंबरेतून धरलं आहे. हा प्रेमाचा अविष्कार असला तरी तिला संकटकालीन स्थितीत सावरण्याचा विश्वास आहे परंतु बाईला भोगवस्तू म्हणून सगळ्याच देशात पूर्वापार काळापासून पाहिलं गेलंय. आज स्त्री विविध क्षेत्रात आघाडीवर आणि मोठमोठ्या पदांवर कार्यरत असली तरी समाजाच्या मानसिकतेत अजूनही फारसा फरक झाला आहे असं वाटत नाही.

**- किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com

ग्रंथाली

**किरण येले** लिखित
**मोराची बायको**




**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत ११० रुपये**

किरण येले यांच्या कथेतील पात्रे सर्वसामान्य स्तरावरची आणि विशिष्ट परिस्थितीत कुंचबलेली, असहाय्य असली, तरी ती काठाला लागण्यासाठी सकारात्मकतेने धडपडताना दिसतात. एखाद्या पीतस्फटिकातून पिवळ्या रंगाच्या असंख्य छटा निर्माण होतात, तसा विविध स्तरांवरील माणसांच्या, स्त्री-पुरुषांच्या कथा सांगणारा 'मोराची बायको' हा कथासंग्रह एक अनोखा 'टोपाझ' आहे.

**- आनंद अंतरकर**

वंदना महाजन

# पुरुष समजून घेताना...

**अनेकदा समानतेचा आणि अगदी स्त्रियांच्या लैंगिक, शारीरिक मानसिक सगळ्याच गरजांचा आवाजी पुरस्कार करणारे पुरुषही पक्के मनुवादी असतात आजूबाजूच्या सगळ्या पुरुषी गजबजाटात बाईला स्वत:ला सिद्ध करण्यासाठी झगडावेच लागते.**

'पुरुष समजून घेणे' ही एका स्त्रीसाठी आव्हानात्मक प्रक्रिया आहे. पुरुष समजून घेणे म्हणजे काय तर माणूस समजून घेणे. माणूस म्हणून एखाद्याला समजून घेणे ही प्रक्रिया स्त्री आणि पुरुष दोघांच्या बाबतीत सारखीच लागू होते. असे असले तरी लिंगभेद मानणाऱ्या व्यवस्थेत पुरुषाला समजून घेताना किंवा स्त्रीलाही समजून घेताना त्याच्या जडणघडणीची प्रक्रिया समजून घ्यावी लागते. अर्थात या जडणघडणीत परत धर्म, वर्ण, वर्ग, जात या सगळ्याचा वाटा आहेच आणि यातून सुटका करून घेत किंवा या संकल्पनांनी ठरवून दिलेल्या चौकटीत स्वतःच्या शारीरिक आणि मानसिक गरजांचा विचार स्त्री आणि पुरुष दोघेही करीत असतात. पुरुषांसाठी या गरजांची परिपूर्ती अधिक मोकळी असते. स्त्रियांना मात्र अनेकदा दमनाचाच अनुभव येतो. यामुळेच एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया अधिक जटिल होते. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, कौटुंबिक आणि अगदी वैयक्तिक पातळीवर वावरणारा पुरुष हा त्या-त्या संकल्पनांमध्ये बद्ध झालेला दिसतो. सगळी व्यवस्थाच पुरुषसत्ताक असल्यामुळे तो प्रत्येक पातळीवर आक्रमक असतो. या प्रत्येक पातळीवर वावरणाऱ्या पुरुषांची त्या त्या पातळीवर निर्विवाद सत्ता असते. याचा परिणाम वैयक्तिक पातळीपर्यंत होत असतो. वैयक्तिक पातळीवर बाईचा जो पुरुषाशी संबंध येतो तो बाप, भाऊ, नवरा, नातेसंबंधातील पुरुष, सहकारी पुरुष आणि मित्रांशी येतो. या प्रत्येक नातेसंबंधात जशा बाईच्या भूमिका साचेबंद आहेत तशाच पुरुषांच्याही भूमिका साचेबंद आहेत. या भूमिका जशा बाईवर बंधनकारक होतात तशा त्या पुरुषावरही बंधनकारक असतात. या ठरीव भूमिकांमध्ये बाई अधिक कोंबली जाते. प्रत्येक नात्यात तिला त्याच्या आवडीनिवडीनुसार स्वत:ला घडवावे लागते. परत हे वैयक्तिक अनुभव सार्वत्रिक करण्याची परवानगी व्यवस्था देत नाही. 'पर्सनल इज पॉलिटीकल' हे स्त्री चळवळीचे एकेकाळचे घोषवाक्य आपण आजही घोकत असलो, तरी बाईच्या 'पर्सनल' जगण्यातलं 'पॉलिटिक्स' दडवून ठेवले जाते कारण ते उघड केले तर कितीही बोल्ड बाई असली तरी तिचीही अब्रू धुळीस मिळते अशी सामाजिक मान्यता कार्यरत असते. बाई शेवटी याच सामाजिक परिवेशात जगत असते. आपल्या समाजाचा आणि कुटुंबाचा ढाचाच वैचारिक दृष्टीने एवढा कमकुवत आहे, की येथे बाई शेवटी बाईच राहते. तिची अब्रू म्हणजे काचेचे भांडेच मानले जाते. त्यामुळे त्याला तडा गेला की बाई संपलीच, अशा भ्रामक कल्पना खूप लोकप्रिय असतात. बाईविषयीच्या शारिरिक आणि मानसिक अधिकारांविषयीची



पुरुषी नकारात्मकता आजही तेवढीच तीव्र आहे. त्यामुळे बाई आणि पुरुष दोघेही आपल्या शारिरीक आणि मानसिक गरजा एकतर दडपून टाकतात किंवा त्यांना त्याची जाणीवच होत नाही, कारण चौकटीतल्या जगण्यात ते इतके गुरफटून जातात की यापेक्षा काही वेगळे जगता येऊ शकते याचा विचारच संभवत नाही आणि जे वेगळा विचार करून त्या पद्धतीने आयुष्य जगण्याचा प्रयत्न करतात ते आजही समाजाच्या दृष्टीने बहिष्कृत ठरतात. समाज कायम त्यांना वेगळ्या नजरेने बघत असतो. त्यात बाईला आयुष्याला भिडण्याचा आणि मनाप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे हेच व्यवस्थेला मान्य नाही. यामुळे स्त्री आणि पुरुष दोघेही चाकोरीबद्ध जगत राहतात. या जगण्यातली मोकळीक हरवलेली असते म्हणून कोणत्याही नात्यातला पुरुष कधीही पूर्णत्वाने समजून घेणे बाईसाठी दुरापास्तच होते कारण स्त्री-पुरुष नाते हे ठरवून दिलेल्या चौकटीतच समजून घेणे बंधनकारक आहे. या ठरवून दिलेल्या चौकटीत नात्याचा गाभाच हरवत जातो. 'बाई ती बाई आणि पुरुष तो पुरुष' हे समीकरण मनीमानसी इतके रूळलेले असते की अनेकदा वरून मोकळं दिसणारं नाते देखील बंदिस्त स्वरुपाचेच असते. यात समजून घेण्याची प्रक्रिया याच विरोधाभासांवर आधारलेली असते. 'पुरुष श्रेष्ठ आहे' या न्यूनगंडातच अनेक स्त्रिया या नात्याकडे बघत असतात. पुरुष म्हणजे व्यवस्थेने आकाराला आणलेलं एक रचित आहे, तो व्यवस्थेचा केंद्रबिदू आहे. स्त्री ही सर्वार्थाने त्याच्यावर अवलंबून आहे. तो दाता आहे, ती याचक आहे. तो शोषक आहे, ती शोषित आहे. अशा विषमतावादी, सामाजिक, सांस्कृतिक आणि धर्मिक गृहीत तत्त्वांवर स्त्री-पुरुष नाते आधारलेले असेल तर त्यात कधीच सारखेपणा येऊ शकणार नाही. या परिस्थितीत पुरुष समजून घेताना, आपण त्याच्यावर अवलंबून आहोत म्हणून त्याचे वर्चस्व सहन करीत राहणे, त्याचा अहंकार सुखावेल असे वागत राहणे, त्याने ठरवून दिलेल्या चौकटीत बंदिस्त होण्यात धन्यता मानणे हेच घडत रहाणार आहे. ही प्रक्रिया जशी वैयक्तिक पातळीवर नातेसंबंधातील असलेल्या पुरुषांविषयीची आहे तशीच ती सामाजिक पातळीवर सार्वत्रिकरित्या जगणाऱ्या पुरुषांविषयीही आहेच.

याचा अर्थ तिला पुरुष कळत नाही अस मात्र नव्हे. त्याचे न्यूनत्व तिच्या लक्षात येतच असते, पण मुळात स्त्री-पुरुष नाते समानतेवर आधारित नसल्यामुळे दोन्हीकडून अनेकदा समजून घेण्याची प्रक्रियाच अनेक पूर्वग्रहांनी दूषित झालेली असते. नवराबायकोच्या आणि सगळ्याच कौटुंबिक नात्यात हे अधिक घडत जाते. मुळात कुटुंबाची संरचना स्त्रियांवर अन्याय करणारी असल्यामुळे 'जे नाही, ते आहे' असे समजण्यात स्त्रियांना धन्यता मानावी लागते. अनेकदा आर्थिक परावलंबित्वामुळे स्त्रिया पुरुषांवर अवलंबून असतात जिथे अवलंबित्व असते तिथे समानता रुजू शकत नाही आणि नैसर्गिकपणे एकमेकांना समजून घेण्याची प्रक्रिया देखील घडत नाही. समजून घेण्याच्या प्रक्रियेत समानता हवीच हवी, पण दोघांना एकमेकांविषयी सन्मानही असावा लागतो कारण सन्मानातूनच समानतेची अनुभूती येत असते. पुरुषांचे स्त्रीवादी होणे म्हणजे काय तर खऱ्या अर्थाने माणूस म्हणून स्त्रियांचा सन्मान करणे होय. यासाठी समजून घेण्याची एक विशिष्ट प्रक्रिया पार पाडावी लागते. ते किती पुरुष करू शकतात हा खरा प्रश्नच आहे कारण पुरुषाला समजून घेणे म्हणजे काय तर सगळ्या सामाजिक, धार्मिक,

जातीय समज-गैरसमजांच्या पलीकडे जाऊन विचार करणाऱ्या पुरुषांमधील बदलांना समजून घेणे होय. याच टप्प्यांवर तिला हवा तसा पुरुष मिळू शकतो यावर विश्वास ठेवणे होय.

प्रत्येक बाईला नेहमीच तिच्या कुवतीनुसार एका आयडियल पुरुषाचा शोध असतो. हा शोध लग्नाने पूर्ण होतो असा आपल्याकडे एक सार्वत्रिक गैरसमज आहे. ठरवून केलेले लग्न असेल किंवा प्रेमात पडून केलेले लग्न असेल, लग्न नावाचा करार एकदाचा पार पडला म्हणजे ठरवून दिलेल्या भूमिका नेटाने पार पडण्याचे कसब करावे लागते. परत हे असे 'स्वत:ला आयुष्यभर एकाच खुंट्याला बांधलेल्या जनावरांसारखे जगावे लागत आहे'. असा काही बंडखोर विचार बाईच्या मनाला शिवू नये याची काळजी कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर व्यवस्था घेतच असते. जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीने लग्न केलेच पाहिजे असा अलिखित नियमच आहे. यात नवऱ्याला समजून घेणे म्हणजे काय? तर तुमच्या सगळ्या इच्छा-आकांक्षाना मुरड घालून त्याची ताबेदारी सहन करीत राहणे, असाच लग्नाचा अर्थ आहे. येथे विचार करणाऱ्या बायकांची फरपट होणारच. 'तिचे माणूसपण मारूनच त्याचे माणूसपण फुलते' असा गैरसमज त्याच्या आणि सगळ्याच पितृसत्ताक व्यवस्थेच्या डोक्यात असल्यामुळे नवरा-बायकोच्या नात्यात समजून घेण्याची प्रक्रिया खंडितच होते, हे नाते श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या संकल्पनेवर उभे राहात असल्यामुळे बाईची अस्मिता पायदळी तुडवली जाते. यात एकेमकांना समजून घेण्याचा अवकाश संकुचित होत जातो. विवाह संस्थेविषयी स्त्रीवादी विचारवंतानी वेळोवेळी जी मते मांडली आहेत आणि विवाह संस्थेला नकार दिला आहे त्याची कारणे यातच आहेत कारण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी विवाह संस्थेचा साचा ठरलेला आहे. यात पुरुषाचे दमन होतच नाही, असे नाही पण या दमनाला त्याने प्रतिष्ठेचा बुरखा पांघरवल्यामुळे या प्रतिष्ठेच्या तथाकथित कल्पनांमध्ये बाई अधिक गुदमरत जाते. हल्ली घटस्फोटांचे जे प्रमाण वाढले आहे त्याचे मूळ यातच आहे हे आपण गंभीरपणे समजून घेतले पाहिजे.

हे झाले मानसिक पातळीवर, पण अनेकदा शारीरिक पातळीवरही स्त्रियांची घुसमट होते. यात मोकळ्या पद्धतीने बाईला समजून घेण्याची पद्धत पितृसत्ताक व्यवस्थेला अमान्य आहे. त्यामुळे एकमेकांचे जैविक स्थान, शारीरिक-मानसिक गरजा समजून घेत कोणत्याही नात्याचा नैसर्गिक विकास होऊ शकतो हेच पचनी पडत नाही, त्यामुळे पुरुष समजून घेण्याचा अधिकारही नाकारला जातो. 'तो आहे, असा आहे', बाईने त्याला असेच स्वीकारले पाहिजे हे जर बंधनकारक असेल तर यात दोघेही वैफल्यग्रस्त होणारच कारण समजून घेण्याच्या प्रक्रियेत जो उमदेपणा अपेक्षित असतो तोच नाकारला गेला तर ती प्रक्रिया पुढे कशी जाणार?

बाईला विचारांचा, जगण्याचा मुक्त अवकाश मिळत नाही. मुक्तीची संकल्पना आकळत जाण्याच्या प्रक्रियेत तिची स्वत:ला समजून घेण्याची प्रक्रिया सुरू होते. हे समजून घेणे बऱ्याचदा पुरुषाच्या आणि व्यवस्थेच्या विरोधातच असते, अनेक शतकांचे साचलेपण जेव्हा तिच्या अंगावर चालून येते तेव्हा तिची पुरुषाविषयीची नकारात्मकता वाढत जाते. यात आपल्याला समजून घेणाऱ्या पुरुषाच्या शोधात ती असते पण, तसा तो मिळेलच याची काही खात्री नसते. खरे म्हणजे हा पुरुष कोणत्याही नात्यातला असू शकतो. बाप, भाऊ, प्रियकर, मित्र, नवरा, अगदी तिने ज्याला जन्म दिला आहे असा मुलगाही असू शकतो. अर्थात या कोणत्याही नात्यातील पुरुषाकडून, बाईला समजून घेणे म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्या व्यवस्थेने ठरवून दिलेल्या स्थानाला खतपाणी घालणे नव्हे, हे ज्या स्त्रियांना नीटपणे कळलेले असते, ती स्त्री अशा खोट्या नात्यांमधून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठी धडपडत असते, हे लक्षात घेतले पाहिजे. ही विशिष्ट स्वरुपाची पारंपरिक व्यवस्था नाकारत असताना नवी व्यवस्था निर्माण करण्याचे आव्हान स्त्री आणि पुरुष दोघांसमोरही आहे आणि अर्थात ते दोघेही एकमेकाला किती आणि कसे समजून घेतात त्यावरच या आव्हानाची मूलभूतता अवलंबून आहे.

अर्थात बाईला जसा आयडियल पुरुष हवा असतो त्याच पद्धतीने पुरुषालाही आयडियल स्त्री हवीच असते. अनकेदा मैत्रीच्या नात्यात हे अधिक जाणवते, पण परत स्त्री-पुरुष मैत्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोण निकोप नसतो. त्याला लैंगिकतेचे लेबल लावण्याची खूप घाई असते, मैत्रीच्या नात्यातून असे काही नाते विकसित होऊ शकत असले तरी सामाजिक आणि कौटुंबिक गुंतागुंतीत हे नाते निभावणे, टिकवणे दुरापास्त असते कारण इतका निरपेक्ष अवकाश स्त्री-पुरुष दोघांनाही मिळत नाही. येथे पुरुषाचेही दमन होत असते, त्याचेही साचलेपण असते त्याची परिपूर्ती करण्यासाठी तो चट्‌कन शारीरिक पातळीवर उतरतो. अनेकदा घसरतो. त्याला लैंगिकता हेच सगळ्या शारीरिक-मानसिक भावनांचे उत्सर्जन करण्याचे साधन वाटते. बाईच्या बाबतीत हे असू नये / असत नाही. असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही कारण तिच्याही शारीरिक गरजा असतातच, पण बाईला अशा कोणत्याही गरजा नसतात किंवा त्या असू नयेत असेच व्यवस्थेने ठरवून टाकलेले आहे. तरीही तिच्या मानसिक दबलेपणाची उत्तरेच ती शोधत असते. यातूनच ती स्वत: बरोबरच पुरुषालाही समजून घेत असते.

बाई जशी बदलत गेली तसा पुरुषही बदलत गेला आहेच, पण व्यवस्थेने त्याला नेहमी वर्चस्ववादी भूमिकेत ठेवल्यामुळे त्याला बदल चट्‌कन पचविता येत नाही. परिवर्तनवादी चळवळीतले पुरुषही स्त्रियांना दुय्यम स्थानावर ठेवण्यातच धन्यता मानतात. अनेकदा समानतेचा आणि अगदी स्त्रियांच्या लैंगिक, शारीरिक मानसिक सगळ्याच गरजांचा आवाजी पुरस्कार करणारे पुरुषही पक्के मनुवादी असतात आजूबाजूच्या सगळ्या पुरुषी गजबजाटात बाईला स्वत:ला सिद्ध करण्यासाठी झगडावेच लागते. गेल्या काही दिवसांपासून काही मोजक्या पुरुषांचा आवाज बाहेर येतोय. यातील बरेच पुरुष स्वत:ला स्त्रीवादी म्हणवतात किंवा काही पुरुषभानाची गरज अधोरेखित करणारे आहेत. यातील सगळ्या विरोधाभासांना स्वीकारूनही अशा पुरुषाचे स्वागत केले पाहिजे कारण स्त्रीमुक्तीच्या

चळवळीप्रमाणे पुरुष मुक्तीच्या तथाकथित चळवळीही आपल्याकडे सुरू झाल्या आहेत. यातील कार्यकारणभाव लक्षात घेऊन पुरुषांच्या पारंपरिक प्रतिमा बदलविण्याच्या दिशेने जर हालचाली होत असतील तर त्या समजून घेतल्या पाहिजेत.

मुलगी म्हणून जन्म झाल्यानंतर पहिला सबंध येतो तो बापाशी. बाप आणि मुलगी हे जैविक नाते आहे. बऱ्याचदा कळू लागल्यापासून बापाचे वर्चस्ववादी रूपच मुलगी बघत असते. एका मुलीने पुरुष समजून घेताना बापाला कसे समजून घ्यावे? नाही म्हटले तरी बाप हाच कुटुंबव्यवस्थेचा आधार आहे. अलीकडे काही मोजक्या कुटुंबांमध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात असले, तरी मुलगी नको म्हणणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यात बाप आणि मुलीचे नाते फारसे सुखकारक नसतेच. बाईपणाच्या धार्मिक, सामाजिक मान्यतांमध्ये हे नाते गुरफटलेले असते. यात प्रत्येक मुलीने अनुभवलेला बाप हा चौकटीतलाच असतो. सगळ्या सामाजिक मान्यतांमध्येच आपल्या बायकोने, मुलीने आणि नाते संबंधातील सगळ्याच स्त्रियांनी वागले पाहिजे असेच कुटुंबप्रमुख म्हणून वावरणाऱ्या कोणत्याही बापाला वाटत असते, पण आईपासून आजूबाजूच्या सगळ्याच स्त्रिया आहे त्या वातावरणात स्वतःचा अवकाश निर्माण करणाऱ्या होत्या, माझा बापही याला अपवाद नव्हता. आई आणि तिच्या आजूबाजूच्या सगळया स्त्रिया घर आणि शेतीत राबणाऱ्या होत्या, पण एवढं सगळं करूनही उपऱ्या होत्या कारण संपत्ती शेवटी पुरुषांची होती. शेती आणि घर सगळे काही वडिलोपार्जित होते. याचाच अर्थ संपती त्याची होती, तिची नव्हती. हे सामाजिक वास्तव सार्वत्रिक असले तरी शेतीत राबणाऱ्या सगळ्या स्त्रिया खूप खंबीर होत्या आपल्या आयुष्याकडे आणि आपल्या बरोबरीचच आपल्या आजूबाजूच्या स्त्रियांकडेही समानतेच्या पातळीवर बघणाऱ्या होत्या. सगळी सत्ता पुरुषांच्या हातात आहे याचे त्यांना मुळातूनच भान होते पण तरीही जमेल तसे आपले स्थान निर्माण करण्यासाठी झगडणाऱ्या होत्या. अर्थात हे स्थान कुटुंबव्यवस्थेच्या चिरेबंद भितींमध्ये चिरडले गेलेले होते, पण या परिस्थितीही मला आई कायमच भक्कम वाटली. बाप नेहमीच केविलवाणा वाटला. मान्यताप्राप्त पुरुषी अरेरावी बापाने कधीच केली नाही. समाजाने ठरवून दिलेल्या चौकटीत कुटुंब आपोआपच चालत होते म्हणून कदाचित त्याला वेगळे काही करावसे वाटले नाही/नसेल.

माझ्या मनात लहानपणापासून आजपर्यंत बापाविषयीचा एक हळवा कोपरा आहे. बाप फक्त माझ्याशीच संवाद साधू शकतो असे मला नेहमीच वाटते. त्याच्या मनात काहीतरी सातत्याने चालू असते, पण त्याच्या सगळ्याच भावना अव्यक्त राहातात कारण व्यक्त करायला कुठे संधीच नसते. पुरुषपणाची झूल अंगावर पांघरून जगणाऱ्या सगळ्या पुरुषांचे असेच होत असावे, आपणच अंथरलेल्या जाळ्यात आपणच अडकावे आणि त्यातून आपलीच जिवघेणी तडफड व्हावी असे पुरुषांच्या बाबतीत होत असावे. कारण स्त्रिया जशा एकंदरीतच समाजव्यवस्थेच्या विशिष्ट धारणांमुळे आणि सोयींमुळे विशिष्ट प्रतिमांमध्ये अडकलेल्या आहेत. तसेच पुरुषही अडकलेले आहेत पण यात मूलभूत असा फरक आहे. या प्रतिमा पुरुषनिर्मित आहेत. स्त्रियांच्या प्रतिमा पुरुषांनी निर्माण केल्या त्यातून त्यांच्याही विशिष्ट प्रतिमा तयार होत गेल्या आणि नकळत तेही त्या प्रतिमांमध्ये अडकत गेले. आधुनिक काळांपासून मूर्तिभंजनाला सुरुवात झालेली असली तरी अजूनही पारंपारिक साच्यांमध्ये अडकलेल्या स्त्री-पुरुषांची संख्या मोठी आहे. बापाकडे बघत असताना मला नेहमीच हे जाणवत गेले की तो पुरुषी प्रतिमांमध्ये अडकलेला आहे. त्या प्रतिमांमधून त्यालाही बाहेर पडायचे आहे पण पडता येत नाही. त्याने त्याच्याही जगण्याची एक चौकट ठरवून घेतली आहे, त्या चौकटीबाहेर तो कधीच गेला नाही.

आईला व्यक्त व्हायच्या, मोकळ्या व्हायच्या बऱ्याच जागा आहेत. तिच्या भावांशी तिची घट्ट मैत्री आहे. आयुष्यातील कोणतीही घटना ती भावांशी शेअर करू शकते. तिचे दोन्ही भाऊ तेवढ्याच समजूतदारपणे ते सगळं समजून घेऊन तिच्या पाठीशी उभे राहतात. तिच्या अनेक मैत्रिणी आहेत. बहुजन बायका ज्या पद्धतीने एकमेकांचं दुःख वाटून घेतात ते अप्रतिमच आहे. बापाला मी अस शेअरिंग करताना कधी बघितले नाही. खूप आतल्या गोष्टी तो माझ्याशीच कधीतरी बोलतो. अर्थात त्याने समरसून कष्टही केले नाहीत. शेतीचा भार त्याच्यापेक्षा आईनेच अधिक उचलला. आईचा करारीपणा त्याचाकडे नव्हता. त्यानेही ते मान्य केले. त्याने कधीही आईशी भांडण केले नाही. तो नेहमी तिला 'अहो-जाहो'असे सन्मानार्थी बोलतो. तिला निर्णयस्वातंत्र्य आहे. तिच्या निर्णयांच्या विरोधात तो गेला नाही. बापाला आम्ही जिभाऊ म्हणतो. मी लहानपणी अनेकदा आजूबाजूच्या स्त्रियांच्या तोंडी एक वाक्य ऐकलेलं ''जिभाऊ म्हणजे भोळा सांब शे, उघडी बाई दिखनी तरी तिले झाकी दी'' मला तेव्हा त्याचे गांभीर्य कळत नव्हते. पण आज जेव्हा मी माझ्याच आजूबाजूला लैंगिक शोषणापासून बलात्कारापर्यंतच्या घटना बघते आहे. तेव्हा बापाविषयीचा आदर कितीतरी पटीने वाढतो. कृषिसंस्कृतीत जगणाऱ्या कुटुंबांमध्ये याच पद्धतीचे वातावरण मी बघितले. अर्थात बायकांचे स्थान दुय्यमच होते पण एक स्वाभाविक मोकळेपणा स्त्री-पुरुषांच्या नात्यात होता. बाप-मुलीच्या नात्याचे अनेक पदर असतात पण या नात्यात जे साचलेपण आलेले असते त्याच्यातून ते नाते फुलण्याऐवजी कोमेजत जाते कारण मुलगी म्हणजे तिचे लग्न होईपर्यंतची जबाबदारी समजली जाते. कन्या ही दान देण्याची वस्तू आहे हा सार्वत्रिक समज असल्यामुळे एकदाचे मुलीचे लग्न झाले म्हणजे बापाची जबाबदारी संपली असेच काहीतरी चित्र असते. मलाही माझे बापासोबतचे नाते तसे फुलवता आले नाही, पण त्याच्या माझ्यातील आंतरिक समजदारी इतकी घट्ट आहे की आजूबाजूच्या सगळ्या सामाजिक, धार्मिक मान्यता आम्ही आमच्या वैयक्तिक नात्यात थोड्यातरी दूर करू शकलो. याच पद्धतीने भावांचाही विचार मला करावा लागतो. भाऊ म्हणजे बहिणीचे रखवालदार, पण घरात आईचा दरारा असल्यामुळे माझी रखवालदारी करण्याचा अधिकार भावांना

फारसा कधी मिळाला नाही. कौटुंबिक वातावरणात मुलगी आहे म्हणजे माझ्यात काही न्यूनत्व आहे, या पद्धतीची वागणूक मला कधीच मिळाली नाही पण तरीही सामाजिक रूढी परंपरांनी मुलीला, बाईला दिली जाणारी वागणूक प्रत्येक बाईसारखी मलाही सहन करावीच लागली. अर्थात या नात्यांची चौकट मनूने ठरवून दिलेली असल्यामुळे त्या चौकटीतच अनेकदा ही नाती जोपासली जातात त्यामुळे अनेकदा ती समजून घेण्याऐवजी शतखंडित होत जातात.

बाप आणि मुलीप्रमाणेच आई आणि मुलगा यांच्या नात्यातही एक द्वंद्व असते. नुकत्याच वंदना भागवत यांच्या 'स्तब्ध' या कथासंग्रहातील कथा वाचल्या. या संग्रहातील काही कथांमध्ये आई आणि मुलगा यांच्या नात्याचा चांगला वेध घेतला आहे. कितीही पुरोगामी वातावरणात मुलाची जडणघडण झाली तरी शेवटी तो पुरुषी साच्यातच घडवला जातो. याचा अर्थ बदलत गेलेल्या आईचे सगळेच प्रयत्न वाया जातात असे नाही. आता विशी/पंचविशीत असलेली पिढी दोन्ही बाजूंनी विचार करणारी आहे. जरी आई आहे तशी स्वीकारायला त्यांना जड जाते तरी ती स्वीकारायची प्रकिया घडते आहे. किमान आईच्या माणूस म्हणून काही गरजा आहेत आणि त्या समजून घेतल्या पाहिजेत हा विचार ही पिढी करताना दिसते आहे. अर्थात यामागे स्त्रीचळवळीने घेतलेले गेल्या अनेक वर्षांचे परिश्रम आहेत. परत मागच्या पुरुषांच्या पिढीसारखी ही समज वरवरची नाही. तर मनापासूनची आहे. आईच्या काही गोष्टी पटत नसतील तर त्याची मोकळी चर्चा करायची या पिढीतील मुलांची तयारी आहे. कुठेतरी नवरा, सहकारी, मित्र यांच्यापेक्षा या तरुण पिढीतील हा बदल सकारात्मक आहे. याला कारण म्हणजे लिंगभेदाच्या पारंपरिक कल्पनांचा या पिढीने त्याग केला आहे. अर्थात यात स्त्रियांसाठी सगळ्याच चौकटी सैल झाल्या असे मात्र नाही, पण त्यांच्याकडून एक हात पुढे करण्याची तयारी या पिढीने दाखविली आहे. हा पुरुषांमधला हा बदल पुढच्या पिढीसाठी सकारात्मक आहे. एकंदरीतच आयुष्याविषयी आणि स्त्री-पुरुष नात्याविषयी सामंजस्य वाढवणारा आहे. परत ही मुले स्वत:शी झगडतानाही दिसतात. त्यांच्या या संघर्षात त्यांना जाणीवपूर्वक मदत केली पाहिजे. स्त्री-पुरुष नात्याचा आणि एकंदरीतच तिच्या अधिकारांविषयीचा, तिच्या सन्मानाविषयाचा सामाजिक आग्रह ज्या पद्धतीने वाढत जाईल. त्या पद्धतीने स्त्री-पुरुष नाते समृद्ध होत जाईल, पण नवभांडवलदारी व्यवस्थेमध्ये माणसांसकट सगळ्याच वस्तूंचे जे बाजारीकरण झालेले आहे, त्यात स्त्री-पुरुष नात्याविषयीच्या संकल्पना प्रचंड वेगाने बदलताना दिसत आहेत.

ग्लोबल जगात बाईचे नव्याने वस्तूकरण झालेले आहे त्यात स्त्री-पुरुष संबंधाचे वेगाने व्यवहारीकरण झाले. संपर्क साधनांच्या अतिरेकी वापरामुळे जे उपलब्ध आहे त्याचा उपभोग घेतला पाहिजे अशी दृष्टी वाढत गेली. यात बाईच्या उपभोग्यतेला नवा मुलामा देण्यात आला. हा पुरुषी दृष्टिकोण व्यवसायापासून युद्धभूमीपर्यंत तसाच कार्यरत असलेला आजही आपल्याला दिसतो. पुरुष हा भांडवलदारी आहे. तो व्यावसायिक आहे. राजकारणी आहे, साम्राज्यवादी आहे. पर्यावरणाच्या विरोधात जाऊन विकासाच्या वल्गना करणारा आहे, युद्धखोर आहे आणि या प्रत्येक टप्प्यावर तो बाईचा माध्यम म्हणून वापर करतोय. येथे बायकांना आपल्या भूमिका विषद करायला अवकाशच नाहीये. येथे बाईला आपले नैसर्गिक अधिकार हवे असतील तर संघर्ष अटळ आहे. या संघर्षातूनच तिला पुरुषाच्या मानवी नैसर्गिक रूपावर विश्वास ठेवायचा आहे. वाढवायचा आहे. त्यामुळे नाउमेद होऊन चालणार नाही तर समतेवर आधारित पुरुषाच्या खऱ्या प्रतिमा घडविण्यात तिलाही आपला वाटा उचलायचा आहे त्यामुळे नात्याचे साचे ओलांडून पुरुषांकडे बघता आले पाहिजे, व्यवस्था कितीही पुरुषी असली तरी तो ही अनेक गोष्टींमध्ये स्त्रियांवर अवलंबून असतोच. शेवटी सगळ्या साच्यातून मोकळे होण्याची प्रक्रिया हातात हात घेऊनच पूर्णत्वाला जाणार आहे.

**– डॉ. वंदना महाजन**
भ्रमणध्वनी : ९९२०७९५१३९
dr.vandanamahajan@gmail.com

ग्रंथाली

**अनुराधा गोरे** लिखित
**'अनंत आमुची ध्येयासक्ती'**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

''तिरंगा फैराकर आयेंगे या तिरंगेमें लपेटकर'' असं अभिमानानं सांगणाऱ्या सैनिकांपैकी काही जणांच्या वाट्याला येतं अपंगत्व पण नेहमीच केवळ जिंकण्याचंच प्रशिक्षण मिळालेले आमचे सैनिक या आपत्तीवर मात करतात. सन्मानाचं आयुष्य जगतात. इतरांचे आदर्श बनतात. अशा आमच्या खास सैनिकांच्या यशोगाथा आपण या पुस्तकात वाचूया आणि त्यांना हे बळ देणाऱ्या QMTI या संस्थेची पण ओळख करून घेऊया. त्यांच्याप्रमाणे आपणही म्हणूया ''अनंत अमुची ध्येयासक्ती...'' कारण भारतमातेला पुन्हा सुवर्णभूमी बनवण्याची जबाबदारी तुमची-आमची साऱ्यांची आहे.

'४९७ -' काय आहे हा कायदा? एका पुरुषाने दुसऱ्या पुरुषाच्या पत्नीशी तिच्या संमतीने शरीरसंबंध ठेवल्यास तो विवाहबाह्य संबंध ठेवल्याचा गुन्हा ठरतो. तिची संमती नसेल तर अर्थात बलात्काराचा गुन्हा होतो. पूर्ण शरीरसंबंध असतील तर आणि तरच हा विवाहबाह्य संबंध ठेवल्याचा गुन्हा मानला जातो. गुन्हेगारी दंडसंहिता कलम १९८ (१) आणि (२) नुसार केवळ पतीने दाखल केला तर आणि तरच गुन्हा नोंद होतो. बाकी कोणी केलेली तक्रार दाखल होऊ शकत नाही. मुलगा, मुलगी किंवा इतर नातेवाईक गुन्हा नोंद करू शकत नाहीत. त्यामुळे या कायद्यातून पत्नी ही पतीची खाजगी मालमत्ता असल्याचंच अधोरेखित होते. या तथाकथित गुन्ह्यात पत्नी विरुद्ध तक्रार दाखल होऊ शकत नाही. ती सह-आरोपी समजली जाऊ शकत नाही. त्या अर्थाने हा गुन्हा करूनही स्त्री सुरक्षित रहाते. हा कायदा १५८ वर्ष जुना आहे, ब्रिटनमध्ये हा कायदा १८५७ मधेच निकालात निघाला होता. त्यावेळच्या कॉलनीसाठी हा कायदा करताना कर्नल स्लीमन याने महत्त्वाची कामगिरी बजावली होती. भारतीय पुरुष मागासलेले आणि क्रूर आहेत. ते या गुन्ह्याचा सगळा राग पत्नीला मारहाण आणि मानसिक त्रास देऊन काढतील असा विचार त्याने मांडला. म्हणून त्याने दुसऱ्या पुरुषाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची योजना करून क्रूर पुरुषांच्या संतापाला थोडी वाट करून दिली. मग स्त्रीचा एवढ्या सहानुभूतीने विचार करणारा कायदा जुनाट आणि कालबाह्य कसा? तर या कायद्याची पटकन लक्षात न येणारी दुसरी बाजू आहे. समजा या पतीने दुसऱ्या स्त्रीशी तिच्या संमतीने शरीरसंबंध ठेवल्यास पत्नीला मात्र दोघांविरुद्धही विवाहबाह्य संबंध असल्याचा गुन्हा दाखल करता येत नाही. अर्थात ती दुसरी स्त्री विवाहित असेल तर तिचा पती या पुरुषाविरुद्ध हा गुन्हा दाखल करू शकतो. या गुन्ह्याला पाच वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. ४९७ एवढा वादाचा विषय झाला असला तरी प्रत्यक्षात फार क्वचित फसवल्या गेलेल्या पती महाशयांनी गुन्हे नोंदवले आहेत आणि गुन्ह्याची सिद्धता आणि शिक्षा त्याहूनही विरळाच. सहसा हुंडा-विरोधी कायद्याच्या कचाट्यात सापडलेले नवरे उलटवार करण्यासाठी पत्नीचे सासरच्या कोणाशीतरी संबंध असल्याची बतावणी करत या कलमांतर्गत मुद्दाम तक्रार करतात अशीही उदाहरणे आहेत. असं असलं तरीही व्यक्तीच्या मूलभूत हक्काच्या दृष्टीने या कायद्याला विशेष महत्त्व आहे आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाने त्याची विशेष दाखल घेतली.

धनंजय गांगल

# दफा ४९७ अर्थात विवाहबाह्य संबंध

**२१व्या शतकातील बदलत्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पना आणि वाढत्या आकांक्षा (फ्रीडम अँड ऍस्पिरेशन्स) यांनी ही पूर्वापार चालत आलेली विवाह संस्था आणि त्याची लवचीकता यांना परत आव्हान मिळू लागले आहे. तेव्हा धर्म बुडाला म्हणून अरण्यरुदन करण्यापेक्षा विवाहसंस्थेचा नव्याने विचार आणि व्यवहार्य मांडणी करण्याची गरज आहे.**

अनिवासी भारतीय असलेले जोसेफ शाइन यांनी वकील सुविदुत सुंदरम् आणि के. राज यांच्यामार्फत डिसेंबर २०१७ मध्ये कलम ४९७ च्या वैधतेलाच आव्हान दिले होते. यात गुन्हेगारी दंडसंहिता कलम १९८(२) चाही समावेश आहे. हे कलम ४९७ 'अर्काईक आणि जेण्डर डिस्क्रिमिनेटरी' म्हणजे कालबाह्य आणि लिंग-भाव असणारे असून विवाहबाह्य संबंधात केवळ पुरूषांनाच दोषी ठरवून शिक्षा केली जाते, याबाबत स्त्रियांचाही विचार समान पातळीवर करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या तीन सदस्यीय पीठाने ही लोकहिताची याचिका घटनापीठाकडे सुनावणीसाठी दिली होती. यापूर्वी १९५४, १९८५ व १९८८ सालच्या तीन निकालात कलम ४९७ वैध ठरवण्यात आले होते.

सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने २७ सप्टेंबर २०१८ रोजी या याचिकेवर निर्णय दिला. न्या. ए. एम. खानविलकर, न्या. आर एफ नरिमन, न्या. डी वाय चंद्रचूड, न्या. इंदू मल्होत्रा यांचा घटनापीठात समावेश होता. सुप्रीम कोर्टाने व्यभिचाराला गुन्हा ठरवणारे आयपीसीतील कलम ४९७ रद्द करण्याचा निर्णय दिला. पतीच्या परवानगीशिवाय पत्नी परपुरुषाशी संबंध ठेवू शकत नाही, असे त्यात अभिप्रेत होते. म्हणजे पत्नी ही पतीची 'मालमत्ता' आहे असा अर्थ त्यातून निघत होता. तो भारतीय राज्यघटनेतील कलम १४ (Right to equality - समानतेचा अधिकार), १५ (prohibition of discrimination – सापत्न-भावाला प्रतिबंध) आणि २१ (Right to life and personal liberty - जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार) या मूलभूत समानतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारा आहे असेही न्यायालयाने स्पष्ट केले. आणि म्हणून भारतीय दंड विधानातील हे कलमच असंवैधानिक असल्याचे न्यायालयाने सांगितले. हा कायदा लैंगिक पसंती रोखणारा आहे. लग्नानंतरही कोणाला लैंगिक पसंतीपासून गुन्हेगारी कायद्याने रोखता येणार नाही, असंही न्यायालयाने सांगितलं. मात्र, १९५६च्या हिंदू विवाह कायद्यातील कलम १३ (१) मधील तरतुदीनुसार विवाहबाह्य संबंध हे घटस्फोटासाठी कायदेशीर कारण मानणारा मुद्दा कायमच असल्याचे न्यायालयाने सांगितले, पण तो गुन्हा ठरत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. विवाहबाह्य संबंध हा गुन्हा नाही. मात्र या कारणाने जर तुमच्या पती किंवा पत्नीने आत्महत्या केली तर त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येऊ शकतो, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं. न्या. धनंजय चंद्रचूड यांनी बाबिलोनच्या जमान्यातील (मनुस्मृतीसारखा) हामुराबी कोडचाही उल्लेख केला. ज्यात त्या अनैतिक गुन्हेगारांना पाण्यात बुडवून मारावं अशी शिक्षा नमूद केली आहे. योगायोग म्हणजे न्या. धनंजय चंद्रचूड यांनी महिलांचे लैंगिक स्वातंत्र्य मान्य करताना, आपले वडील न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी १९८५ मध्ये या कायद्याच्या वैधतेच्या बाजूने दिलेल्या निकालाला छेद दिला.याआधीही ऑगस्ट २०१७मध्ये 'राईट टू प्रायव्हसी'बद्दलच्या निर्णयात चार-एक दशके आधी वडील न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी दिलेल्या निकालाला छेद दिला होता!

लग्नानंतर विवाहबाह्य संबंध ठेवण्यासंबंधीच्या कायद्याला असंविधानिक ठरविण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली होती. या कायद्याचा बचाव करताना ४९७ कलमाला गुन्हा न ठरविल्यास विवाह संस्थांमध्ये वादळ निर्माण होईल, असा तर्क केंद्र सरकारने दिलेल्या प्रतिज्ञापत्रात वर्तवला होता. व्यभिचाराला गुन्ह्याच्या श्रेणीतून बाहेर काढल्यास विवाहाचं पावित्र्य संपुष्टात येईल आणि त्यामुळे समाजात तणाव निर्माण होईल. तसंच विवाह संस्थांमध्ये वादळं येतील, असं केंद्रानं प्रतिज्ञापत्रात म्हटलं. ४९७ कलमांमुळे देशातील लग्नसंस्था टिकून आहेत, हे कलम नसेल तर लग्नसंस्था कमकुवत होतील, असाही केंद्र सरकारच्या वतीने ॲडिशनल सॉलिसिटर जनरल पिंकी आनंद यांनी प्रतिवाद केला, पण 'जे वैवाहिक जीवनात आनंदी नाहीत, ज्यांचे संबंध तुटण्याच्या मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी हा गुन्हा होऊच नाही,' ही सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका बदलत्या काळाशी सुसंगत आहे. अर्थात याचा अर्थ विवाहबाह्य संबंधाना मुक्त परवाना मिळाला असा कोणी घेऊ नये असेही न्यायालयाने नमूद केले.

बहुतेक महिला संघटनांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागतच केले आहे. राष्ट्र-महिला अयोगानेही स्वागत केले. अपवाद फक्त दिल्ली-राज्य महिला अयोगाच्या अध्यक्ष स्वाती मैलवाल यांचा. त्यांनी सरकारप्रमाणेच विवाहाचं पावित्र्य धोक्यात येईल अशी भीती व्यक्त केली आहे. यात नवीन काही नाही. १९५५ चे हिंदू कोड बिल आणि त्यातील बहुपत्नीत्वावर आणलेली बंदी असो, हुंडा-विरोधी कायदा असो, मुलीला पालकांच्या संपत्तीत सामान वाटा असो की शाहबानो निकाल असो, हुंडा-विरोधी कायदा असो वा साबरीमालातील स्त्रियांना प्रवेश असो. धर्म आणि विवाहसंस्था धोक्यात आल्याची आरडाओरड नेहमीच होते. शाहबानो निकाल तर राजीव गांधींसारख्या आधुनिक, पुरोगामी, भारताला २१व्या शतकात नेणाऱ्या नेत्याने केवळ मुस्लीम अनुयायांसाठी लोकसभेतील पाशवी बहुमताच्या जोरावर बदलला होता ज्यातून पुढे राम-मंदिराच्या आंदोलनाला जोर आला. असदुद्दीन ओवेसीही विरोध करण्यात मागे नाहीत. विवाहबाह्य संबंध आणि समलैंगिकता गुन्हा ठरत नाही तर तीन तलाक तरी गुन्हा कसा ठरू शकतो?, असा सवाल करतानाच 'तीन तलाक'चा अध्यादेश हा फ्रॉड असून त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं पाहिजे, असं मत 'एमआयएम'चे नेते असदुद्दीन ओवेसी यांनी व्यक्त केलं आहे. तीन तलाकला गुन्हा मानणे चुकीचे आहे कारण इस्लाममध्ये निकाह हा करार आहे. आपला समाज पितृसत्ताक आहे. मग स्त्रियांना मदत कोण करेल? असा उफराटा सवाल त्यांनी केला.

जगातील बहुतांश देशांमध्ये विवाहबाह्य संबंध गुन्हा ठरवणारे कलम रद्द करण्यात आले आहे. ब्रिटिशांनी आपल्यासाठी हा कायदा दीडशे वर्षांपूर्वी केला असला तरी खुद्द ब्रिटनमध्ये हा कायदा




ही गाजलेली केस आठवते. कमांडर नानावटींची ब्रिटिश पत्नी सिल्विया. तिचे विवाहबाह्य संबंध प्रेम अहुजा या कमांडर नानावटीच्याच मित्राशी जडले. असं म्हणतात की कमांडर नानावटीने परिपक्वता दाखवत प्रेम अहुजाला खरं प्रेम असेल तर तिच्याशी लग्न करण्याचं बंधन घातलं, पण प्रेम अहुजा टाळाटाळ करतोय असं लक्षात येताच त्याचा खून केला. न्यायालयाने त्याला खुनाबद्दल शिक्षा ठोठावली. रुसी करंजिया यांनी आपल्या 'ब्लिट्झ वृत्तपत्रा'तर्फे कमांडर नानावटीच्या बाजूने मोहीमच चालवली. या 'ब्लिट्झ'नेच या केसचे त्या वर्षीच्याच जेम्स स्टुअर्ट अभिनित 'ऍनाटॉमी ऑफ मर्डर' या हॉलिवूडपटाशी असलेलं साम्य दाखवून खळबळ निर्माण केली. या खुनामागची ती कहाणी कळल्यावर कमांडर नानावटीबद्दल देशभर सहानुभूतीची लाट उसळली. मग ही कहाणी आणि जन-मत विचारात घेऊन 'बॉम्बे प्रोव्हिन्स'च्या तेव्हाच्या राज्यपाल विजयालक्ष्मी पंडित यांनी कम ांडर नानावटीला माफी दिली. ज्युरी पद्धत स्वतंत्र भारतात बंद होण्याच्या आधीच्या

१८५७ मधेच निकालात निघाला. साऊथ अफ्रिकेत १९१४ साली, जपानमध्ये १९४७, फ्रांसमध्ये १९७५ आणि उर्वरित युरोपियन देशात २००५ पर्यंत तर लॅटिन अमेरिकन देशात गेल्या दशक-दोन-दशकात हा कायदा निकालात निघाला आहे. आता बहुतेक देशात हा अपराध नाही पण घटस्फोटाचे कारण होऊ शकते. तैवानमध्ये मात्र हा अजूनही गुन्हा मानला जातो पण तो समतोल म्हणजे पती-पत्नी दोघांनाही लागू आहे. गंमत म्हणजे स्त्री-पुरुष संबंधाबाबतीत खूप मोकळा समाज अशी आपली समज असणाऱ्या अमेरिकेत अजूनही २० राज्यात हा गुन्हा आहे. दुसरीकडे इस्लामिक कायद्याने चालणाऱ्या सौदी आणि सोमालियासारख्या देशात अर्थातच झीना म्हणजे विवाहबाह्य संबंध हा प्रचंड मोठा गुन्हा आहे. या गुन्ह्यास फटक्यांपासून देहदंडापर्यंत शिक्षा आहे. त्यापुढे जाऊन पाकिस्तानात 'हदूद अध्यादेश/फतवा' १९७९ मध्ये झियांच्या कालखंडात आला. त्यात स्त्रीला स्वतःला वाचवण्यासाठी त्या पुरुषावर बलात्काराचा आरोप करायला लागतो आणि तो सिद्ध करण्यासाठी चार 'ताजकीय-अलं-शुदूद' म्हणजे समाजातील मान्यवर पुरुष त्या बलात्काराचे साक्षीदार पैदा करावे लागतात. (आता तो बलात्कार होता आणि हे चौघे बघत बसले, का तर पुढे साक्ष देण्यासाठी... असे प्रश्न पडू देऊ नका!)

विवाहबाह्य संबंध हा विषय आला की १९५९ ची नानावटी

शेवटच्या काही केसेसमधील ती केस होती. यावर आधारित सुनील दत्त, लीला नायडू यांचा आर. के. नय्यर दिग्दर्शित 'ये रास्ते हैं प्यार के' हा चित्रपट १९६३ साली आलेला होता. याच घटनेवर आधारित गुलजार दिग्दर्शित विनोद खन्नाचा 'अचानक' हा १९७३ साली तर नुकताच, २०१६ मध्ये अक्षयकुमारचा 'रुस्तम' हा याच विषयावरचा चित्रपट होता. विवाहबाह्य संबंध हा एक बॉलिवूडचा आवडता विषय आहे. दीप्ती नवलचेच या विषयावर तीन चित्रपट आहेत - विनोद पांडे दिग्दर्शित 'एक बार फिर' (१९८०), बासू भट्टाचार्य दिग्दर्शित 'पंचवटी' (१९८६) आणि सामाजिक विषयावरचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त, सुधीर मिश्रा दिग्दर्शित 'मैं जिंदा हूँ' (१९८८). पुढे अरुणा राजे दिग्दर्शित 'रिहाई' (१९८८), महेश मांजरेकर दिग्दर्शित 'अस्तित्व' (२०००) आणि सुधीर मिश्रा दिग्दर्शित 'हजारों ख्वाईशें ऐसी' (२००५) असे एक ना अनेक विवाहबाह्य संबंधांवरील चित्रपट सांगता येतील. साहित्यात तर क्लासिक्स समाजल्या जाणाऱ्या टॉल्स्टॉयची 'ऍना कॅरेनिना' असो की गुस्ताव फ्लोबर्टची 'मादाम बोव्हेरी' याच विषयावर आधारित होत्या. माणसाच्या मनात खोल दडलेल्या या अज्ञात प्रदेशात फिरण्याचा मोह बहुतेक सगळ्या सर्जनशील व्यक्तींना होतोच. त्यांच्या अभिव्यक्तीत आणि व्यक्तिगत जीवनातही तो उतरतो.

न्यायालयाला आणि सरकारला कदाचित हा कायदा समतोल




करता आला असता म्हणजे पत्नीही पतीविरुद्ध विवाहबाह्य संबंध असल्याचा दावा ठोकू शकते, पण सहसा पुरुषच कुटुंबाचा मुख्य आधार असतो आणि कुटुंब टिकवण्याची मुख्य जबाबदारी पत्नीची असल्याचा अलिखित नियम, यामुळे असा गुन्हा दाखल होणे दुरापास्त. सहसा पतीच्या तोंडी माफीनाम्याने प्रकरण मिटण्याची शक्यता, पण न्यायालयाने हा कायदाच रद्दबातल केला. न्यायालयाने एक प्रकारे जनमानसातील रूढ नैतिकतेच्या संकल्पनांना छेद देऊन राज्य-घटनेतील अभिप्रेत नैतिकतेच्या बाजूने निर्णय दिला आहे. आता हा कायदा रद्दबातल झाला असला तरी समाजमनावर विवाहबाह्य संबंध अनैतिक ठरवण्यासंबंधात जो काही पगडा बसलेला आहे, तो तात्काळ बदलता येणे कठीण आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हा कायदा केला गेला, तेव्हा नीतिमत्ता, तसेच नैतिक मूल्ये यांच्या संकल्पना वेगळ्या होत्या आणि त्याचे मूळ हे पुरुषवर्चस्वी समाजपद्धतीत होते, ही बाब ध्यानात घ्यायला हवी.

सतत युद्धात गुंतलेल्या समाजात पुरुष युध्दात धारातीर्थी पडत असल्याने स्त्री-पुरुष लोकसंख्येचे प्रमाण व्यस्त असायचे. त्यामुळे ज्यांना आर्थिक दृष्ट्या सोसेल त्या पुरुषांनी एकापेक्षा जास्त स्त्रियांबरोबर राहावे असा व्यवहार्य संकेत असावा, पण स्थिरता लाभलेल्या समाजात स्त्री-पुरुष लोकसंख्येचे प्रमाण सर्वसाधारणपणे समान म्हणजे एकास-एक किंवा त्याच्या जवळपास असते. अशा समाजात एकास-एक रहाण्याचा संकेत व्यावहारिक आणि अनेक दृष्टींनी सोयीचा आणि कमीत-कमी तापदायक म्हणून रूढ होतो. यालाच विवाह संस्था म्हणून आपण संबोधतो. पत्नीकडून असलेल्या त्यातील आंतरिक असमानतेच्या स्वीकृतीमुळे या संस्थेला प्रचंड लवचिकता प्राप्त झाली होती. या लवचिकतेतूनच गेल्या कित्येक शतकातील अनेक आव्हाने या विवाह संस्थेने पेलली आणि टिकून राहिली, पण २१व्या शतकातील बदलत्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पना आणि वाढत्या आकांक्षा (फ्रीडम अँड ऍस्पिरेशन्स) यांनी ही पूर्वापार चालत आलेली विवाहसंस्था आणि त्याची लवचिकता यांना परत आव्हान मिळू लागले आहे. समलैंगिक संबंधाबद्दलचे कलम ३७७ आणि या विवाहांना न्यायालयाने दिलेली संमती, तिहेरी तलाक मुद्यावर सरकारने काढलेला वटहुकूम. दफा ४९७ - अर्थात विवाहबाह्य संबंध गुन्हा ठरवणारे कलम असंवैधानिक असल्याने रद्द करण्याचा न्यायालयाचा निर्णय, शिवाय विवाहाअंतर्गत शारीरिक जबरदस्तीला बलात्कार समजावा का हाही प्रश्न ऐरणीवर आहे. ४९७ रद्दबातल केल्याने विवाहाचं पावित्र्य संपुष्टात येईल म्हणणे म्हणजे रोगाच्या लक्षणांना रोग समजल्यासारखं आहे. ते तथाकथित पावित्र्य संपुष्टात येण्याचा रोग आधीच जडलेला असतो. विवाहबाह्य संबंध हे त्याचे एक लक्षण असते (नॉट कॉज बट द रिझल्ट ऑफ अॅन अनहॅपी मॅरेज). मग मारून-मुटकून त्या रोगावर पावित्र्याचं पांघरूण का घालायचं? अर्थात प्रत्येक वेळेला दुभंगलेली मने हेच कारण असते असे नाही. अत्यंत सुखी लग्नातही विवाहबाह्य संबंध असू शकतात. शारीरिक गरजेची तीव्रता आणि सातत्य पूर्णपणे दोन टोकाचे असू शकते. एकापेक्षा जास्त व्यक्ती आवडण्याची, त्यांच्याशी संबंध ठेवण्याची मानसिक शारीरिक मोह आणि गरज असू शकते. हा गुन्हा नाही हे न्यायालयाने स्पष्ट केले.

तेव्हा धर्म बुडाला म्हणून अरण्यरुदन करण्यापेक्षा विवाहसंस्थेचा नव्याने विचार आणि व्यवहार्य मांडणी करण्याची गरज आहे.

**- धनंजय गांगल**

भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०

dhananjay.gangal@gmail.com

दीपक घारे

# 'कविथां'चं षांतारामीय अवकाश

**षांताराम पवार यांच्या 'कविथां'चे चार संच 'ग्रंथाली'ने प्रकाशित केले. बालसाहित्याच्या रूपबंधातून साकारलेल्या या 'कविथां'मधून अर्थाचे अनेकपदरी आकाश बोलके झाले आहे. कविता आणि कथा यांचा एकात्म अनुभव देणाऱ्या या 'कविथां'वरचा हा लेख...**

काही कविता, कथा अशा असतात की वाचताक्षणी त्यातलं वेगळेपण लक्षात येतं, पण हे वेगळेपण शब्दात पकडता येत नाही किंवा त्याची वर्गवारीही करता येत नाही. षांताराम पवारांच्या 'कविथा' या अशा प्रकारच्या कविता आहेत. होय! निवेदनाच्या सोयीसाठी मी त्यांना कविता असेच संबोधणार आहे. पण पवारांनीच सांगितल्याप्रमाणे त्या कविता आणि कथा दोन्ही आहेत. पण खरी समस्या पुढेच आहे. त्या लहान मुलांसाठी लिहिलेल्या आहेत की सर्वांसाठी. त्यांची धाटणी बडबड-गीतांप्रमाणे आहे की त्या नीतिकथा, बोधकथांच्या अंगाने जाणाऱ्या आहेत? त्यांचा आविष्कार भाषिक रचना, ध्वनी यांच्या खेळकर योजनेतून होतो की त्यामागे काही मूल्यात्मक आणि अनुभवसंचिताशी पोचणारा उपजत शहाणपणाचा (wisdom) भाग आहे? या कविता सर्जनात्मक आविष्कारासंबंधी काही सांगतात का? असतील तर कविता आणि त्यांची चित्रे यांच्यात कोणता अनुबंध आहे? असे अनेक प्रश्न पडतात. या प्रश्नांच्या शोधातून 'कविथां'चा काही अन्वयार्थ लागू शकतो का हे पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे.

'कविथा' या वरवर पाहता लहान मुलांसाठी लिहिलेल्या कविता वाटतात. प्रत्यक्षात या बालवाङ्मयाचा फॉर्म घेऊन मोठ्यांसाठी, नव्हे सर्वच वयोगटांसाठी लिहिलेल्या कविता आहेत. ज्याला जितपत आणि जेवढा अर्थ कळेल त्याचा त्याने आस्वाद घ्यावा. खोलात शिरलात तर उत्तमच. पण नाही शिरलात तरी आकलनाच्या प्रत्येक पातळीवर त्या तुम्हाला भावतातच. का? ते कारण सांगता येईलच असं नाही पण भावतात हे नक्की. या कवितांमध्ये काही वेळा काव्यात्मता अधिक आहे तर काहीत कथाभाग प्रथम डोळ्यांत भरतो. प्राचीन वाङ्मय हे मौखिक स्वरूपात असल्यामुळे ते पद्यरूपात आणि दृष्टांत, दाखले किंवा गोष्टीरूपांमध्ये असायचं. त्याची आठवण करून देणाऱ्या या कविता आर्ष वाङ्मयाशी नातं सांगणाऱ्या आणि त्या अर्थाने बालवाङ्मय आहेत. मानवी जिज्ञासेच्या पोटी असणारं अद्भुताचं आकर्षण (Sense of Wonder) आणि सत्यशोधनातली निरागसता यातल्या बऱ्याच कवितांमध्ये दिसते. कधी कधी निरागसता आणि कटू वास्तव यांच्यातला विरोधही या कवितांमधून प्रकट होतो. प्रत्येकात दडलेल्या या लहान मुलाला या कविता आवाहन करीत असल्यामुळे त्या सर्वांनाच भावतात.

कविथांचे एकूण चार संच ग्रंथालीने प्रकाशित केले. प्रत्येक संचात भेटकार्डाच्या चौकोनी आकाराच्या रंगीबेरंगी कार्डावर छापलेल्या तेरा कविथा होत्या आणि पोथी जशी बासनात बांधलेली असते तसा हा संच आकर्षक रंगीत कागदाच्या चार पाकळ्यांच्या फोल्डरमध्ये बांधलेला होता. पवारांना हे फ्ल्युरोसंट

भडक रंग अपेक्षित नव्हते असं ते सांगतात पण प्रथमदर्शनी मुलं आणि प्रौढ वाचकही आकर्षित होतात ते या बाह्यरूपामुळेच! प्रत्येक संचात पहिली कविता आहे- 'रिकामा' - निर्मितीची ऊर्जा आणि चेतना, त्यातून निर्माण होणारी सृष्टी, म्हटलं तर क्रीडा, म्हटलं तर वास्तव ही मध्यवर्ती कल्पना सांगणारी ही कविता असल्यामुळे ती सर्व संचांत आली असावी. कविथेचा एक नमुना म्हणून ही संपूर्ण कविताच पाहावी.

**रिकामा**

आज तो रिकामा होता
त्याला आकाश खोदावेसे वाटले.
गावाकडच्या सावल्यांना भेटावेसे वाटले.
बंद मुठीत आहे काय, बघावेसे वाटले.
बावन्नकशी चिमुटभर मिळवावेसे वाटले
जमले तर, आकाश जरा बदलावेसे वाटले.

सर्जकतेबद्दल सांगणाऱ्या आणखी काही कविता या संचांमध्ये आहेत. पण त्याबद्दल बोलण्याआधी विवेचनाच्या सोयीसाठी त्यांची वर्गवारी केली पाहिजे. काही कविथा बडबडगीतं या सदरात बसणाऱ्या आहेत. दुसरा गट आहे तो नीतिकथा किंवा दृष्टांतकथांची आठवण करून देणारा. तिसरा सर्जनाची प्रक्रिया काव्यात्म शैलीत सांगणारा. आणि काही कविथा आहेत त्या तात्त्विक आशय सांगणाऱ्या. इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. नीतिकथा सांगणाऱ्या कवितेत तात्त्विक आशय नसेलच असं नाही किंवा सर्जनप्रक्रिया सांगणाऱ्या कविथेत इतर घटक नाहीत असा त्याचा अर्थ नाही. प्रत्येक चांगल्या कवितेत हे चारही गुणविशेष कमीअधिक प्रमाणात आढळतील. त्यामुळे वर्गवारी ही फक्त विवेचनासाठी.

या कविथांचा थाट, घाट आणि आत्मा आहे तो बाळगाण्यांचा किंवा नर्सरी ऱ्हाइम्सचा. बडबडगीतांमध्ये म्हणजेच नॉनसेन्स व्हर्समध्ये असतो तितका शाब्दिक खेळ किंवा ध्वनीचा वापर यात नाही. किंवा बाळगाण्यात छंदोबद्ध ताल असतो तोही नाही. पण शब्दांच्या भाषिक, वाचिक उच्चारातून आणि संस्कृती चिन्हांमधून आलेली खेळकर विनोदी वृत्ती आहे. बाळगाण्यांमध्ये चंद्र, सूर्याच्या रूपाने निसर्ग असतो, माणसांप्रमाणे वागणारे, दोस्ती करणारे प्राणी असतात, अद्भुत आणि गूढ गोष्टी असतात. गोष्टीवेल्हाळपणा असतो. चालीरीती आणि संस्कार असतात. पवारांच्या कविथांमध्ये हे सारं आहे. पण यापेक्षा वेगळं, खास षांताराम पवारांचं असं एक वैशिष्ट्य या कवितांमध्ये आहे. तो म्हणजे उलटसुलट प्रतिमांचा, अर्थांतराचा, आकार अवकाशाच्या बदलत्या नात्याचा सतत चाललेला लपंडाव आणि त्यातली गंमत या कविथांना एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवते. बाळगाण्यांमध्ये शब्दांच्या पुनरावृत्तीला जसं एक नादमयतेचं प्रयोजन असतं तसं या आकार अवकाशाच्या पुनरावर्तित खेळाला अर्थच्छटांचं वस्त्र विणण्याचं आणि विशिष्ट पोत निर्माण करण्याचं प्रयोजन आहे. बाळगाणी जशी मनामध्ये त्याच्या नादमयतेमुळे गुंजत राहतात तसा या कवितांमधला छायाप्रकाशाचा आणि आकार अवकाशाचा खेळ दृश्यपटलावर रेंगाळत राहतो. कविथा रसिकांच्या मनात घर करून राहिल्या आहेत त्याचं कारण ही अदृश्य प्रतिमा हेच आहे. सगळं जग हाच एक आभास आहे, असाही एक अंत:स्वर या कवितांमधल्या गोष्टींना म्हणजेच घटितांना आहे.

प्रत्यक्ष कविथांची आता उदाहरणे पाहू. बाळगाण्यांच्या शैलीला शोभतील अशा कविथा म्हणजे 'भोवळ', 'भवरा' या कविता.


**भोवळ**

फिर फिर फिरून
पिवळा पिवळा गोळा लाल लाल झाला
भोवळ येऊन पडला
वितळून गेला वाहून गेला बुडून गेला
बुडत्यांना काडीचा आधार मिळाला
आजचा दिवस बरा गेला.

या दोन्ही कवितांमध्ये गतिमानता आहे. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेतलं अवस्थांतर आहे. खेळात असते तशी एक गंमतही आहे. पिवळा पिवळा, लाल लाल, फिर फिर, फिरता फिरता अशी पुनरुक्ती आहे. 'वितळून गेला वाहून गेला बुडून गेला' किंवा निसटला, बिथरला, पळाला, शिरला, सापडला अशी क्रियापदांची पुनरावर्ती पण क्रिया पुढे नेणारी मांडणी आहे. 'भोवळ' आणि 'भवरा'चा केंद्रबिंदू गती हाच आहे. गती म्हणजेच ऊर्जा. 'भोवळ'मध्ये कोड्याचे उत्तर सापडावे तशी सूर्य ही प्रतिमा लपलेली आहे. 'भवरा'मध्ये भवऱ्याच्या प्रतिकापासून कवितेची सुरुवात होते पण नंतर लक्षात येतं की मुलांच्या खेळातल्या भवऱ्यापेक्षा हा भवरा निराळा आहे. तो निसर्गामधल्या गतीबद्दल आणि मनाच्या अचपळ मनोवृत्तीबद्दल बोलतो. 'भवरा' कवितेची सुरुवात मुलांच्या खेळापासून होते. दुसऱ्या आणि तिसऱ्या ओळीत भोवरा ही नैसर्गिक ऊर्जेची प्रतिमा बनतो. शेवटच्या दोन ओळीत भवरा मानसिक आवर्तांची प्रतिमा बनतो आणि 'जात्यावर सापडला' या शब्दांमुळे त्याला सांस्कृतिक संदर्भही प्राप्त होतो. यापैकी 'चक्री वादळ' आणि 'बिथरला' या शब्दप्रतिमांमधून नैसर्गिक शक्तीच्या वर्णनाबरोबरच मानसिक आंदोलनांचे, मानसिक संतुलन बिथरल्याचे संकेत मिळतात. 'डोक्यात शिरला' या शब्दांनी मानसिक अवस्थेचंच हे वर्णन असल्याचं स्पष्ट होतं. 'जातं' या प्रतिमेला अनेक सांस्कृतिक संदर्भ आहेत. जात्यावरची ओवी आणि बायकांचं जात्याला जुंपलेलं कष्टमय जीवन असे सर्जकतेचे आणि चाकोरीबद्ध आवर्ताचे दोन्ही संदर्भ त्याला आहेत. हे सारे संदर्भ जागे ठेवून 'भवरा' ही कविता आता वाचून पहा.

**भवरा**

सुट्टीचे दिवस. मुले भवरा खेळत होती.
त्यातला एक भवरा फिरता फिरता निसटला,
चक्री वादळ झाला, समुद्रात बिथरला.
भवरा तिथूनही पळाला. एकाच्या डोक्यात शिरला.
आणि जात्यावर सापडला.




'भोवळ' आणि 'भवरा' दोन्ही कवितांमध्ये शब्दांच्या पातळीवर शब्दप्रतिमांच्या खेळाचा मोहक आभास आहे, पण त्यामागची अदृश्य प्रतिमा (लॅटंट इमेज) क्षणभंगुरतेची आणि आयुष्यातल्या संमोहाचीच आहे.

'कुक्कुले' अशीच एक बडबडगीतातल्या चमत्कृतीला साजेल अशी कविता आहे. एक म्हातारा कुक्कुलं बाळ झाला तर तो काय करील याचं गंमतीदार वर्णन या कवितेत आहे. लहान मुलांना त्यातली चमत्कृती आणि आजोबांच्या प्रतिमेशी विसंगत असलेलं म्हाताऱ्याचं वागणं विनोदाच्या अंगाने भावतं आणि कवितेतल्या विरोधाभासाला ती दाद देतात. पण ही कविता एवढ्यावरच थांबत नाही. कवीमध्ये जे एक वात्रट मूल दडलेलं आहे त्याला या कवितेतून वार्धक्यातल्या विपरीत शैशवाबद्दल आणि हटवादी-पणाबद्दल उपरोधिक भाष्य करायचं आहे. म्हाताऱ्याला 'स्वप्नाने पळवले' या वाक्यातच फँटसी अभिप्रेत आहे. म्हातारपण हे दुसरं बालपण असतं. पण या बालपणात बऱ्याच वेळा दुराग्रह आणि हट्टच असतात. निरागसतेचा तिथे मागमूस नसतो. एके काळी गाजवलेल्या कर्तृत्वाचा वृथा अभिमानही असतो. कितीही जोजवलं तरी आपल्या मूळ लक्षणांवर जाणाऱ्या म्हाताऱ्याचं, खरं तर कुणाही अशा माणसाचं हे व्यक्तिचित्र आहे. एकीकडे निरागस बालपण तर दुसरीकडे आयुष्यातल्या बऱ्या-वाईट अनुभवांनी संस्कारित झालेलं, अनुभवांच्या ओझ्याने विरूप झालेलं वार्धक्य अशा दोन टोकांमधला हा प्रवास आहे. बालपण → वार्धक्य ही नेहमीची प्रवासाची दिशा. उलट्या दिशेने प्रवास केला तर आपण जमवलेलं टाकून देऊ शकत नाही. मग उरते ती फक्त विसंगती. या विसंगतीवरचं एक तिरकस भाष्य इथे आढळतं.

**कुक्कुले**


एक होता म्हातारा. त्याला स्वप्नाने पळवले.
छान कुक्कुले बाळ केले. एका बाईच्या पदरात घातले.
तिने बाळाला दूध पाजले. पाळण्यात घातले, जोजवले.
तरी म्हाताऱ्याचे पाय नाही लपले.
'लाथ मारीन तिथे पाणी काढीन' म्हणाले.

अशीच 'फरक' नावाची कविता आहे. दोन हातांवरची ही कविता आहे. जुळे हात, सुखदुःख वाटून घेणं, आनंदाचा शेजार असणं असं दोन हातांचं गुण्यागोविंदानं जगणं अगदी आदर्श वाटावं असं. एखादा उखाणा असावा तशी ही कविता. फक्त 'हात' हे उत्तर आधीच आपल्याला कळतं. पण ही आदर्श रचना शेवटच्या दोन वाक्यांनी वाचकाला भानावर आणते. निसर्गाने निरागसपणे दिलं तरी माणूस त्याला विरूपाचं रूप देतो. या कवितेत सगळा समतोल साधलेला आहे. पण माणसाची उच्चनीचता, तरतमभाव, जातियता अशी भेदभावाची भ्रष्ट नीती आली की उजवं-डावं करणारा शाप आपला प्रभाव दाखवतो. भारतीय संस्कृती आणि शिष्टाचारात तर उजवं-डावंला फारच महत्त्व आहे. उजव्या हाताने सर्व चांगली कामं करायची, डाव्या हाताने शौचविधीसारखी स्वच्छतेची, दुय्यम कामं करायची. उजव्या-डाव्याचं एक कर्मकांडच आचारविचारांमध्ये एकेकाळी होतं. वाकडा मार्ग म्हणजे वाममार्ग. स्त्रीचं दुय्यम स्थान दाखवण्यासाठी ती पुरुषाच्या डाव्या बाजूला ('वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा') असावी हा संकेत. षांताराम पवारांची उखाण्यासारखी वाटणारी कविता क्षणार्धात सांस्कृतिक पूर्वग्रहांच्या कूटप्रश्नांमध्ये परावर्तित होते. परस्परपूरक घटकांची सममिती (symmetry) साधणारी ही कविता आशयाच्या दृष्टीने पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह स्पेस देखील डाव्या-उजव्याच्या निमित्ताने सूचित करते.

**फरक**

जुळे दोन हात असतात.
सुखदुःख वाटून घेतात.
आनंदाने शेजारी होतात.
माणसाला दोन हात मिळतात.
हातांना मात्र शाप मिळतो.
उजवा-डावा फरक कळतो.

वास्तव आणि आभास यांचा खेळही काही कवितांमधून येतो. उदा. 'चेहरे', 'मांजरे' किंवा 'वाघोबा', 'चेहरे' कवितेत



सावजाला वाटणारी शिकाऱ्याची भीती (मग ती उंदराला मांजराची किंवा माणसाला अज्ञात भविष्यकाळाची वाटणारी भीती असेल) आणि त्यातून येणाऱ्या अनामिक अस्वस्थतेचं चित्रण आलं आहे. 'मांजर आडवं जाणं' यासारख्या समजुती, ज्योतिषांचे आडाखे आणि चोरपावलांनी येणारा भविष्यकाळ खेळकर शैलीत व्यक्त होतो. 'मांजरे' आणि 'वाघोबा' कवितेत वास्तव आणि आभास यांचा लपाछपीचा खेळ अधिक तरल आणि दृश्यात्मकतेला कवेत घेणारा आहे. या दोन्ही कवितांमध्ये वास्तव आणि त्याची आभासात्मक प्रतिमा किंवा प्रतिबिंब आलेलं आहे. त्याला फँटसीचा स्पर्शही झालेला आहे. 'वाघोबा' कवितेत फुटलेला आरसा आहे. त्यात पतंगासारखा फाटलेला ढग वाकून पाहतो आहे. तिथे चटेरीपटेरी वाघ येतो आणि आरशातील ढग पळून जातो. आणि वाघोबा आरशात बुडून मरतो. लोक त्या वाघाला थोडा थोडा घरी नेतात आणि वाघ मारला म्हणून सांगतात. आरसा हे प्रतिबिंब मानलं, आभासाचं विश्व मानलं तर ढग, वाघ, लोक हे वास्तव जगाचे प्रतिनिधी ठरतात. वास्तव आणि आभास यांच्यामधली ही देवाणघेवाण आहे. वाघामुळे ढगाचं प्रतिबिंब पळून जाणं, वाघोबाचं आभासात्मक मरणं, लोकांच्या हाती त्याचे अवशेष लागणं (म्हणजे पुन्हा वास्तवात येणं), 'वाघ मारला' असं लोकांनी सांगणं म्हणजे मिथ तयार करणं असा एक आभास/वास्तवाचा लुटुपुटूचा खेळ इथे रंगतो. आणि लक्षात येतं की वास्तवातले ढग, वाघ, माणसं ही सुद्धा इथे प्रतीकरूपानेच आलेली आहेत. म्हणजे सारा खेळ आभासी वास्तवाचा (Virtual reality) आहे. एम.सी. ईशर (M.C. Escher) यांच्या चित्रांमध्ये आकार आणि अवकाशाचा तसेच दृष्टिभ्रमाचा खेळ असतो, तसाच काहीसा प्रकार या कवितांमध्ये आहे. 'फरक' कवितेतील जुळलेले हात आणि ईशरने काढलेले हाताचे चित्र यांची इथे आठवण होते. फुटलेला, फाटलेला, चटेरीपटरी या शब्दांमधून अवकाशाचं विभाजन सूचित होतं. वाघ मारल्याचा तुकड्या-तुकड्यांमधला अनुभव भंगलेल्या आणि तुकड्या-तुकड्यांमध्ये विभागलेल्या आधुनिक आणि उत्तर आधुनिक कलाजाणिवेशी अधिक जवळचा आहे.

'मांजरे' कवितेत आदिम भूक, भक्षकाच्या तावडीतून सुटण्याची जैविक प्रेरणा हे वास्तव आहे, पण या लपंडावाला आभासी सृष्टीतल्या आकार-अवकाशाच्या खेळाचं रूप लाभलेलं आहे. मांजर, उंदीर, कावळा या वास्तवातल्या प्राणिसृष्टीला इथे प्रतिकात्मक रूप मिळालेलं आहे. उंदीर मांजराच्या तावडीतून सुटला पण कावळ्याच्या तावडीत सापडला. 'उंदीर कावळ्याच्या तोंडी दिसला. मांजरांच्या पोटात तेव्हा कावळे होते. पोट दुखेपर्यंत हसत होते.' उंदीर तोंडात धरलेला कावळा वास्तवातला धरला तर मांजराच्या पोटातले कावळे लाक्षणिक अर्थ असलेले आहेत. एकीकडे कावळा भक्ष्य सापडल्यामुळे होकारात्मक, पॉझिटिव्ह अवकाश सूचित करतो तर दुसऱ्या बाजूला मांजरांच्या पोटातले कावळे अभावात्मक असल्यामुळे निगेटिव्ह स्पेस सूचित करतात. 'पोटात कावळे ओरडणे' हा वाक्प्रचार. त्यातून भूक सूचित होते. 'पण पोट दुखेपर्यंत (पोटातले कावळे) हसत होते' या ओळीमुळे, त्याला असूयेची, दुसऱ्याला खिजवण्याची मात्रा मिळाल्यामुळे सगळ्या कवितेला कलाटणी मिळते आणि ती माणसाची कविता होते!

**वाघोबा**

आरसा होता फुटलेला, उताणा वाटेत पडलेला.
ढग त्यात वाकलेला, पतंगासारखा फाटलेला.
तिथे चटेरीपटेरी वाघ आला.
त्याला बघून आरशातील ढग पळून गेला.
आणि वाघोबा आरशात बुडून मेला.
लोकांनी त्याला थोडा थोडा घरी नेला.
सांगितले, वाघ मारला.

**मांजरे**

एक मांजर उंदरामागे पळाले. दुसरे बिळाशेजारी बसले.
तरीही उंदराने मांजरांना चकवले.
मांजरे खूप चिडली. चोवीस तास पहाऱ्याला बसली.
आणि उंदीर फसला. कावळ्याच्या तोंडी दिसला.
मांजरांच्या पोटात तेव्हा कावळे होते.
पोट दुखेपर्यंत हसत होते.

या कविथांमधलं कवित्व पाहिल्यानंतर आता त्यांचं कथारूप पाहूया. एका अर्थाने या मुलांच्या गोष्टी आहेत. देव, राक्षस, संन्यासी, हत्ती, मुंगी, राजा-राणी अशी गोष्टींमधली पात्रं त्यांच्या सांस्कृतिक संदर्भांसह इथे आलेली आहेत. बोधकथा किंवा नीतिकथांमध्ये असतात तशा चांगल्या-वाईटाच्या निश्चित कल्पना इथे नाहीत. म्हणजे त्या काळ्या पांढऱ्या रंगात बाळबोधपणे मांडलेल्या नाहीत. माणसाची नीती-अनीती, खरं तर अनीतीच त्यात उपरोधाने सूचित केलेली आहे. एका बाजूला परीकथेतली अद्भुत मांडणी आणि दुसऱ्या बाजूला मिथ्यकथेतलं मिथक किंवा रूपक या कविथांमधून येतं. त्यामुळे काही निवडक कविथा तात्त्विक आशय अगदी सहजपणे सांगून जातात. आभासी विश्वाचं रूपांतर गूढ अनुभवामध्ये किंवा झेन कथांमधल्या तत्त्वज्ञानातल्या विरोधाभासातून सत्याचा साक्षात्कार घडवणाऱ्या दृष्टांत कथांमध्ये होतं. 'गवत', 'वेताळ' या गूढवादी कविथा आहेत तर 'दुष्काळ', 'आनंद' या दृष्टांतकथा आहेत.

'धनबा' कवितेत दरिद्री ग्यानबा आयुष्यभर राबतो. दारात कल्पवृक्ष लावतो, आयुष्यात सारं काही मिळवून आनंदाने 'राम' म्हणतो. ग्यानबाचा मुलगा हाती आलेली संपत्ती खर्च करतो. कोठार, खजिना, कल्पवृक्ष सारं नष्ट होतं आणि दुष्काळात तेरावा महिना येतो. धनबाला ग्यानबाची मेख प्रत्ययाला येते. या कथेचा घाट बायबलमधल्या 'द प्रॉडिगल सन'सारख्या पॅरैबल्स अथवा बोधकथांना जवळचा आहे. 'दिवस' कवितेत गावात मिठाई नाही म्हणून ती आणायला एक मुंगी गावाबाहेर

पडते आणि राजवाड्यापर्यंत पोचते. तिथे राणी एकटीच मिठाईच्या डोंगरांवर ताव मारताना बघून तिच्या आप्पलपोटेपणाचा राग येऊन रागाने लाल होते आणि त्यातच मरते. 'काविळ' कवितेत अर्ध्या हळकुंडाने स्वत:च्या सावलीला गोरी करण्याचा ध्यास घेतलेला सावलीचा धनी काविळीने मरतो. 'खेकडे' कवितेत एकमेकांचे पाय ओढणारे खेकडे माणसांचं प्रतीक बनून येतात. या कवितांमध्ये संदेश आहे पण पंचतंत्र किंवा इसापनीतीतल्या कथांसारखा तो उघडपणे उपदेशाच्या रूपात आलेला नाही. 'खेकडे'मध्ये खेकडा हा सरळपणे माणसांचे रूपक म्हणून आलेला आहे. पण 'दिवस'-मधली मुंगी आणि राणी यातली प्रतिकयोजना अधिक तरल आणि वाचकांना गुंतवून ठेवणारी आहे. 'वेताळ'मधले घुबड हे देखील अज्ञानामुळे येणाऱ्या भीतीचे आणि गूढतेचे प्रतिक आहे. त्याच्या झाडाखालचे पुस्तक हाती लागताच अज्ञानाचा अंध:कार दूर होतो आणि प्रवासी ज्ञान वाटून टाकतो. इथे वेताळाचे मृत्यूशी असलेले नाते, कूटप्रश्न मांडणाऱ्या विक्रम आणि वेताळाच्या कथांमधून येणारी वेताळाची गूढ, भीतिदायक पण ज्ञानी माणसाची प्रतिमा आणि भारतीय परंपरेतील अशुभाचे आणि पाश्चात्य संस्कृतीतील ज्ञानी माणसाचे प्रतीक असलेले घुबड अशी एक व्यामिश्र प्रतिकरचना तयार होते आणि एक वेगळंच मिथक तयार होतं. 'संन्यासी' कवितेत 'ब्यूटी अँड द बीस्ट'सारख्या परीकथांचा तोंडवळा घेऊन आलेली कथा पर्यावरणाचा संदेश देते. हत्तीएवढ्या वाघामधून संन्यासी प्रकट होतो. झाडं तोडल्याबद्दल, प्राण्यांना मारल्याबद्दल गावकऱ्यांना दिलेला शाप गोट्याने क्षमा मागितल्यानंतर तो मागे घेतो. 'चांदण्या' आणि 'चेटूक' कविता चैतन्यशक्तीचा, कालगतीचा वेध घेणाऱ्या स्वप्ननगरीतल्या वाटाव्यात अशा परीकथाच आहेत. राक्षसांचा मागमूसही नसलेल्या!

या कवितांमधल्या काही कथा तत्त्वज्ञानाच्या प्रांतात शिरणाऱ्या आहेत. 'परीक्षा', 'उत्तर' आणि 'आनंद' या कविथा अशा प्रकारच्या आहेत. जीवनाचा एक व्यापक अनुभव कविथेच्या चतकोर अवकाशात सामावण्याची किमया या कविथांनी केलेली आहे. 'परीक्षा' कवितेत अहोरात्र शून्याचा जप करणारा 'तो' आहे. त्याला शून्याचा पाढा येतो. तो उत्तरे देण्याचे टाळतो. पण परीक्षा घेणारा कुणीतरी त्याचा खिसा कापतो आणि आकाशाकडे झेपावलेले बुडबुडे बघून कैचीत सापडतो. 'पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्णमेवावशिष्यते'. पूर्णातून पूर्ण वजा केलं की बाकी पूर्ण राहते. या वचनाची उलटी बाजू म्हणजे शून्य. शून्य म्हणजे पूर्ण अभाव नव्हे तर प्रकट बलाला पूर्णत्व देणारी पूरक शक्ती. कृष्णविवरातही जसं विश्व आकुंचित स्वरूपात सामावलेलं असतं, पण डोळ्यांना दिसत नाही तसाच शून्याच्या चैतन्यशक्तीचा हा प्रताप आहे. 'उत्तर' कवितेतही एक वैश्विक फूटपट्टी आहे. Scale किंवा प्रमाणबद्धता मापणारी. गार्गीच्या हाती फूटपट्टी पडताच ती अनेक वर्षे प्रवास करून आणि नंदीची लांबी, आकाशाची रुंदी, समुद्राची खोली आणि पर्वताची उंची मोजून येते. एका मोठ्या चित्रफलकावर विस्तारलेलं हे अवकाश एका गहन प्रश्नापाशी येऊन थांबतं. एवढं करूनही माणसाचं मन काही मापता आलं नाही याची गार्गीला खंत आहे. त्यावर आईचं उत्तर आहे, 'बाळ, माणसाचं मन कदाचित प्रश्नांनी मापता येत असावं, प्रश्नांनी!' या उत्तरात मनाची अथांगता सूचित होते आणि याबरोबरच मोजमापाचा तर्कसंबद्ध विचार आणि मनाचं तर्कापलीकडचं अस्तित्व आणि वर्तन यातून सूचित होतं. 'आनंद' कविथेने यापुढची, झेन कथेची पायरी गाठली आहे.

**आनंद**

स्वामींचा आवडता शिष्य आनंद डोंगर,
नद्या जंगले ओलांडतो.
स्वामींच्याही पुढे येतो. गंगेच्या उगमाकडे पोचतो.
आनंद गगनात मावेनासा होतो.
तोच, आनंदची सावली साक्षात् गुरुमाउली आनंदसमोर उभी राहते;
म्हणते, 'वत्सा! गंगोत्री अजून दूर आहे
भासांच्या पलिकडे जायचे आहे.'



आनंद

स्वामींचा आवडता शिष्य आनंद डोंगर, नद्या, जंगले ओलांडतो.
स्वामींच्याही पुढे येतो. गंगेच्या उगमाकडे पोचतो.
आनंद गगनात मावेनासा होतो.
तोच, आनंदची सावली साक्षात् गुरुमाउली आनंदसमोर उभी रहाते;
म्हणते, 'वत्सा! गंगोत्री अजून दूर आहे.
भासांच्या पलिकडे जायचे आहे.'

झेनकथेत नेहमी विरोधाभास असतो आणि एखाद्या साक्षात्कारासारखं अचानक सत्याचं दर्शन होतं. या कथेतही आनंद अगदी शेवटच्या टप्प्यावर पोचलेला असतानाच आपल्याला झालेलं सत्यदर्शन हाही एक भासच आहे याचा साक्षात्कार त्याला होतो. इथे आनंद शब्द दोन अर्थांनी आलेला आहे. 'आनंद गगनात मावेनासा होतो.' याचा शिष्याला झालेला आनंद, कृतार्थतेची जाणीव हा एक अर्थ झाला.

दुसरा अर्थ आनंद एवढा महान होतो की तो गगनात मावत नाही. त्यात 'आपल्याला समजलंय' अशी अहंकाराची छटा येते. या फुगलेल्या अहंला सारासारविवेक असलेला आणि सावलीसारखा त्याच्यातच सामावलेला गुरू भानावर आणतो आणि सांगतो की आपल्याला सत्यदर्शनाच्या भासांच्या पलीकडे जायचं आहे. आपल्या ज्ञानेंद्रियांना जाणवणारं जग ही माया आहे हे तत्त्व अनेक तत्त्वविचारातून आलेलं आहे. 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या'पासून ते

ग्नॉस्टिक्स या ख्रिस्ती धर्मपंथीयांपर्यंत वेगवेगळ्या पद्धतीने ते आलेलं आहे. जग म्हणजे तामसी शक्तीने निर्माण केलेला आभास आहे असं ग्नॉस्टिक्स मानतात. झेन तत्त्वज्ञान असं सांगतं की साक्षात्काराची अशी एखादी अवस्था की जिच्यामुळे एखादी व्यक्ती बाह्य आणि अंतर्गत वास्तव सत्याशी एकरूप झालेली असेल. तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वानिशी वास्तव सत्याला सामोरे जाणे म्हणजे परिपूर्ण अवस्थेला पोचणे. कधी कधी ही अवस्थाही भ्रामक असू शकते. अशा वेळेस गुरु शिष्याला भ्रामक आणि खऱ्या परिपूर्णावस्थेतील फरक समजावून सांगतो. 'आनंद' कवितेत स्वामी शिष्य आनंदाला नेमकं हेच सांगतात.

'संन्यासी' कविथेचं 'ब्यूटी अँड बीस्ट' परीकथेशी असलेलं साम्य यापूर्वीच सांगितलं आहे. पण त्यामागचा तात्त्विक आशय पाहिला तर तो 'आनंद' कविथेपेक्षा थोडा वेगळा आहे. ब्यूटी ही चार मुलींपैकी एक. तिच्या पांढऱ्या गुलाबाच्या हट्टापायी तिचे वडील बीस्टच्या-जंगली श्वापदाच्या बागेतलं फूल तोडून आणतात. त्यामुळे बीस्टला राग येतो आणि तो तीन महिन्यांनी वडिलांनी शिक्षा भोगायला यायचे फर्मान सोडतो. वडिलांऐवजी ब्यूटीच बीस्टकडे तीन महिन्यांनी जाते. त्याच्याकडे राहते. तो तिला लग्नाची मागणी घालतो. ब्यूटी त्याच्या प्रेमात पडते आणि त्याची पत्नी होण्यास मान्यता देते. त्याक्षणी जंगली श्वापदाचं रूपांतर तरुण, सुंदर राजपुत्रात होतं. युंगच्या मानसशास्त्रानुसार या परीकथेचा अन्वयार्थ लावला जातो तो असा- बीस्टच्या रूपाने क्रौर्य आणि चांगुलपणा एकत्रपणे नांदणारी माणसाची नियती घडवणारी अज्ञात नैसर्गिक शक्ती परीकथेत येते. ब्यूटीसारख्या निरागस मुलीने या शक्तीला ओळखणं, जिंकून घेणं आणि निसर्गशक्तीशी एकरूप होणं अशी आत्मभान जागृत होण्याची ही प्रक्रिया आहे. 'संन्यासी'च्या कथेत हत्तीएवढ्या वाघात संन्यासी दडलेला आहे. निसर्गाचं रक्षण करणारा. गोट्याने वाघाला ओळखणं, त्याची क्षमा मागून गावकऱ्यांना झाडं तोडण्याच्या अपराधातून मुक्त करणं आणि जटाधारी औदुंबर (ज्यात ज्ञान, निसर्ग आणि गुरू-शिष्य नातं सगळंच आहे) - त्याच्या मांडीवर ध्यानाला बसणं ही सुद्धा गोट्याची एका अर्थाने ब्यूटीप्रमाणे आत्मभानाची अवस्थाच आहे.

षांताराम पवारांच्या कविथांमध्ये तात्त्विक आशयाची सूत्रे आहेत ती अशी - आपल्याला होणारं आकलन हे उजवं-डावं, अंधार-प्रकाश अशा द्वैतपूर्ण अनुभवातून होतं. वास्तवाचं होणारं ज्ञान हा एक आभास (illusion) असतं. निसर्गनिर्मित व्यवस्थेचा प्रवास मानवी स्वभावामुळे अव्यवस्थेकडे होतो. 'संन्यासी'सारख्या काही अपवादात्मक कवितांमध्ये अव्यवस्थेकडून व्यवस्थेकडे प्रवास झालेला दिसतो. हे विरोधपूर्ण तणावपूर्ण जगणं सर्जकतेला पोषक ठरतं. म्हणूनच निर्मितीप्रक्रिया अत्यंत तरलपणे सांगणाऱ्या कविताही या संग्रहात आहेत.

आता या सर्जकतेच्या कवितांबद्दल थोडेसे बोलू या. कारण पवार हे चित्रकार कवी! आणि या कविथांमध्ये सर्जकतेचा अनुभव शब्दांमध्ये असला तरी त्यातल्या प्रतिमा दृश्यात्मकतेला जवळच्या आहेत. लेखाच्या सुरुवातीला दिलेली 'रिकामा' ही कविथा पाहा. वरवर डोळ्याला दिसणारं रिकामपण म्हणजे रितेपण नव्हे, अनेक शक्यता पोटात असलेलं हे अवकाश आहे. अव्यक्त अवकाश आणि व्यक्त, गोचर आकार यांचा खेळ म्हणजे ही कविता. 'आकाश खोदावेसे वाटले' या ओळीत आकाश अवकाश (space) म्हणून येते. 'खोदावेसे' शब्दाने आकाशाचं रूपांतर भरीव अशा भौतिक आकारामध्ये करण्याची कवीची इच्छा सूचित होते. गावाकडच्या सावल्या म्हणजे अमूर्त भावनांचं अबोध मन, त्यांना भेटण्याची इच्छा म्हणजे मन आणि शरीराची भेट. बंद मूठ, बावन्नकशी यांना भौतिक आकार आहे तर बघावेसे, मिळवावेसे या क्रियांना अमूर्त आकांक्षांचे लवचीक अवकाश आहे, 'पावसाच्या हातांमध्ये' अदृश्य प्रेरणा आहे तर 'पेरावेसे' वाटण्यामध्ये बीज आकाराला येणे आहे. सुरुवातीला आकाश खोदावेसे वाटणारा कवी आकाश (जमले तर) बदलवण्याची भाषा करतो. म्हणजेच आकार अवकाशाचा खेळ स्थिर, गतिहीन न राहता तो कलाकृतीच्या आशयाप्रमाणे बदलता, नित्यनूतन राहावा अशीच त्याची अपेक्षा आहे.

आकार अवकाशाचं द्वैत या कविथांमध्ये प्रकाश-सावली, अंधार-प्रकाश अशा रूपकांमधूनही येतं. 'अंधार' कवितेत 'कागदी होडीतून एक ज्योत प्रवासाला निघते. 'सातासमुद्रापलीकडे झोपलेल्या अंधाराच्या ओठाला लागून झोपमोड करते.' अंधाराच्या मनातील काळे जागे होते. तेव्हा काजव्याच्या पिलासारखी ज्योत सूर्यासारखी तळपते. अमृताच्या पैजा जिंकते'. 'कागदी होडी' आणि 'अमृताच्या पैजा' या दोन प्रतिमांमुळे यातला सूर्य आणि प्रकाश साहित्य कलाकृतीचे संदर्भ जागे करतो. इथे अंधाराला दोन छटा आहेत. अंधार हा अवकाशाप्रमाणे संभवाच्या साऱ्या शक्यता सामावलेला असा आहे. 'मनातील काळा अज्ञानाचा, नकारात्मक, दुष्ट प्रवृत्ती, मानसिक गंडांचा-पूर्वग्रहांचा सूचक आहे. ज्योत ही सकारात्मक आत्मशोध घेणाऱ्या वृत्तीचं प्रतीक आहे. सातासमुद्रातून आत्मशोधातून येणाऱ्या आत्मभानाचा प्रवास सूचित होतो आणि अंधाराच्या ओठातून जाणिव-नेणिवेची सीमारेषा स्पष्ट होते. प्रकाशाची तीव्रता दाखवणाऱ्या दोन छटा इथे काजवा आणि सूर्य या प्रतिमांमधून व्यक्त होतात. मनातल्या अज्ञानरूपी काळेपणाचा सामना करण्यासाठी एरवी शीतल, आल्हादक असलेला काजव्या-चा प्रकाश स्वयंप्रज्ञतेच्या प्रखर तेजाचे सूर्याचे रूप धारण करतो. 'अमृताच्या पैजा'मुळे ज्ञानेश्वर आठवतात आणि 'अमृतानुभवा'तील ज्ञान-अज्ञान निरसनाबद्दलचं विवेचनही. विज्ञानाच्या दृष्टिकोनातून पाहिलं तर कृष्णविवर (black hole) आणि ऊर्जा हे द्वैत या कवि-थेत दिसतं. या कवितेतला तात्त्विक आशय निर्मितीक्षम ऊर्जेबद्दल अधिक सांगतो.

'सावली' या कविथेत सावली आणि प्रकाश असं द्वैत आलेलं आहे. इथे पुन्हा अंधार आणि सावली अशा काळ्या रंगाच्या दोन छटा आहेत. सावली आणि प्रकाश यांच्या लपंडावात दोघांचे रुसवे फुगवे होतात आणि ते एकमेकांना सोडून जातात.

त्यामुळे अंधार सावलीला पळवायचं ठरवतो. पण टिटवी हे कपट सावलीकडे उघड करते. 'सावली प्रकाशाच्या पाठी लपते. अंधाराचे नाक कापते. 'अंधार हा प्रकाशावर अवलंबून नसतो. तो असतोच. पण प्रकाश असला तरच सावली असणार. सावली ही अहंच्या, इगोच्या अप्रगट, अंधाऱ्या जगातल्या जैविक प्रेरणांची प्रतीक आहे. प्रकाश सुखांतिकेला जन्म देतो तर सावली शोकांतिकेला. सावलीला प्रकाशाशिवाय आपण असुरक्षित आहोत असं कळतं तेव्हा ती प्रकाशात विलीन होते. माणसाला प्रकाशाबरोबरच अहंचा अंधारा भागही माहीत होणं, तो समजून घेणं म्हणजे पूर्णावस्थेला पोचणं. 'सावली' पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह स्पेसच्या खेळात हा आशय दडलेला आहे.

'आकाश' आणि 'गंमत' या कविथा तर सरळ सरळ काळ्यावर पांढरे करण्याविषयी आणि रेषा व रेखांकनाबद्दल बोलणाऱ्या आहेत. निर्मितीचे माध्यम आणि आशयाचे रूपांतर याबद्दल त्या बोलतात. निर्जीव आकृतिबंधाचे चैतन्यपूर्ण आशयात होणारे रूपांतरही त्यात दिसते. 'आकाश' कवितेत चिंतूची पावले पांढऱ्याधोप खडूवरून घसरली. काळ्या भिंतीवर आदळली; खडू संपेपर्यंत चिंतूने भिंतीवर रेघा ओढल्या; त्या ओळी शहारल्या; हिरव्या झाल्या; अशा ओळी येतात. या कविथेत एक दृश्य चित्र उभे राहते. खडूने फळ्यावर काढलेल्या उभ्या-आडव्या रेषा, ग्रिडसारख्या. काळ्या-पांढऱ्या रंगात हिरव्या रंगाने आणलेलं चैतन्य. काळ्यावर पांढरे, पांढऱ्यावर काळे – उलटसुलट शब्दांमधून बदलणारे आकार-अवकाशाचे नाते. रेषा फळ्यावर आहेत, पण वाट चुकलेला चिंतू आकाशातलं वाचतो आहे. चौकट मोडून तो आता चौकटीबाहेरचं पाहू शकतो आहे. 'गंमत' कविथाही अशीच.

**गंमत**

त्या दिवशी मोठी गंमत झाली.
गौरीला दगडावरची रेघ दिसली.
चंद्रकोर भासली, गळ्यात घालाविशी वाटली.
गौरीने दगडावरची रेघ उचलली, तर वीज चमकली.
गौरीला जादूची कांडी सापडली.
ती कांडी गौरीने गंगेच्या ओटीत भरली.
गंगा अशी दुथडी भरून वाहू लागली.

या कवितेत अवकाश चहू अंगांनी कवेत घेता येते. दगडा-वरची रेघ ही सुरुवातीला 'वस्तू' आहे. दोन मिती असलेली प्रतल विभागणारी रेषा. गौरी कलाकाराच्या दृष्टीतून या रेषेचा चिन्हार्थ वाचते. त्याक्षणी रेषेभोवतालचं अवकाश सचेतन होतं. चंद्रकोर म्हणून गळ्यात घालावीशी वाटणं म्हणजे चिन्हाचं रूपांतर प्रतिमेत होतं. दगडावरची रेष उचलताच प्रतलाला तिसरी मिती लाभली आणि वीज चमकली. त्याक्षणी काळही प्रवाही झाला. गौरीला जादूची कांडी सापडली. तिने ती गंगेच्या ओटीत भरली. 'वीज चमकली' यातून नंतर होणारा कड्कड् आवाज अध्याहृत आहे. म्हणजेच अवकाश श्राव्य झालं. जादूच्या कांडीने स्पर्शसंवेदनेतूनही अवकाश कळले. पण अजूनही गौरी, चंद्रकोर या भिन्न पातळीवर



आकाश

चिंतूची पावले वाट चुकली.
पांढऱ्याधोप खडूवरून घसरली. काळ्या भिंतीवर आदळली.
आतापर्यंत चिंतूने काळ्यावर पांढरे केले नव्हते.
पण आज खडू संपेपर्यंत चिंतूने भिंतीवर रेघा ओढल्या.
त्या ओळी शहारल्या. हिर्व्या हिर्व्या झाल्या.
तेव्हापासून चिंतू पांढऱ्यावर काळे करू लागला.
आकाशातले वाचू लागला.

आहेत. कांडी गंगेच्या ओटीत भरल्यावर गंगा दुथडी भरून वाहू लागते. इथे स्थूल आणि सूक्ष्म, देह आणि विश्वरूपी अवकाश यांची एकरूपता होते आणि अवकाशाचं प्रवाहीपण तेवढं जाणवत राहतं. अवकाशाच्या मिती बदलत जाणे, विविध पातळ्यांवर त्या जाणवणे हे इथे महत्त्वाचं आहे. सभोवतालच्या अनुभवातून कलाकार कलाकृती घडवत असतो. दगडावरची रेघ, आकारबद्धता किंवा अश्मीभूत अवस्था हा त्याचा अंतिम टप्पा असतो. रसिक प्रेक्षक या रेघेपासून सुरुवात करतो आणि कलाकृती मन:चक्षूंसमोर जिवंत करतो. गौरीचा अनुभव या जातीचा आहे.


'चेटूक' कविथेतील निष्पर्ण वृक्षावर आलेली पाने, फळे आणि पोपटांचे लाल चेटूक म्हणजे साक्षात्कारी सौंदर्याचा परमोच्च बिंदू आहे. पोपटी पाने आणि हिरवे पोपट, लाल डाळींब आणि पोपटांच्या लाल चोची यांच्यामधली अदलाबदला निसर्ग क्रीडा, तिचे अखंड रूपांतरण आणि त्यातलं अद्भुत (Sense of wonder) यांचा एक विलक्षण, उत्कट प्रत्यय देतं. इथे सारा काळ निर्मितीच्या परमोच्च बिंदूवर क्षणभर गोठल्यासारखा वाटतो. षांताराम पवारांच्या या कविथांना अर्थपूर्ण करणारा काळ हा देखील एक महत्त्वाचा घटक आहे. गार्गींच्या फूटपट्टीमध्ये तो आहे आणि 'चांदण्या' कविथेतल्या चांदण्यांच्या आणि गोगलगायीच्या कालगतीबद्दलच्या धारणांमध्येही आहे. कधी कधी विविध कालखंडातल्या अथवा विविध क्षेत्रातल्या प्रतिमा एकत्र आणून पवार काळाची एक संभ्रमावस्था निर्माण करतात आणि रूढ प्रतिमा प्रतिकांना वेगळा अर्थ देतात. 'दुष्काळ' कविथेतला सावकार दुष्काळी प्रदेशात तहानलेल्या गाढवांना आधी पाणी पाजतो. मग ओंजळभर उरलेलं पाणी पिण्यासाठी विहीर जवळच्या चांदीच्या मोहोरांनी भरतो आणि वर आलेलं पाणी पितो. चांदीच्या मोहोरांचं मृगजळ पाठी सोडून दूर पुढे निघून जातो. या कवितेत वेगवेगळे संदर्भ एकत्र आले आहेत. एकनाथांनी गाढवाला पाणी पाजल्याची कथा, तहानलेल्या कावळ्याने रांजणात खडे टाकून वर आलेलं पाणी प्याल्याची उपदेशकथा, संपत्ती हे मृगजळ

आहे हे सांगणारी दृष्टांतकथा अशा गोष्टी एकत्र आलेल्या आहेत. त्यात भूतदया, प्राण्यांना समानतेची वागणूक यासारखी नैतिकता आहे. इसापनीतितली अक्कलहुशारी आहे. समबुद्धीने साऱ्या जीवनसंघर्षाकडे पाहण्याची अध्यात्मिक वृत्तीही आहे. वास्तव काळात या सर्व गोष्टी एकत्र येण्याची शक्यता नाही. गोष्टीच्या आभासमय काळाच्या चौकटीतच त्या एकत्र नांदू शकतात. 'कावळा' कथेतही सांस्कृतिक प्रतिमांची अशीच सरमिसळ झालेली आहे.

**कावळा**

कावळा दररोज येतो.
खात नसतो, पीत नसतो, झोपत नसतो.
कावकावसुद्धा करीत नसतो.
कावळा जागा चुकला आहे. गावाला वळसे घेतो आहे.
सफरचंद शोधतो आहे.
एक दिवस कावळा फांदीवर बसतो आणि फांदी मोडतो.
न्यूटनच्या हाती सफरचंद देतो.
आर्किमिडीज तेव्हा 'यूरेका', 'यूरेका' म्हणत पळत सुटतो.

कावळ्याबद्दल भारतीय संस्कृतीतले काही संकेत आहेत. परलोकाशी असलेला त्याचा संबंध हा त्यापैकी एक. काकतालीय न्यायं हा दुसरा. सफरचंद ॲडम इव्हच्या कथेतून आलेलं मोहाचं प्रतीक. न्यूटनचं सफरचंद गुरुत्वाकर्षणाचा नियम सांगणारं. सतराव्या शतकातल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचं प्रतीक. तर आर्किमिडीज ग्रीक संस्कृतीतला. त्याच्या सिद्धांतांपेक्षा स्वत:च एक मिथ बनलेला. काळ आणि संस्कृती भिन्न असलेले हे संदर्भ पवारांच्या कवितेत एकत्र येतात तेव्हा त्यांचे संदर्भ बदलतात आणि काही वेगळाच आशय सांगू पाहतात. पवारांच्या कविथेच्या अवकाशात त्यांना त्यांच्या मूळ अर्थापासून वेगळा असा स्वायत्त अर्थ आहे. तो अर्थातच संदिग्ध आहे. या कवितेचं मध्यवर्ती केंद्र सफरचंद हे




आहे. सफरचंद एक प्रतीक म्हणून पवारांनी आपल्या चित्रांमध्ये अनेकदा अनेक अर्थांनी वापरलं आहे. इथे सफरचंद जीवनातील सत्याचं प्रतीक वाटतं. कावळा या सत्याच्या शोधात तहानभूक हरपून गावाला वळसे घेत आपली जागा शोधतो आहे. काळ आणि नियतीचं प्रतीक किंवा आत्मशोध घेणाऱ्या समूहमनाचं प्रतीक म्हणून कावळ्याकडे पाहिलं तर कावळा न्यूटनला सफरचंदाच्या रूपात ठोस वाटणारा असा सत्याचा एक अर्थ देतो. त्याचा आनंद आर्किमिडीसच्या 'सापडलं! सापडलं' या उद्गारांमधून व्यक्त होतो. खरं तर सफरचंद आणि आर्किमिडीसच्या 'युरेका' उद्गारांमधली साफल्याची भावना भ्रामक आहे. सत्य सापडल्याचा आभास निर्माण करणारी आहे. या कविथेतल्या घटनाक्रमाला एक कार्यकारणभाव आहे. तशाच त्यात काही विसंगतीही आहेत. कावळ्याने न्यूटनलाच सफरचंद का द्यावे? न्यूटनला सफरचंद मिळाल्याचा आर्किमिडीसला आनंद का व्हावा? या विसंगतीलाही काही अज्ञात पातळीवरची सुसंगती आहे का? अशा बौद्धिक खेळात ही कविथा वाचकाला गुंतवून ठेवते. लुईस कॅरॉलची एलिस 'जॅबरवॉकी' ही कविता वाचून उद्गारते, ''ही खूप छान आहे. पण कळायला जरा अवघड आहे. पण तिने माझं डोकं कल्पनांनी भरून टाकलं आहे – फक्त मला त्या नक्की काय आहेत हे माहीत नाही!'' 'कावळा'सारख्या कविथा वाचून वाचकाची काहीशी अशीच अवस्था होते.

आतापर्यंत षांताराम पवारांच्या कविथांचे बाळगाण्यांपासून ते तात्त्विक आशयापर्यंतचे स्वरूप आपण पाहिले. पवारांच्या चित्रांशी, लेखाचित्रांशी आणि त्यांच्या काव्यलेखनाशी या कविथांचं नातं आहे. प्रतिमा मग त्या दृश्यप्रतिमा असोत वा शब्दप्रतिमा या वाचकांच्या ओळखीच्या आहेत. पण इतर कवितांच्या तुलनेत इथे तो आशय साध्या, सोप्या पद्धतीने आला आहे. 'अंधार' या एकाच प्रतिमेचं उदाहरण द्यायचं तर अजंठा, वेरूळच्या कलापरंपरेचा अनुभव सांगणारी, अनेक संदर्भ पुरवणारी 'अंधार' ही कविता आणि या कविथांमधून येणारा अंधार याची तुलना करून पहावी. कविथांचं वेगळेपण स्पष्ट होण्यासाठी लुईस कॅरॉल आणि एम.सी. ईशर यांची उदाहरणं देणं अधिक समर्पक ठरेल. 'एलिस इन वंडरलँड' लिहिताना ती गोष्ट मुलांसाठी लिहायची आहे हा लुईस कॅरॉलचा प्रमुख उद्देश होता. पण त्याचवेळेस भाषेचा उपयोग त्याने कोड्यात टाकणाऱ्या आणि वेगळ्या विचाराला प्रवृत्त करणाऱ्या भाषेतील अर्थवाहकतेचा शोध घेण्यासाठीही केला. त्यासाठी कॅरॉलने नवीन शब्द तयार केले. पवार असे नवीन शब्द तयार करत नाहीत. पण शब्दांची उलटापालट करून, कावळा, मांजर, सफरचंद अशा प्रतिमा एका सांस्कृतिक पर्यावरणातून काढून दुसऱ्या पर्यावरणात वापरतात. त्यातून अमूर्त अशा अर्थांच्या चौकटी शोधण्याचा प्रयत्न करतात (कावळा, सफरचंद, न्यूटन, आर्किमिडीज यांना एका पर्यावरणात आणून अर्थाचा वेगळा आकृतिबंध शोधणे.) कॅरॉलने 'थ्रू द लुकिंग ग्लास'मध्ये वास्तव जग आणि आरशातलं भ्रामक प्रतिमेचं जग यांच्या नात्याचा शोध घेतला आहे. पवारही कविथांमधून बिंब-

प्रतिबिंब भावाचा शोध घेताना दिसतात. काळ आणि अवकाश कॅरॉलप्रमाणेच पवारांच्या कविथांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो.

एम.सी. ईशर हा विसाव्या शतकातला एक नावाजलेला ग्राफिक आर्टिस्ट. त्याच्या चित्रांमधला आकार अवकाशाचा खेळ आणि आकारांचे एकातून दुसऱ्यात होणारे अवस्थांतर, दृष्टिभ्रमाचा त्याने केलेला अफलातून उपयोग सारेच विलक्षण. एका आभासात्मक (illusionistic realism) वास्तवाचा प्रत्यय देणारे. पवारांच्या कविथा ईशरच्या या आभासात्मक वास्तवाशी नातं सांगणाऱ्या आहेत. थेट संबंध दाखवायचा झाला तर 'आकाश' कवितेचं चित्र पाहावं. यात पानांचे पांढरे आणि काळे आकार उलटसुलट दाखवलेले आहेत. ईशरच्या अनेक चित्रांमध्ये ('स्वान्स', 'हॉर्समेन') बदक अथवा घोडेस्वाराचा एकच आकार काळ्या आणि पांढऱ्या पार्श्वभूमीवर काढलेला असतो. पांढऱ्या भागावर लक्ष केंद्रित केलं तर पांढरी बदकं दिसतील, काळी पार्श्वभूमी असेल. काळ्यावर लक्ष केंद्रित केलं तर काळी बदकं दिसतील आणि पांढरी पार्श्वभूमी असेल. पवार यांच्या चित्रांमध्येही असा पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह स्पेसचा वापर आढळतो. ('किशोर' १९८४ च्या दिवाळी अंकाचे पवारांचे मुखपृष्ठ पहावे.) ईशर यांच्या चित्रांमध्ये अवकाशाचा आकृतिबंध आणि पाहणाऱ्याचा बदलता कोन आणि दृष्टिकोन यांचं त्यांनी विकसित केलेलं एक शास्त्र आहे.

पवारांची चित्रं आणि कविथा तशाच आहेत. काळ्या-पांढऱ्या अंधार-प्रकाश, सपाटपणा-त्रिमिती, सुष्ट-दुष्ट, बिंब-प्रतिबिंब, पॉझिटिव्ह-निगेटिव्ह अशा भाषेतच त्या बोलतात. त्यात विरोध-ाभास असतो आणि या प्रतिमा पूरकही असतात. पवारांच्या कविथा पाहिल्या तर त्यात अर्थांची उलटापालट होणारे शब्द असतील. कधी विरोधी तर कधी संवादी स्तरावरचं अवस्थांतर असेल. 'काळ्यावर पांढरे/पांढऱ्यावर काळे', 'कावळ्याच्या तोंडात उंदीर/मांजराच्या पोटात कावळे' यात उलटापालट आहे, तर पोपटपक्षी (पाने) → पोपट, डाळींब → (पोपटांचे) लाल लाल ओठ, यात अवस्थांतर आहे. तर 'काविळ' कविथेत रोगट गोरेपणाच्या पिवळ्या छटा आहेत. अर्ध्या हळकुंडाने पिवळा, पी हळद हो गोरी, पिवळाधम्मक, कावीळ यात संवादी छटा आहेत. 'गंमत' कविथेत दगडावरची रेघ त्रिमितीपूर्ण जिवंत चित्रात परावर्तित होते. ईशरशी कविथांचे साम्य आहे ते या अर्थाने. कविथांचं वेगळेपण स्पष्ट होण्यासाठी ईशरचा आधार घेतलाय इतकंच. अन्यथा कविथांचं षांतारामीय अवकाश आपल्या स्वतंत्र गृहीतकांवर उभं आहे. ती गृहीतकं जाणून घेतली तर 'कविथा' अधिक कळतील, मनाला आणि बुद्धीला सारख्याच भावतील.

**– दीपक घारे**
भ्रमणध्वनी : ९१६७७६४३२८
gharedeepak@rediffmail.com

*With Best Complimenst From*

**Granthali's leading paper supplier**



# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

**We are paper suppliers of reputed publishers like Granthali**

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com



शांति गॅरंटीड
एलआयसी
जीवन शांति
PLAN NO. 850
UIN 512N328V01
नॉन लिंक्ड, असहभागी
सिंगल प्रीमियम वार्षिकी योजना
सदर योजना स्वत:साठी संयुक्त जीवनासाठी दिव्यांगजनसाठी घेता येते
योजना ३० वर्ष वयापासून उपलब्ध आहे.*
तात्कालिक आणि स्थगित वार्षिकी विकल्प, मृत्यू लाभांसह देखील उपलब्ध.
आजीवन नियमित उत्पन्न
गॅरंटीड
• गॅरंटीड वार्षिकी दर पॉलिसीच्या सुरुवातीपासून
• गॅरंटीड अॅडीशन विलंब कालावधी दरम्यान
तपशिलासाठी तुमच्या एजंट/नजीकच्या एलआयसी शाखेशी संपर्क साधा किंवा ५६७६७४७४ या क्रमांकावर तुमच्या शहराचे नाव एसएमएस करा किंवा www.licindia.in वर भेट द्या.
ही योजना ऑनलाईन देखील उपलब्ध आहे.
Follow us : You Tube LIC India Forever
नकली/ फसव्या फोन कॉलपासून सावध रहा.
आयआरडीएआय या उपक्रमांमध्ये गुंतलेला नाही आहे जसे विमा पॉलिसी विक्री, बोनस किंवा प्रीमियमच्या गुंतवणूकीची घोषणा करणे. असे फोन कॉल देणाऱ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करा.
LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
LIC/AR/18-19/14/MAR
* जोखीम घटक, अटींसाठी विक्री समापनापूर्वी विक्री पुस्तिका ध्यानपूर्वक वाचा.
IRDAI Regn. No. 512
ज़िन्दगी के साथ भी, ज़िन्दगी के बाद भी.

रंजन रघुवीर इंदुमती जोशी

# ‘उपयोजित’ अभिजाततेचे निर्माते ‘धुरंधर’ चित्रकार!

**२०१८ हे चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांचे एकशेएकावन्नावे जयंती वर्ष! मुंबईच्या ‘नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट’ येथे यानिमित्ताने एका भव्य प्रदर्शनाचे आयोजन केले गेले होते. पाच मजल्यांवर साकारलेले हे प्रदर्शन चित्रकार सुहास बहुळकर यांच्या संकल्पनेतून सजले होते. धुरंधरांच्या चित्रशैलीचा हा अभ्यासपूर्ण परिचय...**

चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर ह्यांचा जन्म इ.स.१८६७ मध्ये मुंबई येथे झाला आणि मृत्यू मुंबईत १९४४ मध्ये झाला. त्यानुसार २०१८ हे एकशेएकान्नावे जयंती वर्ष! मुंबईच्या ‘नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट’च्या (NGMA) मुंबई शाखेच्या सल्लागार समितीचे प्रमुख, चित्रकार सुहास बहुळकर ह्यांनी ह्यानिमित्ताने ‘रोमँटिक रिअलिस्ट’ नावाने संपूर्ण पाच मजली दालनातून धुरंधरांची चित्रकला ११ सप्टेंबरपासून १३ ऑक्टोबर २०१८ पर्यंत प्रदर्शित केली होती. ह्याकरिता भारत सरकारचे संस्कृती मंत्रालय व महाराष्ट्र पुरातत्व विभाग, दिल्ली आर्ट गॅलरी, स्वराज आर्ट आरकाईव्ज, राजन जयकर संग्रह, सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि दळवीज आर्ट इन्स्टिट्यूट-कोल्हापूर ह्या सर्वांचे सहकार्य मिळाले होते.

अजिंठापूर्वीच्या आणि नंतरच्या गेल्या हजार वर्षात भारतीय दृश्यकला विविध चित्रशैलींतून प्रकट होत गेली. अनेक परदेशी आक्रमणांमुळे जगातील विविध सांस्कृतिक आकृतिबंध ह्या देशात स्थिरावले. मूळ आदिम लोककलांमध्ये मोहेंजोदाडो, हडप्पा ते येथील स्थानिक कला प्रकार मिसळून नव्याने दृश्य भाषा तयार झाली. उदाहरणार्थ, पारंपरिक कला शैलीत वारली, मधुबनी, राजस्थानी, मुगल-पर्शियन, दखनी, पहारी, बसोली, कांग्रा अशा अनेक शैली विकसित झाल्या.

मूळची सपाट द्विमितीय भारतीय दृश्यकला ब्रिटिश साम्राज्याच्या आगमनाने त्रिमितीय ग्रीको-रोमन आधुनिक वास्तववादी दृश्यकलांच्या नव्या युगात भारताला घेऊन गेली. चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर हे ब्रिटिशकालीन भारतीय चित्रकारांच्या मांदियाळीतील महत्त्वाचे नाव होय. ब्रिटिशकालीन आशिया खंडातील नावाजलेल्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट संस्थेचे ते पहिले भारतीय डायरेक्टर होते. गेल्या दीडशे वर्षात भारतीय चित्रकला अनेक स्थित्यंतरांमधून विकसित झाली. इ.स. १९४७ मध्ये नव्या विचारांच्या बंडखोर ‘प्रोग्रेसिव्ह आर्ट’चे आगमन झाले आणि ब्रिटिशकालीन ‘बॉम्बे स्कूल’ नामशेष होऊ लागले. भारतीय स्वातंत्र्यप्रेरणा, स्वदेशी चळवळ ‘शांतिनिकेतन’ रूपातून रवींद्रनाथ टागोरांनी रुजवली. ब्रिटिशकालीन ‘बॉम्बे स्कूल’ आणि ‘नॅशनलिस्ट आर्ट’ असा नवा दृश्यकला संघर्ष काहींनी देशप्रेम अधोरेखित करण्यासाठी निर्माण केला. ह्या पार्श्वभूमीवर चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर ह्यांचा पन्नास वर्षीय चित्रकलेतील विविध माध्यमातील संचार आज ताजाच वाटतो. त्याचे मर्म शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे.

**धुरंधर ह्यांचे शालेय शिक्षण व सर जे. जे. कलासंस्थेत प्रवेश**

चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर ह्यांचा जन्म



**आई, वडील आणि कुटुंबासमवेत पुढे बसलेले धुरंधर**

इ.स. १८६७ मध्ये मुंबई येथे झाला. मुंबईत त्यांचे आजोळ होते. त्यांचे वडील विश्वनाथ धुरंधर, ही कोल्हापूर संस्थानातील आदरणीय व्यक्ती म्हणून ओळखली जात असे. ते कोल्हापूर संस्थानच्या पॉलिटिकल ऑफिसमध्ये हेडक्लार्कच्या जागेवर होते. तो काळ इ. स. १८५७च्या बंडाचा होता. ब्रिटिश साम्राज्यास विरोध करणाऱ्या बंडखोरांना स्वातंत्र्यसैनिक म्हणून फाशीची शिक्षा दिली गेली होती. त्याबाबत कोल्हापूर संस्थांनच्या पॉलिटिकल ऑफिसचे प्रतिनिधी म्हणून विश्वनाथ धुरंधरांनी शिष्टाई केल्यामुळे अनेकांचे प्राण वाचले. ब्रिटिश व कोल्हापूर संस्थानच्या परस्पर विरोधी भूमिकांचे समन्वयक म्हणून त्यांनी यशस्वीपणे काम केले. ते ब्रिटिश समर्थक होते ह्याचा अर्थ देशविरोधक नव्हते.

चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर मुंबईतून लहानपणीच पुन्हा कोल्हापुरात रहावयास आले. त्यांचे शालेय शिक्षण राजाराम हायस्कूलमध्ये झाले. जवळील महालक्ष्मी मंदिर हा वास्तू स्थापत्य कलेचा उत्तम नमुना होता. कोल्हापुरातील कलापूर्ण वातावरणात त्यांची सौंदर्य जाणीव विकसित झाली. तेथील शिल्पे आणि पारंपरिक कारागीर, लोहार, कुंभार, कातडीवरील कलाकुसर करणारे चांभार, हे सर्व आजूबाजूचे वातावरण संस्कार करणारे ठरले. कोल्हापूर संस्थानचे चित्रकार आणि त्यांचे जे.जे.तील ज्येष्ठ आबालाल रहमान हे स्फूर्तिस्थान होतेच. रंकाळा तलाव आणि आजूबाजूच्या निसर्ग निरीक्षणातून कला शिक्षण आपोआप होत होते. हे सर्व आपल्याला 'कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' ह्या धुरंधरांच्या आत्मवृत्तातून वाचता येते. *हे दुर्मीळ पुस्तक आज २०१८ मध्ये जवळजवळ सत्तर वर्षांनी 'मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस'तर्फे दीपक घारे संपादित नव्या आवृत्तीत पुन्हा उपलब्ध झाले आहे. ते मुळातून वाचकांनी जरूर पाहावे.)*




**आबालाल रहमान**



आबालाल रहमान कोल्हापुरातील असल्याने त्यांच्या कामाचा धुरंधर बारकाईने अभ्यास करीत. अनेक वर्षांपूर्वी चित्रकार बाबुराव सडवेलकर ह्यांनी आबालाल रहमान ह्यांच्यावर दीर्घ लेख लिहिला होता. चित्रकार सुहास बहुळकर ह्यांनी त्यांच्यावर अनेक लेख लिहिले असून त्यांनी व दीपक घारेंनी संपादित केलेल्या 'विवेक साप्ताहिक' प्रकाशित 'दृश्यकला'खंडातून देखील नवी संशोधित माहिती मिळते.

इ.स. १८८९ मध्ये बॉम्बे युनिव्हर्सिटीची मॅट्रिक होणे हे शिक्षणातील गुणवत्तेचं लक्षण होतं. चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर मॅट्रिक होऊन सर जे.जे. कला संस्थेत प्रवेश न घेणे म्हणजे आजच्या काळातील मिळालेला मेडिकल शिक्षणाचा प्रवेश नाकारण्यासारखे होते कारण सर जे.जे. कला संस्थेत एवढे शिक्षण झालेले विद्यार्थी क्वचितच येत. मुंबईतील आजोळ वास्तव्याने ही संस्था त्यांना परिचित होती. ह्या संस्थेची स्थापना १८५७ मधली तर त्यात धुरंधर ह्यांचा प्रवेश वयाच्या तेविसाव्या वर्षी धरला तर तो १८९० मध्ये झाला. म्हणजेच ते अगदी सुरुवातीच्या काळातील घडामोडींचे प्रत्यक्ष साक्षीदार होते. ह्याच काळात भारताचे सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा ह्यांच्या चित्रकलेने देखील ते प्रभावित झाले होते. भारतीय पौराणिक कथांना दृश्यकला माध्यमातून वास्तवतेचे दिलेले रूप धुरंधरांना आवडत असे. पहिले प्रिन्सिपॉल जॉन लॉकवुड किप्लिंग (रुडयार्ड किप्लिंगचे वडील) आणि ग्रिफिथ्स ह्यांचे धुरंधरांना मार्गदर्शन असे. जॉन लॉकवुड किप्लिंग पुढे इ. स. १८७५ला लाहोरच्या मेयो आर्ट स्कूलचे प्रिन्सिपॉल म्हणून गेले. किप्लिंग जरी धुरंधरांना शिकवत नव्हते, तरी प्रत्यक्ष रेखाटने करण्याची त्यांची सर जे.जे. कला संस्थेतील अध्यापनपद्धती धुरंधरांनी आयुष्यभर जोपासली.



**मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटच्या प्रवेशद्वारावरील लॉकवुड किप्लिंग यांचे सुशोभीकरण शिल्प**

१८९२ मध्ये ते विद्यार्थी असताना 'बॉम्बे आर्ट सोसायटी'चे मानाचे सर्टिफिकेट मिळवणारे पहिले भारतीय विद्यार्थी धुरंधर होते. येथून



**राजा रविवर्मा आणि त्यांचे 'राम, लक्ष्मण, सीता' चित्र**






The Growth Of The School Designed By The Student For The School Exhibition 1934

## ‘दि साउथ केनसिंगस्टन सिस्टीम’

सर ज.जी. उपयोजित ‘कमर्शियल आर्ट’ ही सर जे.जे. कलासंस्थेच्याच आवारातील विस्तारित स्वतंत्र संस्था इ.स. १९३५ला स्थापन झाली. तेथील एका विद्यार्थ्याने पोस्टर डिझाईन विषयाचा अभ्यास करताना सर. जे.जे. कला आवारातील संपूर्ण विभाग एका पोस्टरमधून त्यांत दाखवले आहेत. (वरील पोस्टर पाहावे.)

माझे कुतूहल जागृत होऊन पुढील अभ्यास सर जे.जे. कला संस्थेचा मूळ शिक्षणक्रम इ. स.१८५७ च्या आधी कसा असावा याचा इंटरनेटवर शोध घेताना प्रस्तुत माहिती मिळाली. हा शोध घेण्याचे कारण ब्रिटिशांनी ह्या आर्ट स्कूलच्या स्थापनेनंतर सर जमशेटजी व नाना शंकरशेट ह्यांना अभिप्रेत असलेली कला शिक्षण पद्धती न तयार करता ‘दि साउथ केनसिंगस्टन सिस्टीम’ ही शिक्षण प्रणाली घाईघाईने आणून मूळ भारतीय पारंपरिक कलाकारांच्या कलानिर्मिती पद्धतीला नव्या (निदान त्यावेळच्या) जागतिक व्यवहारात उपयुक्त पद्धतीला पूरक प्रथम का विकसित केले नाही? सर जमशेटजी जीजीभॉय ह्यांचे ब्रिटिश राज्यकर्त्यांना लिहिलेले मूळ पत्र आज उपलब्ध असून त्यात स्पष्टपणे ‘भारतीय परंपरागत कारागिरांना नव्या औद्योगिक क्रांतीस सामोरे जाण्यास सक्षम करावे हा हेतू मनात ठेवून ज.जी कला शाळा निर्माण व्हावी’ असा उद्देश व्यक्त केलेला आहे. हा मूळ विचार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी बाजूला सारून थेट ‘दि साउथ केनसिंगस्टन सिस्टीम’ अंमलात आणली का? सांस्कृतिकदृष्ट्या विविधतेने आणि जगातील अनेक सांस्कृतिकदृष्ट्या देशांच्या आक्रमणांना पचवून तयार झालेल्या कोणत्या भारतीय चित्रकला? त्यांना अभ्यासक्रमात कसे बसवावे हा गोंधळ ब्रिटिशांच्या मनात असावा का? सर जमशेटजी व नाना शंकरशेट ह्यांना अभिप्रेत असलेली कला शिक्षण पद्धती त्यांच्या मनातील कोणती भारतीय चित्रकला या आकृतिबंधात अभिप्रेत होती? पुढे परिचित झालेले ‘बॉम्बे स्कूल’ ही ओळख प्रथम कोणी उच्चारली? **चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर व त्यांचे सर्व समकालीन ‘दि साउथ केनसिंगस्टन सिस्टीम’चे विद्यार्थी ठरतात, असे म्हणावे का? तेव्हा हे प्रदर्शन पाहताना मला हा शोध घ्यावासा वाटला. धुरंधरांचे ज्येष्ठ राजा रविवर्मा ह्यांना प्रत्यक्ष युरोपियन शिक्षक मार्गदर्शन देत असत. त्यामुळे रविवर्मा चित्रशैली ते भारतीय चित्रकलेचे नवे वळण तयार झाले. पुढे अमृता शेरगिल चित्रशैलीने अजून नवे वळण दिले.** ह्या अशा अनेक प्रश्नांच्या कुतूहलाने हा अभ्यास सुरू झाला.





Botany Diagram, about 1855 by Christopher Dresser to illustrate his teaching at the school. V&A Museum.

उपयोजित चित्रकलेचा अभिजात कलेबरोबरीने समांतर अभ्यास होणे देखील आवश्यक आहे. युरोपीय चित्रकला एकरेषीय पद्धतीने सहज समजू शकते, परंतु आपल्याला आजचे वर्तमान समजण्यासाठी वरीलप्रमाणे ऐतिहासिक प्रश्नांची साखळी सोडवत जावे लागते. येथे भारतीय अस्मिता ही चर्चा मनात नसून भारतात हजार वर्षे अस्तित्वात असलेल्या, प्रसिद्ध अभ्यासक अजित मुखर्जींनी नमूद केलेल्या ‘आर्ट इज अॅप्लाईड लाईफ’ हे ‘भारतीय दृश्यकला मूळ’ हरवले का? सर जमशेटजी व नाना शंकरशेट ह्यांना अभिप्रेत असलेली कला शिक्षण पद्धती अशी कोणती होती?



सोबतच्या छायाचित्रातील चित्रकार रिचर्ड ब्रूचेट, ज्याने प्रथम ‘दि साउथ केनसिंगस्टन सिस्टीम’ विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ख्रिस्तोफर फ्रेलीन्स ह्यांच्या ‘हिस्ट्री ऑफ दि कॉलेज’ ह्या पुस्तकात, इ. स. १८३७ मध्ये इंग्लंडमध्ये स्थापन झालेल्या ‘दि गव्हर्मेन्ट स्कूल ऑफ डिझाईन विषयीच्या इ.स.१८४५ मधील त्यावेळचे मुख्याधापक रिचर्ड ब्रूचेट ह्यांनी नव्याने मांडलेल्या कला शिक्षणपद्धतीबद्दलच्या वादाविषयी चर्चा केलेली आहे.

इ. स. १८५२ला झालेल्या ‘ग्रेट एक्झिबिशन’मधून मिळालेल्या नफ्यातून (ग्रेट एक्झिबिशनचे त्यावेळचे दालन इ. स. १८५१) मोठ्या जागेवर हेन्री कोल नि सायन्स व आर्ट डिपार्टमेन्टसह विकसित केले. स्कूलच्या मुख्य ध्येयापासून ही कला शिक्षण पद्धती दूर जात आहे असा वाद होता. वादाचा विषय होता फाईन आर्ट, अॅप्लाईड आणि कमर्शियल आर्ट व डिझाईन ह्यांचा योग्य समतोलपणा! रेडग्रेवनि विलियम डायीसी चित्र संकल्पनेची हेन्री कोलच्या मदतीने ‘दि साउथ केनसिंगस्टन स्कूल सिस्टीम’ जन्माला घातली. ही अत्यंत प्रभावी कलाशिक्षण पद्धती जगभर सर्व इंग्रज राजवटी अंमलाखालील राष्ट्रीय स्तरावर त्या दृष्टीने प्रशिक्षणाची साखळीच उभी केली. लंडन स्कूल मध्यवर्ती ठेवून त्याकरिता लोकाश्रयातून पैसा उभा केला.







भारतात इ. स. १९२८पर्यंत ही कलाशिक्षण पद्धती कायम होती. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये कॅप्टन सालोमन व मद्रास स्कूलचे डॉक्टर हंटर ह्यांनी भारतीयत्वाचा विचार रुजवला त्यातूनच पुढे 'बॉम्बे स्कूल' विकसित झाले असावे. ह्या कोर्सची रचना तेवीस स्तरावर अनेक उपविभागात मांडली होती. वेगवेगळ्या मिश्र शिक्षण स्तरांना निवडण्याची संधी विद्यार्थ्यांना होती. मशिनिस्ट, इंजिनिअर्स आणि फोरमन ह्यांनी एक ते पाच स्तरांची निवड करावी आणि मधील सर्व स्तर गाळून थेट तेवीस स्तरांवर जाता येत असे. टेक्निकल स्टडीज व ऑरनामेन्ट लिस्टचे विद्यार्थी सर्व तेवीस स्तरांचे शिक्षण घेत. सर्वसाधारण विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व त्यांना आर्थिक मदत मिळत असे. तो कला शिक्षक होऊन जात असे. राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळालेले विद्यार्थी इंडस्ट्रियल डिझाईनअर्स होत व त्यांना फी आकारली जात असे. त्यातील काही फाईन आर्टकडे जात. ('कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे' ह्या धुरंधरांच्या पुस्तकांतील त्यांनी केलेली सिलॅबस चर्चा ह्या संदर्भात तपासण्यास हरकत नाही.) स्त्रियांना अर्धवेळ वेगळ्या वर्गात घेत असत. मुख्यतः लष्करातील गणवेशात अंगरख्यासह मॉडेल मांडण्यात येई.

थोडक्यात वरील माहिती अभ्यासताना इंग्लंडमध्ये 'व्हिक्टोरियन आर्ट आणि आर्ट अँड क्राफ्ट्स'च्या जडणघडणीचा हा काळ जो भारतात जवळपास त्यास सुमारास अमंलात आणला त्यामुळे तो नक्कल स्वरुपात लादला गेला असावा का? ह्या प्रश्नाचा शोध घ्यावा का? तर ह्याचे उत्तर होय, कारण आजच्या झालेल्या चांगल्या-वाईट परिस्थितीचा अभ्यासपूर्ण आढावा घेता येईल. विलियम मॉरीस (१८३४-१८९६) ह्यांनी इंग्लंडमधील खेडेगावात पारंपरिक नक्षीकाम करणाऱ्या कारागीरांच्या कलेतून प्रेरणा घेऊन ओद्योगिक क्रांतीच्या (यांत्रिकी) लाटेला थोपवून धरण्यासाठी 'आर्ट्स ऍन्ड क्राफ्ट शैली'च्या द्वारे दृक् कला चळवळ उभारली. निसर्गातील पाने, फुले, फळे त्यांचे आकार, वेलीची लयदार वाढ इत्यादीच्या नक्षीकामातून, त्यांच्या निरीक्षणाने नवे आकृतिबंध संकल्पून, सर्जनशीलतेचे गुण सांभाळत विकसित केले. ह्या नव्या मूलभूत दृश्य घटकांनी औद्योगिक क्रांतीच्या यांत्रिकीपणाला विरोधी अशी भाषा तयार केली. कलाकुसरीतील काटेकोर कारागिरी हे महत्त्वाचे गुण त्यातून घेतले. इ.स. १८३० च्या काळात सुरू झालेले 'आर्ट्स एँड क्राफ्टशैली'चे महत्त्व इ.स. १९५० पर्यंत राहिले. शंभर वर्षे त्यापासून नित्य जीवनातील उपयोजित्वाच्या गरजेतून वस्त्र, घरातील फर्निचर इत्यादींच्या निर्मितीवर प्रभाव राहिला. पाहा दोन चित्र : सर्वात शेवटचे चित्र मासिक जाहिरात आशयचित्र इ.स. १९०० : या चित्रातील तपशील हा शब्दशः भाषांतराप्रमाणे चित्ररूपातून पाहण्यास मिळतो. एकाच क्रीमचे सहा उपयोग चित्रकथन पद्धतीने मांडले असून विलियम मोरिसकृत आर्ट्स आणि क्राफ्टचा प्रभाव चित्ररेखाटनातून जाणवतो. या चित्रातून त्या वेळेच्या जीवनशैलीचे दर्शन होते. डावीकडील भित्तिचित्र इ. स. १९२४ चित्रकार रावबहादूर धुरंधर यांचे असून चित्र विषय: भारतीय रेल्वेप्रवास.

भारतात विशेषतः मुंबईत ब्रिटिशकालीन (बॉम्बे स्कूल) भारतीय चित्रकार रावबहादूर धुरंधरांनी भारतीय रेल्वे प्रसाराकरता अनेक भित्तिचित्रे वास्तववादी चित्रशैलीतून केली. चित्रातून संदेश कथनपद्धती परंतु मांडणीतून अक्षररचनेला मात्र दुय्यम स्थान असे चित्र व अक्षरे (टेक्स्ट व ईमेज) एकमेकास विसंगत असा एकंदरीत प्रकार होता. रंगसंगती मात्र भडक पारंपरिक भारतीय पद्धतीची नसून युरोपीय पद्धतीची पेस्टल अशी फिकट आहे. हा भारतीय उपयोजित कलेचा प्रारंभ काळ होय.

इ.स. १९००च्या काळातील वेशभूषा व जीवनशैलीचा दृश्यात्मक अनुभव या भित्तिचित्रातून आपणास मिळतो. भारतीय ग्रामीण जीवन त्यातून प्रतीत होते. चित्रकार रावबहादूर धुरंधर आणि तूलू लॉत्रेक ह्यांची ही भित्तिचित्रे.




**इ. स. १९००चा काळ :** भारतात जेव्हा धुरंधर भारतीय रेल्वेसाठी भित्तिचित्रे करीत होते त्याच काळात फ्रान्समध्ये (तूलू लॉत्रेक : उजवीकडील भित्तिचित्र, या चित्रकाराच्या भित्तिचित्रातून तेथील चंगळवादी जीवनशैली प्रतिबिंबित होताना दिसते, परंतु येथे चित्रास साजेशी सुसंगत अक्षररचना मांडणी दिसते. दृश्यकलेच्या गुणवत्तेच्या दृष्टीने मात्र या दोन्ही चित्रकारांच्या कलाकृती निव्वळ उपयोजित कला न राहता त्या अभिजात वाटतात. चित्रकार रावबहादूर धुरंधर यांच्या कलाकृतीतील अक्षररचना जरी विसंगत वाटलीतरी ते युरोपीय व भारतीय कलेचे मोहक मिश्रण जाणवते.

'दि साऊथ केनसिंगस्टन सिस्टिम' ही पद्धत लंडन स्कूल मध्यवर्ती ठेवूनच विकसित झाली.



**वरील छायाचित्र : डाव्या बाजूस धुरंधराच्या प्रथम पत्नी हातात नव बालक गणपतीसह उभ्या असलेल्या असे स्केच-डॉईंग. उजव्या बाजूस द्वितीय पत्नी, स्वतः धुरंधर व मागे पेंटिंग.**

त्यांची यशस्वी कारकीर्द व बक्षिसांची मालिका सुरू झाली. १८९५ मध्ये धुरंधरांचे सर जे.जे. कला संस्थेतील कलाशिक्षण पूर्ण झाले व तेथेच कला शिक्षक म्हणून त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. १८९७ मध्ये धुरंधरांचे लग्न झाले व इ.स. १८९७ मध्ये गणपती ह्या पहिल्या मुलाचा जन्म झाला. पुढे हा मुलगा एमबीबीएस होऊन जो डॉक्टरी व्यवसायात स्थिरावला. १८९७ च्या प्लेगच्या साथीत पहिली पत्नी बापू ह्यांचे निधन झाले. पत्नीचा मृतदेह इस्पितळातून घरी आणणे शक्य नव्हते तेव्हा त्या अवस्थेतील त्यांच्या मृतदेहाचे त्यांनी केलेले स्केच आजही उपलब्ध आहे. ते प्रदर्शनात आणि प्रकाशित ग्रंथात पाहता येते. दुसरा विवाह घरच्या दबावाने करावा लागला परंतु त्यातून पुढे त्यांचा वारसा जपणाऱ्या कन्या प्रसिद्ध चित्रकर्ती अंबिका धुरंधर ह्यांचा १९१२ मध्ये जन्म झाला. दुसऱ्या पत्नीमुळे दोन्ही मुले आणि कौटुंबिक जीवन आनंदी झाले.



**कन्या अंबिका धुरंधर ह्यांचे एक चित्र**

### विविध बिरुदे आणि सामाजिक मानसिकता :

१८३० नंतरच्या काळात 'रावबहादूर', 'लोकहितवादी', 'न्यायमूर्ती', 'महात्मा' आणि 'लोकमान्य' ही बिरुदे लोकोतर व्यक्तींना दिली जात असत. 'लोकहितवादी' देशमुख हे इंग्रज सरकारच्या नोकरीत असून भारतीय समाजाला पोषक इंग्रजी राजवटीतून आलेला आधुनिक विचार मानणारे होते. भारतीय रुढिग्रस्त मानसिकता त्यामुळे नाहीशी होईल अशी त्यांची धरणा होती, 'महात्मा' ज्योतिबा फुले हे इंग्रजी राजवटीचे समर्थक होते कारण भारतातील हजार वर्षे असलेले चार वर्ण आणि जातिव्यवस्थेचे उच्चाटन होऊन शूद्र म्हणून हिणवलेला कष्टकरी मुक्त होईल ह्या हेतूने त्यांनी सत्यशोधक चळवळ उभी केली. लोकांनी त्यातूनच 'महात्मा' हे सन्माननीय बिरूद त्यांना दिले. कोल्हापूरचे शाहू महाराज प्रजाहितदक्ष राजा म्हणून ओळखले गेले (धुरंधर ह्यांच्या चित्रांत त्यांचे पोर्ट्रेट केल्याचे दिसत नाही), 'न्यायमूर्ती' महादेव गोविंद रानडे हे ब्रिटिशांच्या नोकरीत होते तरी त्यांचे भारतीय समाजसुधारणाचे प्रामाणिक प्रयत्न लोकांनी अनुभवल्याने ते सर्वार्थाने 'न्यायमूर्ती' म्हणून ओळखले गेले. 'लोकमान्य' हे बिरुद बाळ गंगाधर टिळकांना लोकांनीच लावले कारण ते कष्टकरी तसेच अगदी सुशिक्षित वर्गात देखील देशपातळीवर स्वातंत्र्य चळवळीचे नेते मानले गेले. समाजसुधारक म्हणून गोपाळ गणेश आगरकर ओळखले गेले. 'महर्षी' म्हणून धोंडो केशव कर्वे ह्यांच्या, स्त्रियांना शिक्षण देण्याच्या कार्यामुळे ते पद समाजाने दिले. 'महात्मा' गांधी तर धुरंधर ह्यांचे समकालीन, परंतु परस्परविरोधी विचार असलेले! 'महात्मा' म्हणून ओळखले गेलेले गांधी अहिंसावादी सामाजिक व राजकीय विचारांच्या धोरणांनी नवयुगाची सुरुवात करणारे म्हणून त्यांची जागतिक पातळीवर नोंद घेण्यात आली. 'प्रबोधनकार' ठाकरे सच्चे समाजप्रबोधन करणारे म्हणून मान्यता पावले. अशी काही बिरुदे देशप्रेम व स्वातंत्र्य चळवळीचे पुरस्कर्ते म्हणून ओळखली गेली. ह्या व्यक्ती धुरंधरांना समकालीन होत्या त्याकरिता ही नोंद. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर देखील 'लोकनायक' जयप्रकाश नारायण अशा पद्धतीने मान्य झाले. नंतरच्या काळात 'हृदयसम्राट' उदयाला आले.

'रावबहादूर' हे बिरूद ब्रिटिशांच्या राजवटीचे जाहीर समर्थन करणाऱ्यांनाच मिळत असे, असा समज रूढ होता. चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर जेव्हा 'रावबहादूर' ह्या बिरुदाने ओळखले जाऊ लागले तेव्हा







**विविध रूपांतील धुरंधर काळानुसार कसे घडत गेले ते ह्या छायाचित्रांतून कळते.**

त्यांची उत्कृष्ट चित्रकला दुर्दैवाने ब्रिटिशधार्जिणी म्हणून काहीजण पाहू लागले. ते निर्वतल्यानंतर पन्नास वर्षांनी लिहिलेल्या आणि त्यांना प्रत्यक्ष पाहिलेल्या तसेच 'शांतिनिकेतन'मध्ये शिकलेल्या चित्रकार प्रा. दिनकर कौशिक यांनी एकीकडे धुरंधर ह्यांची थोरवी मान्य करताना ब्रिटिशांच्या मर्जीतले म्हणून त्यांची नोंद केली. ('विश्रब्ध शारदा', खंड तिसरा, पृष्ठे २१७/२१८) दुर्दैवाने अशा विचारांनी जणू ते देशद्रोहीच असावेत असा शिक्का मारला गेला. हे अन्यायकारक होते आणि कदाचित त्यामुळे धुरंधरांना जणू विस्मृतीत टाकून देण्यात आले. सर जमशेटजी जीजीभॉय, नाना शंकरशेट असे थोर समाजसेवक १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांना चुचकारत, मनात स्वतंत्र भारताची स्वप्ने उराशी ठेवून प्रत्यक्षात रेल्वे, मेडिकल संस्था, अनेक शिक्षण संस्था उभारत होते. चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर ह्याच पठडीत तयार झालेले नेमस्त विचारांचे असावेत. आज मुंबईत प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात प्रदर्शित झालेली 'धुरंधर चित्रकला' त्यांचे भारतदेशप्रेम अधोरेखित करतानाच दिसते.

मानववंशशास्त्र जसे मानव, प्राणी आणि निसर्ग यांच्या नोंदी करते, तसेच काम चित्रकलेतून धुरंधरांनी केले. अनेक भारतीय स्त्री-पुरुष, निसर्ग ह्यांची स्केचेस व चित्रे केली. येथे ही तीन स्केचेस नमुना म्हणून पाहू. पहिले चित्र स्त्री आग्रहाने पंगतीत वाढत आहे तर दुसरे स्त्री ब्लाउज घालताना, तिसरे स्केच सकाळचे नित्यकर्म करतानाचे. पोस्टकार्डाकरिता केलेली चित्र पाहताना स्त्री-पुरुष देहबोली व त्यांचे संकेत आठवले. धुरंधरांनी केलेली ही नमुना स्केचेस पाहताना 'न्यूड' आणि 'नेकेड' ह्या दोन इंग्रजी शब्दातील सूक्ष्म फरक जाणवला. देहबोलीच्या अभ्यासातून प्रकाशित झालेल्या 'मॅन वॉचिंग' या डेस्मंड मॉरिस ह्यांच्या पुस्तकाची आठवण झाली. चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांनी शंभर वर्षे आधीच असा चित्रमय अभ्यास केला होता.







मानवी देहबोली कशी असते हे धुरंधरांच्या चैतन्यपूर्ण स्केचेसमधून अभ्यासता येते.

सुहास बहुळकर ह्यांनी चित्रकार धुरंधर प्रदर्शनाचे आयोजन पुढील-प्रमाणे केले होते. १. धुरंधर वारसा, २. वसाहतकालीन काळाचा मागोवा, ३. पूर्वीचे चित्रकार, ४. विद्यार्थिदशेतील अभ्यास, ५. थोर दृश्य कथनकार, ६. व्यक्तिचित्रण एक कला, ७. कालक्रमानुसार समाजचित्रण दृश्यकलेतून नोंदवणे, ८. विद्या आणि कला यांची स्फूर्ती देणाऱ्या नऊ देवता अशा स्वरूपात विविध स्त्रियांची रेखाटने आणि चित्रे, ९. माझी पत्नी माझ्या कलेतून, १०. जलरंगाचे किमयागार, ११. स्केचेसची सुपीकता, १२. दृश्यकलेतून शिवाजी महाराज इतिहास, १३. निसर्गचित्रे, १४. 'कमर्शियल आर्ट' अभिजात 'उपयोजित' कला प्रकार, १५. पुढील पिढीकडे हस्तांतर, १६. धुरंधरांचे समकालीन, १७. राजघराण्याचे चित्रकार, १८. ऐतिहासिक दस्तावेजीकरण, विविध पुस्तकातील आशय, कथा आणि बोधचित्र, जाहिरातीसाठी उपयोजित चित्रकला, पोस्टकार्ड्स चित्रकला, छायाचित्र संग्रह, बक्षिसे, सन्मानचिन्हे बॉम्बे आर्ट सोसायटीतील गाजलेल्या कलाकृती आणि जीवनपट.

**समांतर कला प्रवाह**



स्टील लाईफ : विद्यार्थिदशेतील सुरुवातीचे चित्र (१८९५)



इ.स. १९२४ मधील 'हॅपी मूड' चित्र.




हे निसर्गचित्र पाहताना अमूर्ततेचा अनुभव देणारे वाटते. संपूर्ण प्रदर्शनातील मनुष्य, झाडे नसलेले धुरंधराचे एकमेव चित्र.

धुरंधरांचा सर ज.जी. कला संस्थेतला काळ इ. स. १८९० ते इ.स. १९३१ म्हणजे पहिले जागतिक महायुद्ध हा आहे. त्यावेळी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' असल्याने सिंध ते येमेन ब्रिटिशराज्य शासन असे. तसेच दुसरी 'बेंगॉल प्रेसिडेन्सी' हिखय्बरपक्तुव्हा ते बर्मा, सिंगापूर इत्यादीपर्यंत ब्रिटिश राज्यशासन असे. सर जे.जे. कला संस्था 'बॉम्बे प्रेसिडेन्सी'मध्ये असल्याने चित्रकारांचा वावर अन्य प्रांतातही असे. त्या काळातील नाट्यकला, संगीतकला, चित्रकला, चित्रपट ह्यांचा आवाका वरील नमूद केलेल्या 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' व 'बेंगॉल प्रेसिडेन्सी' असा व्यापून असे. म्हणजे लाहोरात पंडित पलुस्कर, चित्रकार आणि वेदशास्त्री पंडित सातवळेकर होते. तर अब्दुल




कॅलेंडर

करीम खाँ, अण्णासाहेब किर्लोस्कर हे मुंबई, कर्नाटक, धारवाड, तर बालगंधर्व मुंबई, पुणे येथे आणि दादासाहेब फाळके मुंबई, नाशिक असा मोठा समांतर पट शोधता येईल. ह्या दोन मुख्य ब्रिटिश राज्यशासन परिघात उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिम असा अखंड परिसर होता. आशियात साधारण दीडशेहून अधिक वर्षे रुजलेली व्हिक्टोरियन आर्ट शैली आणि विचारप्रभाव असणे सहाजिक होते. ही शैली वर नमूद केलेल्या सर्व कला आविष्करणात दीडशेहून अधिक वर्षात खरंच झिरपली का? ही चर्चा खूप मोठी अभ्यास करण्यासारखी असून चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर हे आपला व्हिक्टोरियन आर्ट शैलीचा मार्ग मागे टाकत नव्या 'बॉम्बे स्कूल' आर्ट शैलीचा विकास करण्यातले अग्रणी चित्रकार ठरले, असे हे संपूर्ण प्रदर्शन व त्यांचे कला मंदिरातील पुस्तक पाहताना मला वाटते. ह्या समांतर कला प्रवाहातील कलाकारांनी हा देश – स्वतंत्रता –स्वराज्य अशा राजकीय आणि सांस्कृतिक तणावात असून देखील हजार वर्षे असलेली सनातनी अंध रुढिग्रस्त मानसिकता, कलापरंपरा जपताना नव्या प्रयोगांत आपलीशी केली. ह्यामुळे ती आधुनिक जगात आणण्याचे काम पुढे सोपे झाले. 'शांतिनिकेतन' का 'बॉम्बे स्कूल' अशा संभ्रमात, आपल्यावर जबाबदारी टाकत देश ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दोनशे वर्षांनी सोडला.




मुलाची लग्नपत्रिका



पोस्टर



जाहिरात चित्र




जाहिरात चित्र



मुखपृष्ठ




पोस्टकार्ड

## जागतिक विविध चित्र शैली अथवा वाद आणि चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर!

हा आलेख येथे घेण्याचे कारण इ. स. १८३० ते इ. स. १९८० पर्यंत ग्राफिक आर्टची उत्क्रांती कशी झाली? जगातील दृश्यकला कशा व कोणत्या काळात उत्क्रांत होत गेल्या आणि यात रावबहादूर धुरंधर व 'बॉम्बे स्कूल' हा एक महत्त्वाचा भारतीय चित्रकलेचा टप्पा ह्या पटलावर अधोरेखित होणे गरजेचे आहे. भारतातील सर्वच दृश्यकला स्थित्यंतरे जागतिक पटलावर नोंदवली पाहिजेत. आपण खरंच निव्वळ अमेरिका, युरोप ह्यांचे दृश्य कलेतील गुलाम आहोत का? हे देखील तपासता येईल.




चित्रकारांनी हे सर्व 'इझम्स' काही ठरवून केलेले नाहीत. आजूबाजूच्या परिस्थितीला कलाकाराने दिलेली ती उस्फूर्त प्रतिक्षिप्त क्रिया असते. दृश्यकलेच्या मूलभूत घटकांच्या साहाय्याने केलेले ते सृजनशील प्रकटीकरण असते. (बिंदू, रेषा, अवकाश, रंग, पोत, घनता, समूह आणि



मला दिसलेले धुरंधरांच्या मेघदूत कथाचित्रातील 'अभिजात' बारकावे.

आकृतिबंध इत्यादी वापरून) व्हिक्टोरियन आर्ट १८३० ते १९००, आर्ट ॲण्ड क्राफटस १८५० ते १९००, आर्ट नोव्हा १८९० ते १९२०, ग्लासगो १८९० ते १९२०, जुजेंडस्टील १८९० ते १९००, दादा १८९० ते १९३०, असा प्रवास घेतला तर धुरंधर कोणत्या नव्या चित्रशैलीचा शोध घेत होते? हे साधारणपणे समजू शकेल.

धुरंधरांच्या काही कलाकृती मी जागतिक शैली अथवा इझम्सनुसार पाहण्याचा प्रयत्न करतो. जागतिक स्तरावर दृश्यकला कशी होती आणि धुरंधरांची दृश्यकला त्याहून कोणते नवे रूप घेऊ पाहत होती असा यामागचा उद्देश आहे. (कृपया ही तुलना समजू नये.) वास्तविक धुरंधरांची दृश्यकला विविध विभागातून उपयोजित आणि अभिजातता स्वरुपात संचार करताना दिसते. त्यामुळे सूक्ष्म अभ्यासाद्वारा हे जाणून घ्यावे लागेल एवढे मोठे हे काम आहे. येथे कॅलेंडर, पोस्टर, पोस्टकार्ड्स, जाहिराती, लेटरिंग, अक्षर रचना संकल्पना, लग्नपत्रिका, कथा चित्र, आशय चित्र, मुखपृष्ठ असे जमेल ते घेतले आहे. ह्या लेखात त्यांच्या पेंटिंगविषयी चर्चा न करता 'उपयोजित' किवा पूर्वीच्या 'कमर्शियल आर्ट' ह्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. राजा रविवर्मांनंतर कदाचित चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांची दृश्यकला भारतीय ललित आणि सांस्कृतिकदृष्टचा महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल.



कोटावरील ठसे.
(मूळ चित्राचा अंशभाग)

**धुरंधर ह्यांची आशयचित्र नीती आणि चारित्र्यावर भाष्य :** त्यांच्यातील सृजनशील कलाकार करताना कसा गमतीदार बारकावे टिपतो हे पाहण्यासारखे आहे. येथे बायकोला फसवणाऱ्या नवऱ्याच्या कोटावरील पिठाच्या हाताचे ठसे बायको पाहते व चोरून केलेली लबाडी पकडते. हे निव्वळ कारागिरीचे काम नसून अभिजात चित्रकलेत विचार असल्याशिवाय असे चित्र होत नाही.

हा लेख आवरता घेताना मी 'धुरंधर हे महाराष्ट्राच्या अभिजातता उपयोजित चित्रकलेचे आद्यप्रवर्तक' असा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे धुरंधरांनी खऱ्या अर्थाने दृश्य कलेचे सर्व प्रकार सहजपणे, कोणताही भेद न ठेवता हाताळले. 'कमर्शियल आर्ट' ह्या नावाने जगभर आजही ओळखला जाणारा हा कला प्रकार, भारतात १८५० नंतर औद्योगिक क्रांतीचे वारे वाहू लागले आणि व्यापारयुग इंग्रजांनी जगभर पसरवले, त्याचवेळी सुरू झाला. ह्या करता प्रत्येक क्रय वस्तूची ओळख ग्राहकाच्या मनात, बाजारपेठेतील इतर तशाच वस्तूंच्या गर्दीतून व्यवस्थित रुजावी म्हणून 'कमर्शियल आर्ट' हा एक उपयोजित चित्रकला प्रकार म्हणून अस्तित्वात आला. वास्तविक जगातील सर्व पारंपरिक कलाप्रकार हे उपयुक्तता ह्या गरजेतूनच विकसित झाले. कला आणि कौशल्य ह्यांची योग्य सांगड घालत तसेच मागणी व पुरवठा ह्या तत्त्वांना सांभाळत धुरंधरांनी कामातील सौंदर्य जाणीव कायम ठेवली.

विसाव्या शतकात नवस्थापत्यकला आणि औद्योगिक संकल्पन ह्यात कोणत्याही इमारतीचे अथवा वस्तूचे कार्य हे त्या संकल्पित आकाराशी व उद्देशाशी निगडित असावे असा तो विचार होता. अभिजाततेत नेमके उलट म्हणजे 'फॉर्म विच इज फंक्शनलेस' थोडक्यात उद्देशविरहित निव्वळ सौंदर्य जाणीव, ज्यात आकार कोणताही संदेश देत नाही हे गृहीत धरले जाते. वास्तवतेच्या अतिरेकी आग्रहाचा परिणाम म्हणून अमूर्त चित्रकला उदयास आली. गेल्या चार शतकात वैज्ञानिक दृष्टी विकसित झाली, ज्यातून मानवी तसेच मूलभूत सुप्त इच्छांना आवाहन करणाऱ्या गोष्टी सृजनात्मक पद्धतीने संदेशवहन प्रकारात रूढ झाल्या.

चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर, आर्ट स्कूलमध्ये निव्वळ सौंदर्य जाणीव असलेल्या चित्रकलेचा अभ्यास करीत, आयुष्यभर

**विविध जागतिक चित्रशैलींचे वाद**

व्हिक्टोरियन आर्ट इ. स. १८३० ते इ. स. १९००, आर्ट अँण्ड क्राफ्ट्स इ. स. १८५० ते इ. स. १९००, आर्ट नोव्हा इ. स.१८९० ते इ. स. १९२०, ग्लासगो इ. स.१८९० ते इ. स. १९२०, जुजेंड स्टील इ. स. १८९० ते इ. स. १९००, दादा इ. स. १८९० ते इ. स. १९३०, आर्ट डेको इ. स. १९२० ते इ. स. १९४०, स्विस इंटरनॅशनल इ. स. १९४० ते इ. स.१९८०- आजपर्यंत चालूच आहे, बाहौस इ. स. १९२० ते इ. स. १९३० परंतु तिचा प्रभाव अनेक शैलीत आजपर्यंत दिसून येतो, कन्स्ट्रक्टिव्हिझम इ.स. १९२० ते १९३०, पोलिश स्टाईल इ. स. १९५० ते आजपर्यंत, न्यू टायपोग्राफी इ. स. १९२० ते इ. स. १९३०, लेट मॉडर्न इ. स. १९४० ते आजपर्यंत चालूच आहे, डी स्टीजल इ. स. १९२० ते इ. स. १९३०, ब्रिटिश मॉडर्न इ. स. १९३० ते इ. स. १९४०, बाझल इ. स. १९७० ते आजपर्यंत चालूच आहे, एक्सप्रेशनिझम इ. स.१९०० ते इ. स. १९२०, पोस्ट-मॉडर्न इ. स. १९७०पासून आजपर्यंत, फ्युचरिझम इ. स. १९१० ते इ. स. १९४० इत्यादी चित्रशैली. खाली काही नमुना 'इझम्स' चित्र देत असून, यातून विविध प्रयोगातून चित्रशैली कशा विकसित झाल्या ते कळू शकेल.




1. Will Bradley: *The Masqueraders*. Poster, c. 1894
The Metropolitan Museum of Art, New York. Gift of Fern Bradley Dufner




**जगातील इ.स. १८३० पासून दृश्यकलेतील विविध प्रयोगांतून 'इझम्स' तयार झाले त्यांची काही नमुना चित्र.**

तोच ध्यास घेत जगले. त्यांची 'कमर्शियल आर्ट' मानवी मूलभूत आणि सुप्त इच्छांना आवाहन करणारी होती. ह्या प्रदर्शनाचे 'रोमँटिक रिअलिस्ट वास्तववादी अद्‌भुतरम्य चित्रकला' हे नाव समर्पक होते. वास्तववादी असून देखील अद्‌भुतरम्य अमूर्ततेचा येथे मला माझे गुरु चित्रकार षांताराम पवार ह्यांच्या दृश्य मंत्राची आठवण येते. तो म्हणजे 'जिवंतपणा असलेली रेषा, त्यास दिलेला अर्थ आणि तो प्रत्येकास त्याच ऊर्जेने मिळणे ह्याचा प्रत्यय चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर देतात.' ह्या निमित्ताने प्रकाशित केलेल्या सुंदर 'रोमँटिक रिअलिस्ट' ग्रंथातील प्रदर्शित चित्रे पुन्हा घरी पाहताना तोच आनंद देतात. चित्रकार सुहास बहुळकर ह्यांनी घेतलेले कष्ट नोंद घ्यावेत असेच आहेत कारण ही चित्रे पुन्हा अशा एकत्रितपणे दिसणार नाहीत इतकी ती दुर्मीळ आहेत. त्यांनी विविध व्यक्ती आणि संस्था संपर्कासाठी केलेली धडपड हे प्रदर्शन पाहताना जाणवली.

मी ह्या लेखाच्या विषयानुसार सुरुवातीला त्यांचे पूर्वी न दिसलेले काम मांडले. आता काही प्रत्यक्ष चित्र '**अभिजातता असलेल्या उपयोजित चित्रकलेचे आद्यप्रवर्तक**' ह्या दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न करतो. १९२४ ह्या काळातील त्यांनी केलेली भित्तिचित्रे पाहताना मला अशी दिसली. माझा हा प्रयोग भारतात जागतिकीकरणाच्या प्रवाहात आलेल्या 'युरोपियन' आणि अमेरिकेतील 'ग्राफिक डिझाईन' कलाशिक्षण पद्धतीतून परिचित झाला व तो शिक्षणक्रम येथे राबवताना चित्र कसे पाहावे ह्याचे वैज्ञानिकदृष्ट्या आकलन करणे सोपे झाले.

मथुरा आणि वृंदावन पोस्टर आणि त्यातील हे नमस्कार करणाऱ्या स्त्रीचे चित्र वेगळे करून ते मोठे केल्यावर स्वतंत्र पेंटिंग वाटू लागते. पोस्टरमधील पुढील चित्रांकन सुंदर आकृतिबंध आणि मानवी व्यवहार ह्याचे अप्रतिम दर्शन घडवते. पंढरपूरांतील यात्रा ह्या पोस्टरमधील हे दोन चित्र तपशील स्वतंत्रपणे पाहिले तर ती पेंटीग वाटतात. धुरंधरांनी कवी कालिदास ह्यांच्या 'मेघदूत'करिता केलेली आशय चित्रे जर पुन्हा स्वतंत्रपणे पाहिली की तोच अनुभव आपणाला मिळतो. ती केवळ आजच्या नित्याच्या संकल्पनेतील सुशोभिकरण करणारी किंवा जागा भरणारी 'इलेस्ट्रेशनस' न राहता पेंटीग करिता केलेल्या घट्ट आकृतिबंध असलेल्या चित्रसंकल्पना वाटतात.हे एक कथाचित्र व त्यातील त्यांचा बारीक चित्र अभ्यास संपूर्ण वातावरणात आपल्याला घेऊन जातो. हे त्याकाळी छायाचित्र वापरून देखील साधले असते परंतु धुरंधरांच्या रोमँटिक रिअलिस्ट शैलीत ते जिवंत वाटू लागते. ह्या त्यांच्या चित्रकला प्रदर्शित कलाकृतीतून आपण शब्दविरहीत संचार करू शकता. (ही चित्रे मागील पृष्ठावर पाहावीत.) येथे मी जागेअभावी काही मोजकेच नमुने मांडलेत. प्रत्यक्ष प्रदर्शनात मांडलेल्या सर्वच कलाकृती दृश्यकलेच्या सर्व भिंती नाहीशा करतात व निखळ दृश्य आनंद समान पातळीवर देत राहतात.

चित्रकार सुहास बहुळकर आणि दीपक घारे संपादित साप्ताहिक विवेक प्रकाशित दृश्यकला खंड ह्यातून त्यांनी महाराष्ट्राच्या गेल्या दोनशे वर्षातील दृश्यकलांच्या सर्व प्रकारांचा आढावा घेतला



**मला दिसलेले धुरंधरांच्या कथाचित्रां–तील 'अभिजात' बारकावे.**

**धुरंधरांनी केलेल्या चित्रांचा व इलस्ट्रेशन्सचा समावेश असलेले ग्रंथ**

'Women of India' - Otho Rothfield

'Deccan Nursary Tales' - C.A. Kincaid

'Tales of King Vikramaditya' - C.A. Kincaid

'By the ways of Bombay' - S.M. Edward (Police Commissoner of Bombay)

'Desire of all Nations' (BIBLE) - George Francis Enoch

'Peoples of Bomaby' - Miss Olivia Strip

'Omar Khayyam' (Orginally urdu) - English Translation by Fitzerald

Mricchakatic (toy cart) - Shudraka

'Shri Shiva Chhatrapati Charitra - Men and Women in Indian History' - Published by Shreeman Purushottam Vishram Maoji.

'सुवर्णमाला' या पुरुषोत्तम विश्राम मावजी यांच्या मासिकासाठी १९०१ ते १९१४ या कालावधीत रामायण, महाभारत, भागवत, भगवद्गीता, गणेशपुराण, शिवपुराण, विष्णुपुराण, जयदेवाचं गीतगोविंद अशा विषयांवर चित्रे काढली.

इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराथी, तेलगू, उर्दू नियतकालिकांसाठी चित्रे.

विविध भाषांमधील शालेय पाठ्यपुस्तकांसाठी इलस्ट्रेशन्स केली. लाँगमन्स ग्रीन अँड कंपनी आणि मॅकमिलन अँड कंपनी यांनी ती प्रकाशित केली.

आहे. पेंटिंग, स्कल्पचर, उपयोजित कला आणि कार्टून्स असा हा विस्तारित आढावा संशोधनात्मक सत्तर चित्रकलेच्या जाणकारांना लिहिते करून मांडला आहे तो जरूर पाहावा.

ह्या लेखाकरिता चित्रकार सुहास बहुळकर व कला आणि साहित्य समीक्षक प्रा. दीपक घारे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

**संदर्भ**

१ कलामंदिरातील एकेचाळीस वर्षे : रा. महादेव विश्वनाथ धुरंधर. प्रथम आवृत्ती १९४०, वागळे प्रोसेस स्टुडिओ आणि प्रेस, मुंबई. दुसरी आवृत्ती टिपा आणि अन्य मजकुरासह, संपादन दीपक घारे: २०१८. प्रकाशक अशोक केशव कोठावळे, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस.

२ पोस्टकार्ड पेपर जुएल्स, पोस्टकार्ड फ्रोम राज, लेखक ओमर खान, मापीन पब्लिशिंग हाऊस प्रायव्हेट लिमिटेड, २०१८.


३ एम.वी.धूरंधर-रोमँटिक दि रिअलिस्ट, लेखक: सुहास बहुळकर, डाग-दिल्ली आर्ट गॅलरी प्रकाशन, २०१८.

४ ग्राफिक स्टाईल फ्रोम व्हिक्टोरीयन टू पोस्ट मॉडर्न, लेखक : स्टीवन हीलर आणि स्वामूर च्यावस्त, थेम्स अॅण्ड हडसन प्रकाशन, १९८८.

५ मॅन वाचिंग-फिल्ड गाईड टू हुमन बिहेवर, लेखक डेस्मंड मॉरीस, प्रकाशन १९७७.

*ह्या लेखात वापरलेला धुरंधर चित्रसंग्रह दिल्ली आर्ट गॅलरी व एनजीएमए, मार्ग पब्लिकेशन्स ह्यांच्या सौजन्याने घेतली आहेत.*

**– रंजन जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६९५३०९४२
joranjanvid@gmail.com



## मुलाखत

# स्वच्छंद कलाप्रवासी राजाराम होले

**राजाराम होलेंच्या चित्रातले नाद, उजळ रंग, बारीक रेषा, विविध आकारांची गुंफण, अवकाशाचा अर्थ उलगडू पाहणारे ठिपके, गडद अवकाशावरची फिकी आकाशगंगा, कृष्णविवरं, कलेचा अव्याहत ध्यास, त्यांची अमूर्तकला, निसर्गातले हिरवे-निळे रंग या सर्वांसह रंगत गेलेली एक मुलाखत...**


चित्राशी एकरूप झालेला नव्हे जगण्यालाच ज्याने चित्ररूप दिलं असा, चित्ररूपी संवादाचं माध्यम निवडून जगाशी कौशल्याने पण तितक्याच अलिप्ततेने संवाद साधणारा, शालेय शिक्षणात 'ढ' समजला जाणारा गोल्डमेडॅलिस्ट, कलेच्या झपाटलेपणामुळे गरिबीने होरपळलेला, तरीही कलेचा घट्ट हात धरून ठेवणारा, राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावर आपली दखल घेण्यास भाग पाडणारा पण जमिनीवर पाय घट्ट रोवून उभा राहणारा कलाकार म्हणजे राजाराम होले. याच महिन्यात इटलीतील 'एमआयआयटी' येथे त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यानिमित्ताने या स्वच्छंद कलाकाराच्या फिनिक्स भरारीविषयी जाणून घेण्याचा हा प्रयत्न...

*मला तुमच्यातल्या शून्यातून वर आलेल्या चित्रकाराबद्दल अधिक ऐकायला आवडेल.*

खरं तर घरात चित्रकलेची कोणतीही पार्श्वभूमी नाही.भीम शंकर जवळच्या खेड्यातला शेतकरी कुटुंबातला जन्म,शिक्षणात रस नव्हता, अगदी 'ढ' म्हणा ना तशातली गत पण मला या माझ्या कलेची देणगी माझ्या गावातल्या निसर्गाने दिली. डोंगर, दऱ्या, शेतं, आकाश, नदी यांच्यामध्ये निसर्ग मुक्त हस्ताने रंगांची उधळण करत होता, त्यातले काही थेंब माझ्यावर पडले असावेत

म्हणूनच कोणतीही पार्श्वभूमी नसताना चित्रकलेची आवड निर्माण झाली. एखाद्या संगीतकाराला जसं पक्ष्यांच्या शीळेतूनही संगीत स्फुरतं तसाच निसर्ग मला चित्ररूपाने दिसत होता, चित्रे काढण्यासाठी मला प्रोत्साहित करत होता. शालेय पुस्तकी शिक्षणापेक्षा मी चित्रातल्या रेषा, रंग यांच्यामध्ये अधिक रमू लागलो. चांगला चित्रकार म्हणून शाळेत ओळख होतीच. चित्रकलेतही करिअर होतं (खरं तर पोटापाण्याला आधार मिळू शकतो.) हे माझ्या कलेच्या गुरूजीकडे बघून वाटलं. चित्रकला शिकण्यासाठी कॉलेज असतं हेही त्यावेळी गुरूजींकडून कळलं तेव्हा गंमतच वाटली होती. मलाही शहरात जाऊन चित्रकला शिकायची होती.

आजही जिथे चित्रकला हा दृश्यकलेतला प्रकार म्हणजे 'भिकेचे डोहाळे' असं मानलं जातं तर साधारण तीसेक वर्षांपूर्वी काय परिस्थिती होती याचा अंदाज येऊ शकतो. घरून विरोध होता. मात्र आधी संगमनेर मग तिथून पुण्यातलं 'अभिनव कला विद्यालय' असा प्रवास सुरू झाला. तिथे पाय ठेवल्यावर आपण इतके दिवस जे शोधत होतो ते हेच असं वाटून गेलं आणि झपाटल्यासारखं कामाला लागलो. रात्रंदिवस तुफान स्केचेस काढत होतो. तासन्‌तास लायब्ररीमध्ये बसत होतो मोठे चित्रकार, परदेशी चित्रकार यांची चित्र बघत होतो, अनेक प्रश्न पडत होते. त्यांची उत्तरं मिळवण्यासाठी शिक्षकांना भंडावून सोडत होतो. तुमच्यातली जिद्द समोरच्याला दिसली की तो त्याच्या परीने तुमची मदत करतो. ते माझ्या आयुष्यात सातत्याने झालं. अगदी माझ्या लायब्ररीच्या शिपायापासून ते माझ्या मित्रांपर्यंत, माझ्या गुरूंपासून ते माझ्या सहचारिणीपर्यंत! माझ्या वाटचालीत माझ्यापेक्षा यांचा वाटा अधिक. 'अभिनव'मध्ये लॅन्डस्केप्स केली, पोट्रेट्स केली जिथे परीक्षेसाठी दहा चित्रं मागितली जायची, तिथे माझी तीस-चाळीस चित्र तयार असायची. चित्राशिवाय मला काहीच सुचायचं नाही. त्यावेळी संभाजी कदम, शंकर पळशीकर यांची चित्र आवडायची. पुण्यात



आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्र



'अभिनव'ला त्यांचं छान कलेक्शन आहे. त्यांची जशी कॅनव्हासवर लोणी फिरवावी तशी चित्र असायची. तसे आम्हीही बटर नाईफ वापरून चित्र करायचो. कदमांच्या चित्रांचं टेक्श्चर काय सांगू तुम्हाला, असं काही पाहिलं की ह्रदयात कालवाकालव होते. काही तरी एकदम भन्नाट! त्याला दुसरा काही शब्दच नाही..(हे सांगताना त्यांचे डोळे लुकलुकले आणि ते कॉलेजच्या दिवसांत कदमांची चित्र पाहतायत असा काहीसा भास झाला. )

असाच एकदा सिनियर चित्रकारांचे कॅटलॉग पाहताना गायतोंडेंच्या चित्रांचा कॅटलॉग मला दिसला. ती पेटिंग्ज बघताना मी हरखून गेलो, अद्‌भुत असं काहीतरी होतं. सरांकडे गेलो त्यांना विचारलं, ''हे कोण आर्टिस्ट आहेत, त्यांच्या कामाने अक्षरशः वेड लागलंय.'' ते म्हणाले, ''अरे, हा खूप मास्टर माणूस, ग्रेट आहे. तुला आवडला असेल तर या माणसाचा अभ्यास कर, त्याचं जगणं बघ.'' तेव्हापासून मी झपाटल्यासारखं गायतोंडेंविषयी वाचायला लागलो. त्यांची चित्रं तासन्‌तास पाहत बसायचो. तिसऱ्या वर्षाला आम्हाला थिसिस असतो शंभर मार्कांचा. मी दुसऱ्या वर्षीच तिसऱ्या वर्षाच्या थिसिससाठी गायतोंडे निवडले. त्यांच्यासारखी केवळ चित्र काढायची नाहीत तर त्यांच्यासारखं कलंदर आयुष्य जगायचं.




चित्रकार वासुदेव गायतोंडे

मला असं वाटतं कलाकार म्हणून कसं जगायला पाहिजे ही देखील मोठ्या कलाकारांकडून शिकण्याची गोष्ट आहे. प्रसिद्धीच्या मागे न जाता त्या कलेत आकंठ बुडता यायला हवं. जसे गायतोंडे जगले जशी नसरीन मोहंमदी जगली. ते चित्रासारखे जगले. त्यांनी चित्रं केली नाहीत त्यांच्याकडून चित्रं झाली.

*तुमच्या आणि गायतोंडेंच्या भेटीबद्दल थोडंसं सांगाल ना...*

शेवटच्या वर्षाला अगदी जुळवाजुळव करून मी दिल्लीला ट्रीप



नेण्यासाठी सुचवलं. त्याच्यामागचा उद्देश एवढाच, माझ्या दैवताला, गायतोंडेंना मला भेटायचं होतं. त्यासाठी काहीही करण्याची माझी तयारी होती. दिल्लीत गेल्यावर कानडे सर आणि मला गायतोंडेंचा पत्ताच शोधायला दोन दिवस लागले. अखेर पत्ता मिळाला. ते गुरगावमध्ये राहत होते. कानडे सर होते म्हणून मी निश्चिंत होतो पण जायच्या वेळी सरांनी मला एकट्यालाच जायला सांगितलं. पुण्याव्यतिरिक्त शहर न पाहिलेला, मराठीही धड न बोलता येणारा मी. हिंदी, इंग्रजी दूरच राहिलं. ''तुला गायतोंडेंना भेटायची तीव्र इच्छा आहे ना, त्यासाठी तू एवढा खटाटोप केलायस. मी आलो तर तो झाकोळला जाईल, विषय भरकटेल, ''असं सरांनी सांगितलं.

अखेर मनाचा हिय्या करत गुरगावच्या गाडीत चढलो. तिथून त्यांची कॉलनी दोन किमी लांब होती. आज गुरगाव उच्चभ्रू वस्ती म्हणून प्रसिद्ध असले तरी तेव्हा म्हणजे मी ९८ सालचं सांगतोय, तेव्हा ते जंगलासारखं होतं. गायतोंडे थोडे विक्षिप्त आहेत. फारसे कुणाला भेटत नाहीत, बोलत नाहीत हे ऐकलेलं रस्ता चालताना आठवत होतं, तरीही पावलं झपाट्याने त्यांच्या घराकडे जात होती. वाटेत चिटपाखरूही नव्हतं. संध्याकाळचे पाच वाजले होते. त्यांचा बंगला शोधत गेलो. बेल वाजवली. मनात शब्द आकार घेत होते. ''पुण्यातून आलोय, विद्यार्थी आहे. तुम्हाला भेटायला आलोय. फक्त तुमच्या पायावर डोकं ठेवायचंय.''

गायतोंडेंनी दार उघडलं बाहेरचा कुत्रा आत जाऊ देईना, मग ते स्वतः बाहेर आले. मला घरात घेऊन गेले. मी त्यांना भेट म्हणून आणलेली गीता दिली आणि त्यांनी मला अक्षरशः कवटाळलं. मी आनंदाच्या भरात त्यांच्याशी काय बोललो हे आठवत नाही, पण 'तू चित्र काढत रहा' असं ते मला म्हणाले. आजही प्रसंग आठवला की अंगावर रोमांच उभा राहतो. मला जे त्यांच्याबद्दल सांगितलं होतं त्याच्याविरूद्धच घडत होतं. ''सर, मी फोटो काढू का?'' विचारलं तर त्यांनी परवानगी दिली, त्यांच्या सह्या घेतल्या. अखेर निघताना त्यांनी 'अच्छा' म्हणून हात वर केला. हे सगळं घडलं यावर माझा विश्वासच बसत नव्हता. तिथून 'ललित कला अकादमी' गाठली. मी लांबूनच पाहिलं, कानडे सर उभे होते. मी धावत जाऊन त्यांना घट्ट मिठीच मारली. आयुष्यात गायतोंडेंना दोनदाच भेटलो. त्यांनी मला पुण्यात हॉस्टेलवर पत्रही पाठवलं होतं. तुमची आयुष्यात काही स्वप्न असतात त्यातलं ते सर्वोच्च पायरीवरचं स्वप्न होतं, जे सत्यात उतरलं.

*तुमच्या अमूर्त शैलीतील चित्रांवर गायतोंडेंचा प्रभाव आहे असं म्हणायचं का?*

हो, गायतोंडेंचा प्रभाव निश्चितच आहे, पण तो माझ्या चित्रांवर नाही तर माझ्या जगण्यावर.नुसतं श्रेष्ठ कलाकाराची नक्कल करून चित्र काढणं यात काही गंमत नाही. त्यांच्यासारखं जगता आलं पाहिजे. मी माझ्या प्रबंधाच्या निमित्ताने गायतोंडेंना जगण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी भोपाळ, मुंबई गाठली. 'एनसीपीए'ला गेलो. लक्ष्मण श्रेष्ठ, प्रफुल्ला डहाणूकर, कोलते सरांना भेटलो. कोणत्याही विद्यार्थ्याने वाचावा असा तो प्रबंध आहे. गायतोंडे किती ग्रेट आहे ते सांगण्यासाठी तो प्रबंध नक्कीच नाही तर गायतोंडेंचा प्रवास त्यातून मला उलगडून दाखवयाचा होता.

*मुंबईतल्या प्रवासाबद्दल थोडंसं सांगाल का?*

शालेय शिक्षणात 'ढ' असलेला मी कला शिक्षणात मात्र नेहमीच पहिला राहिलो. शेवटच्या वर्षी शासनाचं सुवर्णपदकही मिळालं. आणि हो, त्याच वेळेस प्रबंधाला मदत करण्याच्या निमित्ताने माझी आयुष्यभराची सहचारिणीही मला मिळाली. मग जे.जे.त एक वर्ष शिकलो. मुंबईला खूप घाबरायचो. ट्रेनच्या गर्दीला, रस्त्यावरच्या गर्दीला. पण एक जाणवलं की कलेसाठी मुंबईशिवाय पर्याय नाही. मी स्वच्छंदपणे चित्र काढणार अशी पूर्वकल्पना देऊनही माझ्या सहचारिणीने माझ्याशी लग्न केलं. लग्नानंतर ती नोकरी करत होती आणि मी चित्र काढत होतो. जगणं तेवढंसं सोपं नव्हतं. कधी-कधी दोन वेळचं जेवायलाही पैसे नसायचे तर चित्र काढायला कुठून असणार? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल ना? मी दोनशे रुपयांच्या चित्रकलेच्या सामानावर दोन वर्ष 'ब्लॅक अन्ड व्हाईट' चित्रं काढली, पण चित्रच काढत होतो स्वच्छंदपणे.

प्रभाकर कोलतेंच्या विचारसरणीने चित्रविचारांना दिशा मिळत होती. काही वेळेस प्रदर्शन भरवत होतो. फारसं काही हाती येत नव्हतं. अखेर एक दिवस कलाकारांचं स्वप्न असलेल्या 'जहांगीर कला दालना'तून प्रदर्शन भरवण्यासाठी निमंत्रण आलं. माझ्याकडे पैसेच नव्हते. तसं माझ्या एका मित्राला म्हणालोही. त्याने पैसे भरले आणि २६ जुलैच्या पावसाने जेव्हा मुंबईला झोडपलं होतं तेव्हा माझं प्रदर्शन जहांगीरला भरलं आणि दर्दींनी दाद दिली. मोलही छान मिळालं. मग थोडं स्थिरस्थावर होत गेलो. चेन्नईची आप्पाराव गॅलरी, ललित कला अकादमी, दिल्ली, लंडन, न्यूयॉर्क, इटली इथे शो होत गेले. राज्यशासनाची



फेलोशिप मिळाली, ललित कला अकादमीची स्कॉलरशिप मिळाली. पोलॉक क्रान्सनर, न्यूयॉर्कची ग्रॅन्ट मिळाली. मुद्दामच शहरापासून दूर पण निसर्गाच्या जवळ असलेल्या नालासोपऱ्यात घर घेतलं. स्टुडिओ घेतला. असं स्वप्नवत घडत गेलं. आता पुन्हा शो करतोय, इटलीत! पुण्यात असायचो तेव्हा माझ्या भाषेचा बाज ग्रामीण! धड हिंदी काय, मराठीही येत नव्हतं. लंडनला गेलो तेव्हा इंग्रजीही येत नव्हती, तरीही बारा दिवस लंडनला एकटा फिरलो.माझी भाषा तुम्हाला येत नाही. तुमची भाषा मला येत नाही पण मला काय बोलायचंय हे पोहोचतंय ना! माझी चित्र हीच माझ्या संवादाचं माध्यम आहेत. त्यातूनच मी जगाची संवाद साधू शकतोय आणि साधतोय.

मी म्हटलं तसं माझ्या कॉलेजच्या शिपायापासून ते माझ्या सगळ्या गुरूजनांपर्यंत, माझ्या आयुष्यात आलेले माझे सगळे मित्र, रणजित होस्केटे,इटलीची मैत्रीण सोरियाना किती जणांची नावं घेऊ? माझी धडपड बघून या सर्वांनी मदत केली, प्रोत्साहन दिलं.

*आज मुंबईबाहेरचे गावाकडून आलेले अनेक चित्रकार आहेत, जे निराश होतात... काही मागे फिरतात.*

हो, असतील पण त्याच्यामागची काय कारणं आहेत हेही जाणून घ्यायला हवं. अनेकांना मुंबईची धावपळ सोसवत नाही. पैशांसाठी चित्र केली जातात मग मेहनत घेऊनही त्याचं चीज होत नाही. निराशा येते, पण मी मागे सांगितलं तसंच विद्यार्थिदशेत तुम्ही ज्येष्ठ कलाकारांचा अभ्यास करता म्हणजे काय? दशकाच्या फरकाने त्यांच्या चित्रात काय बदल होत गेला? त्यांनी त्यांची चित्र कोणत्या गॅलरींना दिली, आंतरराष्ट्रीय पातळीवर कशी पाठवली हाही त्यातला एक अभ्यास असतो. महाविद्यालयात तुम्हाला शिक्षण मिळतं, पुढे जायचा मार्गही मिळतो पण तो तुमचा तुम्ही शोधला पाहिजे. त्यासाठीच तुमचा पाया पक्का हवा, साधना हवी. गायतोंडेंच्या अभ्यासामुळे मला हे कळलं की ते कुठे-कुठे चित्र द्यायचे, कुठे 'शो' करायचे मग मी ठरवलं की त्यांच्याच इथे 'शो' करायचा. मी दुसरीकडे कुठे गेलोच नाही. अनेकदा पैसे नसतात निराशा येते मग त्यातून साधना कमी होते. आजही मी सकाळी चारला उठून काम करायला बसतो. काम करतो म्हणजे नेहमीच मी चित्र काढतो का? तर नाही, मी कधी पुस्तकं वाचतो, कधी संगीत ऐकतो, कधी कधी तर पेन्सिल आणि ब्रश घेऊन कॅनव्हासकडे बघत राहतो, निसर्गात फिरतो. मी यालाही काम म्हणतो कारण हे सगळं करताना माझ्या मनात फक्त आणि फक्त चित्रकलेचेच विषय असतात.ती एक साधना आहे.

*आज तुम्ही परदेशात प्रदर्शनं करताय, तिथे कलेला मानचं स्थान आहे तसं इथे आहे? आपल्याकडे चित्रकलेतलं बाबा आम्हाला काही कळत नाही आणि ते ॲबस्ट्रॅक्ट तर काहीच नाही असा म्हणणारा वर्ग खूप मोठा आहे.*

होय, असं खेदानं म्हणावं लागतंय, कारण 'कला म्हणजे जीवनावश्यक वस्तू नाही' असं आपल्याकडे मानलं जातं. परदेशात कलेची संस्कृती आहे. तिथे पबमध्ये जाणारेही म्युझियममध्येही आवर्जून जातात. त्यांच्या संस्कृतीचा तो भाग आहे. मला आठवतंय मागच्या वेळी इटलीला मी एका इटालियन मित्राकडे थांबलो होतो. चित्र काढत होतो, मनासारखं जमत नव्हतं. ते कागद चुरळून खाली टाकत होतो. ते चुरगळलेले कागदही त्याने उचलले आणि व्यवस्थित ठेवले. मी त्याला म्हटलं, ''अरे, हे जमलं नाही फारसं.'' त्यावर तो म्हणाला, ''ही कला आहे, कला ही श्रेष्ठच. ती सांभाळूनच ठेवली पाहिजे.''

दुसरं अमूर्त कलेचं.शास्त्रीय संगीतातलंही किती जणांना नीट कळतं? मी कुठे त्याचं शिक्षण घेतलंय पण भीमसेनजी, गंगुबाई हंगल, किशोरीताईंना ऐकलं की एक समाधान मिळतं. खूप संगीत ऐकलं की जसं चांगलं कुठलं, वाईट कुठलं हे कानसेनांना कळतं तसं चित्रकलेत होत नाही. तुम्ही काही दिवस फक्त चित्र पहा. प्रत्येक चित्राचा अर्थ शोधायला जाऊ नका. वारंवार चित्र पाहाल तर नक्कीच तुम्हालाही त्या आडव्या, उभ्या रेषा, त्यातले ठिपके, त्यातले रंग यांचा अर्थ उलगडत जातील, पण त्यासाठी तुम्ही 'दृष्टिसेन' तर बना. मलाही अजून चित्रकला पूर्ण कळलेली नाही पण माझा शोध सुरू आहे, अभ्यास सुरू आहे तो अखंड, अविरत सुरूच राहणार आहे.


**मुलाखतकार - श्रद्धा पेडणेकर**

भ्रमणध्वनी : ९९३०११२००४

shraddha.vasant@gmail.com

**राजाराम होले**

भ्रमणध्वनी : ९०४९०९९८६९

rbholle@gmail.com

अनुराधा गांगल

# घरा-घरातले कलाकार

**छोट्या-छोट्या अवतीभवतीचा गोष्टींमधला अर्थ शोधणारा ललित लेख माणसांकडे, आयुष्याकडे बघण्याची एक वेगळी दृष्टी देतो. कलावंतांचे अनन्य पैलू मग बोलके होतात. कोण आहेत हे घरा-घरातले कलावंत?**

कलाकार हा शब्द जरी तोंडी आला तरी एक असाध्य, उमदे व्यक्तिमत्त्व, त्याची महान गुणवत्ता, त्याच्याविषयीची, त्याच्या कलेची ओढ अंगाअंगात रोमांच भरते. सगळी माणसे शाळा-कॉलेज शिकून मोठी, विद्वान होतच असतात, पण या अंगातील विद्वत्तेबरोबर अंगामध्ये एखाद्या गोष्टीचा छंद, एखादी महान कला असेल तर त्या माणसाचे श्रेष्ठत्व प्रचंड मोठे होते. 'माणसाच्या अंगी शिक्षणाबरोबरच एखाद्या कलेची अपूर्वाई असणे म्हणजेच कलाकार' अशी साधी व्याख्या आपण त्या कलाकाराविषयी करू शकतो.

माणसाच्या अंगी भरतकाम, विणकाम, उत्तम शेफ-स्वयंपाकाचा दर्दी, गायन-वादन, शिल्पकला, सुतारकाम अशा अनेक पैलूंचा प्रचंड व्यासंग असेल तर तो माणूस महानच. नाट्यकला, चित्रकला, नृत्यकला, अभिनय अशा नाना कला अंगी बाळगणारा माणूस, माणूस राहतच नाही. तो एक महान कलाकार बनतो. गानतपस्वी मंगेशकर घराणे, तबलावादक झाकीर हुसेन, गायतोंडे, हार्मोनियमवाले अप्पा जळगावकर, पु.ल. देशपांडे, नृत्यविशारद गोपीकृष्ण, चित्रकार दलाल... महान अभिनय कलाकार कित्येक आहेत. शेकडो जणांची नावे येथे सादर करावी लागतील. अभिनयकुशल स्त्री कलाकारांची अशीच जंत्री बनेल. या मोठमोठ्या कलाकारांसारखे छोटेखानी कलाकारसुद्धा शेकडो आहेत. कोणी शिक्षणक्षेत्रात, कोणी स्वयंपाकात, कोणी भरतकामात, तर कोणी विणकामात! काही तर अगदी शिवणकामात, क्राफ्टमध्येसुद्धा नैपुण्यवान बनतात. अगदी गणपती-गौरी-शारदा अशा थोर महान महाकाय मूर्ती बनवणारे महान मूर्तिकार आपल्या कलेत निपुण असतात, तरबेज असतात. त्यांच्या कलेत त्यांचे इतके नैपुण्य असते की, त्यांची बोटे, त्यांचे हात, त्यांचे पाय... सर्व अवयव त्या-त्या कलेत साद घालत असताना जरी पाहिले, तरी आपण मंत्रमुग्ध होतो. त्यांच्या शरीराची लय पाहताना थक्क व्हायला होते. चकित व्हायला होते.

आज मी अशा कलाकारांविषयी लिहिते आहे, की ज्याची वाच्यता आजपर्यंत कोणीच केली नाही.

एकदा नंदाकाकू पुरणपोळ्या करत होत्या. त्यांना झालेली पुरणपोळी वर्तमानपत्रावर ठेवायची होती. त्यांनी पट्कन एक वर्तमानपत्र उचलले. ते पाहून शामराव त्यांच्यावर डाफरले, ''अगं, तुला काय अक्कल बिक्कल आहे की नाही? ते आजचे वर्तमानपत्र आहे. जुने वर्तमानपत्र घ्यायचे ना! काही कसे कळत नाही ते! दुपारी वाचायचे आहे ते!'' तेवढ्यात

दारात शेजारच्या मनूमावशी येतात अन् म्हणतात, ''अहो नंदाबाई, आजचे वर्तमानपत्र देता का? माझ्या भावाचा फोटो आलाय त्यात.'' नंदाकाकूंना खरे तर राग आला होता. नवऱ्याच्या बोलण्याने त्यांचा चेहरा गोरामोरा झाला होता, पण अगदी सेकंदाचाही वेळ न लावता हसत-हसत हावभाव करत त्या म्हणाल्या, ''मनूमावशी देते हं आजचा पेपर, पण तुमचे काम झाले, की द्या आणून. अहो, ह्यांचे जेवण झाले की ह्यांना पेपर वाचायला लागतोच लागतो. त्यांची ती अगदी रोजची सवय आहे बघा. देते.'' नंदाबाईंनी राग, क्रोध, असूया एका सेकंदात नष्ट करून चेहरा हास्यमय केला होता.

''अगं कांता, तीन दिवस झाले, कामाला का आली नाहीस? बरे नव्हते का? का कुठे गावाला गेली होतीस?''

''अहो काकू तब्येत बरी नव्हती. उठवतही नव्हते. अंग खूप दुखत होते. खूप ताप आला होता.'' खरे तर, कांताला दारुड्या नवऱ्यानं, ती त्याला पैसे देत नव्हती म्हणून पट्ट्याने बेदम मारले होते. तिच्या पाठीवर त्याचे वळ उठले होते. तीन दिवसांनी ती आली हे खरे तर कठीणच होते कारण फरशी पुसताना तिची 'पाठ' वळाने लालीलाल झालेली दिसत होती, पण शांत चेहऱ्याने सांगणारी कांता 'वळ' दुखत असल्यामुळे रडूच लागली होती. काकू तिच्या 'वळांवर' कैलासजीवन लावताना कांताचा शांत चेहरा अन् नंतरचा मुसमुसलेला, रडवेला चेहरा न्याहाळत होत्या. काकूंच्या चेहऱ्यावरचे भाव आणखीनच निराळे!



सीताकाकू या अगदी साध्या, सरळ, हसऱ्या बाई, अगदी-शेजारीपाजारी, नातलग मंडळी, सगे-सोयरे सगळेच जण सीताकाकूंवर खूश असायचे. शेजारणी काही अडले-नडले तर त्यांनाच विचारायला येत. त्याही अगदी सहजतेने 'अगं, नको काळजी करूस हं. बरं वाटेल लौकरच सदाशिवरावांना' असं म्हणत तिच्या पाठीवरून प्रेमळ हात फिरवत, पण कालच रात्री त्यांना फोन आला होता, सीताकाकूंच्या काकूंना देवाज्ञा झाली होती. त्यांना रात्रभर झोप नव्हती. सारखी लहानपणाची दृश्ये डोळ्यांसमोर येत होती. कशा काकू लाडू-करंज्या करायच्या, कशा बोलायच्या, 'यायला हवं हं सगळं काही. नवऱ्याला करून घालायचे आहे ना?' वेण्या घालताना, ''बरं का, हे केस असेच लांबसडक राहिले पाहिजेत हं. मोठासा अंबाडा आला पाहिजे, बघ. वन्स खूश होतील बाई, एका मुलीवर.'' सीताकाकू सकाळी चहा पित होत्या, तरीही त्यांच्या चेहऱ्यावरची दुःखाची छाया ओसरली नव्हती. अशाच एकटक बघत, विचार करत बसल्या होत्या. आपल्या काकूंच्या आठवणीसरशी त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव आपोआप बदलत होते. तेवढ्यात समोरच्या रमाकाकू आल्या. अगदी हसत-हसत, नाचत बागडत आल्या. ''वहिनी, आमच्या नातवाला ब्याण्णव टक्के गुण मिळाले. अहो, बघा ना! केवढा अभ्यास करत होता! पण छान झाले.'' सीताकाकूंचा चेहरा पूर्णपणे बदलला. चेहऱ्यावर हसू आणत त्या लगेच म्हणाल्या, ''अगं रमा, मीच आणते हं आता पेढे. चंदूचे अभिनंदन करीन. त्याच्या पाठीवर शाबासकी देईन हं.'' रमाकाकू दहा मिनिटे बोलत होत्या, पण सीताकाकूंना किती दुःख झाले आहे हे त्यांना बिलकूलही समजले नाही. चेहऱ्यावरचे भाव क्षणाक्षणात

किती आणि कसे बदलता येतात या स्त्रियांना कोण जाणे!

शारदा वहिनी अन् राजाराम, दोघेही अगदी छान स्वभावाचे, सतत दुसऱ्यांच्या उपयोगी पडायचे. राजाराम तर समाजकल्याण करण्यासाठी अगदी प्रसिद्ध, पण दोघेही वाढले वेगवेगळ्या परिस्थितीत. राजाराम गावात शाळा झाल्यावर कॉलेजसाठी मुंबईत आले अन् एकटे राहू लागले तर शारदावहिनी अगदी मायाळू कुटुंबातून आलेल्या. त्यांना सारख्या आई-आजी विचारणार, "अगं, काय झाले? खातेस का काही? जाऊ नको एवढ्या उन्हात. अगं, खेळताना कुठे धडपडली का? थांब, त्याला उगाळून लावते आंबेहळद." अशा घरात लहानाच्या मोठ्या झालेल्या शारदावहिनी. लग्न झाले खरे, पण दोघांच्या स्वभावात विरोधाभास. दोघेही मनाने प्रेमळ, पण शारदाबाईंना लहानपणापासूनच या सवयीमुळे 'अहो बाहेर जाता का? ऊन आहे हो अजून. काळा चष्मा घाला, टोपी घाला वगैरे वगैरे.' अशा त्यांच्या सूचना. राजाराम एका खोलीत एकटे राहिले असल्याने अन् त्यांची वेगळ्या वातावरणात वाढ झाली असल्यामुळे त्यांना सारखे-सारखे तेच ते बोललेले आवडत नसे. अन् त्यांतून तब्येतीचे, स्वयंपाकाचे सांगणे तर अजिबातच त्यांना आवडायचे नाही. त्यांना राग यायचा. ते रागाने शारदाताईंना बोलायचे. शारदाताईंना मात्र कळत नसे की इतकी आपण त्यांची काळजी घेत आहोत तर त्यांना समजत कसे काय नाही? मग आणखी बोलाचाली व्हायची. राजाराम भलतेच चिडायचे, "आपले एकत्रित राहणे जमणार नाही. आपण वेगवेगळे राहू." मग ते निघून जायचे नि शारदावहिनी मनाने खट्टू व्हायच्या. त्यांच्या वाक्यागणिक अन् शब्दागणिक चेहरा - त्यावरील हावभाव बदलत जायचे. काय करावे? कसे वागावे? हेच त्यांना कळेनासे होई. त्या घरात एकट्या विचार करत राहत, पण दारावरची बेल वाजली किंवा राजाराम घरी येताच काही नवीन बातमी समजली की, दोघेही मघाशी आपण घटस्फोटापर्यंत येऊन भांडण केले होते हे विसरून जायचे. राजाराम यांच्या नवीन बातम्यांवर, शारदावहिनी शेजारून आलेल्या फोनवरची बातमी सांगत. दोघेही सगळ्या गोष्टी पार विसरून नवीन गप्पागोष्टींत सामील होत. 'अगं बाई, हो का? असे का झालं, छानच की!' अशा चेहऱ्यावरच्या हावभावासहित शारदावहिनी त्यात विरघळून जात.

मनूताई अन् गजाभाऊ यांचं वेगळंच दुःख होतं. त्यांची एक सून दोन मुलांना जन्म देऊन अचानक देवाघरी गेली होती. इतकी सालस, हुशार, अनेक गोष्टींत रस घेणारी ती छोटी मुलगी अशी गेलीच कशी? असा त्या दोघांना पेच वाटे. घरात किंवा दूरदर्शनच्या मालिकांतून काही विचित्र स्टोरी ऐकली की दोघांचे डोळे पाणावायचे, पण हे दुःख मनात ठेवून शेजारीपाजारी, नातलग, मित्रमंडळी यांच्यात सामील होऊन, त्या-त्या गोष्टींना, समोर ऐकू येईल त्या बातमीला कधी हसत-हसत, तर कधी वैतागून, तर कधी डोळ्यांत पाणी आणून सामोरे जावे लागे. दुःखामुळे घरात सतत बसता येत नव्हते, पण सगळ्याला सामोरे तर जावे लागत होते. क्षणाक्षणाला चेहऱ्याची पट्टी बदलावी लागे. त्याच्याशिवाय गत्यंतरच नव्हते. श्वास संपेपर्यंत असेच सर्व घटनांना सामोरे जायचे हेच खरे.

विमलाताईंचे पूर्ण शिक्षण झालेले नव्हते. फक्त त्या अकरावी पास होत्या. त्यांना इंग्रजी बोलता येत नव्हते. मुलींची लग्ने झाली. त्या दोघी अमेरिकेत गेल्या. मुलगी प्रेग्नंट आहे हे समजताच आपल्याला इंग्रजी बोलता येत नाही हे काही विमलाताईंच्या मनी आले नाही. फक्त एक प्रेमळ, मायाळू ओढ. ती ओढ त्यांना अमेरिकेला जायचेच लेकीच्या बाळंतपणाला! असे वेड लावून गेली. विमलताई अमेरिकेत एकट्या गेल्या. त्यांना त्यांची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती. तोडके-मोडके इंग्रजी बोलण्यावर अन् आपल्या हावभावावर, हालचालींवर, त्यांच्या महान अभिनयावर त्या अमेरिकेत पोचल्या.

कसे असते ना या स्त्रियांचे! घरातील, दारातील, ऑफिसातील, समोर येणाऱ्या प्रत्येक माणसांना त्या त्यांच्या वागण्या-बोलण्याने-अभिनयाने सामोऱ्या जात असतात. चेहऱ्यावर कधी हसू, तर कधी आसू, कधी माया, तर कधी राग, कधी शांतता, कधी प्रेम! अशी चेहरेपट्टी बदलणे कसे काय त्यांना जमते! ही अभिनयकला त्यांना जन्मतः मिळाली की काय कोणास ठाऊक! अभिनयावर त्या अनेक लोकांना आपलेसे करतात. आपला परिवार उंचीवर नेऊन ठेवतात. मला वाटते, सर्व कलाकारांच्यापेक्षा घरची गृहिणी, घराघरातील स्त्री महान कलाकार आहे. गृहिणीला किती गोष्टींना सामोरे जावे लागते. सतत लाखो गोष्टी घडणार घरात, ऑफिसात, बाहेर कोठेही जाताना-येताना त्यांना विविध तऱ्हेची माणसे सतत भेटत असणार. त्यांच्याशी बोलताना, कधी त्यांना 'वा- व्वा! फारच छान!' तर कधी 'हो का असे झाले का? वाईट झाले हो! तुम्ही एकटे आहात असे बिलकूल समजू नका. आम्ही सर्व आहोत तुमच्या बरोबर.' प्रत्येक माणसाबरोबर बोलण्याचे त्यांचे तंत्र वेगळेच, पण स्त्री जन्मतःच कलाकार बनून आलेली असते. ती सेकंदासेकंदाला आपली चेहरापट्टी, त्यावरील हावभाव बदलते. कोणलाही कळत नाही तिच्या अंतरंगातील आगडोंब, पण रिक्षावाल्याशी, भाजीवाल्याशी, इस्त्रीवाल्याशी, दूधवाला, बस कंडक्टर, मुलांच्या शाळेतील शिक्षकवर्ग, दुकानदाराशी, शेजाऱ्यापाजाऱ्यांशी, स्वतःच्या नातलगांशी; इतकेच काय, स्वतःच्या नवऱ्याशी सर्वत्र बोलताना, चेहऱ्यावरचे भाव क्षणाक्षणाला बदलावे लागतात. सर्व क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार दिले जातात, पण घराघरातील ह्या महान कलाकारांना कोठे आहे पुरस्कार?

**- अनुराधा गांगल**

दूरध्वनी : २५२२१६४८

# महिरपी कंस

**वृषाली किन्हाळकर**

**एकदा तिनं सवतीला माझ्याकडं तपासायला आणलं होतं. तिला तपासल्यावर माझ्या लक्षात आलं की एक छोटीशी शस्त्रक्रिया जर तरुण वयातच तिची केली असती; तर तिला सुद्धा मूल होऊ शकलं असतं! वेळ निघून गेली होती...**

तीस वर्षांपूर्वी ती पहिल्यांदा मला भेटली ती एक पेशंट म्हणून. माझ्या सासूबाईंची ती मामेबहीण. खेड्यात राहणारी. तिला दोन मुलं अन् दोन मुली. पुन्हा पाचव्यांदा दिवस गेलेले. आता हे पाचवं मूल नको म्हणून माझ्याकडे आलेली. तिच्या नवऱ्याच्या सांगण्यानुसार मी तिची कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया देखील त्याचवेळी करून टाकली. तिच्या बोलण्यात सतत 'घरची मानसं' असा उल्लेख असे. ती असेल माझ्याच वयाची किंवा एखाद-दोन वर्षांनी मोठी. शिक्षण जेमतेम चौथीपर्यंत पण जात्याच हुशार होती. बोलण्यात ग्रामीण म्हणी, वाक्प्रचार असायचे त्यामुळं तिचं बोलणं मला आवडायचं. तिच्याशी बोलण्यात मला रस वाटायचा. त्या ऑपरेशनच्या आठ-दहा दिवसांच्या वास्तव्यात आम्ही मैत्रिणीच होऊन गेलो.

पुढं चार-पाच वर्षांनंतर ती आली मुलीच्या लग्नाची पत्रिका घेऊन. मुलगी केवळ तेरा वर्षांची! मी विचारलं, ''का गं इतक्या लवकर लग्न करतेस मुलीचं?'' तर उत्तरली, ''घरच्या मानसांनीच ठरविलंय लगीन.'' नवऱ्याला असं 'घरची मानसं' कसं म्हणतेस गं? तर म्हणाली - म्हंजे मालक आन् आक्काबाई. मला काहीच कळलं नाही, तशी तिनं लग्नपत्रिका दाखवली. त्यात


सौ. महादाबाई }<br>
सौ. चंद्राबाई } श्री. धोंडिबा नरसोबा पाटील

असं छापलेलं होतं. महादाबाई ही तिच्या नवऱ्याची पहिली बायको. हिला सवत आहे हे ऐकून मला धक्काच बसला होता! ती मात्र सहजपणे सांगत होती की, 'आक्काबाईला लेकरू व्हत नव्हतं म्हनून मंग माजं लगीन लावलं पाटलाशी.' हे असं दोन बायकांची नावं त्यापुढं महिरपी कंस आणि पुढं नवऱ्याचं नाव अशी लग्नपत्रिका मी प्रथमच पाहत होते. पुढे नंतर मी नांदेडच्या आसपासच्या ग्रामीण जीवनाशी जशी परिचित होत गेले तशी अशा महिरपी कंसवाल्या पत्रिका अधूनमधून दृष्टीस पडत असत. चंद्राबाई सहजतेनं बोलत राहिली होती, लग्नाला येण्याचा आग्रह करीत. मूळपत्रिका म्हणून गूळखोबरं लावून तिनं पत्रिका दिली होती. मूळपत्रिका म्हणजे मान. लग्नाला गेल्यावर साडी नेसवतात. बायकांना त्याचं अप्रूप असतं इकडच्या भागात. मला मात्र तिच्या सवत प्रकरणाचंच कुतूहल वाटत होतं. हिच्या वडिलांनी का बरं असं बिजवराशी तिचं लग्न लावलं असावं असा विचार करत बसले होते मी. तिनंच सांगितलं की घरची परिस्थिती जेमतेम. त्यात ही काळीसावळी आडमाप अंगाची. पुढं वय वाढलं की हुंडा लागेल जास्त त्यामुळं या घरी दिली. सवतीची भरपूर जमीन मिळालेली होती नवऱ्याला. निदान आपली पोरगी खाऊनपिऊन राहील एवढ्या विचारानं बापानं हे लग्न उरकलेलं!

चंद्राबाई सांगत होती– ''म्या लई रडलो व्हत्ते माय, शाळा सुटली म्हून आन् मायबापाशी बोललोच न्हाई म्या लई दिवस. काय करनार? दैव आपलं.'' मला मग ती अजूनच जवळची वाटू लागली. 'येत जा गं अधूनमधून' असं म्हणाले मी तिला. तीही आवर्जून यायची. ''डाक्तरीन लई माया लावती मला'' असं इतरांना सांगायची. काय माया करत होते मी तिच्यावर? अन् काय करू शकत होते मी जेव्हा तिचं नशीबच तिच्यावर रुसलेलं होतं. डोक्यानं हुशार असून सुद्धा त्या हुशारीचं चीज करण्याची संधीच तिच्या मायबापांनी तिला दिली नव्हती. लग्नानंतरचं तिचं जगणं तर अक्षरश: यंत्रवत होतं. पहिल्या बायकोच्या माहेराहून चांगली पिकाऊ जमीन मिळाल्यामुळे नवरा संपूर्णपणे तिच्या आज्ञेत असायचा. तिचीच हुकूमत होती घरावर. दिवसभर तिच्या मर्जीप्रमाणे सांगण्याप्रमाणे कामं करायची आणि रात्री... रात्री सवत अक्षरश: चंद्राबाईला नवऱ्याच्या खोलीत ढकलायची आणि स्वत: खोलीच्या बाहेर असून राहायची. तासाभराने नवरा चंद्राबाईला खोलीबाहेर पाठवून द्यायचा आणि मग ती सवतीबरोबर माजघरात झोपायची. मूल प्रसवणारं यंत्र यापेक्षा वेगळी किंमत तिच्या शरीराला नव्हती. अशी चार मुलं झाली आणि मग पाचव्या खेपेचं मूल काढून टाकून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय देखील सवतीनंच परस्पर घेऊन टाकला. प्रत्येक मूल सवतीनं स्वत:च्या छायेखाली इतकं मायेनं वाढवलं की ती सगळी मुलं तिलाच खरी आई मानत अन् हिला सावत्र माय म्हणत! चार मुलं झाल्यानंतर हिची गरज सर्वार्थानं संपली होती त्यामुळं हिचं जगणं वाळवंटापेक्षाही रुक्ष अन् कोरडं झालं होतं. आईबापांना काही व्यथा सांगण्याची सोयच नव्हती. त्यांच्या गावात म्हणच आहे की ''दाळ घालावी दाटणीत आन् लेक द्यावी जाचणीत'' जाच झाला म्हणजे पोरगी बरुबर जाग्यावर ऱ्हाती हे लोकांचं मत!

माझ्या नवऱ्याच्या निवडणुकीच्या काळात मी तिला मदतीला बोलावलं तशी ती पट्कन आली. पंधरा दिवस राहिली. परत जाते तर काय दुसऱ्या मुलीचं लग्न ठरवून टाकलेलं! हिनं विचारलं की मला कळवलं का नाही, मी येईपर्यंत थांबायचं की... तर त्यावर सवतीचं उत्तर होतं– ''लेकरं आमचे हैतं – तुजे न्हाईत'' आणि यावर नवरा कधीच आक्षेप घेत नसे. नवऱ्याचं आणि हिचं अक्षरानेही कधी बोलणं नसे. ऑपरेशन झाल्यानंतर तर ते तासाभरासाठी नवऱ्याच्या खोलीत पाठवणं सुद्धा सवतीने बंद केलं! हिच्या आयुष्यात उरलं केवळ जनावरासारखं निमूट राबणं! अचानकच नवऱ्याला घशाचा कर्करोग झाला आणि शेताचा तुकडा विकून त्याचा इलाज करावा लागला. चार वर्षानंतर नवरा वारला. हिच्याशी अक्षरही न बोलताच...! पुढं उरलेल्या दोन मुलांची लग्नं सवतीनं उरकली आणि उरल्या या दोघीच!

एकदा तिनं सवतीला माझ्याकडं तपासायला आणलं होतं. तिला तपासल्यावर माझ्या लक्षात आलं की एक छोटीशी शस्त्रक्रिया जर तरुण वयातच तिची केली असती; तर तिला सुद्धा मूल होऊ शकलं असतं! वेळ निघून गेली होती.. म्हणजे त्या महिरपी कंसा



अलीकडच्या या दोन स्त्रिया, अज्ञान आणि रुढी परंपरांच्या बळी ठरल्या होत्या. महिरपी कंसाच्या अलीकडे कधी–कधी तीन देखील नावं असतात. त्या नावांना तसा काय अर्थ असतो? ती अनुसया असो वा शकुंतला वा दुर्गा... तिला कोणतेच बळ नसते. नसते ती अष्टभुजा किंवा नसते महिषासुरमर्दिनी, ती असते एक स्त्री देह!

वंशाला दिवा देण्यासाठीच तिचे प्रयोजन असते. भोग देणे, भोग घेऊ देणे, वापरू देणे, वापरले जाणे आणि गृहीत धरले जाणे... श्वास चालू असणारी एक जिवंत बाहुली. तिची बटनं असतात कुटुंबप्रमुखाच्या लहरीत, वासनेत आणि त्याच्या प्रतिष्ठेच्या

पोकळ कल्पनांमध्ये! पहिलीला मूल होत नाही पण बापानं दिलेली भरपूर जमीन म्हणून तिनं हयातभर नवऱ्यावर, धाकट्या सवतीवर आणि मुलांवर रोब गाजवला पण स्त्री म्हणून तिला तरी काय मिळालं? तिचंही आयुष्य त्या अर्थी रिक्तच होतं ना! हे सगळं मग उतारवयात उफाळून यायचं. अत्यंत गलिच्छ शिव्या द्यायची ती चंद्राबाईला. नवऱ्याच्या माघारी तीन वर्ष चंद्राबाईनं सवतीची सेवा केली कारण उतारवयात ती ठार आंधळी झाली होती. मात्र चुकूनदेखील ती चंद्राबाईशी मायेचा एक शब्दसुद्धा बोलत नसे. आता सवत सुद्धा वारली. मुलांनी जमीन वाटून घेतली. चंद्राबाईची रवानगी कधी मोठ्याकडे, कधी धाकट्याकडे. आजही ती एक काम करणारं यंत्रच आहे. सडा सारवणं, शेतात जाणं, स्वयंपाक करणं सुटलेलं नाहीच. पण ती आता कीर्तन-भजनाला जाते. तिथं तिचं मन रमतं. कारण तिथं सधवा-विधवा भेद नसतो. तिथं सगळे पोळलेले जीव येतात.

चंद्राबाई म्हणते, ''बाईच्या जिंदगीत म्हत्वाचं हाय तिचं कुंकू. त्ये गेलं की संपलं. बाईला मानपान नाही. दैवच माजं. काय करनार? आमच्या गावात म्हणतात, ''तूर मोडली की अंबाडी वाढती'' तूर मंजे नवरा. अंबाडी मंजे बायको. तुरीच्या शेंगा येईपत्तोर अंबाडी वाढंना. तूर मोडली मंजे नवरा मेला की बाई शानी व्हती मंजे ती धीट व्हती म्हणून विधवाबाईला बैठकीत येऊ द्याचं न्हाई. तिला मान द्यायचा न्हाई'' शेतात तूर व अंबाडी एकत्र लावतात. तुरीला शेंगा येईपर्यंत अंबाडी फारशी वाढत नसते. तुरीची रोपं काढली की अंबाडी फोफावते. हे असं उदाहरण पतीपत्नीच्या नात्याला देणं म्हणजे किती क्रूर चेष्टा आहे स्त्री जीवनाची!

चंद्राबाई मन लावून भजन म्हणत असते माझ्या पुढ्यात बसून.

*''गुरुदेव तुम्हाला भेटाया*
*किती तळमळतो जीव सांगू द्या''*

माझं मन भरून येतं. तिची ती आर्त विनवणी ऐकून, गलबलून येतं. कधीची तळमळतेय ती! शाळा शिकायची ओढ होती, त्या वयापासून तिची फरफट सुरू झाली. काय फार मोठी स्वप्नं होती का तिची? खरंच भेटलेच गुरुदेव तर काय सांगेल ती? उभ्या जन्माचा आकांत मांडेल? फिरून हाच जन्म सुखात, मनासारखा जगण्याची संधी तिला देण्याची किमया करतील का गुरुदेव? तडफड होते माझ्या जीवाची. ऐकवत नाही तिचं ते व्याकूळ भजन... डोळ्यांत पाणी दाटू लागतं...


**- डॉ. वृषाली किन्हाळकर**
भ्रमणध्वनी : ९४२२८७१३६५
vrushaleekinhalkar@yahoo.com



**ग्रंथाली**

## विनता कुलकर्णी
लिखित
# पुस्तकचोर



**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ५२० रु.**

आजवर आपण हिटलरच्या विचारांमुळे झालेल्या ज्यू लोकांच्या हालअपेष्टांबद्दल वाचत आलोय. 'पुस्तकचोर' ह्या कादंबरीत त्याच्यामुळे झालेली जर्मन कुटुंबाची ससेहोलपट दिसते. राजकीय दडपण, त्रास विविध प्रकारे होत असतो. ह्या स्थितीत युद्ध, वेदना, जखमा, उपासमार अशा वातावरणातील ही कादंबरी. आपल्याला अपरिचित असा हा सारा माहोल. म्हणूनच त्याची पार्श्वभूमी समजून घेणं गरजेचं आहे. अनुवादिकेने तो अत्यंत समर्पकपणे अनुवाद करून शब्दांच्या समर्पक छटा शोधत सादर केला आहे.

**- संजीवनी खेर**

## ज्योति जोशी
लिखित
# सात पावलांचा प्रवास



**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत ५२० रु.**

चार पावलांची आमची ही जोडी! ४७ वर्षांनी बघता बघता अचानक दोन पावलं मध्येच अडखळली. त्याच्या हातांची घट्ट पकडही सैल होऊन निसटायला लागली. माझा अनुभव, मला होणारं दु:खच फक्त या पुस्तकात लिहिलंय. त्याचं भरकटलेलं मन, भ्रम हे सारं पॅण्डॉराच्या पेटीसारखं होतं. ते नोंदवताना डोळ्यांतलं पाणी शब्दांना पुसू लागलं. त्याला काय क्लेश होत असतील, ही कल्पनाही मला करवेना. माझं आयुष्य सामान्य आहे. तरीही वाटतं, प्रत्येकाचं जीवन ही एक आगळीच कथा, त्याची एकच दुर्मीळ प्रत.

**- ज्योति जोशी**

# ९/११ च्या हल्ल्याचे गौडबंगाल

दीपक करंजीकर

**गेल्या जवळपास एकशेचौदा वर्षांच्या काळात जागतिक पटलावर घडणाऱ्या उलथापालथींनी आपल्याला कोड्यात टाकले, अस्वस्थ नि सुन्न केले. या निव्वळ घटना आहेत की घातपात! नि कोण आहे या मागचा सूत्रधार?**

ट्विन टॉवर्सला पहिल्या जेटने धडक दिली तेव्हा, म्हणजे ११ सप्टेंबरच्या सकाळी बेअर स्टर्नचा सी.इ.ओ. जिमी केन आणि अध्यक्ष स्वत:च्या छोट्या टी.व्ही.वर हे अविश्वसनीय दृश्य बघत होता. काही क्षणातच दक्षिण टॉवरला दुसरे जेट धडकले. त्या दिवशी त्याला न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजचा सी.इ.ओ. रिचर्ड ग्रासोने फोन केला. तो म्हणाला की, 'आपण सरकारला ताबडतोब शक्य तितक्या लवकर शेअर बाजाराचा व्यवहार सुरू करण्यास सांगायला हवे.' ग्रासो असेही म्हणाला की, 'दुसऱ्या दिवशी तो वॉलस्ट्रीटवरच्या सगळ्या फर्म्सच्या प्रमुखांची एक मीटिंग बोलावणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी केन उठला तेव्हा त्याला समजले की न्यूयॉर्कच्या प्रशासनाने 'लोअर मॅन हटन'चा प्रवेश बंद केला आहे. केनने ग्रासोला फोन करून सांगितले की या मीटिंगसाठी बेअर स्टर्नचे ऑफिस उपलब्ध आहे. ही मीटिंग १२ सप्टेंबरला दुपारी दोन वाजता लगेच बेअर स्टर्नच्या सातव्या मजल्यावर बोर्डरूममध्ये घेण्याचे ठरले.

जणू काही अमेरिकेच्या आर्थिक जगतातले सर्वच 'मुखिया' तिथे होते. केन लिहितो, 'या सगळ्या इतक्या लोकांना एकमेकांचा द्वेष न करता एकत्र शांत बसलेले कधीच पहिलेले नव्हते.'

९/११च्या थक्क करणाऱ्या हल्ल्याची व्याप्ती भयानक होती. बारा दशलक्ष स्क्वेअर फूट इतकी उच्च प्रतीची, महागडी कार्यालयीन जागा नष्ट झाली. इन्शुरन्स उद्योगाचे एकूण विम्याचे दावे चाळीस बिलियन डॉलर्स इतके प्रचंड होते. सुमारे पन्नास हजार लोकांचे तिथून स्थलांतर झाले. ज्या हल्ल्याने आजच्या जगाचे सारेच आर्थिक, राजकीय संदर्भ बदलून टाकले, त्या ९/११ च्या भोवती असणारे संशयाचे धुके मात्र काळागणिक अधिकच गडद होत गेले आहे. त्याच्या अनेक थिअरीज आहेत. अनेक लोक तावातावाने त्याबद्दल बोलतात. बोलणारे अमेरिकेवरच्या 'पर्ल हार्बर'नंतरच्या या एकमेव हल्ल्याचे विश्लेषण करताना राष्ट्रप्रेमाने उसळतात. भावुकही होतात काही अमेरिकन माणसे, कारण त्यांनी आपले जिवलग या हल्ल्यात निष्कारण गमविले आहेत.

मी या हल्ल्याच्या वेळी अमेरिकेत होतो. या सगळ्या शोकाकुल काळाचा मी साक्षी आहे. अमेरिकेच्या आर्थिक ताकदीच्या बुलंद मनोऱ्यांची पडझड, अमेरिकेच्या अस्पर्शित ताकदीला तब्बल पंचावन्न वर्षांनंतर दिलेले आव्हान आणि गेल्या सत्तर वर्षांत दुसऱ्यांदा तब्बल चार दिवस बंद पडलेले 'न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंज' यांच्या एकत्र आणि गंभीर अशा सावल्या, त्या



सर्व वातावरणावर होत्या. माझ्यासारखी परदेशी माणसे अमेरिकन समाजाची ही बधिर शोकाकुल अवस्था बघताना, त्या लोकांच्या मूकपणे हे सहन करण्याच्या पद्धतीने जास्तच अबोल झाली होतो. सर्व कर्मचाऱ्यांना सुट्टी देण्यात आली. आम्ही सर्वजण तिथून निघालो. माझा एक अमेरिकन सहकारी मित्र माझ्याबरोबर होता. मला त्याच्याशी बोलण्याची, ह्या सगळ्या गोष्टींना एक साधारण अमेरिकन नागरिक कसा सामोरा जातो याची उत्सुकता होती, पण ती व्यक्त करणे सभ्यपणाचे ठरेल असे मला वाटले नाही. इमारतीच्या पार्किंग लॉटमध्ये निरोप घेताना तो म्हणाला, ''सबवेला थांबूया का?'' खाताना तो अधिकच मोकळा होत गेला. आम्ही निघालो तसे तो मला अगदी सहज म्हणाला, ''दीपक, वॉल स्ट्रीटवर या हल्ल्याचा दीर्घ परिणाम होईल. तू एक काम कर. बाजार सुरू होईपर्यंत डिझास्टर रिकवरी प्लान बनविणाऱ्या कंपन्यांचे शेअर बघून ठेव आणि आणि पैसे असतील तर भरपूर विकत घे. त्यांना पुढच्या दिवसात खूप चांगला भाव येईल.''

लांबवर जात असलेली त्याची कार पाहताना माझ्या मनात मात्र बरेच काही रेंगाळत राहिले. भांडवलशाही देशातली माणसे एखाद्या घटनेचा कसा विचार करतात नाही? सगळे अमेरिकन दुःखी होते. प्रश्न तो नाहीच. मीही दुःखी होतो. दुःखातही त्याची बाजाराची जाणीव किती तीव्र होती! मला अप्रूप आणि दुःख दोन्हीही वाटले.

मी उगाच भाबडेपणाचा आव आणला असेल का? नाही, पण सभोवताली घडणाऱ्या सर्व गोष्टींकडे बाजाराच्या नफ्यातोट्याच्या चष्म्यातून पाहणे मला अंतर्मुख करून गेले. आज त्या देशात इतकी वर्षे काम केल्यावर आणि इतर अनेक देशांची मुशाफिरी केल्यावर मात्र माझी खात्री पटते आहे की जगातल्या सर्व गोष्टींच्या मुळाशी फक्त पैशाचा विचार आणि अर्थकारणच आहे. ते बुलंद बुरुज कोसळले, त्यांच्या बाजूच्याच गल्लीत जगाचे सर्वशक्तिमान आर्थिक केंद्र आहे. त्याठिकाणी रोज जे काही घडते त्याचे पडसाद जगातल्या नऊ स्टॉक बाजारांत उमटतात. न्यूयॉर्कमधील वॉल स्ट्रीट नावाच्या एका गल्लीतून हलणारे अक्षरशः अब्जावधी डॉलर्सचे आर्थिक व्यवहार, ज्यावर जागतिकीकरणाच्या रेट्यात सारे जग आज अवलंबून आहे.

ते पुढे जवळून अभ्यासताना ठळकपणे जाणवले ते इतकेच की जगाच्या आर्थिक चलनवलनाची सर्व रुजुवात इथे होते. इथे उच्चारली गेलेली अर्थसूत्रेच अंतिम आहेत आणि त्या सूत्रांचे उच्चारण करणारे सूत्रधार ज्यांच्या निर्देशाबरहुकुम सारे जग निमूटपणे झुकते आहे. एखादा विस्तृत आणि वरवर स्वतंत्र भासणारा ऑर्केस्ट्रा त्याच्या नियंत्याच्या छोट्या दोन काड्यांनी बांधून ठेवावा तसे हे सूत्रधार! एखाद्या जादूगारासारखे त्यांचे चेहरे जणू एखाद्या मंत्रभाराने जगाच्या संघर्ष-समझोत्याचे, स्वामित्व-परावलंबित्वाचे, मानसिक बळ -छळाचे अदृश्य अशा धाग्यांनी नियमन करीत आहेत. या मूठभर माणसांचा आज आणि याआधीही जगातील सात अब्ज माणसांच्या आयुष्यावर विलक्षण पहारा आहे. जणू एखाद्या अशा ठिकाणी ही काही माणसे जगातल्या संपत्तीचा मोठा पट मांडून बसली आहेत, ज्यावरच्या सर्व खेळ्या, या प्रत्यक्षात सकारण भासत असल्या तरी त्या त्यांच्या संकेतांचे सारांश आहेत. जगात काय घडायला हवे ह्याचा ते एक डाव टाकतात, चपळाईने त्यांच्या हातांची बोटांची हालचाल सुरू होते. त्याला

बांधलेल्या धर्म, दहशतवाद, निरक्षरता, सीमावाद, सार्वभौमता यांचे दोर खेचले जात्तात आणि जगात काहीतरी घडू लागते. ते कधीतरी युद्ध असते, कधी एखाद्या देशाचा नकाशा विस्कटलेला असतो, कधी प्रबळ धर्मांध डोके वर काढतात, कधी आरोग्याचे प्रश्न भेडसावू लागतात तर कधी मस्तवाल राष्ट्रप्रमुख अंतर्धान पावतात आणि जग वेगळ्याच वाऱ्यावर डोलू लागते. अर्थात इथे आपण बघतो त्या फक्त हलणाऱ्या कळसूत्री बाहुल्या, जी कधी सरकारे असतात, कधी कोर्पोरेट क्षेत्र असते, कधी युनायटेड नेशन्स, वर्ल्ड बँक, नाणेनिधी अशा संस्था असतात तर कधी उजव्या-डाव्या विचाराचे समूह असतात, विविध वादांचे अभिमान बाळगणारे बुद्धिजीवी पंथ असतात आणि कोणीच नाही तर मग अडाणी, आपापल्या देशावर प्रेम करणारी, चेहरा व परिचय नसणारी प्रजा असते. हे सूत्रधार 'दोर' कोण याचा विचार करीत नाहीत. ते नवनवीन दान टाकीत पुढे निघालेले असतात. जगात त्या बरहुकूम घडणाऱ्या आर्थिक-सामाजिक, उत्पातांनी यांच्या चेहऱ्यांवर सुरकुत्या उमटत नाहीत. याचे कारण ते बेमुर्वत, बेपर्वा आहेत असे नाही तर ते परिणामात: गुंतून पडत नाहीत हे आहे. उलटपक्षी ते अधिकच संवेदनशील असतात. मी हे जे सांगतो आहे ते तुम्हाला कविकल्पना, अतिशयोक्ती वाटू शकते. तो हक्क तुम्हाला आहेच. कदाचित आपण कोणाच्या तरी तालावर चालतो याचे वाटणारे वैषम्य अथवा आपल्या स्वतंत्र असण्याच्या भावनेचा मोठा पगडा ह्या दोन्हीही भावना त्याला कारणीभूत असतील, पण एका वेगळ्या अर्थाने तुम्हाला असे वाटते यातच त्यांच्या अदृश्य खेळाचा विजय आहे, असे यावर माझे म्हणणे असेल. असो.

हे सगळे खरे असले तरी ९/११ घडविला कोणी याचे तर्कवितर्क आज तब्बल दशकानंतरही संपलेले नाहीत, अगदी ओसामाच्या खातम्यानंतरही. असे का? ओसामा बिन लादेनच्या कहाणीतही काही संशयी रंग ठासून भरलेले असावेत हा निव्वळ योगयोग नाही. ओसामा हा सी.आय.ए.चा एकेकाळाचा दोस्त. सोव्हिएत रशियाच्या अफगाणिस्तान प्रवेशाला अमेरिकेने जो विधिनिषेधशून्य विरोध केला. त्याचे बाय प्रॉडक्ट म्हणजे ओसामा. मुजाहिद्दीनकरता सुरू केलेले अनेक ट्रेनिंग कॅम्प्स हे बिन लादेनच्या नेतृत्वाखाली आणि सी.आय.ए.च्या पैशाने सुरू होते. सी.आय.ए.ने त्या काळात तिथल्या अनेक अफूच्या दलालांमार्फत, वॉर लॉर्डमार्फत अफगाणिस्तानात अमाप पैसा ओतला. राजकीय पटावरील शीतयुद्धाला दहशतवादाची किनार लावण्याचे पाप कोणाचे? त्या कोणत्या मोठ्या चित्राच्या रेषा होत्या? आधी बुश, ओबामा आणि आता ट्रंप जगभरातल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल कितीही गळे काढीत असले तरी या सगळ्या दुष्टचक्राची सुरुवात त्यांच्याच देशाद्वारे कोणी केली आहे हे काय त्यांना माहीत नाही? बिन लादेनच्या टोळीच्या खांद्यावर दिसणारे शोल्डर मिसाईल कोणी बनविले आहेत? कोणी ते त्यांना पुरविले आहेत? त्यांची तोंडे नंतर फिरली आहेत म्हणून काय त्यांचे मूळ विसरता येईल ?बिन लादेन सी.आय.ए. कळसूत्री बाहुला होता असे आज सगळेच बोलतात. पण त्या कळसूत्राचे दोर कोणाचे हे मात्र कोणीच का सांगत नाही? तो अगदी मारला जाईपर्यंत त्याचा ठावठिकाणा अमेरिकेला माहित होता आणि पाकिस्तानात त्याला दडवून ठेवण्यात आणखी कोणत्या खेळी पूर्ण व्हायच्या होत्या, याचा ऊहापोह करणारी अनेक लेख, पुस्तके आहेत. बिन लादेनची अख्खी अलकायदा सी.आय.ने घडविली, पोसली आहे. या पार्श्वभूमीवर म्हणूनच बिन लादेनचा ९/११च्या हल्ल्याशी असणारा संबंध धूसर होत जातो. त्याने हल्ल्याची जबाबदारी घेणे वेगळे आणि ते उत्तरदायित्व अमेरिकेच्या कोणत्याही कोर्टात सिद्ध होणे वेगळे! ठावठिकाणा माहीत असताना त्याला पकडून आपल्या कसाबसारखा आरोपी न करणे हे जितके अनाकलनीय तितकेच बिन लादेनच्या हत्येचे श्रेय ओबामांनी घेणेही अनाकलनीय. एखाद्याला आरोपी समजून मारून टाकणे आणि आरोपी म्हणून न्यायालयासमोर उभे करणे, यात मूलभूत सत्याचा फरक आहे हे नाकारून कसे चालेल? ९/११ च्या हल्ल्यात मारले गेलेल लोक हे हुतात्मे आहेत याचा अर्थ असा आहे की सामान्य नागरिक जेव्हा हुतात्मे म्हणून गणले जातात तेव्हा त्यामागे एक मोठे षड्यंत्र कार्यरत असते, ज्याद्वारे कंपन्या सामान्य नागरिकांना ढालीसारखे वापरतात.

प्रोफेसर डेव्हिड रे ग्रिफिन लिहितो - ( हा ९/११ वरच्या एकूण ११ पुस्तकांचा लेखक आहे) ९/११ चा हल्ला मुस्लिमांनी केला होता ही बाब अत्यंत खोटी आणि तो बनाव आहे. मुस्लीम हायजॅकर्स यात कसे असतील, जेव्हा कोणत्याही विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेज त्यांचे एकही चित्र दाखवत नाही. एकही विमानात प्रवाशांच्या लिस्टमध्ये एकाही अरब माणसाचे नाव नाही. एखादा अरब विमानात चढला याबाबत एकाही एअर लाईनचा बोर्डिंग स्टाफ साक्ष द्यायला पुढे आलेला नाही. या हल्ल्यात एकतरी अरब मेला याचे एकही पोस्टमार्टेम अपघाताच्या जागी उपलब्ध नाही. एकीकडे हा सगळा खोटारडेपणा असताना एका संशयित आरोपीचा - सातम अल स्कामी याचा पासपोर्ट अचानक कुठेही न फाटलेला, जळालेला असा ग्राउंड झिरोला एफ.बी.आय.ला सापडतो ही जादूच आहे नाही तर काय? एफ बी आय म्हणते की 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' कोसळल्यावर रस्ते साफ करताना या माणसाचा पासपोर्ट सापडला, जो या फ्लाईटमधला हायजॅकर होता. आता हा साधा कागदी पासपोर्ट या सगळ्या धुमाळीत सुरक्षित कसा राहिला याचे कोणतेही उत्तर एफ.बी.आय देत नाही. हे अत्यंत गूढ आणि विचित्र विधान आहे. म्हणजे एकाही अतिरेक्याची डेड बॉडी सापडत नाही, कोणतेही फर्निचर सापडत नाही, एकही कॉम्प्युटर सापडत नाही आणि त्या प्रचंड राखेत केवळ अतिरेक्यांचे पासपोर्ट सापडतात हे फारच लक्षणीय आहे. असले प्रश्न हे अमेरिकेला लज्जास्पद आहेत विमानातले कोणत्याही आघातात कधीही नष्ट न होणारे ब्लॅक बॉक्सेस पूर्णपणे वितळून जातात किंवा हवेत वाफ होऊन जातात हे सुद्धा पदार्थविज्ञान म्हणून हास्यास्पद आहे. असे सगळे घडत असताना महम्मद आटा आणि स्काम्मी यांचे पासपोर्ट एकदम कोरे असल्यासारखे सापडतात हा दावा थक्क

करणारा आहे.

अनेक लोकांना हेच माहीत नाही की या अपघाताचा अत्यंत सखोल असा गुन्हेगारी तपासच झालेला नाही. कोणत्याही यंत्रणेने तो केलेला नाही. म्हणजे वर्ल्ड ट्रेड सेंटर कोसळणे हा अमेरिकेच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि क्रूर हल्ला आहे असे मानले तर त्याचे सापडलेले सगळे पुरावे तपासयंत्रणांनी का जपून ठेवले नाहीत? तिथले सापडलेले लोखंडाचे तुकडे स्क्रॅपच्या भावात विकण्यात आले. भारत त्याचा एक गिऱ्हाईक होता ही अजून एक खेदजनक बाब इथे सांगितली पाहिजे. लोखंडाचे जे काही मोठाले तुकडे सापडले, त्याचे बारीक-बारीक तुकडे करून ते त्वरेने तिथून हलविण्यात आले. चीन-भारतात ते वितळण्यासाठी पाठवले गेले. लोकांना एक तद्दन भंपक गोष्ट सांगून तातडीने अफगाणिस्तान युद्धाला सुरुवात करण्यात आली. इकडे अमेरिकन सैन्य सगळे पाश सोडून आणि आपल्या बांधवांच्या हत्येच्या सूडाने पेटून अफगाणिस्तानमध्ये उतरत असताना इकडे न्यू जर्सीच्या दोन मोठ्ठाल्या जंक यार्डमध्ये तिथले सगळे महत्त्वाचे पुरावे वितळले जात होते, हे किती भीषण आणि क्रूर आहे.

९/११ च्या घटनेवर संशयाच्या दाट सावल्या उगाच पडलेल्या नाहीत. त्या दूर करण्याचे ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे आवाज का दाबले गेले? ९/११ च्या हल्ल्यापाठोपाठ आणखीही काही बळी गेले आहेत. ते दहशतवाद्यांचे नाहीत तर अमेरिकन राजकीय समाजजीवनातल्या मातब्बरांचे आहेत. अमेरिकन जीवनाच्या मुक्त आकाशात सारे काहीसमोर उलगडून ठेवणाऱ्या प्रसिद्ध व्यक्तींचे आहेत. ९/११ हे एक अनाकलनीय कारस्थान आहे. त्याचा शोध आपल्या मनाला गुंग करून टाकणारा आहे.

*(वास्तव घटनांमागच्या सत्याचा सर्जक शोध घेणारे दीपक करंजीकर यांचे 'घातसूत्र' हे कथनपर पुस्तक 'ग्रंथाली' लवकरच प्रकाशित करीत आहे. या आगामी पुस्तकातील हा निवडक अंश.)*

**– दीपक करंजीकर**

भ्रमणध्वनी : ९८८१५४६५७८
deepak.karanjikar@gmail.com



# केनिया सफारी!

गणेश कुलकर्णी

**भारतात चित्ता दिसत नाही. शेवटचा चित्ता १९४७ साली मारला गेला याची नोंद आहे. इथे चित्ता आम्ही एकदा सकाळच्या फेरीत मनसोक्त अनुभवला. अक्षरशः त्याच्यापासून हाताच्या अंतरावर आमच्या गाईडने गाडी लावली. इतकं देखणं जनावर की वाटलं, त्याला कवेतच घ्यावं....**

भारतात बऱ्यापैकी भटकल्यावर यावर्षी मात्र परदेशात तेही आफ्रिकेत फिरायला जाण्याचा बेत नक्की केला. आपण म्हणताना साऊथ आफ्रिका म्हणतो, पण खरे तर पूर्व आफ्रिकेत जे जंगल आहे त्याचा आम्हा सर्वांनाच मोह वाटत आला आहे.

आम्ही केनिया एअरवेजने प्रवासाला निघालो. मुंबईतल्या नव्या एअरपोर्टवर आमचं सामान देऊन झालं. नवीन विमानतळ 'जीवीके' कंपनीने जबरदस्तच बनवला आहे. प्रचंड मोठ्या अवकाशात तो विस्तारला आहे. त्याची भव्यता बघूनच छाती दडपून जाते. आमचं विमान पहाटे साडेतीनचं होतं, पण विमानतळाच्या आत शिरल्यावर बाहेर दिवस आहे की रात्र याचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. विमानतळावर आम्हाला प्रत्येकाला वेगवेगळे प्रश्न विचारून याची खात्री करण्यात आली की आम्ही केनियाला जंगल सफारीसाठीच चाललो आहोत. सगळे सोपस्कार होऊन आम्ही लाउंजमध्ये जेव्हा विसावलो तेव्हा निव्वळ दिवसच वाटत होता. घड्याळ मात्र चक्क रात्रीची दीडची वेळ दाखवत होतं. खाणंपिणं, कपडे यांचे अफाट झगझगीत स्टॉल्स, सगळीकडे तुमचं स्वागत करत होते. फक्त किंमत विचारायची नाही. मधे-मधे बसण्यासाठी, आराम करण्यासाठी सोफा-खुर्च्या होत्या, अनेक लॅपटॉप वायफायसहित सेवेला उपलब्ध होते. खा-प्या-मजा करा असा सगळा मामला!

केनिया एअरवेजच्या विमानात बसल्यावर पहिला धक्का स्वतःच्या सौंदर्याच्या कल्पनेला बसला. आपण हवाई सुंदरी सुंदरच असेल असं गृहीत धरतो. अर्थात आपल्या सौंदर्याचे मापदंड निराळे, हे केनियाच्या हवाई सुंदरीना बघितलं तेव्हा लख्खपणे जाणवलं. काळा घट्ट रंग, उंची ताडमाड, अंगात काळपट लाल रंगाचा युनिफॉर्म, नाकी डोळी छान, सर्वांनीच केसांचा बुचडा बांधलेला, एकंदरीतच आपल्याला न झेपणारं प्रकरण.

विमानाचा प्रवास नवीन नव्हता. भारतातल्या भारतात याचा अनुभव घेतलेला होता, पण परदेशप्रवास मात्र पहिलाच होता. विमान आकाशात उडालं, पोटात गोळा आला. जमिनीशी संबंधच सुटला. आम्ही अक्षरशः हवेतच तरंगत होतो. बाहेर खिडकीतून ढग दिसत होते. विमानतल्या खिडकीतून ढगांवर चमकणारी वीज जबरदस्तच दिसत होती. आपल्या डोळ्यांच्या पातळीवर समोर वीज चमकताना पहिल्यांदाच बघत होतो. आपण नेहमी आकाशात वीज चमकताना बघतो, पण आम्ही त्यावेळी आकाशातच असल्याने त्याचं सौंदर्य काही वेगळंच वाटत होतं.


एशियन पॅराडाईज क्राऊन


पाणघोडा


झेब्रा


सिंह


चित्ता


शहामृग


एक शिंगी गेंडा


लिलियाक रोलर


विल्डरबिस्ट


रमणीय सूर्यास्त


विल्डरबिस्ट


फ्लेमिंगो


हायना


गिधाड


कायगेलिया अफ्रिका


हरणं

*आभाळ घरावर माझ्या ताऱ्यांनी लहरून येते*
*मग जरा वाकतानाही डोळ्यांतून वीज चमकते!*

ग्रेसना आठवतच बसल्या-बसल्या पेंगत राहिलो. नैरोबीत उतरायला सकाळ उजाडली. साधारण पाच-साडेपाच तासांचा प्रवास होता. सकाळचे ८.३० वाजले होते. पावसातच विमान जमिनीवर उतरलं होतं. पावसाने वातावरणात आल्हाददायक गारवा आणला होता.

मनात माझ्या धाकधुक होती. कुणीतरी केविन नावाचा माणूस आम्हाला घ्यायला येणार होता. फोन बंद असल्यामुळे कुणाला कसा संपर्क करायचा याचा काही अंदाज येत नव्हता. बाहेर तुडुंब गर्दी उसळलेली. प्रत्येकाला घ्यायला कुणी ना कुणी आलेलं, इतक्यात हातात 'कुलकर्णी' नावाचा बोर्ड घेतलेला एक माणूस इतक्या गर्दीतही आम्हाला दिसला. आम्ही जवळ गेल्यावर इंग्रजीत त्याने माझं नाव विचारलं, छानपैकी हात मिळवला, मी मात्र घट्ट मिठीच मारली!

केविनने आम्हाला आमच्या गाडीत बसवलं. किबे नावाचा चालकच आमचा गाईडही असणार होता. पुढचे सहा-सात दिवस आम्ही किबेच्या ताब्यात होतो. पहिल्या भेटीतच केविनने किबेला खूश ठेवण्याची प्रामाणिक सूचना केली कारण तो खूश तरच तुमची सफारी चांगली होणार. हे म्हणजे अगदी भारतातल्यासारखेच होते! किबे बऱ्यापैकी इंग्रजी बोलत होता. आम्ही आपलं इंग्रजीचं ज्ञान तपासून बघितलं आणि जाणवलं की, आपणही इंग्रजीत संवाद साधू शकतो. वर्षानुवर्षे आपण त्या भाषेच्या सान्निध्यात असतोच आणि परत इथली माणसं तुमच्यासाठी अगत्यानं मदत करायला तयार. त्यांची स्थानिक भाषा स्वाहिली आपल्याला बिलकूल उमजत नाही. आमचा किबे त्याचा सहकारी भेटला तर आवर्जून त्यांच्या भाषेत बोलायचा. बोलताना सतत 'बे-बे' असा बकरीच्या बेबाटण्याचा स्वर प्रत्येक वाक्य संपताना लावायचा. सोलापुरात काय 'बे', कसा आहे 'बे' म्हणतात, तसाच प्रकार वाटला.

नेरोबी ते नैरोबी हीच गाडी आम्हाला फिरवणार होती. या गाडीचे वरचे छत गरज असेल तसे उघडता यायचे. खिडकीच्या काचा संपूर्ण एका बाजूला करता यायच्या. सहा जणांना असणारी गाडी आम्हा तिघांसाठीच (मी, स्वप्निल आणि सखी) आरक्षित केली होती. त्यामुळे आम्हाला हवं तसं फिरता आलं. आम्ही तिघेच असल्यामुळे पाहिजे तेथे गाडी उभी करायचो, त्यामुळे एखादा छोटासा पक्षी, फुलपाखरू ते भलामोठा हत्ती/देखणा बिबळ्या आम्हाला निवांतपणे

बघता आले. आम्ही एका बाजूची सीट बंद करून टाकली त्यामुळे स्वप्निलला, माझ्या मुलाला गाडीत मुक्तपणे फिरून फोटोग्राफी करता आली.

दुपार कलता-कलता आम्ही लेक-नूकुरूच्या हॉटेलात शिरलो. आम्हाला दिलेली खोली मागच्या बाजूला होती. भारतातला साधारण असा अनुभव असतो की तुमची खोली पुढच्या बाजूला असणारच नाही. किचन लांब कुठे तरी असणार. त्यामुळे खोलीपासून खूप चालावे लागते. तेव्हा मनातल्या मनात खट्टू झालो. वाटले इथे पण आपली कदर नाही. आपण मागच्या बाजूलाच असणार पण खोलीत शिरलो आणि जीव पार वेडावूनच गेला. हॉटेलच्या माणसाने सामान ठेवले आणि गॅलरीचा दरवाजा उघडून दिला तर समोर नजर जाईल तितका नुसता हिरवा रंग पसरलेला होता. दुपारच्या कोवळ्या उन्हात दोन-चार हरणं चरत होती आणि अगदी हाताच्या अंतरावर तीन गेंडे निवांतपणे चरत होते. हिरव्या रंगावर राखाडी पांढरट रंगाचे गेंडे उठून दिसत होते. कुठलाही आटापिटा न करता गेंड्यासारखा भला मोठा प्राणी सुरुवातीलाच समोर दिसणं आम्हाला सर्वांना सुखावणारं होतं. आवारात देखील छानपैकी हिरवीगार झाडं होती. त्यावर भरपूर प्रकारचे पक्षी निवांतपणे बागडत होते. सभोवताली भन्नाट शांतता होती. पक्ष्यांचा-वाऱ्याचा आवाज तेवढा सोबतीला. आजूबाजूला जपान, चायना, इंग्लड येथील प्रवासी. त्यातही तरुण फक्त आम्ही, भोवतालचे सारे पन्नाशीपुढचे, पण उत्साह आमच्यापेक्षा कणभरही कमी नाही. एक होतं आम्ही तिघंही काही बघितलं की, फसफसून जायचो, उसळायचो. त्यावेळी त्यांची प्रतिक्रिया मात्र फारच सौम्य असायची. अर्थात आम्ही सारे वेगवेगळ्या गाड्यांमध्ये असायचो.

ते त्यांच्या वयस्कर ग्रूपमध्ये धमाल करत असायचे, सारेच चिरतरुण भासायचे. आमचा गाईड मात्र चायनातल्या लोकांवर चिडायचा. या ठिकाणी चायनामधल्या लोकांनी एक हॉटेल काढलं आहे. त्यात चिनी लोकांना अधिक महत्त्व दिलं जातं आणि इथल्या स्थानिक लोकांना मात्र टाळलं जातं. त्याच्या रागाचं हे एक कारण असावं.

आम्ही तिघंही या प्रवासात मनसोक्त भटकत होतो. भारतातल्या अनेक जंगलांमध्ये गाईड नुसत्या कहाण्यांवर जगतात. 'यहां पे शेर आके गया किंवा यहाँ पे परसो लडाई हुई' किंवा ताडोबात नुसत्या पाऊल खुणांचा मागोवा घेण्यातच तीन दिवस गेले होते. (आताशा ताडोबात वाघ बऱ्यापैकी दिसतोय) या पार्श्वभूमीवर इथले मांसाहारी प्राणी अगदी सहजच दिसतात. इथल्या सफरीत 'बिग फाईव्ह' बघणं मोठं मानाचं असतं. जर तुम्हाला या पाचातले पाचही दिसले तर तुमची सफारी सफल संपूर्ण झाली असं समजायचं. हे बिग फाईव्ह म्हणजे हत्ती, गेंडा, सिंह, चित्ता, बिबळ्या. इथली प्रसिद्ध सोनेरी वानरं काही आम्हाला दिसली नाहीत. लेक-नुकुरूला गेंडे अगदी संपूर्ण परिवारासहित दिसले. इथल्या गेंड्यांना दोन शिंगं असतात. गेंड्याचं बाळ गुटगुटीत आणि बाळसेदार होतं. भारतात एक शिंगी गेंडा आसामला काझिरंगा येथे दिसतो. एक शिंगी गेंडा चावायचा प्रयत्न करतो तर दोन शिंगी गेंडा तुम्हाला शिंगाने उडवण्याचा प्रयत्न करतो.

हत्ती चालताना खूप काळजीपूर्वक आपल्या बाळाला मध्ये लपवून चालतात. हत्तींचा कळप जागोजागी सहज दृष्टीस पडतो. सिंहाचे अनेक परिवार आम्हाला सतत भेटले. सिंह किंवा सिंहीण, ऊठसूट शिकार करत नसतात. त्यातली लांबलचक सिंहीण, त्यांची बाळं, त्यांचे नवरे असे मस्ती करताना आरामात दिसायचे. लहान बाळ, भले ते सिंहाचं असो, हत्तीचं असो किंवा गेंड्याचं सुंदरच दिसतं. सिंहांना विल्डरबिस्टची शिकार करताना, खाताना सहज बघायला मिळतं.

खरं तर या जंगलातली खरी गंमत इथलं स्थलांतर आहे. हजारो लाखो विल्डरबिस्ट आणि झेब्रा टांझानियातून या महिन्यात सेरेंगेटीजवळ मारा नदी पार करून मसाईमारात येतात. हे प्राणी स्थलांतर करून जाऊ नये म्हणून टांझानियातले मूळ आदिवासी खूप आटापिटा करतात, पण प्राण्यांना काय? ते झुंडीच्या झुडीनं इथे येत राहतात. तब्बल दोनचार महिने ते इथे येतात आणि नंतर परत जातात. इथेच काही जण नवे साथीदार शोधतात. नवे बाळ या धकधकीतच जन्माला येतं. नुकतंच जन्मलेलं बाळ सिंहानं किंवा चित्त्यानं खाल्लेलं बघणं त्यांच्या नशिबात असतं. बऱ्याचदा छोटी-छोटी बाळं सिंहांच्या आश्रयाने चालताना देखील दिसतात. विल्डरबिस्ट, झेब्रे लाखोंच्या संख्येत दौडत येणं अंगावर येतं. एक लांबलचक रांग तयार होते. ती रांग संपतच नाही. आपण ऐतिहासिक सिनेमात जशी सैनिकांची रांग पळताना बघतो, तसं काहीतरी चित्र असतं. मध्येच यातला एखादा नायक थांबतो. त्याच्यामागे पूर्ण रांग खोळंबून उभी राहते. या प्रवासात नेमके मी उज्ज्वला बुटालियाचे 'अदर साईड ऑफ सायलेंस' वाचत होतो. पाकिस्तानच्या फाळणीनंतर स्त्रियांच्या झालेल्या किंवा जाणीवपूर्वक केलेल्या कत्तली हा विषय डोक्यातून जात नव्हता. फाळणीमुळे झालेलं स्थलांतर आठवत राहिलं. हवालदीलपणे अनेक विल्डरबिस्ट आणि झेब्रे एका ओळीत नुसते पळत असतात. कुठवर जायचं, कुठे थांबायचं, याचं काहीच भान नसतं आणि दिवसरात्र हे स्थलांतर सतत चालू असतं.

*'न अंदाज कुठले, न अवधान काही; कुठे जायचे यायचे भान नाही...'* असंच काहीसं दृश्य.

हे सारं पहिल्यांदा बघितलं तेव्हा भारावलो, नंतर आम्ही तिघंही हळवे होत गेलो. त्यांचे चेहरे करुण वाटायला लागले. त्यांची कीव वाटायला लागली. म्हणजे भोवताली सिंह सुस्तावलेत आणि समोर पार नजर जाईल तिथवर भांबावलेले विल्डरबिस्ट आणि झेब्रे पसरलेत. आत कुठेतरी कालवाकालव होत होती. सेरेंगेटीची मारा नदी बघितली. तिथनं हजारो प्राणी बेधडक पाण्यात उडी मारतात, पडतात, धडपडतात परत उठतात. बाजूच्या मगरी शांतपणे हे सारं बघत असतात. त्यांना शिकार करण्यासाठी काही फार कष्ट करावेच लागत नाहीत. त्यामुळे इथले प्राणी, पक्षी तुमच्यावर आक्रमण करत नाहीत. त्यांचं त्यांना खाणं पुष्कळ असतं. एकमेकांच्या खाण्यावर

उगाच कुणी डल्ला मारत नाही, याला कोल्हा आणि हायना मात्र अपवाद! गिधाडांनी घेरून लहान विल्डरबिस्टला टोचून मारतानाही बघितलं. गिधाडंही प्रचंड मोठी. त्यांची धाड जेव्हा येते तेव्हा सारा आसमंत पाखरांनी भरून जातो. ती झुंडीनं येतात. एखाद्या भक्ष्यावर बसले तर पार साफ होईस्तोवर उठणार नाहीत. इथले सर्वात मोठे मराबू स्टार्कही पाहिले. त्यांच्या लांबलचक चोची कुठल्याही प्राण्याचं पोट फाडू शकतात. आम्ही हॅमाकॉक नावाचा कोंबडीसदृश पक्षीही बघितला. तो प्रचंड मोठं घरटं बांधतो. लिलियाक रोलर 'जगातला सर्वात सुंदर रंगीबेरंगी पक्षी' असे नामाभिधान लाभलेला म्हणजे आपला निलपंख, पण अधिकचे रंग ल्यायलेला सुंदर पक्षी तोही आम्हाला बघायला मिळाला.

मी जेव्हा केनिया सफरीला जायचं ठरवलं तेव्हा कामावर येता जाता अचानक एका झाडानं लक्ष वेधून घेतलं. मोठा, भरपूर पानं असलेला वृक्ष, त्याला लटकणारी दुधी भोपळ्यासारखी फळं, लाल रक्तवर्णाची मोठी फुलं मला अचंबित करत होती. मग मी माझ्या झाडप्रेमी मित्राशी बोललो तर ती 'कायगेलिया आफ्रिका' या वृक्षाची फुलं, फळं आहेत असं कळलं. एकदा बरोड्याहून त्याचे फळही घेऊन आलो. आत भरपूर बिया असतात. वाळूसदृश जमिनीतच त्याचे रोप रुजते, तेही सप्टेंबरच्या आसपासच पेरायला हवे. ती सगळी माहिती गोळा होताना अनेक कायगेलिया जागोजागी दिसू लागले. झाडं पूर्वीपासून तिथेच होती, फक्त मला अनोळखी! पण एकदा ओळख झाल्यावर मला ती पट्कन वेचता आली. जेव्हा केनियात आम्ही सफरीला होतो तेव्हा या परिवारातले अनेक वृक्ष बघून मला या योगायोगाचे आश्चर्य वाटत राहिले. म्हणजे मला आतूनच या झाडांशी ओळख करून घ्यायला हवी असं वाटणं, हा माझ्या पुढच्या प्रवासातला एक टप्पा होता, जेणेकरून केनियात फिरताना मला कुठलंही झाड अनोळखी वाटणार नाही. केनियात ॲकॅशिया, कायगेलिया यांनी भरलेलं जंगल बघितलं. ॲकॅशियाचे विविध प्रकार बघायला मिळाले. आकाशाशी स्पर्धा करणारे उंच ॲकॅशिया आमच्या हॉटेलच्या परिसरात आम्हाला खुजं ठरवत. निवडुंगाचं रान आणि त्याचा मोठा वृक्षासारखा आकार, बोरांची जाळी, त्यात दुपारी लांबलचक सिंहिणीला लोळताना बघितलं. गवताचे अनेक प्रकार समोर दिसत होते. संध्याकाळची किरणं गवतावर पडायची तेव्हा प्राणी आपसूक त्यात मिसळून जायचे. त्यांना नेमकं हेरणं अवघड व्हायचं. या प्रवासात तब्बल १५० प्राणी, पक्षी बघितले. डिस्कव्हरी चॅनलचं सारं आकर्षणच संपून गेलं. प्रत्यक्ष डोळ्यांसमोर निसर्गातल्या घडामोडी बघणं याचा आनंद काय वर्णावा. खरं तर मी इतकं लिहिलंय पण तो आनंद तुमच्यापर्यंत पोचवताना मलाच माझं करंटेपण जाणवतंय. अगदी छोट्या सनबर्डपासून मोठाल्या शहामृगांपर्यंत अनेक रंगाचे, आवाजाचे, सुंदर सुंदर पक्षी आम्ही या प्रवासात बघितले. त्याचप्रमाणे छोट्या मुंगूस, उंदरांपासून, हत्ती, जिराफ ते सिंह, चित्ता, बिबळे यांना मनसोक्त बघितलं. इतकं काही डोळ्यांसमोर रोज दिसायचं की बऱ्याचदा सिंह-हत्ती यांच्याकडे आम्ही दुर्लक्षच करायचो.

भारतात चित्ता दिसत नाही. शेवटचा चित्ता १९४७ साली मारला गेला याची नोंद आहे. इथे चित्ता आम्ही एकदा सकाळच्या फेरीत मनसोक्त अनुभवला. अक्षरशः त्याच्यापासून हाताच्या अंतरावर आमच्या गाईडने गाडी लावली. इतकं देखणं जनावर की, वाटलं त्याला कवेतच घ्यावं! सकाळच्या कोवळ्या उन्हात त्यानं आम्हाला फोटोसाठी भरपूर पोझेसही दिल्या. त्यानं आम्हाला साफ दुर्लक्षित केलं. तो आपल्या मस्तीत होता. चित्त्याचा वेग हे त्याचं मोठं अस्त्र. तो चालताना त्याचा लांबसडक, कमनीय बांधा खूपच मोहक दिसतो. त्याच्या डोळ्यांभोवती काळी रेष असते. त्याला गाय म्हणतात. रडताना अश्रू ओघळले तर कसे दिसतील तशी एक काळी जाड पट्टी डोळ्यांच्या दोन्ही बाजूला असते. याचा उपयोग तो उन्हातही दूरचं बघण्यासाठी गॉगलसारखा करतो. त्या मानानं बिबळ्या मात्र भारतात सर्रास दिसतो. बिबळ्या खूपच लाजाळू, वाघाप्रमाणे लपून हल्ला करणारा. अगदी सावध चालणारा. त्याच्या पायाला गादी असल्यामुळे हे चालतात तेव्हा जंगलात पाला-पाचोळ्याचा आवाज होत नाही, पण चित्ता बेधडक समोरून वार करतो. त्याची पावलं वेगळी असतात. चित्ता आपलं सावज पट्ट्यात आल्यावरच धावतो. तो धावतो तेव्हा सगळं आयुष्यच पणाला लावतो. ऐंशी कि.मी.च्या वेगाने तो झपाटतो तेव्हा सावज पकडूनच थांबतो. खरं तर मार्जार परिवारातील हे सारे प्राणी, पण ही सगळी मंडळी सिंहाला मात्र घाबरतात. सिंह समोर आला तर शिकारही सोडून जातात.

बिबळ्याने मात्र आम्हाला दिवसभर दमवलं. महाराष्ट्रातही बिबळ्या अगदी सहज दिसतो. पेपरमध्ये देखील वाचायला मिळत असतं की, बिबट्याने नागरी वस्तीत आक्रमण केलं वगैरे. तो बिबळ्या आम्ही दिवसभर शोधत होतो पण दिसत नव्हता. आमच्या सफरीचा शेवटचा दिवस. आम्ही तिघंही दिवसभराच्या सफारीनं थकलेलो, तरीही बिबळ्या बघण्यासाठी आसुसलेलो. या दिवशी दिसणारे सिंह, हत्ती, गेंडा, झेब्रा, हरणं, पक्षी यात कशातही आमचं मन रमेना. आम्हाला बिबळ्या बघायचा होता. अचानक आमच्या गाईडला फोन आला. तो आम्हाला एके ठिकाणी घेऊन गेला. खूप दूरवर एका झाडाकडे सारेजण दुर्बीण लावून बघत होते. आम्हीही आटापिटा करायला लागलो. काहीच दिसेना. मावळतीचं आभाळ दिसत होतं. वातावरण अंधार पसरण्याच्या मार्गावर होतं. गायी, पाखरं रानातून परतण्याची ही वेळ! आमचा जीव तडफडत होता. सगळ्या गाड्या निराश होऊन परतत होत्या. आमचा किबे गाईड मात्र शांत होता. शेवटी दोनच गाड्या उरल्या. इथले नियम सारेच जण काटेकोरपणे पाळतात. आखलेला रस्ता सोडून जंगलात शिरायचं नसतं. टप्प्याटप्प्यावर वनखात्याची माणसं पहारा देत असतात. त्यात आपण परदेशी, ते दंड डॉलर्समध्ये घेतात. (स्थानिक चलन ११५ शिलिंगला एक डॉलर आणि आम्ही त्यावेळी साठ रुपयांना एक डॉलर घेऊन प्रवास करत होतो. बाजूला झाडात वनखात्याची गाडी लपून उभी होती. नक्की काय झालं माहीत नाही, पण आम्हाला बिबळ्या ज्या झाडावर होता, त्या झाडाजवळ

जाण्याची परवानगी मिळाली. एव्हाना आम्ही तिघंही एक्साईट झालो होतो. स्वप्निलनं साधारण अंदाज घेऊन आम्हाला दुरूनच दुर्बिणीतून हिरव्या झाडावरचा पिवळा ठिपका दाखवला होता. मग छानपैकी आमच्या गाईडने गाडी झाडाजवळ नेऊन उभी केली. बघतो तर महाशय मस्तपैकी शिकारी खाण्यात दंग होते. आम्ही त्याला बघतोय, हे त्याला पसंत न पडल्याचं त्याच्या नजरेतून जाणवलं. त्याने आमच्याकडे पार दुर्लक्ष करून स्वतःच्या खाण्यावर लक्ष केंद्रित केलं. नंतर किबे सांगत होता की, दोन शिकार त्याने या झाडात लपवल्या आहेत. चौदा-सोळा फूट उंच काटेरी झाडावर (अ‍ॅकेशियाचे झाड) हा निवांत शिकार खात बसलेला.

एव्हाना अंधार उतरला होता. जंगलातले वेगवेगळे आवाज कानावर यायला लागले. मग बिबळ्याने देखील आपलं तोंड झाडात लपवून टाकलं. परतीच्या प्रवासात कळलं की, वनखात्याला किबेनं पैसे देऊन पटवलं होतं. ते पैसे त्याला आम्हीच स्थानिक चलनात दिले होते. अचानक त्याच वनखात्याची गाडी अंधारात आमच्या मागावर आली तेव्हा मध्यमवर्गीय आम्ही तिघे बऱ्यापैकी घाबरलो होतो. आम्हाला भर जंगलात अंधारात थांबविण्यात आले. आम्ही ज्यांना पैसे दिले होते ती गँग दुसरी होती. ही माणसं आमच्या इतक्या उशिरापर्यंत जंगलात रेंगाळण्याचा जाब मागत होती. पुन्हा एकदा किबेनं 'बे'च्या भाषेत काही शिष्टाई केली. गाडी पुन्हा सुरू झाली तेव्हा जरासे बरे वाटले. आमच्या परकेपणाची, एकटेपणाची जाणीव अंधाराबरोबरच गडद होत गेली. गाडीच्या हेडलाईटमध्ये फक्त गाडीचा आवाजच अंधाराला चिरत होता. अंधारातलं जंगल अंगावर येत होतं. तिघेही निःशब्द झालो होतो. हॉटेलवर पोचलो तेव्हा आम्ही सुटकेचा निःश्वास टाकला.

आता आमची परतीची सफर सुरू झाली. आम्हाला उगाच भारतीय पद्धतीचं जेवण्याची हुक्की आली. मग आम्हाला किबेनं एका भारतीय हॉटेलात नेऊन सोडलं. प्रचंड पैसे, तेही डॉलर्समध्ये देऊन निव्वळ असमाधानच पदरात पडलं. 'जैसा देश वैसा भेस' म्हणतात. एखाद्या प्रदेशातलं खाणं खाण्यातच खरी लज्जत असते, हे आम्ही भरपूर डॉलर्स देऊन शिकलो. ज्या दिवशी परत निघालो त्या दिवशी केनियाचं बजेट प्रसिद्ध झालं होतं. पेपरातले मथळे तिथल्या स्थानिक बातम्यांनी, बजेटने भरून गेले होते. (पेपरची किंमत तब्बल साठ शिलिंग होती) तसा केनियाही खूप अस्वस्थ आहे. परके-स्थानिकवाद, वंशवाद, अतिरेकी वगैरे, पण या कशाचाही त्रास आम्हाला झाला नाही. भारतीय लोक इथल्या मातीत अगदी मिसळून गेलेत. इथले हॉटेलमालक भारताला आपला मोठा भाऊ मानतात. त्यामुळे भारतीय प्रवाशांची इथे छानच बडदास्त ठेवली जाते. आम्हाला प्रत्येक हॉटेलमध्ये पार किचनमध्ये जाऊन काय हवं ते बनवून घेण्याची परवानगी सर्वांनी मनापासून दिली होती. मसाईमाराच्या हॉटेलात चेक इन करण्यासाठी नाव-गाव लिहीत होतो, तेव्हा रिसेप्शनला त्याने हातात जे पेन दिलं ते चक्क 'नटराज'चं होतं. आपल्या विरारजवळ असणाऱ्या 'नटराज'चं पेन हाताळताना उगाच (आता ते वापीजवळ संजानला बनते.) देशप्रेम वगैरे उफाळून आलं होतं. नटराजच्या मार्केटींगचं कौतुकही वाटलं होतं.

किबेनं आम्हाला एअरपोर्टवर सोडलं. साधारण पाच तासात तुम्ही भारतात परत येता. आमच्या जागा आम्हाला वेगवेगळ्या मिळाल्या. पुन्हा एकदा हट्ट्याकट्ट्या हवाईसुंदरींना न्याहाळत आपल्या विमानाची वाट बघत बसलो. सामान तपासून आत जाताना अचानक सखीच्या पर्समधून आवाज यायला लागले. मोठ्या बॅगा तर कार्गोत दिल्या होत्या. आवाज येता क्षणी आम्हाला दोनचार बंदूकधारी शिपायांनी बाजूला काढलं. नेहमीप्रमाणे आम्ही तंतरलो. काय झालं तेच कळलं नाही. मग एक मुलगी धावत त्या पोलिसांजवळ आली. म्हणाली, 'दे हॅव अ नाईफ.' मग डोक्यात प्रकाश पडला. शेवटी निघताना एक पाऊच बॅगेत भरण्याऐवजी पर्समध्ये आला होता. त्यात नेलकटर, चाकू, कात्री अशा वस्तू होत्या. कैक वर्षे ट्रेकिंगला साथ देणाऱ्या त्या वस्तू तिथे जप्त करण्यात आल्या. दोन-पाच मिनिटं आपण अतिरेकी समजले जाणं, इतर लोकात वेगळे काढलं जाणं, मग इतर प्रवाशांनी एका वेगळ्या नजरेनं आपल्याला न्याहाळणं, पार नकोसं झालं. प्रत्येक टप्प्यावर शिकायचं असतं हे ठीक आहे, जंगलातल्या प्रत्येकाचा जगण्याचा, तगण्याचा संघर्ष प्रखर असतो हेही ठीक होतं. प्रत्येक क्षणाचा जिवंतपणाही आम्हाला भावत होता, तरीही इतक्या तणावाची खरंच गरज असते का? शेवटी आपलं घर ते आपलं घर. परदेशात- *'हे शहर आपले शहर नाही. आसऱ्याला कुठेच घर नाही'*, ही भावना मात्र प्रबळ होत गेली!

**– गणेश मनोहर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८१९९५७८५२
magnakul@rediffmail.com

ग्रंथाली



**रामचंद्र वरक लिखित**
## धनगरगाथा

'धनगरगाथा' हा कुलाचार आणि कुलधर्म यातून उलगडत जाणारा एका संस्कृतीचा आढावा आहे. जीवनमान आणि कलांच्या माध्यमातून, धनगरांचं अवघं जगणं आविष्कृत करणारी, इतिहासातील एका दुर्लक्षित पानावर प्रकाशझोत टाकणारी आणि धनगर जातीच्या इतिहासाला नवा आयाम देणारी ही गाथा जाणकारांच्या संग्रही हवीच.

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

# सुख निर्देशांक

**स्कँडिनेव्हियन देश सुखात लोळत आहेत हे बघून नवल वाटतं कारण त्या देशात दिवसरात्र हत्तीच्या कानापेक्षा जास्त लांब! हिवाळ्यात बर्फ, थंडी आणि सहा महिने अंधार तर उन्हाळ्यात अर्धे वर्ष न मावळणारा सूर्य. म्हणजे सूर्योदय-सूर्यास्ताचा जो आनंद आपण रोज अनुभवतो तो या लोकांना माहीत नाही. मग ते जगात सर्वाधिक सुखी कसे?**

हल्ली जगातल्या जवळजवळ सर्व गोष्टींचे निर्देशांक सापडतात. उद्योग सुरू करणं भारतात एक भीमकृत्य समजलं जातं. उद्योग सुलभता निर्देशांकात २०१७ मध्ये आपला १३०वा नंबर लागे. यावर्षी तो शंभरवर गेला आणि आपल्या वित्तमंत्र्यांना देव पावल्यासारखा आनंद झाला. याशिवाय जगात भ्रष्टाचार निर्देशांक आहे. यात आपण नापास होतो म्हणून राजकारणी मौन पाळतात. आंबेडकरांनी देशात प्रत्येकाला अभिव्यक्तिस्वातंत्र्य दिलं. त्याचा उपयोग आपण मूर्खपणा व्यक्त करण्यात करतो. परवाच एका मंत्र्यानं सीता ही जगातली पहिली टेस्ट ट्यूब बेबी म्हणून आपलं पांडित्य उगाळलं. देशात एवढी सर्जनशीलता असताना अभिव्यक्ती निर्देशांकात आपला पहिला नंबर लागायला पाहिजे, पण त्यात जगात आपला ३८ वा क्रमांक लागतो.

जागतिक शांतता निर्देशांकात तरी आपला माथा उजळ असायला नको का? अहिंसेचे व्रत धरलेल्या व रक्त न सांडता स्वातंत्र्य मिळवणाऱ्या गांधींच्या देशात शांततेची ज्योत अखंड तेवत आहे, असं आपण समजतो, पण या निर्देशांकातही आपल्याला चांगले मार्क्स मिळत नाहीत. त्यात २०१७ मध्ये भारताचा १५६ देशांमध्ये १३७ वा नंबर लागला. याचा अर्थ आपल्या देशात युद्धसदृश्य परिस्थिती आहे. याचं मुख्य कारण आपण मुंगीला चिरडणं पाप आणि भंग्याला मारणं पुण्य समजतो हे आहे. देशात अनेक राज्यांत अराजक आढळतं. महिलेला एकटं रिक्षेत बसणं अनेक राज्यांत सुरक्षित वाटत नाही. शांतता निर्देशांकात 'आईसलँड' या बटू देशाचा पहिला नंबर लागतो. तिथे एवढी थंडी की हिंसा करण्यात कुणाच्या अंगात ऊर्जा शिल्लक राहत नसेल. प्रत्येक देशाच्या पारपत्राचं (Passport) महत्त्व सांगणारा निर्देशांकही आहे. यात अमेरिकेचा नंबर वर लागतो कारण त्या देशाच्या पारपत्रधारकांना जगातील २०० देशांमध्ये १८६ राष्ट्रांत व्हिसामुक्त प्रवेश करता येतो. या बाबतीत भारताच्या पारपत्राचा फार कमी देश आदर करतात. आपण फक्त ५६ देशांना व्हिसा न घेता भेट देऊ शकतो.

असं असताना जगात सुख निर्देशांकही आहे हे ऐकून कुणाला नवल वाटू नये. यात अर्थातच भौतिक सुख अभिप्रेत आहे, पाश्चात्त्यांना बहुधा साष्टांग नमस्कार आणि आत्मिक सुख यातला फरक ठाऊक नाही. सुखाचं मोजमाप करणं अर्थातच नभातल्या तारका मोजण्याएवढं कठीण म्हणून सुख मोजण्यापासून तज्ज्ञ परावृत्त झालेले नाहीत. जगभर त्याची मोजणी करून एक निर्देशांक त्यांनी जाहीर केला. दिवाळीच्या दिवसात तरी आपल्या देशात सर्वत्र सुख नांदत असल्यामुळे आपण या निर्देशांकात कुठे बसतो हे जाणून घेणं महत्त्वाचं. २०१७ मध्ये



जगातल्या १५६ राष्ट्रांमध्ये भारताचा १०३ वा नंबर लागला. या निर्देशांकानुसार जगातले सर्वाधिक सुखी देश म्हणजे स्वीडन, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलँड वगैरे. ते पाळीपाळीनं पहिला नंबर आपसात वाटून घेतात. स्वित्झर्लंड, आईसलंड देशही उच्च श्रेणीत मोडतात, पण अमेरिकेची पहिल्या दहा देशांमध्ये वर्णी लागली नाही. भौतिकदृष्ट्या समृद्ध असलेला महासत्ताक देश अठराव्या नंबरवर फेकला गेला. अमेरिकेत माणसांपेक्षा बंदुका जास्त सापडतात म्हणून असेल. नाहीतर वंशकलहाचा भोवरा नेहमी फिरत असल्यामुळे असेल. या देशात जगात सर्वाधिक दु:खशमनाच्या गोळ्यांचा उपयोग करण्यात येतो, हे याविषयी बोलकं आहे. संपत्तीतून सुखप्राप्ती होत नाही हे आपल्या गीतेत कितीदा तरी म्हटलं आहे. ते आपल्या देशात दारिद्र्य असल्यामुळे सिद्ध करणं कठीण, पण अमेरिकेत ते शहाणपण सिद्ध झालं. आपल्यापेक्षा चीन (८६), भूतान (९७) व नेपाळ (१०१) सुखी आहेत असंच म्हणावं लागेल. लॅटिन अमेरिकेतले देश भ्रष्टाचारग्रस्त असले तरी तुलनेनं सुखी आहेत. त्यांचा २५ ते ३५ दरम्यान नंबर लागतो. मुस्लीम देशही आपल्यापेक्षा वर आहेत. पाकिस्तान ७५ तर इंडोनेशिया ९६व्या क्रमांकावर आहे. हा निर्देशांक तयार करताना प्रत्येक देशातील पर्यावरण प्रदूषण लक्षात घेण्यात आलं. त्याचा सुखाशी संबंध आहे. म्हणूनही आपण मागे पडलो असेल.

मात्र स्कँडिनेव्हियन देश सुखात लोळत आहेत हे बघून नवल वाटतं कारण त्या देशात दिवसरात्र हत्तीच्या कानापेक्षा जास्त लांब! हिवाळ्यात बर्फ, थंडी आणि सहा महिने अंधार तर उन्हाळ्यात अर्धे वर्ष न मावळणारा सूर्य. म्हणजे सूर्योदय-सूर्यास्ताचा जो आनंद आपण रोज अनुभवतो तो या लोकांना माहीत नाही. मग ते जगात सर्वाधिक सुखी कसे? याचं एक कारण इथलं सरकार जन्मल्या-पासून मरेपर्यंत प्रत्येकाची काळजी घेते. कुणी आजारी पडलं तर आरोग्यसेवा पुरवते, नोकरी गेली तर सरकार दुसरी मिळवून देते. जर ते शक्य झालं नाही तर आपल्या तिजोरीतून पगार सुपूर्द करते. म्हणजे इथले लोक पोटापाण्याच्या किंवा शरीराच्या प्रश्नापासून मुक्त झालेले आहेत. अर्थातच या सुविधा फुकट मिळत नाही. त्यासाठी नोकरीधारकांवर जबरदस्त उत्पन्न कर आकारण्यात येतो. त्यामुळे इथला प्रारंभशूरपणा, नवनिर्माणशील व उद्यमारंभी कंपन्या स्थापन करण्याची ऊर्मी लोप पावली आहे. दुसरं म्हणजे या देशांची लोकसंख्या हातावर मोजण्याएवढी व अधिकांशानं एकजिनसी. मुंबईचं सांडपाणी त्यापेक्षा मोठं असून या देशात फारसं धार्मिक, भाषिक, वांशिक व जातीय वैविध्य सापडत नाही.

भारताचं उलटं आहे. आपली लोकसंख्या भव्य नाही तर अतिभव्य आहे. लवकरच ती जगात सर्वात जास्त होणार आहे. एक रुपयाची नोट बघितली की देशाच्या भाषिक विविधतेचं भान होतं. त्यावर सोळा भाषांचा उल्लेख आहे. दिल्लीवरून चेन्नईला रेल्वेनं जाताना जे सांस्कृतिक व सामाजिक फरक अनुभवायला मिळतात तेवढे युरोपमधल्या वेगवेगळ्या देशांतून फेरफटका मारताना दिसत नाहीत. देशात सर्वत्र नोकऱ्यांचा व संसाधनांचा दुष्काळ आणि भ्रष्टाचाराचा सुकाळ असताना सुखाची पालवी कशी फुटणार? कुठल्याही अभावग्रस्त परिस्थितीत विषवल्लीच फोफावणार. शिवाय आपण पर्यावरण वस्त्राच्या चिंध्या केल्या आहेत.

प्रत्येकाला सुख वेगवेगळ्या गोष्टीतून मिळतं. अमेरिकन माणूस स्वत:चं मोठं घर असलं, बँक खात पुरेसं फुगलं आणि चैन करण्याची संधी लाभली की स्वत:ला सुखी समजतो. दर सहा महिन्यांनी सुट्टी घेता येणं या सुखाचा भाग आहे. थोडक्यात म्हणजे त्याचं सुख भौतिक गोष्टींवर अवलंबून असतं व त्या बाबतीत तो

आत्मकेंद्रित असतो. मुलाबाळांचं शिक्षण, नोकऱ्या, लग्न वगैरे त्याच्या सुखाच्या समीकरणात फारशा महत्त्वाच्या नसतात. याउलट भारतीय माणसाच्या सुखाच्या व्याख्येत मुलांचं भलं निर्णायक ठरतं. त्याची सुखाची कल्पना साधी असते. चांगली नोकरी मिळाली, मुलंबाळं शिकली, त्यांचे हात पिवळे झाले आणि बऱ्यापैकी स्वास्थ्य लाभलं की तो आनंदानं वानप्रस्थाश्रमात शिरतो आणि ज्ञानेश्वरीचं पठण करतो. त्यात वर्षाकाठी दोनदा हवापालट करण्याची संधी किंवा मोठं घर, गाडी त्याच्या ध्यानीमनीही नसतं. भौतिक गोष्टी विकत घेऊन मिळणारं सुख क्षणिक व तात्कालिक असतं. तो आनंद लवकरच विरून जातो. तो पुनरुज्जीवित करण्यासाठी पुन्हा नवीन गोष्टी विकत घ्याव्या लागतात. या दुष्टचक्राला गीतेत, 'राजस' किंवा 'तामस' म्हटलेलं आहे. त्यापेक्षा सत्त्वसुख केव्हाही चांगलं आणि दीर्घकाळ टिकणारं. त्याचा अध्यात्म्याशी संबंध आहे. म्हणून सुखाची पाश्चात्यांची व्याख्या लक्षात घेताना हा फरक विसरू नये.

त्यांनी एकूण पाच निकष वापरले. पहिला म्हणजे सामाजिक जाळं. नातेवाईकांच्या, मित्रांच्या किंवा निकटवर्तीयांच्या संबंधांची घट्ट वीण असलेला माणूस एकलकोंड्यापेक्षा केव्हाही जास्त सुखी व समाधानी. अडीअडचणीच्या वेळी तेच मदतीस धावून येतात. अमेरिकेत महिन्याला तीस डॉलर्स भरून घरात एकटी राहणारी बाई केव्हाही आपत्कालीन मदत मागवू शकते, पण त्यात आपुलकी नसते. मग प्रेम दूरच राहिलं. भारतात नातेवाईकांचं जाळं मोठं असतं. याबाबतीत अमेरिकेची तुलना होऊ शकत नाही. यासंबंधाचं दरवर्षी एकदोनदा तरी लग्नकार्यात नूतनीकरण होतं. हे अमेरिकेत आढळत नाही. एक म्हणजे या देशात लग्नाचं प्रमाण घटलं आहे आणि दुसरं म्हणजे ते झालंच तर समारंभपूर्वक होईल हे सांगणं कठीण. अनेक मित्र साक्षीदार घेऊन कोर्टाच्या पायऱ्या चढतात आणि नोंदणी होऊन मोकळे होतात. आईवडिलांना मग टेलिफोनवर ही वार्ता कळवल्यानं फारसा विरस होत नाही म्हणून आपल्या देशात नातेवाईकांकडून कधी कधी डोकेदुखी मिळत असली तरी अधिकांशानं त्यांच्याकडून सुखही मिळतं.

या नातेवाईकांच्या जाळ्यात अर्थातच कौटुंबिक घटक आलेच. मुलंबाळं, बायको, नातवंडांपासूनही सुखप्राप्ती होते असं कोण म्हणणार नाही? अमेरिकेपेक्षा भारतात जास्त अखंड कुटुंब सापडत असल्यामुळे आपल्याला कुटुंबविभक्तीचं दुःख पारखं असतं. ते अमेरिकेत ठिकठिकाणी दिसतं. साध्या माणसापेक्षा विवाहित माणूस जास्त सुखी असतो, त्याचं स्वास्थ्य चांगलं असतं आणि जीवन शिस्तबद्ध असतं हे केव्हाच सिद्ध झालं आहे. म्हणून घटत्या लोकसंख्येचे व घटस्फोटांचे दुष्परिणाम कौटुंबिक सुखावर होणारच.

दुसरं परिमाण म्हणजे दातृत्व. कविवर्य विंदा करंदीकरांनी म्हटल्याप्रमाणे ओंजळ पुढे करण्यापेक्षा मदतीचा हात पुढे धरणं केव्हाही चांगलंच. दयाळू आणि मायाळू लोकांच्या सान्निध्यात राहिल्यानं सुखं मिळतं.

तिसरं म्हणजे विश्वासार्हता (Trust). विश्वासघात करणाऱ्या लोकांपासून कुणाला सुख मिळत नाही. रक्ताचे संबंध असलेल्यांमध्ये इतरांपेक्षा जास्त विश्वासूपणा असतो, पण अमेरिकेत असं सापडतच असं नाही. या देशात अनेकदा नातेवाईकांची जागा मित्रांनी घेतलेली आढळते. कुणी आपल्याला फसवलं तर त्याचे व्रण बुजत नाहीत म्हणून सुखप्राप्तीसाठी विश्वासार्हता महत्त्वाची समजण्यात येते.

चौथं म्हणजे स्वातंत्र्य. जीवनातील मुख्य निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य नसेल तर सुख मिळू शकत नाही. अमेरिकेत अठरावं उलटण्याची प्रत्येक मुलगा व मुलगी आतुरतेनं वाट पाहत असते. त्यावेळी सज्ञान होताच त्याला कायद्यानुसार स्वतंत्र निर्णय घेण्याचं सुख मिळतं. आईवडिलांचा प्रभाव वर्तुळाबाहेर तो फेकला जातो. याचा त्याला परमानंद होतो. आपल्या संस्कृतीत वेगळं आहे. वडिलांचा जन्मभर मुलावर प्रभाव पडतो. कॉलेज कुठलं निवडायचं इथपासून लग्न कुणाशी करायचं यात आईवडिलांचा मोठा वाटा असतो, पण या पारतंत्र्याला रूपेरी झालर आहे. कॉलेजचा खर्च ते भरतात. अमेरिकेत तसं होतंच असं नाही. कायद्यानुसार सज्ञान मुलाला आईवडिलांनी आर्थिक पाठिंबा दिलाच पाहिजे असं बंधनकारक नाही.

या आठवड्यात झालेली एक गोष्ट बघा. आईवडिलांनी गेल्या आठ वर्षांपासून आपल्या मुलाला स्वतंत्र राहा व नोकरी शोध म्हणून सांगितलं, पण आता तो तीस वर्षांचा घोडा झाला तरी आई-वडिलांच्या घराच्या तळभागात राहत होता म्हणून त्याच्या पालकांनी चिरंजीवाला कोर्टात ओढलं आणि न्यायाधीशानं त्याला स्वतंत्र राहाण्याचं फर्मान काढलं. परावलंबित्वामुळे तो सुखसमाधानाला मुकला होता, पण आता स्वतःच्या पायावर उभं राहावं लागत असल्यामुळे त्याला खऱ्या सुखाचा आनंद मिळेल.

पाचवा महत्त्वाचा निकष म्हणजे धन. पुरेसा पैसा जवळ असल्याशिवाय सुख अनुभवणं अशक्यच, पण एका मर्यादेपलीकडे जास्त रोकड कमावल्यानं सुखात भर पडत नाही. पहिला दशलक्ष किंवा अब्ज कमावण्यात आव्हान असतं, पण त्यानंतर पैसा साध्य न रहाता साधन बनतं. इथे दोन संस्कृतीत बराच फरक आढळतो. कोट्यधीश होण्याचं समजा भाग्य लाभलं तर आपल्याला दुसरी कोटी कमावण्यात तेवढा रस वाटत नाही, पण अमेरिकेतला लक्षाधीश असमाधानी असतो. जास्तीचे पैसे कमावणं हे उद्दिष्ट सोडून तो पैसे जग बदलण्यास व आपली मुद्रा उमवटण्यास वापरतो. जगातली थोर माणसं - ॲझॉझनचा जेफ बेझोझ, मायक्रोसॉफ्टचा बील गेटस् ही त्याची काही उदाहरणं.

मुकेश अंबानीनं पहिले अब्ज डॉलर कमावल्यावर हात टेकले नाहीत. पुढे जाऊन त्यानं व्यापार विस्तार केला व 'जिओ' काढून महाजाल गोरगरिबांपर्यंत पोहचवलं. या प्रक्रियेत तो जगातला एकोणिसावा श्रीमंत गडगंज झाला. त्याच्यासाठी पैसा हे साध्य नसून साधन झालेलं आहे. या अमाप संपत्तीपासून त्याला सुख मिळत नसेल असं नाही, पण त्याहीपेक्षा जास्त समाधान सगळा देश महाजालानं जोडला यापासून मिळतं हे त्यानं फोर्ब्ज मासिकाच्या

एका मुलाखतीत कबूल केलं.

सुखाचा शेवटचा पण महत्त्वाचा निकष म्हणजे आरोग्य. आरोग्याचं सहकार्य नसेल तर सुख हे एक मृगजल ठरू शकतं. निवृत्तीनंतर उतरत्या वयात स्वास्थ्य राखण्यासाठी बरेच पैसे व कष्ट खर्च करावे लागतात. सुदैवानं वैद्यकशास्त्रानं जी प्रगती केली त्यामुळे अनेक दुर्दम्य रोग साध्य झाले आहेत. कॅन्सरला यमाचा अवतार समजण्याची जरुरी राहिली नाही. योग्य व वेळेवर उपचार केले तर अमेरिकेत तरी अनेक प्रकारचे कर्करोग नवीन औषधांना शरण गेलेले आहेत. अमेरिकेत प्रत्येकाला वृद्धापकाळात आरोग्यविमा असतो. त्यामुळे पासष्ट व वरील वयाचे लोक काळजीमुक्त होतात. ही सुविधा भारतात अजून उपलब्ध नाही पण सुखप्राप्तीसाठी ती आवश्यक आहे हे कुणीही कबूल करेल.

सुखाचा आलेख वयाप्रमाणे बदलतो. विशी उलटल्यावर 'लाथ मारेन तिथे पाणी काढेन' या उमेदीनं माणूस सुखाच्या शिखरावर असतो पण गृहस्थाश्रमात शिरून संसाराच्या जबाबदाऱ्या वाढल्या की काळजीत भर पडते आणि हा आलेख अर्ध्वदिशेला जातो, पण वानप्रस्थाश्रमात शिरताच त्या काळज्या दूर झाल्यामुळे तो पुन्हा वर जाऊन उच्चांक गाठतो. आयुष्याचं आठवं दशक गाठण्याचं भाग्य लाभलेल्या लोकांत सर्वाधिक सुख सापडतं असं सर्वेक्षणात आढळून आलं.

सकृत्दर्शनी हे अविश्वसनीय वाटेल. गोवऱ्या मसणात गेलेला आयुष्यात सर्वाधिक सुखी कसा असेल? पण संशोधनांती असं आढळून आलं. आयुष्याच्या पाचव्या दशकाच्या उत्तरार्धात जीवनातला तणाव कमी होतो. त्या काळात ऑफिसचं ओझं नसतं. मानगुटीवर बसलेला साहेब निघून गेलेला असतो. त्यामुळे तणाव वीस टक्के घटतो. तरुणाईत इवल्याशा कारणानं भावनांचा उद्रेक होतो, पण जसजसं वय वाढतं आणि आपण वानप्रस्थाकडे झुकतो तसतसा भावनेचा लंब तेवढा फिरत नाही. म्हणजे आपल्याला एक प्रकारचं भावनिक स्थैर्य लाभतं. आपल्या ऋषीमुनींनी जे तपश्चर्या करून मिळवलेलं असतं ते अंशत: उतारवयात माणसाच्या वाट्याला येतं. यात योगासनाचा समावेश केला तर अजूनच चित्तशांती मिळेल. पाश्चात्यांच्या संशोधनात या योगसूत्रांचा समावेश केलेला नसतो. तसंच वृद्धापकाळात माणसाला कमी पश्चाताप होतात. आयुष्यात केलेल्या चुका स्वीकारून तो पश्चातापमुक्त होतो. या वयात वैफल्याचं प्रमाण वाढतं असा समज आहे. प्रकृतीच्या अस्वास्थ्याचं दु:ख म्हणजे वैफल्य नव्हे. संशोधनानंतर हा समज चुकीचा आहे असं सिद्ध केलं.

याप्रमाणे वानप्रस्थाश्रमात तणाव व पश्चाताप कमी, भावनिक स्थैर्य जास्त आणि दुर्मीळ मतिमांद्यता या गोष्टींच्या युतीमुळे वयोवृद्ध सरासरीनं आयुष्यात सर्वाधिक सुखी असतात. त्यांना शरीरानं साथ द्यावी म्हणजे झालं. या सुखप्राप्तीत व्यक्तिश: फरक असतो म्हणा. पण हजारो वयस्कर लोकांचा अभ्यास करून हे अनुमान काढण्यात आलं. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे या वयात माणूस प्रज्ञावंत होतो. संयुक्त कुटुंबात आजीओजाबांच्या विशेष ज्ञानाचा नातवंड उपयोग करून घेत. मुलगा देखील अडचण आली तर आईवडिलांचा सल्ला विचारी, पण आता कामामुळे कुटुंबाचे घटक विखुरलेले असतात. त्यामुळे लहान मुलांना आजीआजोबांच्या अनुभवांचा फायदा मिळत नाही. ते ज्येष्ठांची प्रज्ञा कालबाहय समजून फेसबुक व गुगल यांना प्रज्ञावंत समजतात, पण यात होणारी चूक अशी की प्रज्ञा म्हणजे बुद्धिमत्ता किंवा कौशल्य नव्हे. किंबहुना बुद्धीचा प्रज्ञेशी काही एक संबंध नाही. आयुष्यभर आपण विविध क्षेत्रातील ज्ञानकण एकात्मिक करतो. त्यांची अनुभवांशी सांगड घालतो. त्यापासून जे शिकतो ती प्रज्ञा. ती कुठल्या क्रमिक पुस्तकात सापडत नाही. ती जीवन-ग्रंथातच आढळते. त्याचा एक भाग म्हणजे अडचणीच्या काळातही कोपिष्ट न होता भावनिक संतुलन ठेवणं. आपल्या ऋषीमुनींत हा गुण सापडतो. तो ज्येष्ठ लोकांत प्रज्ञाप्राप्तीमुळे डोकावतो.

याप्रमाणे सुख निर्देशांकाचा हा 'u' आकाराचा आलेख आपल्याला बरंच काही शिकवून जातो यात शंका नाही.


**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)

anantlabh@gmail.com

(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)



ग्रंथाली




अरुण शेवते संपादित

**परतवाडा आणि बरेच काही**

आणि

**बापूंच्या सहवासात**



मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये

मूल्य १५० रुपये
सवलतीत २०० रुपये

उद्याचा
# मराठवाडा
## दिवाळी शिक्षणपर्व २०१८

संपादक :
**राम शेवडीकर**

कविता विभाग संपादक :
**डॉ. केशव सखाराम देशमुख**


कला संपादन
**नयन बाराहाते**

मूल्य : **२०० रु.**

**संपर्क** : दैनिक उद्याचा मराठवाडा
'आनंदऋतू' यात्री निवास मार्ग,
रस्ता क्र. १४, नांदेड - ४३१६०१
संपर्क : ९४२२१७१८८५, ९८२३६७४९२०

अतिथी संपादक
**हेरंब कुलकर्णी**

यंदाचा दैनिक उद्याचा मराठवाडाचा 'शिक्षणपर्व २०१८' हा अंक भारतातील शैक्षणिक व्यवस्थेची प्रस्तरे उकलून आकलनाचा नितांतनूतन ऐवज वाचकांपुढे ठेवणार आहे. महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील लेखक, शिक्षणतज्ज्ञांनी आपली मते यात मांडली आहेत.




**लेख**
वसंत पुरके
डॉ. श्रीकर परदेशी
समीक्षा गोडसे
रेणू दांडेकर
प्रसाद मणेरीकर
शहाजी ढेकणे
निलांबरी जोशी
विद्याधर शुक्ल
हेमांगी जोशी
योगिनी खानविलकर
प्रतिभा भराडे
वैशाली बाफना
राजेंद्र धारणकर
रणजित दिसले
उल्का महाजन
उषा राणे
धन्वंतरी हर्डीकर

**विशेष मुलाखत**
मनिष सिसोदिया

**मुलाखत**
राजेंद्र दर्डा
बाळासाहेब थोरात
मानवेंद्र काचोळे

**व्यंगचित्रे**
मधुकर धर्मापुरीकर
प्रशांत कुलकर्णी
शिवाजी जवरे

**कथा**
विजय पाडळकर
रा. रं बोराडे
राजकुमार तांगडे
बब्रुवान रुद्रकंठावार

**कविता**
यशवंत मनोहर
अशोक नायगावकर
भारती बिर्जे डिग्गीकर
श्रीपाद भालचंद्र जोशी
श्रीकांत देशमुख
प्रफुल्ल शिलेदार
मोहन देस
प्रदीप निफाडकर
तीर्थराज कापगते
बापू दासरी
अजय कांडर
वर्जेश सोलंकी
प्रशांत असनारे
संघमित्रा खंडारे
शिवाजी जवरे
संतोष पद्माकर पवार
संध्या रंगारी
मनोज बोरगावकर
सुचिता खल्लाळ
प्रफुल्ल कुलकर्णी
ऐश्वर्य पाटेकर
केशव खटिंग
भरत दौंडकर
केशव सखाराम देशमुख

**भूमिकेला न्याय द्यायचा प्रयत्न करतो – सुबोध भावे, अभिनेता (तुला पाहते रे – झी मराठी)**

'झी' मराठी वरील नवीनच सुरू झालेली 'तुला पाहते रे' ही मालिका सध्या तुफान गाजतेय. सुरू झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्येच या मालिकेने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या मालिकेतून अभिनेता सुबोध भावे आणि नवोदित अभिनेत्री गायत्री दातार मुख्य भूमिका साकारत आहे. ईशा आणि विक्रांत सरंजामे यांची अनोखी कहाणी सगळ्यांच्याच पसंतीस पडत आहे. झी मराठीवर सर्वाधिक 'टीआरपी' मिळवणाऱ्या 'तुला पाहते रे' या मालिकेतील विक्रम सरंजामेच्या भूमिकेतून सुबोधने चक्क दोन वर्षांनी छोट्या पडद्यावर पदार्पण केलं आहे. मालिकेतील त्याची व्यक्तिरेखा आणि या मालिकेबद्दल त्यांच्यासोबत साधलेला हा खास संवाद.

*१. चित्रपट आणि मालिका या दोन्ही माध्यमातून तू प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेस. दोन वर्षांनी झी मराठीवरील वेगळा विषय असलेल्या 'तुला पाहते रे' या मालिकेतून छोट्या पडद्यावर पुनरागमन करताना कास वाटतंय?*

– मी छोट्या पडद्याला कधी छोटा समजत नाही. माझ्या कारकिर्दीची सुरुवात छोट्या पडद्याने म्हणजे टीव्ही मालिकेने झाली. माझ्यातील नटाला मोठे व्यासपीठ मिळाले आणि अभिनेता म्हणून माझी ओळख झाली. त्यामुळे टीव्हीचा माझ्या कारकिर्दीवर मोठा प्रभाव आहे. चित्रपट जगतात खूप




काम असताना, टीव्ही मालिकेत काम करण्याचा तोटा काहीच नाही. मला प्रत्येक भूमिका आणि प्रत्येक ठिकाणी प्रेक्षकांनी स्वीकारले आहे. प्रेक्षक मला 'तुला पाहते रे' मालिकेत विक्रांत सरंजामे नामक मोठ्या उद्योगपतीच्या भूमिकेत पाहत आहेत. अनेक वर्षानंतर टीव्ही मालिकाही करतोय त्यामुळे चित्रपटाप्रमाणे टीव्ही सीरियलला मिळालेला प्रतिसाद पाहता, स्वत:ला धन्य मानतो.

ZEE मराठी

# रंग 'झी' मालिकाविश्वाचे...

**'झी मराठी'वरील मालिका, त्यांच्यातील व्यक्तिरेखा आणि ती साकारणारे कलावंत म्हणजे प्रत्येक कुटुंबाचा अविभाज्य भागच! या मालिकांच्या रंगांची झलक आता 'शब्द रुची'तून भेटीला येणार आहे. वाचनसंस्कृतीच्या जतन-संवर्धनात 'झी'ने पुढे केलेला हात मोलाचा आहे.**

*२. 'तुला पाहते रे' ही मालिका सध्या चर्चेचा विषय ठरली आहे तर या मालिकेविषयी आणि प्रेक्षकांच्या मालिकेला मिळालेल्या प्रतिसादाविषयी काय सांगशील?*

– मुळात मालिकांमध्ये काम करावं ही माझीच इच्छा होती. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये मी 'झी मराठी'च्या निलेश मयेकरांना भेटलो होतो तेव्हा, ''चित्रपटात काम करायचा कंटाळा आला असून तुमच्याकडे मी करण्यायोग्य एखादा विषय आला तर मला सांगा मला मालिकेत काम करायचं आहे'', असं सांगितलं होतं. योगायोगाने या मालिकेची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. त्यासाठी राजू आणि अपर्णा केतकर हे निर्माते मिळाले आणि 'तुला पाहते रे' ही मालिका प्रेक्षकांसमोर आली. मालिका प्रेक्षकांना आवडेल असा अंदाज होता पण मालिका पाहून लोक इतके भारावून जातील याची कल्पना नव्हती कारण काम करताना मी कधीच परिणामांचा विचार नाही करत. मी फक्त काम करतो. या मालिकेचा परिणाम खरोखरच अद्‌भुत आहे. लोक इतक्या प्रेमाने ही मालिका बघतात, विचार करतात, प्रतिक्रिया देतात हे सगळं कमाल आहे. खूप कमी वेळात या मालिकेने घरातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना बांधून ठेवलं आहे.

*३. मालिकेचा विषय अगदी वेगळा आहे, त्याबद्दल काय सांगशील?*

– या मालिकेचा विषयही प्रेक्षकांना वेगळा वाटतो आहे. वयाने मोठा असलेला विक्रांत आणि त्याच्यापेक्षा निम्म्या वयाची ईशा यांची ही प्रेमकथा लोकांना किती पचेल अशी शंका होती. मात्र सध्या मालिकेला जो प्रतिसाद मिळतोय तो पाहता आपल्या समाजातही बदल स्वीकारले जात आहेत. आजपर्यंत ज्या प्रथा आणि समज प्रचलित होते ते आपल्या समाजात गळून पडले आहेत. याचे श्रेय हे नव्या पिढीचे असून ही नवी पिढी अधिक स्वतंत्र आणि नव्या विचारांची आहे यात दुमत नाही.

*४. मालिकेत तुझा 'लुक' जरा वेगळा आहे, त्यासाठी काय मेहनत घ्यावी लागली?*

– 'लुक' सांभाळणं ही तशी सोपी गोष्ट नाही. 'विक्रांत सरंजामे'च्या भूमिकेसाठी थोडे राखाडी केस ठेवले आहेत. त्यावरही दोन्ही प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत. काहींना तसे केस आवडले तर काहीजण तसे पांढरे केस ठेवल्याबद्दल तक्रार करत आहेत, पण त्यात काय लपवायचंय? जे आहे ते आहे. दाढी तशीच्या तशी ठेवणं जरा अवघड जातं, पण मी हे सगळंच पहिल्यांदा करतोय. त्यामुळे मी सध्या फक्त मालिका करतो आहे, दुसरं कोणतंही काम हातात घेतलेलं नाही. जे काही चित्रपट केले आहेत त्यांच्या प्रसिद्धीत गुंतलो आहे. आता या मालिकेच्या निमित्ताने 'विक्रम सरंजामे' कसा वागेल? कसा उभा राहील? कसा बोलेल? लोकांपुढे कसा येईल? डोळ्यांतून कसा व्यक्त होईल? या सगळ्याचा विचार करून ही व्यक्तिरेखा साकारायला मजा येते आहे.

*५. तुझ्यासाठी प्रेम आणि नातेसंबंधांची व्याख्या काय आहे?*


– या पिढीच्या अगदी नातेसंबंधांच्या व्याख्याही बदललेल्या आहेत. मी जेव्हा गायत्री (ईशा – तुला पाहते रे) आणि त्या वयाच्या इतर मुलांना सांगतो की लग्नाआधी मी आणि माझी पत्नी दहा वर्ष एकमेकांच्या प्रेमात होतो. ते ऐकल्यावर आता नाही हे शक्य, असा त्यांचा सूर असतो. त्यांचे नातेसंबंधाबद्दलचे विचारही आता बदलले आहेत. मला वाटतं बदल तेव्हाच होतात जेव्हा आपण त्यांचा स्वीकार करतो. जोपर्यंत आपण बदल स्वीकारत नाही तोपर्यंत आपण त्याविरोधात टक्कर देत राहतो.

*६. मराठीतील सगळ्यात व्यग्र अभिनेता म्हणून तुझ्याकडे पाहिलं जातं, यावर तुझं काय म्हणणं आहे?*

– 'ससा आणि कासव' यांच्या गोष्टीतील मी कासव आहे. सावकाश पण, निश्चितपणे ध्येय गाठण्याचे मी ठरवले आहे. मी कधी स्पर्धेत नव्हतो आणि माझी कुणाशीही स्पर्धा नाही. खूप काम असले तरी मला दिलेले काम योग्य पद्धतीने आणि जबाबदारीने करायला आवडते. आजवर तेच केले आहे. एका मागून एक चित्रपट करत आहे. प्रत्येक भूमिका निष्ठेने साकारत असल्यामुळे प्रेक्षकांना आवडत आहे. भविष्यात हाच प्रयत्न असेल.

## रंगत जाणारी 'माझ्या नवऱ्याची बायको'

गोड संसारासाठी थोडं तिखट व्हावं लागतं' असं म्हणत जवळपास दोन वर्षांपूर्वी सुरू झालेली 'माझ्या नवऱ्याची बायको' ही



मालिका रसिकप्रेक्षकांच्या मनावर अक्षरशः राज्य करतेय. आजवर 'टीआरपी'चे नवे उच्चांक या मालिकेने प्रस्थापित केले आहेत. आपल्या नवऱ्यावर मनापासून प्रेम करणारी, 'स्वावलंबी' राधिका, राधिकाच्या नवऱ्याला आपल्या तालावर नाचवणारी 'नखरेल' शनाया आणि राधिका-शनायाच्या कचाट्यात सापडलेला 'बिचारा' गुरुनाथ, या तिघांची अफलातून केमिस्ट्री हेच या मालिकेच्या यशाचं गमक आहे. दिवसेंदिवस रंगत जाणाऱ्या मालिकेने प्रेक्षकांच्या मनाचा ताबा घेतला आहे.

## 'झी मराठी' आणि 'एकदंत'ची नवी नाट्यनिर्मिती 'नटसम्राट'

कुणी घर देता का घर? अशी आर्त साद घालत रस्त्यावर हतबल होऊन हिंडत फिरणाऱ्या गणपतराव बेलवलकर या नटाची व्यथा मांडणारे नाटक अर्थातच 'नटसम्राट.' ज्येष्ठ नाटककार वि. वा. शिरवाडकर लिखित हे मराठी नाटक सत्तरच्या दशकात रंगभूमीवर आले. त्यानंतर या नाटकाने मराठी नाट्यसृष्टीत इतिहास रचला. आजही या नाटकाचे गारुड मराठी नाट्यरसिकांच्या मनावर कायम आहे. या नाटकाशी मराठी प्रेक्षकांचे एक हळवे नाते आहे. हे नाटक नवीन पिढीपर्यंत जावे या उद्देशाने हे पुन्हा रंगभूमीवर येत आहे. या नाटकात अप्पासाहेब बेलवलकर यांची भूमिका ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी साकारणार आहेत. 'झी मराठी' प्रस्तुत आणि 'एकदंत' निर्मिती असलेले 'नटसम्राट' हे नाटक नोव्हेंबर महिन्यात रंगभूमीवर सादर होणार आहे.

'हॅम्लेट', 'अलबत्या गलबत्या' या नाटकांच्या यशानंतर झी मराठी 'नटसम्राट' हे नाटक मंचावर आणत आहे. या नाटकातील गणपतराव बेलवलकर यांची भूमिका साकारणे हे प्रत्येक नटाचे स्वप्न असते. आजवर ही भूमिका श्रीराम लागू, दत्ता भट, सतीश दुभाषी, यशवंत दत्त, उपेंद्र दाते यांनी साकारली आहे. आता नव्याने येणाऱ्या या नाटकात गणपतरावांची भूमिका साकारण्याचे शिवधनुष्य मोहन जोशी पेलणार आहेत. तर गणपतराव बेलवलकर यांच्या पत्नीची म्हणजे कावेरीची भूमिका ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी साकारणार आहे. या नाटकाच्या निमित्ताने हे दोन्ही दिग्गज कलाकार बऱ्याच वर्षांनी रंगभूमीवर येत आहेत. या नाटकाचे दिग्दर्शन हृषीकेश जोशी करत आहेत. येत्या ४ नोव्हेंबरला हे नाटक रंगभूमीवर सादर होणार असून सध्या या नाटकाच्या जोरदार तालमी सुरू आहेत.

मोहन जोशी, रोहिणी हट्टंगडी यांच्याव्यतिरिक्त या नाटकामध्ये सुशील इनामदार, भक्ती देसाई, श्वेता मेहेंदळे, शुभांकर तावडे, अभिजित झुंझारराव, मिलिंद अधिकारी, आशीर्वाद मराठे, सायली काजरोळकर, राम सईदपुरे हे कलाकार आहेत. या नाटकाच्या नेपथ्य आणि प्रकाशयोजनेची जबाबदारी प्रदीप मुळये यांच्याकडे आहे, तर संगीत नरेंद्र भिडे यांचे आहे.

## स्वराज्यरक्षक संभाजी

छत्रपती शिवाजी महाराजांनी जगातील पहिल्या लोकाभिमुख स्वराज्याची स्थापना केली. शून्यातून स्वराज्य निर्माण करणं हे सहज शक्य नव्हत, पण त्याहून कठीण होतं ते निर्माण केलेलं स्वराज्य टिकवणं, वाढवणं. छत्रपती संभाजी महाराज आणि त्यांच्या मर्द मावळ्यांनी हे आव्हान स्वीकारलं आणि सक्षमपणे पेललं सुद्धा.




संभाजी महाराजांबद्दल आजवर अनेकदा इतिहासकारांकडून, बखरकारांकडून अनेक कथा रंगवल्या गेल्या. पण त्या सगळ्या गोष्टींमागचा खरा इतिहास लोकांसमोर आणण्याचा काम झी मराठीवरील 'स्वराज्यरक्षक संभाजी' ही मालिका यशश्वीरित्या करत आहे. शिवाजी महाराज्यांच्या भूमिकेतून शंतनू मोघे आणि संभाजी महाराज्यांच्या भूमिकेतून डॉ. अमोल कोल्हे यांनी या दोन्ही व्यक्तिरेखा उत्तमरित्या साकारल्या आहेत. प्रेक्षकांचाही या मालिकेला उदंड प्रतिसाद मिळत आहे.

# असा 'साधू' होणे नाही!



'ग्रंथाली' वाचक चळवळीने जे सामाजिक भान जपले, त्या वाटचालीत अरुण साधू यांचे योगदान मौलिक आहे. 'ग्रंथाली', चेतना महाविद्यालय आणि साधू कुटुंबीय यांच्या संयुक्त विद्यमाने अरुण साधू यांचा पहिला स्मृतिदिन मुंबईतील 'चेतना हजारीमल सोमाणी' महाविद्यालयात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दाखवल्या गेलेल्या अरुण साधूंवरील चित्रफितीतून साधूंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लेखनाचा प्रवास साकार झाला. या चित्रफितीची संहिता साधूंची कन्या शेफाली साधू यांनी लिहिली होती. त्यानंतर अरुण साधू यांची परदेशस्थ नात तन्वी बॅनर्जी आणि दिपाली पटवर्धन यांचे अरुण साधूंशी बालपणापासून जुळलेले भावबंध त्यांच्या व्हिडिओजच्या माध्यमातून उपस्थितांनी अनुभवले.

त्यानंतरच्या प्रास्ताविक भाषणातून सुदेश हिंगलासपूरकर यांनी साधूंच्या आठवणी जागवतानाच साधूंच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या सुहृदांनी उभारलेल्या कॉर्पस निधीची माहिती दिली. हा निधी पुणे विद्यापीठास सुपूर्द करण्यात आला असून दरवर्षी एका पत्रकार तरुण/तरुणीस साधूंच्या स्मृतिप्रित्यर्थ पाठ्यवृत्ती देण्यात येणार आहे. निवडप्रक्रियेत पारदर्शकता राहावी म्हणून ही जबाबदारी पुण्यातील रानडे इन्स्टिट्यूटकडे सोपवण्यात आल्याचेही हिंगलासपूरकर यांनी सांगितले.

'साधू सुहृदांनी कथन केलेल्या आठवणी' हा या कार्यक्रमाचा महत्त्वाचा भाग होता. गणेश पुराणिक आणि हेमंत वाघ यांनी साधूसरांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू जिव्हाळ्याने उलगडले तर प्रताप थोरात यांनी पत्रकार साधू सरांची वैशिष्ट्ये व त्यांच्याशी असलेला भावबंध अधोरेखित केला.

साधू सरांच्या शेजारी ज्याचे बालपण गेले अशा चैतन्य संतने बालपणच्या अनेक आठवणी खेळकर शैलीत सांगितल्या तर साधूंचा नातू वेद बॅनर्जी याने आजोबांसोबतच्या आठवणी भावस्पर्शी शैलीत सांगितल्या. 'ग्रंथाली' परिवाराचे मित्र संपादक अरुण शेवते यांनी साधूंशी ग्रंथालीनिमित्ताने त्यांचा लाभलेला सहवास चैतन्यदायी असल्याचे नमूद केले. 'कॉलनी' या आत्मकथनाचे लेखक सिद्धार्थ पारधे हे 'साहित्य सहवास'मधील साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या सावलीत वाढले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत ज्यांचे योगदान आहे अशा साहित्यिकांमध्ये साधूंचे नाव ठळक असल्याचे सांगितले.

याप्रसंगी साधू सरांच्या 'ऋतुरंग' दिवाळी अंकातून प्रकाशित झालेल्या अरुण शेवते यांनी संपादित केलेल्या 'परतवाडा आणि बरेच काही' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. प्रकाशन करताना सुरेश देशपांडे यांनी 'परतवाडा' या साधूंच्या गावाचे संदर्भ देत कौटुंबिक आठवणी जागवल्या. दिनकर गांगल, अशोक जैन आणि अरुण साधू यांचे दृढ मैत्र अतिशय आनंददायी! त्यांच्या मैत्रीच्या प्रवासातील एक दुर्मीळ क्षण साकारणारं छायाचित्र यावेळी दिनकर गांगल आणि सुनीती जैन यांना स्नेहभेट म्हणून अरुणा साधू यांच्या हस्ते देण्यात आले.

अरुण साधूंची कन्या सुवर्णा बॅनर्जी यांनी 'तिसऱ्या पिढीचे आत्मकथन' या पुस्तकातील अरुण साधू यांच्या लेखाचे अभिवाचन केले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात या लेखाचे स्थान महत्त्वाचे आहे. याप्रसंगी चेतना महाविद्यालयाचे प्राचार्य महेशचंद्र जोशी यांनी तरुण पिढीला साधू कळले पाहिजेत आणि त्याकरता तरुणाईच्या दृष्टीने उपक्रमांचे आयोजन झाले पाहिजे हा मुद्दा मांडला तसेच अशा उपक्रमांकरता 'ग्रंथाली'ने जोडून घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे अर्थवाही सूत्रसंचालन 'शब्द रुची'च्या कार्यकारी संपादिका डॉ. वीणा सानेकर यांनी केले.

अरुण साधूंच्या लेखनावर प्रेम करणारे आणि त्यांच्याशी जोडले गेलेले विविध क्षेत्रांतील सुहृद याप्रसंगी उपस्थित होते.



**अरुण शेवते संपादित 'परतवाडा आणि बरेच काही' पुस्तकाचे प्रकाशन.**

# अरुण साधूंचा वैचारिक वारसा जपण्यासाठी पाठ्यवृत्ती



साधू स्मृती पहिली पाठ्यवृत्ती पत्रकार मेघना ढोके यांना देताना ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ भाटिया

'व्यवस्थेला सातत्याने प्रश्न विचारत राहणे व त्याचा पाठपुरावा करणे हे पत्रकारांचे काम आहे', अशा शब्दांत पत्रकारितेची व्याख्या विशद करत 'समाजात ज्यांना आवाज उठविता येत नाही, त्यांचा आवाज व्हा', असा कानमंत्र ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ भाटिया यांनी गुरुवारी पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना दिला. 'पत्रकारिता हे प्रचाराचे साधन नाही', असेही त्यांनी परखडपणे सुनावले.

दिवंगत ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरुण साधू यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'भारतीय माध्यमांसमोरील पेच' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, अरुण साधू यांचे कुटुंबीय व मित्रपरिवार आणि 'ग्रंथाली' यांच्यातर्फे या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ पत्रकार आणि काँग्रेसचे खासदार कुमार केतकर, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रमुख डॉ. उज्ज्वला बर्वे, 'ग्रंथाली' प्रकाशनचे धनंजय गांगल आदी उपस्थित होते. या वेळी साधू यांच्या स्मरणार्थ जाहीर करण्यात आलेली पाठ्यवृत्ती पत्रकार मेघना ढोके यांना देण्यात आली.

पैसे अथवा ग्लॅमर कमविणे हा पत्रकारितेचा हेतू नाही, तर समाजाबद्दल आणि वाचकाबद्दल असलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून पत्रकारिता करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करत भाटिया यांनी पत्रकारिता क्षेत्रातील बदलाचा आढावा घेतला. सोशल मीडियाच्या माध्यम म्हणून वापराचेही अनेक स्तुत्य प्रयोग होत असून डिजिटल माध्यमांमधील या स्टार्ट अप प्रकल्पांचे भवितव्य उज्ज्वल असेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. अरुण साधू यांच्या उदारतावादी वैचारिकतेचा वारसा जपण्यासाठी ही पाठ्यवृत्ती दिली जात असल्याचे कुमार केतकर यांनी सांगितले.

२०१४ पूर्वीचा काळ हा माध्यमांसाठी सुवर्णकाळ होता असे नाही, मात्र, त्या काळात सरकार आणि यंत्रणांकडून थेट हस्तक्षेप होत नव्हता. गेल्या चार वर्षांत त्यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे, असे सांगत सरकारविरोधात बोलणाऱ्यांच्या नोकऱ्यांवर गदा येत आहे, अशी खंतही सिद्धार्थ भाटिया यांनी व्यक्त केली. बातम्यांपेक्षाही 'सेल्फी' महत्त्वाची झाली असल्याचा टोलाही त्यांनी सरकारला लगावला.

# रसिकतेच्या दिशेने नेणारा वसंतराव उपाध्ये व्यासंगी पत्रकारिता पुरस्कार

''रसिकता घडत जाते, संस्कारित होत जाते. पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक आहे. त्यामुळे आपल्या विचारांना बळ मिळते. ते जपण्यासाठी साहित्यकृतीचा चोखंदळपणे आनंद घेणे, प्रगल्भता वाढवणे हे आजच्या काळात खूपच आवश्यक आहे. माणसाला जागे करणारे, सजग मन निर्माण करणारे प्रयोग म्हणजे वाचन होय. सध्या समाज 'स्वान्त सुखाय' म्हणजे स्वतःतच समाधानी आहे. आजूबाजूच्या जगाशी बांधिलकी घटत चालली आहे. सध्या समाजात इंटरनेटमुळे बहुश्रुतता आली आहे. येत्या काही वर्षांत वाचनसंस्कृतीमध्ये आमूलाग्र बदल घडून येणार आहेत. सन २०३३ सालापर्यंत कदाचित सर्व वृत्तपत्रे नष्ट होतील असे एका अमेरिकन विचारवंताचे भाकित आहे. धुक्यातले वर्तमान टिपणे हे आजच्या काळातले आव्हान आहे. मागचे यथार्थत्व आणि पुढले पर्याय यांचा सांधा जोडता आला पाहिजे. समाजात ज्या विविध लाटा येत आहेत, त्यांचा बुद्धिनिष्ठ विचार करून सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून भविष्यातील वाचक आणि वाचनसंस्कृती यांचे विवेचन करणे गरजेचे आहे. सध्या वाचक, प्रेक्षक यांनी रसिकतेचे उन्नयन करून घेणे आवश्यक आहे.'' असे मत ज्येष्ठ पत्रकार दिनकर गांगल यांनी मांडले. नवीन ऊर्जा टिपण्याचा आपला छंद जोपासत 'ग्रंथाली'च्या माध्यमातून त्यांनी अनेक पुस्तकांची वाचनीयता तर वाढवलीच, त्याचबरोबर वाचकांना विचारप्रवृत्त करण्याची क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी ते 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या वेबपोर्टलच्या माध्यमातून झटत राहिले आहेत. त्यांच्या याच व्यासंगाचा गौरव म्हणून त्यांना सोमवार, १ ऑक्टोबर रोजी 'कै. वसंतराव उपाध्ये व्यासंगी पत्रकारिता पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार व चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. चेंबूर एज्युकेशन सोसायटी आणि बाल विकास संघ यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.




ज्येष्ठ पत्रकार व चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर यांच्या हस्ते 'कै. वसंतराव उपाध्ये व्यासंगी पत्रकारिता पुरस्कार' स्वीकारताना दिनकर गांगल

पुण्यातील केसरी, सकाळ आणि मुंबईतील महाराष्ट्र टाईम्स या प्रतिष्ठित वृत्तपत्रांमध्ये तीस वर्षे पत्रकारिता केलेले ज्येष्ठ पत्रकार दिनकर गांगल हे सध्या 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम 'या वेबपोर्टलचे मुख्य संपादक आहेत. 'ग्रंथाली' आणि 'प्रभात चित्रमंडळा'चे ते संस्थापक सदस्य आहेत. 'रुची' मासिकाचे तीस वर्ष संपादन, 'ग्रंथाली'च्या माध्यमातून सुमारे चारशे पुस्तकांचे संपादन, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या तेराव्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद अशा अनेकविध जबाबदाऱ्या त्यांनी लीलया पेलल्या आहेत.

ज्येष्ठ पत्रकार दिनकर गांगल आणि सुधीर नांदगावकर हे गेली पन्नास वर्ष एकमेकांचे सहकारी आहेत. त्यामुळे कार्यक्रमात एकमेकांविषयी माहितीवजा बोलण्यापेक्षा या कार्यक्रमाला आम्ही 'रसिकतेच्या शोधात' या विषयावरील गप्पागोष्टींचे स्वरूप दिले, असे दिनकर गांगल यांनी सांगितले. त्यांचे आणखी एक सहकारी चित्रकार रघुवीर कुल यांनाही या गप्पांसाठी आमंत्रित करण्यात आले. गेल्या पन्नास वर्षांतील आपल्या आयुष्यातील अनुभव सांगून या द्रष्ट्या, दिग्गज व्यक्तींनी रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

प्रभात चित्रमंडळाचे संस्थापक सदस्य, चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर यांनी त्यांचा वाङ्मय ते चित्रपट प्रवास, चित्रपटांकडे वेगळ्या दिशेने पाहण्याची कला कशी जोपासली हे मांडत चित्रपट शौकिनांपासून चित्रपट रसिक होण्यापर्यंतचा आपला प्रवास अत्यंत रंजकपणे त्यांनी प्रेक्षकांना सांगितला. एखादी गोष्ट ही साहित्य, चित्रकला वा नाटक या माध्यमांतून जितकी प्रभावीपणे मांडता येत नाही, ती चित्रपटांच्या माध्यमातून मांडता येते. कविता आणि चित्रपट या दोन्ही गोष्टी अल्पाक्षरात अधिकाधिक भावना व्यक्त करणाऱ्या असतात या शब्दांत चित्रपट आणि कविता यांतील साम्य सुधीर नांदगावकर यांनी सांगितले.

चित्रकलेच्या अंगानी हे जग कसे बदलत गेले , चित्रकलेविषयीची रसिकता जोपासण्यासाठी लागणारी 'नजर' आपणास आयुष्यात कशी मिळाली याविषयी आपल्या गुरुवर्यांचे खुमासदार किस्से सांगत ज्येष्ठ चित्रकार रघुवीर कुल यांनी अवघा माहौल रसिकतेने भारून टाकला. रसिकतेचा संबंध हा आनंदाशी असतो. व्यक्तीला ज्यातून आनंद मिळतो, त्यात त्याला रसिकता सापडते. ती रसिकता ही सतत आपल्या आजूबाजूलाच असते, मात्र ती जाणून घेण्याची नजर आपल्याकडे हवी, असे रघुवीर कुल म्हणाले. १९७० ते ७५च्या सुमारास जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये चित्रकलेचे शिक्षण घेत असतानाच नाटकांसारखे इतरही अनेक उपक्रम केले. आमच्या शिक्षकांनी आमच्यातील रसिकता ओळखून तिला उभारी दिली, असे त्यांनी अभिमानाने सांगितले.

ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना, 'पत्रकारिता ही केवळ तात्पुरती किंवा प्रासंगिक बाब नसते, वर्तमानाच्या जाणिवेतून ते सातत्याने पडलेले प्रतिबिंब असते, याचे भान असणारा पत्रकार दैनंदिन लेखनकार्याच्या पलीकडे जाऊन नवनवीन सृजनशील उपक्रमांमध्ये स्वतःला अहोरात्र गुंतवून समाजमनाची मशागत करत असतो.' असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी ज्येष्ठ पत्रकार कै . वसंतराव उपाध्ये यांच्या आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमासाठी चेंबूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अविनाश तांबे देखील उपस्थित होते. बालविकास संघाचे अध्यक्ष नितीन कऱ्हाडकर यांनी खुमासदार शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. चंद्रशेखर पाठारे यांनी आभारप्रदर्शन केले.

**शब्दांकन : नम्रता ढोले–कडू**

# 'बलुतं'च्या चाळिशी निमित्ताने 'बलुतं' पुरस्कार प्रारंभ आणि पद्मश्री दया पवार पुरस्कार




**महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि लेखक-विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते पहिला 'बलुतं' पुरस्कार स्वीकारताना नजुबाई गावित. शेजारी 'दया पवार प्रतिष्ठान'च्या अध्यक्षा हिरा पवार**

'ग्रंथाली' वाचक चळवळीचा पहिला 'बलुतं' पुरस्कार 'आदोर' या आत्मकथनाच्या लेखिका नजुबाई गावित यांना राजकीय विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ११ हजार रुपये रोख, गोधडी व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्राच्यविद्यापंडित शरद पाटील यांचे दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र दलित साहित्यिकांनी नाकारले. त्यामुळे दलित साहित्याची चळवळ कुंठित झाली अशी टीका त्यांनी आपल्या भाषणात केली.

आदिवासी साहित्यात अजूनही आत्मकथने येत नाहीत. आदिवासींच्या नावे काही धंदेवाईक लोकांना मात्र सुगीचे दिवस आले आहेत. बाबा भांड यांसारख्या लोकांनी आदिवासींवर जे काल्पनिक लिहिले आहे, त्याचे खंडन करण्यासाठी आदिवासी समाजातील महिलांनी पुढे आले पाहिजे असेही आवाहन नजुबाई यांनी केले.

याच कार्यक्रमात 'दया पवार प्रतिष्ठान'चे यंदाचे पद्मश्री दया पवार पुरस्कार लेखक आनंद विंगकर (सातारा), समीक्षक राहुल कोसंबी (औरंगाबाद) आणि अभिनेता, कवी व सामाजिक कार्यकर्ता सयाजी शिंदे (सातारा) यांना प्रदान करण्यात आले. ११ हजार रुपये रोख, शाल आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे.

काँग्रेस आणि भाजप यांनी दलितांचे जितके नुकसान केले आहे, त्यापेक्षा अधिक नुकसान आंबेडकरी आणि डाव्या चळवळीने एकमेकांवर केलेल्या कुरघोडीने झाले आहे, असा आरोप राहुल कोसंबी यांनी केला. शहरी नक्षलवादाच्या नावाखाली पाच सामाजिक कार्यकर्त्यांवर केलेल्या कारवाईबाबत दलित चळवळ बोलत का नाही, असा प्रश्न कोसंबी यांनी उपस्थित केला.

नट म्हणून घडवण्यात कवितांच्या पाठांतराचा आपल्याला मोठा फायदा झाला. त्यात दया पवार यांची 'बाई मी धरण बांधते' या कवितेचा पण समावेश असल्याचे अभिनेता सयाजी शिंदे यांनी सांगितले. यावेळी सयाजी यांनी आपल्या खास शैलीत दया पवार यांची 'धरण' ही कविता गाऊनही दाखवली. 'झुलवा' नाटक करताना दया पवार यांच्याकडून अनेक शब्दांचे अर्थ समजून घेतल्याचे ते म्हणाले.

दलित चळवळीने आता जातीबाहेर गेले पाहिजे. लाल, पिवळा, हिरवा, भगवा यांना निळ्यात सामावून घेतले पाहिजे, अशी भूमिका आनंद विंगकर यांनी मांडली. तसेच दलित साहित्याने दबलेल्या घटकांची जुबान व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

व्यासपीठावर यावेळी 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'चे विश्वस्त व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार हेमंत टकले, 'दया पवार प्रतिष्ठान'च्या अध्यक्ष हिरा पवार उपस्थित होत्या. पुरस्कार विजेत्यांच्या ओळखी अरविंद जगताप, केशव वाघमारे, शर्मिष्ठा भोसले यांनी करून दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'पाणी फाऊंडेशन'च्या नम्रता भिंगार्डे यांनी तर आभार रविंद्र पोखरकर यांनी मानले.

ग्रंथाली वाचक चळवळ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने बलुतंच्या चाळिशीनिमित्त या भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# वाचनसंस्कृतीच्या प्रवासातील 'ग्रंथाली'चे पुढचे पाऊल



मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांच्या हस्ते महानगरपालिकेच्या शाळांना ग्रंथपेट्यांचे वाटप

बेचाळीस वर्षांच्या प्रवासामध्ये 'ग्रंथाली'ने विविध विषयांवर पुस्तक प्रकाशित केलेली आहेत. यात बालसाहित्याचाही तेवढाच विचार झालेला आहे. 'बालझुंबड' या उपक्रमातून प्रेरणा घेऊन अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. 'ग्रंथाली'च्या या प्रवासात हेवा वाटावा असा आणखी एक उपक्रम राबविला गेलेला आहे तो म्हणजे 'ग्रंथभेट योजना'. बऱ्याच शाळांमध्ये वाचन संस्कृती जपली जात असली तरी या चळवळीपासून महानगरपालिकेच्या शाळा दूर होत्या. या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांच्या कामाची व्याप्ती ही सरकारी यंत्रणेशी जोडल्यामुळे वाचन करण्यासाठी जो पुरेसा वेळ द्यावा लागतो तो विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही देता येत नाही. मग थेट त्या-त्या शाळेत अशी 'ग्रंथभेट योजना' राबवली तर खऱ्या समृद्धीचा प्रवास सुरू होईल. असे करण्याला कारण म्हणजे शासनाने 'ग्रंथाली'ला मुंबईत दोन जागा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत त्याचे ऋण सामाजिक कार्यातून व्यक्त व्हावे यासाठी ग्रंभथेट योजनेची संकल्पना पुढे आली. पंधरा हजारांच्या किंमतीच्या पुस्तकांचा यात अंतर्भाव आहे. विद्यार्थ्यांसाठी साठ टक्के आणि शिक्षकांसाठी चाळीस टक्के पुस्तके यात समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

स्थळ प्रभादेवी इथली महानगरपालिकेची शाळा. इथे या 'ग्रंथभेट योजने'चा शुभारंभ झाला. पाचवी ते दहावी महानगरपालिकेत शिकणारे विद्यार्थी क्रीडा पेहेरावात इथे एकत्र आले होते. इतरवेळी सांस्कृतिक कार्यक्रम, सरकारी उपक्रम यानिमित्ताने पालिकेचे विद्यार्थी एकत्र येत होते. वाचनसंस्कृतीचा अनुभव आपल्यालाही घेता येणार आहे याचा उत्साह विद्यार्थ्यांपासून मुंबई परिसरातील एकत्र आलेल्या शिक्षकांना झाला होता. मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांच्या हस्ते ग्रंथपेट्यांचे वाटप करण्यात आले. या निमित्ताने उपशिक्षणाधिकारी भारतकुमार पांडे, बीट ऑफिसर डायस मॅडम, प्रभादेवी महानगपालिकेच्या शाळेचे मुख्याध्यापक निवास शेवाळे हे उपस्थित होते. प्रकल्प संयोजक श्रीधर पाटील यांनी 'ग्रंथाली'च्या वतीने या उपक्रमाची किती आवश्यकता आहे हे पटवून सांगितले. 'ग्रंथाली'च्या वतीने सुदेश हिंगलासपूरकर आणि चांगदेव काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पहिल्या टप्प्यामध्ये ग्रंथभेट उपक्रमासाठी ज्या शाळेची निवड केली त्यात कुलाबा, डोंगरी, भायखळा पूर्व, न्यू सायन, भायखळा पश्चिम, डॉ. आंबेडकर, जी. के. मार्ग, एन. एम. जोशी, ग्लोब मील पॅसेज, सायन या शाळांचा समावेश आहे. या शाळांच्या शिक्षकांनी ही भेट योजना स्वीकारली. ज्या शाळेत या कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्या प्रभादेवीच्या शाळेला प्रथम ग्रंथभेट देऊन शुभारंभाचा मान देण्यात आला.

''माणसाच्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्यात वाचनालाही सर्वांनी प्राधान्य दिले पाहिजे. शाळकरी विद्यार्थ्यांपासून तेही महानगरपालिकेच्या निगराणीत या 'ग्रंथभेट योजने'ला प्रारंभ होत आहे याचा मला आनंद आहे.'' मुंबईचे महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांच्या हस्ते ग्रंथपेट्यांचे वाटप करण्यात आले, त्यावेळी त्यांनी आपले हे मनोगत व्यक्त केले. ''वाचनाशी आपले असलेले नाते प्रस्थापित करताना मुंबई महापालिकेत महापौर म्हणून कार्यभार हाती घेतला तेव्हा केवळ वाचनाची आवड निर्माण व्हावी,


## कार्यक्रम वृत्तांत

व्यक्तिमत्त्वामध्ये बदल व्हावा, कार्यपद्धती जाणून घ्यावी यासाठी मार्गदर्शन करणारी दोन पुस्तके सर्व नगरसेवकांना भेट दिली होती. या माझ्या नव्या उपक्रमाचे सर्वच थरातून स्वागत झाले.'' ही आठवण महाडेश्वर यांनी आपल्या भाषणातून करून दिली.

शाळकरी मुलांसाठी आजचा दिवस खास होता. त्याला कारण म्हणजे जे पुस्तकात वाचले जाणार आहे त्याची काहीशी झलक प्रत्यक्ष सादरीकरणाने इथल्या मुलांना अनुभवायला मिळाली होती. दत्ता सावंत या लेखकाने मुलांशी उत्स्फूर्त सुसंवाद साधला होता. इतकेच काय तर याच विद्यार्थ्यांना नकला, नाट्यप्रवेश, गाणी सादर करायला भाग पाडले होते. अस्मिता पांडे या निवेदिकेने 'श्यामची आई' या पुस्तकातील काही उताऱ्यांचे अभिवाचन केले. श्रीनिवास नार्वेकर यांनी शाळकरी विद्यार्थ्यांना मोहवून टाकतील अशा विंदांच्या बालकविता सादर करून दाखविल्या त्यामुळे आनंदाबरोबर मुलांमध्ये उत्साहही तेवढाच दिसला. 'ग्रंथभेट' उपक्रमाच्या संयोजिका धनश्री धारप याही यावेळी उपस्थित होत्या. ग्रंथभेटीच्या संयोजिका नंदिनी पाटील यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. २०१८ ते २०१९ या शैक्षणिक वर्षांत दहा शाळांचा या उपक्रमात अंतर्भाव केलेला आहे. पुढे अन्य शाळांनाही या योजनेत सहभागी करून घेतले जाणार आहे. या शाळांना ग्रंथभेट दिलेली आहे त्या शाळेत काही महिन्यांनंतर पुस्तके बदलली जाणार आहेत. या निमित्ताने अभिवाचनाची, विद्यार्थी-शिक्षक यांची स्पर्धा त्या-त्या शाळेत आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी 'ग्रंथाली'ने केली.

## पुस्तकप्रकाशन

### 'अनंत आमुची ध्येयासक्ती' प्रकाशन सोहळा



जनसेवा समिती, विलेपार्ले आणि उत्कर्ष मंडळ विलेपार्ले यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम अयोजित केला होता. लष्करातील अनेक मान्यवर अधिकारी, सनदी अधिकारी त्याच प्रमाणे ज्यांची मुलं लष्करात आहेत अशा अशी अनेक कुटुंबे कार्यक्रमात सहभागी झाली होती.

कॅप्टन विनायक गोरे यांचे सहकारी कर्नल विनायक सुपेकर हे कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. कॅप्टन विनायक गोरेंच्या सैन्यातील जुन्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला. २६ सप्टेंबर १९९५ च्या रात्री ज्या ऑपरेशनमध्ये कॅप्टन विनायक गोरे यांना वीरमरण आले तेव्हा घडलेला सारा प्रसंग डोळ्यांसमोर उभा केला.

वीरमाता अनुराधा गोरे लिखित 'अनंत आमुची ध्येयासक्ती' या पुस्तकाचे प्रकाशन विक्रम गोखले यांच्या हस्ते झाले. युद्धात जखमी झालेल्या अशा 'Specially abled' वीरांच्या गाथा या पुस्तकात गोरे यांनी मांडल्या आहेत.

युद्धात जायबंदी झालेले सैनिक पुढे स्वतःच्या संस्था काढतात, अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांत मेडल्स मिळवतात, शेतीत नवनवीन प्रयोग करतात ह्या सगळ्या गोष्टी थक्क करणाऱ्या आहेत.

जखमी सैनिकांना हे बळ देणारी संस्था म्हणजे Queen Mary's Technical Institute. एरवी लष्करी अखत्यारीत येणाऱ्या या संस्थेचे विक्रम गोखले हे एकमेव नागरी पदाधिकारी आहेत. गेले ३० वर्ष QMTI शी ते संलग्न आहेत. QMTI चे प्रोजेक्ट्स तसेच काश्मीरमधील त्यांचे अनुभव त्यांनी भाषणातून मांडले.

आजच्या तरुण पिढीने देशाचे भवितव्य आणि सुरक्षा याबाबतीत सावधान राहिले पाहिजे असे त्यानी आपल्या भाषणात आग्रही प्रतिपादन केले.

शेवटी उत्स्फूर्तपणे कर्नल राकेश चौहान यांनी लष्कराविषयी अधिक माहिती दिली.

विक्रम गोखले पदाधिकारी असलेल्या QMTI संस्थेसाठी अनेकांनी देणगी दिली.

उत्कर्ष मंडळाच्या उषा जांभेकर कर्णबधिर विद्यालयातील मुलांनी आणि शिक्षकांनी या संस्थेसाठी १५,००० रुपये रक्कम दान केली. त्याच बरोबर जनसेवा समितीकडून १०००० आणि संस्थेचे शशिकुमार लेले यांच्याकडून २५००० रुपये QMTI साठी देण्यात आले.

एकंदरीत भारतीय लष्कर आणि त्यातही जायबंदी झालेले सैनिक यांच्या विषयी नवा दृष्टिकोन देणारा असा हा कार्यक्रम ठरला.

## पुस्तकप्रकाशन

# 'अलूफ' संग्रहाचा, संगीतमय 'उत्तुंग' प्रकाशन सोहळा!



सिद्धहस्त गझलकार, सदानंद डबीर ह्यांचा 'अलूफ' हा नवा संग्रह 'ग्रंथाली'ने २९ सप्टेंबर २०१८ रोजी प्रकाशित केला. 'ग्रंथाली' आणि 'उत्तुंग' या दोन संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडला. विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघाच्या गोखले सभागृहात सायंकाळी ५ ते ८ असा तीन तास श्रोत्यांच्या भरगच्च उपस्थितीत हा सोहळा चांगलाच रंगला. सुप्रसिद्ध गायिका आशा खाडिलकर व अभिनेते सुमित राघवन यावेळी उपस्थित होते.

उत्तुंग संस्थेने देखणा रंगमंच उभारला होता. कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध होते. प्रथम संस्थेचे विश्वस्त माधव खाडिलकर यांनी सर्वांचे स्वागत केले व संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर आशा खाडिलकरांचे शब्द व संगीत लाभलेले 'उत्तुंग'चे स्फूर्तिगीत झाले व दिनकर गांगल, डॉ. राम पंडित व प्रा. सुखमणी रॉय ह्यांच्यासह सदानंद डबीर, मिलिंद जोशी व सुदेश हिंगलासपूरकर व्यासपीठावर स्थानापन्न झाले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी सर्वांचे स्वागत करून 'ग्रंथाली'च्या उपक्रमाची माहिती दिली. अलीकडे नामवंत प्रकाशक कवितासंग्रहाचे प्रकाशन करत नसताना – ग्रंथाली मात्र चांगल्या संग्रहांच्या पाठीशी नेहमी उभी असते हे सांगितले. 'ग्रंथाली'च्या नंदिनी पाटील ह्यांनी सूत्रसंचालन केले. अतिथींचा परिचय झाल्यावर 'उत्तुंग'तर्फे पुष्पगुच्छ व 'ग्रंथाली'तर्फे ग्रंथभेट देण्यात आली.

डॉ. राम पंडित आपल्या भाषणात म्हणाले, 'डबीरांची गझल त्यांच्या समकालीनांपेक्षा प्रौढ व प्रगल्भ आहे. ती अमूर्त नाही त्यामुळे कृतकही नाही. ती जीवननिष्ठ गझल आहे. ती 'वाह'ची दाद तर घेतेच पण 'आह'चा उद्गारही काढते! तिच्यावर दार्शनिक चिंतनाचा प्रभाव आहे. अलीकडे त्यांच्या शेरातून 'मी' त्रयस्थ, साक्षीरूप, जगतव्यवहाराकडे बघतोय हा भाव स्पष्ट जाणवतो. ही निर्लेपता सूफी फकिरांशी, रामदासी वा वारकरी पंथाशी नाते सांगते. त्या दृष्टीने संग्रहाचे मुखपृष्ठ अर्थवाही झाले असून निर्मितीमूल्ये उच्च दर्जाची आहेत.'

प्रा. सुखमणी रॉय ह्यांनी संग्रहातली अनेक उदाहरणे देत डबीरांची आकलनप्रतिमा, स्वयंप्रभता, शब्दसजगपणा, निःशब्दाची अभिव्यक्तता ही वैशिष्ट्ये स्पष्ट केली. 'जदीद' व 'रिवायती' दोन्ही गझलांची उदाहरणे संग्रहातल्या गझलांतून दाखवली. 'आम्ही कोण?' ही केशवसुतांची कविता व 'आम्ही' ही डबीरांची गझल – ह्यातील विरोध वैषम्य ह्यातून गझलविधेचे मराठी संदर्भ अधोरेखित होतात हे सांगून त्यांनी डबीरांच्या गझलेतला 'अंदाजे बयाँ' नमूद केला.

दिनकर गांगल यांनी ''डबीरांचा नि ग्रंथालीचा जुना परिचय असल्याचे नमूद करून तो काळ, तो माहौल व चर्चा यांची आठवण जागवली. रसिकांना कविता, गीत, गझल ह्यांच्या 'तंत्रामंत्राशी' काही घेणे-देणे नसते. त्याला कलाकृती आवडली की तो दाद देतो'' असं ते पुढे म्हणाले. संग्रहाच्या परिशिष्टात दिलेल्या वकार काद्रींच्या 'छांदस'वरील समीक्षा लेखाची त्यांनी प्रशंसा केली. हा लेख जरूर वाचा अशी शिफारस केली. हा लेख सदानंद डबीरांची वैशिष्ट्ये मर्मज्ञपणे सांगतो. तसेच सुरेश भट व समकालीन कवींपासून त्यांचे वेगळेपण सोदाहरण अधोरेखित करतो,'' असं ते म्हणाले.

सदानंद डबीरांनी आभार व कृतज्ञता व्यक्त केली व 'अलूफ' ह्या शीर्षकाचे प्रयोजन स्पष्ट केले.

प्रकाशन समारंभानंतर 'छांदस' व 'अलूफ' संग्रहातील गीत व गझल गायनाची मैफिल झाली. मिलिंद जोशी, मनीषा जोशी, माधव भागवत, सुचित्रा भागवत ह्या प्रथितयश गायकांनी डबीरांच्या रचना गायल्या. आदित्य ओक (पेटी), प्रसाद पाध्ये (तबला) व संजय महाडिक (गिटार) ह्यांची साथ होती. ह्या मैफिलीचे निवेदन व सूत्रसंचालन खुद्द सदानंद डबीरांनी अतिशय थोडक्यात पण मार्मिकपणे केले. त्यांच्या दिलखुलास निवेदनाला दाद मिळाली. सुचित्रा भागवतांनी – 'जरा जगून घे अरे'! व 'ढळता ढळता ढळली रात' ह्या रचना गायल्या. मिलिंद जोशींनी 'असे असे अन् तसे तसे' – ही

व 'मी उन्हाचे शब्द केले' ह्या गझला गायल्या. माधव भागवतांनी 'एरव्ही जगासवे' ही गझल व 'कचपाश मोकळे' हे गीत गायले. मनीषा जोशींनी 'फूल हवे तर' व 'षडज् पंचम छेडता' ह्या गझला गायल्या. मिलिंद-मनीषाने - 'तू मी आपण...' हे द्वंद्वगीत गायले तर माधव-सुचित्रांनी- पिंपळाचे झाड... हे स्मरणरंजनात्मक गीत गायले.

सर्वच गायकांना भरपूर दाद मिळत मैफिल उत्तरोत्तर रंगत गेली. सुचित्राने पहिल्याच गीतातून जीवनावर प्रेम करण्याचा संदेश दिला नंतर मिलिंद जोशी यांनी गायलेली 'असे असे अन् तसे तसे' ही मिष्कील गझल व माधव भागवतांची 'एरव्ही जगासवे' ही गझल दाद घेऊन गझली. 'कचपाश मोकळे' व 'ढळली रात' ह्या शृंगारिक रचनांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. 'पिंपळाचे झाड' ह्या स्मरणरंजनात्मक गीताने मैफिल वेगळ्याच उंचीवर नेली. अप्रतिम संगीत साथ हे या मैफिलीचे वैशिष्ट्य ठरले.

ही स्वरमयी संध्याकाळ खरोखरीच 'उत्तुंग' ह्या संस्थेच्या नावाला साजेशी व अविस्मरणीय झाली. पुस्तकविक्रीलाही चांगला प्रतिसाद लाभला.

## डॉ. टिकेकर अभ्यासवृत्तीसाठी अर्ज

नामवंत संशोधक, अभ्यासक, ज्येष्ठ संपादक, मान्यताप्राप्त लेखक, दुर्मिळ ग्रंथांचे संग्राहक आणि विचारवंत डॉ. अरूण टिकेकर यांचे १९ जानेवारी २०१६ रोजी आकस्मिक निधन झाले.

डॉ. टिकेकरांनी २००७ ते २०१३ अशी सहा वर्षे एशियाटिक सोसायटीचे अध्यक्षपद सांभाळले. एशियाटिक सोसायटीसारख्या ज्ञानसाधनेला महत्त्व देणाऱ्या संस्थेत तरूण संशोधकांनी यावे व तेथील ज्ञानपरंपरा कायम राहावी, संशोधकांना उत्तेजन व प्रेरणा मिळावी, यासाठी त्यांनी या काळात अनेक नवनवीन प्रकल्पांची आखणी केली व वेगवेगळे उपक्रम सुरू केले.

डॉ. टिकेकर यांच्या कार्याचे स्मरण म्हणून व त्यांचे कार्य पुढे चालावे म्हणून एशियाटिक सोसायटीने 'डॉ. अरुण टिकेकरप्रगत अभ्यास केंद्रा'ची स्थापना केली आहे. डॉ. टिकेकरांच्या आवडीच्या संशोधनक्षेत्रांमधील संशोधनास प्रेरणा मिळावी व संशोधनवृत्ती वाढीस लागावी यासाठी हे केंद्र कार्यरत असेल. त्यासाठी परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा यांचे आयोजन केले जाईल. या केंद्राने चालू केलेला महत्त्वाचा उपक्रम म्हणजे डॉ. टिकेकर अभ्यासवृत्ती.

या केंद्रातर्फे तिसरी 'डॉ. टिकेकर अभ्यासवृत्ती', त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधत, एक फेब्रुवारी २०१९ रोजी दिली जाईल. यावर्षी 'महाराष्ट्र किंवा पूर्वीचा मुंबई प्रांतयातील ऐतिहासिक आणि / किंवा समकालीन संस्कृती' या मुख्य संशोधनक्षेत्रातील, खालील विषय देण्यात येत आहेत.

१) लोकसाहित्य व मौखिक परंपरा
२) सण व उत्सव-नवीन प्रवाह
३) वास्तुरूप वारसा (built heritage) व वर्तमानातील वारसा (living heritage)
४) बदलत्या सामाजिक प्रथा व चालीरीती
५) पाककला परंपरा व खाद्यसंस्कृती

या निवेदनाद्वारेया संशोधनक्षेत्रांत काम करणारे संशोधक, अभ्यासकव विद्यार्थी या सर्वांना या विशेष अभ्यासवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.ही अभ्यासवृत्ती रुपये सव्वा लाख एवढ्या रकमेची असून एका वर्षासाठी आहे. आपला संशोधकीय प्रबंध आपण मराठी वा इंग्रजी या पैकी कोणत्याही भाषेत सादर करू शकता. ३० ते ६५ या वयोगटातील इच्छुकांना यासाठी अर्ज करता येतील. 'डॉ. टिकेकर अभ्यासवृत्ती'च्या इतर सर्व अटी व सूचना एशियाटिक सोसायटीच्या कार्यालयात अथवा सोसायटीच्या संकेतस्थळावर (www.asiaticsociety.org.in) उपलब्ध होतील. तसेच त्यासाठीचे अर्जही संकेतस्थळ व कार्यालय याठिकाणी उपलब्ध आहेत. (कार्यालय दूरध्वनी ०२२-२२६६०९५६, २२६६५१३९, २२६६५५६०)
संशोधन प्रस्ताव व पूर्ण भरलेले अर्ज सोसायटीच्या कार्यालयात ता. २५ ऑक्टोबर २०१८ पर्यंत स्वीकारले जातील. इमेलद्वारा पाठवलेले प्रस्ताव किंवा अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व नामवंत परीक्षक योग्य संशोधकाची / अभ्यासकाची निवड करतील.

# 'लाखो इथले गुरू' प्रकाशन सोहळा



फ्रान्सिस डिमेलो लिखित आणि 'ग्रंथाली' प्रकाशित 'लाखो इथले गुरू' या पुस्तकाचा पुन:प्रकाशन सोहळा रविवार, १६ सप्टेंबर २०१८ रोजी विरारजवळील नंदाखाल येथील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या मदर वेरोणिका सभागृहात पार पडला.

या दिमाखदार सोहळ्याचे अध्यक्ष थोर विचारवंत साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रेटो ह्यांच्या हस्ते पुस्तकाचे पुन:प्रकाशन झाले. याप्रसंगी बोलताना ते म्हणाले, '' 'लाखो इथले गुरू' हे पुस्तक डिमेलोसरांच्या भावनेने ओथंबलेले आणि संवेदनशीलतेने भरलेले आहे. सदर पुस्तक हे शतकमहोत्सवी आर.एम. भट हायस्कूलचे चरित्र आहे तर डिमेलोसरांचे आत्मचरित्र आहे. विद्यार्थी आणि पालकांनी हे पुस्तक जरूर वाचावेच, परंतु स्वत:ला उत्तम शिक्षक म्हणून घडवू पाहणाऱ्या प्रत्येक शिक्षकाने या पुस्तकाची पारायणे करायला हवीत.

पुस्तक प्रकाशनसोहळ्यासाठी विशेष अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूलच्या माजी मुख्याध्यापिका सिस्टर सुषमा म्हणाल्या, ''शिक्षक शाळेपुरताच नव्हे तर डिमेलोसरांसारखा समाजाचा शिक्षक असावा, अनुभव घ्यायला लाखो पुस्तकं लागत नाही पण पुस्तक लिहायला मात्र लाखो अनुभव घ्यावे लागतात. चांगली पुस्तके आपले चांगले मित्र असतात. त्यातूनच आपण नवीन कल्पकता आणि नवीन विचार घेतो. डिमेलो सरांसारखे चांगले शिक्षक विद्यार्थ्यांना आणि समाजालाही प्रेरित करतात.''

सुप्रसिद्ध सॉलिसिटर जॉन रुमाव ह्यांनी आपल्या छोटेखानी भाषणात डिमेलोसरांची विद्यार्थिप्रियता आणि अनुभवसंपन्नतेचे कौतुक करून पुस्तकाच्या माध्यमातून डिमेलो सरांनी स्वत:ला व्यक्त करण्याची संधी घेतल्याबद्दल कौतुक केले.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक जॉन डिमेलो यांनी करून 'ग्रंथाली'ने 'लाखो इथले गुरू' हे पुस्तक प्रसिद्ध करून डिमेलोसरांचे अनुभव भांडार खुले केल्याबद्दल 'ग्रंथाली' प्रकाशनाला विशेष धन्यवाद दिले.

या पुन:प्रकाशन सोहळ्याला 'ग्रंथाली' प्रकाशनचे प्रमुख सुदेश हिंगलासपूरकर आणि संयोजिका धनश्री धारप उपस्थित होते. शिक्षक म्हणून घडण्यात विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक, सेवकवर्ग आणि विविध प्रसंगानुभव या साऱ्यांचाच लहानमोठा वाटा असतो. या पुस्तकाने या साऱ्यांविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाल्याचे समाधानही डिमेलो सरांनी व्यक्त केले.

या पुस्तकाच्या प्रकाशनसोहळ्यातील श्रोत्यांना भारावून टाकणारा उपक्रम म्हणजे डिमेलोसरांचे सहकारी मिलिंद बेडेकर आणि विद्यार्थिनी मेधा आलकरी ह्यांनी सादर केलेले अभिवाचन! या पुस्तकातील काही भावनोत्कट तर काही गंमतीदार प्रसंगाचं साभिनय अभिवाचन करून या दोघांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध तर केलेच शिवाय पुस्तकाविषयीची प्रचंड उत्कंठा निर्माण केली. त्यामुळे सभागृहातच सुमारे चारशे पुस्तके हातोहात संपली.

या प्रसंगी पुस्तकाच्या निर्मितीत सहकार्य करणारे लिएल आर्टचे संजय कोरिया आणि मेधा आलकरी यांचा 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप ह्यांनी यथोचित सन्मान केला.

रॉबर्ट लोबो यांचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कु. स्नोव्हिया कोरिया हिचे सुमधूर ईशस्तवन आणि सहाशेहून अधिक ज्येष्ठ-श्रेष्ठ साहित्यिकांची रसिकांची उपस्थिती यामुळे प्रकाशनसोहळा 'ग्रंथाली' प्रकाशनचा लौकिक वाढविणारा ठरला.

एका हाडाच्या शिक्षकाचं हे अतिशय प्रामाणिक आणि पारदर्शी अनुभवकथन हे वाचकांच्या मनाची कशी पकड घेते हे कळत नाही.

'लाखो इथले गुरू' या पुस्तकाचे मुखपृष्ठ, आकर्षक मांडणी व बांधणी याद्वारे ग्रंथाली प्रकाशन या नामवंत प्रकाशन संस्थेने पुन्हा एकदा आपला दर्जा सिद्ध केला आहे. अशा प्रतिक्रिया यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या.

# दत्ता सावंत यांच्या 'अष्टनायिका' आणि पिटुकल्यांसाठी नाटुकल्या' या पुस्तकांचे प्रकाशन




लेखक, दिग्दर्शक, अभिनेता असा दत्ता सावंत यांचा प्रवास राहिलेला आहे. कितीतरी वर्षे अमर हिंद मंडळाच्या कलाविभागाचे ते प्रमुख होते. या कारकीर्दीमध्ये त्यांनी एकांकिका, दिर्घांक तसेच अनेक नाटके लिहिलेली आहेत. इतर विषयांवरही त्यांनी लिखाण केलेले आहे. 'ग्रंथाली'ने यापूर्वी त्यांनी लिहिलेले 'परिघपारधी' हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे आणि अवघ्या काही महिन्यांतच आणखी दोन पुस्तके प्रकाशित होण्याचा मान त्यांच्या वाट्याला आलेला आहे. एक आहे 'अष्टनायिका' तर दुसरे आहे 'पिटुकल्यांसाठी नाटुकल्या' ज्याचे प्रकाशन सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी लीला हडप, 'अमर हिंद मंडळ'चे अध्यक्ष भास्कर सावंत, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप हे उपस्थित होते.

सुरवातीला अभिवाचन आणि नाट्यसादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये तृप्ती जाधव, चंदन जमदाडे, सुभाष तोडणकर, अश्वजित सावंत, कविता नाईक, अमित सोलंकी, ऐश्वर्या सक्रे, तृप्ती कदम या 'अमर हिंद मंडळ'च्या कलाकारांचा सहभाग होता. प्रियांका जाधव हिने सरस्वती वंदना सादर केली.

पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम म्हटल्यानंतर त्याचे स्वरुपही ठरलेले असते, पण प्रकाशनाच्या प्रमुख पाहुण्या निर्मिती सावंत यांनी भाषणापेक्षा सुसंवादाला महत्त्व दिले. उपस्थितांमध्ये नाट्यक्षेत्रात करिअर करू पाहणारे विद्यार्थी होते. कलेवर निस्सीम प्रेम करणारा प्रेक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यांना निर्मिती सावंत यांनी उत्तर देऊन त्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. 'फारसे श्रम न घेता झटपट प्रसिद्धीच्या मागे नवकलाकारांचा असलेला ओढा याला पालकही जबाबदार असल्याचे सांगून सावंत यांनी मुलांमध्ये असलेले सामर्थ्य लक्षात घेऊन प्रेरणा द्यायला हवी' असे सुचवले. मालिका, चित्रपटाच्या सादरीकरणामध्ये भविष्यात थोडाफार फरक जाणवेल परंतु नाटक ही जिवंत कला आहे, जोपर्यंत प्रेक्षकांत नाटकाचे आकर्षण आहे तोपर्यंत ही कला राहणार आहे. अमर हिंद मंडळाच्या सान्निध्यात जे कलाकार आले ते यशाचे साक्षीदार झालेले आहेत असे मत निर्मिती सावंत यांनी साधल्या गेलेल्या संवादात व्यक्त केले.

ज्येष्ठ रंगकर्मी लीला हडप यांनी आपण या क्षेत्रात कसे आलो हे सांगताना अमर हिंद मंडळातील अनेक आठवणी त्यांनी जागवल्या. नाटकांच्या संहिता लिहिल्या जातात पण त्या जपल्या जात नाहीत ही खंत 'अमर हिंद मंडळ'चे अध्यक्ष भास्कर सावंत यांनी व्यक्त केली. लेखक या नात्याने दत्ता सावंत यांनी पुस्तक निर्मितीविषयी आपले मनोगत व्यक्त केले. अभिनेता संजय क्षेमकल्याणी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

**– नंदिनी पाटील**

भ्रमणध्वनी : ९८६७६६८८०५

ग्रंथाली



नाही फिरलो माघारी
मोहन शिरसाट
मूल्य १३० रु.
सवलतीत ८० रु.

दोन कवितासंग्रह

कविताच... माझी कबर
मोहन शिरसाट
मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.



पुस्तकप्रकाशन

# खेळिया : बा.भ. बोरकरांच्या काव्याचा स्पर्श



महाराष्ट्रातील कवींची मांदियाळी लक्षात घेतली तर ज्या कवींची सन्मानाने नावे घेतली जातात त्यात पद्मश्री बा. भ. बोरकर यांचे नाव अग्रभागी आहे. त्यांनी आपली कविता ही स्वत:पुरती मर्यादित न ठेवता रसिकांपर्यंत पोहोचवली त्यामुळे त्यांचा चाहतावर्ग हा मोठा होता. डॉ. घनश्याम बोरकर हे कवी बोरकरांचे पुतणे. अनेक वर्षे त्यांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे कवितेचा वेगळा गुण त्यांच्या अंतरंगीही भिनलेला आहे. आवश्यक तेथे त्यांनी कवितांची टिपणे कागदावर लिहूनही ठेवलेली आहेत परंतु ती जनमानसात व्यक्त करावीत असे त्यांना फारसे काही वाटले नाही. वयाची साठी उलटल्यानंतर कागदावर उतरविलेल्या कविता संग्रह रुपाने प्रसिद्ध व्हाव्यात असे कुटुंबाला वाटले. पद्मश्री मधु मंगेश कर्णिक हे यावेळी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. 'झी चोवीस तास'चे प्रमुख संपादक विजय कुवळेकर प्रमुख पाहुणे म्हणून तर डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित होते. सुरवातीला 'खेळिया' कवितासंग्रहातील स्वरबद्ध केलेले काव्य स्वत: डॉ. घनश्याम बोरकर यांनी सादर केले. त्याचे निवेदन त्यांची कन्या तेजश्री बोरकर-दिक्षित यांनी केले. या निमित्ताने उपस्थितांना 'खेळिया काव्य मैफिली'चा सुरेल आनंद घेता आला.

'मी माझे भाग्य समजतो की मला बा.भ. बोरकरांच्या कविता जवळून ऐकता आल्या. सरकारी सेवेत असताना त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी या गोवा दौऱ्यावर आल्या होत्या. इथल्या महात्मा गांधी शिल्पाचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले होते. शिल्पाभोवती जो कट्टा उभारला होता त्यावर बोरकरांच्या कवितेच्या काव्यओळी लिहिलेल्या होत्या. गांधी यांनी त्याचा अर्थ जाणून घेतला आणि त्यानंतर त्यांनी त्या काव्याची प्रशंसा केली. जाणून घेण्याची इतकी प्रतिभा बा.भ.बोरकरांच्या काव्यात होती', अशा आठवणींना प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी उजाळा दिला. पुढे ते म्हणाले, 'डॉ. घनश्याम बोरकर यांच्या कविता वाचल्यानंतर त्यांच्याही कवितेत बा.भ. बोरकरांच्या काव्याचा स्पर्श आहे हे सांगताना मला आनंद होत आहे'.

'कवीला कविता स्फुरली की त्याचा काव्यसंग्रह प्रकाशित होतो परंतु डॉ. घनश्याम बोरकर यांनी उसंत घेऊन काही वर्षांचा कालावधी घेऊन 'खेळिया'हा काव्यसंग्रह तब्बल वयाच्या साठाव्या वर्षी प्रसिद्ध केला याचा मला आनंद होत आहे' असे मत झी चोवीस तासचे प्रमुख संपादक विजय कुवळेकर यांनी प्रमुख पाहुणे या नात्याने व्यक्त केले. 'गेल्या काही दशकात अनेक कविता बोरकरांकडून लिहिल्या गेल्या. प्रकाशनासाठी वेळ दिल्यामुळे यात निवडक कवितांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे, जो वाचकांना आनंद देणारा आहे. कवितेत विविध प्रकार पहायला मिळत असले तरी बोरकरांच्या कवितेत प्रामुख्याने प्रार्थना, चिंतन, अध्यात्म, मानवी प्रेम यांचा प्रभाव अधिक पहायला मिळतो जो शब्दांतून उलगडतो. हा कवितासंग्रह प्रकाशित करण्यासाठी काही वर्षांचा अवधी घेतला, आता दुसरा संग्रह प्रकाशित करण्यासाठी वेळ घेऊ नये' असे कुवळेकर यांनी यावेळी सुचवले.

डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे यांचे समीक्षक म्हणून साहित्य क्षेत्रात योगदान आहे. सन्माननीय वक्ते म्हणून त्यांना निमंत्रित केले होते. 'एकवेळ काव्य लिहिणे सोपे असते पण काव्यातही गीत असते याचे भान ठेवून ते स्वरांत सादर करणे तसे कठीण असते. ही किमया फार कमी कवींच्या अंतरंगात असते. डॉ. घनश्याम बोरकर यांच्या काव्यात ही प्रतिभा मला पहायला मिळाली', अशी प्रतिक्रिया त्यांनी एकंदरीत महाराष्ट्रातील काव्यपरंपरेबद्दल मागोवा घेताना व्यक्त केली.

कविता हा प्रकार माझ्यासाठी आत्मिक आनंद देणारा आहे. ते पुस्तकरुपाने यावे असे मला कधी वाटले नाही आणि मी त्यादृष्टीने प्रयत्नही केलेला नाही. निवडक अशा मित्रांसमोर कविता सादर केल्यानंतर जी दाद दिली जात होती ती माझ्यासाठी पुरेशी होती. माझी पत्नी जयश्री बोरकर हिने पाठपुरावा केल्यामुळे हा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. माझे काका पद्मश्री कवी बा.भ.बोरकर यांच्याकडून मिळालेली ही काव्यसंपदा आहे हे सांगताना आनंद होत असल्याचे 'खेळिया'चे कवी डॉ. घनश्याम बोरकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले. सुदेश हिंगलासपूरकर आणि ग्रंथालीच्या कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप तसेच बोरकर कुटुंबीयांच्यावतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. मुंबईतील दादर-माटुंगा कल्चरल सेंटर इथे हा प्रकाशन सोहळा पार पडला.

**- नंदिनी पाटील**

भ्रमणध्वनी : ९८६७६६८८०५

पुस्तकप्रकाशन

# पंखाविना भरारीची चौदावी आवृत्ती व इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन



'ग्रंथाली'च्या सर्वच पुस्तकांना वाचकांनी पसंती दर्शवलेली आहे. त्यामुळे विविध विविध विषयांचे पुस्तक प्रकाशन करण्यात ग्रंथालीने नेहमी पुढाकार घेतलेला आहे. 'पंखाविना भरारी' हे शरयू घाडी लिखित पुस्तक आहे. त्यात त्यांचा चिरंजीव प्रसाद घाडी याची विविध क्षेत्रातली प्रशंसनीय कारकीर्द अधोरेखित केलेली आहे. दिव्यांग म्हणावे अशा मोठ्या आजाराला सामोरे गेल्यानंतरसुद्धा सुदृढ मुलाने जे कर्तृत्त्व सिद्ध करावे ते प्रसादने अल्प कालावधीमध्ये केलेले आहे. कितीतरी प्रतिष्ठेच्या संस्थांनी पुरस्कार देऊन त्याच्या या कामाचे कौतुक केलेले आहे. काही वाहिन्यांनी त्याची दखलही घेतलेली आहे. समाजाला त्याचा एवढा हेवा वाटत असेल तर त्याहीपेक्षा आई शरयू घाडी आणि वडील नागेश घाडी यांना वाटणे साहजिकच आहे. त्याच्या या कलेला प्रोत्साहन देता यावे, आई-वडील या नात्याने विनातक्रार त्याची शुश्रूषा करता यावी यासाठी प्रसादबरोबर आई-वडिलांनी घेतलेले कष्ट म्हणजेच 'पंखाविना भरारी' हे पुस्तक सांगता येईल. प्रकाशित झाल्यापासून ते ते अगदी इंग्रजी आवृत्ती निघेपर्यंत या पुस्तकाचा झंझावाती प्रवास राहिलेला आहे. इंग्रजी अनुवादित पुस्तक आणि मराठी चौदावी आवृत्ती यांचे निमित्त घेऊन त्याचा नुकताच प्रकाशन सोहळा ग्रंथाली आणि आर एम भट गोखले एज्युकेशनच्या संयुक्त विद्यमाने परळच्या हायस्कूलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांच्या हस्ते मराठी, इंग्रजी या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. उद्योजक सेफ कुरेशी, गोखले एज्युकेशनच्या प्राचार्य डॉ. सुहासिनी संत, अनुवादक ज्योत्स्ना वऱ्हाडकर, प्राची कुंकळीयेंकर हे या वेळी उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी यांनी प्रसाद घाडीचा संदर्भ देताना आपण स्वत:सुद्धा अशा समस्येला सामोरे गेलो होतो असे सांगत यावेळी त्यांनी आपला दिव्यांग मुलगा अंशुमन याच्या आठवणी जागवल्या. तो जरी आमच्या सोबतीला नसला तरी कुटुंब सदस्य म्हणून मी त्याच्या नावाचा उल्लेख वेळोवेळी करतो. प्रसादची पुस्तकातली उज्ज्वल कारकीर्द वाचल्यानंतर त्याच्यावर मालिका किंवा चित्रपट यायला हवा असे त्यांनी यावेळी सुचवले. ग्रंथालीच्या कार्यक्रमात आपला उल्लेख प्रमुख पाहुणे या नात्याने जो केला जात आहे, ते मला स्वत:ला मान्य नाही. त्याला कारण म्हणजे ग्रंथालीच्या वाचनजागृतीच्या प्रवासात मी सुरवातीपासून असल्यामुळे प्रमुख पाहुण्यापेक्षा सदस्य म्हणून ओळख करुन देणे उचित वाटते, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. बऱ्याचवेळा पुस्तकावर लेखक म्हणून व्यक्तीचे नाव असते. या पुस्तकात मात्र लेखिका प्रसादची आई असा उल्लेख असल्यामुळे मायलेकाचे नाते काय आहे हे जाणवायला लागते.

सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप, नागेश घाडी यांच्याहस्ते उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. शरयू घाडी यांनी आपल्या मनोगतात प्रसादसारखा दिव्यांग मुलगा आमच्या पदरी देण्याला देवच कारणीभूत असल्याचे सांगून त्याच्या प्रामाणिकपणाच्या भारावून टाकणाऱ्या अनेक गोष्टी घाडी यांनी उलगडून सांगितल्या. प्रकाशनाचे निमित्त घेऊन घाडी परिवाराने काही दिव्यांग मुलांचा सत्कार केला. त्यात प्रामुख्याने सचिन पाटील, नाजुका कदम यांचा समावेश होता. शिवाय शाळाबाह्य शिक्षणात विशेष प्रावीण्य दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये सई हिंगलासपूरकर हिचासुद्धा सत्कार केला. पुस्तकाच्या निर्मितीसाठी आणि प्रसादच्या जडणघडणीमध्ये ज्यांचा सहभाग होता त्यांचासुद्धा इथे सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांना प्रसादच्या कर्तृत्त्वाची, कलासंपन्न अविष्काराची चित्रफित दाखवण्यात आली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी एका सुरात एका तालात स्वागत गीतही सादर केले होते. डॉ. लतिका भानुशाली यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

– नंदिनी पाटील

भ्रमणध्वनी : ९८६७६६८८०५

# 'मु.पो.आई' मध्ये व्यक्त झाली आहे संपादकांच्या आईची महती

आई हा प्रत्येक व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येकाला त्यावर बोलायला आवडते. बऱ्याच जणांनी ते व्यक्तही केलेले आहे. समाजासाठी पत्रकारिता करत असताना दुसऱ्याच्या आईविषयी कदाचित या पत्रकारांनी भरभरुन लिहिलेही असेल, पण कामाच्या व्यापामुळे खुद्द संपादकालाच आपल्या आईविषयी भाष्य करणे आवडत असले तरी ते व्यक्त होईलच याची खात्री देता येत नाही. मात्र पत्रकार संदीप काळे यांनी पुढाकार घेऊन काही महिन्यांचा कालावधी देऊन, अनेक नामांकित संपादकांना लिहिते केलेले आहे. 'मु.पो.आई : संपादकांचं मातृस्मरण' हे त्या पुस्तकाचे शीर्षक आहे. 'ग्रंथाली'ने आजवर संग्रही ठेवावीत अशी जी पुस्तकं प्रकाशित केली, त्यात नुकतेच प्रकाशित झालेले हे एक पुस्तक असणार आहे. पद्मविभूषण शरद पवार यांच्याहस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. पद्मश्री कुमार केतकर हे या प्रकाशन सोहळ्याला अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम पवार, अभिनंदन थोरात यांचा सहभाग होता. या निमित्ताने या पुस्तकावरील 'उद्याचा मराठवाडा' या विशेष अंकाचे प्रकाशनही करण्यात आले. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि कार्यक्रम संयोजक धनश्री धारप यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

'सात भाऊ, चार बहिणी असा आमचा मोठा परिवार होता. प्रतिकूल परिस्थितीतही आईने आमचा सांभाळ केला. शेती हा आमचा मुख्य व्यवसाय असला तरी मुलांनी शिक्षण घ्यावे याचा ध्यास तिने घेतला होता. यासाठी भल्या पहाटे उठून वेळच्यावेळी हॉस्टेलला आमच्यासाठी डबा पोहोचेल, याची ती काळजी घेत होती. कुटुंबाबरोबर सामाजिक कार्याची तिला आवड होती. तेवढ्या धावपळीतही लोकल बोर्डाच्या सदस्या म्हणूनही ती काम करित होती. बैठकीला उपस्थित राहिल्यास काही आणे त्यावेळी भत्ता म्हणून दिले जात होते. आई बैठकीला उशिरा जरी गेली तरी ती त्या दिवशीचा भत्ता नाकारत असे. आज आम्हा भावंडांमध्ये स्थिरता









कार्यक्रमात प्रातिनिधिक मानांचा भावपूर्ण गौरव




आणि शिस्त आली आहे. त्यामागे आईने घेतलेली मेहनत सांगता येईल', असे उद्गार शरद पवार यांनी पुस्तक प्रकाशनाच्यावेळी काढले. आई हा कुटुंबाचा आधार आहे. ती घरात असल्याने घर भरल्यासारखे वाटते, असे मत व्यक्त करताना पवार यांनी तिच्या आठवणी मनमोकळेपणाने जागवल्या. बैलाच्या धडक देण्याने तिचा एक हात व पाय निकामी झाला होता. त्यामुळे हातात आलेल्या कुबड्यांनी अनेकवेळा आपल्याला चोप दिल्याचा स्मरणात असल्याचे त्यांनी सांगितले. 'मु.पो.आई' या पुस्तकात नामवंत अशा तीस संपादकांच्या आईच्या कर्तृत्वाचा आलेख मांडलेला आहे. पवार यांनी यातील निवडक संपादकांच्या आईच्या गुणांचे दर्शन आपल्या भाषणातून घडविले.

आई हा विषय ठराविक समाजाचा, कुटुंबाचा नाही तर जगभर आई-मुलांच्या नात्याचे संशोधन होत आहे असे सांगत केतकर यांनी जागतिक पातळीवरच्या व्यक्तींच्या मातांचा स्वत:कडे बघण्याचा दृष्टिकोन काय आहे हे विस्तृतपणे सांगितले. आईच्या संस्कारांचे, विचारांचे पालन प्रत्येकाने केले तर जगातली अराजकता कमी होईल असा विश्वास त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केला.



पुस्तकाची देखणी मांडणी व मुखपृष्ठकार नयन बारहाते यांचा सन्मान

पुस्तकाचे लेखक, पत्रकार संदीप काळे हे चळवळीतून पुढे आलेले आहेत. आजच्या युवकांची गरज काय आहे हे त्यांनी ओळखलेले आहे. सकाळ माध्यम समूहाचे संचालक, संपादक या नात्याने मी इथे आलेलो नाही तर सहकारी या नात्याने इथे आल्याचे प्रमुख पाहुणे श्रीराम पवार यांनी आपल्या भाषणात सांगितले.

प्रमुख पाहुणे आभिनंदन थोरात यांनी संदीप काळे यांच्या जडणघडणीचा मी साक्षीदार असल्याचे सांगितले. शरद पवार यांनी या पुस्तकासाठी जी प्रस्तावना लिहिलेली आहे त्यात माझ्याबरोबर अनेक संपादकांच्या आईचा उल्लेख आहे. कामाचा प्रचंड व्याप असतानासुद्धा त्यांनी संपूर्ण पुस्तक वाचल्याची कल्पना या प्रस्तावनेतून मिळते असे सांगत. प्रकाशित झालेले पुस्तक हे मराठी आहे, त्याची इंग्रजी आवृत्ती यावी असे थोरात यांनी सुचवले.



प्रा. डॉ. वीणा सानेकर

लेखक म्हणून पत्रकार संदीप काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. 'पंखाविना भरारी'च्या लेखिका शरयू घाडी यांच्याबरोबर उपस्थित असलेल्या संपादकांच्या आईंचा शाल व पुस्तकभेट देऊन सन्मान करण्यात आला. यात संपादक महाराव यांच्या आई, संपादक संजय वरकड यांच्या आई तसेच संदीप काळे यांच्या आईंचा समावेश होता. नरिमन पॉईंट इथल्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मध्ये हा प्रकाशन सोहळा पार पडला. 'शब्द रुची'च्या कार्यकारी संपादिका आणि प्रा. डॉ. वीणा सानेकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**– नंदिनी पाटील**

भ्रमणध्वनी : ९८६७६६८८०५

## पुस्तकप्रकाशन

# डायरी एका चंद्राबाईची : स्त्रीच्या वेदनांचा आणखी एक




स्त्री ही समाजाचा अविभाज्य घटक आहे, मात्र तिच्याकडे आपला समाज दूषित नजरेने पाहतो. त्यामुळे स्त्रियांवर अत्याचार होत आहेत, असे मत पत्रकार-विचारवंत दिनकर गांगल यांनी 'डायरी एका चंद्राबाईची' या पुस्तकात प्रकाशनप्रसंगी मांडले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा, पंढरपूर व द.ता. भोसले सार्वजनिक वाचनालय, इसबावी यांच्या संयुक्त विद्यमाने द.ता. भोसले यांच्या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. राजेंद्र दास, प्राचार्य महेंद्र कदम, देवानंद सोनटक्के, नानासाहेब रत्नपारखी, सिद्धार्थ ढवळे, सुदेश हिंगलासपूरकर आदी उपस्थित होते.

राजेंद्र दास म्हणाले, ''ही कादंबरी म्हणजे जीवनाचा खरा अर्थ शोधणारी डायरी आहे. कामभावनेच्या सूक्ष्म छटा शोधण्याचे काम ही डायरी करते.'' प्रा. महेंद्र कदम म्हणाले, ''माणसाच्या जीवनातील विद्रूपता दाखविणारी ही कादंबरी आहे. 'मी टू'ची चळवळ पुढे येत असताना आधार वाटावा अशी ही कादंबरी आहे.'' प्रास्ताविक अकुंश गाजरे, सूत्रसंचालन कल्याणराव शिंदे यांनी केले तर आभार धनाजी चव्हाण मानले.

---



**रामचंद्र वरक लिखित 'धनगरगाथा' पुस्तकाचे प्रकाशन प्राध्यापक विजय तापस व गावातील सहकाऱ्यांसमवेत**

||ग्रंथाली||※||

**कर्तबगारीची पताका जगभर फडकत ठेवणाऱ्या**
**अनिवासी मराठी ज्ञानवंतांचा प्रेरणादायी प्रवास...**

सुनीता गानू आणि आनंद गानू लिखित
'गर्जे मराठी' इंग्रजी भाग १ व २




**गर्जे मराठी इंग्रजी**
**भाग १ व २ मिळून**
**मूल्य २२५० रुपये**
**सवलतीत १४०० रुपये,**
**टपालखर्च २०० रुपये**








**गर्जे मराठी भाग १**
**मूल्य ६५० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये,**
**टपालखर्च ५० रुपये**

विश्वसंचारी
प्रवासाची गाथा




**मूल्य ७०० रुपये**
**सवलतीत ४०० रुपये,**
**टपालखर्च ५० रुपये**

**लालफितीतल्या कारभारातला शह-काटशहाचा खेळ...**

कलेक्टर पद म्हणजे भ्रष्ट यंत्रणेला आव्हान देण्याचं आणि जनहित जपण्याचं एक जबरदस्त माध्यम आहे; पण दुर्दैवाने भ्रष्ट यंत्रणेला आव्हान देण्यापेक्षा त्या यंत्रणेला शरण जाऊन स्वत:चं उखळ पांढरं करून घेण्याकडेच अनेकांचा कल असतो; मात्र एखादा कलेक्टर जेव्हा या भ्रष्ट यंत्रणेच्या विरोधात दंड थोपटून उभा राहतो, तेव्हा त्याच्या वाट्याला संघर्ष येणं अटळ असतं. अशाच एका प्रामाणिक आणि सच्च्या कलेक्टरची संघर्षगाथा अभिजित कुलकर्णी यांनी रंगवली आहे 'रेड टेप' या कादंबरीतून. अभिजित कुलकर्णी दोन दशकांपासून पत्रकारितेत कार्यरत आहेत आणि त्यांनी मंत्रालयात राज्य सरकारच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात सहायक संचालकपदावर काम करताना राजपत्रित अधिकारी या नात्याने दोन वर्षं प्रशासकीय काम काजाचा प्रत्यक्ष अनुभवही घेतला आहे. त्यामुळे लाल फितीचा हा भ्रष्ट कारभार आणि त्याला आव्हान देणाऱ्या एका कलेक्टरचा लढाऊ बाणा 'रेड टेप'द्वारे वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

'रेड टेप' ही कादंबरी महेश राऊत या प्रामाणिक कलेक्टरची संघर्षगाथा आहे. वांद्र्याच्या मध्य वस्तीतला एक भूखंड बळकावण्याचा घाट एका बड्या बिल्डरने घातलेला असतो. भूखंडालगत असलेल्या हजारो कोटी रुपयांच्या किमतीच्या जागेवरही काही हितसंबंधीयांचा डोळा असतो. अब्जावधींच्या या गैरव्यवहाराला महसूलमंत्री कदम आणि आरोग्यमंत्री घोरपडे यांचा वरदहस्त असतो. महेश नावाचा कलेक्टर याबाबत आवाज उठवू पाहतो. दैनिक 'प्रखर'मध्ये काम करणारा पत्रकार जया देशमुख याला बोलवून महेश या भूखंडाबाबत होऊ घातलेल्या गैरव्यवहाराची माहिती देतो आणि त्यासंदर्भातील कागदपत्रंही त्याच्या स्वाधीन करतो. या प्रकरणातील गांभीर्य जयाच्या लक्षात येतं आणि 'प्रखर'मध्ये तो या होऊ घातलेल्या गैरव्यवहाराविषयी सनसनाटी बातमी छापतो. त्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडते आणि इथूनच सुरू होतो महेशचा संघर्षमय प्रवास.

बातमीत कुठेही महेशचं नाव छापलेलं नसलं तरी मीडियापर्यंत ही बातमी महेशने पोचवली आहे, याची कुणकुण या गैरव्यवहाराशी संबंधित सगळ्यांना लागलेली असते. मग मुख्यमंत्र्यांपासून सगळे सावध होतात. रोजच्या रोज वांद्रा भूखंडाबाबतची नवीन माहिती प्रसारमाध्यमांतून उजेडात येत असल्यामुळे कदमांसह या प्रकरणाशी संबंधित सगळेच अस्वस्थ असतात. थेट मंत्रालयातून, विशेषत: सीएस साहेबांकडून महेशवर या प्रकरणावर पडदा टाकण्यासाठी दबाव येत असतो; पण महेश आपल्या भूमिकेवर ठाम असतो आणि जया देशमुखसारख्या तडफदार, निर्भीड पत्रकाराची त्याला समर्थ साथ असते.

एकूण, वांद्रा भूखंडाच्या गैरव्यवहाराशी संबंधित असलेल्या लोकांना महेश आणि जयाकडून जबरदस्त काटशह मिळत असतो. शह-काटशहाचा हा खेळ रंगात आलेला असताना महेशला या प्रकरणापासून परावृत्त करण्याचे प्रयत्न चालू असतात. मग वांद्रा भूखंड प्रकरणावरून महेशचं लक्ष हटावं म्हणून त्याला तातडीने अभ्यास दौऱ्यासाठी आणखी काही लोकांबरोबर परदेशवारीवर पाठवायचं ठरतं; पण आपण दौऱ्यावर गेल्यावर बांद्रा प्रकरण थंड पडणार नाही, अशी सोय महेश करून जातो. त्या परदेश दौऱ्यात महेशचं चारित्र्यहनन करण्यासाठी तो मदनिकांच्या जाळ्यात अडकेल अशी फिल्डिंग कदम भारतात बसून लावतात; पण त्यांचा तो प्रयत्नही निष्फळ ठरतो.

मेहता पब्लिशिंग हाऊस

रेड टेप

अभिजित कुलकर्णी



महेश अभ्यास दौऱ्यावरून परत येतो; पण बांद्रा प्रकरण अजून चालू असतं. आता त्या प्रकरणावरून मीडियाचं लक्ष वळवण्यासाठी एका सुशिक्षित तरुणीवर सामूहिक बलात्काराचं प्रकरण घडवून आणलं जातं आणि मग मीडियाकडून आपोआप वांद्रा प्रकरण बाजूला पडतं आणि बलात्काराचं प्रकरण गाजायला लागतं. प्रखरमधून जया बांद्रा प्रकरण लावून धरतो; पण बलात्कार प्रकरणामुळे त्यातली हवा निघून गेलेली असते. तसेच जया वगळता महेशला वांद्रा प्रकरणी साथ देणारे लोकही आपली भूमिका बदलतात.

या सगळ्या पार्श्वभूमीवर अन्य आयएएस अधिकाऱ्याबरोबर महेशची बदली केली जाते. कलेक्टर पदावरून त्याला मंत्रालयातील प्रोटोकॉल सेक्शनला पाठवण्यात येतं, जेणेकरून कुठल्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला तो आव्हान देऊ शकणार नाही; मात्र या सेक्शनमध्ये काम करत असतानाही त्याच्या डोक्यातून वांद्रा प्रकरण गेलेलं नसतं. अन् एक दिवस त्या प्रकरणाला शह देण्याची एक जबरदस्त कल्पना त्याला सुचते. काय असते ती कल्पना आणि ती तो कशी अमलात आणतो, हे जाणून घेण्यासाठी 'रेड टेप' ही कादंबरी अवश्य वाचली पाहिजे.

एकूणच, भ्रष्ट राजकारणाचं वास्तव दर्शन ही कादंबरी घडवते. राजकारण्यांच्या सत्तेच्या आणि धनाच्या मोहापायी ते जनहित कसं पायाखाली तुडवतात आणि जो कोणी त्यांच्या विरोधात आवाज उठवेल त्याची कशी मुस्कटदाबी करतात, केवळ राजकारणच नाही तर पत्रकारितेच्या क्षेत्रातही शिरलेली अपारदर्शकता, याचंही चित्रण या कादंबरीत केलं आहे; मात्र महेश आणि जयासारख्या माणसांमुळे या भ्रष्ट व्यवस्थेतही काही आशेची किरणं असतात, असा संदेशही या कादंबरीतून मिळतो. कोणत्याही चांगल्या गोष्टीसाठी दीर्घकाल लढा देण्याची तयारी नसल्यामुळे जनरेट्याचा म्हणावा तसा प्रभाव भ्रष्ट यंत्रणेवर पडत नाही, हे वास्तवही या कादंबरीच्या निमित्ताने समोर येतं.

राजकारणाचं, राजकारण्यांचं प्रातिनिधिक दर्शन घडविणारी, महेश आणि त्याच्या विरोधकांमधील शह-काटशहाचा खेळ रंगविणारी ही कादंबरी वाचनीय आहे. वाचकांची उत्सुकता ती शेवटपर्यंत ताणून धरते.

**-अंजली पटवर्धन**

रेड टेप

लेखक : अभिजित कुलकर्णी

पृष्ठसंख्या : २६८

किंमत : ३४० प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस

**ग्रंथाली येथे सभासदांना सवलतीत २६० रुपये**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## परतवाडा आणि बरेच काही

**संपादन : अरुण शेवते**



**मागे वळून पाहताना...**

'परतवाडा आणि बरेच काही...' हे अरुण साधू यांचे लेखांचे पुस्तक. सहा लेख असलेले. हे सर्व लेख वेळोवेळी एकाच दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेले आहेत. त्या दिवाळी अंकाचे नाव आहे 'ऋतुरंग'. या अंकाचे संपादक आहेत अरुण शेवते. शेवते यांनी त्यांच्या अंकासाठी नेहमीच वेगळेपण जोपासले आहे. ते वेगळेपण विषयाचे आणि त्यावर लिहिणाऱ्या लेखकांचेही. त्या त्या विषयास अनुसरून पुढे यथावकाश शेवते यांनी स्वतंत्र पुस्तके प्रकाशित केली, त्यातून त्यांचे वेगळेपण कायम राहिले, जोपासले गेले. तीच परंपरा कायम ठेवणारे हे पुढचे पाऊल, एकाच लेखकाचे त्याच्या विविध लेखांचे पुस्तक. अरुण साधू हे बहुआयामी असे व्यक्तिमत्त्व. शिवाय 'ग्रंथाली'च्या संस्थापकांपैकी एक. त्यामुळे सुदेश हिंगलासपूरकर यांचे नाते अतिशय धनिष्ठतेचे. त्याच आत्मीयतेने त्यांनी या पुस्तकात आपले मन मोकळे केले आहे. अरुणा साधू यांनी यांनीही या पुस्तकनिर्मितीचे मनापासून स्वागत केले आहे. ग्रंथालीने त्यांच्या चळवळीच्या वाटचालीशी समांतर असलेले एक चांगले पुस्तक वाचकांच्या हाती देऊन साधूचा प्रथम स्मृतिदिन त्यांच्या आगळ्यावेगळ्या प्रद्धतीने साजरा केला आहे.

पं. जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिमत्त्व उमदे आणि राजकारणात सर्वमान्य. राजकारणात ते जितके अग्रभागी तितकेच ते लेखक म्हणून ख्यातकीर्त. त्यांच्या प्रेमभावना आणि त्यांच्या नावाशी जोडलेल्या काही स्त्रिया यांची ओळख सर्वांनाच आहे. परंतु त्यात आणखी एक नाव आहे, पद्मजा नायडू (सरोजिनी नायडू यांच्या कन्या). त्यांना पं. नेहरूंनी लिहिलेली पत्रे यात दिलेली आहेत. पं. नेहरूंची पत्रे चटका लावणारी, खिळवून ठेवणारी आहेत. अतिशय नेटकी, कमी शब्दातील आहेत. त्यातून नेहरूंच्या मनातील तरल भावना, रसिकता, संवेदनशीलता यांचे सुरेख दर्शन होते. त्यांच्या भाषेचे माधुर्य व पारदर्शीपणा चटकन लक्षात येण्यासारखा आहे.

इंदिरा गांधी यांना लाभलेले बालपण आणि पं. नेहरू यांनी त्यांना दिलेले संस्कार यांची ओळख 'जगावेगळे बालपण : इंदिरा गांधी' या लेखात आहे.

सगळ्यात लक्ष वेधून घेणारा आणि कायम लक्षात राहावा असा लेख म्हणजे 'आतला आवाज'. 'मला आग्रह करू नका. माझा आतला आवाज सांगतो आहे. काही झाले तरी मुकुट मी स्वीकारणार नाही. मला सत्ता नकोच होती... मी लढले ते या देशाच्या लोकशाहीसाठी. लोकशाहीचा गळा घोटणाऱ्यांचा पराभव करण्यासाठी.' हे त्यांचे उद्गार! सोनिया, त्यांचा राजीवच्या जीवनात झालेला प्रवास, त्यांचे सांसरिक भावविश्व, इंदिरा गांधी यांच्याशी असलेले त्यांचे संबंध, राजकारणात येण्याची कारणे, त्यांनी अनुभवलेले भयंकर हत्यातांडव, पक्षाची जबाबदारी स्वीकारण्याची अपरिहार्यता, अशा अनेक अंगांनी हा लेख सजलेला आहे. यात आलेले वर्णन आणि लेखकाने पत्रकार म्हणून केलेले साधार विश्लेषण थक्क करणारे आहे. एक मोठा विषय आटोपशीर लेखात प्रभावीपणे कसा मांडता येतो, त्याचे हे उत्तम उदाहरण होय.

पद्मभूषण देशपांडे यांनी साधूंची घेतलेली साहित्यिक मुलाखत, ही साधूंची लेखक म्हणून असलेली भूमिका समजून घेण्यास उद्‌बोधक ठरावी अशी आहे. साहित्यव्यवहार, पत्रकार, भाषा, आंतरराष्ट्रीय घडामोडी, असा मोठा आवाका असलेली ही मुलाखत आहे.

'परतवाडा आणि बरेच काही...' हा लेख साधूंच्या बालपणीच्या गावाविषयीच्या आठवणी सांगणारा आहे.

अरुण साधू यांचे लेखांचे पुस्तक वाचत असताना त्यांच्या वैचारिक प्रगल्भ पातळीचा जागोजागी प्रत्यय येत राहतो. राजकारणावर लिहीत असताना त्यातले बारकावे, खाचखळगे टिपावे लागतातच. परंतु त्याचवेळी संपूर्ण वातावरणाचा, परिस्थितीचा, डावपेचांचा आढावा घेत पुढे जावे लागते. त्याला सुसंगत अशी साधार साखळी जोडावी लागते, त्याचे समर्पक असे विश्लेषण करावे लागते. तारखा, ठिकाणे, व्यक्ती यांचे सदर्भ असावे लागतात. ती सगळी व्यवधाने सांधूनी अतिशय कसोशीने सांभाळलेली आहेत. एखादा सुंदर गोफ न दिसणाऱ्या नाजूक धाग्यांनी गुंफावा, तसे हे लेख आहेत. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि सोनिया गांधी, यांच्या राजकारणांवर प्रकाश तर टाकलेला आहेच, परंतु त्यांचे आपसातले संबंध, सांसरिक जीवन, व्यक्तिगत पातळीवरील जगणे, त्यांचे भावविश्व, आवाका आणि मर्यादा, असा मोठा पट साधूंनी उलगडून दाखवलेला आहे. त्यांनी दिलेली वाक्ये ही काळाच्या आणि तर्काच्या कसोट्यांना पारखून आलेली आहेत, असे जाणवत राहते. 'स्वार्थकेंद्रित नेत्यांना वाऱ्याची दिशा सर्वात आधी कळते हे खरे, पण स्वार्थाच्या पलीकडे पाहण्याची वृत्ती नसल्याने त्यांना दूरचे दिसत नाही... व्यापक स्वार्थामध्ये स्वतःचा स्वार्थ शोधणाऱ्या पुढाऱ्यांमध्ये बऱ्यापैकी दूरदृष्टी असू शकते.'

पुन्हा पुन्हा वाचावे असे हे पुस्तक आहे.

गावाची आठवण, आपण बालपणी पाहिलेला – अनुभवलेला गाव आणि बऱ्याच काळाने दिसणारा गाव, यात कधीकधी खूप तफावत झालेली दिसते. काही नवीन उदयाला आलेले असते तर काही भग्न स्मृती जपताना दिसतात. अशाच एका भग्नेतचे प्रातिनिधिक चित्र मुखपृष्ठावर घेऊन ते सजवलेले आहे. परतवाडा आणि बरेच काही, या शीर्षकाशी साम्य दाखवणारे हे मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

## ग्रंथपान

### लाखो इथले गुरू
**फ्रान्सिस डिमेलो**



**खडूंच्या सोबतीने...**

'विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हा एक त्रिकोणच आहे. विद्यार्थी हा त्याचा शिरोबिंदू आहे; तर पालक आणि शिक्षक पायाचे दोन बिंदू! हे दोन्ही बिंदू जितके जवळ येतील तितका शिरोबिंदू उंच जाईल. याउलट जर हे दोन्ही बिंदू एकमेकांपासून दुरावले तर शिरोबिंदूवर असलेला विद्यार्थी खाली घसरल्याशिवाय राहणार नाही.' हे बोल आहेत विद्यार्थी आणि पालक यांच्याशी घनिष्ट नाते असलेल्या हाडाच्या शिक्षकाचे. सदतीस वर्षे मनोभावे ज्ञानदानाचे उदात्त कार्य करणाऱ्या अनुभवी ज्ञानवंताचे. शाळा, विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना समानतेच्या पातळीवर समजून घेणाऱ्या विचारवंताचे आणि जात, धर्म, उच्चनीचता यांच्या पातळ्या आडवळाने कधी आक्रमकतेने जपणाऱ्या हितचिंतकापेक्षा विश्वव्यापी माणुसकीच्या धर्माला प्राधान्य देणाऱ्या एका सहृदय माणसाचे! आपण, आपले व्यावसायिक क्षेत्र आणि त्याला लाभलेला परीघ, याच वर्तुळात वावरणारी माणसे अनेक असतात. मोठ्या पदावर पोहोचलेल्या विद्यार्थ्यांच्याच यशाचे माप आपल्या पदरात घेणाऱ्यांची संख्याही काही कमी नाही, परंतु असा कुठलाच भेदभाव न बाळगणारे काहीजण असू शकतात. शिक्षकच ज्ञानदान करू शकतो यावर अधिक भर देण्याऐवजी शिक्षकही विद्यार्थ्यांकडून शिकत असतो, असे मानणारे जे थोडेफार समग्रविचारी शिक्षक आहेत, त्यापैकी एक आहेत डिमेलो सर! सदतीस वर्षांच्या शिक्षकाच्या भूमिकेत वावरताना शाळा नावाच्या वावरात जे अनुभवांच्या आधारावर बरेवाईट पीक आले, त्याची रास त्यांनी या पुस्तकाच्या रूपाने वाचकांच्या समोर तयार करून ठेवली आहे. तिचे नाव आहे, 'लाखो इथले गुरू.'

हे अनुभव शाळा, तिचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, पालक, शालेय उपक्रमांच्या निमित्ताने भेटलेली अनेक मोठी माणसे, माजी विद्यार्थी यांच्याशी निगडित आहेत. पाठ्यपुस्तकात जसे वेगवेगळे विभाग असतात आणि प्रत्येक धड्याला स्वतंत्र शीर्षक असते, तशी मांडणी या पुस्तकाची आहे. विद्यार्थी, शिबिरे, पालक, शिक्षक, शिपाई, सुसंगती, आणि पुन्हा शाळा, असे सात विभाग आहेत. या सर्व विभागात मिळून एकोणचाळीस लेख आहेत. त्यामुळे जे सांगायचे, ते आटोपशीर आणि नेमकेपणाने मांडता आलेले आहे. यात कुठेही शैक्षणिक तत्वज्ञानाच्या पाट्या टाकून पाल्हळिकपणाने पानेच्या पाने भरणारा मजकूर नाही. ज्यांच्याविषयी लिहिले आहे, त्यांना अवास्तव वाटेल असे रंगवलेले नाही. मुद्देसूदपणा म्हणून जो काही एक गुण असतो त्याचा प्रत्यय या लेखनात येतो. स्वतःचेच अनुभव सांगायचे म्हणून उगाच फापटपसाराही नाही. यात कुठे 'मी' मी डोकावत नाही. इतरांवर 'तो' मात करीत नाही. संथ आणि शांतपणे तसेच तितकेच संयमाने केलेले हे अनुभवकथन आहे. विद्वत्ता असूनही लेखनात त्याचे बोजडपण होणार नाही, याची काळजी घेतलेली आहे. समवयस्कांशी आपण जितक्या सहजपणे संवाद करतो, तसे लेखन आहे. त्यामुळे त्यातला अस्सलपणा उठून दिसतो. 'लाखो इथले गुरू' या शीर्षकावरून याची कल्पना यावी. शाळेत केवळ शिक्षकच गुरूच्या भूमिकेत वावरत असतो असे नाही. विद्यार्थी, पालक, व्यवस्थापन, शिपाई, उपक्रमाच्या निमित्ताने त्या त्या वेळी भेटणारी माणसे, ही गुरूपेक्षा कमी नसतात, असे इतरांना मोकळेपणाने आणि मोठ्या मनाने श्रेय देणारी वृत्तीच सारे काही सांगून जाते.

'गोखले एज्युकेशन सोसायटी'च्या अनेक ठिकाणी शाखा आहेत. त्यापैकी परळची आर एम भट शाळा येथे सरांनी बावीस वर्षे पुढे पंधरा वर्षे बोरिवलीच्या शाळेत, असे सदतीस वर्षे (१९७१ ते २००८) ज्ञानदान केलेले आहे. शिक्षक म्हणून कितीही विद्वान असलात, तरी गरज असते ती विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्याची कला अवगत करण्याची आणि स्वतःचा जम बसविण्याची. या गोष्टी साध्य झाल्या की मग पुढचा प्रवास सुखाचा होतो. यासाठी काय करावे लागले, याचा अनुभव सर देतात. वर्गात टारगट असलेला मुलगा पीटीच्या तासालाही टारगटपणा दाखवायला लागला, तेव्हा सरांनी त्यांच्यातला शिक्षक बाजूला ठेवून त्याला वठणीवर आणला. तो टारगट वठणीवर तर आलाच पण पुढे यशस्वीही झाला परंतु त्या एकाच प्रसंगाने इतर विद्यार्थ्यांना सर काय आहेत, याची कल्पना आली. हर्षद हा विद्यार्थीही तसाच. सगळ्या शिक्षकांनी त्याच्यासमोर हात टेकलेले, परंतु हर्षदच्या वागण्यामागचे कारण शोधल्यानंतर सरांची भावना बदलली. त्याला सगळ्या शिक्षकांनी सहकार्य करावे अशी विनंती केली. सुबोध, महेंद्र, मनीषा, रामाने, संगिता, संजय, सुल्या, चंदू, अशा अनेक विद्यार्थ्यांविषयीच्या आठवणी दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांना समजून घेणारा शिक्षक अशी ओळख त्यांनी निर्माण केली. जवळपास दोन ते अडीच हजार विद्यार्थ्यांची संपूर्ण नावे त्यांना पाठ आहेत. ते लिहितात, 'सर्वच मुले एकाच परिस्थितीतून येत नाहीत. मुलांची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच आपण त्यांच्याशी वागायला हवं. विद्यार्थ्यांनाही भावभावना असतात. त्या शिक्षक समजून घेत नाहीत, त्यांना व्यक्त करायला संधी देत नाहीत. समजून घेणे, व्यक्त व्हायला संधी देणे हे शिक्षकांचे कर्तव्यच आहे.'

पालकांच्या सभा हा एक वेगळाच विषय असतो. यात पालकांचे अनेक नमुने अनुभवाला येतात. पालकांशी नाते जोडणे सरांना नेहमीच महत्त्वाचे वाटत आले. विद्यार्थ्यांसाठी अनेकदा ते पालकापर्यंत घरी पोहोचले. कधी त्यांना शाळेत बोलावून घेत. त्यातून एक वेगळे नाते तयार झाले. पालकांना सल्ला देतात, 'पालकांनी 'कंपल्शन' (सक्ती),'कंपेरिजन' (तुलना) आणि 'क्रिटिसिझम' (टिकास्त्र) हे तीन सी टाळणे आवश्यक आहे.'

या पुस्तकाला फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांची प्रस्तावना लाभलेली आहे. तर सुंदर मुखपृष्ठाची जबाबदारी सतीश खानविलकार यांनी उत्तमपणे सांभाळलेली आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**माझ्या मनातलं**

**संपादन : अरुण शेवते**




**मनाचा तळ शोधताना**

'आपलं मन नदीसारखं असतं. ओढ्यासारखं खळखळाट करणारं असतं. वाऱ्यासारखं उधळणारं असतं. आपलं मन तळ्यासारखं शांत असतं आणि वादळासारखं अशांतही. आपल्या मनात आपण काय साठवून ठेवलेलं आहे हे आपलं आपल्याही कळत नसतं. आयुष्य जगत असताना आपलं मन घडत असतं आणि...सारं काही सांगून जात असतं...' 'ऋतुरंग' या रौप्य महोत्सवी दिवाळी अंकाचा विषय होता, 'माझ्या मनातलं.' त्याच दिवाळी अंकातील तेच शीर्षक असलेला निवडक लेखांचे हे पुस्तक आहे. संपादन केलं आहे अरुण शेवते यांनी. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर या पुस्तकाचा क्रमांक आहे त्रेपन्नवा.

गुलजारांची दिग्दर्शक म्हणून कारकिर्दीला सुरुवात झाली त्याला कारण एन.सी.सिप्पी. सिप्पी हे स्वतः सिनेमा निर्माते, दिग्दर्शक म्हणून लौकिक असलेले. कामात, वागण्यात शिस्त असलेले. जे काम करायचे त्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही शिस्तीत असलेला. माणूस निवडताना, त्यांच्यावर जबाबदारी सोपवताना त्याला पारखून घेण्याची उपजत कला, कुठल्याही चांगल्या कामासाठी वाटेल ती साहस करण्याची तयारी. यामुळे सिनेजगतात स्वतःचा दबदबा निर्माण केलेल्या सिप्पीसाहेबांच्या सोबत काम करण्याची संधी मिळणे ही गुलजार यांच्यासाठी मोठी भाग्याची गोष्ट ठरली. गुलजार पुढे स्वतःच्या कलेने, प्रतिभेने नामवंत व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहिले, त्यामागे सिप्पींचे मार्गदर्शन आणि सहाय्य मोलाचे ठरले. त्यांच्यासोबत काम करताना आलेले अनुभव, त्यांनी केलेली पारख, त्यांचा साहस दाखवण्याचा उदार दृष्टिकोन, हे सारे सांगताना, स्वतः मी कसा घडत गेलो, त्यात सिप्पी साहेबांचा वाटा किती महत्त्वाचा होता, याचे प्रांजळ कथन 'मेरे अपने...सिप्पीसाहेब' या लेखात गुलजार यांनी केलेले आहे.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचे गायनाविषयीचे अनुभव हा सगळ्यांच्या उत्सुकतेचा विषय. सगळ्यात लक्षात राहणारा अनुभव आहे तो 'ऐ मेरे वतन के लोगो' या गाण्याविषयीचा. या गाण्याने क्रांती घडवली, तसे गैरसमजही पसरविले. मुळात हे गीत आशा भोसले गाणार होत्या परंतु ते त्यांच्या ऐवजी लताजींनी गायले, यात त्यांचा स्वार्थ होता, असे काही गैरसमज! ते समज या लेखाने दूर होतातच, परंतु एक वेगळा अनुभव सगळ्यांना हेलावून जातो. गाण्याच्या निमित्ताने उच्चारले गेलेले शब्द आनंदच देतील याची खात्री नसते. काही गाणी अजरामर होतात, पण त्यांनी दिलेल्या जखमाही अजरामरच असतात.'

'ग्रंथाली'चा गेली बेचाळीस वर्षांचा समृद्ध अनुभव गाठीशी असलेले सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या उपक्रमशीलतेविषयी 'ग्रंथालीतील माझे दिवस' या लेखात अतिशय आत्मीयतेने मन मोकळे केले आहे. कुमार केतकर, दिनकर गांगल आणि अरुण साधू यांचा सहवास लाभलेल्या सुदेशसाठी ग्रंथाली म्हणजे एक विद्यापीठच. तिचा चढता आलेख आणि ग्रंथालीसोबत स्वतःची होत गेलेली जडणघडणही ते मोकळ्या मनाने सागूंन जातात. उदय निरगुडकर यांनी आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सांगताना कुटुंबातील प्रत्येकाविषयी अलिप्तपणे लिहिले आहे. 'आयुष्य म्हणजे नेमकं काय...?' या लेखात ही आत्मीयता आणि कृतज्ञता व्यक्त झाली आहे. 'ताई आणि माई' या लेखात गिरीश कुबेर यांनी या दोन आजींविषयी लिहिले आहे.

राजीव खांडेकर यांनी पत्रकारितेतील अनुभवांविषयी लिहिले आहे. वकिलाच्या सोबत सर्वोच्च न्यायालय सुद्धा ग्रहदूषित असू शकते, हा अनुभव 'न्यायालयाचा अवमान होईल' या कारणास्तव जाहीर करता आला नाही, त्याची त्यांना वाटत असलेली खंत. अजमल कसाबला फाशी देताना शासनाने पाळलेली कमालीची गुप्तता असून ती बातमी मिळणे, मिळालेल्या बातमीचा पाठपुरावा करताना करावी लागलेली कमालीची चिकित्सक कसरत, आणि आपल्या चॅनलवर सगळ्यांत प्रथम ती बातमी दाखविल्यात मिळालेला आनंद. पत्रकारितेची पथ्ये पाळताना येणारे अविस्मरणीय असे अनुभव म्हणजे पत्रकारासाठी मोठी शिदोरीच असते, तिचा प्रत्यय 'बातमी' या लेखात येतो.

याशिवाय संदीप वासलेकर यांचा 'माझ्या स्मरणातले जग' हा लेख, 'भेट तुझी माझी...' हा सुशीलकुमार शिंदे यांचा लेख, 'आम्ही दोघे ' हा नितीन गडकरी यांचा लेख, मनोहर पर्रीकर यांचा 'अधुरी एक कहाणी', निखिल वागळे यांचा 'सुकून' हा लेख, हे लेख स्वतःचे अनुभव, स्वतःची माणसे, त्यांच्याविषयीच्या आठवणी, अनुभव, स्वभाव मोकळेपणाने सांगतात.

या पुस्तकातील लेख हे आपापल्या क्षेत्रात लौकिक प्राप्त केलेल्या नामवंतांचे लेख आहेत. हे लेख अतिशय खाजगी स्वरूपाचे, कौटुबिंक नातेसंबधांचे आहेत. याविषयी फारसे कुणी असे जाहीरपणे मन सहसा मोकळे करीत नाही. परंतु इथे कुठलाही आडपडदा ठेवलेला नाही. मनातल्या जगण्याचे संदर्भ पारदर्शीपणे मांडलेले आहेत. आपण एका कुटुंबातील आहोत, एकत्र गप्पागोष्टी, संवाद करण्यासाठी आलो आहोत आणि त्याविषयी मनसोक्त असे बोलत आहोत, असे हे लेखन वाचताना जाणवत राहते. यातल्या काही लेखांचे शंब्दाकन दुसऱ्यांनी केलेले आहे. परंतु ते वाचत असताना त्यात कुठे परकेपणा जाणवत नाही. कर्ता स्वतः आपल्यासमोर बोलत आहे, आपल्याशी संवाद साधत आहे, असेच वाटते. कुठलाही लेख वाचला तरी आपण त्याच्याशी एकरूप होतो, आणि नकळत पुढचा लेख वाचायचा मोह होतो. असे हे वाचनीय पुस्तक आहे.

माणसाचे मन हे फुलपाखरासारखे असते, अनेक रंगाच्या छटा असलेले. त्या छटांची प्रतिमा घेऊन सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ सुंदरपणे सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत ११० रुपये**

## ग्रंथपान

### हे काही शब्द
**रत्नाकरी मतकरी**



**खोल गाभाऱ्यातला नाद**

रत्नाकर मतकरी यांचा परिचय एक गूढ-कथाकार आणि यशस्वी नाटककार, इतका मर्यादित नाही. वीस कथासंग्रहाबरोबरच सत्त्याण्णव नाटके, अठरा एकांकिका संग्रह आणि आत्मचरित्र, वैचारिक लेखसंग्रह, ललित लेखसंग्रह, कादंबरी, बालसाहित्य, असे विपुल साहित्य त्यांच्या नावावर आहे. म्हणजेच साहित्यातील सर्वच प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळलेले आहेत. नाटक, सिनेमा, मालिका यातून कविता, गाणी यांनी यापूर्वीच आपली नाममुद्रा कोरून ठेवलेली आहे. त्यांचा कवितासंग्रह 'ग्रंथाली'ने प्रकाशित केला आहे, त्याचे नाव आहे, 'हे काही शब्द'.

कुंती आणि विदुर यांच्या संवादातून निघालेले तत्त्वज्ञान हे आत्मपरीक्षणाचे आहे तसे आत्मवंचनेचे. वंचना ही गरीब-श्रीमंत, लहान-थोर, उच्च-नीच यावर अवलंबून असतेच, तशी ती जन्मावरही अवलंबून असते. हा जन्म उजाड माळरानावर होऊ दे नाहीतर राजमहालात. तिचा विखार कुठल्याही सन्मानाने शीतल होत नाही, कुठल्या राजवस्त्राने झाकला जात नाही. त्यातल्या जखमा अखंड भळभळत राहतात, अश्वत्थाम्याच्या जखमेसारख्या! कर्णाच्या वाट्याला आलेली वंचना, विदुराच्या वाट्याला आलेली वचंना तशी कुंतीची वंचना! विदुर आणि कर्ण हे दोघेही सूतपुत्र, त्यामुळे त्यांच्या वाट्याला आलेले भाग्य केवळ त्यांच्या जन्माशी जोडलेले आहे. त्याविषयी कुंतीच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द त्यांच्या सत्यतेचे दर्शन घडवितात,

माय बदलताच जात बदलते, आणि बदलते विधिलिखित नाहीतर माझ्या कर्णाचे का चुकले असते सारे गणित? या ओळी मग साकार होतात.

'टेकड्यांचा प्रदेश' या कवितेत टेकड्यांच्या मनोगतातून त्यांचा दृष्टिकोन चित्रित झाला आहे. या खुज्या वृत्तीच्या प्रवर्तकांना उंची लाभलेल्यांचे कौतुक नसतेच मुळी. उलट करायचाच झाला तर तो असतो हेवा, नकारात्मक भाव, आपल्यापेक्षा कोण कसा हीन आहे, हे सिद्ध करणे. अशा खुज्या लोकांच्या संख्येला कधी मर्यादा आढळत नाही आणि आज अशाच टेकड्यांचे प्रदेश जागोजागी पसरलेले दिसतात.

अलीकडे मोबाईल नावाच्या संपर्कमाध्यमाने खूप जणांना आपल्या संपर्कात जोडले आहे. त्याचा आपल्याला काही प्रमाणात अभिमानही वाटत असतो. त्यात दिवसागणिक भरच पडत जाते, कमी होण्याचे प्रमाण जवळजवळ नाहीच. कधी तटस्थपणे या जोडलेल्या माणसांच्या यादीकडे पाहिले तर, स्थळकाळानुसार त्यात बदल करण्याची खरच गरज असते आणि त्याप्रमाणे मन तयारही होते, नको असलेले संपर्क यातून वगळूया म्हणून परंतु प्रत्यक्षात तसे करायला पुन्हा मन राजी होत नाही, अशी ही अवस्था येते. मन उचल खाते. मोबाईलमुळे जी मानसिक आंदोलने तयार होतात, त्यांचे आवर्त या 'डिलिट' कवितेत वाचकालाच कवेत घेते.

'हे काही शब्द' याच नावाची एक दीर्घ कविता आहे, जी संग्रहाच्या अगदी सुरुवातीला आहे. लेखक, कवी यांचे आयुध म्हणजे शब्द. व्यक्त होण्यासाठी उपयोग होतो तो शब्दांचा. प्रतिभेचे धुमारे फुलतात ते शब्दांनी. कुणी, कुठे, कधी, कसे शब्द वापरायचे, हे पुन्हा स्थळकाळानुसार ठरते. शब्दांची किमया अगाध आहे, हे खरेच, परंतु या शब्दांच्या जातकुळीविषयी साहित्यिक किती जागरूक आहे, त्यांचा वापर किती चपखल करतो, त्यांचे संदर्भ आणि व्यक्तिमत्त्व जपण्याचा किती प्रयत्न करतो, हे अधिक महत्त्वाचे आहे. अन्यथा त्यांचे गुळगुळीत चमकतेपण तेवढेच दिसत राहील. जणू साहित्यिकांना सावधानतेचा इशाराच या कवितेतून दिलेला आहे. बालगीत कसे असावे, याचा सल्ला देणारी कविता स्वतंत्रपणे समाविष्ट आहेच.

'पुस्तकाचा वास' ही अशीच एक सुंदर कविता आहे. प्रत्येकाला त्याचा वास येतो तो त्याच्या वकुबानुसार, परंतु जो पुस्तकप्रेमी आहे, त्याला जो वास येतो, तो असतो फक्त पुस्तकाचा. त्यात अनेक संदर्भ जोडलेले आहेत. 'विकते इथं; पिकत नाही','नाते : अखंड आणि अनंत', 'निरर्थाचा महापूर', 'दिवाळी येईल' 'शांतता' अशा इतरही अनेक सुंदर कविता या संग्रहात आहेत.

या संग्रहाची दोन भागात विभागणी करण्यात आलेली आहे. पहिला भाग हा 'कवितांचा' आहे. यात आलेल्या कविता या दीर्घ स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यासाठी मुक्तछंदाचा वापर केलेला आहे, परंतु त्यांच्यात असलेली लय आणि बहुपेडी आशयाचा असलेला अतूट धागा वाचताना खिळवून ठेवतो. कविता सूत्ररूपाने येते तसे तिचे संदर्भ काळाशी संघर्ष करीत येतात, त्याला आपल्या प्रभावाशी जखडून ठेवतात. अनेक स्तरावरील खोलवरच्या नादाला ते मोकळे करू पाहतात. तर दुसरा भाग हा 'नाटक व इतर माध्यमातील निवडक गाणी' असा आहे. यात सूत्रधाराने, समूहाने नाटक पुढे नेण्यासाठी गायलेल्या गीतांचा समावेश आहे. तसेच नाटकातील कथानकाचा भाग म्हणूनही आलेली गीते आहेत. अर्थात ज्यांनी नाटके पाहिलेली असतील, त्यांना ती पट्कन आठवतील.

या संग्रहाला कवी आणि अभिनेता सौमित्र आणि संगीतकार यशवंत देव यांच्या प्रस्तावना लाभलेल्या आहेत. यशवंत देवांनी संगीत दिलेली गाणीही यात आहेत. कविता आणि गाणी अशा दोन्ही काठांना जोडणाऱ्या या प्रस्तावना आहेत. या संग्रहात रत्नाकर मतकरींनी कवितांना अनुरूप अशी रेखाचित्रे रेखाटलेली आहेत. त्यांच्यातली तरलता कवितेइतकीच उत्कट आहे. या संग्रहाचे मुखपृष्ठ देखील त्यांनीच सजवलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

ग्रंथाली





मूल्य ६०० रुपये
सवलतीत ३६० रुपये

## धर्मधुरीण - डॉ. प्रकाश लोथे

वऱ्हाडातील कर्मठ सनातनी कुटुंबातील धर्मपरायण आबासाहेबांचा मुलगा श्याम ख्रिश्चन मिशनऱ्याच्या प्रभावाखाली येऊन वडिलांशी टक्कर घेऊ पाहतो, तेव्हा त्यांच्यात निर्माण होणारा जीवघेणा संघर्ष चितारणारी ही कादंबरी एकदा वाचावयास घेतली तर खाली ठेववत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही हृदयद्रावक कहाणी बंगाली लेखक शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांची आठवण करून देते.

स्त्री शिक्षण, विधवा विवाह, स्वातंत्र्यपूर्व राजकारण व देशाची फाळणी असलेल्या अनेक तत्कालीन समस्यांमुळे निर्माण झालेला प्रखर वैचारिक लढा चितारत, अनेक कौटुंबिक समस्यांचे पदर सहज उलगडत जाणारी संयत भाषाशैलीतली ही कादंबरी मनाला चटका लावून जाते.

- दिनकर गांगल




मूल्य ६०० रुपये
सवलतीत ४०० रुपये

## कारवारी माती - वसंत नरहर फेणे

ही कादंबरी सुरू होते १९०१ मध्ये आणि संपते १९४७ साली. उत्तर कन्नडामधील, अंकोला तालुक्यातील, होन्नेकेरी या खेड्यातील एका वाड्यात राहणारा, गणपतराय हिचकड आणि त्याचा मुलगा विद्याधर हे दोघे केंद्रवर्ती असणाऱ्या ह्या कादंबरीत, त्या दोघांच्या अवास्तव बौद्धिक तसेच भावनिक अहंकारामुळे, त्या कुटुंबांतील व्यक्तींची आणि त्यांच्या नातेवाइकांची होत गेलेली फरफट, त्या साऱ्यांच्या स्वभावांचे विलक्षण कंगोरे, त्यातून त्यांचं घडणं, मोडणं आणि पुन्हा नव्याने घडणं या सगळ्यांचा कादंबरीकाराने सूक्ष्म निरीक्षण पद्धतीने जो वेध घेतला आहे; तो मनोवेधक आणि विलक्षण आहे. ह्या साऱ्या कथेला स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी असल्याने, त्या काळातील सामाजिक अवकाशाच्या प्रभावपरिणामातून जे काही रचित निर्माण होतं, त्या रचितातून ही चित्रमय शैलीतील कादंबरी साकार होत जाते. ह्यातील प्रत्येक व्यक्तिरेखेची त्या काळातील जीवनरीती, मूल्यसरणी, समूहभाव, प्रेमभाव यांमध्ये, स्थळ-काळानुसार बदल होत जाण्याने, त्यांच्या परस्पर नात्यात आणि व्यवहारात निर्माण झालेला टकराव, घुसमट ह्यांना प्रवाही गद्यशैलीमुळे वाचनीयता प्राप्त झाली आहे.




मूल्य ३५० रुपये
सवलतीत २५० रुपये


## हुंकार - डॉ. अनंत पां. लाभसेटवार

...जीवनात कुठेही संघर्ष दिसला की माझ्यातला कथालेखक जागृत होतो आणि तो शब्दबद्ध करण्यास माझी लेखणी सरसावते. जगात सुखापेक्षा दुःख, त्यागापेक्षा भोग आणि सौहार्दापेक्षा कलह जास्त सापडत असल्यामुळे विषयांना तोट नाही. पाहिजे ती चिकित्सक बुद्धी आणि लिहिण्याची ओढ. देश व वेष वेगळे म्हणून माणसाच्या भावना व मनोवृत्ती बदलत नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत तीच आसवं उभी राहतात आणि छातीत तेच काळीज धडधडत असतं. त्यामुळे घटना वेगळ्या असल्या तरी प्रतिक्रिया कशी होते हा कथेचा सार ...लघुकथा म्हणजे एक प्रकारचं शीघ्र साहित्यच. मॅकडोनल्डच्या शीघ्र अन्नाप्रमाणे (फास्ट फूड) ...लघुकथांचे दोन प्रकार म्हणता येतील- मनोविश्वलेषणात्मक व घटनात्मक. मनाचे विविध पापुद्रे उलगडून कथा लिहिल्यामुळे मराठीच्या साहित्याच्या मुशीत फ्रॉईड केव्हाच फ्राइड (तळलेला) झाला आहे... रोजच्या जीवनात जगभर जो कलह सापडतो, तो कलात्मकरीतीने गुंफला तर लालित्यपूर्ण कथा निर्माण होऊ शकते. त्यासाठी मनोविकारतज्ज्ञाची जरुरी नसते. अनुभवांचं भांडवल आपण कृतीतून व वाचनातून मिळवू शकतो. म्हणजे लेखक होण्यासाठी प्रथम वाचक होणं आवश्यक असतं.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव
पुस्तकांचे गाव
• स्ट्रॉबेरीसोबत पुस्तकांचा आनंद घ्या !
• पुस्तके वाचायला या / राहायला या
(निवास व्यवस्था - सशुल्क असेल)
• ३० घरे, २८ साहित्य प्रकार, २५,०००हून अधिक दर्जेदार पुस्तके...
मु. पो. भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा ४१२८०५
संपर्क : ०२१६८-२५०१११
pustakanchgaav.rmvs@gmail.com
राज्य मराठी विकास संस्थेचे सुरू असलेले प्रकल्प
• मायमराठी
(अमराठी भाषकांना मराठीचे प्रशिक्षण)
• मराठी बोलींचे प्रतिमांकन
• बृहन्महाराष्ट्रातील संस्थाना अनुदान
• मराठी संशोधन संस्थांना अनुदान
• दुर्मिळ पुस्तके व नियतकालिके संवर्धन
• संगणकीय आज्ञावल्यांचे मराठीकरण
• भाषाविज्ञान शिष्यवृत्ती योजना
• गीतार्णव शब्दार्थ संदर्भ कोश
• विधिशास्त्र संज्ञा संकल्पना कोश
• ऑलिम्पिक माहितीकोश
• रंगवैखरी- आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धा
• फिरते वाचनालय
• भाषिक कौशल्यांच्या विविध स्पर्धा
संस्थेची निवडक प्रकाशने
₹२००/-
₹१२५/-
₹२१०/-
₹२००/-
₹४००/-
₹१६००/-
₹१३३६/-
₹२७५/-
राज्य मराठी विकास संस्था
नोंदणी क्र. एफ १६०९५
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी: (०२२) २२६३ १३२५. संकेतस्थळ: http://www.rmvs.in ई-पत्ता : rmvs_mumbai@yahoo.com

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.